म. ग्रं. सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क्र. 3032
REFBK-0024186

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, ते न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा फी भरावी लागेल.

3 MAY 1984
20 MAY 1984
30 MAY 1984
10 JUN 1984
21 JUN 1984
4 JUL 1984
1 AUG 1984
8 AUG 1984
2 SEP 1984
9 SEP 1984
23 SEP 1984
9 JUN 1985
16 JUN 1985
21 AUG 1985
11 MAY 1988
5 JUN 1988
5 JUN 1988
10 JUL 1988

( क्र. मा. प. )
५०००—१२-८२

कांधणी

म. ग्रं. संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 3032 / २४१८६
निबंध १७।४।५९
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ निबंध
3032
२४९८६
१७।४।८४

# दि आर. एस. एस. स्टोरी

(राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे, स्थापनेपासून आजपर्यंतचे, वास्तव दर्शन)

लेखक : श्री. के. आर. मलकानी

अनुवाद : श्री. आनंद हर्डीकर

प्रस्तावना : श्री. नानाजी देशमुख

REFBK-0024186

स्नेहल प्रकाशन

स्नेहलशी स्नेह
अर्थात दर्जेदार
वाङ्मयाशी स्नेह.

प्रकाशक
रवींद्र कृष्ण घाटपांडे
स्नेहल प्रकाशन
१२२८/ब शिवाजीनगर,
पुणे ४११००४.

मुखपृष्ठ : अनिल उपळेकर

© श्री. के. आर. मलकानी

प्रकाशन : १५ मार्च १९८४

मुद्रक
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९ सदाशिव पेठ,
नागनाथपाराजवळ, पुणे ३०.

मूल्य सत्तर रुपये

पूर्णार्थाने आदर्श स्वयंसेवक असलेल्या
कै. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे
पवित्र स्मृतीस अर्पण !

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| * | प्रतिज्ञा | ५ |
| * | प्रकाशकाचे मनोगत | ६ |
| * | प्रस्तावना | ९ |
| * | रा. स्व. संघ उल्लेखनीय मते | १० |
| * | केशव | १ |
| * | संघाचा जन्म | २४ |
| * | श्री गुरुजी | ५२ |
| * | १९४७ | ७० |
| * | महत्त्वाचे प्रश्न | ९५ |
| * | विचारधन | ११६ |
| * | उत्कर्षाच्या शिखरावर | १३६ |
| * | आजचा संघ | १५५ |
| * | संघ आणि राजकारण | १७६ |
| * | रा. स्व. संघ आणि जनता | १९३ |
| * | दंगली– वस्तुस्थिती– न्यायालये | २१४ |
| * | चांगले कार्य | २३७ |
| * | सामाजिक उणिवा | २५६ |
| * | इतिहास हेच खरे तत्त्वज्ञान | २७७ |
| * | प्रातःस्मरण | ३०६ |
| * | प्रार्थना | ३११ |

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची प्रतिज्ञा

सर्वशक्तिमान श्री परमेश्वरास आणि आपल्या पूर्वजांस स्मरून मी अशी प्रतिज्ञा करतो की, हिंदू धर्म, हिंदू संस्कृती व हिंदू समाज यांचे संरक्षण करून हिंदू राष्ट्राला समर्थ करण्यासाठी मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा घटक झालो आहे. मी संघाचे काम प्रामाणिकपणे, निःस्वार्थबुद्धीने व तन-मन-धनपूर्वक करीन व हे व्रत आजन्म पाळीन !

भारत माता की जय !

## प्रकाशकाचे मनोगत...

कमी-अधिक प्रमाणात का होईना राज्यकर्ते हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विरोधातच राहिले त्याचे कारण ह्या विस्तृत सांस्कृतिक संघटनेस त्यांना पाहिजे तसे वाकवता आले नाही, वागवता आले नाही हेच असले पाहिजे.

आणीबाणीच्या काळात तुरुंगात राहिलेल्या समदुःखी लोकांनी, 'आम्ही विचारांनी एकमेकांच्या जवळ आलो आहोत' अशी कल्पना करून घेऊन (वास्तविक सर्वजण परिस्थितीने एकमेकांजवळ आलेले होते) जनता पक्षाची निर्मिती केली. वास्तविक आणीबाणीत संघाने केले कार्य, सत्याग्रह आणि त्याचबरोबर १९७७ च्या निवडणूकीत केलेले सक्रीय सहकार्य यामुळें जनता पक्ष सत्तेवर आला. आणि सत्तेवर येताच ती उपभोगण्याची जाण नसलेल्या विविध विचारांच्या नेत्यांनी ती आपणच उपभोगावी या कल्पनेने एकमेकांत झोंबाझोंबी सुरू केली. दुहेरी सदस्यत्वाचा बागुलबुवा उभा करून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला बदनाम करण्यास सुरुवात केली. सत्तेच्या मस्तीत असलेली जनता पक्षातील मंडळी संघाला योग्य जागा द्यायला विसरली आणि कधी नव्हे ते संघविरोधी विचारांचा गदारोळ उठला. जनता राजवटीत त्याचा क्लायमॅक्स झाला. जनता मंडळींत होत असलेल्या भांडणाचे पडसाद वृत्तपत्रांतून उमटू लागले. काही मोजकी वृत्तपत्रे सोडली तर बाकीच्या सर्व वृत्तपत्रांनी आणीबाणीत आपला दाबलेला गळा ज्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने मोकळा करण्याचा प्रयत्न केला त्या – संघावरच मुक्तकंठाने टीका करण्यास सुरुवात केली. याचा परिणाम सामान्य माणूस गोंधळून गेला. त्याचा असा गैरसमज झाला की जनता पक्ष आणि त्याचे सरकार रा. स्व. संघामुळेच कोसळले आणि म्हणून त्या काळात माझ्या

मनात असा विचार आला होता की, संघ समजावून देणारे एखादे तरी पुस्तक आपण प्रकाशित केले पाहिजे की सामान्य माणसाला ते रा. स्व. संघाचे वास्तवदर्शन घडवेल. त्याच्या सर्व प्रश्नांना उत्तरे मिळतील.

परंतु जनता सरकार कोसळले. हाती आलेली सत्ता घालवून बसलेली मंडळी रस्त्यावर खाली मान घालून दिसू लागली. इंदिरा शासन आले आणि संघावर नेहमी राजकीय हेतूने होणारे आरोप सोडले तर चर्चा कमी होत गेली. पण प्रश्न राहिलाच. रा. स्व. संघ म्हणजे आहे तरी काय ?

त्यानंतर मध्यंतरी रा. स्व. संघावर दोन-तीन पुस्तके निघाली. त्यात संघाचे खरे स्वरूप समजावण्यापेक्षा व्यक्तिगत असंतोषच शब्दांकित झाला. स्वतःच्या 'गुणांमुळे' विपरीत अनुभव आलेल्या, अपरिपक्वता असलेल्यांनी संपूर्ण संघाचेच मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला त्यात वास्तवता तर नाहीच नाही पण संघाबद्दल गैरसमज वाढवण्याचेच काम या लेखकांना करावयाचे आहे की काय असे वाटते. त्यामुळे माझ्या विचारांनी पुन्हा उचल घेतली की राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे वास्तव दर्शन घडविणारे पुस्तक लोकांपर्यंत पोहचले पाहिजे, ज्यामुळे संघाची सामाजिक, सांस्कृतिक, विधायक भूमिका लोकांपुढे मांडली जाईल आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ म्हणजे आहे तरी काय ? या प्रश्नास पूर्णत्वाने उत्तर मिळेल.

आणि तो सुयोग जुळून आला. 'ऑर्गनायझर'चे संपादक संघाचे निष्ठावंत कार्यकर्ते श्री. के आर. मलकानी यांचे 'दि आर. एस. एस. स्टोरी' पुस्तक वाचनात आले. संघाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या बारीक सारीक गोष्टींची तपशीलवार नोंद घेणारे हे पुस्तक मराठीत आले तर संघाबद्दलच्या सर्व गैरसमजांना उत्तरे मिळतील असे वाटले आणि म्हणून हे पुस्तक मराठीत भाषांतर करून प्रसिद्ध करू का ? अशी विचारणा श्री. के. आर. मलकानी यांचेकडे केली असता त्यांनी तत्काळ मान्यता दिली आणि फार दिवसाचे माझे स्वप्न पूर्ण झाले. कदाचित आपलेही झाले असेल. मी श्री. मलकानी यांचा अत्यंत ऋणी आहे.

गोंडा प्रकल्पाचे शिल्पकार ! एक विधायक दृष्टी घेऊन जनता सरकारच्या काळात आलेले मंत्रिपद लाथाडून विधायक आदर्श भारतातल्या नागरिकांसमोर उभे करणारे व दीनदयाल शोध संस्थान दिल्लीचे कार्याध्यक्ष मा. श्री. नानाजी देशमुख यांनी आपल्या प्रचंड व्यापातून माझ्यासाठी वेळ काढून या विषयाला पोषक अशी प्रस्तावना दिली. त्यांचे ऋण कसे मानावेत मला समजत नाही, पण त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

श्री. आनंद हर्डीकर यांनी 'दि आर. एस. एस. स्टोरी' मराठीत आपल्या सिद्धहस्त भाषेत शब्दांकित केली. त्यांचाही मी ऋणी आहे.

श्री श्रीपती शास्त्री, श्री वसंतरावजी केळकर, श्री दामुअण्णा दाते, श्री विनायकराव जोशी, श्री माधवराव कुलकर्णी या संघाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी ह्या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी मला जी अमूल्य मदत केली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

चित्रकार श्री अनिल उपळेकर, मुद्रक श्री प्रमोद वापट यांचाही मी ऋणी आहे.

आभार मानायचे आहेत ते त्यांचे की जे 'दि आर. एस. एस. स्टोरी' वाचून रा. स्व. संघाचे वास्तव स्वरूप समजून घेतील आणि इतरांनाही समजावून देतील. आणि तेव्हाच ह्या खटाटोप सार्थकी लागला असे म्हणता येईल.

प्रकाशक : **रवी घाटपांडे**

# प्रस्तावना

सुप्रसिद्ध संपादक श्री मलकानींनी दि आर. एस. एस. स्टोरी लिहून खूप मोठे काम केले आहे. संघासारख्या विशाल, देशव्यापी, आदर्शवादी, अनुशासित, रचनात्मक व सुसंघटित शक्तीचा समर्पक इतिहास आज पावेतो उपलब्ध नव्हता. अशा चिरप्रतिक्षित पुस्तकाचे मराठीत भाषांतर स्नेहल प्रकाशनाच्या वतीने श्री. रवी घाटपांडेंनी प्रकाशित करून अभिनंदनीय पाऊल उचलले आहे. परिणामस्वरूप ह्या उपयुक्त पुस्तकाची भाषांतरे देशातील सर्व भाषेंत प्रसिद्ध होण्यास चालना मिळेल व समाजाच्या सर्व स्तरांतील नागरिकांना संघाची सर्वांगीण माहिती सुलभ होऊ शकेल. वर्तमानकाळी निःस्वार्थ भावनेने राष्ट्रसेवेत संलग्न, निष्ठावान लोक दुर्मिळ झाले आहेत. संघ हीच एक संघटना आपला हा बाणा विपरीत वातावरणांतही कसा कायम ठेवू शकली हे लोकांच्या ध्यानी येणे हितावह ठरेल.

इतर कोणत्याही गोष्टींच्या नादी न लागता संघ आपल्या ध्येय-साधनेत तन्मय असूनही स्वतःस प्रगतीवादी म्हणवून घेणारे विचारक संघाला संकुचित व कम्यूनल म्हणण्याइतकी मजल मारतात. आधुनिक काळातील विकृत विचार पद्धतीचाच हा दुष्परिणाम म्हणावा लागेल.

जगातील कुठल्याही विचारवंतांनी पूर्वग्रह न बाळगता विचार केला तर हिंदू जीवन दर्शनातील 'आत्मवत् सर्व भूतेषु'च्या भावनेत त्यांना थोडी तरी संकुचितता आढळेल का ? सांप्रदायिकतेचा लेशमात्र-गंध येईल का ? आजपावेतो जगात जन्म पावलेले कोणतेही मानवीय चिंतन, व्यक्तीला स्वतःच्या जीवनात ह्या पेक्षा अधिक कनवाळू व सर्वसमावेशक बनण्याची प्रेरणा देऊ शकेल का ? असे असता हिंदू म्हणताच संकुचिततेचा भास व्हावा हे उचित आहे का ?

सामाजिक जीवनाची आकांक्षा व्यक्त करणारा हिंदु-जीवन-

दर्शनाचा संदेश—

" सर्वेऽपि सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयः ।।
सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कःश्चित् दुःखमाप्नुयात् ।।"

विश्वव्यापी मानव समाजात क्षेत्र, वर्ण, वर्ग, भाषा, संप्रदाय (मजहब) आदी बाबतींत यत्किंचितही भेदभाव न मानता संपूर्ण मानव जातीच्या सुखाची, आरोग्याची व कल्याणाची अभिलाषा मनी ठेवून जगात कुठेंही दुःखाचा लवलेशही उरू नये ह्या मंगल भावनेने ओतप्रोत आहे, असे हे हिंदू जीवनदर्शन परंपरागत संस्कारांनी ज्यांच्या रक्ताच्या बिंदू-बिंदूत समरस झालेले आहे तोच हिंदू जर संकुचित नि कम्युनल मानला गेला तर ह्या जगी उदात्त व सर्वसमावेशक कोण सापडू शकेल ?

आधुनिक विज्ञानाच्या विस्मयकारी आविष्कारांनी विभूषित ह्या नूतन काळीसुद्धा हिंदू जीवनदर्शनातील 'वसुधैव कुटुम्बकम्'ची आत्मीयतापूर्ण भावना साकार करण्याकडे कुणी लक्ष दिले आहे का ? हिंदू जीवनदर्शनाची उपेक्षा करून राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय जीवनाला सुखानंदानी परिपूर्ण करणे शक्य होईल का ?

परानुकरण कधीही स्वावलंबी, स्वाभिमानी व संपन्न सामाजिक जीवन उभे करू शकत नाही. पाश्चिमात्त्य देशांत जन्म पावलेल्या भोगवादी औद्योगिक सभ्यतेच्या प्रवाहात प्रवाहपतितासारखी स्वतंत्र भारताची अवस्था झालेली आहे. त्यातूनच झपाट्याने वाढीस लागलेल्या अमानवीयतेच्या, अनितीच्या नि अनाचारांच्या आहारी जाऊन आपला समाज स्वातंत्र्याच्या गत सदतीस वर्षांत संभ्रमित बनला आहे. वर्तमानकाळी समाजात आढळणारी दिशाहीनता, अकर्मण्यता व वैफल्य ही त्याचीच फळे आहेत. त्यामुळेच स्वार्थ व कलहाची बेलगाम घोडेजोडी जीवनरथाला घेऊन सैरावैरा धावत सुटली आहे. समाजाची सर्वांत लहान इकाई (युनिट) अर्थात कुटुंबपद्धती हळूहळू लुप्त होत आहे. रात्रंदिवस गर्दीत राहूनही मानवाला एकाकीपणाची खंत बोचू लागली आहे. आपल्या उदात्त परंपरेला विसरून बेगडी प्रगतिशीलतेने नटलेल्या आधुनिकतेच्या जाळ्यात फसल्याचाच हा परिणाम नाही का ? भरभराटीचे प्रतिक मानण्यात आलेलं विशालकाय औद्योगीकरण– मुद्रास्थिती, बेसुमार महागाई व असह्य बेकारी वाढविण्यासच कारणीभूत

होत आहे. ते मौजक्या श्रीमंतांचं असीम ऐश्वर्य अधिकाधिक वाढवणारं व असंख्य गरिबांची दशा अधिक दयनीय करणारं ठरलं आहे. मानवाला मानवीयतेपासून वंचित करण्यात पाश्चिमात्त्य औद्योगिक सभ्यतेनं मानवीय इतिहासात अत्युच्च शिखर गाठले आहे. त्यामुळे जगभर प्रश्न उपस्थित झाला आहे की, ह्या स्थितीतून तरणोपाय काय? कार्ल मार्क्स कालबाह्य बनला. साम्यवाद विफल ठरला. समाजवादाच्या आधारावर संतोषजनक सामाजिक जीवन उभारू शकण्याची शक्यता संपली. म्हणून पाश्चिमात्त्य विचारकांनी गांधी चिंतनाकडे डोळे लावले आहेत. आपण मात्र हिंदुजीवन दर्शनाकडे डोळेझाक करून सगळीकडे विफल ठरलेल्या मार्गानीच वाटचाल करीत आहोत. आणि पाश्चिमात्त्य विचारक सर्व प्रकारचे आधुनिक प्रयोग विफल झाल्यामुळे अनेक युगांना पार पाडून वर्तमानकाळीसुद्धा आपली उपादेयता कायम ठेवू शकणाऱ्या हिंदुजीवन दर्शनाचे आधुनिक व्याख्याता महात्मा गांधींकडे वळू लागले आहेत.

अनंत काळ प्रयोग करून अनुभवसिद्ध हिंदु जीवनदर्शन स्पष्टपणे सांगत आहे की, मनुष्यप्राणी एकाकी राहू शकत नाही. तो कुटुंबात जन्मास येतो. त्यातच वाढतो, जाणता व समर्थ बनतो. पण एक कुटुंबही एकाकी राहू शकत नाही. एका कुटुंबाची वस्ती जगात कुठेही आढळणार नाही. लहानातील लहान खेडे घ्या. पाच-दहा कुटुंबांचं मिळूनच ते बनलेले दिसेल. कारण सामूहिक जीवनाविना मनुष्य जगू शकत नाही. त्याच्या जीवनावश्यकता सामूहिकतेतूनच पूर्ण होऊ शकतात. त्या आवश्यकता फक्त आर्थिकच असतात असे नाही; मानसिक, बौद्धिक नि आत्मिकही असतात. मानव सामाजिक प्राणी आहे हे मानण्यापावेतो सर्वांची मजल पोचलेली आहे. पण सामाजिक प्राणी म्हणून तो सफल जीवित कसे जगू शकेल हे मर्म फक्त हिंदू जीवनच अनुभवसिद्ध रूपात मांडत आले आहे. त्याची उपेक्षा हेच सर्व संकटांचं कारण आहे.

वासना व संवेदना ह्या दोन उपजत वृत्तींचा मानव अनुपम संगम आहे. वासना उपभोगाकडे प्रवृत्त करीत असते. पण संवेदना परपीडा अनुभव करवून ती दूर करविण्यास मानव मनाला प्रेरित करते.

दोन्ही उपजत वृत्तींत सम्यक संतुलन गाठूनच मानव मानवीयतेनी विभूषित होऊ शकतो. करुणा त्याचा अलंकार व परसेवा त्याचा स्वभाव बनू शकते. संपूर्ण समाज त्याचे कुटुंब व सर्वांचे हित त्याची कर्मसाधना बनते. पण वासनेनी जर कुरघोडी केली तर मानवच दानव बनतो. त्याच्या हृदयातील संवेदनेची कोमलभावना लुप्त होऊ लागते. तो आपली वासना तृप्त करण्यास्तव निष्ठुर व निर्दयी बनतो. तो सामाजिक जीवन उद्ध्वस्त करणारा ठरतो. मानवमनाची ही ठेवण जाणूनच हिंदुजीवन दर्शनाने गर्भधारणेपासूनच मानव मनावर सुसंस्कारांच्या विधिची व्यवस्था सुचविली आहे. कुटुंबातील सर्व मंडळींचा आचार-विचार ' आत्मवत् सर्व भूतेषु 'च्या बोधवाक्यानुसार असला तर कुटुंबातील वाढत्या मुलांवर सहजासहजी उपयुक्त संस्कार पडतात. त्याचा विकास तदनुसार होत जातो. मानव मानवीय बनतो, वासनेच्या आहारी जात नाही. म्हणूनच सामाजिक जीवनासाठी तो पोषक ठरू शकतो. अशा रीतीने हिंदू जीवन दर्शन, व्यक्तीचा व मानव समाजाचा सर्वांगीण उत्कर्ष साधण्याचा सोपान आहे.

हिंदू समाज व संस्कृती विश्वमानवाची पुरातनतम ठेव आहे. भूतकाळी जगात खूप भरभराटीस आलेले समाज व सभ्यता विदेशी आक्रमणासमोर पराजित झाल्या. परदास्यात त्या स्वतःचे अस्तित्व टिकवू शकल्या नाहीत. त्या कालकवलीत झाल्या. हिंदू समाज व संस्कृती मात्र टिकुन राहिली. अनेक आक्रमणांना हिंदूंनी तोंड दिले. जयपराजयाचे अनेक प्रसंग झेलले. शेकडो वर्षं हिंदूंना परदास्यातही जीवन कंठावे लागले. त्या काळी जितके भीषण अत्याचार नि यातना हिंदू समाजाने सहन केल्या तितक्या अन्य समाजाने कधीच केल्या नाहीत. अशा स्थितीतही हिंदू समाज आपले अस्तित्व कायम ठेवू शकला. त्याची सभ्यता व संस्कृती जिवंत राहू शकली. शेवटी आपली स्वतंत्रता प्राप्त करण्यातही तो यशस्वी सिद्ध झाला. ह्या विजिगिषु वृत्तीचे व चिरंतनत्वाचे रहस्य काय आहे ? हे समजून स्वतंत्र भारताने वाटचाल करायला हवी होती. पण आजपावेतो तसे घडले नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

हिंदू जीवनदर्शनाने शासनाची महत्ता कधीच दृष्टीआड केलेली नाही. पण त्यांनी सामाजिक जीवनाचा आधार शासनास कधीच मानलं नव्हतं. समाज जीवनाचा आधार धर्माला मानलं होतं. धर्म म्हणजे समाज धारणेसाठी आवश्यक तत्त्वे– ईश्वरप्राप्तीचा पूजाविधी नाही. त्यामुळेच परदास्यातही आपला समाज स्वतःस टिकवून ठेवू शकला. त्याने समाजाची युगानुकुल पुनर्रचना करण्याचे काम शासनाकडे सोपविले नाही. ते अनुभवसिद्ध शाश्वत तत्त्वांच्या आधारावर, प्रयोगांच्या माध्यमांतून, गैरसरकारी प्रयत्नांतून घडविण्याची परंपरा निर्माण केली. हेच हिंदू समाजाच्या अमरत्वाचे मर्म आहे. त्याची जाणीव हिंदू मनीषींच्या परंपरेस होती. हे मर्म जाणूनच महात्मा गांधींनी स्वराज्य प्राप्त होताच काँग्रेसला– जे स्वराज्य प्राप्तीचे माध्यम होते– विसर्जित करून, राष्ट्र-नवनिर्माणासाठी, अर्थात आर्थिक व सामाजिक पुनर्रचनेच्या कामासाठी, तिला लोकसेवक संघात रूपांतरित करण्याचा सल्ला दिला होता. त्यावेळी कुणालाच त्या सल्ल्याची महत्ता समजू शकली नाही. कारण त्यांचं अधिष्ठान हिंदू जीवन दर्शन नव्हतं. परिणामस्वरूप विश्वव्यापी साम्राज्याच्या असीम शक्तीच्या हातून ज्या लोकशक्तीने आपली स्वाधीनता अर्जित करून घेतली ती असीम लोकशक्ती पुर्ननिर्माणाच्या काळात निष्क्रीय करून टाकली गेली आहे. स्वराज्य प्राप्त झाले. आता राष्ट्र व समाजाशी संबंधित जी काही कामं आहेत ती सर्व शासन करील, व्यक्ती फक्त स्वतःची व आपल्या कुटुंबाची चिंता करील ही धारणा बळकट होत गेली. परिणामस्वरूप आर्थिक व सामाजिक पुनर्रचनेसाठी आवश्यक कायदे बनले. पण त्यानुरूप समाजाचे मानसिक परिवर्तन घडू शकले नाही. हे कार्य शासन कधीच करू शकत नाही. हे काम करण्याची क्षमता लोकशक्तीतच असते, हे अद्यापिही वर्तमान नेतृत्वाच्या ध्यानी येत नाही ही काळजीची गोष्ट आहे.

संघच एक अशी संघटना आहे जी लोकशाहीच्या आराधनेत संलग्न आहे. कारण संघाने हिंदू जीवन दर्शनाची कास सोडलेली नाही. संघ आजही व्यक्ती व्यक्तीच्या जीवनात राष्ट्रभक्तीची ज्योत तेवत ठेवीत आहे. संघाची धारणा आहे की अंततोगत्वा लोकशक्तीच सर्व

समस्यांचे निराकरण करण्यात सक्षम सिद्ध होणार. हेच हिंदू जीवन दर्शनाचं मर्म आहे व इतिहासाचा स्पष्ट निष्कर्ष पण हाच आहे.

आपल्या जीवन दर्शनाच्या आणखी एका विशेषतेची संघाने गाठ बांधून ठेवलेली आहे. हिंदू जीवन दर्शन समाजाला सनातन अर्थात चिरंतन मानीत आलं आहे. हिंदू समाज त्याचं स्पष्ट उदाहरण आहे. व्यक्ती, संस्था व शासनव्यवस्था सीमित काळासाठीच अस्तित्वात येत असतात. त्याचं महत्त्व त्या काळी असतं. समाजाचं चिरंतनत्व बनवून ठेवणं हेच काम त्या तिन्ही अभिकरणांचं असतं. पण कधी कधी ही अभिकरणं स्वतःचं महत्त्व समाजापेक्षा अधिक मानू लागतात. असा संस्थागत अहंभाव समाजासाठी घातक सिद्ध होतो. म्हणूनच प्रारंभापासून संघाने नीती अंगिकारली आहे की संघ समाजाच्या विभिन्न स्तरांतील घटकांना समाजकार्यासाठी प्रेरित व प्रशिक्षित करण्याचंच काम करीत राहील. असे प्रेरित व प्रशिक्षित समाजघटक समाजजीवनाच्या विभिन्न क्षेत्रात आपल्या रुचि व क्षमतेच्या अनुसार काम करतील. ह्याचा परिणाम बघणाऱ्यास सहज दिसून येईल की संघप्रेरित समाजघटक समाजाचे एक अभिन्न अंग ह्या नात्याने हजारो प्रकल्प हाती घेऊन देशभर सामाजिक पुनर्रचनेच्या कामात संलग्न आहेत. संघ या महत्कार्याचे श्रेय घेण्याच्या भानगडीत पडू इच्छित नाही. असं करणं समाजाच्या भविष्याला पोषकही नाही.

संघप्रेरित समाजघटकांची कार्यशैली सुद्धा विशेष प्रकारची आहे. ते आपल्या प्रकल्पांच्या माध्यमांतून समाजात प्रचलित असलेल्या भिक्षावृत्तीला समूळ नष्ट करू इच्छितात. जे जे फुकटात मिळेल ते ते घेऊन आपण समृद्ध बनू ही वृत्ती स्वस्थ समाजाच्या दृष्टी अतिघातक आहे. ह्यातून न समाजाच्या घटकात, न समाजात स्वावलंबन व स्वाभिमानाची आवश्यक वृत्ती वाढीस लागू शकते. म्हणून संघप्रेरित समाज घटक आपापल्या प्रकल्पांतून समाजाच्या ज्या स्तरांत ते सक्रीय आहेत, त्या क्षेत्रांतील समाजघटकांत ते स्वपरिश्रम व स्वपराक्रमाची भावना जागृत करतात. फुकटात मिळणाऱ्या सहायतेवर निर्भर न राहता आपण आपले जीवन उभारू अशी भावना नागरिकांत निर्माण केली जाते.

कुणाकडूनही दान घेऊन आपण स्वावलंबी व स्वाभिमानी बनू शकत नाही. आणि जो मानव स्वावलंबी व स्वाभिमानी नाही तो आपल्या समाजाचे भविष्य बनवू शकत नाही अशी धारणा प्रत्येक व्यक्तीत जागृत केली जाते. त्यामुळे संघप्रेरित समाज घटकांचे प्रकल्प सर्व दृष्टींनी हळूहळू यशस्वी होत आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रकल्प क्षेत्रांत राहणाऱ्या नागरिकांमध्ये आत्मसन्मानयुक्त आत्मविश्वास जागृत होत आहे.

संघप्रेरित समाज घटक समाजात नोकरी वा मजुरीमागे धावण्याच्या वृत्तीलाही आळा घालू लागले आहेत. कारण समाजांतील सर्व नवयुवकांना नोकरी मिळणे हे अशक्य आहे. दुसरी गोष्ट ही की नोकरी करणाऱ्यांमध्ये आवश्यक जिम्मेदारीची व आत्मविश्वासपूर्ण साहसाची वृत्ती वाढू शकत नाही. ती वृत्ती स्वरोजगारांतूनच वाढू शकते. समाज घटकांतील स्वरोजगार वृत्तीच समाजास समर्थ व गतिशील बनवू शकते. संघप्रेरित समाज घटकांच्या द्वारे चालविल्या जाणाऱ्या प्रकल्पांची ही विशेषता सहज ध्यानी येते.

अनेकदा संघ पुरातनवादी म्हणून ओळखला जातो. पुरातनतम शाश्वत मूल्यांचा संघाला अभिमान आहे. त्याच आधारावर उज्ज्वल भविष्य निर्माण होणार ही संघाची दृढ धारणा आहे. मानव इतिहासाच्या कसोटीवर ही धारणा अनेकदा खरी उतरलेली आहे. मानव प्राणी हा विकासशील आहे. तो सतत प्रगती करीत राहणार. त्या प्रगतीचा उपयुक्त व्यवहार आवश्यक म्हणूनच युगधर्म शब्द हिंदू जीवन दर्शनाच्या इतिहासात प्रचलित झालेला आहे. ह्याची संघाला जाणीव आहे व संघ त्याच दिशेने चालणारी जिवंत संघटना आहे. संघ सायन्स व टेक्नॉलॉजीच्या सतत आविष्कारांना आवश्यक महत्त्व देत आलेला आहे. पण संघाचे मत आहे की सायन्स हे सार्वभौमिक (युनिव्हर्सल) आहे. त्याचे निष्कर्ष सर्व जागी समसमान लागू पडतात. पण टेक्नॉलॉजीला सार्वभौमिक (युनिव्हर्सल) मानणे चुकीचे ठरेल. टेक्नॉलॉजीचा विकास नेहमी स्थानीय आधारावरच व्हायला हवा. अमेरिकेत भारतातील जनसंख्येच्या अर्धी जनसंख्या आहे. पण भारतातील शेतीच्या जमिनीपेक्षा अमेरिकेत शेतीची जमीन दोन पटींपेक्षाही अधिक आहे. भारतात जन-

संख्येतील सत्तर टक्क्यांपेक्षा अधिक लोक शेतीच्या व्यवसायात संलग्न आहेत. पण अमेरिकेत अमेरिकेतील लोकसंख्येच्या फक्त चार टक्केच लोक शेती करतात. तेव्हा अमेरिकेत शेतीची जी टेक्नॉलॉजी विकसित होत आहे ती भारतातील शेतकऱ्यांसाठी कशी उपयुक्त नि लाभदायक सिद्ध होऊ शकेल ? पण ही गोष्ट स्वत:स प्रगतिवादी म्हणून घेणाऱ्यांच्या लक्षात येत नाही. त्याचे दुष्परिणाम आपल्या देशाला भोगावे लागत आहेत. संघ मानत आलेल्या ह्या गोष्टींना आता जगातील अनेक आधुनिक विचारक मानू लागले आहेत.

संघाबद्दल होत आलेल्या अपप्रचाराला मौखिक उत्तर देण्यात संघ आपली शक्ती वाया घालवीत नाही. तो आपल्या कामात तन्मय असतो. संघाचा दृढ विश्वास आहे की संघाचे कार्य हिंदूंच्या शाश्वत तत्त्वांवर आधारित आहे. त्याची उपयोगिता काळाच्या कसोटीवर खरी ठरल्याशिवाय राहणार नाही.

शेकडो वर्षं परदास्यात गेल्यामुळे हिंदू जीवन दर्शन समाजाच्या दैनंदिन व्यवहारात प्रतिबिंबित होत असलेले दिसत नाही. ते समाज घटकांच्या व समाजाच्या व्यवहारात उतरविण्यात संघ आपली संपूर्ण शक्ती लावून आहे. तो आपली एकाग्रता ढळू देऊ इच्छित नाही.

पुरातन परंपरेतून आपलं जीवनदर्शन हिंदूंच्या रक्तांतून प्रवाहित होत आहे. ह्या जीवनदर्शनानुरूप हिंदू समाजाची पुनर्रचना करणे अधिक सुलभ आहे. म्हणून संघाने प्रारंभिक प्रयोग म्हणून आपलं कार्य हिंदू समाजातच सीमित ठेवलेलं आहे.

आदर्श समाजाचा एक व्यावहारिक नमुना प्रस्तुत करणं ही आजची सर्वांत महत्त्वाची आवश्यकता आहे. हिंदू जीवनदर्शनावर आधारित व्यावहारिक नमुना घडविण्याच्या कामी संघ संलग्न आहे. सगळ्या प्रकारच्या जीवनदर्शनांच्या पायाशी शाश्वत मानव मूल्यांचा अभाव असल्यामुळे त्यांची विफलता काही दशकांतच स्पष्ट झालेली आहे. अशा स्थितीत शाश्वत मानव मूल्यांच्या पायावर सामाजिक रचना उभी करून दाखविणे हिंदू समाजाचे परंपरागत दायित्व आहे. ते दायित्व पूर्ण करण्यातच संघ संलग्न आहे.

हा नमुना विश्व मानवाला उपयोगी पडावा हीच एक मंगल कामना संघाच्या अंतःकरणी आहे. अशा ह्या कार्याचा इतिहास दि आर. एस. एस. स्टोरीत आहे. ह्याच दृष्टिकोनातून संघाच्या कार्याला समजून घेणे सर्व दृष्टीनी व सर्वांसाठी हितावह सिद्ध होईल ही अपेक्षा आहे.

पत्ता –
पं. दीनदयाळ शोध संस्थान,
७/ई, स्वामी रामतीर्थ नगर,
नवी दिल्ली – ११००५५.

**नानाजी देशमुख**
दिनांक ११ फेब्रुवारी १९८४
कै. पं. दीनदयाळ बलिदान दिवस

# रा. स्व. संघ : काही उल्लेखनीय मते

" ज्या उदात्त भावनेने तुम्ही ही संघटना चालवता आहात आणि कुणालाही आश्चर्यचकित करून सोडील अशी जी शिस्त तुम्ही निर्माण केली आहे ती पाहून मला अतिशय आनंद होतो. मी तुम्हाला मनापासून यश चिंतितो. "

**–महात्मा गांधी**

( मैं संघ का अ–सभ्य सभ्य हूँ । )

" मी रा. स्व. संघाचा सन्माननीय सदस्य आहे. "

**–विनोबा भावे**

" रा. स्व. संघ ही क्रांतिकारी संघटना आहे. या देशातली दुसरी कोणतीही संघटना तिच्या जवळपास पोचू शकणार नाही. समाजपरिवर्तन घडवण्याची, जातिभेद नष्ट करण्याची आणि गोरगरिबांच्या डोळ्यांतली आसवे पुसण्याची क्षमता केवळ यात्र संघटनेत आहे. परमेश्वराने तुम्हाला भरपूर सामर्थ्य द्यावे आणि या सर्व अपेक्षा तुमच्या हातून पुऱ्या व्हाव्यात, हीच माझी हार्दिक सदिच्छा ! "

**–जयप्रकाश नारायण**

" रा. स्व. संघ ही सुसंघटित आणि शिस्तबद्ध संघटना असून स्वयंसेवक हा तिचा पाया आहे. ते सर्व स्वयंसेवक कमालीचे देशभक्त आहेत, असे मी सदैव मानीत आलो आहे. "

**–अच्युतराव पटवर्धन**

" रा. स्व. संघावर हिंसाचाराचे आणि मुसलमानांबद्दलच्या द्वेषभावनेचे जें आक्षेप घेतले जातात ते पूर्णपणे असत्य आहेत. उलट मुसलमानांनीच रा. स्व. संघाकडून परस्परांवर प्रेम करायला, सहकार्य करायला आणि संघटना बांधायला शिकले पाहिज. "

**–डॉ. झाकिर हुसेन**

" रा. स्व. संघ माझ्या मनातलेच कार्य करीत आहे. माझ्या प्रिय तरुण मित्रांनो, हितसंबंधी लोकांनी काढलेल्या अनुदार उद्गारांमुळे अस्वस्थ होऊ नका. पुढे पाहा ! पुढे जात राहा ! तुमच्या सेवेची आज देशाला नितांत गरज आहे. "

**–जनरल करिअप्पा**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०३२
ग्रं. क्र. २४९८६
निबंध
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## प्रकरण पहिले : केशव

दिनांक २७ सप्टेंबर १९२५. विजयादशमी होती त्या दिवशी. नागपूरमधल्या नवी शुक्रवारी या भागातल्या एका अगदी छोट्याशा मातीच्या घरात काही तरुण मंडळी एकत्र जमली होती. जोमाने रसरसलेल्या त्या तरुणांच्या चेहऱ्यांवरून उत्साह ओसंडून जात होता. देशाच्या दुर्दशेबद्दल आणि ती दूर करण्याच्या विविध मार्गांबद्दल विचारविनिमय करण्यासाठी एकत्र येण्याची ही काही त्यांची पहिलीच वेळ नव्हती. पण त्यांच्या कल्पना प्रत्यक्ष व्यवहारात उतरवण्यासाठी एक संघटना स्थापण्याच्या हेतूने ते त्या शुभ मुहूर्तावर प्रथमच एकत्र आले होते. त्यांच्यापैकी एकजण बोलू लागला, ' तरुणांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना जागवण्याची त्याचप्रमाणे त्यांच्या अंगी शिस्त बाणावी म्हणून शारीरिक शिक्षण देऊन राष्ट्रीय संस्कार घडवण्याची किती नितांत आवश्यकता असते ', याबद्दलचे आपले विचार त्या तरुणाने सर्वांसमोर मांडले. उपस्थित असणाऱ्या सर्वांनीच त्याच्या विचारांशी आपण सहमत असल्याचे सांगितले.

या घटनेची नोंद ठेवण्यासाठी जवळपास एकही पत्रकार नव्हता किंवा कुणी एखाद्या छायाचित्रकारालादेखील बोलावलेले नव्हते. नवी संघटना स्थापन झाली होती तथापि तिच्यासाठी घटना तयार करण्यात आलेली नव्हती; एवढेच नव्हे तर संघटनेला कोणते नाव द्यावे, हेदेखील ठरवण्यात आले नव्हते. एकाही पदाधिकाऱ्याचे नाव सुचवण्यात आले

नव्हते, त्यामुळे निवड होण्या– न होण्याचा प्रश्नच नव्हता. आणि तरी-देखील एक मोठी घटना घडली होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जन्मला होता.

या समर्थ, शक्तिशाली चळवळीमागे उभा राहिलेला तो तरुण कोण होता ? त्याची प्रेरणा कोणती होती ?

डॉ. केशव बळिराम हेडगेवार यांचा जन्म रविवार, दि. १ एप्रिल १८८९ रोजी वर्षप्रतिपदेच्या मुहूर्तावर झाला होता. त्यांच्या माता-पित्यांना एकूण सहा मुले झाली, त्यांत केशवचा क्रमांक पाचवा होता. तीन भावांमध्ये तो सगळ्यांत धाकटा होता. हे देशस्थ ब्राह्मण कुटुंब मूळचे आंध्रप्रदेशच्या तेलंगण भागातले. गोदावरी, वंजरा आणि हरिद्रा या नद्यांच्या त्रिवेणी संगमावर वसलेले कंदकुर्ती हे गाव हेडगेवारांच्या पूर्वजांचे मूळचे गाव. मराठी, तेलगु आणि कानडी या तिन्ही भाषांच्या संयुक्त प्रभावाचे हे क्षेत्र होते. सुमारे हजार वर्षांपूर्वी आदिशंकराचार्यांनी या भागातील हेडगेवार कुटुंबाला धर्मसंरक्षक म्हणून नेमल्याचे म्हटले जात असे. हे काश्यप गोत्री हेडगेवार कुटुंब ऋग्वेदी विद्वान म्हणून सुविख्यात होते. इ. स. १८०० च्या सुमारास केशवच्या पणजोबांनी निझामाच्या हैद्राबाद संस्थानातले ते आपल्या पूर्वजांचे गाव सोडले आणि नागपूरमध्ये येऊन ते स्थायिक झाले. वेदशास्त्रातील आपल्या व्यासंगाचे नागपूरमध्ये अधिक चांगले चीज होईल, अशी त्यांची अपेक्षा होती.

केशवचे वडील बळिराम हे सुप्रतिष्ठित पुरोहित होते. कुटुंब सुखवस्तू होते. दारात गायही होती. बळिराम यांचा स्वभाव तापट असला तरी आईचा म्हणजे रेवतीबाईंचा स्वभाव अगदी सौम्य, मृदू असा होता. त्या धर्माचरणी होत्या. थोरल्या भावाला– माधवला– व्यायाम करण्याचा छंद होता. तो दररोज घरी भरपूर व्यायाम करीत असे. मैदानी खेळांमध्ये तो चांगलाच प्रवीण होता. इतर क्रीडापटूंप्रमाणेच त्यालाही भांग आवडत असे. सीताराम नावाच्या दुसऱ्या भावाने वेदा-ध्ययन सुरू केले होते. लहानग्या केशवला देवी आल्या होत्या आणि त्यांचे व्रण त्याच्या चेहऱ्यावर पुढे आयुष्यभर कायम राहिले.

हेडगेवार कुटुंबातली ही सारी माणसे चांगली उंचनिंच, काळी-सावळी, धट्टीकट्टी होती. ती जशी व्यवहारी होती तशीच अगदी उमदी होती, मनमिळाऊही होती. जेव्हा त्यांनी नवी विहीर खणली तेव्हा तिचा वापर सुरू करण्यापूर्वी सगळे जुने अस्वच्छ पाणी काढून टाकावे, असा तिघा भावांनी विचार केला आणि खरोखरच अवघ्या एका रात्रीत त्या तिघांनी संपूर्ण विहीर उपसून काढली.

केशवला प्रारंभी एका संस्कृत पाठशाळेत पाठवण्यात आले होते. तेथे त्याने उत्तम संस्कृत उच्चार आत्मसात केले. नंतर त्याचे नाव नागपूरच्या नील सिटी हायस्कूलमध्ये घालण्यात आले. सगळ्यात धाकटा मुलगा म्हणून केशव सगळ्या कुटुंबाचाच लाडका होता. तथापि दहा वर्षांचा होण्यापूर्वीच त्याच्या मनातल्या कुटुंबाबद्दलच्या प्रेमाची जागा मातृभूमीबद्दलच्या प्रेमाने घेतली होती. लोकमान्य टिळकांच्या 'केसरी'चे –स्वतंत्र होण्यासाठी लढत असलेल्या भारताचे मनोगत व्यक्त करणाऱ्या त्यातल्या लेखांचे– तो नियमितपणे वाचन करीत असे.

इ. स. १८९७ साली व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाचा हीरकमहोत्सव साजरा झाला. त्यावेळी केशवच्या वर्गात मिठाई वाटण्यात आली होती. वर्गात जरी केशवने ती मिठाई घेतली तरी त्याने ती खाल्ली नाही, उलट घरी परतताना वाटेवरच्या कचराकुंडीत त्याने ती फेकून दिली. घरी गेल्यावर त्याला जेव्हा कारण विचारण्यात आले, तेव्हा तो उत्तरला, "ती काही आपली राणी नाही!"

त्यानंतर चार वर्षांनी, सातव्या एडवर्डचा राज्याभिषेक साजरा करण्यासाठी नागपूरमध्ये फटाक्यांची आतषबाजी आयोजित करण्यात आली होती. ती गंमत पाहायला इतर मुले मोठ्या उत्साहाने निघून गेली. केशवला मात्र त्यात मुळीच रस वाटत नव्हता. "तो आपला राजा नाही!" हे त्याचे रोखठोक उत्तर ठरलेले होते.

एवढ्यापुरतेच हे मर्यादित नव्हते. सीताबर्डी किल्ल्यावर फडकणारा युनियन जॅक पाहून केशवला फार दुःख होत असे. त्याच्याशी सहमत असणारे काही मित्रदेखील त्याने गोळा केले होते. नागपूरच्या शेवटच्या भारतीय राजांचे म्हणजेच भोसल्यांचे ते वसतिस्थान आणि

तेथे ब्रिटिश सत्तेचे प्रतीक ? तेथे पोचावे कसे आणि तो ध्वज खाली खेचावा कसा, याबाबत या मित्रमंडळींचा विचारविनिमय चाललेला असे. तरुणांना साजेल अशा उत्साहाच्या भरात ती मंडळी वझे गुरुजींच्या घरातल्या एका बाजूच्या खोलीत एकत्र जमली, त्यांनी दाराला आतून कडी लावून घेतली आणि सीतावर्डीच्या दिशेने भुयार खणले जाऊ लागले. एक ना एक दिवस त्या भुयारामार्गे आपल्याला त्या किल्ल्यात शिरता येईल आणि युनियन जॅक खाली उतरवून त्याच्या जागी भारताचा प्राचीन राष्ट्रध्वज म्हणजेच भगवा ध्वज फडकवता येईल अशी त्यांची अपेक्षा होती. हे काम तीन दिवस बिनबोभाटपणे चालले, पण नंतर मात्र ते उघडकीला आले आणि त्यामुळे तो प्रकल्प तसाच सोडून द्यावा लागला.

त्यानंतर थोड्याच कालावधीत केशवच्या घरातला आनंद अचानक, अनपेक्षित रीतीने संपुष्टात आला. १९०२-१९०३ साली नागपूरमध्ये प्लेगच्या साथीने धुमाकूळ घातला. बळीराम हे पुरोहित असल्यामुळे त्यांना प्लेगच्या साथीमध्ये दगावलेल्या लोकांच्या अंत्यविधीसाठी आणि इतर संस्कारांसाठी वारंवार जावे लागे. एक दिवस त्या भयानक रोगाची खुद्द बळीरामना आणि त्यांच्या पत्नीला लागण झाली. दुर्दैवाची गोष्ट ही की, दोघांचेही त्याच दिवशी निधन झाले. एकाच चितेवर दोघांचे अंत्यसंस्कार करण्यात आले. किशोरवयीन केशवचे जग त्या एका दिवसात पूर्णपणे उद्ध्वस्त झाले.

तिघे भाऊ आपापले कपडे धुणे, स्वयंपाक करणे, भांडी घासणे वगैरे कामे करू लागले. थोरला महादेव अनिर्बंध वागू लागला. आपली भांग तयार करून ठेवली नाही म्हणून किंवा राजकीय सभांना जाऊन बसतो म्हणून तो केशवला बडवू लागला. सीतारामला घरातले बदललेले वातावरण आवडेनासे झाले आणि तो वेदविद्येच्या अधिक अध्ययनासाठी इंदूरला गेला.

त्या दिवसांत लहानग्या केशवला अनेकदा उपाशीपोटी राहावे लागे, त्याचे कपडे देखील ठिकठिकाणी फाटलेले असत. पण त्याने तशा परिस्थितीतही आपला धीर सोडला नाही. त्याने अभ्यास चालू ठेवला

आणि राजकीय सभांना जाणेही चालू ठेवले. भारतीय उद्योगांना भांडवलपुरवठा करण्याच्या उद्देशाने लोकमान्य टिळकांनी जेव्हा 'पैसा फंडा' ची योजना जाहीर केली तेव्हा केशवाने तो फंड गोळा करण्यात पुढाकार घेतला. डॉ. मुंजे यांच्यासारख्या त्यावेळच्या प्रसिद्ध नेत्याच्या घरी साधे बाँब बनवण्याचे तंत्रही त्याने आत्मसात केले.

त्या बिकट परिस्थितीत केशवला मुख्य आधार होता तो आबाजी हेडगेवार या दूरच्या काकांचा. नागपूरजवळच्या रामपायली येथे आबाजी महसूल अधिकारी होते आणि त्यांच्या घरी केशवचे नेहमीच चांगले आगतस्वागत केले जात असे. इ. स. १९०७ सालच्या दसऱ्याच्या दिवशी केशव रामपायलीला गेला. दसरा म्हणजे प्राचीन भारतीय सेना नवीन विजयाच्या शोधात ज्या दिवशी सीमोल्लंघन करीत असत तो दिवस. त्या दिवशी केशवने गावकऱ्यांसमोर सीमोल्लंघनाचे महत्त्व सांगणारे भाषण केले आणि 'वंदे मातरम्'च्या निशाणाखाली गुलामगिरीतून स्वातंत्र्याकडे सीमोल्लंघन करण्याचे आवाहनही केले. लौकरच त्याच्या या जहाल भाषणाचे वृत्त नागपूरला पोचले. नागपूर ही त्यावेळची प्रांतिक राजधानी होती. केशववर राजद्रोहाचा आरोप ठेवून खटला चालवण्यासाठी श्री. आर्मस्ट्राँग नावाचा सरकारी वकील तेथे आला, परंतु भंडारा येथील वकील श्री. पुरुषोत्तम सीताराम देव यांनी नागपूरला येऊन त्यावेळचे कलेक्टर श्री. रुस्तुमजी यांना स्पष्टपणे सांगितले की, "वंदे मातरम् म्हणणे हा काही गुन्हा होऊ शकत नाही." श्री. आर्मस्ट्राँग यांच्या बलप्रयोगाला त्या वेळी यश मिळू शकले नाही, मात्र त्या दिवसापासून केशवमागे ब्रिटिश पोलिसांचा जो ससेमिरा लागला तो थेट अगदी मृत्यूच्या दिवसापर्यंत टिकला.

केशवच्या राजकीय कार्याबद्दल त्याच्या चुलत्यांना म्हणजे आबाजींनादेखील सरकारने इतका त्रास द्यायला सुरुवात केली की अखेरीस त्यांना नोकरीचा राजीनामा देणे भाग पडले. ते नागपूरला आले. 'स्वदेशी' दुकान थाटायचा त्यांचा विचार होता. परंतु 'या धोकादायक माणसाला भाड्याने जागा देऊ नका' असे सगळ्या संभाव्य घरमालकांना सांगून पोलिसांनी त्यांच्या दुकानासाठी त्यांना जागा मिळू

दिली नाही. अर्थात यामुळे त्यांचे केशवबरोबर असणारे संबंध मात्र दुरावले नाहीत. ते शेवटपर्यंत तसेच परस्परांना प्रेम देणारे ठरले. पुढे कित्येक वर्षांनी जेव्हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली तेव्हा-देखील आबाजी डॉ. हेडगेवारांचे फार मोठे आधारस्तंभ ठरले.

'वंदे मातरम्' म्हणण्यावर बंदी घालणारे रिस्ले परिपत्रक त्या वेळी सर्वत्र अमलात होते. नैल सिटी स्कूलमधल्या मित्रांसह वंदे मातरम् म्हणायचा केशवने निर्धार केला. १९०८ साली सरकारी अधिकारी जेव्हा शाळा तपासणीसाठी आले तेव्हा वर्गामागोमाग एकेक वर्ग 'वंदे मातरम्' म्हणू लागला. सरकारला मोठा धक्काच बसला. 'सर्व विद्यार्थी जोपर्यंत माफी मागत नाहीत तोपर्यंत शाळा बंद!' असा सरकारने निर्णय घेतला. केशवने डॉ. मुंजे आणि इतर नेत्यांचा सल्ला घेतला. ती कोंडी सुमारे दोन महिन्यांपर्यंत टिकली. त्या काळात शाळेवर पहारा देणाऱ्या पोलिसांना विद्यार्थ्यांकडून बांगड्यांची भेट मिळे. नैल स्कूल चालवणाऱ्या 'एज्युकेशनल सोसायटी' चे चिटणीस सर विपिन कृष्ण बोस हे परिस्थितीमुळे इतके अस्वस्थ झाले होते की दिवसातून अनेक वेळा ते आपले डोके थंड पाण्याने धूत. अधिकारी आणि पालक या दोघांनीही अखेरीस कंटाळून असा तोडगा काढला की 'जे काही घडले त्याबद्दल तुला वाईट वाटते का,' असे प्रत्येक मुलाला विचारल्यावर त्याने नुसती होकारार्थी मान डोलवायची आणि मग शाळेत त्याला पुन्हा प्रवेश द्यायचा. ही मर्यादित तडजोडदेखील केशवने मान्य केली नाही. परिणामी त्याला शाळेतून काढून टाकण्यात आले. त्याने ताबड-तोब लोकनायक मा. श्री. अणे यांच्या यवतमाळच्या राष्ट्रीय शाळेत प्रवेश मिळविला.

अर्थात तेथेसुद्धा केशवच्या राष्ट्रीय हालचाली थांबल्या नाहीत. एक दिवस स्थानिक पोलिसस्टेशनजवळ बॉंबस्फोट झाला. सरकारने त्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी क्लीव्हलँड नावाच्या गुप्त पोलीस अधिकाऱ्याला पाठवले. केशवच्या शाळेसमोरच मुद्दाम एक पोलीस स्टेशन स्थापण्याचा अधिकाऱ्यांनी निर्णय घेतला. पुढे थोड्याच महिन्यांत ती शाळाही बंद करायला भाग पाडण्यात आले.

केशव फक्त या अशा 'क्रांतिकारक' कार्यातच गुंतलेला नव्हता. राष्ट्रीय समस्येच्या विविध पैलूंचा त्याने विचार केला होता. रामटेकच्या रामनवमी मेळ्यात विकले जाणारे पेढे आयात केलेल्या साखरेपासून तयार केले जात असत. स्वदेशी गुळाचा वापर करून पेढे तयार करायची पद्धत केशवने रूढ केली.

माधव दास नावाचे एक संन्यस्त क्रांतिकारक नागपूरमध्ये भूमिगत अवस्थेत राहत होते. जपानला जायची तयारी पूर्ण होईपर्यंत ते सुमारे सहा महिने नागपूरमध्ये होते. त्यांच्या मदतीसाठी केशवने बरेच पैसे जमा केले होते. श्री. उपाख्य बोगरे नावाच्या एका वकिलांकडूनच त्याने चांगले १०० रुपये मिळवले होते. 'अलिपूर बॉंब खटला' सुरू झाला आणि त्यात अरविंद घोषांसारख्यांना गुंतवण्यात आले तेव्हा त्यांच्या मदतीसाठीदेखील केशवने पैसे गोळा करून कलकत्त्याला पाठवले होते.

इ. स. १९०९ साली केशव पुण्यातून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाला. त्याच्या प्रमाणपत्रावर सही केली होती कलकत्ता विद्यापीठाच्या रासविहारी घोष यांनी. केशवला पुढील शिक्षणासाठी कलकत्त्याला पाठवावे, असा त्यांच्या क्रांतिकारक मित्रांचा विचार होता. कलकत्ता शहर म्हणजे त्या काळात सर्व भारतीय क्रांतिकारकांची काशीच होती. केशवचे एक निकटवर्ती स्नेही आणि पुढे अमेरिकेत जाऊन स्थायिक झालेले क्रांतिकारक नेते श्री. रामलाल वाजपेयी यांनी आपल्या आत्मचरित्रात लिहिले आहे की, " राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक श्री. केशवराव हेडगेवार यांना डॉक्टरींचे शिक्षण घेण्याच्या निमित्ताने क्रांतिकारक चळवळ संघटित करण्यात पुलिन बिहारी दास यांना मदत करण्यासाठी कलकत्त्याला पाठवण्यात आले होते. त्यासाठी डॉ. मुंजे, दाजीसाहेब बूटी आणि इतरांकडून त्यांना आर्थिक मदत देण्यात आली होती."

आणि १९१० साली केशव कलकत्त्याला गेला आणि नॅशनल मेडिकल कॉलेजमध्ये दाखल झाला. तो जरी महाराष्ट्रीय वसतिगृहात राहात होता तरी तो अनेकदा पंजाब वसतिगृहात आणि इतर वसतिगृहांतही वारंवार जात असे. अल्पावधीतच त्याने सर्व वसतिगृहांमधून

गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करवून घेतली. याच सुमारास लोकमान्य टिळकांनी मंडालेच्या तुरुंगात ठेवलेले होते. त्या सहा वर्षांच्या अवधीत केशवने एकादशीव्रत (एकादशीच्या दिवशी उपवासाचा नियम) मोठ्या निष्ठेने अनुसरले होते.

लौकरच केशव अनुशीलन समिती या क्रांतिकारक संघटनेचा संपूर्ण सभासद झाला. आपला जीव धोक्यात घालून त्याने अनेक कामे यशस्वीपणे पार पाडली. 'कोकेन' हे त्याचे सांकेतिक नाव होते. मध्य प्रांताच्या सरकारने याच सुमारास नॅशनल मेडिकल कॉलेजमध्ये कुणा एका केतकर नावाच्या व्यक्तीला प्रवेश मिळवून दिला होता. आपल्या आणि इतर महाराष्ट्रीय क्रांतिकारकांच्या हालचालींवर पाळत ठेवण्यासाठीच केतकरची नेमणूक झाली असावी, अशी केशवला खात्री वाटत होती. आणि खरोखरच केतकरची ट्रंक त्याच्या नकळत केशवने उघडून पाहिली तेव्हा त्यात त्याला दिलेल्या अधिकृत सूचनांचे पत्रकच सापडले. तसे बिंग फुटल्यावर केतकर एवढा वरमला की तो पळून गेला, पुढे कधी त्याने आपले तोंड केशवला दाखवले नाही.

एकदा सुट्टीत यवतमाळला आलेला असताना केशव दोघा मित्रांसह सिव्हिल लाइन्समधून भटकत होता. उलट दिशेने इंग्रज जिल्हाधिकारी आपल्या दोघा सहकाऱ्यांबरोबर चालत येत होता. केशवचे मित्र लगबगीने बाजूला झाले, त्यांनी त्या इंग्रज अधिकाऱ्यांना अभिवादनही केले. केशव मात्र सरळ चालतच राहिला. परिणामी त्या अधिकाऱ्यांनाच बाजूला सरून वाट करून द्यावी लागली. नंतर ते अधिकारी मागे वळले आणि त्यांना अभिवादन न करण्याचे कारण त्यांनी केशवला विचारले. 'आम्ही अनोळखी लोकांना अभिवादन करीत नसतो!' असे त्याने शांतपणे उत्तर दिले. हे उत्तर देऊन तो त्या अधिकाऱ्यांची प्रतिक्रिया बघण्यासाठीदेखील तेथे थांबला नाही. खिशात हात घालून तो पूर्वीप्रमाणेच सरळ चालत गेला. हा इतिवृत्तांत समजल्यावर डॉ. मुंजे यांनी केशवचे हार्दिक अभिनंदन केले होते.

एकदा केशव कलकत्त्यातल्या एका प्रभातफेरीतून बंगाली गीते म्हणत जात होता. अचानक एका इंग्रजाने त्याच्या खांद्यावर हात ठेवला

आणि तो केशवशी मराठीतून बोललादेखील. तो कलकत्त्याचा पोलीस सुपरिंटेंडेंट वोमन होता. त्याने पूर्वी कधीतरी महाराष्ट्रात कुठेतरी नोकरी केलेली असावी आणि त्या काळात तो मराठी शिकलेला असावा, हे स्पष्ट होते. पण केशव हा महाराष्ट्रीय असल्याचे त्याला कसे बरे समजले ? विचार केल्यावर केशवलाच असे जाणवले की जरी आपण एखाद्या बंगाली तरुणाप्रमाणेच वेषभूषा केली असली आणि जरी आपण बंगालीच बोलत असलो तरी आपल्या डोक्यावरची शेंडी महाराष्ट्रातल्या प्रमाणे आपण चांगली लांब ठेवली आहे. त्यामुळेच आपण ओळखले गेलो. हे समजल्यावर लगेच त्याने आपली शेंडी कमी केली. ती बंगाल्यां-इतकीच ठेवायला सुरुवात केली.

नॅशनल मेडिकल कॉलेजमधील 'त्या' दिवसांबद्दलच्या आठवणी लिहिताना अमूल्य रत्न घोष यांनी 'मॉडर्न रिव्ह्यू' मध्ये म्हटले होते की,...एक दिवस प्राध्यापक महाशय वर्गावर यायला उशीर झाला. घोषनी –त्यांना त्यावेळी 'हावरा बाबू' म्हटले जात असे– कल्पना काढली, कोण हातावर जास्तीत जास्त मार सहन करू शकतो ते आपण पाहू या. त्यांनी असे म्हणायचा अवकाश, केशवने आपला हात पुढे केला. हावरा बाबूंनी छड्या मारायला सुरुवात केली. शेवटी ते दमले आणि खाली बसले, परंतु केशव मात्र आपला हात तसाच पुढे धरून उभा होता. त्याच्या ओठांवरचे प्रारंभीचे स्मितहास्य तसेच कायम होते.

१९१३ साली दामोदर नदीला आलेल्या महापुरामुळे बऱ्याच मोठ्या प्रदेशात जेव्हा हाहा:कार माजला होता, तेव्हा इतर डॉक्टरां-सह केशवही मदतकार्यात सहभागी झाला होता. गंगानदी सागराला मिळते त्या ठिकाणी दरवर्षी मकरसंक्रांतीला होणाऱ्या जत्रेच्या सुमारास कॉलऱ्याच्या साथीची हमखास लागण होई. त्यावेळी देखील केशव मदतकार्यात भाग घेई आणि झोपड्यांमधल्या रुग्णांची सेवाशुश्रूषा करी.

क्रांतिकार्यात आणि वैद्यकीय कार्यात भाग घेत असतानाच केशव बंगालच्या सार्वजनिक जीवनातही सहभागी होत होता. १९११ साली 'दिल्ली दरबारवर बहिष्कार' घालण्याच्या आंदोलनात त्याने भाग घेतला आणि त्याबद्दल त्याला अटकदेखील झाली. एका वेळी तर त्याची

चार तास चौकशी चालली होती.

सर आशुतोष मुखर्जी– डॉ. श्यामाप्रसादांचे पिताजी– यांना केशव पित्यासमान मान देत असे. अनेक वेळा तो त्यांच्याकडे सल्ला मागायला जात असे. ' अमृत बझार पत्रिका 'चे संपादक श्री. मोतीलाल घोष यांचा केशव इतका लाडका होता की ' केसरी 'चे अंक त्याला वाचायला मिळावेत म्हणून ते अगदी जपून ठेवत असत.

नॅशनल मेडिकल कॉलेजने दिलेल्या पदव्यांची अपप्रतिष्ठा करण्यासाठी ब्रिटिश सरकारने ' फसव्या वैद्यकीय पदव्या कायदा ' (Bogus Medical Degrees Act) संमत केला होता. नॅशनल मेडिकल कॉलेजच्या पदवीधरांना एका मामुली परीक्षेला बसावे लागत असे आणि मग त्यांना सरकारमान्य पदव्या दिल्या जात असत. हा राष्ट्रवादी भारतीयांचा अपमान आहे, असे केशवला वाटले. त्याने त्या कराराविरुद्ध आंदोलन संघटित केले आणि आशुतोष मुखर्जी, मोतीलाल घोष, सुरेन्द्रनाथ बॅनर्जी प्रभृती नेत्यांच्या साहाय्याने कायदा रद्द करून घेण्यात यशही संपादन केले.

पुलिन बिहारी दास आणि त्रैलोक्यनाथ चक्रवर्ती या अनुशीलन समितीच्या थोर क्रांतिकारक नेत्यांव्यतिरिक्त केशवचा थोर देशभक्त श्यामसुंदर चक्रवर्ती यांच्याशीही निकटचा संबंध आला. श्यामसुंदरजी कमालीच्या दारिद्र्यात राहात होते. अनेकदा ते अनवाणी असत. त्यांच्या कपड्यांची लक्तरे लोंबत असत. केशव कुठल्या ना कुठल्या तरी विद्यार्थी वसतिगृहात त्यांच्या जेवणाची वारंवार व्यवस्था करीत असे. मित्रांकडून पैसे गोळा करून केशव तेदेखील श्यामसुंदरजींना देत असे. आणि ' आपल्याहूनही जास्त गरजू असणाऱ्या तिसऱ्याच कुणालातरी ' श्यामसुंदरजी तो पैसा देऊन टाकीत असत.

केशवचा कलकत्त्यातला आणखी एक मित्र म्हणजे मौलवी लियाकत हुसेन. ही मोठी वेगळी असामी होती. एकदा मौलवीसाहेब आजारी पडले, तेव्हा सहा आठवडे त्यांची शुश्रूषा करून केशवने त्यांना बरे केले. लियाकत हुसेन यांच्यातल्या राष्ट्रभक्त क्रांतिकारकाने परक्या फेझ टोपीचा त्याग केला आणि भगवा ध्वज हाच भारताचा राष्ट्रध्वज

आहे हेही मान्य केले.

१९१४ साली केशवने आपला वैद्यकीय अभ्यासक्रम (एल. एम. एस.) पूर्ण केला. त्यानंतर थोड्याच काळात पहिले महायुद्ध सुरू झाले. लष्करी वैद्यकीय सेवेत प्रवेश मिळवावा म्हणून केशव आणि इतर काही क्रांतिकारक डॉक्टर डॉ. सुऱ्हावर्दींना भेटण्यासाठी गेले, परंतु 'राजकीय कारणांसाठी तुम्हाला प्रवेश देता येणार नाही.' असे त्या सर्वांना नम्रपणे सांगितले गेले.

दोन वर्षांची इन्टर्नशिप करून झाल्यावर केशव नागपूरला परतला. तो परतला तो केवळ एक वैद्यकशास्त्राचा सर्वांगीण अभ्यास केलेला एक डॉक्टर म्हणूनच नव्हे, तर क्रांतिकारक नेता म्हणूनदेखील. लौकरच टिळकांची मंडालेच्या तुरुंगातून सुटका झाली. ती घटना केशवने नागपुरातल्या डॉ. मुंजे यांच्या घरावर रोषणाई करून साजरी केली.

डॉ. केशव हेडगेवार नागपूरला परतले तेव्हा संपूर्ण मध्य प्रांतात व विदर्भामध्ये फक्त ७५ ॲलोपथिक डॉक्टर होते. त्यांनी वैद्यकीय व्यवसाय सुरू केला असता तर त्यांची आर्थिक भरभराट होणे अगदी सहजासहजी शक्य होते. ५००० रु. हुंडा देऊन त्यांना एक स्थळदेखील सांगून आले होते. त्या काळात ५००० रु. म्हणजे बरीच मोठी रक्कम होती. परंतु कौटुंबिक स्वास्थ्य किंवा व्यावसायिक यश हे डॉ. हेडगेवारां-समोरचे ध्येय नव्हतेच मुळी ! त्यांची ध्येये वेगळीच होती. पुढील चार वर्षांत वृत्तपत्रे सुरू करण्यापासून ते होम रूल लीगमध्ये सहभागी होण्या-पर्यंत आणि गणेशोत्सव साजरा करण्यापर्यंत अनेक चांगल्या सार्वजनिक कार्यांत त्यांनी भाग घेतला. त्याचवेळी त्यांच्या क्रांतिकारक हालचाली-देखील शांतपणे चालू होत्याच. एकदा थोडा दारूगोळा हलवायचा होता, तेव्हा कुणालाही संशय येऊ न देता ते काम पार पाडण्यासाठी डॉक्टरांनी काही मुलांनाच बायकांचे वेषांतर करायला लावले होते. दुसऱ्यांदा त्यांनी काही मित्रांना खुद्द पोलिसांच्याच वेषात उभे केले होते. शस्त्रास्त्रांनी भरलेली एक वॅगन फोडून त्या पोलिसांनी बऱ्याच पेट्या टांग्यातून पळवल्या होत्या. या क्रांतिकारक हालचालींत डॉक्टरांना

भाऊजी कर्वे आणि शमीमुल्ला खान यांची मदत होत असे.

एकदा लोकनायक अणे यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या काँग्रेस-च्या एका बैठकीत 'क्रांतिकारकांच्या हालचालींचा निषेध करण्याचा' ठराव मांडला गेला. डॉक्टर तावडतोब उभे राहिले आणि म्हणाले, "माझा या ठरावाला विरोध आहे." त्यानंतर अणे म्हणाले, "डॉक्टर हेडगेवार जे काही म्हणाले, त्याला तसेच कारण आहे. क्रांतिकारकांचा निषेध झालेला त्यांना सहन करता येणार नाही. त्यांच्या पद्धती कोणत्याही असोत, क्रांतिकारक हे जहाल देशभक्तच आहेत. फार फार तर त्यांच्या मार्गाबद्दलचे मतभेद तुम्हाला व्यक्त करता येतील. परंतु त्याच वेळी त्यांनी केलेल्या अतुलनीय त्यागाबद्दल तुम्ही त्यांचे ऋणही मान्य केले पाहिजेत !" आणि मग तो मांडला गेलेला ठराव आपो-आपच मागे घेतला गेला.

पुढे कित्येक वर्षांनी आपल्या मित्रांशी बोलताना डॉक्टरांनी सांगितले होते की, 'मी सतत नावे आणि वेष बदलत राहिलो, क्रांति-कार्याबद्दल कुणालाही कधीही पत्र लिहिले नाही किंवा एखाद्या क्रांति-कारक मित्राचा पत्तादेखील जवळ बाळगला नाही आणि म्हणूनच मी कधीही पकडला गेलो नाही.' अर्थात त्यांची स्मरणशक्ती इतकी तीव्र होती की, वीस वर्षांचा कालावधी मध्ये गेलेला असतानाही पूर्वीच्या असंख्य सहकाऱ्यांची नावे त्यांच्या पत्त्यांसह ते सांगू शकत होते.

पहिले महायुद्ध जसजसे पुढे जात चालले आणि ब्रिटिशांच्या विरुद्ध पारडे झुकत चालले तसतसा डॉक्टरांचा उत्साह वाढत चालला. बहुतेक भारतीय व ब्रिटिश सैन्य त्यावेळी परदेशात होते. त्या स्थितीचा फायदा घेऊन भारताने एकतर्फी स्वातंत्र्याची घोषणा करावी, अशी त्यांनी डॉ. मुंजे यांना सूचनादेखील केली. परंतु मुंजे यांना ती योग्य वाटली नाही. डॉक्टर मग पुण्याला गेले व काही दिवस लोकमान्य टिळकांसमवेत राहिले. तेथून ते शिवाजीच्या जन्मस्थानी शिवनेरीलाही जाऊन आले. तिथे त्यांना ते पवित्र स्थान दुर्लक्षित असल्याचे आणि त्याच्याजवळच एक मशीद व दर्गा असल्याचे आढळले. त्यामुळे ते दुःखी झाले.

आणि मग झाले काँग्रेसचे ऐतिहासिक नागपूर अधिवेशन !

इ. स. १९२० च्या डिसेंबर महिन्यातील शेवटच्या आठवड्यात झालेल्या त्या अधिवेशनाला १४००० हूनही अधिक प्रतिनिधी उपस्थित होते. प्रतिनिधींच्या उपस्थितीचा तो एक उच्चांक होता. स्थानिक स्वागत समितीने १००० स्वयंसेवकांचे पथक उभारले होते. प्रतिनिधींच्या राहण्या-जेवण्याची सोय पाहणाऱ्या दलाचे नेतृत्व डॉक्टर हेडगेवारांकडे सोपवण्यात आले होते. परंतु त्या कामापेक्षा डॉक्टरांना उत्सुकता होती ती त्या अधिवेशनात होणाऱ्या कामकाजाविषयी. लोकमान्य टिळकांचे निधन झाले होते. ते अधिवेशनाला उपस्थित नाहीत, याची डॉक्टरांना बरीच खंत वाटत होती. त्यामुळेच 'आपण आपल्या एकांतवासातून बाहेर या' अशी अरविंदांना विनंती करण्यासाठी डॉ. मुंजे जेव्हा पाँडिचेरीला गेले होते तेव्हा डॉक्टरही त्यांच्याबरोबर गेले होते, परंतु अरविंदांनी त्यांची निराशाच केली. ते काही अधिवेशनाला यायला तयार झाले नाहीत. अधिवेशनाच्या अध्यक्षपदासाठी बहुसंख्य राज्यांनी विजयराघवाचारियार यांचे नाव सुचवले. पण डॉक्टरांना काही ते फारसे पसंत पडले नाही. नुकत्याच झालेल्या गव्हर्नरांच्या मेजवानीत सहभागी झालेल्या विजयराघवाचारियार यांच्यापेक्षा क्रांतिकारक आंदोलनाचे एक अध्वर्यू श्यामसुंदर चक्रवर्ती यांनी अध्यक्ष व्हावे, असे डॉ. हेडगेवारांना वाटत होते. ते घडू शकले नाही त्यामुळे त्यांचा विरस झाला.

विषयनियामक समितीत डॉक्टरांनी आणि अन्य तिघांनी संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयाचा आग्रह धरला, पण त्यावेळी गांधीजी सहमत झाले नाहीत. 'खिलाफतीच्या पुनर्स्थापनेप्रमाणेच गोरक्षणाचाही काँग्रेसने आग्रह धरावा' अशी, डॉक्टरांचे एक मित्र श्री. बढे यांनी सूचना केली, पण गांधीजी तिच्याशीही सहमत झाले नाहीत. अर्थात पुढे अधिवेशनात जेव्हा गांधीजींनी 'गोरक्षण हे स्वराज्याहूनही अधिक महत्त्वाचे ध्येय' असल्याचे जाहीर केले तेव्हा बढे, हेडगेवार व इतरांना विजय मिळाल्यासारखेच वाटले. डॉक्टरांनी 'साम्राज्यवादापासून मुक्त अशा लोकशाहीचे ध्येय' काँग्रेसने स्वीकारावे, यासाठीदेखील विषयनियामक

समितीत बरेच प्रयत्न केले. परंतु त्याबाबतीतही समितीने नकार दिला. दि. २१ मार्च १९२१ च्या 'मॉडर्न रिव्हयू 'मध्ये अधिवेशनासंबंधी जे टिपण प्रसिद्ध झाले त्यात 'या सूचनेला अधिक चांगला प्रतिसाद मिळायला हवा होता' असे स्पष्ट म्हटले होते.

काँग्रेसचे अधिवेशन संपल्यावर असहकाराची चळवळ सुरू झाली. तुर्कस्थानच्या माजी सुलतानाला सर्व मुसलमानांचा खलिफा म्हणून पुन्हा प्रतिष्ठित करण्यात यावे, या मागणीचा डॉक्टरांच्या मनावर काही फारसा ठसा उमटला नाही, पण ती चळवळ सगळ्या देशात जागृती घडवील आणि स्वातंत्र्य जवळ आणील, असा त्यांना विश्वास वाटला. परक्या ब्रिटिश राजवटीच्या कल्पनेनेदेखील त्यांच्या अंगाचा तिळपापड होत असे, संतापाने त्यांचे शरीर थरथरत असे. त्यामुळे साहजिकच ते त्या चळवळीत सर्वस्व पणाला लावून सहभागी झाले. राजद्रोही ठरेल असे भाषण केल्याबद्दल त्यांना अटक करण्यात आली आणि न्यायमूर्ती स्मेली यांच्यासमोर उभे करण्यात आले. हे न्यायमूर्ती इतके पूर्वग्रहदूषित होते की डॉक्टरांचा बचाव करण्याकरता आलेल्या सहा वकिलांनी त्यांच्या निषेधार्थ सभात्याग केला होता. त्यानंतर डॉक्टरांनी न्यायालयात केलेले निवेदन भलतेच वादळी स्वरूपाचे होते.

डॉक्टर हेडगेवार म्हणाले, "कायद्याने स्थापन झालेल्या ब्रिटिश सरकारविरुद्ध घृणा, तिरस्कार आणि संताप वाढीस लागेल, त्याचप्रमाणे भारतीय आणि युरोपीय लोकांमध्ये शत्रुत्व निर्माण होईल अशा प्रकारची भाषणे मी हेतुपूर्वक करीत होतो काय, या प्रश्नाचे उत्तर देण्याकरता मला येथे उभे करण्यात आले आहे. या भारतात एका भारतीयाच्या कृतीची योग्यायोग्यता ठरवून निर्णय देण्याचा अधिकार आपल्या हाती आहे, असे एका परक्या देशाने गृहीत धरावे हा माझा आणि माझ्या थोर देशाचा अपमान आहे, असे मी मानतो. भारतात सध्या कायद्याने प्रस्थापित झालेले सरकार अस्तित्वात आहे, असे मला वाटत नाही आणि आता जेव्हा मला तसे सांगण्यात आले तेव्हा मला आश्चर्याचा धक्काच बसला. आज या देशात जे अस्तित्वात आहे ते पाशवी शक्तीच्या आधारावर उभे असलेले, जबरदस्तीने लादण्यात

आलेले दहशतीचे राज्य ! आज इथे कायदा बनला आहे या अशा परक्या राजवटीचा, नोकर आणि न्यायालये बनली आहेत त्याच राजवटीची हत्यारे. जगाच्या कुठल्याही भागात ज्या सरकारला अस्तित्वात राहण्याचा अधिकार हवा असेल ते सरकार लोकांचे, लोकांकडून निवडले गेलेले आणि लोकहितासाठीच झटणारे सरकार असले पाहिजे. शासन चालवण्याच्या इतर सर्व पद्धती म्हणजे त्या त्या देशांना लुटण्यासाठी आणि लुबाडण्यासाठी साहसी गुन्हेगारांनी शोधून काढलेल्या भ्रष्ट राज्यपद्धती आहेत, हे निश्चित !"

"मी माझ्या देशबांधवांमध्ये माझ्या दीनदुबळ्या मातृभूमीबद्दलचे प्रेम निर्माण करण्याचा प्रयत्न केला. भारत हा भारतीयांसाठी आहे हे तत्त्व त्यांच्या मनावर ठसवण्याचा मी प्रयत्न केला. राजद्रोही झाल्याशिवाय जर एखादा भारतीय या राष्ट्रभक्तिपूर्ण तत्त्वांची शिकवण देऊ शकत नसेल, भारतीय आणि युरोपीय लोकांमध्ये शत्रुत्वाची भावना निर्माण केल्याशिवाय जर कुणी वस्तुस्थिती मांडू शकत नसेल, जर परिस्थिती या थराला पोचली असेल तर युरोपीय लोकांनी आणि आपल्याला भारत सरकार म्हणवून घेणाऱ्यांनी हे ओळखावे की, या देशातून सन्मानपूर्वक निघून जाण्याची त्यांची वेळ आता टळून चालली आहे."

"मला माझ्या डोळ्यांसमोर हे स्पष्ट दिसते आहे की, माझ्या भाषणांची संपूर्ण व बिनचूक नोंद घेण्यात आलेली नाही. माझ्या भाषणांचे हे वृत्तांत अर्धवट, विपर्यस्त आणि संदर्भविरहित आहेत. परंतु मला त्याची पर्वा नाही. राष्ट्राराष्ट्रांमधील संबंधांना आधारभूत असणाऱ्या तत्त्वांप्रमाणेच मी ग्रेट ब्रिटन आणि युरोपीय लोकांच्या संदर्भात वागलो आहे. ते काहीही असो, मी जे काही बोललो असेन ते माझ्या देशबांधवांचे हक्क आणि स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठीच बोललो आहे आणि मी बोललेल्या प्रत्येक शब्दावर मी आजही ठाम आहे !"

डॉक्टरांचे हे न्यायालयीन निवेदन त्यांच्या 'मूळ भाषणापेक्षा अधिक राजद्रोही' असल्याचे मत न्या. स्मेली यांनी व्यक्त केले आणि

एक वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा त्यांना ठोठावण्यात आली. न्यायालयातून डॉक्टरांना घेऊन जात असता एक हजाराहूनही अधिक लोकांनी त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार केला. डॉ. मुंजे, बॅरिस्टर अभ्यंकर, शमीमुल्ला खान आणि इतर काँग्रेस नेत्यांनी त्यांना पुष्पहार घातले. ती तारीख होती १९ ऑगस्ट १९२१.

तुरुंगात गेल्यावर सर्वप्रथम डॉक्टरांना त्यांचे जानवे काढून टाकायला सांगण्यात आले. त्यांनी तसे करण्यास साफ नकार दिला. त्यावेळी तुरुंगाधिकारी असणारा फोर्ड हा आयरिश होता. भारतीयांच्या स्वातंत्र्यलढ्याबद्दल त्याला सहानुभूती वाटत होती. त्याने डॉक्टरांना जानवे ठेवण्याची परवानगी दिली.

सक्तमजुरी म्हणून डॉक्टरांना हँडमेड कागदाला पॉलिश करण्याचे काम देण्यात आले. त्यावेळी कागदाला चकाकी आणण्यासाठी वापरली जाणारी रसायने अगदीच निकृष्ट दर्जाची असत. त्यामुळे डॉक्टरांच्या हातांना भोके पडली. पण त्याबद्दल त्यांनी कधीही तक्रार केली नाही.

तथापि, तुरुंगात डॉक्टरांना काही कटू अनुभवही आले. खिलाफत चळवळीत भाग घेतल्यामुळे तुरुंगात आलेल्या इनामुल्लाखान नावाच्या एका कैद्याने पहाटे इतर सगळे कैदी झोपेत असताना मोठ्या आवाजात कुराणपठण करायला सुरुवात केली. लगेच राधामोहन नावाच्या आर्यसमाजी सत्याग्रह्याने त्याच्यापेक्षाही मोठ्या आवाजात रामायण म्हणायला प्रारंभ केला. परिणामी दुसऱ्यांची झोपमोड होऊ न देण्याची इनामुल्लाला शिकवण मिळाली. इनामुल्लाला पुस्तकबांधणीचे काम देण्यात आले होते. एके दिवशी त्याने 'महाभारत'ची एक प्रत घेतली आणि तो बांधणी करीत असलेल्या पुस्तकांवर वजन म्हणून ती ठेवली. तेवढ्याने समाधान झाले नाही म्हणून की काय, त्या पुस्तकांवर आणखी दाब देण्याच्या निमित्ताने तो सरळ त्या 'महाभारत'वर उभा राहिला. त्याच्या या अशिष्ट वागण्यामुळे डॉक्टरांना बराच धक्का बसला.

त्याच दिवशी नंतर थोड्या वेळाने बरेच कैदी तुरुंगातल्या एका खोलीत गप्पा मारीत होते. डॉक्टर नेहमीप्रमाणेच खोलीतल्या टेबलावर

बसले होते. शेजारच्या बिछान्यावर कुराणाची प्रत होती. त्या कुराणापेक्षा वरच्या जागेवर डॉक्टरांनी बसण्यास इनामुल्लाने हरकत घेतली. तेव्हा डॉक्टर त्याला म्हणाले, " ते कुराण कायम बिछान्यावरच पडलेले असते आणि मी नेहमीच टेबलावर बसलेलो असतो. आजपर्यंत तूदेखील कधी याला हरकत घेतली नाहीस. शिवाय मी जो बसलो आहे तो कुराणापासून चांगला १०–१५ फूट लांब बसलेलो आहे. शिवाय हे कुराण आणखी एखाद्या उंच ठिकाणी ठेवावे असे तुला वाटत असेल तर तू तसे अवश्य करू शकतोस." इनामुल्लाला नाइलाजाने गप्प बसावे लागले.

या अशा घटनांव्यतिरिक्त डॉक्टरांचे तुरुंगातले जीवन काळजीविरहित होते. कोणतेही काम करण्यात त्यांनी कुचराई केली नाही की कुठल्या खास सोयीसवलतीदेखील मागितल्या नाहीत. दि. १२ जुलै १९२२ रोजी जेव्हा ते तुरुंगातून बाहेर आले तेव्हा त्यांचे वजन चांगले २५ पौंडांनी वाढलेले होते. तुरुंगाच्या दाराशी त्यांचे डॉ. मुंजे, डॉ. खरे, डॉ. परांजपे प्रभृतींनी स्वागत केले. त्या दिवशी काँग्रेसच्या कार्यकारिणीची नागपूरमध्ये बैठक होती. संध्याकाळच्या बैठकीत डॉक्टरांचे पुष्पहार घालून अभिनंदन करण्यात आले. त्या बैठकीला मोतीलाल नेहरू, डॉ. अन्सारी, राजाजी, अजमलखान, विठ्ठलभाई पटेल प्रभृती नेते उपस्थित होते.

मात्र त्यावेळची राष्ट्रीय स्थिती मुळीच प्रेरणादायक नव्हती. 'एका वर्षात स्वराज्य' मिळवून देण्याचा गांधीजींचा कार्यक्रम पूर्णपणे फसला होता. भ्रमनिरास झाल्यामुळे सगळ्या समाजाचे नीतिधैर्यच खचल्यासारखे झाले होते. डॉक्टरांनी मात्र आपल्याला अनेक सार्वजनिक कार्यामध्ये गुंतवून घेतले. १९२२ साली अनाथ विद्यार्थी गृहाची स्थापना करण्यात त्यांनी सक्रिय पुढाकार घेतला. ख्रिस्ती मिशनऱ्यांपासून अनाथ मुलांना वाचवणे आणि भूमिगत क्रांतिकारकांना आश्रय देणे हे त्या संस्थेच्या स्थापनेमागचे उद्देश होते. रायफल असोसिएशन आणि स्वाध्याय मंडळ या दोन संस्थांचे ते सभासद झाले. विभागीय क्रीडा-

समितीवर त्यांची नेमणूक झाली. त्याचप्रमाणे नागपूर विभागीय काँग्रेस समितीचे ते सरचिटणीसही झाले.

राष्ट्रीय स्थिती मात्र दिवसेंदिवस बिघडतच चालली होती. खिलाफत आंदोलनाच्या वाऱ्यांमुळे जातीय वणवा भडकला होता. पहिले महायुद्ध सुरू झाले तेव्हा तुर्कस्थानचा सुलतान हा सर्व मुसलमानांचा वंशपरंपरागत खलिफा होता. तुर्कस्थानचा युद्धात पराभव झाल्यानंतर सुलतानाला पदच्युत केले गेले आणि त्या देशातला नवा जबरदस्त राज्यकर्ता केमाल पाशा याने खुद्द खिलाफतच रद्द करून टाकली. खलिफाचा तो अस्त तुर्की आणि अरबी मुसलमानांना स्वागतार्ह वाटला, पण भारतीय मुसलमानांना या बाबतीत प्रक्षुब्ध करण्यात आले. 'तो इस्लामवरचा आणि मुसलमानांवरचा हल्ला आहे,' असा अर्थ लावण्यात आला. त्या परिस्थितीत गांधीजींनी भारतीय मुसलमानांची बाजू उचलून धरली आणि त्यांना सांगितले की, "जागे व्हा, उठा आणि खलिफाला पुन्हा त्याच्या गादीवर बसवा, नाहीतर तुमचा कायमचा अधःपात ठरलेलाच आहे!"

याची मुद्दाम नोंद घेतली पाहिजे की, जिनांनी या खिलाफत चळवळीला विरोध दर्शवला होता. 'गांधीजी आगीशी खेळत असल्याचा' त्यांनी इशाराही दिला. डॉ. अन्सारींनीदेखील त्या चळवळीला पाठिंबा दिला नाही.

महायुद्धामुळे भारतातले राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले होते. खिलाफत चळवळीने त्या आगीत तेल ओतण्याचे काम केले. दिल्लीतल्या जामा मशिदीच्या तटावरून स्वामी श्रद्धानंद भाषण करीत आहेत, अशी हिंदू-मुसलमान ऐक्याची प्रचीती आणून देणारी काही संस्मरणीय दृश्ये त्या काळात पुढे आली, हे खरे; वीस हजारांहून अधिक लोक तुरुंगात गेले हेही खरे; पण त्या चळवळीचा मूळ पायाच चुकीचा होता. धार्मिक अभिनिवेशावर ती आधारलेली होती. त्यामुळे ती अखेरीस अपयशी ठरणार, हे निश्चितच होते. 'अल्ला– हो– अकबर–'सारखी घोषणा राजकीय सभांच्या वेळी दिली जाऊ लागली; 'भारत माता की जय' या घोषणेपेक्षादेखील अल्लाचा म्हणजे परमेश्वराचा जयजय-

कार करणारी ही घोषणा अधिक श्रेष्ठ आहे, असे गांधीजींनी जाहीर केले. पण या घोषणेबरोबर जोडल्या गेलेल्या ऐतिहासिक प्रसंगांच्या स्मृतींमुळे हिंदू अस्वस्थ होणे स्वाभाविक होते. त्या सर्व चळवळीमुळे सामान्य मुसलमानांमधला धार्मिक अभिनिवेश चाळवला गेला. नको तितका आवेश दाखवला जाऊ लागला. हजारो मुसलमानांनी 'नापाक' भारतात राहायचे सोडून देऊन, 'हिजरत' म्हणजे धार्मिक स्थलांतर करून, इस्लामी अफगाणिस्तानात स्थायिक व्हायचा प्रयत्न केला. परंतु त्यांची तेथून हकालपट्टीच करण्यात आली.

एकेकाळी महासामर्थ्यवान असणाऱ्या ऑटोमन साम्राज्याचे 'युरोपच्या आजारी माणसा'त रूपांतर करून टाकणाऱ्या तुर्की सुलतानापासून सुटका करून घेण्याचे 'तरुण तुर्कां'चे प्रयत्न फार पूर्वीपासून चालू होते आणि तुर्की साम्राज्यातले अरब तुर्कस्थानच्या– मग तिथे राजेशाही असो की प्रजासत्ताक राजवट असो– जोखडातून मुक्त झाल्यामुळे आनंदातच होते. पण भारतीय मुसलमान मात्र आपल्याच कल्पनांच्या जगात रममाण झाले होते.

जुना खलिफा अस्ताला गेल्यामुळे भारतीय मुसलमानांनी केमाल पाशाला नवा खलिफा होण्याची विनंती केली. मध्यंतरीच्या काळात 'सर्व तुर्कांचा पिता' अशा अर्थाची 'अतातुर्क' ही पदवी लावून घेतलेल्या त्या तुर्की राज्यकर्त्याला ती मोठी गंमतच वाटली. 'तुम्ही सारे ब्रिटिशांचे गुलाम असताना खलिफा म्हणून माझ्या आज्ञेचे पालन कसे काय करू शकाल ?' असा प्रश्न त्याने त्याला भेटायला गेलेल्या भारतीय मुसलमानांच्या एका शिष्टमंडळाला विचारलादेखील होता.

नंतर अलीबंधूंनी अरेबियाच्या राजा अब्दुल– अझीझ इब्न–सौद याची भेट घेऊन त्याने खलिफाचे पद स्वीकारावे, अशी विनंती केली. पण दुसऱ्या कोणत्याही देशातले मुसलमान आपल्याला खलिफा म्हणून स्वीकारणार नाहीत, याची सौद राजाला जाणीव होती. शिवाय ही ब्रिटिश सूचना असल्याचेही तो ओळखून होता. त्यामुळे त्याने शांतपणे अलीबंधूंना सांगितले की, "जर इस्लामबद्दलच तुम्हाला एवढी आस्था वाटत असेल तर तुम्ही गांधीजींबरोबर हातमिळवणी करून तुमच्या

देशातून सर्वप्रथम ब्रिटिशांना का बरे हाकलून देत नाही ? इस्लामची खरी शिकवण तीच आहे. तुम्ही माझ्याकडे आला आहात ते ब्रिटिशांचे गुलाम म्हणून आला आहात आणि मला ब्रिटिश सापळ्यात ओढण्यासाठी– अडकवण्यासाठी आला आहात, असे मला वाटते." तीन दिवसांचे परंपरागत अरबी आदरातिथ्य स्वीकारून मायदेशी परतण्याचा सल्ला त्याने दिला आणि 'गांधीजींना सलाम पोचवायला' सांगितले. शौकत अलीने जेव्हा विरोध करायचा प्रयत्न केला तेव्हा अब्दुल– अझीझ उठून उभा राहिला, त्याने दोघा अलीबंधूंची दाढी धरून त्यांना जवळ खेचले आणि त्यांची डोकी एकमेकांवर आपटली, असे म्हणतात !

तुर्कस्थान आणि अरेबियात निराशा पदरी पडल्यावर खिलाफत चळवळीचे नेते इराणचा नवा राजा रेझा शाह पहेलवी याच्याकडे गेले. पण तो सम्राट शिया किंवा सुन्नीपंथीय इस्लामपेक्षा 'आर्यवंशीय इराण'-बद्दल आणि त्याच्या आहूर मझदाबद्दल अधिक आस्था बाळगून होता.

साहजिकच खिलाफत चळवळ पूर्णपणे अपयशी ठरली. आपले उद्दिष्ट साध्य करण्यात असफल ठरलेल्या आंदोलनाची नेहमी कुठेतरी विकृत प्रतिक्रिया उमटत असते. खिलाफत चळवळीसारख्या मोठ्या अहमहमिकेने चालवल्या गेलेल्या चळवळीचे अपयश कोणत्या भयानक स्वरूपात पडसाद उमटवील, हे सांगता येणे कठीण होते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढण्याऐवजी मुसलमान फक्त एका खलिफासाठी लढले, म्हणून हिंदूंनी मुसलमानांना दोष द्यायला सुरुवात केली तर उलटपक्षी ज्या स्वराज्यात मुसलमान अल्पसंख्य ठरतील असे स्वराज्य ब्रिटिशांकडून मिळवण्यासाठी मुसलमानांचा हिंदूंनी फक्त उपयोग करून घेतला, असा ठपका मुसलमान लोक हिंदूंवर ठेवू लागले. ब्रिटिशांविरुद्ध किंवा अतातुर्कविरुद्ध लढणे मुसलमानांना शक्य नव्हते, म्हणून त्यांचा संताप हिंदूंविरुद्ध व्यक्त होऊ लागला. कोहाट, मलबार आणि इतरत्र अभूतपूर्व हिंसाचार घडला.

'भारत सेवक समाजा'च्या एका अहवालानुसार मलबारमधल्या मोपला बंडात १५०० हिंदूंना ठार मारण्यात आले आणि २०,००० हिंदूंना बाटवण्यात आले. सुमारे ३ कोटी रुपये किमतीच्या मालमत्तेचा

विध्वंस करण्यात आला. सरकारने सर्व शक्ती पणाला लावून प्रत्याघात केला आणि मोपल्यांचे बंड चिरडून टाकले. त्या कारवाईत २,३३९ लोक मारले गेले तर २४,१६७ लोकांना शिक्षा ठोठावण्यात आल्या. मलबारहून मद्रासला नेले जात असता एका मालवाहू रेल्वेगाडीच्या डब्यातल्या १५० मोपला लोकांपैकी ६६ जण गुदमरून मरण पावले. मोपल्यांचा हिंसाचार आणि ते बंड दडपून टाकताना ब्रिटिशांनी केलेला प्रतिहिंसाचार या दोन्ही घटनांमुळे संपूर्ण देशाला धक्का बसला.

मानसिक दृष्टीने विचार करता कोहाट येथील कत्तल ही अधिक भयानक ठरली. तिने सर्वांनाच हादरवून टाकले. पट्टाभि सीतारामय्या यांनी 'हिस्टरी ऑफ काँग्रेस' या आपल्या ग्रंथात असे लिहून ठेवले आहे की, "१९२४ या वर्षातली सर्वांत मोठी विषारी घटना जर कोणती असेल तर ती म्हणजे दिल्ली, गुलबर्गा, नागपूर, लखनौ, शाहजहानपूर, अलाहाबाद, जबलपूर इ. अनेक ठिकाणी आणि त्या सर्वांपेक्षाही मोठ्या प्रमाणावर कोहाटमध्ये उद्‌भवलेली जातीय दंगल. कोहाटच्या दंगलीने तर भारताचा कणाच मोडल्यासारखे झाले."

वायव्य सरहद्द प्रांतातील या छोट्याशा गावात हिंदूंचे प्रमाण जेमतेम पाच टक्क्यांएवढे होते. असे असूनही त्यांच्यातल्या १५५ लोकांना ठार करण्यात आले. त्या आगडोंबापासून सुटका करून घेण्यासाठी उरलेल्या सगळ्या हिंदूंनी ३२० किलोमीटर लांब असलेल्या रावळ-पिंडीकडे आश्रयार्थ धाव घेतली. आणि २१ दिवसांचा उपास करण्याचा निर्णय गांधीजींनी घोषित केला. त्यांना त्या निर्णयापासून परावृत्त करण्याचा जेव्हा श्री. महादेव देसाईंनी प्रयत्न केला तेव्हा त्यांना गांधीजी म्हणाले, "माझी चूक झाली! मी, हिंदूंचा विश्वासघात केल्याचा आरोप माझ्यावर केला जाऊ शकेल, असा वागलो. मुसलमानांशी मैत्री करा, असे मी त्यांना सांगितले. पवित्र ठिकाणांच्या रक्षणाकरता आपले जीवितवित्त त्यांनी मुसलमानांच्या स्वाधीन करावे, असा मी त्यांना सल्ला दिला. आजदेखील मी त्यांना 'अहिंसेचे पालन करा, मारण्याऐवजी मरून भांडणे मिटवा,' असेच सांगतो आहे. आणि या सगळ्याचा परिणाम काय झाला आहे, ते मी पाहातोच आहे. कितीतरी

मंदिरांचा विद्ध्वंस करण्यात आला आहे. कितीतरी भगिनी माझ्याकडे तक्रारी घेऊन आल्या आहेत. काल मी हकीमजींना म्हणालो त्याप्रमाणे आज हिंदू स्त्रिया मुसलमान गुंडांच्या भीतीने ग्रासून गेल्या आहेत. अनेक शहरात एकटे बाहेर पडायला त्यांना भीती वाटू लागली आहे. मला नुकतेच...हून पत्र आले आहे. त्यांच्या लहान मुलांचा ज्या पद्धतीने छळ केला गेला ती कल्पनेतदेखील असह्य आहे. हे सारे संयमपूर्वक सहन करा, असे मी हिंदूंना सांगू तरी कसे शकेन ?"

त्यापूर्वी डिसेंबर १९२३ मध्ये काँग्रेसच्या काकिनाडा अधिवेशनात विष्णू दिगंबर पलुस्कर यांनी 'वंदे मातरम्' गायला सुरुवात करताच त्यावेळचे काँग्रेस अध्यक्ष महंमद अली उठून निघून गेले होते आणि आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी '५० टक्के हरिजनांना बाटवून मुसलमान करण्याची' इच्छा व्यक्त केली होती, एवढेच नव्हे तर 'तेवढे हरिजन उपलब्ध करून दिले गेले पाहिजेत,' असे सूचितही केले होते.

राष्ट्रीय वृत्तीच्या सर्व भारतीयांची मने पिळवटून टाकणारे असे हे प्रसंग होते. खुद्द नागपूरात डॉक्टरांना असे आढळले की मुसलमानांनी गोहत्या करण्याचा त्यांचा तथाकथित अधिकार अचानक प्रात्यक्षिका-सह मांडायला सुरुवात केली होती, त्याचप्रमाणे मशिदींसमोर वाद्ये वाजवायलाही आक्षेप घेतला जाऊ लागला होता. हे दोन्ही प्रश्न खिलाफत चळवळीनंतर उद्भवले होते. हिंदूंच्या मदतीने उभारल्या गेलेल्या मशिदीसमोरदेखील वाद्ये वाजवायला हरकत घेतली जात होती, हा त्या प्रकरणातला मजेशीर भाग होता.

डॉक्टर हेडगेवार, राजा लक्ष्मणराव भोसले आणि इतर अनेकांनी 'जय विठ्ठल, जय जय विठ्ठल' असा जप करीत, वाद्यघोषात मूर्ती नाचवीत दिंडी सत्याग्रह केला आणि सार्वजनिक ठिकाणी संगीत वाजवण्याचा आपला हक्क पुन्हा प्रस्थापित करून घेतला. पण या सगळ्या घटनाक्रमामुळे डॉक्टर विचार करू लागले होते– 'सद्यस्थितीत काय केले पाहिजे ?' याचा...!

ब्रिटिशांची तर देशाबाहेर हकालपट्टी करायलाच हवी होती.

मवाळपंथीयांच्या अर्ज-विनंत्यांचा काहीही परिणाम होत नव्हता. आणि यशस्वी क्रांती घडवून आणण्याच्या दृष्टीने क्रांतिकारकांचे संख्याबळ फारच अपुरे होते. आणि मध्यंतरीच्या काळात अनेक मुसलमानांनी विचित्र भूमिका स्वीकारली होती. ऐंशी टक्के हिंदू लोकसंख्या असलेल्या नागपूरसारख्या शहरातदेखील दंगली माजवणे आणि हिंदू समाजाचे भरपूर नुकसान करणे त्यांना शक्य होऊ लागले होते. गांधीजींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस ही जनसामान्यांची चळवळ बनली होती, हे निश्चित, तथापि तीदेखील खूप मवाळच राहिली होती. संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणेसुद्धा तिला जमले नव्हते. (पुढे १९२९ साली तशी मागणी केली गेली.) मुसलमानांच्या प्रश्नावर ठाम भूमिका घ्यायला ती कचरत होती. अशा स्थितीत काय केले पाहिजे ?

दिवस न् दिवस, महिनो न् महिने, वर्षानुवर्षे डॉक्टर हेडगेवारांनी या प्रश्नांवर इतर सेवाभावी व्यक्तींशी चर्चा केली होती. विविध प्रश्नांची समाधानकारक उत्तरे शोधण्यासाठी सॉक्रेटिस ज्याप्रमाणे त्या-वेळच्या तरुणांबरोबर विचारविनिमय करीत असे, त्याचप्रमाणे डॉक्टरही सार्वजनिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या अनेकांशी सतत चर्चा करीत असत. या चर्चेतून ते अशा निष्कर्षाप्रत आले होते की मुसलमानांसमोर ताठ उभे राहाण्यासाठी हिंदूंनी संघटित होण्याची गरज आहे आणि भारता-तून ब्रिटिशांनी लौकर निघून जावे यासाठी हिंदूंनी सुधारक दृष्टिकोन अंगिकारण्याची गरज आहे. आणि ही दोन उद्दिष्टे साध्य करण्याच्या हेतूनेच १९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना करण्यात आली होती.

## प्रकरण दुसरे : संघाचा जन्म

नागपूरमधील त्या तरुण देशभक्तांनी डॉक्टर हेडगेवारांच्या नेतृत्वाखाली एक समर्थ राष्ट्रीय संघटना उभारण्याचे ठरवले खरे; पण ती संघटना कशी संघटित करावी, याबद्दल मात्र त्यांनी निश्चित असे काहीच ठरवलेले नव्हते. खरे सांगायचे झाले तर असेच म्हणावे लागेल की आंब्याच्या कोयीत आणि प्रत्यक्ष आम्रवृक्षात जसा बराच फरक असतो तसाच १९२५ सालच्या त्या विजयादशमीला अस्तित्वात आलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघात आणि काही वर्षांनंतरच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघात होता. ती संघटना हळूहळू फुलत होती पण आतून उमलत होती.

सुरुवातीला त्या सर्व तरुणांना आपापल्या पूर्वीच्या आखाड्यां-मध्येच शारीरिक व्यायाम करण्यासाठी जात राहायला सांगण्यात आले. त्यांच्यापैकी बहुतेकजण अण्णा खोटयांच्या नागपूर व्यायामशाळेत जाऊ लागले. त्या सर्वांचा उल्लेखनीय विशेष कार्यक्रम होता तो म्हणजे दर रविवारी पहाटे ५ वाजता इतवार दरवाजाजवळ एकत्र जमण्याचा. १९२० सालच्या नागपूर काँग्रेस अधिवेशनातील स्वयंसेवकांचा जो गणवेष होता– खाकी शर्ट, गुडघ्यापर्यंत लांब असणारी खाकी अर्धी चड्डी आणि दोन बटणांची खाकी टोपी– तोच गणवेष त्या प्रसंगी ते सगळे तरुण घालून येत. पुढे पाच वर्षांनी त्या टोपीऐवजी काळी टोपी वापरली जाऊ लागली. दर गुरुवारी देशाच्या सद्यस्थितीविषयी एखाद्या ज्येष्ठ व्यक्तीचे विचार ऐकायला ही सारी मंडळी पुन्हा एकत्र येत. दोन

वर्षांनी या भाषणाला 'बौद्धिक' म्हणण्यात येऊ लागले. अजूनही ती संज्ञा तशीच कायम आहे. जसजशी तरुणांची संख्या वाढत चालली, तसतसा महाराष्ट्र व्यायामशाळा आणि प्रताप आखाडा यांचाही उपयोग केला जाऊ लागला. पण या व्यायामशाळांमधील वितुष्ट किंवा वैमनस्य पुढे त्रासदायक ठरेल, याची जाणीव झाल्यामुळे पुढल्या वर्षीपासून दैनंदिन शाखा भरवल्या जाऊ लागल्या आणि मग लवकरच लाठीचाही वापर सुरू करण्यात आला.

अर्थात शाखा सुरू करणे जेवढे सोपे होते त्यापेक्षा ती चालवून दाखवणे कितीतरी पट कठीण काम होते. सुरुवात झाली ती मोहिते वाड्यापासून. मोहितेवाडा म्हणजे दोन-चार भिंती असलेली परंतु छत नसलेली उंचसखल जमीन होती. तिथे भुताटकी असल्याचा समज प्रचलित होता. पण एकदा तेथे उत्साही स्वयंसेवकांचा वावर सुरू झाल्यावर पुन्हा कधीही कुणीही भुताटकीबद्दल काही ऐकले नाही. तथापि ती जागा सरदार मोहित्यांनी एका सावकाराकडे गहाण टाकली होती. सी. आय. डी.च्या लोकांनी त्या सावकारावर दबाव आणून ती जागा मोकळी करवून घेतली. त्यानंतर राजा लक्ष्मणराव भोसले यांनी त्यांच्या हाथीखान्याची जागा वापरायला देण्याचा मोठेपणा दाखवला. त्यांच्या निधनानंतर पुन्हा शाखेची जागा तुळशीबागेत हलवावी लागली. आणि ती जागादेखील शेतीसाठी नांगरली जावी म्हणून पोलिसांनी लक्ष्मणरावांच्या वारसदारांवर दडपण आणले.

पुढे बराच कालावधी गेल्यानंतर म्हणजे १९३४ साली डॉक्टरांनी मध्यवर्ती आणि कायमचे संघस्थान म्हणून नागपूर शहराबाहेरच्या जंगलात असणारी रेशीमबागची जागा खरेदी केली. १९४४ साली ती जागादेखील 'सिनेमागृह आणि क्रीडांगण बांधण्याच्या' नावाखाली ताब्यात घेण्याचा सरकारने प्रयत्न करून पाहिला. त्या कामासाठी वाटेल तेवढी जागा आजूबाजूला सहज उपलब्ध असतानादेखील सरकारला संघस्थानाचीच जागा हवी होती, पण नागपूरमधल्या अनेक प्रतिष्ठित नागरिकांनी सरकारी धोरणाचा एकमुखाने कडक निषेध केल्यामुळे त्या प्रस्तावर सरकारने माघार घेतली आणि रेशीमबाग मैदान संघाकडेच

राहिले.

रेशीमबाग घेतल्यानंतर काही वर्षांनी मोहितेवाड्याची मालकी-देखील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडे आली. १९४०–४१ सालची गोष्ट, त्या सावकाराला १२००० रुपयांची हुंडी तीन दिवसांत वटवायची होती, नाहीतर त्याचे दिवाळे वाजणार होते. त्याच्या वकिलांनी राष्ट्रीय स्वयं-सेवक संघाशी संपर्क साधला. श्री गुरुजींनी काही तासांच्या अवधीतच आपल्या काही मित्रांकडून आवश्यक ती रक्कम उभी केली. त्या उप-काराची परतफेड म्हणून कृतज्ञता बुद्धीने त्या सावकाराने मोहितेवाडा संघाला विकला. त्या आणि त्याच्या जवळच्या जागेवर सध्याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मध्यवर्ती कार्यालय– हेडगेवार भवन– उभे आहे.

सुरुवातीचे कित्येक महिने नव्या संघटनेचे नावच ठेवले गेले नव्हते. दि. २६ एप्रिल १९२६ रोजी संघटनेचे नाव ठरवण्यासाठी एक बैठक बोलावण्यात आली होती. ' जरी पटका मंडळ ', ' भारत उद्धारक मंडळ ', ' हिंदू सेवक संघ ' आणि ' राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ' अशी वेग-वेगळी नावे सुचविण्यात आली. थोडी चर्चा करून ' राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ' हे नाव मान्य करण्यात आले.

संघटना कितीही लहान असली तरी तिलादेखील थोडाफार पैसा लागतोच. प्रारंभी डॉक्टर हेडगेवार आपल्या खिशातूनच संघटनेचा खर्च चालवीत आणि गरज भासलीच तर मित्रांकडून पैसे गोळा करीत. परंतु ही व्यवस्था समाधानकारक नाही, असे त्या सर्वांनाच जाणवत होते. पैसा गोळा करण्यासाठी एखादी लॉटरी आयोजित करावी, असे कुणी-तरी सुचवले, पण इतरांनी ती सूचना फेटाळून लावली. मग कुणीतरी नाटकाची तिकिटे विकण्याची योजना मांडली, पण ती देखील अमान्य झाली. त्या चर्चेतून खुद्द संघटनेच्या सभासदांनीच देणग्या देण्याची कल्पना पुढे आली. पण देणग्या द्यायचे ठरले तर प्रत्येक सभासदाने किती देणगी द्यावी आणि ती कुणाला द्यावी, असे प्रश्न उभे राहिले. बराच विचारविनिमय झाल्यानंतर असे ठरले की, प्रत्येक सभासदाने आपल्याला शक्य असेल त्याप्रमाणे देणगी द्यावी आणि ती भगव्या ध्वजाला अर्पण करावी. त्या निर्णयानुसार १९२८ साली पहिला गुरु-

दक्षिणा-उत्सव आयोजित करण्यात आला. त्या उत्सवात एकूण ८४ रुपयांची गुरुदक्षिणा जमा झाली.

भारतातल्या विविध न्यायालयांतील महत्त्वाच्या निकालांचे संकलित वृत्त देणाऱ्या 'ऑल इंडिया रिपोर्टर' या नियतकालिकाचे संपादक श्री. रावसाहेब दातार यांच्याकडे देणगी मागायला एकदा काही स्वयंसेवक गेले होते. संघटनेचा जमाखर्च पाहाण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. डॉक्टर हेडगेवारांनी जमाखर्चाच्या वह्या तावडतोब त्यांच्याकडे पाठवून दिल्या. आदल्या दिवशीच्या संध्याकाळपर्यंतचा अगदी आणे-पै पर्यंतचा तपशीलवार जमाखर्च लिहिलेला पाहून दातारांचे समाधान झाले आणि त्यांनी संघटनेला आनंदाने यथाशक्ती मदत दिली. काही वर्षांपूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एक टीकाकार श्रीमती सुभद्रा जोशी यांनी गुरुदक्षिणेची अखिल भारतीय पातळीवर जमा होणारी रक्कम २५ लाख रुपयांच्या घरात असल्याचा अंदाज व्यक्त केला होता. १००० हून अधिक पूर्णवेळ कार्यकर्ते असणाऱ्या एखाद्या अखिल भारतीय संघटनेच्या दृष्टीने ही रक्कम काही फारशी मोठी नाही.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची आरंभीची प्रार्थना अर्धी हिंदीत तर अर्धी मराठीत होती. हिंदी भाग आर्यसमाजाच्या जुन्या प्रार्थनेतून घेतलेला होता. मध्य प्रांत आणि वऱ्हाडातील द्विभाषिक रचना लक्षात घेऊन प्रार्थनेचे स्वरूप बहुधा तसे ठेवण्यात आले असावे. सध्याची संस्कृत प्रार्थना बऱ्याच उशिरा म्हणजे १९३९ साली म्हटली जाऊ लागली.

१९२९ साली अधिकाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. अवघे १७ प्रशिक्षणार्थी होते. शाखांचे कार्य हळूहळू पण निश्चित विस्तारत चालले होते आणि शाखांची संख्यादेखील वाढत चालली होती. लव-कुश, अभिमन्यू, ध्रुव, प्रल्हाद, भीम, भीष्म अशा वीरांची नावे शाखांना दिली जाऊ लागली. नागपूरनंतर संघाचे कार्य वऱ्हाडात, महाकोशल विभागात आणि देशावर म्हणजे पश्चिम महाराष्ट्रात पसरले. पुण्यातल्या उच्चभ्रू लोकांनी प्रारंभी डॉक्टरांना सावधगिरीचा सल्ला देताना म्हटले होते की, 'नागपूरची संत्री पुण्यात फारशी खपत नाहीत.' त्यांच्या त्या विधानात तथ्य असेलही कदाचित;

पण संघ म्हणजे काही संत्री नव्हती. ती एक कल्पना होती आणि अल्पावधीतच पुण्यातल्या उत्कृष्ट तरुणांच्या कल्पकतेकडून संघकल्पनेला प्रतिसाद मिळू लागला. लौकरच मुंबई सरकारकडून मध्य प्रांत आणि वऱ्हाडच्या सरकारकडे विचारणा केली जाऊ लागली की, 'ही कोणती डोकेदुखी तुम्ही आमच्याकडे पाठवून दिली आहे बरे ?'

दुसरे मुख्य केन्द्र होते काशीतले बनारस हिंदू विद्यापीठ. त्या बाबतीत पंडित मदनमोहन मालवीयजी यांनी खूपच मदत केली. लाठ्या वगैरे सामान ठेवण्यासाठी एक छोटी खोली बांधायलासुद्धा त्यांनी परवानगी दिली होती. (त्या खोलीबद्दलचे प्रकरण न्यायप्रविष्ट असतानादेखील आणीबाणीत ती खोली पाडून टाकण्यात आली होती.) या ठिकाणीच दुसरे सरसंघचालक श्री गुरुजी संघात दाखल झाले. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जेव्हा बनारस हिंदू विद्यापीठाचे कुलगुरू झाले तेव्हा आठवड्यातून एकदा ते शाखेला भेट देत असत, एवढेच नव्हे तर 'शाखेची संख्या दुप्पट केली तर मी दररोज येत जाईन', असे सांगून स्वयंसेवकांना प्रोत्साहनही देत असत.

व्यायाम आणि संगीत यांचा मिलाफ म्हणजे आदर्श शिक्षण आहे, असे मत प्लेटोने व्यक्त केले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने खेळ आणि संगीत यांचा मिलाफ घडवून आणला. सुरुवातीपासूनच डॉक्टर हेडगेवारांनी खेळ, कवायत आणि संचलन यांचे महत्त्व समजावून सांगण्यावर भर दिला होता. शारीरिक शिस्तीच्या आधारावरच व्यक्तिगत जीवनातील एकंदर शिस्त अवलंबून असते. 'वॉटर्लूची लढाई एटनच्या क्रीडांगणावर जिंकली गेली', असे जे म्हटले जाते ते उगीच नाही. प्राचीनकाळच्या आश्रमांमध्येदेखील धनुर्विद्येला आणि इतर क्रीडाप्रकारांनाही धर्मग्रंथांच्या अध्ययनाइतकेच महत्त्व दिले जात असे. 'जर आपण चांगल्या रीतीने फुटबॉल खेळलो आणि आपले स्नायू बलवान केले तर आपण गीता अधिक चांगल्या पद्धतीने समजून घेऊ शकू' असे स्वामी विवेकानंद म्हणत असत. श्रीअरविंदांनीदेखील आपल्या पाँडिचेरीच्या आश्रमवासीयांसाठी संचलनाची आणि कवायतीची आवश्यकता नोंदवून ठेवली होती. त्यांनी लिहिले होते की, "वरवर पाहिले तर ते

केवळ खेळ आहेत असे वाटते; पण त्यांची व्याप्ती त्यापेक्षाही कितीतरी अधिक होऊ शकते आणि असतेदेखील. व्यक्तीच्या सवयी घडवण्याची, तिची कार्यक्षमता वाढवण्याची, तिच्या अंगचे गुण संवर्धित करण्याची, जनसामान्यांच्या सेवेसाठी– मग ती युद्धकाळातली असो किंवा शांतता-कालीन असो– तिची तयारी करून घेण्याची आणि राजकीय व सामाजिक कार्याची ओढ त्या व्यक्तीच्या मनात निर्माण करण्याची ती उत्तम साधने आहेत. क्रीडांगणावरच्या या उपक्रमांमुळे एखाद्या व्यक्तीचे आरोग्य, तिची ताकत आणि शरीराची तंदुरुस्ती यांचा पाया घातला जातो हे तर खरेच; परंतु त्यापेक्षाही महत्त्वाची गोष्ट म्हणजे या अशा उपक्रमां-मुळे व्यक्तीला शिस्तबद्ध जीवनाची सवय लागते, तिचे मनोधैर्य उंचावते आणि विशुद्ध व समर्थ राष्ट्रीय चारित्र्याची जडणघडण केली जाते."

आणि त्या शेलाटच्या लाठीचे महत्त्व या अणुयुगातदेखील कमी झालेले नाही. स्वयंसेवकाच्या वैयक्तिक गणवेषाचा लाठी हा एक अविभाज्य भाग होता. बंकिमचंद्रांनी लिहिलेले 'लाठी-माहात्म्य' अजूनही तितकेच खरे आहे.

'लाठी गे! तुझे दिवस आता सरत आले आहेत की काय? बांबू कुटुंबात तुझा जन्म झाला यात शंका नाही. पण तू एखाद्या सुशिक्षित-प्रशिक्षित माणसाच्या हातात असलीस तर तुला न जमण्या-सारखे असे एकही काम नाही. तू एखाद्या तलवारीचेदेखील अनेक तुकडे करू शकतेस, असंख्य ढालीतलवारी तू शतशः विदीर्ण करून टाकल्या आहेस. तुझ्या आघातासरशी सैनिकांच्या हातातल्या रायफली आणि संगिनी दूर भिरकावल्या गेल्या आहेत आणि मोडलेल्या हातांनिशी त्या सैनिकांना पळ काढावा लागला आहे...

'लाठी गे! बंगालमध्ये आजपर्यंत भूमिपुत्रांच्या मानसन्मानाचे, प्रतिष्ठेचे अन् पतिव्रत्याचे, धनधान्याचे, जीवितवित्ताचे तू रक्षण करीत आली आहेस. भूमिपुत्रांचा छळ करणाऱ्या आक्रमकांना जशी तुझी भीती वाटत असे तशी दरोडेखोरांनादेखील तुझीच धास्ती वाटत असे. निळीच्या मळ्यात घाम गाळणाऱ्या मजुरांचे शोषणही तुझ्याच प्रभावामुळे नियंत्रित झाले होते...

'पण तुझ्या वैभवाचे दिवस आता सरले आहेत. आता तू एक लाठी राहिलेली नाहीस, तर बांबूचा एक साधा तुकडा आहेस. एखादा कुत्रा अचानक समोर आला तरी घाबरणाऱ्या बाबूंच्या हातातली काठी झाली आहेस तू आणि तो कुत्रा जरा भुंकला तरी त्यांच्या हातून तू निसटून पडते आहेस...

'अरेरे! तुझे पूर्वापार चालत आलेले ते वैभव तुझ्यापासून हिरावून घेण्यात आले आहे. तुझी आता अमर स्वर्गलोकात पाठवणी झाली असावी, अशी माझी अपेक्षा आहे. स्वर्गराज इंद्राच्या मालकीचे नंदनवनातले पारिजातकाचे झाड हलवून फुले खाली पाडण्यासाठी तुझी नियुक्ती झाली असावी. वासनावृक्षाला लागणारी– धर्म, अर्थ, काम आणि मोक्षासारखी फळे खुडण्यासाठी त्या नंदनवनात येणाऱ्या देवांगना तुला त्यांच्या नाजूक चरणकमलांनी स्पर्श करीत असतील! त्यांच्याकडे आमच्यासाठी शिफारस करून तसे एखाददुसरे फळ तरी या पृथ्वीवर पाडण्याची व्यवस्था कर की!'

डॉक्टरांनी संघस्थानावर सुरू केलेल्या विविध क्रीडाप्रकारांमुळे, कवायतीमुळे आणि संचलनामुळे सहभागी स्वयंसेवकांना तर आनंद होत असेच; पण प्रेक्षकांनाही तो अनुभव चित्तथरारक वाटत असे. समाजात त्यामुळे एक नवे चैतन्य सळसळू लागले होते. नागपूरमध्ये मराठी साहित्य संमेलन भरले होते. पूर्वाश्रमीचे कट्टर टिळकवादी आणि नंतर तितकेच कट्टर गांधीवादी झालेले श्री. काकासाहेब खाडिलकर त्या संमेलनाचे अध्यक्ष होते. डॉक्टरांनी श्री. खाडिलकरांना आणि इतर काही प्रतिनिधींना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थानिक शिबिराला भेट देण्याचे मुद्दाम आमंत्रण दिले. त्या सर्वांनी जेव्हा स्वयंसेवकांची शिस्तबद्ध प्रात्यक्षिके पाहिली, स्वयंसेवकांच्या निष्ठावंत प्रवृत्तीचे जेव्हा त्यांनी दर्शन घेतले तेव्हा त्यांच्यापैकी काहीजण उद्गारले की, "गेले तीन दिवस आम्ही फक्त पुस्तकी साहित्यातच रममाण झालो होतो. पण आत्ता मात्र आम्ही जिवंत साहित्याचे प्रेरक वातावरण अनुभवीत आहोत." काकासाहेब खाडिलकर मात्र शांत होते. त्यांचे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले होते. स्वयंसेवकांना उद्देशून चार शब्द बोलण्याची

डॉक्टरांनी त्यांना विनंती केली. 'नवा-काळ' या दैनिकाचे संपादक आणि विख्यात साहित्यिक असलेले काकासाहेब भावनेने ओथंबलेल्या स्वरात फक्त एवढेच बोलले, "डॉक्टरसाहेब, या कार्याचे वर्णन मी कोणत्या शब्दांत करू? या कार्याचे वर्णन करणे शब्दसामर्थ्यापलीकडचे आहे. हे साधे दृश्यदेखील भरपूर बोलके आहे. आदिशक्तीच्या विजयी अवताराचे– माता दुर्गेचे हे दर्शन आहे! हे साधे दर्शनदेखील तिची ओळख पटण्यासाठी पुरेसे आहे!"

शाखेचा दैनंदिन कार्यक्रम म्हणजे एखाद्या विशिष्ट भागातील स्वयंसेवकांनी ठरवलेल्या वेळी एक तास एकत्र जमणे हा होता. मुख्य शिक्षकांनी शिट्टी वाजवल्यावर स्वयंसेवक रांगेत उभे राहात. भगवा ध्वज फडकवला जाई आणि मग सर्वजण त्याला प्रणाम करीत. तळवा पालथा ठेवून उजवा हात छातीवर धरून हा प्रणाम केला जाई. त्यानंतर शारीरिक कवायत, लाठी-प्रशिक्षण आणि विविध खेळ असा कार्यक्रम असे. शेवटी ते वर्तुळाकार बसत. कोण अनुपस्थित आहे हे पाहिले जाई, तो का अनुपस्थित आहे हे जाणून घेतले जाई. जर एखादा नवा स्वयं-सेवक आला असेल किंवा कुणी पाहुणे आले असतील तर त्यांचा परिचय करून दिला जाई. दुसऱ्या दिवसासाठी काही सूचना असतील तर त्या सांगितल्या जात. मग एखाददुसरे पद्य म्हटले जाई. तास संपला की सगळेजण पुन्हा रांगेत उभे राहात, सारे लक्ष एकवटून उभे राहात, प्रार्थना म्हणत, पुन्हा एकदा ध्वजप्रणाम केला जाई, मग तो ध्वज उतरवला जात असे.

हे झाल्यावर शाखा संपली तरी तावडतोब सगळेजण निघून जात नसत. थोडेसे थांबून सद्यस्थितीवर चर्चा चालू होई. विविध प्रश्नांवर किंवा व्यक्तींबद्दल बोलणे सुरू होई. त्या त्या दिवसाच्या ठळक बातम्यां-वर भाष्य केले जाई. खेळीमेळीच्या वातावरणात ती चर्चा चाले. अधून-मधून हास्यविनोदाची कारंजी उडत. पण त्यामुळे सर्वांच्या विचारांना चालनादेखील मिळत असे. आणि मग घरी परत जात असताना काही स्वयंसेवक आजारी स्वयंसेवकांकडे जात, त्यांची विचारपूस करीत, हवी असेल ती मदत करीत. घरी पोचल्यावरही राष्ट्रभक्तिपर गीतांच्या

ओळी त्यांच्या ओठांवर येत. या अशा संस्कारामुळेच स्वयंसेवकाचे एका कृतिशील राष्ट्रवाद्यात रूपांतर होत असे.

स्थानिक नेत्यांव्यतिरिक्त वल्लभभाई पटेलांचे ज्येष्ठ बंधू आणि केंद्रीय विधिमंडळाचे अध्यक्ष श्री. विठ्ठलभाई पटेल हेदेखील संघाकडे आकृष्ट झाले होते. १९२८ साली दसऱ्याच्या दिवशी त्यांनी मोहिते वाड्यात भरणाऱ्या त्यावेळच्या एकमेव शाखेला भेट दिली होती. स्वयं-सेवकांना उद्देशून ते म्हणाले होते, "मी या देशात किंवा परदेशांत जेथे जेथे गेलो तेथे तेथे मी अशा अनेक संस्था पाहिल्या की, त्या ठिकाणी फक्त निर्जीव उपकरणेच होती. पण या ठिकाणी मात्र स्वत्व गवसलेली जिवंत हातांची समर्थ माणसे पाहून मी आनंदाने भारावून गेलो आहे. आपल्या देवस्वरूप मातृभूमीचे भवितव्य घडवण्यास आपण समर्थ व्हाल, अशी मला खात्री वाटते. हे दुर्मिळ दृश्य मी फक्त इथे आणि इथेच पाहिले आहे. असे दृश्य अन्यत्र कुठेही मला आढळलेले नाही."

त्या आरंभीच्या वर्षांत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेला भेट देणारे दुसरे थोर नेते म्हणजे डॉक्टर आंबेडकर. पुण्यातल्या एका प्रशिक्षण शिबिराला ते उपस्थित राहिले आणि तेथे जातिभेदाचा अभाव पाहून चांगलेच प्रभावित झाले होते.

विठ्ठलभाईसारख्या अनेक नामवंत लोकांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल जरी आशा वाटू लागली होती, तरी संघटनेला अजून कार्या-लयही नव्हते आणि पदाधिकारीदेखील नव्हते. डॉक्टरांनी सत्याग्रह केल्यामुळे त्यांना तुरुंगात जावे लागले तोपर्यंत म्हणजे १९३० साला-पर्यंत डॉक्टर हेडगेवारांचे मातीचे घर हेच संघटनेचे कार्यालय होते. आणि १९२९ साल उजाडल्यानंतरच वर्ध्याचे काँग्रेस नेते श्री. अप्पाजी जोशी यांनी सर्वप्रथम 'सरसंघचालक प्रणाम...एक...दो !' असा आदेश, डॉक्टरांना शाखास्थानाकडे येताना पाहून दिला होता. स्वयंसेवकांनी योग्य रीतीने तो आदेश पाळला. शाखा विसर्जित झाल्यावर डॉक्टरांनी स्वयंसेवकांना विचारले होते, "असे तुम्ही का केलेत ?" त्या चर्चेत असे निष्पन्न झाले की ठरवून दिलेले काम पार पाडण्यासाठी निश्चित अशा पदाधिकाऱ्यांची नेमणूक केली गेली पाहिजे. त्यानंतर लौकरच

बालाजी हुद्दार यांची सरकार्यवाह म्हणून आणि मार्तंडराव जोग यांची सरसेनापती म्हणून नियुक्ती केली गेली. पुढे हुद्दार वृत्तविद्येच्या अभ्यासक्रमासाठी इंग्लंडला गेले आणि तेथून ते स्पॅनिश यादवी युद्धात रिपब्लिकन बाजूने लढण्यासाठी गेले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हे स्वरूप (आणि 'सरसेनापती 'च्या पदाची तरतूद) काहीसे लष्करी धर्तीचे असले तरी ती संघटना कधीच कोणत्याही प्रकारच्या लष्करी स्वरूपाची चळवळ नव्हती. तरुणांना आकर्षित करण्यासाठी आणि त्यांच्यात शिस्तप्रियता वाढीस लावण्यासाठी हे बाह्योपचार योजण्यात आले होते. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर जेव्हा सरकारने लष्करी धर्तीचे गणवेष घालण्यावर बंदी घातली, तेव्हा संघाने तावडतोब बूट-पट्ट्याचा त्याग केला. पण तरीही पूर्वीपेक्षा अधिक वेगाने संघटना वाढतच राहिली.

संकटात सापडलेल्या किंवा भूमिगत झालेल्या क्रांतिकारकांना मदत करण्याचे कामही डॉक्टर हेडगेवारांनी चालू ठेवलेच होते. भगतसिंगाचे उजवे हात असणाऱ्या राजगुरूंना त्यांनी संघनेते श्री. भय्याजी दाणी यांच्या उमरेर येथील शेतावर आश्रयही दिला होता. तिथून पुण्याला जायला निघाले म्हणूनच राजगुरू पकडले गेले. सातारला थोर क्रांतिकारक श्री. दामोदर बळवंत भिडे गुरुजी यांची भेट झाली तेव्हा डॉक्टर हेडगेवारांनी त्यांना साष्टांग नमस्कार केला होता. पण क्रांतिकार्याशी असणाऱ्या आपल्या संबंधांचे रा. स्व. संघाशी नाते जोडण्याचा त्यांचा मुळीच विचार नव्हता. क्रांतिकारकांची शस्त्रास्त्रे कुठे लपवलेली आहेत, हे त्यांना ठाऊक होते. नागपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी श्री. अप्पाजी जोशी यांच्याजवळ तक्रार करताना असेही म्हटले होते की, "तुमच्याजवळ सगळ्या प्रकारची शस्त्रास्त्रे आहेत." तथापि ती शस्त्रास्त्रे आणि स्वयंसेवक यांचा मेळ घालण्याचा डॉक्टरांचा मुळीच विचार नव्हता. उलटपक्षी हिंगणघाट येथे घातलेल्या एका दरोड्यात क्रांतिकारक नेते श्री. पांडे यांचे पिस्तूल त्यांच्या नकळत वापरण्यात आल्याचे कळल्यावर डॉक्टर अस्वस्थ झाले होते. डॉक्टर तुरुंगात असताना १९३१ साली श्री. हुद्दार यांनी बालाघाट येथे राजकीय

स्वरूपाचा दरोडा घातला होता, त्यामुळे तर डॉक्टर आणखीनच अस्वस्थ झाले होते. तुरुंगातून बाहेर येताच डॉक्टरांनी क्रांतिकारकांच्या सर्व शस्त्रास्त्रांचा नाश करण्याचा आदेश दिला होता. हुद्दार यांना लौकरच संघटना सोडून बाहेर पडावे लागले होते.

दि. २४ मे १९३५ रोजी नागपूरमधल्या मध्यप्रांत व वऱ्हाड सरकारच्या सचिवालयाला गूढ प्रकारे आग लागली होती आणि त्यात सी. आय. डी. चे सर्व जुने रेकॉर्ड जळून पार खाक झाले होते. हे कळल्यावर हेडगेवारांना आनंद झाला होता. ते म्हणाले होते, "आता माझी पाटी स्वच्छ झाली आहे."

दि. २६ जानेवारी १९२९ रोजी 'संपूर्ण स्वातंत्र्य हे आपले ध्येय असल्याचे' काँग्रेसने जाहीर केले. डॉक्टरांना ती वार्ता ऐकून खूप आनंद झाला. तो दिवस संचलने आखून, शपथ घेऊन, भाषणे देऊन आणि राष्ट्रभक्तिपर गीते गाऊन साजरा करण्याचा त्यांनी सर्व शाखांना आदेश दिला होता. 'आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर ब्रिटिश सरकार बंदी घालील', अशी भीती काहीजण व्यक्त करीत होते. सरकार त्या बाबतीत खरोखरच गंभीरपणे विचार करीत असावे, परंतु तसे काही घडणार नाही याची डॉक्टरांना खात्री वाटत होती. "त्यांनी जर संघावर बंदी घातली तर याच १६ शाखांच्या २०० शाखा झाल्याशिवाय राहाणार नाहीत !" असे ते म्हणत.

१९३० साली जेव्हा मिठाच्या सत्याग्रहासाठी आवाहन करण्यात आले, तेव्हा डॉक्टरांनी त्यात भाग घ्यायचे ठरवले. असा सत्याग्रह स्वातंत्र्य मिळवून देऊ शकणार नाही, ते त्या दिशेने टाकलेले फक्त एक पाऊल ठरेल असे त्यांना वटत होते म्हणूनच राष्ट्राय स्वयंसेवक संघाने संघटना म्हणून या सत्याग्रहात भाग घेऊ नये असे त्यांनी ठरवले. दुप्पट उत्साहाने संघकार्य चालूच राहिले पाहिजे, स्वयंसेवक व्यक्तिगत रीतीने सत्याग्रहात भाग घेऊन तुरुंगात जाऊ शकतील, असे त्यांनी सांगितले. त्यानुसार शेकडो स्वयंसेवकांनी सत्याग्रहात भाग घेतलादेखील ! त्या सर्वांत डॉक्टर आघाडीवर होते, हे सांगायला नकोच.

मध्य प्रांताला सागरकिनारा नसल्यामुळे मिठाविषयीचा कायदा

मोडून सत्याग्रह करण्यासारखी ठिकाणे उपलब्ध नव्हती म्हणून डॉक्टरांनी वनवासी लोकांविरुद्धचा जंगल कायदा मोडून जंगल सत्याग्रह करण्याचे ठरवले. लोहारा जंगलात जाण्यासाठी ते यवतमाळला गेले. सत्याग्रहाच्या आदल्या दिवशी यवतमाळला त्यांनी एक गाय कत्तलखान्याकडे ओढून नेली जात असल्याचे पाहिले. त्यांना ते दृश्य सहन झाले नाही आणि त्यांनी तेथल्या तेथेच कसायाला अडवले. बरीच माणसे तेथे जमली. त्यांच्यापैकी काहीजणांनी डॉक्टरांना सांगितले, "तुम्ही या ठिकाणी सत्याग्रह करण्यासाठी आला आहात, असल्या फालतू गोष्टींत लक्ष घालण्यासाठी नाही." डॉक्टर ताडकन उत्तरले, "ती गाय तुम्हाला फालतू वाटत असेल, मला वाटत नाही." बरीच वादावादी झाल्यानंतर त्या कसायाला गायीची किंमत चुकती करण्यात आली आणि त्या गायीचे प्राण वाचवण्यात आले.

दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. २१ जुलै १९३० रोजी डॉ. हेडगेवार, अप्पाजी जोशी, दादाराव परमार्थ आणि इतर काहीजणांनी सत्याग्रह केला. गवत कापण्यावरची कायदेशीर बंदी मोडून केलेल्या त्या सत्याग्रहात नंतर सुमारे दहा हजार लोक सहभागी झाले. (डॉक्टरांनी त्या दिवशी कापलेले गवत दुसऱ्या दिवशी नागपूरमध्ये भगव्या ध्वजाला अर्पण करण्यात आले.) डॉक्टरांना त्या सत्याग्रहाबद्दल नऊ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. पण त्यांचे नाव इतके प्रसिद्ध झाले होते की स्थानिक पोलीस सबइन्स्पेक्टरने त्यांच्यासाठी चांगल्या जेवणाची व्यवस्था केली तर स्थानिक सिव्हिल सर्जनने त्यांच्यासाठी मिठाई मागवली. 'सुरुवात तर चांगली झाली !' डॉक्टर म्हणाले.

यवतमाळहून अकोल्याला सत्याग्रह्यांना नेले जात होते तेव्हा अधूनमधून डॉक्टर खाली उतरत आणि आजूबाजूला असणाऱ्या खेडुतांना उद्देशून भाषण देत. बरोबर असणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याला हा प्रकार काही आवडला नाही. सर्व सत्याग्रह्यांना हातकड्या घालण्याचा त्याने हुकूम सोडला. डॉक्टरांनी लगेच त्याला सुनावले की, "जर सत्याग्रह्यांना हातकड्या घालण्याचा पोलिसांनी प्रयत्न केला तर आम्ही सारे मिळून पोलिसांनाच बाहेर फेकून देऊ. आपणहून अटक करवून

घेतलेले आम्ही सत्याग्रही आहोत. आम्ही काही पळून जाणार नाही." डॉक्टरांचे हे आश्वासक बोलणे ऐकून तो पोलीस अधिकारी शांत झाला आणि सगळ्यांना मिठाई वाटण्यात आली. गंभीर प्रसंगाचे हास्य-विनोदात केव्हा रूपांतर झाले, कुणालाही कळले नाही.

तुरुंगात हेडगेवारांनी सर्व सत्याग्रह्यांची मने जिंकली. ते प्रत्येकाला मदत करीत, पण स्वतःसाठी कधीही कोणतीही सवलत मागत नसत. त्यामुळेच ते सगळ्यांचे लाडके झाले. तुरुंगातल्या व वर्गातल्या त्यांच्या एकूण ३५ सहकारी सत्याग्रह्यांपैकी पुढील काळात संघाचे महत्त्वाचे कार्यकर्ते झाले. तुरुंगात सत्याग्रही आणि तुरुंगाधिकारी या दोघांकडूनही डॉक्टरांना आदरपूर्वक वागवले जात होते. एकदा सत्याग्रह्यांनी त्यांना अशी विनंती केली की कैद्यांना पुरवल्या जाणाऱ्या तुपात भेसळ असल्याबद्दल डॉक्टरांनी सुपरिंटेंडेंटजवळ तक्रार करावी. परंतु तक्रार करणे किंवा विनवणे याचा डॉक्टरांना भारी तिटकारा होता. शेवटी सत्याग्रह्यांनी डॉक्टरांच्या संमतीने असा तोडगा शोधून काढला की सुपरिंटेंडेंटकडे त्या सत्याग्रह्यांनी तक्रार करायची आणि फक्त डॉक्टरां-कडून खात्री करून घ्या असे म्हणायचे, त्यांना विचारले गेले की त्यांनी फक्त होकारार्थी मान हलवायची आणि त्यांची तक्रार खरी असल्याचे सूचित करायचे. प्रत्यक्षात घडलेदेखील तसेच. सुपरिंटेंडेंट फोर्डने हेडगेवारांचे मत निर्णायक मानले. त्यानंतर मात्र तुपाच्या दर्जाबद्दल तक्रार करण्याचा प्रसंग सत्याग्रह्यांवर कधी आला नाही.

दररोज संध्याकाळी सगळे सत्याग्रही बाहेर मोकळ्या हवेत उघड्यावर बसत. डॉक्टर त्यांना त्यावेळी ग्रहताऱ्यांचे गूढ समजावून सांगत. खगोलशास्त्राचे ते चांगले अभ्यासक होते. मात्र ज्योतिष्यांसाठी किंवा भविष्यवेत्त्यांसाठी त्यांच्याकडे मुळीच वेळ नव्हता. सत्याग्रह्यांमध्ये जगन्नाथ शास्त्री नावाचे एक सत्याग्रही होते. हात पाहून भविष्य सांगण्याचा त्यांना छंद होता. एक दिवस डॉक्टरांनी व त्यांचे मित्र बेदरकर यांनी त्यांचे पितळ उघडे पाडण्याचा बेत रचला. पूर्वी ठरल्या-प्रमाणे बेदरकरांनी शास्त्रींना ऐकू जाईल अशा बेताने हेडगेवारांना विचारायला सुरुवात केली, "तुमची बायको आता कशी आहे?

आणि पहिल्या बायकोपासून झालेली मुले कशी आहेत ?" नंतर डॉक्टरांनी शास्त्रींपुढे जेव्हा आपला हात धरला तेव्हा त्यांना समाधान वाटले. डॉक्टरांचा हात पाहून शास्त्री काय सांगतात हे ऐकायला प्रत्येकजण उत्सुक होता. शास्त्रींनी डॉक्टरांचा हात मोठा काळजीपूर्वक पाहिला आणि ते शांतपणे म्हणाले, "तुम्ही दोनदा लग्न केले असून तुम्हाला चार मुले आहेत." हे ऐकून जेव्हा सगळेजण मोठ्याने हसू लागले तेव्हा कुठे शास्त्रींना काय झाले ते समजले. त्यानंतर मात्र त्यांनी कुणाचा हात पाहून भविष्य सांगितले नाही.

फेब्रुवारी १९३१ मध्ये जेव्हा हेडगेवारांची सुटका झाली तेव्हा त्यांचे नागपूरमध्ये प्रचंड स्वागत करण्यात आले. त्यानंतर ते तडक हाथीखाना शाखेवर गेले, तेथून मग आजारी स्वयंसेवकांकडे जाऊन शेवटी ते आपल्या घरी परतले.

कित्येक वर्षे विविध प्रकारचे झेंडे वापरले जात असत, हे लक्षात घेऊन राष्ट्रीय ध्वजाचे स्वरूप निश्चित करण्यासाठी कराचीच्या काँग्रेस अधिवेशनात एक ध्वजसमिती नियुक्त करण्यात आली होती. सरदार पटेलांच्या अध्यक्षतेखालील या समितीत मौलाना आझाद, पंडित नेहरू, मास्टर तारासिंग, काका कालेलकर, डॉ. हर्डीकर आणि पट्टाभी सीतारामय्या (निमंत्रक) यांचा समावेश होता. या समितीचा एकमुखी अहवाल असा होता की, "राष्ट्रीय ध्वज केशरी किंवा भगव्या रंगाचा असला पाहिजे. त्या ध्वजाच्या डाव्या बाजूला वरच्या कोपऱ्यात निळ्या रंगातला चरखा असावा." ध्वजाचा तो रंग का असावा हे सांगताना समितीने म्हटले होते की, 'तो जातीय स्वरूपाचा नाही आणि या प्राचीन देशाच्या परंपरेशी निगडित झालेला आहे.' (पहा– File No. 11 / 27– 1927, Important Pamphlets and Schemes, 79–F, Nehru Memorial Museum and Libray, Teen Murti House, New Delhi.)

काँग्रेसने हा अहवाल स्वीकारावा असा आग्रह धरण्याची डॉक्टर हेडगेवारांनी दिल्लीतल्या आणि मुंबईतल्या अनेक काँग्रेस नेत्यांना विनंती केली. पण जातीय दडपणामुळे काँग्रेस नेत्यांनी जुना ध्वजच चालू ठेवला. फक्त लाल रंगाच्या पट्टीऐवजी भगव्या रंगाची पट्टी वापरायला आणि

ती पट्टी तळाशी वापरण्याऐवजी सगळ्यात वर वापरायला त्यांनी सुरुवात केली. भारतीय राष्ट्रवादाचे मूलस्रोत काँग्रेसला समजू शकले नाहीत, याबद्दल डॉक्टरांना खेद झाला. या संदर्भात हे लक्षात घेण्याजोगे आहे की मुसलमानांमधील अडाणी किंवा विकृत माहिती घेतलेले लोकच भगव्या किंवा केशरी रंगाला हरकत घेतात आणि हिरवा ध्वज इस्लामी असल्याचे मानतात. कारण महंमद पैगंबरांनी आपल्या लढ्यांत अनेक रंगांचे ध्वज वापरले होते, त्यात भगव्या रंगाचा ध्वज होता, पण हिरवा ध्वज मात्र कधीच नव्हता.

हा काळ असा होता की, काँग्रेस, हिंदुमहासभा, क्रांतिकारक या सर्वांनाच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची मदत हवीहवीशी वाटत होती. परंतु डॉक्टर हेडगेवार आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी आपला स्वतंत्र मार्ग कायम राखायचे ठरवले होते. या देशातील तरुणांना प्रेरणा देण्याच्या आणि त्यांच्या दृष्टिकोनात सुधारणा घडवून आणण्याच्या कार्यात संघाला स्वतंत्रपणे फार महत्त्वाची भूमिका वजावायची आहे आणि त्या मार्गापासून ढळून इकडेतिकडे जाणे, भटकंती करणे त्याला शक्य नाही असे त्या सर्वांचे म्हणणे होते.

१९३२ सालच्या दसऱ्याच्या उत्सवाला गणवेषातले १२०० स्वयंसेवक उपस्थित होते. आजूबाजूच्या जिल्ह्यांतही संघकार्य समाधानकारकपणे वाटत होते. ब्रिटिशांच्या डोळ्यांत ही गोष्ट चांगलीच सलत होती. म्हणूनच दि. १५ डिसेंबर १९३२ रोजी मध्य प्रांताच्या गव्हर्नर-इन-कौन्सिलने एक आदेश काढून सरकारी नोकरांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखांवर उपस्थित राहायला मनाई असल्याचे जाहीर केले. काही दिवसांनंतर हा आदेश नगरपालिकांच्या आणि जिल्हा स्थानिक मंडळांच्या कर्मचाऱ्यांनाही लागू करण्यात आला. अनेक नगरपालिकांनी आणि जिल्हा मंडळांनी या आदेशाबद्दलची नापसंती व्यक्त केली. आणि दि. ७ मार्च १९३४ रोजी विधिमंडळात मागणी क्र. ८ वरच्या चर्चेच्या वेळी आमदार श्री. कोलते यांनी १ रुपयाची कपात सुचवणारा ठराव मांडून हा प्रश्न उपस्थित केला. गृहमंत्री ई-राघवेन्द्र राव आणि त्यांचे तिघे ब्रिटिश सहकारी श्री. एन. जे. राउटन, श्री. ई-ए. मॅक्नी आणि

श्री. ई-गॉर्डन हे सोडून प्रत्येक वक्त्याने त्या कपात ठरावाला पाठिंबाच दिला. सरकारी बाजूकडून संघावर जातीयवादाचा, फॅसिस्ट असल्याचा, राजकीय संघटना असल्याचा आणि इतरही अनेक खोटेनाटे आरोप करण्यात आले. पण वऱ्हाड नगरपालिका मुस्लीम संघाचे प्रतिनिधी श्री. एस. एम. रहमान यांनी दाखवून दिले की, 'संघ अस्तित्वात आल्यापासूनच्या सात वर्षांत एकाही मुस्लीम संघटनेने कोणतीही हरकत घेतलेली नाही.'

श्री. सी. बी. पारखे म्हणाले, "मी हिंदू नाही आणि त्यामुळे एखाद्या हिंदू माणसाला वाटेल त्याच पद्धतीने माझे विचार मी व्यक्त करू शकणार नाही. तरी मला असे वाटते की हल्ला झालाच तर स्वसंरक्षण कसे करावे याचे प्रशिक्षण देण्याच्या बाबतीत हिंदू समाजाने आजपर्यंत एवढे दुर्लक्ष केले आहे की अनेकदा मुसलमान हे गृहीतच धरतात की त्यांनी हल्ला केला रे केला की हिंदू पळूनच जातील!"

नागपूर विद्यापीठाचे डॉ. डी. टी. मंगलमूर्ती यांनी गृहमंत्री श्री. ई-राघवेन्द्र राव यांना अशी आठवण करून दिली की १९२९ साली त्यांनीच विलासपूरमधल्या एका आखाड्याची– संघाच्या तेथल्या केन्द्राची– कोनशिला बसवली होती. पण सगळ्यात उत्तम भाषण झाले रमाबाई तांबे यांचे. त्या म्हणाल्या, "राष्ट्रीय संघ ही एक चांगली चळवळ आहे. मध्य प्रांतात ती सुरू झाली आहे आणि लौकरच ती भारतभर पसरेल आणि सर्व जातीजमातींना एकत्र आणील, असे मला वाटते. जर तुम्ही कोणत्याही शाळेत जाऊन मुलांकडे पाहिलंत, तर तुम्हाला फरक चटकन समजेल. ख्रिश्चन मुलगा मुसलमान मुलापेक्षा चांगला असेल आणि मुसलमान मुलगा हिंदू मुलापेक्षा चांगला असेल. मला अभिप्रेत आहे ती त्यांच्या शरीरप्रकृतीची ठेवण, त्यांची तब्येत, त्यांची उभी राहाण्याची धाटणी. सध्या आपल्या मुलांपेक्षा इतर मुलांची स्थिती या बाबतीत बरीच चांगली आहे आणि अशा स्थितीत हा राष्ट्रीय संघ आपली मदतच करतो आहे. मुलांनी संघात जाऊन शिक्षण घेतलेले आणि स्वावलंबी झालेले पाहायला मला आवडेल. संघ स्वयंसेवकांना अराजकवादी बनवीत असेल, यावर माझा विश्वास नाही. कुणीतरी

हेतुतः पसरवलेला तो गैरसमज आहे." दोन दिवसांच्या चर्चेनंतर तो कपात–ठराव मताला टाकण्यात आला आणि मंजूरही झाला. सरकारचा पराभव झाला. सरकारचा तो आदेश आपोआपच हद्द ठरला.

संघाचे अस्तित्व अशा रीतीने समाजमान्य ठरले होते !

त्याच वर्षी महात्मा गांधी आणि डॉक्टर हेडगेवार यांची ऐतिहासिक भेट घडून आली. दिनांक २३ ते २५ डिसेंबर १९३४ या दिवशी रा. स्व. संघाचे वर्धा जिल्ह्याचे हिवाळी शिबिर जमनालाल बजाज यांच्या शेतावर भरले होते. जवळच असणाऱ्या सत्याग्रह आश्रमात गांधीजी राहात होते. आपल्या खोलीत बसल्या बसल्या त्यांनी संघाच्या शिबिराचे जे काही ओझरते दर्शन घेतले होते त्यामुळे ते इतके प्रभावित झाले की शिबिराला भेट देण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. त्यानुसार कमलनयन बजाज यांनी अप्पाजी जोशींना– अप्पाजी बरीच वर्षे प्रदेश काँग्रेस समितीचे चिटणीस होते आणि अलीकडच्या काळात संघाचे प्रमुख नेते बनले होते– अशी विनंती केली की त्यांनी गांधीजींना जाऊन भेटावे आणि शिबिराला भेट देण्याचे आमंत्रणही द्यावे. अप्पाजींनी ती विनंती मान्य केली आणि गांधीजींना आमंत्रणही दिले.

दि. २४ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजता मीराबेन, महादेव देसाई आणि इतर काही जणांसह गांधीजींनी शिबिराला भेट दिली. योगासनांची काही प्रात्यक्षिके पाहून झाल्यानंतर गांधीजींनी अप्पाजींच्या खांद्यावर हात ठेवला आणि ते म्हणाले, "मला फार समाधान वाटते आहे. आपल्या देशात असे दृश्य मी कुठेच पाहिलेले नाही."

जेव्हा भगवा ध्वज फडकवण्यात आला तेव्हा गांधीजीदेखील इतर सर्व उपस्थितांप्रमाणेच ताठ, स्तब्ध उभे राहिले आणि त्यांनी ध्वजाला प्रणामदेखील केला. नंतर त्यांनी शिबिरात फेरफटका मारण्याची इच्छा प्रदर्शित केली. एका ठिकाणी त्यांनी काही स्वयंसेवकांना 'तुमची जात काय ?' असे विचारले, तेव्हा त्यांना असे आढळले की एकजण महार, तर दुसरा तेली, तिसरा मराठा, तर चौथा ब्राह्मण असे सर्व जातींचे स्वयंसेवक शिबिरात दाखल झालेले आहेत. वेगवेगळ्या जातींचे लोक एकत्र जेवताना, राहताना, खेळताना पाहून संघाला हे सारे कसे जमले,

याचे गांधीजींना आश्चर्य वाटले.

संघाच्या स्टोअरमध्ये राम, कृष्ण, शिवाजी, प्रताप आणि गुरू गोविंदसिंह वगैरेंची चित्रे पाहून गांधीजींनी विचारले, "राम आणि कृष्णाची चित्रे तुम्ही इथे लावली आहेत. शंकराला किंवा गणपतीला तुम्ही देव मानत नाही का ?" "आम्ही इथे शूरवीरांची चित्रे लावली आहेत, नुसत्या देवांची नव्हेत !" असे त्यांना सांगण्यात आले.

जेव्हा गांधीजी निघाले तेव्हा अप्पाजींनी त्यांना विचारले, "आपल्याला काही उणिवा आढळल्या का ?" त्यावर गांधीजी म्हणाले, "नाही, नाही. सगळ्याच दृष्टींनी तुम्ही उत्कृष्ट काम करीत आहात. जर अगदी एखादी उणीव दाखवायचीच म्हटले तर तुमच्या संघटनेत तुम्ही अन्यधर्मीयांना प्रवेश देत नाही, ही गोष्ट सांगता येईल."

अप्पाजींनी मग सांगितले की, हिंदू समाजातील दौर्बल्य आणि विघटन हे दोष देशाच्या दृष्टीने लौकर दूर केले गेले पाहिजेत असे वाटल्यामुळेच आम्ही हिंदूंच्या संघटनेवर लक्ष केंद्रित केले आहे. इतर धर्मांबद्दल आमच्या मनात मुळीच द्वेषभावना नाही."

"अन्यधर्मीयांचा द्वेष न करता हिंदूंची संघटना उभारणे राष्ट्रीय हिताला बाधक नाही, हे खरे असले तरी या दृष्टिकोनाच्या पार्श्वभूमीबाबत मला तुमच्या नेत्यांबरोबर चर्चा करायला आवडेल." गांधीजी म्हणाले. दि. २५ डिसेंबर रोजी संध्याकाळी ८-३० वाजता डॉक्टर हेडगेवार, अप्पाजी जोशी आणि पुण्याचे ल. ब. भोपटकर गांधीजींना भेटले. आरंभीचे शिष्टाचाराचे औपचारिक बोलणे झाल्यावर गांधीजी म्हणाले, "आतापर्यंत मी असे समजत होतो की संपूर्ण भारतात मी एकटाच संघटक आहे. पण नाही, या देशात दुसराही एक संघटक आहे आणि तो म्हणजे डॉक्टर हेडगेवार." ते पुढे म्हणाले, "तुमचा वाद्यवृंदही खूप चांगला आहे. मला संगीत ऐकायला आवडते. रात्री नऊ वाजल्यावर तुमचा वाद्यवृंद धून वाजवू लागतो आणि नऊ ही तर माझी विश्रांतीची वेळ. तरीदेखील मी मुद्दाम गच्चीवर जाऊन ते स्वर ऐकत राहातो."

'रा. स्व. संघाचे स्वयंसेवक आपल्या भोजनासाठी आणि गण-

वेषासाठी आणि प्रवासासाठी लागणारे पैसे स्वतःच भरतात आणि तरीही पूर्णपणे शिस्तीचे पालन करतात. उलटपक्षी इतर स्वयंसेवी संघटनांमध्ये स्वयंसेवकांना या साऱ्या सेवा किंवा वस्तू मोफत पुरवल्या जात असून देखील त्यांच्याकडून म्हणावी तशी शिस्त पाळली जात नाही, हे कसे काय शक्य होते,' याबद्दलचे आश्चर्य गांधीजींनी व्यक्त केले. त्याबाबत स्पष्टीकरण देताना डॉक्टर म्हणाले, "संघाच्या स्वयंसेवकांना आम्ही भाषणांमधून राष्ट्रीय एकात्मतेचे, चारित्र्याचे, धर्मप्रेमाचे, समाज-संस्कृती आणि राष्ट्र यांच्याबद्दलच्या भक्तीचे महत्त्व समजावून सांगतो. त्यांना आम्ही 'रामायण– महाभारता'तील विविध प्रसंग आणि इतर ऐतिहासिक वीरांच्या गोष्टी सांगतो आणि त्यामुळे स्वयंसेवकांमध्ये उदात्त भावना आणि उच्च ध्येयवाद वाढीस लागतो." इतर संघटना स्वयंसेवकांकडे 'फुकट राबवायला मिळालेले कामगार' म्हणून पाहात असल्या तरी रा. स्व. संघ मात्र आपल्या स्वयंसेवकांना 'मातृभूमीसाठी वाटेल तो त्याग करायला सिद्ध असलेले पहिल्या दर्जाचे देशभक्त' मानतो, असेही डॉक्टरांनी सांगितले.

"तुमचे हे कार्य देशाला हितावह असेच आहे." गांधीजींनी आपला अभिप्राय व्यक्त केला. नंतर त्यांनी संघाच्या घटनेची एक प्रत मागितली. 'लिखित घटनेची आजवर गरजच भासलेली नसल्यामुळे तशी घटना तयार करण्यात आलेली नाही.' असे जेव्हा त्यांना सांगण्यात आले तेव्हा ते म्हणाले, "माझ्यादेखील पूर्वी अशाच कल्पना होत्या पण त्या प्रत्यक्षात उतरवणे अशक्य आहे असे मला वाटू लागले. आता तर मला खूपच लिखापढी करावी लागते. एक ना एक दिवस तुम्हालादेखील ती करणे भाग पडेल. पण ज्या उदात्त भावनांनिशी तुम्ही ही संघटना चालवीत आहात आणि तुम्ही या संघटनेला जी शिस्त लावली आहे ती पाहून मला खरोखरच आनंद झाला आहे. तुम्हाला उत्तम यश लाभावे, अशी हार्दिक सदिच्छा मी व्यक्त करतो."

"आपल्यासारख्या संतसज्जनांच्या अशा आशीर्वादांतच आमचे सामर्थ्य सामावलेले आहे, असे आम्ही मानतो." डॉक्टर म्हणाले.

आणि खरोखरच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अशा सदिच्छांच्या

बळावरच, हितचिंतकांच्या सहकार्यानेच आत्तापर्यंतची वाटचाल करीत आला होता. त्या संघटनेचा जमाखर्च असून नसल्यातच जमा होता. डॉक्टर हेडगेवार आपल्या पुरोहित भावाबरोबर गरिबीतच राहात होते. एकदा त्यांच्या काही मित्रांनी असा निर्णय घेतला की, डॉक्टरांच्या वहिनींना दरमहा ५० रुपये देत जायचे. पण काही महिन्यांच्या कालावधीतच डॉक्टरांना हा प्रकार समजला आणि त्यांनी तो ताबडतोब बंद केला. राजा लक्ष्मणराव भोसले यांनी तर डॉक्टरांना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी थोडीफार जमीन देण्याचा कितीतरी वेळा प्रयत्न केला, पण डॉक्टरांनी ती जमीन घ्यायचे कायम नाकारले. अशातच डॉक्टरांच्या काही मित्रांनी 'आयडियल डेमॉक्रेटिक इन्शुरन्स कंपनी' काढली होती. त्यांनी प्रमुख वैद्यकीय अधिकारी म्हणून डॉक्टर हेडगेवारांचीच नियुक्ती केली आणि त्या कामाबद्दल वर्षाला ५०० रुपये द्यायचे ठरवले.

पंडित मदनमोहन मालवीय संघकार्य पाहून बरेच प्रभावित झाले होते, त्यांनी जेव्हा नागपूरमधल्या रा. स्व. संघाच्या प्रमुख कार्यालयाची, पडझड झालेल्या मोहिते वाड्याची– स्थिती पाहिली तेव्हा त्यांनी हे ओळखले की या संघटनेजवळ पैशाचे पुरेसे बळ नाही. त्यावेळी मालवीयजी MMM म्हणजेच 'Money Making Machine' म्हणून ओळखले जात होते. त्यांनी संघासाठी निधी जमवण्याची तयारी दर्शवली, परंतु डॉक्टर हेडगेवारांनी त्यांची ती मदत स्वीकारली नाही. "मला माणसे हवी आहेत, पैसा नको आहे." असे त्यांनी सांगितले.

खिसे असे मोकळे असले तरी येणाऱ्याजाणाऱ्या सर्व पाहुण्यांना डॉक्टर आवर्जून चहा देत असत. एकदा मात्र चहा करण्यापुरतेदेखील सरपण घरात नव्हते. हे लक्षात आल्यानंतर त्यांनी फारसा मागचा-पुढचा विचार न करता घरातल्या दोन जुन्या फळ्या तोडल्या आणि त्या पेटवून चहा तयार केला.

आणि डॉक्टरांप्रमाणेच संघाचे स्वयंसेवकदेखील गरीबच होते. संघ अनेक कवायती आयोजित करीत असे. परंतु चेतना जागवणारे वाद्यवृंदाचे संगीत असल्याशिवाय त्या कवायतींना किंवा त्या संचलनाला

खरी गंमत कशी येणार ? पण त्या काळात वाद्यवृंदाचा विचार करणे तरी कुणाला जमण्यासारखे होते ? बाबासाहेब आपटे, दादाराव परमार्थ, कृष्णराव मोहरीर आणि सध्याचे सरसंघचालक बाळासाहेब देवरस हे सर्व स्वयंसेवक गोपाष्टमीच्या दिवशी चार मैलांवर असणाऱ्या श्रीमती बूटींच्या घरी चालत जात असत, चालत येत असत– का तर एखादे बिगुल खरेदी करता येईल इतकी दक्षिणा एकत्र करण्यासाठी ! जेव्हा ते बिगुल खरेदी करून त्यांनी वाजवले, तेव्हा त्यांचा आनंद गगनात मावेना. संघाच्या प्रगतीचा मार्ग हा असा पुढे– पुढे जात होता.

संघाची कीर्ती या सुमारास पंजाबचे पंतप्रधान सर सिकंदर हयातखान यांच्या कानांवर जाऊन पोचली. १९३८ साली रावळपिंडीत रायबहाद्दूर सोहनसिंग यांच्यासह त्यांचा मुक्काम होता तेव्हा काही स्वयंसेवकांना त्यांनी मुद्दाम बोलावून घेतले होते. सर सिकंदर त्या स्वयंसेवकांना म्हणाले होते, “एक दिवस रा. स्व. संघ ही भारतातील एक मोठी शक्ती म्हणून ओळखली जाऊ लागेल, यात शंका नाही. तुम्हा तरुणांना माझे असंख्य आशीर्वाद !”

या सर्व गोष्टींत संस्थापकांच्या स्वभावाचा वाटा बराच मोलाचा होता. डॉक्टरांना उत्तम विवेकबुद्धी लाभली होती तशीच चांगली विनोदबुद्धीही त्यांच्यापाशी होती. राजकारणातील रस्सीखेच त्यांना कधीच आवडली नाही. जेव्हा पहिल्या गोलमेज परिषदेला हजर राहण्याच्या डॉ. मुंजे यांच्या निर्णयावर गांधीवाद्यांनी टीका केली, तेव्हा त्यांनी जाहीरपणे असा सवाल विचारला होता की, ‘आपल्या मर्जी-प्रमाणे वागण्याचे एखाद्याला स्वातंत्र्य नसावे की काय ?’ जेव्हा काहीजण गांधी आणि सावरकर यांच्या गुणदोषांची तौलनिक चर्चा उपस्थित करून वाद घालत होते तेव्हा डॉक्टर म्हणाले, “गुलाबाच्या आणि मोगऱ्याच्या फुलांत संघर्ष उद्‌भवण्याची काहीही गरज नाही.”

१९३६ साली काँग्रेसच्या फैझपूर अधिवेशनात पंडित नेहरू ध्वज फडकवण्यासाठी पुढे झाले खरे, पण ध्वज अडकल्यामुळे फडकेना. सर्वत्र गोंधळ उडाला. काय करावे, कुणाला सुचेना. अखेरीस शिरपूर गावच्या किसनसिंग राजपूतने त्या ८० फूट उंच असणाऱ्या ध्वजाच्या काठीवर

सरसर चढून दोरी नीट पुलीवर बसवली. हजारो उपस्थितांनी त्याचे 'वा ! वा !' म्हणून कौतुक केले. खुल्या अधिवेशनात त्याचा सत्कार केला जावा, अशीही काहीजणांनी सूचना केली. पण तो जेव्हा संघाचा कार्यकर्ता असल्याचे समजले तेव्हा सर्वजण ती घटना सोयीस्कररीत्या विसरूनदेखील गेले. माणसे अशी क्षुद्र वृत्ती का दाखवतात, हे डॉक्टरांना समजू शकत नव्हते. पुढे त्यांनी स्वतः किसनसिंगचे धुळ्याच्या देवपुरा शाखेवर अभिनंदन केले आणि त्याला चांदीचा पेला बक्षीस दिला.

नागपूरमध्ये जातीय तणाव असताना कुणीतरी डॉक्टरांना असे सुचवले की मुसलमानांना आव्हान देण्याच्या हेतूने रा. स्व. संघाने दर शुक्रवारी शहरातल्या प्रमुख मशिदींसमोरून संचलन करावे. डॉक्टरांनी ही सूचना तात्काळ फेटाळून लावली. "शुक्रवारी मशिदींसमोर प्रतिक्रिया व्यक्त करायला आम्ही काही प्रतिक्रियावादी नाही ! संघ ही विधायक राष्ट्रीय संघटना आहे आणि ती नैसर्गिक पद्धतीने, सामान्य रीतीनेच काम करील." असे त्यांनी स्पष्ट केले.

१९३७ सालचे रा. स्व. संघाचे हिवाळी शिबिर नागपूरच्या आंबाझरी भागातील एका शेतजमिनीवर भरले होते. शेजारीच दिलावर-खान नावाच्या गृहस्थांची मोसंब्याची बाग होती. त्यांची खास परवानगी घेऊन स्वयंसेवक आंघोळीसाठी त्या बागेत जा-ये करीत असत. दिलावर-खानांनी परवानगी दिली होती खरी, पण शिबिर संपेल तेव्हा आपल्या बागेत एकही मोसंबे शिल्लक राहणार नाही, अशी त्यांना भीती वाटत होती. तीन दिवसांचे शिबिर संपले तेव्हा मात्र त्यांच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. दोन हजार स्वयंसेवक आपल्या बागेत आंघोळी-साठी जा-ये करीत होते आणि तरी आपल्या बागेतल्या एकाही मोसंब्याला हात लागला नाही, हे पाहून त्यांना आश्चर्य वाटले. त्यांनी डॉक्टरांची भेट घेऊन स्वयंसेवकांच्या शिस्तीबद्दल त्यांचे अभिनंदन केले आणि अनेक करंडचा भरून मोसंबी भेटीदाखल दिली.

असेच एकदा डॉक्टर कोल्हापुरात होते. त्या वेळी कोल्हापूर एक संस्थान होते. संघातर्फे एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. महाराजांचा रोष पत्करावा लागू नये म्हणून त्या समारंभाचे नियोजित

अध्यक्ष आयत्या वेळी आलेच नाहीत. जे. ए. करन (ज्युनियर) यांनी म्हटल्याप्रमाणे अनेक संस्थानिक संघ म्हणजे असंख्य राष्ट्रवादी गटांपैकी एक असे मानत असत. या संस्थानिकांना बरे वाटावे म्हणून रा. स्व. संघ कोल्हापुरात 'राजाराम स्वयंसेवक संघ' तर ग्वाल्हेरात 'राणोजी स्वयंसेवक संघ' म्हणून ओळखला जात होता. ते अध्यक्ष येत नाहीत असे दिसताच डॉक्टरांनी सरळ शिवाजीमहाराजांचे चित्र अध्यक्षीय खुर्चीत ठेवले आणि 'खुद्द शिवाजीमहाराजच अध्यक्ष म्हणून लाभल्यावर आपल्याला आणखी काय हवे ?' असे म्हणून त्यांनी आपले भाषण सुरू केले.

हा थोर संघटक अनेकदा आपल्या घराच्या उंबरठ्यावर बसून जेवत असे. हेतू हा की जाणाऱ्या-येणाऱ्या परिचितांना नमस्कार करता यावा, त्यांच्याशी बातम्यांची आणि मतांची देवाण-घेवाण करता यावी. या त्यांच्या सवयीमुळे अगदी बॅरिस्टरांपासून हातगाडीवाल्यापर्यंत सगळे-जण त्यांना ओळखत, त्यांच्याशी प्रेमाने गप्पा मारीत.

रा. स्व. संघ स्थापन होऊन अवघी दोनच वर्षे झाली होती. डॉक्टर चांद्याला भेट देत होते. एका मध्यमवर्गीय कुटुंबात ते गेले असताना त्यांना पोहे आणि चहा दिला गेला. त्यांनी पोहे खाल्ले पण चहाचा कप तसाच ठेवला. त्या दिवसांत ते चहा घेत नव्हते. त्या कुटुंबाची स्थिती विचित्र झाली. कारण डॉक्टरांना देण्यासाठी घरात वेगळे दूध शिल्लक नव्हते. त्या दिवशी बऱ्याच वेळानंतर डॉक्टरांना आपली चूक लक्षात आली. संध्याकाळी मुद्दाम ते त्या घरी गेले आणि त्यांनी कपभर चहा मागितला. तेव्हापासून त्यांनी चहा घ्यायला आणि द्यायला सुरुवात केली. त्यांना जरी त्याची सवय लागली नाही तरी मैत्रीसंबंध वाढवण्यासाठी चहा उपयुक्त असल्याचे त्यांचे मत बनले.

एखादे प्रेरक, उद्‌बोधक भाषण दिल्यानंतर डॉक्टर स्वयंसेवकांशी 'उशांची लढाई' खेळत. कापसाच्या उशा पुरेशा टणक नसल्यामुळे ते उशांच्या अभ्र्यांत उडीद डाळ भरत. प्रत्येक स्वयंसेवक कार्यकर्त्याचे ते एक खास विनोदी टोपणनाव ठेवत. अशा मुलांशी खेळत राहून काय साध्य होणार आहे, असे जेव्हा त्यांना काही वडीलधाऱ्यांनी विचारले

तेव्हा त्यांनी डॉ. मुंजे यांच्या विनोदी काव्यपंक्ती त्यांना ऐकवल्या–

जहाँ बालों का संघ, वहाँ बाजे मृदंग । जहाँ बूढों का संघ, वहाँ खर्चे से तंग ।। (जिथे मुले आहेत तिथे आनंद आहे आणि जिथे म्हातारी माणसे आहेत तिथे फक्त खर्चाच्या गोष्टी आहेत.) त्यांचा विनोदी स्वभाव फक्त स्वयंसेवकांपुरताच मर्यादित राहात नसे. विशेष करून कामगार नेते श्री. आर. एस. रुईकर यांची चेष्टा करायला त्यांना खूप आवडे. मित्रांचे चहापाणी झाल्यावर ते म्हणत– "आता पार्टी संपली आहे. फक्त लेबरलीडर रुईकर मागे थांबतील– कप-बशा विसळण्यासाठी !"

एकदा ब्रिटिश पार्लमेंटमधील भारतीय सभासद सकलातवाला यांच्या सन्मानार्थ योजलेल्या समारंभाचे ५ रुपयांचे एक तिकिट घेण्याची रुईकरांनी डॉक्टरांना विनंती केली. तिला नकार देताना डॉक्टर म्हणाले, "तुम्ही श्रीमंत कामगार आहात तर मी गरीब भांडवलदार आहे !"

एके दिवशी सकाळी डॉ. हेडगेवार रुईकरांच्या घरी गेले. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर डॉक्टरांनी विचारले, "मी विचारलेल्या प्रश्नाचे तुम्ही प्रामाणिकपणे उत्तर द्याल ?" रुईकरांनी होकारार्थी उत्तर दिल्यानंतर डॉक्टर म्हणाले, "काल रात्री छत्रपती शिवाजी महाराजांचा पुनर्जन्म झाला असून संपूर्ण देश त्यांच्या अमलाखाली आला आहे, असे मी तुम्हाला सांगितले तर तुम्हाला कसे वाटेल ?"

"मला आनंद होईल, यात शंकाच नाही." रुइकर म्हणाले.

"का ? त्यांच्या राजवटीविरुद्ध तुम्ही एखादा मोर्चा नाही का काढणार ?" डॉक्टरांनी पुढचा प्रश्न विचारला.

"काय डॉक्टर, तुम्ही मला काय वेडाबिडा समजता की काय ?" रुइकर म्हणाले, "अहो, मी तर त्या बातमीने इतका आनंदित होईन की पेढे वाटीन !"

"हेच जर तुमचे खरेखुरे प्रामाणिक मत आहे तर मग छत्रपती शिवाजीमहाराजांच्या राजवटीसारखी शासनपद्धती या देशात निर्माण

व्हावी म्हणून काम करणाऱ्या आमच्यासारख्यांवर तुम्ही का बरे अहोरात्र टीका करीत असता ?" डॉक्टरांच्या या प्रश्नाला रुइकरांजवळ उत्तर नव्हते. तेवढ्यात चहा आला आणि ताण नाहीसा होऊन पुढच्या गप्पा सुरू झाल्या.

एक दिवस डॉक्टरांनी एका छायाचित्राखालचे 'कसे मरावे ते मला शिकवा' हे वाक्य वाचले आणि लगेच 'कसे जगावे ते मला शिकवा' अशी शब्दरचना त्यांनी बदलूनही टाकली. शौर्याने मरण्यापेक्षा शौर्याने जगणे अधिक महत्त्वाचे आहे, असे ते मानीत असत. 'रामायण' आणि 'महाभारत' मोठ्या उत्सुकतेने आणि श्रद्धेने वाचणारे लोक त्यांनी शिकवलेले महत्त्वाचे धडे मात्र विचारातच घेत नाहीत, हे पाहून त्यांना आश्चर्य वाटे. 'ज्यांचे आदर्श आपण गिरवले पाहिजेत असे वीरपुरुष या नात्याने आपण रामकृष्णांकडे पाहायला पाहिजे, केवळ भक्तिभावाने पुजायचे देव म्हणून नव्हे !' असे ते सर्व संबंधितांना सांगत.

दुसरे महायुद्ध सुरू झाले तेव्हा भारताच्या प्रत्येक प्रांतात रा. स्व. संघाच्या शाखा स्थापन झाल्या होत्या. आता हे संघकार्य वेगाने वाढले पाहिजे, असे डॉक्टरांना तीव्रतेने जाणवू लागले होते. संघाची पंचविशी किंवा पन्नाशी साजरी करण्यात आपल्याला रस नाही, असे ते म्हणत असत. खेड्यांत एक टक्का आणि शहरांत तीन टक्के लोक संघ स्वयंसेवक झाले म्हणजे राष्ट्रीय जीवनाला नवे वळण देण्याचे बळ रा. स्व. संघात येईल, हे त्यांनी अनेकदा सांगितले होते.

१९३९ च्या अखेरीस रा. स्व. संघाच्या प्रमुख कार्यकर्त्यांचे दहा दिवसांचे एक शिबिर वर्धा जिल्ह्यातल्या सिंदी येथे झाले. परिस्थितीचा सर्वांगीण आढावा त्या शिबिरात घेण्यात आला. नव्या संस्कृत प्रार्थनेला मान्यता देण्यात आली, त्याचप्रमाणे काही इंग्रजी आज्ञा बदलून संस्कृत शब्द स्वीकारण्यात आले. देशभरातल्या विस्ताराच्या कार्यक्रमाचीही आखणी करण्यात आली.

कामाची प्रचंड दगदग, तिसऱ्या वर्गाने चाललेला सततचा रेल्वे प्रवास आणि खाण्यापिण्याची किंवा विश्रांतीची झालेली आबाळ यामुळे

१९३४ पासूनच डॉक्टरांची प्रकृती खालावत चालली होती. आपण आता फार दिवस जगणार नाही, हे त्यांना कळून चुकले होते. त्यांनी त्यावेळचे सरचिटणीस श्री. गोळवलकर यांची आपल्यानंतरचे सरसंघचालक म्हणून निवड केली आणि संघाच्या मध्यवर्ती समितीला तसे सांगितले. ती निवड सर्वांनी एकमताने मान्य केली. त्यानंतर त्यांची तब्येत खालावतच गेली. त्यांना डबल-न्यूमोनिया झाला, पाठीतले दुखणे कमालीचे वाढले. अर्धे शरीर गरम तर अर्धे शरीर थंडगार असा प्रकार होऊ लागला. बिहारमधल्या राजगीर येथे जाऊन तिथल्या झऱ्यात त्यांनी स्नान केले, पण त्याचाही काही उपयोग झाला नाही.

डॉक्टरांच्या अखेरच्या दिवसांत त्यांना भेटणारी दोन मोठी माणसे म्हणजे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि सुभ षचंद्र बोस. दि. २० मे १९४० रोजी डॉ. मुखर्जी त्यांना भेटले. मुखर्जींना प्रेमभराने आलिंगन देण्यासाठी डॉक्टर उठले असता मुखर्जी म्हणाले, "मी तर ऐकले होते की तुम्हाला बराच ताप आहे म्हणून !" डॉक्टर हेडगेवार हसले नि म्हणाले, "तुमच्यासारखा मोठा डॉक्टर येत असल्याचे ऐकून माझ्या तापाने पळ काढला आहे बघा !" पण त्यावेळी खरोखरच त्यांच्या अंगात १०३ अंशापर्यंत ताप होता.

डॉ. मुखर्जींनी पूर्व बंगालमधल्या हिंदूंची दयनीय अवस्था कथन केली आणि हिंदू रक्षादल स्थापन करण्यासाठी रा. स्व. संघाची मदत मागितली. दोन्ही डॉक्टरांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. पण डॉक्टर हेडगेवारांनी मुखर्जींना सांगितले की दंगलींच्या गदारोळात रक्षादले कुठल्याकुठे नाहीशी होतील. फक्त शांत व स्थिर चित्ताने दूरवरचा विचार करू शकणारी रा. स्व. संघासारखी संघटनाच संकटावर मात करून लोकांना सहाय्यभूत ठरू शकेल. रा. स्व. संघाने राजकारणात शिरावे, असेही डॉ. मुखर्जींनी सुचवले. पण 'राजकारणापेक्षा समाजसंघटनेचे कार्यच अधिक महत्त्वाचे आहे,' असे मत हेडगेवारांनी व्यक्त केले. जाता जाता मुखर्जींनी हिंदूरक्षादलासाठी संघाचे शंभर प्रशिक्षक कार्यकर्ते देण्याची हेडगेवारांना विनंती केली.

सुभाषचंद्र बोसांची आणि हेडगेवारांची पहिली गाठभेट १९२८ साली काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनाच्या वेळी झाली होती. तेथे सुमारे ६५,००० रुपये खर्च करून ३,००० स्वयंसेवकांचे पथक उभारण्यात आले होते. पण ते स्वयंसेवकच इतके बेशिस्तीने वागत होते की अखेर त्यांनाच सभामंडपातून बाहेर हाकलावे लागले होते. त्या निमित्ताने डॉक्टर हेडगेवारांनी आपण नागपूरच्या आसमंतात करीत असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या उभारणीची माहिती सुभाषचंद्रांना दिली होती. "राष्ट्रीय पुनरुत्थान अशा कार्यातूनच घडू शकेल." असे म्हणून बोसांनी डॉक्टरांच्या कार्याबद्दल त्यावेळी आस्था व्यक्त केली होती. पुढे १९३८ साली काँग्रेसचे अध्यक्ष या नात्याने बोसांनी नागपूरला भेट दिली तेव्हा डॉक्टर हेडगेवारांची भेट घ्यायची त्यांची इच्छा होती, परंतु प्रांतिक काँग्रेस समितीने ती बाजूला सारली. १९३९ साली हुद्दार आणि डॉ. संजीवी यांच्यामार्फत 'आपण सशस्त्र उठाव करण्याची योजना आखीत आहोत.' हे बोसांनी हेडगेवारांना कळवले होते. त्यावेळी डॉक्टर देवळीला डबल न्यूमोनिया होऊन पडले होते. त्यामुळे ते जाऊन सुभाषचंद्रांना भेटू शकले नाहीत. पण यशस्वी उठावाची किमान पन्नास टक्के तरी तयारी झाल्याशिवाय सुरूवात करू नये, असा सल्ला देणारा निरोप मात्र त्यांनी ताबडतोब पाठवला होता. त्यानंतरही डॉक्टरांचे जुने मित्र त्रैलोक्यनाथ चक्रवर्ती सुमारे पंचवीस वर्षांच्या मध्यंतरानंतर डॉक्टरांना भेटले होते. त्यांनी बोसांचा काही निरोप बरोबर आणला होता. त्या दोघांच्या बैठकीत काय बोलणे झाले, हे मात्र कुणालाच ठाऊक नाही.

दि. २० जून रोजी सुभाषचंद्र बोस फॉरवर्ड ब्लॉकचे नेते रुइकर यांना बरोबर घेऊन मृत्युशय्येवर पडलेल्या हेडगेवारांना पाहण्यासाठी आले. त्यावेळी डॉक्टर नुकतेच झोपी गेले होते. आदल्या रात्री त्यांना अस्वस्थतेमुळे झोप लागू शकली नव्हती. म्हणूनच सुभाषचंद्रांनी 'त्यांना उठवू नका' असे सांगितले, डॉक्टरांना प्रणाम करून ते निघून गेले. थोड्या वेळाने डॉक्टरांना जाग आली. बोस येऊन गेल्याचे त्यांना सांगितल्यावर ते उठून बसले, 'सुभाष' एवढेच प्रेमाने म्हणाले आणि

त्यांनीही हात जोडून नमस्कार केला.

दुसऱ्या दिवशी डॉक्टरांचा ताप १०६ अंशापर्यंत चढला. लंबर पंक्चर ऑपरेशन केले होते, ते अयशस्वी ठरले आणि दि. २१ जून १९४० रोजी सकाळी ९-२७ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली.

त्यांच्या अंत्ययात्रेला सर्व पक्षांचे व जमातींचे लोक एकत्र जमले होते. त्यावरून ते अजातशत्रू असल्याचे स्पष्ट होत होते. अनेक लोकांना रा. स्व. संघ हा हेडगेवारांचा संघ वाटला होता. त्यांच्या निधनाने ही संघटनादेखील संपून जाईल, असा त्यांचा कयास होता. पण त्याचरात्री संघाचे तरुण स्वयंसेवक कार्यकर्ते आपापल्या शाखांवर अपुऱ्या राहिलेल्या कार्याची माहिती देत होते.

संघाच्या तत्त्वज्ञानात असे काही बळ होते आणि कार्यपद्धतीत अशी काही सुसूत्रता होती की पुढल्या काही वर्षांतच संघटनेने नवी उंची गाठली. वरवर पाहाता सामान्य भासणाऱ्या एका माणसाने केवढी असामान्य कामगिरी पार पाडली होती !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०३२
क्र. २४७८६
निबंध १०।८।८४
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

## प्रकरण तिसरे : गुरुजी

श्री गुरुजींनी सरसंघचालक म्हणून १९४० साली जेव्हा सूत्रे हाती घेतली तेव्हा संघ एखाद्या जोमदार रोपट्यासारखा होता, पण अवघ्या सात वर्षांच्या अल्पावधीत तो एखाद्या वटवृक्षासारखा वाढला. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि अटकेपासून कटकपर्यंत देशात सर्वत्र संघाच्या शाखा फोफावल्या. संघाचा हा विस्तार खरोखरच अभूतपूर्व असा होता. देशाच्या विधिमंडळात जरी रा. स्व. संघाचे सभासद आढळत नसले तरी शाळाशाळांमधून आणि महाविद्यालयांतून, कार्यालयांतून आणि कारखान्यांमधून संघाचे अस्तित्व जाणवू लागले होते आणि त्यापेक्षाही जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे जनमानसात संघाला मानाचे स्थान मिळाले होते. दिल्लीमध्ये तर आय. सी. एस. अधिकाऱ्यांचीसुद्धा एक शाखा सुरू झाली होती.

देशाच्या फाळणीची मुसलमानांकडून केली जाणारी मागणी हे संघाच्या या विस्ताराचे एक प्रमुख कारण होते, यात शंकाच नाही. "पाकिस्तानची मागणी जर मान्य केली गेली नाही तर इथे रक्ताच्या नद्या वाहतील" अशी मुसलमान आमदारांनी १९४५ साली धमकी दिली होती, तर त्यापूर्वी चौधरी रहमत अलींनी मुसलमान बहुसंख्य असलेला प्रत्येक प्रदेश आणि मुस्लीम संस्थानिकांच्या अमलाखाली असणारा प्रदेश मिळून एक मुसलमान राज्य स्थापन करण्याची योजना मांडली होती. त्यांनी तर भारताचे नाव बदलून ते 'दिनिया' असे

ठेवण्याची सूचनादेखील केली होती. पंजाबच्या मुस्लीम विद्यार्थी संघटनेने असा धाडसी युक्तिवाद केला होता की, 'जीवनाच्या विकसित अवस्थेचे अर्धविकसित अवस्थेवर वर्चस्व प्रस्थापित होणे स्वाभाविक आहे आणि म्हणूनच बकरा खाऊन टाकणाऱ्या सिंहाप्रमाणे हिंदूंचा खात्मा करण्याचा मुसलमानांनाही अधिकार आहे.' दि. १६ ऑगस्ट १९४६ या, मुस्लीम लीगतर्फे 'प्रत्यक्ष कृतिदिन' म्हणून जाहीर करण्यात आलेल्या दिवसापूर्वी काही काळ प्रसिद्ध झालेल्या 'मगूर' या बंगाली पुस्तिकेत असे प्रक्षोभक आवाहन केले गेले होते की, "मुसलमान राष्ट्राने ज्या खुल्या संघर्षाची आकांक्षा आजवर मनात बाळगली होती, तो संघर्ष आता जवळ आला आहे. या, ज्यांना स्वर्गारोहण करण्याची इच्छा आहे अशा लोकांनो, या. जे लोक अगदी साधेसुधे आहेत, ज्यांना मनःशांती हवी आहे किंवा जे संकटात सापडले आहे, अशा सर्वांनो, या. जे चोर आहेत, गुंड आहेत, ज्यांचे चारित्र्य मलिन झालेले आहे किंवा जे नित्यनेमाने प्रार्थना करीत नाहीत, अशांनीदेखील या संघर्षात सहभागी होण्यासाठी यावे. स्वर्गाची तेजोमय द्वारे तुमच्यासाठी खुली झाली आहेत. आपण हजारोंच्या संख्येने त्या द्वारांमधून आत प्रवेश करू या. आपण सर्वांनी उच्च रवाने पाकिस्तानचा जयजयकार करू या, मुस्लीम राष्ट्राचा जयजयकार करू या, जिहाद पुकारणाऱ्या सेनेचा जयजयकार करू या."

या सगळ्याचा हिंदू मनावर परिणाम होणे अगदीच स्वाभाविक होते. तथापि त्या काळात जरी अनेक हिंदू संघटना अस्तित्वात होत्या तरी फक्त रा. स्व. संघ हीच एकमेव संघटना वाढत गेली, ही गोष्ट विशेष नमूद करण्यासारखी आहे. त्याचप्रमाणे हेही लक्षात घेण्यासारखे आहे की जरी बंगालमध्ये मुसलमानांच्या समस्येचे स्वरूप तीव्र होते तरीदेखील त्या प्रांतात रा. स्व. संघाचा म्हणावा तसा प्रभाव पडू शकला नाही. याचा अर्थच हा की मुसलमानांमधल्या वाढत्या विभक्तवादाच्या प्रतिक्रियेशिवाय इतरही अनेक घटक रा. स्व. संघाच्या त्या काळातल्या विस्ताराला कारणीभूत ठरले !

'चले जाव' आंदोलन सुरू झाल्यावर अनेकांनी त्यात सहभागी

होऊन खूप हालअपेष्टा सहन केल्या. रा. स्व. संघाचे अनेक स्वयंसेवकही त्या आंदोलनात सामील झाले होते– अर्थातच वैयक्तिकरीत्या ! अष्टी –चिमूर येथे समांतर सरकार स्थापन करण्यात काही संघस्वयंसेवकांनी भाग घेतला होता आणि तो उठाव दडपून टाकताना ब्रिटिशांनी केलेले प्रत्याघातही त्यांनी सहन केले होते. दिल्ली–मुझफ्फरनगर रेल्वेमार्ग तब्बल दोन महिने नादुरुस्त ठेवणाऱ्या दिल्लीतल्या तरुण मंडळींमध्येही स्वयंसेवकांचाच प्रामुख्याने भरणा होता. 'पत्री सरकार' या नावाने प्रसिद्ध झालेल्या दक्षिण महाराष्ट्रातल्या प्रतिसरकारचे प्रमुख नेते श्री. नाना पाटील यांना औंधचे संघचालक, सुप्रसिद्ध संस्कृत विद्वान पंडित सातवळेकर यांनी आश्रय दिला होता. समाजवादी नेते साने गुरुजी भूमिगत असताना पुण्याचे संघचालक भाऊसाहेब देशमुख यांच्या घरी मुक्काम करीत असत. दिल्लीच्या चांदणी चौकातल्या व्हिक्टोरिया राणीच्या पुतळ्यावरील छत्री संघस्वयंसेवक श्री. चंद्रकांत भारद्वाज यांनी फोडली होती. जयप्रकाश नारायण, अरुणा असफअली प्रभृतींना लाला हंसराज गुप्तांनी आपल्या घरात आश्रय दिला होता...

पण अखेरीस १९४२ सालचे ते आंदोलन फार लौकर विराम पावले, संथपणे समाप्त झाले. त्या आंदोलनाच्या अपयशामुळे संघासारख्या अधिक लढाऊ आणि अधिक भक्कम संघटनेची गरज लोकांना चांगलीच पटली. संघाचा अधिकाधिक वेगाने विस्तार होत गेला.

इतिहासातल्या आपल्या भूमिकेविषयी हिंदू माणसाच्या मनाला एक प्रकारची बोचणी लागून राहिलेली असते. एकीकडे त्याला आपल्या वैभवशाली भूतकाळाचे भान असते तर दुसरीकडे विघटनामुळे झालेल्या अधःपतनाचीदेखील त्याला जाणीव असते. म्हणूनच जेव्हा सर्व जातींना, वर्गांना, जमातींना आणि विभागांना एकाच राष्ट्रीय हिंदू संघटनेत एकत्रित आणण्यासाठी रा. स्व. संघ पुढे आला तेव्हा हिंदू समाजाने साहजिकच त्या संघटनेला चांगला प्रतिसाद दिला. उदाहरणार्थ सनातनी आणि आर्यसमाजी यांच्यामधील कधीही संपुष्टात येणार नाहीत असे वाटणारे तंटेबखेडे संघाच्या सामंजस्यपूर्ण वर्तुळात हां हां म्हणताना नाहीसे झाले. आता स्वयंसेवक केवळ त्यांच्या कुटुंबाचे किंवा

एखाद्या जातीचे राहिले नाहीत, तर ते सगळ्या देशाचे झाले. सारख्याच कवायती करता करता, तीच गीते गाता गाता आणि सारखीच बौद्धिके ऐकता ऐकता सर्व स्वयंसेवकांचे विचार आणि भावनादेखील एकवटू लागल्या. त्यांची भाषा, त्यांची बोलण्याची ढब, एवढेच नव्हे तर त्यांचे हास्यदेखील एकाच धर्तीचे दिसू लागले. एखादा स्वयंसेवक दुसऱ्या स्वयंसेवकाच्या सहवासात असताना त्या दोघांनाही परस्परांची भाषा कळत नसली तरी दोघांनाही आपण एखाद्या कुटुंबियाबरोबरच आहोत, असे वाटू लागले. जास्त गुरुदक्षिणा देता यावी म्हणून स्वयंसेवक सिनेमा पाहाणे टाळू लागले. दैनंदिन शाखा चुकवण्यापेक्षा घरातले एखादे मंगलकार्य चुकले तरी चालेल, असे म्हणणारे काही स्वयंसेवक आढळू लागले. संघ म्हणजे लाखो कृतिशील तरुणांच्या आयुष्यातली एक क्रांतीच होती. तिचे आवाहन सर्वांगीण होते, सर्वव्यापी होते. अहिंसा आणि चरखा यांचे स्तोम माजवणारी काँग्रेस देशाला स्वातंत्र्य मिळवून देऊ शकेल असे वाटत नव्हते. भारताला स्वातंत्र्य द्यायला तयार नसणाऱ्या ब्रिटिशांकडून ते हिसकावून घेण्यासाठी एखाद्या प्रचंड लढाऊ संघटनेची गरज होती आणि परिस्थितीची ती गरज भागवण्याचे बळ फक्त रा. स्व. संघातच असल्याचे दिसत होते. त्याशिवाय मुसलमानांच्या वाढत्या औद्धत्यावर मात करण्याऐवजी त्यांचा अनुनय करणाऱ्या काँग्रेसला शह देण्याचे बळदेखील एकट्या रा. स्व. संघातच होते. काळाने उभ्या केलेल्या आव्हानाला या समाजातून मिळालेला तो एक अनिवार्य प्रतिसाद होता. संघ हा आसेतुहिमाचल राष्ट्रीय संतापाचे प्रतीक ठरला.

रा. स्व. संघाबद्दलचे हे आकर्षण केवळ सार्वजनिक किंवा सामाजिक प्रश्नांपुरतेच मर्यादित नव्हते. व्यक्तिगत पातळीवर तर ते अधिकच वाटत होते. संघामधले विशुद्ध आणि सचोटीपूर्ण वातावरण म्हणजे कोणत्याही व्यक्तीला स्वयंविकासाचे चांगले आमंत्रणच असे. त्या दृष्टीने काही स्वयंसेवक प्रकृती सुधारण्यासाठी आसने करीत. इतर काहींनी मांसाशन करणे सोडून दिले, तर इतरांनी धूम्रपान सोडले. आणखी काहीजणांनी संस्कृतचा अभ्यास आरंभला. अर्थातच त्यांच्यापैकी

कुणालाही असे करायला कुणीच सांगितले नव्हते. पण विशुद्धतेला प्रोत्साहन देणाऱ्या वातावरणात त्या सर्वांनी आत्मविकासासाठी स्वयंस्फूर्तीने केलेला तो एक प्रयत्न होता. काहीतरी वेगळे आणि चांगले करीत असल्याचे समाधान त्या सर्वांना मिळत होते.

साप्ताहिक बौद्धिकांमुळे स्वयंसेवकांना इतिहासाची आणि संस्कृतीची, वाङ्मयाची आणि धर्माची ओळख होई. रा. स्व. संघाजवळ एक स्वच्छ, सुसंगत, संपूर्ण असे तत्त्वज्ञान होते. मनाचे अनेक अंधारलेले कोपरे उजळवून टाकण्याचे सामर्थ्य त्या तत्त्वज्ञानात होते. स्वयंसेवकांच्या मनात येणाऱ्या विविध प्रकारच्या प्रश्नांना त्यामुळे उत्तरे मिळत होती आणि त्यांच्या विचारांना एक सुनिश्चित दिशा लाभत होती. आत्म्याला जणू संजीवनीच लाभत होती. मनात संशय बाळगणाऱ्यांचा अंती नाश होतो, असे गीतावचन आहे ( संशयात्मा विनश्यते । ) आणि संघातल्या कुणाच्याही मनात कशाबद्दलचाही संशय मुळीच शिल्लक राहात नसे !

या राष्ट्रीय आणि वैयक्तिक पातळ्यांवरील प्रभावाप्रमाणेच रा. स्व. संघाचा सामाजिक स्तरावरही जबरदस्त प्रभाव पडला होता. सर्वसाधारण तरुण माणसाची ओळख त्याचे नातेवाईक, वर्गमित्र किंवा शेजारी यांच्यापुरतीच मर्यादित असते. पण संघात मात्र आपल्यापेक्षा ज्येष्ठ असणाऱ्या लोकांप्रमाणेच आपल्याहून लहान असणाऱ्यांबरोबरही गाठीभेटी होत. एकमेकांपासून मैलोन्मैल लांब राहाणाऱ्या, घराणी किंवा व्यवसाय यांचा विचार केल्यास एकमेकांपासून प्रकाशवर्षे लांब असणाऱ्या लोकांच्याही गाठीभेटी होत, मैत्री होई. आपल्या गावातल्या प्रत्येक गल्लीबोळात आणि भारताच्या कानाकोपऱ्यात आपलेच भाईबंद राहात असल्याचा अद्‌भुत साक्षात्कार संघजनांना होत असे. या सर्व गोष्टींचा व्यक्तीवर आणि समाजावर जो ठसा उमटत असे त्यामुळे एकात्मता व जागृती वाढीस लागे.

इंग्रजीतून लेखन करणारे एक प्रसिद्ध साहित्यिक श्री. वेद मेहता यांनी 'Face to Face' या शीर्षकाच्या आपल्या आत्मचरित्रात असे लिहिले आहे की, 'लाहोरमध्ये इमर्सन विद्यालयातला तो सात महिन्यांचा कालावधी मी अगदी आनंदाने घालवला. सकाळी ७ २०

वाजता मी घरातून निघे आणि संध्याकाळी ५.०० वाजता घरी पोचे. नंतर संध्याकाळी मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेवर जात असे. भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या निर्धाराने काम करणारी ती एक हिंदू संघटना होती. सर गंगाराम मेडिकल हॉस्पिटलमध्ये शिकणारा सोहनलाल नावाचा एक विद्यार्थी दररोज संध्याकाळी सात वाजता माझ्याकडे येई आणि मग आम्ही दोघेजण एक मैल लांब असणाऱ्या मैदानापर्यंत चालत जात असू. खेळ खेळत, कवायती-कसरती करीत आणि त्यापेक्षाही प्रार्थना व गीते म्हणत आम्ही नऊ वाजेपर्यंत तिथे थांबत असू. तिथे येणारे बहुतेकजण महाविद्यालयीन विद्यार्थी होते आणि बारा वर्षांचा मी सगळ्यात लहान होतो. स्वातंत्र्यप्राप्तीचा दिवस जवळ येत चालल्यामुळे प्रत्येकाच्या बोलण्यात, विशेषत: विद्यार्थ्यां-मधल्या चर्चेत राजकारणालाच प्राधान्य मिळत होते. शेवटची प्रार्थना म्हणून झाल्यानंतर मैदानावरच आम्ही बसत असू आणि सद्यस्थिती-बद्दल मनमोकळी चर्चा करीत असू. त्या चर्चेत काहीजण आशावादी चित्र रंगवीत तर इतर काहीजण भीती व्यक्त करीत. 'स्वातंत्र्य मिळाले की पाश्चिमात्य जगाच्या तोडीस तोड असे वैभव संपादन करण्याच्या मार्गावर राष्ट्र वाटचाल करू लागेल,' असा विश्वास काहीजण व्यक्त करीत तर काहींना सगळे भवितव्य अंध:कारमय असल्याचे जाणवे. मुसलमानां-मध्ये वाढत चाललेल्या विभक्त राष्ट्रवादामुळे इतका प्रदीर्घ लढा देऊन मिळवलेले स्वातंत्र्यच नाहीसे होईल, असे ते म्हणत. त्यांना असे वाटत होते की आपापसातल्या असंघटितपणामुळे शासन चालवण्यास आपण असमर्थ आहोत, हे भारतीयांकडून फार लौकर सिद्ध केले जाईल आणि ब्रिटिश नाही, तर दुसरी एखादी बडी शक्ती तरी भारतावर पुन्हा वर्चस्व प्रस्थापित करील.

जसजसा काळ पुढे जात चालला आणि डिसेंबर १९४६ व जानेवारी १९४७ हे महिने जसजसे जवळ आले तसतसा त्यांच्या बोलण्याचा सूर बदलत गेला. धर्मांध आणि दुराग्रही लोक देशाला ज्या रक्तपाती मार्गाकडे ओढून नेत आहेत त्यापासून देशाचे रक्षण करणाऱ्या शूरवीरांच्या थाटात ते स्वयंसेवक बोलू लागले. ते म्हणत, "आम्हाला

थोडी मुदत द्या, आम्ही हा रक्तपात थांबवून दाखवतो." भारताची फाळणी करण्यासाठी जसजसा दबाव वाढू लागला तसतसे त्या स्वयंसेवकांतले मतभेद लोप पावले आणि देशाचे अखंडत्व टिकवण्याच्या निर्धाराने ते उभे ठाकले. त्या दृष्टीने त्यांनी काही तयारी केली होती, काही योजना आखल्या होत्या, अशातला भाग नाही. पण ते एका जबाबदारीच्या, एका कर्तव्याच्या जाणिवेने भारावले होते, एका विलक्षण धैर्यभावनेचा त्यांच्यात प्रादुर्भाव झाला होता, हे मात्र निश्चित !'

तो एक अविस्मरणीय असाच अनुभव होता. पण एक महत्त्वाची गोष्ट येथे नमूद केली पाहिजे आणि ती म्हणजे ही की, जर संघाचा एकूण कारभार पूर्णवेळ प्रशिक्षित कार्यकर्त्यांच्या म्हणजेच प्रचारकांच्या मार्फत होत नसता तर मात्र मुसलमानांकडून तसे आव्हान दिले गेले असतानाही आणि त्या आव्हानास प्रत्युत्तर द्यायला हिंदू समाजदेखील उत्सुक असताना त्या परिस्थितीचा संघाला असा फायदा करून घेता आला नसता.

फार पूर्वी, संघस्थापनेनंतर अल्पावधीतच डॉक्टर हेडगेवारांना भारताच्या वेगवेगळ्या काना-कोपऱ्यात संघकार्य सुरू करण्यासाठी प्रशिक्षित कार्यकर्ते पाठवण्याची गरज जाणवली होती. डॉक्टरांचे निधन झाले तोपर्यंत दोन-तीनशे प्रचारक तयार झालेले होतेच. त्यानंतरच्या काळात प्रचारकांची संख्या वाढतच गेली. आज त्यांची संख्या एक हजाराच्या आसपास पोचली आहे.

हा प्रचारक कसा असे ? काही काळ स्वयंसेवक असणारा आणि संघकार्याचा विस्तार करण्यास उत्सुक असणारा उमदा तरुण प्रचारक होऊ शके. तो आपले घरदार सोडी– काही वेळा तर कायमच्यासाठीच तो घरादाराला रामराम ठोकी– आणि त्याला सांगितले जाई त्या प्रांतात, त्या गावी संघकार्यासाठी निघून जाई. साधारणत: त्या नव्या ठिकाणीदेखील तो आपले अध्ययन चालूच ठेवी. शिक्षणक्रम पूर्ण करण्याबरोबरच नव्या ठिकाणच्या तरुणांबरोबर सहज दैनंदिन संपर्क स्थापण्याचा हेतूही त्या अध्ययनामागे असे. हा प्रचारक बहुधा नुकताच तारुण्यात

पदार्पण केलेला असे, पण त्याच्या कुशाग्र बुद्धिमत्तेमुळे आणि एकाग्र निष्ठेमुळे त्या ठिकाणच्या प्रतिष्ठित नागरिकांमध्ये तो समान पातळीवर वावरू शके. साहजिकच आजूबाजूच्या स्वयंसेवकांसमोर त्या प्रचारकाच्या रूपात प्रामाणिक, निष्ठावान, कष्टाळू आणि सेवाभावी विशुद्ध कार्यकर्त्याचा आदर्श उभा राही.

प्रचारकांमध्ये स्वत:साठी कमीत कमी पैसा खर्च करण्याची अहमहमिका लागलेली असे. अनेकजण तर खर्च कमी करण्यासाठी एका वेळचे जेवणदेखील सोडून देत. अलीकडे अखिल भारतीय बौद्धिक प्रमुख असणारे श्री. बापूराव मोघे पूर्वी लखनौमध्ये असताना एक शिकवणी घेत. त्या शिकवणीचे त्यांना जे १८ रुपये मिळत त्यात ते स्वत: आणि श्री. भाऊराव देवरस– सध्याचे अखिल भारतीय सहचिटणीस– या दोघांचा खर्च भागे. भाऊराव आपल्या खाण्यापिण्यावर इतका कमी खर्च करीत की एकदा तर ते घेरी येऊन खाली कोसळले होते.

असेच एकदा जुन्या आठवणी सांगताना श्री. गुरुजी म्हणाले होते, "प्रचारक म्हणून मला जेव्हा कलकत्त्याला पाठवण्यात आले, तेव्हा माझ्या खिशात अवघे वीस रुपये होते. दोन्ही बाजूंचे रेल्वेभाडे त्यातूनच द्यायचे होते. आणि तरीदेखील काही दिवसांनी मी जेव्हा परतलो तेव्हा नागपूरच्या कार्यालयात मी तीन पैसे परत जमा केले होते. कलकत्त्यात वाहनखर्च करण्याचा विचारदेखील माझ्या मनाला शिवला नव्हता. मी दिवसाकाठी कधी वीस तर कधी तीस मैल चालत असे."

श्री. बाळासाहेब देवरस आणि प्रा. राजेंद्रसिंग यांच्यासारख्या, संघाच्या ज्येष्ठ नेत्यांशिवाय वाजपेयी, अडवानी, भंडारी, देशमुख, जोशी आणि ठाकरे यांच्यासारख्या सार्वजनिक क्षेत्रात प्रसिद्ध असणाऱ्या प्रचारकांची नावेच तेवढी जनसामान्यांना ठाऊक आहेत, पण त्यांची संख्या बरीच मोठी आहे. आज जो संघ आहे तो जसा आहे तसा बनवण्याचे खरे श्रेय त्या प्रचारकांनाच आहे. सेवा आणि त्याग यांनी भरलेली त्यांची जीवने म्हणजे एकेक स्वतंत्र गाथाच आहे. काहींची नावे उदाहरणादाखल सांगता येतील. डॉक्टरांचे उजवे हात मानले जाणारे श्री. अप्पाजी जोशी काय किंवा विनयशील, सौम्य स्वभावाचे,

विद्वान आणि असंख्य स्वयंसेवकांना पितृतुल्य वाटणारे श्री. बाबासाहेब आपटे काय, लहानपणी लोकमान्य टिळकांच्या मांडीवर खेळलेले आणि पुढे बनारस हिंदू विद्यापीठात संघाची पहिली शाखा सुरू करणारे श्री. भय्याजी दाणी काय सगळे आदर्श प्रचारक होते. भय्याजी दाणींचा राजकारणात चांगलाच प्रभाव पडू शकला असता, पण त्यांनी आपले सगळे आयुष्य संघकार्यालाच अर्पण करायचे ठरवले. त्यांचे छोटेसे शेत होते, त्यावर त्यांच्या कुटुंबाचा खर्च चाले. भय्याजी अनेक वर्षे संघाचे सरचिटणीस होते. तसेच दादाराव परमार्थ हे उत्तम वक्ते, संघाचे चांगले प्रचारक होते. पंजाब, तामिळनाडू आणि आसाम प्रांतातल्या संघ-कार्याची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली होती. श्री. एकनाथजी रानडे यांच्या पराकोटीच्या निष्ठेबद्दल व कार्यकौशल्याबद्दल गमतीने असे म्हटले जाई की, 'उद्या कधीकाळी जर कुतुबमिनार दुसरीकडे हलवायचा असे ठरले तर ते काम करू शकेल असा एकमेव माणूस म्हणजे एकनाथच!' सरचिटणीस होण्यापूर्वी महाकोशल आणि पूर्वांचलाची सर्व व्यवस्था ते पाहत असत. कन्याकुमारीला उभारले गेलेले स्वामी विवेकानंदांचे शिलास्मारक हे त्यांच्या संघटन-कौशल्याची साक्ष देण्यास पुरेसे आहे. तेथील विवेकानंद केंद्राचे ते अगदी अखेरपर्यंत अध्यक्ष होते.

तसेच शास्त्रोक्त गायक श्री. यादवराव जोशी यांनी दक्षिणेत संघकार्य वाढवण्यासाठी आपले सर्व आयुष्य खर्ची घातले आहे. त्यांच्याच सर्वांगीण मार्गदर्शनाखाली कर्नाटक–आंध्र आणि केरळमध्ये उत्तर प्रदेश बिहार-राजस्थानसारख्याच संघाच्या शाखा फोफावल्या. पश्चिम भार-तात आज जो संघ दिसतो आहे त्याचे बरेचसे श्रेय श्री. मोरोपंत पिंगळे यांना द्यावे लागेल. सध्या ते अखिल भारतीय सहचिटणीस असून भारताचा योग्य दृष्टिकोनातून इतिहास लिहिण्याचे कार्य संघटित करण्यात ते सध्या गुंतले आहेत. श्री. बच्छराज व्यास यांचे घराणे तसे सनातनी मारवाडी ब्राह्मणाचे, पण राजस्थानात संघकार्य वाढावे म्हणून त्यांनी नागपुरातले आपले घरदार आणि चांगली वकिली सोडून दिली होती. मध्यप्रदेशातील होशंगाबाद जिल्ह्यातील टीमरणी या गावातील सुखवस्तु घराण्यातल्या श्री. भाऊसाहेब भुसकुटे यांना त्यांच्या जमिनींच्या

संदर्भात सरकारने वारंवार त्रास देऊनही, परिणामांची यत्किंचितही पर्वा न करता ते मध्यप्रदेश व ओरिसामध्ये पूर्णवेळ संघकार्य करीत राहिले. श्री. भागवत आणि श्री. इनामदार यांनी गुजरातमध्ये संघकार्य सुरू केले तर बिहारमध्ये श्री. मधुकर देव यांनी संघाला आकार प्राप्त करून दिला. पंजाबमधील संघकार्याची जबाबदारी माधवरावांनी सूत्रे हाती घेण्यापूर्वी श्री. पातुरकरांनी योग्य रीतीने पार पाडली. श्री. राजपाल पुरी यांनी सिंधमधील कार्य संघटित केले तर श्री. पालडीकर यांनी ओरिसातले संघकार्य व्यवस्थित पाहिले. श्री. दक्षिणामूर्ती यांनी तामिळ-नाडूमध्ये तर श्री. एच. व्ही. शेषाद्री यांनी कर्नाटकात संघाचे बळ वाढवले. आता कर्नाटकचे के. सुदर्शन पूर्वांचलातले संघकार्य वाढवण्यात गुंतलेले आहेत. दिल्ली प्रांतातल्या संघकार्यावर श्री. ब्रह्मदेव यांची देखरेख असते, तर सरसंघचालकांचे चिटणीस आणि डॉक्टर असणारे डॉ. आबा थत्ते आजीवन प्रचारक आहेत. या सर्वांना सुमारे हजार प्रचारकांचे साहाय्य होत असते. कुणालाही मान लववावीशी वाटेल अशीच या सर्वांची कार्यनिष्ठा आहे, यात शंकाच नाही.

या सर्व प्रचारकांना मदत आणि मार्गदर्शन करण्यासाठी संघ-चालक असतातच. श्री. हंसराज गुप्ता (दिल्ली), श्री. बाबू दिलीपचंद (पंजाब), श्री. नरेंद्रजित सिंग (उत्तर प्रदेश), श्री. आर. के. रस्तोगी (राजस्थान), श्री. कृष्णवल्लभ नारायणसिंग (बिहार), श्री. सुरेन्द्र-नाथ शर्मा (आसाम), श्री. बाबासाहेब भिडे (महाराष्ट्र), श्री. बाबा-साहेब घटाटे (नागपूर), डॉ. प्राणलाल दोशी (गुजरात), श्री. पी. लिंगय्या चौधरी (आंध्र), श्री. के. व्ही. गोपालन (केरळ) आणि श्री. रंगास्वामी थेवर (तामिळनाडू) यांच्यासारखे ज्येष्ठ प्रांत संघ-चालक संघाचे फार मोठे आधारस्तंभ होते.

आणि या सर्व प्रचारकांपेक्षा आणि संघचालकांपेक्षा श्री. गुरुजींचे आगळे व्यक्तिमत्व संघकार्याच्या मुळाशी होतेच.

श्री. माधव सदाशिव गोळवलकर यांचा जन्म नागपूर येथे दि. १८ फेब्रुवारी १९०६ रोजी (माघ कृष्ण एकादशी, शके १८२७) झाला. त्यांचे वडील प्रारंभी तार आणि टपालखात्यात कारकून होते आणि

नंतर एका सरकारी शाळेत शिक्षक होते. त्या नोकरीत असताना त्यांच्या मध्यप्रांतातील आणि वऱ्हाडातील हिंदी भागात वारंवार बदल्या होत. लहान माधवने या संधीचा फायदा घेऊन खूप पाहिले आणि बरेच काही शिकण्याचा प्रयत्न केला. जरी त्याची मातृभाषा मराठी होती तरी त्याने अल्पावधीतच हिंदीवरही चांगले प्रभुत्व मिळवले. माधवच्या माता-पित्यांना एकूण नऊ अपत्ये झाली होती, पण फक्त माधव तेवढाच जगला. त्यामुळे साहजिकच तो त्यांचा जीव की प्राण होता. १९२२ साली मॅट्रिक्युलेशनची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर माधव नागपूरच्या प्रख्यात हिस्लॉप महाविद्यालयात दाखल झाला. परदेशी मिशनरी लोक हे महाविद्यालय चालवीत होते. बायबल हा सक्तीचा विषय होता. प्राचार्य गार्डिनर यांनी एक दिवस आपल्या व्याख्यानात नेहमीप्रमाणे बायबलमधले एक वचन उद्धृत केले पण ते चुकीचे होते. माधव ताबड-तोब उठून उभा राहिला आणि त्याने प्राचार्यांना त्यांचा संदर्भ चुकल्याचे सरळ सांगितले. खरे वचन काय आहे तेदेखील त्याने आठवून सांगितले. वर्गातल्या वर्गातच बायबल पाहून त्याचे म्हणणे तंतोतंत बरोबर असल्याची खात्री पटल्यावर प्राचार्य गार्डिनर यांना माधवच्या विलक्षण तल्लख स्मरणशक्तीबद्दल आश्चर्य वाटले. वर्ग संपल्यावर त्यांनी माधवला आपल्या कार्यालयात बोलावून घेतले आणि प्रखर बुद्धिमत्तेबद्दल व तीव्र स्मरणशक्तीबद्दल त्याची पाठ थोपटली.

१९२४ साली माधव बनारस हिंदू विद्यापीठात दाखल झाला. प्राणिशास्त्रातली एम. एस्सी. ची पदवी त्याने संपादन केली. पण त्या काळात केवळ पाठ्यपुस्तके वाचण्यापेक्षा मनाचा आणि व्यक्तिमत्त्वाचा अधिकाअधिक विकास घडवून आणण्याकडे त्याचा जास्त कल होता. बनारस हिंदू विद्यापीठात असताना माधवने वेगवेगळ्या विषयांवरची जवळजवळ २००० पुस्तके वाचली असावीत, असा अंदाज आहे. या प्रचंड वाचनामुळेच पुढील आयुष्यात कुठल्याही विषयावर चाललेल्या चर्चेत– मग ती विज्ञानविषयक असो किंवा कलेसंबंधीची असो, साहित्या-बद्दलची असो किंवा इतिहासाबद्दलची असो, तत्त्वज्ञानाबद्दलची असो किंवा मानसशास्त्राबद्दलची असो– अधिकारवाणीने काहीतरी खास मुद्दा

मांडणे त्याला शक्य झाले. कुठलीही चर्चा एकदम उच्च पातळीवर नेऊन ठेवणे त्याला सहज शक्य होई. त्या काळातला एक अगदी छोटा प्रसंग पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर तो चांगलाच प्रकाश टाकतो.

बी. एस्सी. च्या शेवटच्या परीक्षेला माधव बसणार होता. परीक्षेला फक्त पंचवीस दिवसच शिल्लक राहिले होते. तो इतर वाचनातच इतका मग्न होता की त्याने पाठ्यपुस्तकेदेखील खरेदी केली नव्हती. त्या वर्षी परीक्षेला न बसण्याची परवानगी मागणारी तार त्याने वडिलांना पाठवली. आपल्या लाडक्या मुलाने अभ्यासाकडे दुर्लक्ष करावे हे वडिलांना आवडले नाही. (त्यांना भाऊजी म्हणत असत.) त्यांनी तारेचे उत्तर पाठवले नाही. त्यावरून वडिलांच्या भावना काय असाव्यात, हे माधवला समजले. आता तर परीक्षेला अवघे वीसच दिवस उरले होते. घाईघाईने त्याने सगळी पुस्तके खरेदी केली आणि तो त्या पुस्तकांच्या वाचनात गढून गेला. त्या वीस दिवसांत त्याच्या खोलीतला दिवा क्वचितच विझवला गेला असेल, तो फारच कमी वेळ झोपला असेल, अशी त्याची तपस्या होती. एक दिवस त्याच्या पायाला विंचवाने डंख केला. पण तरीही त्याने अभ्यास सोडला नाही. त्याने पायाला एका ठिकाणी मुद्दाम छेद दिला, विषाळलेले रक्त वाहू दिले. मग एका बादलीत त्या पाण्यात पोटॅशियम परमँगेनेट मिसळून, त्याने तो पाय पाण्यात ठेवला. आश्चर्यचकित झालेल्या मित्रांना तो फक्त एवढेच म्हणाला– "विंचू चावला तो माझ्या पायाला, माझ्या डोक्याला नव्हे. त्यामुळे माझ्या अभ्यासात खंड पडायची काहीच आवश्यकता नाही."

शिक्षण संपल्यावर माधवराव मद्रासच्या मत्स्यालय केंद्रात विशेष अभ्यासासाठी काही दिवस राहिले. तेथे असताना बिगरतिकिट प्रवेश केल्याबद्दल त्यांनी चक्क निझामालादेखील अडवले होते. मग १९३० साली बनारस हिंदू विद्यापीठाच्या विज्ञानविभागात ते नोकरीला लागले. प्राणिशास्त्राच्या विद्यार्थ्यांवर त्यांच्या ज्ञानाचा आणि साधेपणाचा एवढा प्रभाव पडला की सगळे विद्यार्थी त्यांना 'गुरुजी' म्हणू लागले आणि हे संबोधन एखाद्या बिरुदाप्रमाणे त्यांना चिकटले ते कायमचेच. १९३१ साली त्या बनारस विद्यापीठातच गुरुजी संघाचे

स्वयंसेवक झाले. हिंदू तरुणांच्या केंद्रस्थानी असणाऱ्या त्या विद्यापीठात संघाचे कार्य सुरू करण्यासाठी नागपूरहून मुद्दाम पाठवण्यात आलेल्या भय्याजी दाणींनी गुरुजींना संघात आणले.

बनारस हिंदू विद्यापीठात तीन वर्षे अध्यापन केल्यावर, माधवराव नागपूरला परतले आणि आई-वडिलांच्या आग्रहाखातर कायद्याचा अभ्यास त्यांनी सुरू केला. रामटेकहून बसने जाता-येता त्यांनी हिंदू कायद्याचा अभ्यास पूर्ण केला. आपले सध्याचे उपराष्ट्रपती श्री. हिदायतुल्ला हे त्यांचे त्या वेळचे मुस्लीम कायद्याचे प्राध्यापक होते मुस्लीम कायद्यानुसार, घटस्फोट घेतल्यानंतर दोन वर्षांनी स्त्रीला लग्न करता येते. मुलांचे पितृत्व निश्चित करता यावे यासाठी ही तरतूद करण्यात आल्याचे सांगितले जाते. 'मूल गर्भाशयात सुमारे २७० दिवसच असते, हे आता माहीत झालेले असल्यामुळे हा मधला दोन वर्षांचा कालावधी कमी करता येणे शक्य नाही का ?' असा शास्त्रीय दृष्टिकोनातला प्रश्न माधवरावांनी त्या वेळी श्री. हिदायतुल्ला यांना विचारला होता. श्री. हिदायतुल्लांनी त्यांना काहीच उत्तर दिले नव्हते.

एलएल. बी. झाल्यानंतर माधवरावांनी काही काळ वकिली केली. आता त्यांनी लग्न करावे असे त्यांच्या आई-वडिलांना वाटू लागले, पण माधवराव नेहमीच हसून तो विषय टाळत असत. हे सारे चालले असताना डॉक्टर हेडगेवारांचे श्री. गुरुजींकडे बारकाईने लक्ष होते. त्यांच्या श्री. गुरुजींकडून काही आशा-अपेक्षा होत्या. पण १९३६ साली अचानक श्रीगुरुजी घरातून बाहेर पडले. श्री. रामकृष्ण परमहंसांच्या प्रत्यक्ष अकरा शिष्यांपैकी एक असणाऱ्या स्वामी अखंडानंदांनी स्थापन केलेल्या सरगाच्छी आश्रमात ते गेले. त्या वेळी स्वामी अखंडानंदच आश्रमाचे संचालक होते. त्यांनी श्रीगुरुजींना आश्रमीय जीवनाची दीक्षा दिली. योगाचा सर्व बारकाव्यांनिशी गुरुजींनी अभ्यास केला. याच काळात त्यांनी केस आणि दाढी वाढवली. एक दिवस त्यांच्या डोक्यावर वाढलेल्या बटेशी चाळा करीत स्वामी अखंडानंद त्यांना म्हणाले, "माधव, तुझ्या व्यक्तिमत्त्वाची ही शान आहे. माझे ऐकणार असलास तर हे केस कधी कापू नकोस." त्यांचे म्हणणे श्रीगुरुजींनी मानले आणि पुढे कायम केस

आणि दाढी वाढवली.

फेब्रुवारी १९३७ मध्ये स्वामी अखंडानंदांचे अचानक निधन झाले. त्यानंतर अल्पावधीतच श्री. गुरुजी नागपूरला परतले. त्यांच्या आई-वडिलांना खूप आनंद झाला. पण त्यांच्यापेक्षाही जास्त आनंद झाला तो डॉक्टरांना. त्यांनी श्री. गुरुजींना तातडीने संघाचे सरकार्यवाह नेमून टाकले. १९३९ साली श्री. गुरुजींनी अवघ्या तीन दिवसांत–" We : Our Nationhood Defined " ही महत्त्वाची पुस्तिका लिहून काढली.

डॉक्टर हेडगेवारांची प्रकृती वेगाने खालावत चालली होती, पण आता त्यांना कसलीही काळजी वाटत नव्हती. आगामी वादळी वर्षांत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेतृत्व करण्यात कर्मयोगी माधव हमखास यशस्वी होतील, याबद्दल त्यांना खात्री वाटत होती. नऊ वर्षांच्या प्रदीर्घ काळात डॉक्टरांनी गुरुजींना घडवले होते आणि प्रारंभी आपल्या बुद्धिमत्तेचा अभिमान बाळगून काहीसे अलिप्त राहणारे गुरुजी हळूहळू डॉक्टरांच्या प्रभावाखाली आले होते. खूप वर्षांनंतर श्री. गुरुजींनी असे म्हटले होते की, " एक विद्वान म्हणून डॉक्टरांचा माझ्यावर फारसा ठसा उमटला नाही, पण त्यांचा सत्याबद्दलचा आग्रह आणि पराकोटीचा प्रामाणिकपणा यामुळे मी भारावलो गेलो. बायबलच्या भाषेत सांगायचे झाले तर डॉक्टर एक ईश्वरी कार्य पूर्ण करण्यासाठी जगात आले होते– कशाचाही विध्वंस करण्यासाठी नव्हे ! "

' संघाची तत्त्वे इतकी व्यवस्थित आहेत आणि संघाची कार्यपद्धती इतकी परिणामकारक आहे की, उद्या एखाद्या दगडधोंड्याला जरी सरसंघचालक म्हणून बसवले तरी संघकार्य वाढतच राहील.' असे डॉक्टर म्हणत असत. ' जणू काही हे विक्रमादित्याचे सिंहासन आहे.' हे डॉक्टरांचे वाक्य श्री. गुरुजी नंतरच्या काळात वारंवार उद्धृत करून व्यक्तीला असणारे नगण्य महत्त्व स्पष्ट करीत असत. ते म्हणत, " डॉक्टर म्हणत असत तसेच झाले आहे. सरसंघचालकपदी एक दगड बसवण्यात आला आहे आणि संघाचा विस्तार चालूच आहे."

हा अर्थातच त्या महापुरुषाचा विनय होता. कार्लाइलने म्हटल्या-

प्रमाणे ' माणसाचा धर्म हा त्याच्या संदर्भात विचार करताना सगळ्यात महत्त्वाचा असतो असे जे म्हटले जाते ते सर्वार्थाने योग्य आहे...... कोणत्याही मोठ्या माणसाचे आयुष्य व्यर्थ जात नाही. थोर लोकोत्तर पुरुषांची चरित्रे म्हणजेच जगाचा इतिहास आहे... हा चरित्रनायक कवी, प्रेषित, राजा, पुरोहित– कुणीही असू शकतो, तो ज्या जगात जन्माला येतो त्याला अनुसरून तो रूप धारण करतो." हे श्री. गुरुजींच्या बाबतीत शब्दश: खरे होते. कुठल्याही क्षेत्रात गेले असते तरी त्यांचा ठसा त्यांनी उमटवला असताच. त्यांच्या रूपाने जीवन शांतपणे पाहणारा आणि त्याचे पूर्ण दर्शन घेऊ शकणारा एक द्रष्टा सार्वजनिक जीवनात अवतरला. आपले चातुर्य, ज्ञान आणि दूरदृष्टी यांच्या आधारावर ते हिंदू भारताच्या सद्सद्विवेकबुद्धीचे प्रतीक ठरले.

हिंदूंची स्थिती ' बिगर-मुस्लीम ' म्हणून ओळखली जाण्याइतपत खालावल्याचे पाहून श्रीगुरुजींना दु:ख होई. भारतापेक्षाही मोठ्या असणाऱ्या अमेरिका, सोव्हिएत रशिया किंवा चीन या देशांना उपखंड म्हटले जात नसताना फक्त भारतालाच उपखंड का म्हटले जावे, हा प्रश्न त्यांना सतत सतावे. देशाच्या फाळणीला जनमत अनुकूल व्हावे, या हेतूनेच भारताला मुद्दाम उपखंड असे संबोधण्यात येत आहे, याबद्दल त्यांच्या मनात कोणताही संशय नव्हता.

भारत हे नुकतेच उदयास येऊ लागलेले राष्ट्र असल्याच्या कल्पनेची ते टर उडवीत आणि ' त्या सिद्धांताचा पुरस्कार करणारे लोक म्हणजे नुकतेच होऊ घातलेले राष्ट्रभक्त आहेत.' असे म्हणत. वैदिक कालापासून भारतवर्ष हे एक राष्ट्र आहे, हे सिद्ध करण्यासाठी ते ऋचांमागून ऋचा आणि सर्गामागून सर्ग उद्धृत करीत. मंदिरासमोरच्या हत्तीला उभे गंध लावले जावे की आडवे गंध लावले जावे, या कर्मकांडासंबंधीच्या धार्मिक वादाचा निर्णय शैव आणि वैष्णवपंथीयांनी भारताबद्दल फारच थोडी माहिती बाळगणाऱ्या आणि हिंदू धर्माबद्दल काहीच माहिती नसलेल्या ब्रिटिश प्रीव्ही कौन्सिलकडे सोपवावा, याबद्दल त्यांना खेद होई. ' दि सिंध ऑब्झर्व्हर 'चे संपादक श्री. के. पुनय्या यांनी एकदा गुरुजींना विचारले, " भारताची फाळणी झाली

तर त्यामुळे काही बिघडेल का?" त्यांना उत्तर देताना गुरुजी म्हणाले, "देशाच्या फाळणीमुळे जर काही बिघडणार नसेल तर एखाद्याचे नाक कापले गेले तरीदेखील त्याचेही काही बिघडणार नाही."

"सगळे हिंदू मुसलमान झाले तरी त्यामुळे काही फरक पडत नाही", असे दुसरे कुणीतरी म्हणाले तेव्हा श्रीगुरुजी म्हणाले, "सगळे हिंदू मेले तरी त्यामुळेदेखील काही फरक पडणार नाही. कारण अस्थींच्या रूपाने ते सारेजण जिवंतच असतील आणि विज्ञानाने हे सिद्ध केले आहे की वस्तू अविनाशी असते आणि वस्तू म्हणजे काही विद्युत्भार असतो."

'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची एका शब्दात व्याख्या करा' असे कुणीतरी सांगितल्यावर ते म्हणाले, "ॐ या एकाच शब्दाने हिंदू तत्त्वज्ञानाची व्याख्या करता येईल. पण त्याचे महत्त्व जाणून घेण्यासाठी वर्षानुवर्षे अभ्यास करावा लागेल. त्याचप्रमाणे संघ समजून घ्यायचा असेल तर दररोज शाखेवर उपस्थिती लावलीच पाहिजे."

'भारत ही अहिंसेची उद्‌गाती भूमी आहे' असे म्हणणे हास्यास्पद असल्याचे त्यांचे मत होते. "मध्य आणि आग्नेय आशियात आपला जो प्रभाव वाढला तो काही निव्वळ प्रवचने देऊन वाढला नाही, हे उघड आहे. प्रत्येक हिंदू देव शस्त्रधारी आहे, ही गोष्ट या संदर्भात लक्षात घेण्याजोगी आहे", असे ते सांगत. अलेक्झांडरने भारताच्या राजा पुरुचा (ग्रीक इतिहासकारांच्या लिखाणात पोरस या नावाने उल्लेखिलेल्या) पराभव केला, हे म्हणणे त्यांना अमान्य होते. ते म्हणत, "खरी वस्तुस्थिती अशी होती की, त्या युद्धापूर्वी पुरुकडे जेवढा प्रदेश होता त्याच्यापेक्षा जास्त प्रदेश युद्धानंतर त्याच्या अमलाखाली आला आणि अलेक्झांडरला घाईघाईत माघार घेणे भाग पडले." भारताचा खराखुरा इतिहास अजूनही लिहिला गेलेला नाही, असे त्यांना वाटे. त्याबद्दल त्यांचे म्हणणे असे की, "हिंदू काल, मुसलमान काल आणि ब्रिटिश काल असे राष्ट्रीय इतिहासाचे खंड पाडणे चुकीचे आहे. इतिहासाला राज्यकर्त्यांची नावे देणे योग्य नाही. खरा इतिहास हा त्या त्या देशातील जनतेचा इतिहास असला पाहिजे आणि त्या दृष्टीने आपल्या देशाचा संपूर्ण इतिहास हा हिंदू इतिहासच आहे." ते पुढे म्हणत, "आपली

इतिहासाची पुस्तके प्रामुख्याने दिल्लीभोवती घोटाळताना आढळतात. पण दिल्ली म्हणजे काही हिंदुस्थान नव्हे. आणि भारतीय इतिहासाच्या अनेक कालखंडांत दिल्लीच्या राज्यापेक्षा इतर राज्येच कितीतरी मोठी होती. इतिहासाच्या पुस्तकांतील या गफलतींमुळे आपल्या लोकांना चोल, चेरा, पांड्य, होयसाल, पुलकेशीन यांच्याबद्दल फारच थोडी माहिती असते. बहुतेक आग्नेय आशिया ज्याच्या नियंत्रणाखाली होता तो लोकोत्तर राजा– उत्कलचा खारवेल आपल्यापैकी कितीजणांच्या ऐकिवात आहे ? किंवा मोगलांच्या आक्रमक हल्ल्यांना यशस्वीपणे परतवून लावणारा आसामचा वीरपुरुष लचित बरफुकन तरी कुणाला ठाऊक आहे ?"

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य लौकरात लौकर पूर्ण व्हावे यासाठी जास्तीत जास्त कष्ट करण्याचे कार्यकर्त्यांना आवाहन करताना श्री गुरुजी म्हणाले होते, "एकदा गोल्डस्मिथनी डॉ. जॉन्सन यांना विचारले की, 'डॉक्टर, इथून चंद्रापर्यंत पोचण्यासाठी एका साखळीत किती मासे असावे लागतील ?' डॉ. जॉन्सन निरुत्तर झाले, पण गोल्डस्मिथनी स्वतःच त्या प्रश्नाचे उत्तर दिले. ते म्हणाले, 'केवळ एक मासादेखील पुरेसा आहे, मात्र तो पुरेसा मोठा हवा !' त्याचप्रमाणे आपल्या कामाच्या पूर्ततेसाठी अवघा एक दिवसदेखील पुरेसा ठरू शकेल, मात्र आपले सारे सामर्थ्य– अगदी अणूरेणूंसह– पणाला लावून आपण काम करायला हवे !"

अशी परिस्थिती असल्यामुळे आणि असे नेतृत्व लाभल्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा अत्यंत वेगाने सर्वत्र विकास झाला. काँग्रेस, हिंदुमहासभा, आर्यसमाज या किंवा इतर संघटनांच्या स्थानिक नेत्यांना उद्देशून लिहिलेली काही ओळखपत्रे घेऊन संघाचा प्रचारक गावोगावी जात असे. या संघटनांच्या स्थानिक कार्यालयात किंवा एखाद्या देवळात किंवा एखाद्या हितचिंतकाकडे तो मुक्काम करी. बहुधा त्याचा पेशा शिक्षकाचा असे, त्यामुळे त्याचा अनेक विद्यार्थ्यांशी आणि शिक्षकांशी सहज संपर्क स्थापित होई. हिंदूंची एखादी स्थानिक स्वयंसेवी संघटना तेथे काम करीत असेल तर ती लौकरच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या

नव्या शाखेत विलीन होऊन जाई. स्थानिक हितचिंतकांच्या मदतीने आणि संघातील ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली ती शाखा अल्पावधीतच असे एक सामाजिक केंद्र बने की उमद्या तरुणांप्रमाणेच प्रसिद्ध व्यक्तींनाही त्याचे आकर्षण वाटू लागे. जातिभेद, वर्गभेद किंवा पंथभेद त्या बाबतीत विचारातच घेतला जात नसे. थोड्याच काळात ती शाखा गावातली सर्वांत समर्थ संघटना ठरे. आणि मग त्या शाखेतून संघाचा संदेश इतर शहरांत किंवा खेडेगावांत पोचवायला समर्थ असे उमदे तरुण कार्यकर्ते तयार होऊ लागत. एका दिव्याने दुसरा दिवा पेटवावा आणि मग इतर दिवे लागत जावेत, असा तो प्रकार होता. यामुळेच संघाचा विस्तार इतका वाढत गेला की १९४७ साली श्री. गुरुजी म्हणाले होते, " जर मी एकेक दिवस एकेका शाखेत घालवायचा ठरवले तर मला संपूर्ण देशातल्या सर्व शाखांना भेटी द्यायला सगळे आयुष्यदेखील पुरणार नाही. "

# प्रकरण चौथे : १९४७

दिनांक १५ ऑगस्ट १९४७ चा स्वातंत्र्यदिवस गांधीजींप्रमाणच राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही साजरा केला नाही. तो दिवस शोकदिवसच होता, कारण जरी स्वातंत्र्य मिळाले होते तरी देश रक्तबंबाळ, छिन्न-विच्छिन्न झाला होता. तरीही त्या अनिश्चित वातावरणात नव्या भारत सरकारला मदत म्हणून जे काही करता येणे शक्य होते ते सारे रा. स्व. संघाने केले.

सप्टेंबर १९४६ मध्ये जेव्हा हंगामी भारत सरकारचा शपथविधी झाला, तेव्हा मोटारीतून राष्ट्रपती भवनाकडे जाणाऱ्या काँग्रेस मंत्र्यांचा मुस्लीम लीगच्या शेकडो गुंडांनी निषेध आणि अपमान केला होता. त्यांच्यापैकी काही जणांनी तर पंडित नेहरूंच्या मोटारीवर सिगारेटची थोटके फेकून मारली होती. त्यानंतर लगेच दिल्ली प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष श्री. देशबंधू गुप्ता हे संघाचे दिल्ली प्रांत प्रचारक श्री. वसंतराव ओक यांना ई–४२, कमलानगर येथील संघकार्यालयात येऊन भेटले. 'दुसऱ्या दिवशी नवे मंत्री आपापल्या खात्यांची सूत्रे घेतील तेव्हा कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी' त्यांनी संघाकडून मदत मागितली. दुसऱ्या दिवशी सचिवालयाच्या परिसरात संघ स्वयंसेवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे म्हणजे कोणताही गैरप्रकार घडणार नाही, असे त्यांनी सुचवले. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी खरोखरच हजारो स्वयंसेवक त्या जागी जाऊन पोचले. मुस्लीम लीगचे खोडसाळ

लोक तेथे होतेच, पण त्यांच्यापेक्षा संघाचे स्वयंसेवक संख्येने जास्त असल्यामुळे काहीही अनिष्ट प्रकार घडला नाही.

फाळणीनंतर दिल्लीत जेव्हा मोठ्या प्रमाणावर हिंसाचार झाला तेव्हा हिंसाचारी लोकांना शोधून काढण्यात आणि हिंसाचार रोखून धरण्यात संघाने फार महत्त्वाची भूमिका पार पाडली. बनारसचे प्रसिद्ध संत आणि 'भारतरत्न' या किताबाचे पहिले मानकरी डॉ. भगवानदास यांनी या संदर्भात लिहिताना असे म्हटले होते की, "मला अशी खात्रीलायक माहिती समजली आहे की राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अनेक तरुणांनी इस्लामचा स्वीकार करणे म्हणजे त्यांच्या दृष्टीने जास्तीत जास्त लज्जास्पद अशी गोष्ट असतानादेखील 'आपण धर्मांतर करायला उत्सुक आहोत' असे भासवले आणि नवी दिल्लीतल्या मुस्लीम लीगच्या लोकांचा विश्वास संपादन केला. त्यामुळेच दि. १० सप्टेंबर १९४७ रोजी मंत्रिमंडळाचे सर्व सदस्य, सगळे हिंदू अधिकारी आणि हजारो हिंदू नागरिकांना ठार मारून लाल किल्ल्यावर पाकिस्तानी ध्वज फडकवण्याचा आणि मग सगळा हिंदुस्थान काबीज करण्याचा लीगी नेत्यांचा कट त्यांना समजला आणि त्याबद्दलची माहिती त्यांनी अगदी योग्य वेळी सरदार पटेलांना आणि पंडित नेहरूंना दिली.

"दि. ७ सप्टेंबर रोजी जेव्हा ही महत्त्वाची माहिती सरदार पटेलांना आणि नेहरूंना दिली गेली तेव्हा दिल्लीत म्हणावे तितके निष्ठावान सैनिक नव्हते. त्यामुळे त्यांनी घाईघाईत त्यावेळचे सेनाप्रमुख एफ. एम. ऑचिनलेक यांच्याशी सल्लामसलत केली. इतर ठिकाणी तारेने संदेश पाठवले. उपलब्ध होऊ शकतील तेवढ्या सर्व सैनिकांना दिल्लीत बोलावून घेतले. काही हजार सैनिक एकत्र झाल्यावर दिल्लीतल्या लीगी लोकांच्या लपून बसण्याच्या सगळ्या जागा शोधून काढण्यात आल्या. त्यातली एक जागा तर व्हाइसरॉयच्या पॅलेसजवळच होती. त्या जागेतील एका मोठ्या मशिदीच्या फरशीखाली दारूगोळ्याच्या आणि अन्नधान्याच्या मोठमोठ्या पेट्या, एवढेच नव्हे तर बरेच लीगी सैनिकही लपवून ठेवण्यात आले होते."

ही माहिती देऊन डॉ. भगवानदासांनी पुढे म्हटले होते, "मी हे

सारे आता का सांगितले ? आज तर प्रश्न आहे रा. स्व. संघाबद्दल कोणते धोरण स्वीकारावे, हा ! असे असतानाही मी हे मुद्दाम सांगतो आहे ते एवढ्याचसाठी की जर या उदात्त ध्येयवादी आणि त्यागी तरुणांनी नेहरूंना आणि पटेलांना ती माहिती योग्य वेळी पुरवली नसती तर आज स्वतंत्र भारताचे सरकारच अस्तित्वात राहिले नसते, संपूर्ण देशाचे नाव बदलून 'पाकिस्तान' ठेवले गेले असते, लाखो हिंदूंची कत्तल केली गेली असती, उरलेल्या सर्वांना इस्लामची दीक्षा दिली गेली असती किंवा कायमच्या गुलामगिरीत डांबण्यात आले असते, अतिसनातनी आणि दुराग्रही पंडित एक मरण तरी पावले असते किंवा विनातक्रार गोमांसभक्षण करीत बसले असते, ही वस्तुस्थिती सर्वांच्या लक्षात यावी !"

जेव्हा स्वातंत्र्य मिळाले तेव्हा काँग्रेस सत्तेवर आली खरी पण जास्त लोकप्रियता मिळाली होती ती रा. स्व. संघाला. संघाची ही लोकप्रियता अनेक काँग्रेसजनांना सहन होत नव्हती. मग त्यांनी संघावर जातीयवादाचे, फॅसिझमचे आणि इतरही असेच आरोप करायला सुरुवात केली.

या संदर्भातली एक गमतीशीर गोष्ट म्हणजे श्री. अहमद इ. एच्. जाफर यांनी मध्यवर्ती विधिमंडळात त्याच सुमारास विचारलेला एक प्रश्न. दि. ११ फेब्रुवारी १९४७ रोजी विचारला गेलेला १७८ व्या क्रमांकाचा तो तारांकित प्रश्न असा होता—

अ) राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमांची व हालचालींची चौकशी करण्यासाठी एखादी समिती नेमण्याचा सरकारचा विचार आहे की नाही, हे सांगण्याची माननीय गृहमंत्री कृपा करतील काय ?

ब) राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अलीकडच्या हालचालींबाबत सरकारकडे एखादे शिष्टमंडळ आले होते काय ?

क) संघाच्या संपूर्ण भारतभर शाखा आहेत, ही वस्तुस्थिती आहे काय ?

माननीय गृहमंत्र्यांचे म्हणजे सरदार वल्लभभाई पटेलांचे या

प्रश्नाला उत्तर खालीलप्रमाणे होते :

अ) राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमांची व हालचालींची चौकशी करण्यासाठी एखादी समिती नेमण्याचा सरकारचा मुळीच विचार नाही.

ब) नाही.

क) संघाच्या अनेक प्रांतांत शाखा आहेत.

हे उत्तर देण्यापूर्वी गृहमंत्र्यांनी श्री. जाफर यांचा प्रश्न सर्व प्रांतीय सरकारांकडे पाठवला होता. सर्व प्रांतांकडून उत्तरे आली होती. पंजाब वगळता इतरांपैकी एकानेही– अगदी सिंध, बलुचिस्तान, वायव्य सरहद्द प्रांत आणि बंगालसारख्या मुसलमान बहुसंख्य असणाऱ्या प्रांतांनीही– राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम आक्षेपार्ह मानले नव्हते- वायव्य सरहद्द प्रांताचे मुख्य सचिव फार्ग यांनी लिहिले होते, "या सरहद्द प्रांतात हिंदू अगदीच अल्पसंख्य आहेत, हे लक्षात घेतल्यास संघाचे सर्व कार्यक्रम स्वसंरक्षणाची कला शिकवण्याच्या हेतूने आखण्यात आल्याचे स्पष्ट होते आणि स्वयंसेवक आपणहून आक्रमक पवित्रा घेतील अशी शक्यता वाटत नाही."

बिहार सरकारच्या राजकीय खात्याचे आय. सी. एस. अधिकारी श्री. टी. पी. सिंग यांनी दि. २३ जानेवारी १९४७ रोजी पाठवलेल्या निवेदनात म्हटले होते, "प्रांतात सर्वत्र संघाच्या अनेक शाखा आहेत, परंतु बिहारमध्ये अलीकडे झालेल्या जातीय हिंसाचाराला ही संघटना जबाबदार असल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही."

पंजाबच्या सरकारने मात्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि मुस्लीम नॅशनल गार्डस् या दोन्ही संघटनांवर निर्बंध घालण्याची सूचना केली होती. त्या सूचनेची पार्श्वभूमी लक्षात घेण्यासारखी आहे. १९४५ मधील निवडणुकांनंतर पंजाबमध्ये खिझार हयातखान यांच्या नेतृत्वाखालील युनियनिस्ट पार्टी सत्तारूढ झाली होती. मुस्लीम लीग विरोधात होती. नवे सरकार पाडण्यासाठी लीगने बीभत्स प्रचारमोहीम सुरू केली. लाहोरच्या रस्त्या-रस्त्यांवर 'खिझार कंजर है है' अशा घोषणा अनेकदा ऐकू येत. एकदा लेडी शफी यांच्या नेतृत्वाखाली काही मुसलमान

स्त्रिया खिझार हयातखान यांच्या दिवाणखान्यात गेल्या. आत जाण्यापूर्वी त्यांनी मुलाखत घेण्याची इच्छा व्यक्त केली होती, पण एकदा आत गेल्यावर मात्र त्यांनी कुटुंबप्रमुख मेल्यासारखा शोक– सियाप– सुरू केला.

हे पंजाबच्या मुख्यमंत्र्यांच्या सहनशक्तीबाहेरचे होते. त्यांनी रा. स्व. संघाचे पंजाब प्रांताचे सचिव श्री. धर्मवीर यांना मध्यस्थांमार्फत असे सुचवले की, लाहोरमधील बीदान रोड या हिंदू भागातून मुस्लीम लीगचे संचलन होईल तेव्हा संघाच्या स्वयंसेवकांनी दगडफेक करावी. लीगचे लोक चिडून जाऊन हिंदूंवर प्रतिहल्ला चढवतील असा त्यांचा अंदाज होता आणि लीगच्या विरुद्ध बडगा उभारून ती नेस्तनाबूत करण्यासाठी सरकारला तेवढे निमित्त पुरेल, असे त्यांचे सांगणे होते. पंजाबमधील संघाच्या नेत्यांनी त्या योजनेवर बराच साधकबाधक विचार केला. खिझार हयातखानांबद्दल जरी त्यांना सहानुभूती वाटत होती तरीदेखील मुसलमानांशी तसे भांडण उकरून काढण्याचा आणि राजकारण खेळण्याचा तो मार्ग न अनुसरण्याचा त्यांनी निर्णय घेतला. संघ असा संयमी होता– अगदी पंजाबमध्येदेखील, अगदी फाळणीच्या वर्षातदेखील !

नंतर प्रांतीय सरकारने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि मुस्लीम नॅशनल गार्डस् या दोन्ही संघटनांवर बंदी घातली. आपण निःपक्षपाती आहोत असे दाखवण्यासाठी सध्याचे भारत सरकार रा. स्व. संघ आणि जमात-ए-इस्लामी या दोन्ही संघटनांवर बंदी घालते, पण त्याचा खरा हेतू रा. स्व. संघावर प्रहार करण्याचा असतो. त्याचप्रमाणे त्यावेळी पंजाब सरकारला ‘ निःपक्षपाती ’ दिसण्यासाठी रा. स्व. संघावर जरी बंदी घालावी लागली तरी मुस्लीम नॅशनल गार्डस् ही संघटना नेस्तनाबूत करण्याचाच त्याचा खरा हेतू होता. फाळणीच्या वेळी झालेल्या दंगलींबद्दलच्या, अधिकृतपणे नियंत्रित करण्यात आलेल्या (सेन्सॉर्ड) अहवालात– ‘ स्टर्न रेकनिंग ’ या शीर्षकाने हा अहवाल प्रसिद्ध झाला आहे– न्यायमूर्ती जी. डी. खोसला यांनी लिहिले होते : “ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने तो आदेश मान्य केला आणि आपल्या कार्यालयाची झडती

घेऊन त्याला कुलूप ठोकण्याची अधिकाऱ्यांना परवानगी दिली. पण मुस्लीम नॅशनल गार्ड्स् या संघटनेने मात्र विरोधाची भूमिका घेतली. त्यांच्या लाहोरमधील मुख्य कार्यालयाजवळ पोलीस आल्यानंतर त्यांनी प्रत्यक्ष विरोध दर्शविलादेखील. मुस्लीम लीगच्या कार्यकारिणीचे सदस्य मियाँ इफ्तिकारउद्दीन, सर फेरोझखान नून, मियाँ मुमताझ दौलताना, सरदार शौकत हयातखान आणि मामदोतचे खान इफ्तिकार हुसेन खान घाईघाईने त्या स्थळी आले आणि त्यांनी झडती घेऊ द्यायला नकार दिला. त्यांना तावडतोब अटक करण्यात आली आणि दारे फोडून कार्यालयात घुसण्यात आले. सुमारे १००० पोलादी शिरस्त्राणे, गणवेष आणि प्रचंड प्रक्षोभक साहित्य पोलिसांनी मिळवले. लीगी नेत्यांच्या निवासस्थानी भरपूर दारूगोळा आणि सुरे, चाकू लपवण्यात आल्याचे त्यावेळी बोलले जात होते. लाहोरचे महापौर श्री. मियान अमीरउद्दिन यांचे नाव या संदर्भात मुद्दाम घेतले जात होते. हा संशय अनाठायी नव्हता, हे नंतरच्या घटनांवरून स्पष्ट झाले. कारण दंगलींच्या काळात अनेक वेळा मियान अमीरउद्दिन यांच्या घरातून दारूगोळा वापरला गेल्याचे दिसले."

आणि तरीदेखील काँग्रेसमधील मित्र रा. स्व. संघावर टीका करीतच राहिले. त्याचवेळी मुस्लीम लीग, मुस्लीम नॅशनल गार्ड्स् आणि खाकसार यांच्याबद्दल मात्र ते मूग गिळून गप्प बसले होते. संघाच्या सामर्थ्याबद्दल आणि लोकप्रियतेबद्दल दुस्वास वाटू लागल्यामुळे रा. स्व. संघाविरुद्ध कारवाई करावी, असे त्यांना वाटू लागले. ही संघद्वेषाची भावना उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांचे संसदीय सचिव श्री. गोविंद सहाय यांनी १९४७ साली प्रसिद्ध केलेल्या, आणि गंमत म्हणजे राज्य सरकारच्या मुद्रणालयातच छापल्या गेलेल्या, पुस्तिकेत स्पष्टपणे प्रतिबिंबित झालेली दिसत होती. त्या पुस्तिकेत श्री. सहाय यांनी रडगाणे गायले होते ते असे की, " उत्तर प्रदेशातल्या पश्चिमेकडच्या जिल्ह्यांत आणि विशेषतः बिजनोर या माझ्या स्वतःच्या जिल्ह्यात, हिंदूंनी गेल्या तीस वर्षांमध्ये काँग्रेसला दिलेल्या देणग्यांपेक्षा जास्त देणग्या १९४४ पासून अवघ्या तीन वर्षात रा. स्व. संघाला दिल्या आहेत. अगदी छोट्या

छोट्या गावांनीदेखील संघाच्या निधीला चार ते पाच हजार रुपयांपर्यंत देणग्या दिल्या आहेत."

पण सरदार वल्लभभाई पटेलांना मात्र असे वाटे की, काँग्रेसजनांनी विवेकी भूमिका स्वीकारावी. दि. ६ जानेवारी १९४८ रोजी लखनौमध्ये बोलताना ते म्हणाले होते की, "काँग्रेसमध्ये सत्तारूढ झालेल्या लोकांना असे वाटते आहे की हातात असणाऱ्या अधिकारांचा वापर करून ते रा. स्व. संघ नामशेष करून टाकू शकतील. 'दंडा' वापरून एखादी संघटना नेस्तनाबूत करता येणे शक्य नाही. चोर, लुटारूंविरुद्ध, दरोडेखोरांविरुद्ध दंडा वापरायचा असतो. आणि काही झाले तरी रा. स्व. संघाचे लोक हे काही चोर, लुटारू, दरोडेखोर नाहीत. ते आपल्या देशावर निरतिशय प्रेम करणारे देशभक्त आहेत."

संघातील गुण पाहू शकणारे सरदार वल्लभभाई पटेल हे एकमेव नेते नव्हते. दिल्ली प्रांत प्रचारक श्री. वसंतराव ओक यांच्या त्या अनिश्चित, विकट काळात गांधीजींबरोबर अनेक बैठका झाल्या होत्या. बिर्लाजींनी भंगी कॉलनीत काही खोल्या रा. स्व. संघाला दिल्या होत्या. कॅबिनेट मिशनबरोबर वाटाघाटी चालू असताना जेव्हा गांधीजींनी भंगी कॉलनीत राहाण्याची इच्छा प्रदर्शित केली तेव्हा त्यांच्यासाठी संघाने तत्परतेने दोन खोल्या मोकळ्या करून दिल्या. एका रात्री बऱ्याच मुसलमान गुंडांनी त्या जागेला घेराव घातला आणि गांधीजींना अवाच्य शब्दांत दूषणे द्यायला सुरुवात केली. दुसऱ्या दिवशी काँग्रेसच्या श्री. कृष्णन नायर यांनी संघकार्यकर्त्यांना सांगितले की, "हे प्रकरण गंभीर आहे आणि राष्ट्रीय नेत्यांचे जीवित सुरक्षित राखण्यासाठी आपण संघटित होणे आवश्यक आहे." त्यानंतर गांधीजींच्या खोल्यांभोवती अहोरात्र स्वयंसेवकांचा पहारा राहू लागला. ते गटागटाने बदलले जाऊ लागले.

त्यानंतर श्री. जी. डी. बिर्ला यांनी श्री. वसंतराव ओक यांना महात्माजींच्या भेटीसाठी मुद्दाम नेले. घनश्यामदासजींनी वसंतरावांची ओळख करून दिली आणि मग रा. स्व. संघाच्या कार्याची तोंड भरून प्रशंसादेखील केली. ते म्हणाले, "पिलानीच्या आमच्या शिक्षणसंस्थेत

शारीरिक कवायती शिकवण्यासाठी आम्ही तज्ज्ञ प्रशिक्षक नेमले असले तरी विद्यार्थ्यांच्या कवायती फारशा समाधानकारक होत नाहीत. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे तेच विद्यार्थी जेव्हा रा. स्व. संघाच्या शाखेवर जातात तेव्हा त्यांच्यात अशी काही शिस्त दिसते की बोलायची सोय नाही !" कवायतींचा वर्ग आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शाखा यात मुख्य फरक आहे तो राष्ट्रीय ध्येयवादाचाच, असे मग वसंतरावांनी त्या फरकाचे स्पष्टीकरण दिले.

अशाच दुसऱ्या एका प्रसंगी वसंतराव गांधीजींना भेटायला गेले असताना मौलाना आझाद तेथे शेजारीच बसले होते. गांधीजींच्या प्रार्थनासभेत गोंधळ माजवण्याचे प्रकार तेव्हा चालूच होते. त्याबद्दल वाटणारी चिंता व्यक्त करून घनश्यामदासजी वसंतरावांना म्हणाले, "आझादांसारखी माणसे इथे आलेली एखाद्याला आवडत नसली तरीही बापूजींसाठी ते सहन करावेच लागते, त्याचप्रमाणे गांधीजींच्या प्रार्थनासभेत कुराणाचे पठण झालेले कुणाला आवडत नसले तरी त्याने त्या सभेत गोंधळ माजवता कामा नये." त्यांच्या या मताशी आपण पूर्णपणे सहमत असल्याचे वसंतरावांनी सांगितले. याच प्रसंगी गांधीजी वसंतरावांना म्हणाले, "तुमचा रा. स्व. संघ मुसलमानांविरुद्ध हिंसक कारवाया करीत असल्याबद्दल किडवाईंनी माझ्याकडे तक्रार केली आहे आणि तुम्ही जमिनीखाली पुरून ठेवलेली काही शस्त्रास्त्रेदेखील त्यांनी मला दाखवली आहेत." ही गोष्ट खोटी असल्याचे वसंतरावांनी सांगितले. 'किडवाई माझ्याशी खोटे बोलू शकणार नाहीत,' असे गांधीजी म्हणाल्यावर वसंतरावांनी त्यांना सांगितले, "किडवाई आपल्याशी खोटे बोलत नसून रा. स्व. संघाविरुद्ध खोटारडेपणा करीत आहेत." पुढे हा तथाकथित शस्त्रास्त्र-साठा-जप्तीचा हा खटला उत्तर प्रदेशातल्या मुझफ्फरनगरचा कांढला शस्त्रास्त्र-साठा खटला म्हणून खूप गाजला. जिल्हा व सत्र न्यायाधीशांनी सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली आणि असा अभिप्राय व्यक्त केला की काही निरपराध लोकांना मुद्दाम या प्रकरणात गोवण्यासाठी आधी शस्त्रास्त्रे तेथे पुरण्यात आली होती आणि मग ती पोलिसांनी उकरून काढली. या प्रकरणाची चौकशी

करणारा पोलीस अधिकारी मध्यंतरीच्या काळात पाकिस्तानला पळून गेला होता !

गुरुजींना भेटण्याची इच्छा गांधीजींनी व्यक्त केली होती. म्हणून जेव्हा गुरुजी दिल्लीला आले तेव्हा ते बिर्ला हाऊसमध्ये बापूंना भेटण्यासाठी गेले. शांततेचे आवाहन प्रसृत करण्याची गांधीजींनी गुरुजींना विनंती केली. 'आपले आवाहन पुरेसे आहे, पण मी आवाहन करावे असे आपल्याला वाटत असेल तर तसे करायला मी केव्हाही तयार आहे.' गुरुजी म्हणाले. त्यानंतर तसे आवाहन प्रसृत करण्यात आले. ते दुसऱ्या दिवशी सर्व वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाले, तशीच आकाशवाणीवरूनही त्याला प्रसिद्धी देण्यात आली.

रा. स्व. संघाच्या कार्यकर्त्यांसमोर भाषण करण्याची इच्छाही गांधीजींनी व्यक्त केली होती. 'आपण आपल्या सोयीनुसार केव्हाही आणि कोणत्याही ठिकाणी आमच्या कार्यकर्त्यांसमोर भाषण द्यायला हवे,' असे गुरुजींनी त्यांना आमंत्रणही दिले होते. त्याप्रमाणे मंगळवार दि. १४ सप्टेंबर १९४७ रोजी भंगी कॉलनीतल्या मोकळ्या जागेवर सुमारे ५०० संघकार्यकर्त्यांशी वार्तालाप करण्यासाठी गांधीजी गेले. वसंतरावांनी त्यांचे स्वागत केले आणि म्हटले, "आम्ही रा. स्व. संघातले स्वयंसेवक भारतमाता हा एकच देव मानतो." गांधीजींनी रा. स्व. संघाच्या शिस्तीची आणि ध्येयवादाची प्रशंसा केली. 'उदात्त ध्येयाने प्रेरित झालेली आणि सार्वजनिक सेवेत गुंतलेली अशी संघटना दिवसेंदिवस अधिकाधिक बलवान होत जाईल,' असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. आपण 'एक सनातनी हिंदू' असल्याचे त्यांनी सांगितले आणि बैठकीच्या प्रारंभी म्हटल्या गेलेल्या राष्ट्रभक्तिपर गीताचीही प्रशंसा केली.

'श्रोत्यांनी शंका किंवा प्रश्न विचारावेत' असे गांधीजींनी सांगितल्यावर एका स्वयंसेवकाने त्यांना विचारले की, 'सशस्त्र गुंडांबाबत काय केले जावे ?' गांधीजी उत्तरले, "अशा लोकांना शिक्षाच व्हायला हवी. पण ती शिक्षा फक्त सरकार किंवा परमेश्वरच करू शकतो. तुम्ही किंवा मी कायदा हातात घेऊन त्यांना शिक्षा करणे

योग्य ठरणार नाही." पाकिस्तान अन्याय करीत राहिल्यास भारत-पाकिस्तान युद्ध होणे अटळ असल्याचेही त्यांनी सांगितले. भारत सरकारने ५५ कोटी रुपये पाकिस्तानला देऊन टाकावेत, म्हणून गांधीजींनी जेव्हा उपोषण सुरू केले तेव्हा रा. स्व. संघातर्फे लाला हंसराज गुप्ता यांनी त्यांना उपोषण सोडण्याची विनंती केली.

तथापि अनेक काँग्रेसवाल्यांना गंभीरपणे असे वाटत होते की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा आपला संभाव्य राजकीय प्रतिस्पर्धी आहे आणि म्हणूनच ते कोणत्याही पद्धतीने संघाचा काटा काढायला टपलेले होते. जी संघटना सत्ता हस्तगत करू शकण्याइतकी समर्थ आहे ती तशी सत्ता हस्तगत करणार नाही, याची त्यांना कल्पनादेखील नव्हती. बहुधा त्यांना हे माहीत नव्हते की– जरी सरकारला हे माहीत झाले असले तरी– प्रथम दिल्ली विभागाचे सेनाप्रमुख जनरल राजेंद्रसिंग आणि नंतर जनरल थिमय्या हे दोघे सेनाधिकारी स्वातंत्र्याच्या आणि विभाजनाच्या त्या अत्यंत अनिश्चित वातावरणात २०, बाराखंबा रोडवरील निवासस्थानी श्री गुरुजींना येऊन भेटले होते. परिस्थिती स्थिरस्थावर व्हावी, यासाठी त्यांनी संघाचे सहकार्य मागितले होते. श्री गुरुजींचा निरोप घेऊन जाताना जनरल थिमय्या म्हणाले होते, "आपण फार लौकर किंवा फार उशिरा हल्ला करता कामा नये. आपला हल्ला अगदी योग्य वेळीच व्हायला हवा. आणि काहीतरी कृती करण्याची वेळ येईल, अशी शक्यता आहे." या दोन्ही भेटींच्या वेळी त्यांच्या-व्यतिरिक्त फक्त श्री. वसंतराव ओक तेवढेच उपस्थित होते.

श्री गुरुजींनी त्या दोघांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले, पण त्यांना कोणताही प्रतिसाद दिला नाही. श्री गुरुजींच्या लेखी राजकारण्यांची आणि राजकीय सत्तेची तोंडात हाडूक धरून फिरणाऱ्या कुत्र्याइतकीच किंमत होती. त्यांनी काँग्रेसजनांना हे आश्वासन दिले की जरी आपापसात लढताना आपण जरी शंभर विरुद्ध पाच असलो तरी देशाला कुठलाही धोका उत्पन्न झाल्यास आपण एकशेपाच होऊन लढू. ( वयं पंचाधिकं शतम् । )

आणि तरीही काँग्रेसवाले संघाकडे द्वेषाच्या आणि संशयाच्या

नजरेनेच पाहात राहिले. संघावर बंदी घालायला ते खूप उत्सुक होते. फक्त तशी बंदी घातली तर ती यशस्वीपणे अमलात आणता येईल की नाही, याबाबत ते साशंक असल्यामुळेच काही काळ थांबले. पुढे दि. ४ फेब्रुवारी १९४८ रोजी संघावर बंदी घालणारा जो आदेश सरकारने जारी केला त्यात विविध प्रांतांच्या मुख्यमंत्र्यांनी व केंद्रीय गृहमंत्र्यांनी नोव्हेंबर १९४७ मध्ये नवी दिल्ली येथे झालेल्या बैठकीत या प्रश्नाचा विचार केल्याबद्दल स्पष्ट उल्लेख होता. त्या निवेदनात अशी कबुली-देखील देण्यात आली होती की, ' एक संघटना म्हणून संघाचा विचार करावा, अशी वेळ अजून आली नसल्याचे त्या बैठकीत एकमताने मान्य करण्यात आले होते. ' दुसऱ्या भाषेत सांगायचे झाले तर काँग्रेस सरकार संघाला जखमी करायला उत्सुक होते, पण वार करायला मात्र घाबरत होते.

या परिस्थितीत महात्माजींचा झालेला खून म्हणजे काँग्रेसमधील नेहरूंच्या गटाला सुवर्णसंधीच वाटली. दि. ३० जानेवारी रोजी त्या अमानुष गुन्ह्याची बातमी जेव्हा प्रसृत झाली तेव्हा श्रीगुरुजी मद्रासमध्ये होते. त्यांनी आपले सर्व कार्यक्रम रद्द केले आणि ते दुसऱ्या दिवशी सकाळच्या विमानाने नागपूरला परतले. वृत्तपत्रांना दिलेल्या प्रसिद्धी-पत्रकात त्यांनी खुनाचा निषेध केला आणि गुन्हेगारांना जबर शिक्षा देण्याची मागणी केली. (जेव्हा हे निवेदन ' हिंदुस्थान टाइम्स 'मध्ये प्रसिद्ध झाले तेव्हा ते छपाईसाठी सोडणाऱ्या उपसंपादकाला स्पष्टीकरण विचारण्यात आले. गुरुजींनी त्या गुन्ह्याचा निषेध केला असल्याचे देशाला समजू नये, अशी त्यांची इच्छा होती ! ) नेहरू आणि पटेल या दोघांना पाठवलेल्या तशाच आशयाच्या पत्रांमध्ये श्रीगुरुजींनी त्या गुन्ह्याचा पुन्हा एकदा धिक्कार केला होता आणि ' वादळी स्थितीतून राज्याचे तारू योग्य दिशेने नेण्यात आपण यशस्वी व्हावे ' अशी सदिच्छादेखील व्यक्त केली होती.

परंतु पं. नेहरूंना आणि त्यांच्या मित्रांना या कशाचीच पर्वा नव्हती. गांधीजींचा मृत्यू हे त्यांना संघावर हल्ला चढवण्यासाठी मिळालेले आयते निमित्त होते आणि म्हणूनच त्यांनी ताबडतोब रा. स्व. संघावर

बंदी घातली, त्या संघटनेच्या सुमारे १७००० हून अधिक कार्यकर्त्यांना आणि श्री गुरुजी, श्री. बाळासाहेब देवरस प्रभृती प्रमुख नेत्यांनादेखील खून करण्याच्या कटात सहभागी असल्याच्या आरोपावरून स्थानबद्ध केले. महाराष्ट्रातल्या काँग्रेसजनांनी तर सरसकट ब्राह्मणांची घरेदारे जाळण्याचे, खून करण्याचे सत्र आरंभले. त्यातही त्यांचा रोख विशेषत्वाने संघ कार्यकर्त्यांविरुद्ध अधिक होता.

रक्तपाती संघर्षाची व्याप्ती वाढत जाऊ नये या हेतूने मग श्री गुरुजींनी संघ तात्पुरता विसर्जित केला. मग न्यायालयांनी हेबियस कॉर्पस् अर्ज दाखल करणाऱ्या सर्व संघकार्यकर्त्यांची तुरुंगातून सुटका केली. त्रिची जिल्ह्याचे प्रचारक श्री. एस. एस. आपटे हे तसे सुटणारे पहिले कार्यकर्ते.

हिंदुमहासभेच्या मूठभर अतिरेकी लोकांचाच गांधीजींच्या खुनाशी संबंध असल्याचे स्पष्ट झाल्यानंतरही संघाला त्या प्रकरणात गोवण्याचा पंडित नेहरूंनी खूप प्रयत्न केला. दि. २६ फेब्रुवारी १९४८ रोजी सरदार पटेलांना पाठवलेल्या पत्रात त्यांनी म्हटले होते, "गोडसेने केलेल्या बापूंच्या खुनाबाबतची चौकशी इथे दिल्लीत, मुंबईत आणि अन्यत्र चालू असली तरी मोठ्या कटाचे धागेदोरे शोधून काढण्याचा खरा प्रयत्न अजूनही होत नाही, असे दिसते. दिवसेंदिवस मी अशा निष्कर्षाप्रत येत चाललो आहे की, बापूंचा खून ही एखादी तुरळक घडलेली घटना नसून प्रामुख्याने रा. स्व. संघाने योजलेल्या फार मोठ्या व्यापक मोहिमेचा निव्वळ एक भाग आहे. रा. स्व. संघाच्या अनेक कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली आहे. बहुधा त्यांच्यापैकी बहुतेकजण अनभिज्ञ असतील. पण त्या संघटनेतील अनेक महत्त्वाची माणसे अजूनही परदेशात आहेत किंवा भूमिगत आहेत किंवा समाजात उजळ माथ्याने वावरताना दिसत आहेत. या लोकांपैकी बरेच लोक आपल्या कार्यालयात आणि पोलीस यंत्रणेतही आहेत. या गटाच्या लोकांपासून काही लपवून ठेवणे अगदी अशक्य होऊन बसले आहे. एखाद्या ठिकाणची गुप्त झडती घेता येणे त्याबद्दलची सूचना संबंधितांना अगोदरच मिळत असल्यामुळे अशक्य

होत चालल्याचे एका जबाबदार पोलीस अधिकाऱ्याने मला नुकतेच सांगितले आहे. दिल्ली पोलिसांमध्ये रा. स्व. संघाच्या हितचिंतकांचा बराच मोठा भरणा असावा, असे दिसते. त्या सगळ्यांविरुद्धच कारवाई करणे सोपे नाही. पण आतापर्यंत जे झाले आहे त्यापेक्षा अधिक काहीतरी केले गेले पाहिजे असे मला वाटते. माझी अशी खात्री आहे की, संघाची यंत्रणा अजूनही वेगवेगळ्या मार्गांनी चांगली कार्यरत आहे आणि तिला शक्य होताच ती प्रतिहल्ला चढवायला मागेपुढे पाहणार नाही."

दि. २७ फेब्रुवारी १९४८ रोजी सरदार पटेलांनी पंडित नेहरूंना उत्तर पाठवले. त्यात त्यांनी लिहिले होते, "बापूंच्या खुनाच्या प्रकरणाची जी चौकशी सध्या चालू आहे तिच्या दैनंदिन प्रगतीमध्ये मी स्वत: जातीने लक्ष घालीत आहे. माझी बरीचशी संध्याकाळ मी संघजीवींबरोबर चर्चा करण्यात, दिवसभरात काय प्रगती झाली त्याचा आढावा घेण्यात आणि जर काही मुद्दे उपस्थित झाले असतील तर त्याबद्दलच्या सूचना देण्यात खर्च करतो. सर्व प्रमुख आरोपींनी त्यांच्या हालचालींबद्दल प्रदीर्घ आणि तपशीलवार जबाब दिलेले आहेत. एक निवेदन तर नव्वद टंकलिखित पानांचे झाले आहे. त्यांच्या निवेदनांवरून हे स्पष्ट होते की, कटातला कोणताही भाग दिल्लीत रचण्यात आला नाही. पुणे, मुंबई, अहमदनगर आणि ग्वाल्हेर ही त्यांच्या हालचालींची मुख्य केंद्रे होती. दिल्ली हा अर्थातच त्यांच्या हालचालींचा अखेरचा बिंदू होता, पण त्यांचे ते केंद्र कधीच नव्हते. एकाच वेळी एक-दोन दिवसांपेक्षा जास्त काळ आरोपी दिल्लीला राहिलेदेखील नाहीत, शिवाय दि. १९ जानेवारी ते ३० जानेवारी या काळात ते फक्त दोनदाच दिल्लीला आले होते. त्यांच्या निवेदनांवरून कुठेही, कोणत्याही प्रकारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या प्रकरणात गुंतलेला नसल्याचेच स्पष्ट होते."

सहा महिन्यांच्या स्थानबद्धतेनंतर श्री गुरुजींची जेव्हा सुटका झाली तेव्हा संघावरची बंदी उठवण्याची नेहरू-पटेलांना विनंती करण्यासाठी ते दिल्लीला आले. 'रा. स्व. संघ अराष्ट्रीय आणि सामाजिक हिताला बाधक ठरतील अशा कामात गुंतला असल्याचा भरपूर पुरावा

आपल्यापाशी आहे', असा सरकारने दावा केला. त्या संदर्भात श्री गुरुजींनी दि. ३ नोव्हेंबर १९४८ रोजी पंडित नेहरूंना पत्र पाठवन असे कळवले की, "सरकारने रा. स्व. संघाविरुद्धचा पुरावा सादर करावा, अन्यथा संघावरचे सर्व आरोप मागे तरी घ्यावेत. उत्तरप्रदेश सरकारचे तथाकथित आरोपपत्र ज्या एकुलत्या एक मुझफ्फरनगर जिल्ह्यातल्या प्रकरणावर प्रामुख्याने आधारलेले आहे त्या प्रकरणाचा गेल्याच आठवड्यात निकाल लागला आहे. त्या विद्वतापूर्ण आणि समतोल अशा निकालपत्रावरून सहज दृष्टी फिरवली तरी रा. स्व. संघाच्या काही सदस्यांविरुद्ध सरकारजवळ असणाऱ्या भरभक्कम पुराव्याचा खोटारडेपणा स्पष्ट होऊ शकतो."

श्री. गुरुजींच्या या पत्राला उत्तर म्हणून दि. १० नोव्हेंबर १९४८ रोजी पाठवलेल्या पत्रात नेहरूंनी एक नवा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी लिहिले, "असे दिसते की तुमच्या संघटनेच्या घोषित उद्दिष्टांचा खऱ्या उद्दिष्टांशी फारच कमी संबंध आहे. संघाशी संबंधित असणाऱ्या लोकांनी वेगवेगळ्या मार्गांनी, निरनिराळ्या स्वरूपात जे उद्योग चालवले आहेत त्यांच्याशीदेखील घोषित उद्दिष्टांचा दूरान्वयानेच संबंध पोचतो. आणि तुमच्या संघटनेची ही खरी उद्दिष्टे भारतीय संसदेने घेतलेल्या निर्णयांशी आणि भारताच्या प्रस्तावित राज्यघटनेशी पूर्णतया विसंगत, विरोधी अशीच आहेत."

दि. १२ नोव्हेंबर १९४८ रोजी पाठवलेल्या पत्रात श्री. गुरुजींनी त्या मुद्द्याला सणसणीत प्रत्युत्तर दिले. "राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या उद्दिष्टांमध्ये माझ्या माहितीनुसार असे काहीही नाही की ज्याला भारतीय संसद हरकत घेऊ शकेल, किंवा जे आजवर प्रसिद्ध झालेल्या भारतीय संसदेच्या निर्णयांशी विसंगत आहे. प्रस्तावित भारतीय राज्यघटनेच्या तरतुदींविरुद्ध उद्दिष्टांबाबत काय बोलावे ? हे असले काही जर आमच्या पंतप्रधानांनी लिहिले नसते तर बरे झाले असते. यानंतर एका वर्षाभरात जन्माला येणाऱ्या मुलाचा खून करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल आत्ता एखाद्या माणसाला शिक्षा करण्याइतका आपला आक्षेप विक्षिप्त आणि हास्यास्पद आहे."

अशाच आशयाचे पत्र श्री. गुरुजींनी सरदार पटेलांनाही पाठवले होते. त्या पत्राला उत्तर म्हणून सरदारांनी दि. ११ सप्टेंबर १९४८ रोजी पाठवलेल्या पत्रात लिहिले होते, "माझी अशी पूर्ण खात्री झाली आहे की रा. स्व. संघाचे लोक काँग्रेसपासून अलिप्त राहाण्याऐवजी किंवा तिला विरोध करण्याऐवजी तिच्यात सामील होऊनच आपले राष्ट्रीय कार्यक्रम पुढे चालू ठेवू शकतील."

"संघावरची बंदी उठवण्याच्या प्रश्नाबाबत पंतप्रधान सांगतात– गृहमंत्र्यांशी संपर्क साधा, गृहमंत्री सांगतात– पंतप्रधानांना भेटा. केंद्र सरकार प्रांतिक सरकारांकडे विचारणा करायला सांगते तर प्रांतिक सरकारे केंद्राकडे जा म्हणून सांगतात." याबद्दल गुरुजींनी नेहरू-पटेलांना पत्रे लिहून निषेध व्यक्त केला, पण सरकारने कसलाच प्रतिसाद दिला नाही. नेहरूंना आवडतील असे अहवाल पाठवायला उत्सुक असणाऱ्या सी. आय. डी. च्या लोकांनी रा. स्व. संघाच्या हालचालींबद्दल व हेतूंबद्दल सर्व प्रकारचे खोटे अहवाल पाठवायला सुरुवात केली. त्या अहवालांना पुष्टी जोडायला हितसंबंधी काँग्रेसवाले तयार होतेच. आणि त्या सर्वांवर वरकडी करीत होते– वृत्तपत्रीय लेख. काँग्रेसला आंधळा पाठिंबा देताना रा. स्व. संघावर आंधळी टीका करणारे लेख अनेक वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होत होते. अशा परिस्थितीत आपण काही करणे आवश्यक आहे, असे सरकारला वाटतच नव्हते.

दि. १३ नोव्हेंबर १९४८ रोजी श्री गुरुजींना दिल्लीत अटक करण्यात आली व नागपूरला हलवण्यात आले. यानंतर दि. ९ डिसेंबर १९४८ पासून देशव्यापी सत्याग्रह सुरू झाला. पुढील दोन महिन्यांत सुमारे ५०० लोक सत्याग्रह करतील, असा सरकारचा अंदाज होता. प्रत्यक्षात मात्र पहिल्या दोनच दिवसांत १५०० लोकांना अटक करण्याची त्यांच्यावर वेळ आली. त्यानंतरच्या दोन महिन्यांच्या कालावधीत सुमारे ६००,००० लोकांनी– १६ वर्षांच्या किशोरवयीन मुलापासून ७५ वर्षांच्या वृद्धांपर्यंत सर्व वयोगटातल्या लोकांनी– सत्याग्रह करून स्वतःला अटक करवून घेतली. ही संख्या त्यापूर्वीच्या कोणत्याही सत्याग्रहात– मग तो १९२१ चा असो, १९३०–३२ चा असो किंवा १९४२

चा असो– भाग घेतलेल्या सत्याग्रहयांपेक्षा जास्त होती. जरी त्यावेळी ऐन हिवाळा होता आणि एवढ्या मोठ्या संख्येतल्या कैद्यांची व्यवस्था करण्याइतके तुरुंग सज्ज नव्हते तरी स्वयंसेवकांनी तो थंडीचा त्रास संयमाने व शिस्तीने सहन केला. तेलंगणातल्या चळवळीमुळे त्याच वेळी तुरुंगात आलेले अनेक साम्यवादी कैदीदेखील अनेकदा संघस्वयंसेवकांकडे पाहून म्हणत, "ही माणसे म्हणजे अगदी हिरेमाणकेच आहेत !"

अत्यंत शांतपणे सत्याग्रह करणाऱ्या साठ हजार लोकांचे नैतिक दडपण इतके जबरदस्त होते की, एवढे मोठे बलाढ्य भारत सरकारही त्याच्यापुढे टिकाव धरू शकले नाही. म्हणून मग सरकारने इंडियन लिबरल फेडरेशनचे अध्यक्ष श्री. टी. आर. व्ही. शास्त्री या मध्यस्थांमार्फत असे सुचवले की राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपली घटना तयार करावी. या सूचनेला हरकत घेण्याचा प्रश्नच नव्हता. रा. स्व. संघासारखी एवढी मोठी संघटना घटनेशिवाय चालणे शक्यच नाही, हे उघडच होते. फक्त ती घटना अलिखित होती. म्हणूनच मौलीचंद्र शर्मा जेव्हा त्या घटनेचा मसुदा घेऊन श्री गुरुजींना भेटण्यासाठी सेवनी तुरुंगात गेले, तेव्हा तो मसुदा वाचण्यापूर्वीच श्री गुरुजींनी त्याच्यावर सही केली. तुरुंगाबाहेर असणाऱ्या आपल्या सहकार्यकर्त्यांबद्दल आपल्याला पूर्ण विश्वास वाटत असल्याचे त्यांनी सांगितले. सहज जाता जाता हे लक्षात घेतले पाहिजे की, इ. स. १८८५ ते १८८९ या काळात काँग्रेसला कोणत्याही प्रकारची घटना नव्हती. १९०८ साली प्रथम काँग्रेसच्या प्रांतिक समित्या स्थापन झाल्या. आणि खरीखुरी घटना तयार झाली ती काँग्रेसस्थापनेनंतर तब्बल ३६ वर्षांनी १९२१ साली !

आता सरकारने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने जमवलेल्या निधीला हरकत घेतली. श्री. टी. आर. व्ही. शास्त्री यांनी तो मुद्दा श्री गुरुजींच्या कानावर घातल्यानंतर गुरुजींनी उत्तर दिले, "आमचे जमाखर्च पाहा, असे आम्ही सांगत सुटणार नाही. आमचा जमाखर्च व्यवस्थित ठेवला जात असून संबंधितांपैकी म्हणजेच संघटनेच्या सदस्यांपैकी जर कुणाला ते पाहायचे असतील तर ते केव्हाही पाहाता येतात. आमच्या कौटुंबिक जमाखर्चाची चौकशी करण्याचा उपऱ्या लोकांना कोणताच अधिकार

नाही. आणि तरीदेखील आमचे जमाखर्च पाहाण्याचा सरदार पटेलांचा आग्रह कायम असेल तर मग काँग्रेसनेही लोकांकडून जमा केलेल्या सर्व पैशाचा हिशोब प्रसिद्ध करावा, असे आपण त्यांनादेखील सांगा. टिळक स्वराज्य फंडाच्या हिशोबापासून त्यांना प्रारंभ करू द्या. तसे केल्यावरच त्यांच्या तोंडी आमचे हिशोब प्रसिद्ध करण्याबाबतची विनंती शोभून दिसेल !" त्यानंतर मग कुणी संघाच्या आर्थिक व्यवहारांचा प्रश्न उपस्थित केला नाही.

तथापि रा. स्व. संघाबरोबरची ही लढाई सुरू करायला यापेक्षीही अधिक महत्त्वाची कारणे होती अशी जनतेची समजूत करून देणे आणि आपले वर्तन समर्थनीय ठरवणे सरकारला आवश्यक वाटत होते. म्हणून मग भारतीय घटना आणि राष्ट्रीय ध्वज यांना संघाने मान्यता द्यायला हवी, असे म्हणायला सुरुवात केली. गृहखात्याचे सचिव श्री. एच. व्ही. आर. अय्यंगार यांनी दि. ३ मे १९४९ रोजी एक पत्र पाठवून सरसंघचालकांच्या नियुक्तीच्या पद्धतीला हरकत घेतली आणि शिवाय संघातील अनेक प्रमुख पदे एका विशिष्ट भागातल्या विशिष्ट जातीच्या लोकांकडेच (म्हणजेच महाराष्ट्रीय ब्राह्मणांकडे) सुपूर्त करण्यात आल्याचा आरोपही केला. त्या पत्रात असेही म्हटले होते की, रा. स्व. संघात घेतली जाणारी शपथ ही आयुष्यभरासाठी घ्यायची असल्यामुळे गुप्त मंडळींचा तो प्रकार असावा असे वाटते. मुलांना संघात जायची त्यांच्या पालकांनी परवानगी दिली असेल तरच त्यांना प्रवेश दिला जावा, अशी सूचनादेखील त्या पत्रात करण्यात आली होती.

या सर्व मुद्द्यांचा परामर्श घेणारे जे पत्र श्री गुरुजींनी पाठवले, त्यात रा. स्व. संघाने घटनेचा आणि ध्वजाचा कायम मान राखल्याचे जसे नमूद करण्यात आले होते तसेच काँग्रेसची घटना डोळ्यांसमोर नमुन्यादाखल ठेवूनच संघाची घटना तयार करण्यात आल्याचेही दाखवून देण्यात आले होते. त्या पत्रात श्री गुरुजींनी लिहिले होते, "संघाच्या घटनेच्या मसुद्यावरून नजर फिरवल्यास हे आपल्या लक्षात येईल की, ढोबळ मानाने तिने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या घटनेचाच कित्ता गिरवलेला आहे. अखिल भारतीय प्रतिनिधी सभा ही पूर्णपणे स्वयं-

सेवकांनी निवडून दिलेल्या लोकांची असून तिचे अखिल भारतीय काँग्रेस समित्यांशी बरेच साम्य आहे. प्रांतीय प्रतिनिधी सभांची जडण-घडणही त्याचप्रमाणे प्रांतीय काँग्रेस समित्यांच्या धर्तीवर करण्यात आली आहे. काँग्रेस अध्यक्षांप्रमाणेच सरकार्यवाह हा अखिल भारतीय स्तरावरील निवडून आलेल्या समितीकडून म्हणजेच अखिल भारतीय प्रतिनिधी सभेकडून निवडला जातो. पुन्हा काँग्रेस अध्यक्षांप्रमाणेच तोही त्याची कार्यकारिणी– संघाच्या दृष्टीने केंद्रीय कार्यकारी मंडळ– नेमतो. काँग्रेसच्या अखिल भारतीय कार्यकारिणीसारखेच हे मंडळ आहे. त्याच-प्रमाणे प्रांतीय कार्यकारी मंडळ प्रांतिक काँग्रेस कार्यकारिणीसारखेच आहे. अखिल भारतीय प्रतिनिधी सभा संघाची धोरणे आणि कार्यक्रम आखते व त्या धोरणाची अंमलबजावणी करण्याचे काम फक्त कार्यकारी मंडळ करते. याप्रमाणे ही घटना निवडणुकीच्या तत्त्वावरच पूर्णत्वाने आधारलेली आहे, हे आपल्यालाही समजू शकेल. रा. स्व. संघाच्या शपथेबद्दल सांगायचे झाले तर मी एवढेच म्हणेन की, हिंदू संस्कृतीच्या आधारावर संघाचे काम उभे आहे आणि हिंदू संस्कृतीत कोणतीही शपथ ही आयुष्यभरासाठी स्वीकारलेली जबाबदारी असते, तो काही विशिष्ट काळापुरता केलेला तापुरता करार नसतो."

श्री गुरुजींनी केलेल्या एवढ्या स्पष्टीकरणानंतरही जेव्हा सरकार काही ना काहीतरी सूचना करीत किंवा आक्षेप घेत वेळकाढूपणा करताना दिसू लागले तेव्हा श्री. टी. व्ही. आर. शास्त्रींनी दि. ११ जुलै १९४९ रोजी आपली मते स्पष्ट करणारे एक निवेदन प्रसिद्धीला दिले. इतर गोष्टींचा उहापोह करताना त्यांनी असेही म्हटले होते की, "संघटना प्रमुखाची म्हणजेच सरसंघचालकाची निवड मागच्या सरसंघचालकाने करण्याची पद्धत लोकशाहीविरोधी आणि फॅसिस्ट आहे, असा संघा-बद्दलचा एक महत्त्वाचा आक्षेप असल्याचे सांगितले जात होते. मला असे वाटते की ही निवड इतर ज्येष्ठ नेतेमंडळींबरोबर विचारविनिमय करूनच केली जावी, असे गृहीत धरण्यात आले आहे. या पद्धतीबाबत असा आक्षेप माझ्या मनात कधीही उद्भवला नाही, हे मला कबूल केलेच पाहिजे. तो आक्षेप घेणे म्हणजे संघटनेचे स्वरूप समजावून घेण्यात

चूक करण्यासारखेच आहे. एखादे सरकार किंवा राज्य फॅसिस्ट आहे असे म्हणता येऊ शकेल, परंतु ज्या संघटनेचे सभासदत्व कुणावरही लादण्यात येत नाही, अशा खाजगी संघटनेला फॅसिस्ट म्हणता येणार नाही." त्यांनी पुढे असेही म्हटले होते की, " अशा सेवाभावी, सांस्कृतिक संघटनांच्या बाबतीत सर्व सदस्यांनी मतदान करून एखाद्याला निवडून देणे आवश्यक नाही. आणि जर तशा निवडणुकीचाच प्रश्न असेल तर प्रमुखाच्या विरोधकाला जबरदस्त पराभव स्वीकारावा लागेल, हे उघड आहे. काही झाले तरी या प्रश्नाचे उत्तर संघटनेतील अनुयायांनी घ्यायचे आहे. ते उत्तर असेच असले पाहिजे हा बाहेरच्यांनी आग्रह धरण्याचे मुळीच कारण नाही." अल्पवयीन मुलांनी काँग्रेसच्या स्वयंसेवक-संघटनेत सहभागी व्हायला जर त्यांच्या आई वडिलांची परवानगी आवश्यक ठरत नाही तर मग सरकारने केवळ रा. स्व. संघातील प्रवेशाबाबत तशी अट घालण्याचा आग्रह धरणे योग्य ठरणार नाही, असेही श्री. शास्त्रींनी स्पष्टपणे त्या निवेदनात म्हटले होते.

आपल्या त्या निवेदनात रा. स्व. संघावरील जातीयवादाच्या आक्षेपाबद्दल त्यांनी असे मत व्यक्त केले होते की, " सध्या आपण पराकोटीच्या जातीय विद्वेषाच्या वातावरणात वावरत आहोत. मला सतत जाणवते की वऱ्याच भेदभावांनी विभागल्या गेलेल्या हिंदू समाजाला संघटित करण्याचा संघाचा हा प्रयत्न म्हणजे एक चांगले कार्य आहे. आपल्या डोळ्यांसमोर वाढत चाललेल्या ज्या सामाजिक दोषांकडे सरकारचे लक्ष जाणे आवश्यक आहे, त्या दोषांना आळा घालण्यातही ही संघटना उपयुक्त ठरू शकेल." त्या निवेदनाच्या अखेरीस श्री. शास्त्रींनी म्हटले होते की, " आमची बिगरराजकीय संघटना आहे, असे हे लोक सांगत असले तरी ते एका रात्रीत राजकीय संघटनेत रूपांतरित होऊ शकतील, असा एक शेरा माझ्या वाचण्यात आला आहे. ते राजकीय संघटना उभारू शकतात, हे तर खरेच आहे. पण उद्या समजा, जरी त्यांनी तसे केले तरी तो काही गुन्हा ठरणार नाही. आणि माझी खात्री आहे की तशी चूक न करण्याइतके शहाणपण या लोकांजवळ निश्चित आहे. ही संघटना राजकीय संघटनेत परिवर्तित करायचे ठरवल्यास

संघटनेत फाटाफूट होईल व तिची शकले उडतील, हे त्यांना ठाऊक आहे. आणि म्हणून तर कोणत्याही राजकीय गटात सहभागी व्हायला ते नकार देतात. गेल्या निवडणुकांमध्ये त्यांच्यापैकी बहुतेकांनी काँग्रेसला मते दिली, असे मला समजले आहे आणि या संघटनेने आपली ताकत आमच्या बाजूने पणाला लावली नाही अशी हिंदुमहासभेची तक्रार आहे. सरकारच्या संघाबद्दलच्या या कृतीचा येत्या निवडणुकांच्या वेळी संघ-जनांवर काय परिणाम होईल, हे मी सांगू शकत नाही."

हे पत्रक प्रसिद्ध झाले त्याच दिवशी म्हणजे दि. ११ जुलै १९४९ रोजी सरकारने संघावरची बंदी बिनशर्त मागे घेतली. एक खेदजनक प्रकरण अखेरीस चांगल्या वातावरणात समाप्त झाले. पण काँग्रेस-जनांच्या दुस्वासाव्यतिरिक्त नेहरू आणि पटेल यांच्यातील वितुष्टाचा-देखील संघ त्यावेळी बळी ठरला असावा, असे दिसते. गांधीजींचा खून होण्यापूर्वी सरदार पटेलांनी आपल्या लखनौच्या आणि जयपूरच्या भाषणांतून काँग्रेस आणि संघामधील अंतर कमी करण्याचा प्रयत्न केला होता. दि. ११ सप्टेंबर १९४९ रोजी त्यांनी श्री गुरुजींना लिहिलेल्या पत्रात म्हटले होते, " राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने हिंदू समाजाची फार मोठी सेवा केली आहे, यात शंकाच नाही. ज्या भागांत मदतीची आणि संघटनेची आवश्यकता होती, त्या भागात संघाच्या तरुण स्वयंसेवकांनी बायकामुलांचे रक्षण केले आहे, ते त्यासाठी खूप झटले आहेत."

या संदर्भात हे महत्त्वाचे आहे की काँग्रेसमधील नेहरू गटाने गांधीजींच्या खुनाचे निमित्त केवळ रा. स्व. संघ दडपण्यासाठीच वापरले नाही, तर सरदार पटेलांची हकालपट्टी व्हावी या हेतूनेही वापरले. गांधीजींच्या मृत्यूनंतर काही दिवसांनी रा. स्व. संघाचे नेते श्री. वसंतराव ओक जेव्हा पटेलांना भेटले, तेव्हा सरदारांनी स्पष्ट म्हटले होते की, " या अमानुष गुन्ह्याशी तुमचा काहीही संबंध नाही, हे मला ठाऊक आहे. पण जी माणसे आज तुमच्यावर आरोप करीत आहेत, तीच माझ्यावरही दोषारोप करीत आहेत !"

संघावरील बंदी उठवावी याबद्दलच्या वाटाघाटींत भाग घेण्या-साठी आणि मध्यस्थांना मदत करण्यासाठी श्री. एकनाथजी रानडे

यांना नागपूरहून दिल्लीला पाठवण्यात आले होते. त्यांनादेखील १९४९ साली सरदारांचे काही मजेशीर अनुभव आले. त्यांची सरदारांबरोबरची पहिली भेट मसुरीच्या बिर्ला हाऊसमध्ये झाली. त्या बैठकीला बिर्ला स्वत: हजर होते. पटेल जरा आक्रमक पवित्र्यात आहेत, असे प्रारंभी एकनाथजींना दिसले. सुरुवातीची तब्बल दहा मिनिटे सरदार संघावर टीकाच करीत होते. सगळ्या हिंसाचाराचे खापर संघाच्या माथी मारत होते.

तो हल्ला थांबल्यावर एकनाथजींनी त्यांना विचारले, "जे आरोप आत्ता आपण आमच्या संघटनेवर केलेत ते सारे खरे आहेत, असे आपल्याला खरोखरच वाटते काय ? महात्माजींच्या खुनाशी संघाचा संबंध होता, यावरही आपला विश्वास आहे काय ?" त्यावर सरदारांनी उत्तर दिले, " नाही. पण ज्या वातावरणात हा सगळा हिंसाचार झाला ते मानसिक वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी संघावर येऊन पडते, हे निश्चित."

एकनाथजी म्हणाले, " राष्ट्रीय स्वयंसेवक संघातले आम्ही लोक अखंड हिंदुस्थानवर श्रद्धा ठेवून होतो. साहजिकच आम्ही फाळणीला विरोध केला. हा विरोध करणे म्हणजेच जर हिंसाचाराला अनुकूल असे मानसिक वातावरण तयार करणे ठरणार असेल तर मात्र आपण म्हणता तो गुन्हा आम्ही केला आहे." त्यानंतर एकनाथजींनी १९४२ सालच्या 'छोडो भारत' चळवळीचा संदर्भ देऊन सांगितले की, " त्या चळवळीनंतरही देशभर खूप हिंसाचार घडला. माणसे जिवंत जाळली गेली. आपले निकष लावायचे तर त्या सर्व हिंसाचाराला काँग्रेसच जबाबदार धरली पाहिजे. कारण तिनेच ते विशिष्ट मानसिक वातावरण तयार केले होते." एकनाथजींनी आणखी एक उदाहरण घेतले. ते म्हणाले की, " महात्माजींच्या खुनानंतर श्री. गुरुजींसह हजारो संघ कार्यकर्त्यांना पकडण्यात आले होते आणि खुनाच्या कटात सहभागी असल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. त्याचा परिणाम म्हणून अनेक ठिकाणी, विशेषत: महाराष्ट्रात, हिंसाचार, जाळपोळ, लूटमार, खून वगैरे गुन्हे घडले होते. आपले निकष लावायचे तर या सर्व हिंसाचारासाठी भारत

सरकारलाच जबाबदार धरले पाहिजे. कारण त्यानेच ते मानसिक वातावरण तयार केले होते."

एकनाथजींच्या या म्हणण्याला सरदारांनी काहीच उत्तर दिले नाही. एकनाथजींच्या बोलण्यामुळे श्री. बिर्ला मात्र अस्वस्थ झाले होते. म्हणूनच ते एकनाथजींना म्हणाले, "मला वाटते, तुम्ही कुणाबरोबर बोलत आहात, याची तुम्ही जाणीव ठेवावी." "मी आतापर्यंत जर काही अयोग्य बोललो असेन तर यापुढे मी आणखी काही बोलणार नाही, आणि निघून जाईन." असे म्हणून एकनाथजी जायला उठले तेव्हा सरदारांनी 'या प्रकरणी सखोल विचार करा आणि मला पुन्हा भेटा' असे त्यांना सांगितले. पुन्हा एकनाथजी जेव्हा त्यांना मसुरीला भेटले तेव्हा सरदार बरेच बदललेले होते. त्यांच्या बोलण्याचा रागरंग पालटलेला होता. 'मी तुमच्या भेटीची वाटच पाहात होतो.' असे सांगून त्यांनी एकनाथजींना विचारले, "तुम्ही काही विचार केला आहे का ? आत्ता रा. स्व. संघावर बंदी आहे, पण या बंदीबाबत शाश्वत असे काहीच नसते. पूर्वीच्या काळी काँग्रेसवर पण बंदी आली होती. अशा बंदीमुळे संघटना काही मरत नसते. तेव्हा रा. स्व. संघावरची बंदी आज नाही तर उद्या– केव्हातरी उठवली जाणार, हे निश्चित. प्रश्न आहे तो हा की पुढे काय ?"

संघाची भूमिका काय आहे, हिंदू संघटना आणि हिंदू संस्कृती यावरचा संघाचा विश्वास कसा आहे, हे एकनाथजींनी स्पष्ट करून सांगितल्यावर सरदारांनी विचारले, "माझे विचार वेगळे आहेत असे वाटते तुम्हाला ?" त्यावर एकनाथजी म्हणाले, "पण सगळ्या काँग्रेसजनांचे विचार आपल्यासारखे नाहीत."

"मी आज जे म्हणतो आहे ते उद्या काँग्रेस म्हणेल," असे आत्मविश्वासपूर्वक उद्‌गार काढून सरदार म्हणाले, "नेहरूंसारखे आमचे काही भाईबंद वेगळ्या विचाराचे आहेत. संघटन किंवा संस्कृती वगैरे शब्द उच्चारले तरी त्यांच्या रागाचा पारा चढतो, हे खरे असले तरी तेदेखील बदलतील. खरा मुद्दा आहे तो हा की तुम्ही माझे हात बळकट कराल की नाही ?"

'असे जर असेल तर आपल्याबरोबर हातमिळवणी करायला आम्हाला आनंदच वाटेल,' असे सांगून एकनाथजी म्हणाले, "पण कोणत्याही प्रकारचे सहकार्य शक्य होण्यापूर्वी काँग्रेसजनांच्या मनातला हा संघाविरोधाचा विखार आपण काढून टाकला पाहिजे." संघाला ध्येयपूर्तीमध्ये आस्था आहे, सत्तासंपादनात स्वारस्य नाही, हे स्पष्ट करीत असतानाच एकनाथजींनी सरदारांबद्दल संघकार्यकर्त्यांना वाटणारा आदरदेखील व्यक्त केला. "आता सारे काही ठीक होईल. मला एकदा गुरुजींना भेटून काही गोष्टींबाबत चर्चा करावी लागेल आणि निर्णय घ्यावे लागतील." असे शेवटी सरदारांनी सांगितले. साम्यवाद्यांना उद्देशून ते म्हणाले, "सर्वत्र अराजक माजावे, कायद्याचे राज्य मोडून पडावे असे वाटणारे काही हितसंबंधी लोक आहेत, म्हणूनच समविचारी लोकांनी एकत्र येऊन काम करण्याची आज खरी गरज आहे. तुमच्यावरची बंदी उठण्याबद्दल मुळीच काळजी करू नका. आता फक्त काही दिवसांचाच काय तो प्रश्न आहे."

आणि झाले तसेच. त्या भेटीनंतर लौकरच म्हणजे दि. ११ जुलै १९४९ रोजी संघावरील बंदी उठवण्यात आली. श्री. गुरुजी जिथे गेले तिथे तिथे त्यांचे प्रचंड स्वागत करण्यात आले. अगदी दूरवरच्या बी. बी. सी. ने सुद्धा ती गोष्ट नोंदवताना म्हटले, "अशी गर्दी खेचणे भारतात दुसऱ्या फक्त पंडित नेहरूंनाच शक्य आहे. श्री गोळवलकरांचे राजकीय महत्त्व किंवा त्यांच्या संघटनेचे सामर्थ्य आज भारतातला कुणीही कमी लेखत नाही."

एका खास लेखात श्री. कन्हैयालाल मुन्शी यांनी लिहिले की, "राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख श्री. गोळवलकर सध्या भारताच्या दौऱ्यावर आहेत. त्यांचे दिल्लीत जे प्रचंड स्वागत झाले तेवढ्यावरून संघाचे समाजातले स्थान आता अबाधित झाले असल्याचेच दिसून आले. ही वस्तुस्थिती नाकारण्यात किंवा दुर्लक्षित करण्यात काहीच अर्थ नाही." त्याच लेखात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भारतीय कम्युनिस्ट पक्षाशी तुलना करताना त्यांनी लिहिले, "साम्यवादी पक्ष सोव्हिएत युनियनच्या रथचक्राला बांधलेला, भारतीय राष्ट्रवादाचा शत्रू आहे, तर रा.

स्व. संघ पराकोटीचा देशभक्त आहे. संघाचे कार्यकर्ते जाज्वल्य निष्ठेने भारतमातेची पूजा करतात. प्राचीन भारत हेच त्यांचे एकमेव प्रेरणा-स्थान आहे. साम्यवादी पक्ष व्यवस्थित चाललेल्या जीवनाचा आधार उखडून टाकून उलथापालथ करू इच्छित आहे तर संघ शिस्तबद्ध जीवनाचा न कोसळणारा भरभक्कम आधार तयार करू इच्छीत आहे. क्रांतिकार्याची आणि तरुण स्त्रियांची भूल दाखवून साम्यवादी पक्ष तरुणांना आपल्या जाळ्यात ओढू पाहातो आहे. नेहमीच्या चाकोरीबद्ध जीवनापेक्षा वेगळे मुक्त जीवन जगण्याचे आमिष दाखवतो आहे. उलट-पक्षी लक्ष्यवेधी संघटित जीवनाचे आणि हिंदूविरोधी असणाऱ्या सर्व गोष्टींबद्दलच्या पराकोटीच्या विद्वेषाचे बाळकडू पाजून रा. स्व. संघ तरुणांचे जीवन फुलवू पाहात आहे. तरुण स्त्रियांना संघात सहभागी करून घेण्याचा त्यांनी कधी प्रयत्न केल्याचे ऐकिवातदेखील नाही. साम्य-वादी पक्षाच्या दृष्टीने लेनिन, स्टालिन आणि सोव्हिएत युनियन हेच सर्वस्व आहे, तर रा. स्व. संघाच्या दृष्टीने भारत हीच दैवी माता असून तिच्या वेदीवर स्वतःचा होम करून घेणे हेच मोठे वरदान आहे. भौतिक-वाद हा साम्यवादी पक्षाचा धर्म आहे, तर प्राचीन परंपरांनी चालत आलेला चिरंतन धर्म संघाला पूज्य आहे."

ओरिसा विधिमंडळाचे माजी सभापती श्री. नीलकंठ शास्त्री यांनी संघाबद्दलचा आपला अभिप्राय व्यक्त करताना म्हटले की, "जगन्नाथाच्या विटंबनेची आणि विध्वंसाची मुसलमानांनी धमकी दिली तेव्हा नागपूरचे भोसलेच मदतीला धावून आले होते. आता परत एकदा नागपूरहूनच संस्कृती.संरक्षणाची हाक दिली गेली आहे. आणि यावेळी फक्त उत्कलच नव्हे तर संपूर्ण भारतच त्या हाकेमुळे संरक्षिला जाणार आहे."

पण सगळीकडून असा गौरव केला जात असताना गुरुजी मात्र शांत व स्थितप्रज्ञ राहिले. सरकारने दिलेल्या वागणुकीमुळे जो त्रास सहन करावा लागला त्याबद्दलच्या संतापाची पुसटशी छटासुद्धा त्यांच्या भाषणात आढळत नसे. अग्निपरीक्षेतून यशस्वीपणे बाहेर पडल्याबद्दल त्यांनी स्वयंसेवकांचे अभिनंदन केले, पण मनात कोणत्याही प्रकारची

कटुता ठेवू नका असेही सांगितले. ' चुकून दातांनी जीभ चावली गेली म्हणून काही आपण सारे दात उपटून टाकत नाही, हे लक्षात ठेवा,' असा त्यांनी सल्ला दिला.

भुसावळच्या रेल्वे-स्थानकावर श्री. गुरुजींवर इतकी पुष्पवृष्टी करण्यात आली की ते गमतीने म्हणाले, " माझ्यावर फुलांचा वर्षाव होत नसून मला फुलांचे तडाखे मारण्यात येत आहेत !" प्लॅटफॉर्मवर सगळीकडे फुलांचा नुसता खच पडला होता. श्री. गुरुजींनी तेथे एक छोटेसे भाषणही केले. त्यांचे भाषण चालू असतानाच एका पोर्टरने प्लॅटफॉर्म झाडायला सुरुवात केली. ' हे काम करायला या माणसाला नंतर येता येणार नाही का ?' असे कुणीतरी रागावून विचारले. त्यावर तो पोर्टर उद्‌गारला, ' देवाला वाहिलेली फुले सामान्य माणसांच्या पायदळी तुडवली जाऊ नयेत म्हणून फक्त मी आता लगेच ही फुले गोळा करीत आहे !"

रा. स्व. संघाचा विजय हा असा पूर्णत्वाला पोचलेला होता.

त्यानंतर थोड्याच दिवसांनी म्हणजे दि. २० नोव्हेंबर १९४९ रोजी मोंघीर येथे मिलाद मेहफिलमध्ये बोलताना डॉ. झाकीर हुसेन यांनी म्हटले, " राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर केले जाणारे हिंसाचाराचे आणि मुसलमानांबद्दलच्या द्वेषभावनेचे आरोप सर्वस्वी चुकीचे आहेत. उलट मुसलमानांनी परस्परांबद्दलच्या प्रेमाचे, सहकार्याचे आणि संघटनेचे धडे संघाकडून शिकले पाहिजेत !"

ग्रंथालय ठाणे
३०३२
२४९८६
निबंध
७७/४८४
शाखा (स्थळ प्रत)

# प्रकरण पाचवे : महत्त्वाचे प्रश्न

दि. २६ जानेवारी १९५० रोजी आपला भारत प्रजासत्ताक झाला. त्या ऐतिहासिक महत्त्वाच्या घटनेचे श्री गुरुजींनी स्वागत केले आणि लोकांनी आनंद साजरा करावा, असे आवाहन केले. ती घटना योग्य रीतीने साजरी करावी, अशा सूचना देशभरातल्या सर्व शाखांना देण्यात आल्या. सुमारे एक हजार गरीब लोकांना मिष्टान्नाचे जेवण देऊन इंदूरमधल्या शाखेने हा दिवस सर्वांत चांगल्या रीतीने साजरा केला.

१९५० साली जेव्हा नेहरू–लियाकत करार करण्यात आला आणि दोन्ही देशांतील अल्पसंख्याकांना चांगली वागणूक मिळण्याची त्याच्यात तरतूद करण्यात आली तेव्हा श्री गुरुजींनी 'एक चांगला प्रयत्न' या शब्दांत त्याचे स्वागत केले. 'हा नेहरू-लियाकत करार अयशस्वी ठरू नये', अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली. त्या कराराला काही पर्याय होते काय, असा प्रश्न विचारला गेल्यावर ते म्हणाले, "या कराराला पर्याय सुचवले तर लोकांच्या मनात संशय निर्माण केल्यासारखे होईल. लोकांनी जर दुसऱ्या गोष्टींचा विचार सुरू केला तर करार अपयशी ठरण्यास मदत केल्यासारखेच होईल. कराराच्या यशस्वी अंमलबजावणीच्या मार्गात असे अडथळे निर्माण करण्याची माझी मुळीच इच्छा नाही."

अगदी लिखित घटना स्वीकारली जाण्यापूर्वीदेखील राष्ट्रीय

स्वयंसेवक संघाचे काम अलिखित घटनेच्या आधारावरच चालत होते– जसे ते नंतरही चालू राहिले. केंद्रीय कार्यकारी मंडळ पूर्वीपासून अस्तित्वात होते. संघाच्या जडणघडणीच्या महान कार्याबाबत त्या मंडळीने वेळोवेळी निर्णयदेखील घेतले होते. पण औपचारिकरीत्या ठराव मांडण्यात किंवा संमत करण्यात आले होते. आता मात्र मूलभूत राष्ट्रीय प्रश्नांवर आपली मते ठरावरूपाने नियमित रीतीने व्यक्त करण्यास सुरुवात झाली. पूर्व पाकिस्तानातील (आता बांगला देश) हिंदूंच्या सुरक्षिततेबद्दलची आपली जबाबदारी भारत टाळू शकत नाही, हे केंद्रीय कार्यकारी मंडळीने एका ठरावान्वये जाहीर केले. त्याचप्रमाणे बेरूबारीचा प्रदेश पाकिस्तानला देऊन टाकण्यास त्याने विरोध दर्शविला. सिंधू नदीच्या पाणीवाटपाबाबतचा पाकिस्तानबरोबरचा करार भारतावर अन्याय करणारा असल्याचे मत त्याने व्यक्त केले. त्याचप्रमाणे १९६५ मधील युद्धानंतर भारताच्या झालेल्या– विशेषतः सीमावर्ती भागातल्या– जीवितवित्ताच्या हानीबद्दल नुकसानभरपाई मागण्याची केंद्रीय कार्यकारी मंडळाने सूचना केली. हाजीपीर खिंड आणि लष्करी दृष्टचा महत्त्वाचा बाकीचा प्रदेश पाकिस्तानला परत देऊन टाकणाऱ्या ताश्कंद निवेदनावर त्याने टीका केली. बांगला देशातल्या बिकट परिस्थितीमुळे जेव्हा एक कोटी निर्वासितांचा लोंढा भारतात आला तेव्हा लौकरात लौकर पाकिस्तानला धडा शिकवण्याचे केंद्रीय कार्यकारी मंडळाने भारत सरकारला आवाहन केले.

'आपण जेव्हा तिबेटवरचे (त्रिविश्टप) चीनचे वर्चस्व मान्य केले तेव्हापासून चीनच्या खोडसाळपणाला वाव मिळाला', असा अभिप्राय व्यक्त करून संघाच्या केंद्रीय कार्यकारी मंडळाने 'चीन आणि पाकिस्तान या दोघांनाही रोखू शकेल असे अण्वस्त्रांचे सामर्थ्य संपादन करण्याची' सरकारला सूचना केली. 'आपल्या राज्यघटनेतले काश्मीरला खास दर्जा देणारे ३७० वे कलम रद्द करणे आणि पाकव्याप्त काश्मीरची मागणी करणे हाच काश्मीर प्रश्नाच्या सोडवणुकीचा एकमेव मार्ग आहे', असे मत केंद्रीय कार्यकारी मंडळाने व्यक्त केले तर 'मुस्लीम स्थलांतरितांची आपल्याला मते मिळावीत या हेतूने त्यांचे

ईशान्य भारतातले अवैध पण छुपे आक्रमण काँग्रेस खपवून घेत आहे', अशी शंका त्याने व्यक्त केली. गोवा, पाँडिचेरी वगैरे प्रदेश एखाद्या पुराणवस्तुसंग्रहालयातील वस्तूंप्रमाणे वेगळे ठेवणे निरर्थक आहे, हे मत जसे त्या मंडळाने व्यक्त केले होते तशीच भाषिक प्रश्नावरची आपली भूमिका स्पष्ट करताना म्हटले होते की ' सर्व भारतीय भाषा या राष्ट्रीय भाषा आहेत. प्रत्येक भारतीयाने मातृभाषेव्यतिरिक्त आणखी एक भारतीय भाषा शिकली पाहिजे.' केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेतल्या जाणाऱ्या परीक्षा सर्व अधिकृत भारतीय भाषांमधून घेतल्या जाव्यात, अशी मागणीही मंडळाने केली.

१९५२ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने गोरक्षणासाठी एक प्रचंड जनआंदोलन सुरू केले. महिनाभर चाललेल्या त्या मोहिमेत गोहत्येवर तातडीने संपूर्ण बंदी घालण्याची मागणी करणाऱ्या निवेदनावर देशभरातून संघकार्यकर्त्यांनी एकूण १,७५,३९,८१३ स्वाक्षऱ्या गोळा केल्या. त्या स्वाक्षऱ्या करणाऱ्यांमध्ये लाखो मुसलमानही होते, हे विशेष. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती आणि त्यावेळचे ओरिसाचे राज्यपाल श्री. फाझल अली यांनी जाहीरपणे त्या मागणीला पाठिंबा दिला होता.

देशात होणाऱ्या दंगलींबाबत वाटणारे दुःख व्यक्त करताना केंद्रीय कार्यकारी मंडळाने म्हटले होते की, "केवळ आपल्या देशाचे अहित चिंतणारे लोकच देशाचे नुकसान आणि अप्रतिष्ठा करणाऱ्या या दंगलींबाबत आस्था दाखवू शकतील." १९६७ सालच्या निवडणुकीतील निकालांबाबत मतदारांचे अभिनंदन करणारे आणि संयुक्त विधायक दलांच्या स्थापनेचे स्वागत करणारे निवेदन मंडळाने त्या वेळी प्रसिद्ध केले होते. त्याचप्रमाणे १९७४-७५ साली जयप्रकाशांच्या आंदोलनाचा प्रभाव वाढू लागल्यानंतर मंडळाने सरकारला असे आवाहन केले की, ' त्या आंदोलनाला मिळणारा पाठिंबा पाहून रा. स्व. संघावर दोषारोप करीत राहण्याऐवजी जनसामान्यांतील असंतोषाची दखल घ्या.' मार्च १९७७ मध्ये जनताक्रांती यशस्वी झाल्यानंतर केंद्रीय कार्यकारी मंडळाने

जयप्रकाशजींचे, इतर नेत्यांचे, लेखकांचे, कलावंतांचे, स्वयंसेवकांचे आणि इतरांचे त्यांनी मिळवलेल्या अभूतपूर्व विजयाबद्दल अभिनंदन केले.

आणि या ठरावांव्यतिरिक्त श्री गुरुजी आपल्या खाजगी संभाषणांतून आणि जाहीर भाषणांतून असंख्य विषयांवर मार्गदर्शक प्रकाश टाकत होतेच, देशाला योग्य दिशा दाखवण्याचे काम करीत होतेच. मी एकदा त्यांना विचारले होते, "भारतवर्षाच्या कोणत्या सीमा योग्य मानता येतील ?" त्यावर ते म्हणाले होते, "याचे नेमके उत्तर देणे कठीण आहे. सीमा नेहमी बदलत्या स्थितीत असतात. तसे पाहिले तर अफगाणिस्थानलाही भारताचा भाग मानणे सहज शक्य आहे. वैदिक आर्यांच्या दृष्टीने तर अफगाणिस्थान हे त्यांच्या संस्कृतीचे प्रमुख केंद्र होते. कौरवांची आई गांधारी गांधार प्रदेशातून– अलीकडे आपण त्याला कंदाहार म्हणतो– आली होती. पुराणांमध्ये तर तिबेट आणि बलुचिस्तानासह सर्व हिमालयीन प्रदेश आणि दक्षिणसमुद्रापर्यंतचा प्रदेश भारतातच समाविष्ट झालेला होता. अगदी इराणदेखील आर्य आहे. त्यांचे शेवटचे राजघराणे पेहलवी होते. त्याने इस्लामपेक्षादेखील आर्यत्वावरच जास्त भर दिला होता. झेंद-अवेस्ता म्हणजे अर्धा ऋग्वेदच आहे. बर्मा म्हणजे प्राचीन ब्रह्मदेशच. महाभारतात इरावत हत्तीने युद्धात भाग घेतल्याचा (अलीकडे इरावती खोरे आपल्याला माहीत झाले आहे) उल्लेख आहे. दोन हजार वर्षांपूर्वी आपली ५६ राज्ये होती. पार्वतीच्या शरीराचे ५१ भाग बलुचिस्तान आणि बांगला देशसारख्या परस्परांहून लांब असणाऱ्या प्रांतांमध्ये पडल्याची कथा आपल्या देशाच्या एकात्मतेवरच भर देत आहे."

'हा आर्यत्वाचा मुद्दा दक्षिणेतील काही लोकांना खटकणार नाही काय ?' असे विचारल्यावर श्री गुरुजी म्हणाले होते, "आर्य विरुद्ध द्रविड हा वाद अगदी अलीकडचा आणि अत्यंत कृत्रिम असा आहे. ती एक आधुनिक काळातली भ्रामक समजूत आहे. पूर्णतः शुद्ध असा वंश अस्तित्वातच नाही. अगदी प्रारंभी आपल्या देशात वंशाचे जे काही वेगळेपण अस्तित्वात असेल ते परिस्थितीनुसार आणि काळानुसार अस्पष्ट होत गेले. दोन हजार वर्षांपूर्वी हा देश 'पंच गौड' आणि 'पंच

द्रविड ' अशा दोन गटांत संघटित करण्यात आला होता. दक्षिणेतील लोकही आपल्याला आर्यच मानीत होते. भारतात ' आर्य ' हा शब्द वंशवाचक मानला गेला नसून संस्कृतीचा सूचक मानण्यात आला आहे. सगळ्या पौराणिक वाङ्मयात स्त्रिया आपल्या पतींना ' हे आर्य ! ' म्हणून संबोधताना आढळतात. त्या स्त्रिया अनार्य होत्या, असा याचा निश्चितच अर्थ होत नाही. ' आर्य ' याचा साधा अर्थ होता ' धीरोदात्त माणूस ! ' "

उत्तर-दक्षिण वादाबाबत श्री गुरुजी म्हणाले, " हे सारे आधुनिक काळातले सत्तासंघर्षाचे राजकारण आहे. आपल्या ऋषीमुनींनी सर्व देवदेवींचा स्वीकार करून आणि त्यांची देव्हाऱ्यात प्रतिष्ठापना करून हिंदू धर्माचा आधार विस्तृत आणि व्यापक केलेला होता. शिव, विष्णू, शक्ती, सूर्य आणि गणपती हे पंचायतन मान्य करून सर्व पंथांना त्यांनी एकत्र आणले होते. राक्षसांचा ' निरुती ' असा उल्लेख केलेला आढळतो. संस्कृतमध्ये त्याचा अर्थ नैऋत्य दिशेला राहाणारे असा होतो. ते समुद्रात लपणारे म्हणजेच बेटांवर राहणारे आहेत, असेही म्हटले गेले आहे. पण कुठेही राक्षस हे दक्षिण भारतीय होते किंवा सिलोनी होते, असा उल्लेख आढळत नाही. राक्षस म्हणजे कुणीतरी परके, बाहेरचे लोकच होते. "

या दृष्टिकोनाबाबत मुसलमान पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांची प्रतिक्रिया काय असेल, असे विचारल्यावर श्री गुरुजी म्हणाले होते, " ऐतिहासिक दृष्टया आपण एकच आहोत. महाभारत काळापासून मराठा अमदानीपर्यंत अफगाणिस्तान भारताचाच एक भाग होता. शल्य तेथूनच आलेला होता. धर्माच्या सेमिटिक संकल्पनेमुळे असहिष्णुता वाढीस लागली आणि धार्मिक पायावर लोकांमध्ये फाटाफूट पाडली जाऊ लागली. पण खरा धर्म लोकांमध्ये दुफळी माजवीत नाही. खरीखुरी पूर्ण सहिष्णुता पुन्हा एकदा प्रस्थापित झाली पाहिजे. "

श्रीलंकेबाबत मत व्यक्त करताना ते म्हणाले होते, " लंकेचे भारताबरोबर कायम निकटचे संबंध राहिले आहेत. राम-रावण युद्ध म्हणजे आर्य-द्रविड संघर्ष होता, अशी कल्पना काहीजणांनी मांडली आहे, पण तशी वस्तुस्थिती नाही. खुद्द रावण हा थोर संस्कृत विद्वान

होता, शिवांचा भक्त होता. सामवेदाला चाल त्याने लावली, असे म्हटले जाते. त्याचा पिता विश्रव किंवा आजोबा पुलस्त्य हे दोघे ब्राह्मण होते. मग घडत होते काय, तर रावण दक्षिणेत अत्याचार करीत होता आणि रामाने त्या लोकांची रावणाच्या जुलमापासून मुक्तता केली. शिवाय रावणाने आपला थोरला भाऊ कुबेर याच्याकडून राज्य जबरदस्तीने हिसकावून घेतले होते. अगदी सिंगापूरसुद्धा प्राचीन शृंगपूरच– शिंगासारख्या आकाराचे शहर– आहे."

श्री गुरुजी पुढे म्हणाले होते, "अफगाणिस्तानपासून इंडोनेशियापर्यंतच्या प्रदेशाचे आशियाई संघराज्य स्थापन करण्याची कल्पना लोकमान्य टिळकांनी मांडली होतीच." भारत आणि पाकिस्तान भविष्यकाळात आधी महासंघ, मग संघराज्य या प्रकारे पुन्हा एकत्र येतील, याबाबत त्यांना मुळीच शंका नव्हती.

भारतीय राज्यघटना म्हणजे 'आधी कापा, मग जोडा' असा प्रकार असल्याचे त्यांचे मत होते. आणि प्रारंभी त्या राज्यघटनेला जे काही पावित्र्य लाभले होते तेसुद्धा वारंवार होणाऱ्या दुरुस्त्यांमुळे नष्ट होत चालले आहे, असे त्यांना वाटत होते. 'भारतासाठी एकात्म राज्यघटना केली गेली असती तर काटकसरीच्या आणि एकात्मतेच्या दृष्टीने ते योग्य ठरले असते', असे मत व्यक्त करून श्री गुरुजी म्हणाले होते, "असे एकात्म राज्य प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने अनेक भागात विभागता आले असते." प्रादेशिक प्रतिनिधित्वाच्या तत्त्वामुळे खरीखुरी प्रातिनिधिक मंडळे अस्तित्वात येऊ शकत नाहीत, प्रामुख्याने शेतीव्यवसाय असणाऱ्या विभागातून अनेकदा शेतीविषयक ज्ञानाचा गंधदेखील नसणारे लोक आमदार म्हणून निवडले जातात, असा अभिप्राय व्यक्त करून सध्याच्या प्रादेशिक प्रतिनिधित्वाऐवजी कामानुरूप प्रतिनिधित्वाचा वापर केला जावा, असे त्यांनी सुचवले होते.

निवडणुकीच्या वेळी कुणाचा प्रचार करायचा किंवा कुणाला मत द्यायचे, याबाबत स्वयंसेवकांना पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे, असे श्री गुरुजींचे मत होते. १९६७ साली त्यांनी असे दाखवून दिले होते की, संघाच्या काही स्वयंसेवकांनी काँग्रेसचे उमेदवार जनरल थोरात यांना

मते दिली होती तर काहीजणांनी त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवार कोल्हापूरच्या राजमाता यांच्या प्रचारमोहिमेत भाग घेतला होता. 'अर्थात, पक्षाच्या तिकिटावर सेनाधिकाऱ्यांनी निवडणूक लढवण्याची कल्पना मला फारशी पसंत नाही. सेनाधिकारी सगळ्या देशाचे असतात', असे भाष्यही त्यांनी त्या विशिष्ट निवडणुकीबाबत केले होते.

१९६७ साली संयुक्त विधायक दलांची सरकारे स्थापन झाल्यावर काही स्वयंसेवक मंत्री झाले, तेव्हा एका पत्रकाराने श्री गुरुजींना विचारले, "ज्या राज्यांमध्ये बिगर-काँग्रेसी सरकारे सत्तारूढ झाली आहेत त्या राज्यांमध्ये संघकार्याला वेग प्राप्त झाला आहे काय?" त्यावर ते ताडकन उत्तरले होते, "विचार करण्याची ही पद्धत अत्यंत चुकीची आहे. संघाने कधीही आपल्या कार्यासाठी सरकारी मदतीची अपेक्षा केलेली नाही. सरकारे येतील आणि जातील, पण उद्दिष्टपूर्ती होईपर्यंत सरकारच्या कृपेची अपेक्षा न धरता किंवा अवकृपेची तमा न बाळगता संघकार्य चालूच राहिले पाहिजे. शिवाय काँग्रेस आणि बिगर-काँग्रेस असा भेदभाव आम्ही संघवाले करीत नाही. जो कुणी देशाबरोबर असेल आणि देशासाठी काम करीत असेल तो प्रत्येकजण आमचाच आहे– मग तो कोणत्याही पक्षाचा असो."

१९६७ साली जे स्वयंसेवक मंत्रीपदावर आरूढ झाले त्यांना मार्गदर्शनपर सल्ला देताना श्री गुरुजी म्हणाले होते, "भारतवर्षाच्या उत्तर भागातील काही प्रांतांत आज आमचे काही मित्र राजकीय सत्तास्थानांवर जाऊन बसले आहेत. त्यांच्यापैकी कुणीही अशी समजूत करून घेऊ नये की आपण कधीच चुकणार नाही, कधीच भ्रष्ट होणार नाही. सत्ता भ्रष्ट होऊ शकते, ती इतरांना भ्रष्टवू शकते. जर त्यांच्या प्रामाणिकपणावर संशयाचे सावट पडले तर ते कधीही जनतेला आपले तोंड दाखवू शकणार नाहीत आणि त्यांच्याहून जास्त प्रामाणिक माणसे त्यांची जागा घेतील, हे त्यांनी विसरता कामा नये. त्याचप्रमाणे मी संघातल्या माझ्या इतर बांधवांना आणि मित्रांना असे सुचवू इच्छितो की त्यांनी आपली कुठलीही कामे करून घेण्यासाठी प्रशासनाची यंत्रणा डावलून सत्ताधारी मित्रांना भेटू नये. सार्वजनिक दृष्टीने महत्त्वाच्या

कामांचा याला अपवाद करायला हरकत नाही. पण अन्यथा ते ऊठसूठ सत्ताधाऱ्यांची मदत घेऊ लागले तर सार्वजनिक नीतिमत्तेचा स्तर खाली नेण्यास ते जबाबदार ठरतील."

१९६५ सालचे भारत-पाकिस्तान युद्ध संपून बरेच दिवस झाल्यानंतरही आणीबाणी आणि भारत संरक्षण अधिनियम अस्तित्वात होतेच. त्याबाबतचा आपला निषेध नोंदवताना श्री गुरुजी म्हणाले होते, "प्रथम वेगवेगळ्या राज्यांचे सार्वजनिक सुरक्षितता कायदे अस्तित्वात होते, त्यानंतर स्थानबद्धता कायदा होता. आणि आता गेल्या तीन वर्षांहूनही अधिक काळ भारत संरक्षण अधिनियमही अस्तित्वात आहेत. जास्तीत जास्त असाधारण अधिकारांचे आपल्या हातांत केंद्रीकरण व्हावे, हा सत्ताधारी पक्षाचा या सर्व कायद्यांमागचा हेतू आहे. लोकशाही पद्धतीत ही काही फारशी सुखावह गोष्ट नाही. इंग्लंडने तर जागतिक युद्धात भाग घेतला होता, आणि तरीही त्याच्या साम्राज्य-संरक्षण-विषयक कायद्यात अशी स्पष्ट तरतूद होती की युद्ध संपून सहा महिने उलटताच तो कायदा आपोआप रद्दबातल ठरेल. १९३९-१९४५ या काळातले भारत संरक्षण अधिनियम लढाई थांबल्यावर सहा महिन्यांनी आपोआपच रद्द झाले. पण सध्याचे भारत संरक्षण अधिनियम मात्र लढाई संपली तरी अस्तित्वात आहेतच आणि त्याचे अधिराज्य संपण्याची चिन्हेही दिसत नाहीत." शेवटी श्री गुरुजी म्हणाले होते, "ज्याला शत्रू आहेत असा काही या जगात फक्त आपलाच देश नाही. युद्धाचा धोका ज्याच्यापुढे उभा राहिला आहे असा एकमेव देश आपलाच, अशीही काही वस्तुस्थिती नाही. आज सारे जगच युद्धाच्या सावलीत जीवन कंठते आहे. पण प्रत्यक्ष लढाई चालू नसतानादेखील आणीबाणीतले कायदे अमलात आहेत असा लोकशाहीवादी देश केवळ आपलाच !"

१९७० साली त्यांनी श्रीमती गांधींच्या एकाधिकारशाहीविरुद्ध इशारा दिला. दिल्लीत सार्वजनिक ठिकाणी रा. स्व. संघाच्या शाखा भरवण्यास बंदी घालणारा हुकूम जारी झाल्यावर त्यांना १९३० साली गुंतुर जिल्ह्यात इंग्रज कलेक्टरने गांधी टोपी घालण्यावर लादलेल्या निर्बंधाची आठवण झाली. श्री गुरुजींचे हे ज्ञान, हे शहाणपण आर्थिक

प्रश्नांवरील त्यांच्या वक्तव्यांमध्येही प्रतिबिंबित होत असे. १९६५ मध्ये पडलेल्या दुष्काळात अन्नधान्यव्यापाऱ्यांनी नफेबाजी चालवली होती. त्या संदर्भात श्री गुरुजी म्हणाले होते, " मागणी आणि पुरवठ्याचा सिद्धांत पुढे करून अव्वाच्या सव्वा भाव लावणे केव्हाही समर्थनीय ठरणार नाही. ते अर्थशास्त्र न ठरता अनर्थशास्त्र ठरेल ! "

परदेशांकडून कर्जे व मदत घेण्याच्या धोरणाला श्री गुरुजींचा सक्त विरोध होता. ' इतर देश आपल्याला जी मदत देतात ती वेगळ्या पद्धतीने त्यांच्याच लाभासाठी देत असतात ', असे ते म्हणत. परदेशांच्या दडपणाला बळी पडून सरकारने रुपयाचे अवमूल्यन केल्याचे पाहून त्यांना खेद वाटला. कापडाची किंवा साखरेची निर्यात सबसिडी देऊन का केली जाते, असा वेडेपणा का केला जातो, हेच त्यांचा समजू शकत नव्हते. देशाची आर्थिक एकात्मता नष्ट करणाऱ्या 'अन्नधान्य विभागां'ना तर त्यांनी कडाडून विरोध केला. मद्रासमध्ये पंजाबी गव्हापेक्षा अमेरिकन गहू सहज मिळू शकतो, अशी तक्रार त्यांच्याजवळ तेथील लोकांनी केल्याचे ते सांगत. ' वस्तूंच्या अनिर्बंध ने-आणीवर बंधने घातल्यामुळे विचित्र परिस्थिती निर्माण झाली. जोपर्यंत उत्तर प्रदेशातून साखर, गूळ आणि खाद्यतेल पंजाबमध्ये येत नाही तोपर्यंत तिकडे गहू पाठवायचा नाही, असा निर्णय पंजाब सरकारला घ्यावा लागला ', याचाही ते दाखला देत. भिलाई पोलाद कारखाना उभारण्यासाठी अवघ्या ३० किलोमीटर अंतरावर कच्च्या लोखंडाच्या खाणींजवळची एक पडीक जागा उपलब्ध असताना उत्तम भातशेतीची १०० एकर जमीन ताब्यात घेण्यात आली, याबद्दल त्यांनी जाहीरपणे टीका केली होती. अन्नधान्यात दोन टक्के केरकचरा, दगड असायला मद्रासमध्ये सरकारने परवानगी दिली होती. अशी पळवाट उपलब्ध करून दिल्यानंतर व्यापारी लोक ती टक्केवारी २० टक्क्यांपर्यंत सहज वाढवू शकतील, इकडे त्यांनी सरकारचे लक्ष वेधले होते. जमीनधारणेबाबतची १५ एकरांची मर्यादा आर्थिक दृष्ट्या योग्य नसल्याचे, ३० एकरांपेक्षा कमी जागेत शेती करण्यात समाधान नसल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले होते.

भारताबरोबरच्या सोव्हिएत रशियाच्या मैत्रीमागे कोणते हेतू

असतील, याबाबत त्यांना शंका वाटत होती. भारत आणि सोव्हिएत रशिया यांच्यात झालेल्या तथाकथित मैत्री-कराराचे सर्व राजकीय नेत्यांनी आंधळेपणाने स्वागत करावे, त्याचे त्यांना आश्चर्य वाटले. ते म्हणाले, "आपण रशियन अस्वलाला चांगले ओळखतो. आधी ते गुदगुल्या करते, मग मिठी मारते आणि शेवटी आवळून ठार मारते. रशियन अस्वलाने गोड शब्दांनी तुम्हाला पुरेशा गुदगुल्या केल्या आहेत. आता आपल्याला मिठीत सामावून घेतले आहे. तिसरी अवस्था केव्हा येईल, हे मात्र मी सांगू शकत नाही."

श्री गुरुजी म्हणाले होते, "साम्यवाद औद्योगिक दृष्टचा विकसित पाश्चिमात्य देशात उदयाला येण्याऐवजी मागासलेल्या रशियात उदयाला आला तेव्हाच त्याचे सैद्धांतिक अपयश स्पष्ट झाले आणि आपल्या लोकांना पुरेसे अन्न द्यायला रशिया असमर्थ ठरला तेव्हा त्याचे व्यावहारिक अपयश निश्चित झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या संकटकाळात स्टालिनलादेखील 'होली रशिया' किंवा 'मदर रशिया' यांनाच आवाहन करावे लागले. साम्यवादाच्या तत्त्वज्ञानापेक्षा राष्ट्रवादच बलवत्तर ठरला."

आपल्या देशातल्या साम्यवादी कार्यकर्त्यांचे मॉस्कोवादी आणि पेकिंगवादी असे दोन गट अस्तित्वात असले तरी त्यांच्यापैकी कोणीही भारतवादी नाहीत, याबद्दलची खंत श्री गुरुजींनी अनेकदा व्यक्त केली होती. 'मरण पत्करण्यापेक्षा साम्यवादी झालेले बरे !' अशा आशयाचे बर्ट्रांड रसेल यांचे एक वचन आहे. त्यावर टीका करताना ते म्हणाले होते, "पुरुषार्थाचे तत्त्वज्ञान सांगण्यापेक्षा निराशेचे तत्त्वज्ञान सांडणारा हा कुठल्या प्रकारचा तत्त्वज्ञ ?" भारतीय राष्ट्रवाद जर संवर्धित केला तर पाकिस्तान आणि चीन या दोघांनाही तोंड देणे आपल्याला सहज शक्य आहे. आपण संघटित असलो तर दहा चीन आपल्याविरुद्ध उभे राहिले तरी आपण त्यांना तोंड देऊ शकू, असे ते म्हणत. अमेरिकेचे या भागातले हितसंबंध आपल्या हितसंबंधाशी मिळतेजुळते आहेत, असे श्री गुरुजींना वाटत होते. पण ते म्हणत, "अमेरिका किंवा रशिया यांपैकी कुणीही भारताला खरीखुरी मदत करणार नाही. स्वतःचा

उद्धार करून घेण्यासाठी भारताने स्वतःचेच प्रयत्न केले पाहिजेत."

पंजाबचे वेगळे राज्य करण्यास त्यांचा विरोध होता, पण 'पंजाबमधल्या बिगरशिखांनी (मोनांनी) पंजाबी ही आपली मातृभाषा आहे हे नाकारण्यात अर्थ नाही' असे ते म्हणत. त्याचवेळी जनसंघातर्फे पंजावमध्ये हिंदीसाठी आंदोलन चालू होते. 'आपल्या वक्तव्यामुळे जनसंघाच्या कार्यकर्त्यांना वाईट वाटेल,' असे कुणीतरी म्हटल्यावर ते म्हणाले, "मी जेव्हा देशात सर्वत्र फिरत असतो, त्यावेळी माझ्या मनात फक्त जनसंघच असतो, असे आपल्याला वाटते की काय? मी मात्र सतत देशाचा आणि फक्त देशाचाच विचार करीत असतो."

भाषेच्या महत्त्वाच्या प्रश्नावर श्री. गुरुजींचे विचार असेच स्वतंत्र होते. सर्व भारतीय भाषांच्या बाजूने ते बोलत. 'सर्व भाषा सारख्याच राष्ट्रीय असून फक्त परस्पर-संपर्कासाठी हिंदीचा वापर आवश्यक आहे' असे ते सांगत. १९५७ साली त्यांनी मला स्पष्टपणे सांगितले होते, "उच्च शिक्षणासाठी आणि संशोधनासाठी आपल्याला एका समान भाषेचा अवलंब करावा लागेल, याबाबत माझ्या मनात शंका नाही. प्रारंभी आपण संस्कृतजन्य तांत्रिक संज्ञांचा वापर करू शकू. संस्कृत भाषा समृद्ध आहे, तसेच तिच्याभोवती पावित्र्याचे एक वलयही आहे. राष्ट्रीय संवादासाठी संपर्कभाषा म्हणून ती उपयोगात आणली जाऊ शकेल. अशा एखाद्या समान भाषेच्या दुव्याअभावी प्रांताप्रांतांत बौद्धिक सुसंवाद साधला जाऊ शकणार नाही आणि ते एकमेकांना दुरावू लागतील. राष्ट्रीय एकात्मतेच्या संवर्धनासाठी संस्कृत भाषा अत्यावश्यक आहे."

"हिंदी भाषादेखील हा हेतू पूर्ण करू शकेल. आपली निम्मी लोकसंख्या ती भाषा जाणणारी आहे, हा तिच्या संदर्भातला अधिक फायदा आहे. पण ती एक प्रादेशिक भाषा आहे, हा संस्कृतच्या तुलनेने तिचा तोटा आहे. शिवाय समृद्धीच्या आणि पावित्र्यभावनेच्या बाबतीत तिची संस्कृतशी तुलनाच होऊ शकत नाही. इतर कोणत्याही प्रादेशिक भाषेपेक्षा हिंदी अधिक जुनी-पुराणी नाही. इतर काही भाषांइतकी ती समृद्धदेखील नाही. उदाहरणार्थ, तामिळ भाषा सुमारे २५०० वर्षा-

पूर्वीच एक प्रगत भाषा होती. आणि म्हणूनच हिंदी इतर भाषांपेक्षा श्रेष्ठ असल्याचे मानणे अयोग्य ठरेल. मी आपल्या सर्व भाषा राष्ट्रीय भाषाच मानतो. तो आपल्या सर्वांचा समान राष्ट्रीय वारसा आहे. हिंदीभाषिकांची संख्या इतर भाषिकांपेक्षा जास्त आहे म्हणूनच केवळ हिंदी ही राज्यभाषा म्हणून स्वीकारण्यात आली आहे. हिंदी ही एकमेव राष्ट्रीय भाषा असून इतर साऱ्या प्रांतिक भाषा आहेत असे म्हणणे चुकीचे ठरेल. वस्तुस्थितीबद्दलचा तो योग्य दृष्टिकोन ठरणार नाही."

त्यापूर्वी काही दिवस डॉ. सी. पी. रामस्वामी अय्यर यांनी नवी दिल्लीतल्या एका जाहीर सभेत हिंदी भाषेची टर उडवली होती. 'तुलसीरामायण आणि रेल्वेचे वेळापत्रक ही फक्त दोनच हिंदीतली मोठी पुस्तके आहेत,' असे ते म्हणाले होते. सरदार पनिक्करांनीदेखील त्याच सभेत त्या विधानाची पुनरुक्ती केलेली होती. त्यावर भाष्य करताना श्री. गुरुजी म्हणाले होते, "हिंदीच्या कडव्या पुरस्कर्त्यांप्रमाणेच या लोकांचा हा दृष्टिकोनही चुकीचा आहे. हिंदी भाषा न जाणणारे लोकच फक्त तिची अशी टर उडवू शकतील. काही वर्षांपूर्वी, विख्यात मराठी नाटककार राम गणेश गडकरी यांनी एका पात्राच्या तोंडी असे वाक्य घातले होते की, 'दाक्षिणात्य भाषा ? पत्र्याच्या डब्यात काही दगडगोटे घालून तो डबा जोरात वेगवेगळ्या प्रकारे हलवला म्हणजे तुम्हाला आपोआप त्या भाषा ऐकू येतील !' आता अर्थातच हे वाक्य गमतीने त्या पात्राच्या तोंडी घालण्यात आले होते; पण अशी विखारी, विकृत चेष्टादेखील आपल्या देशाच्या दृष्टीने इष्ट ठरणार नाही. अज्ञानातून उद्भवणारा हा परस्परांबद्दलचा भ्रम आता यापुढे नष्ट झाला पाहिजे."

हिंदीच्या विकासामुळे आपल्या मातृभाषेचा प्रभाव कमी होईल, अशी काही जणांना भीती वाटत होती. त्यांची ती भीती काढून टाकताना श्री. गुरुजी म्हणाले होते, "तसे घडेल, असे मला वाटत नाही. इंग्रजीचे वर्चस्व असतानाच बंगाली, तामिळ, मराठी आणि तेलगू या भाषा विकसित झाल्या. हिंदीचा जास्त वापर सुरू झाल्यानंतर या भाषा अधिक समृद्ध होतील आणि हिंदीलाही अधिक समृद्ध करतील.

आपल्या भाषेचे हिंदीकरण होईल, अशी बंगाल्यांना भीती का वाटावी ? गेली वीस वर्षे बंगालीचे उर्दूकरण चालू आहे. 'सकाळ'साठी पूर्वी 'प्रभाते' म्हटले जायचे ते आता 'फाजरे' म्हटले जाते. पण त्याविरुद्ध एकाही बंगाल्याने निषेधाचा सूर काढलेला नाही. मग त्यांनी फक्त हिंदीचीच एवढी धास्ती का बरे घ्यावी ?"

"मी उर्दू शब्दांच्या किंवा विविध भाषांमध्ये रुळलेल्या इतर भाषांतील शब्दांच्या वापराला हरकत घेतो आहे असे नाही. काही काळापूर्वी वीर सावरकरांनी मराठीच्या शुद्धीकरणाची योजना पुढे मांडली होती. नेहमीच्या वापरातल्या उर्दू शब्दांसाठी त्यांनी समानार्थी संस्कृत शब्द सुचवले होते. 'जरुरी'च्या ऐवजी 'आवश्यकता' हा शब्द त्यांनी सुचवला, पण तसे करताना, पर्याय सुचवताना, त्यांनादेखील 'ऐवजी' हा उर्दू शब्द वापरावा लागलाच. तेव्हा माझी हरकत आहे ती रुळलेल्या शब्दांना नसून विशिष्ट योजनेने एखाद्या भाषेत घुसडलेल्या परक्या शब्दांना आहे ! काही दिवसांपूर्वी मदुरेत मला एक बॅरिस्टर भेटले होते. हिंदीमुळे तामिळची हानी होईल, असे त्यांनी मला सांगितले. मी त्यांना विचारले, 'कशी काय ?' ते काही स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत. 'जिल्हा न्यायालयांमध्ये तामिळचा वापर करण्यास परवानगी दिली गेलेली असतानाही आपण तामिळऐवजी इंग्रजीचाच वापर का करता ?' असे मी त्यांना विचारले. त्या प्रश्नालादेखील त्यांनी उत्तर दिले नाही. तेव्हा त्यांना मी सांगितले की तामिळ भाषेची शत्रू हिंदी भाषा नाही. उलट इंग्रजीच दोन्ही भाषांची शत्रू आहे."

मातृभाषा, हिंदी, संस्कृत आणि इंग्रजी अशा चार भाषांचा अभ्यास विद्यार्थ्यांच्या दृष्टीने खूप जड ठरतो, विद्यार्थ्यांचा निम्म्यापेक्षा जास्त वेळ त्यांच्याच अभ्यासात खर्च होतो, असे काहीजणांना वाटते. त्या संदर्भात प्रतिक्रिया व्यक्त करताना श्री गुरुजी म्हणाले होते, "तसे होते, हे खरे आहे. पण या चार भाषांपैकी जी टाळता येऊ शकेल अशी भाषा इंग्रजीच आहे. ती सक्तीची असता कामा नये. सरकारने जर एक ठाम निर्णय घेतला, त्याच निर्णयावर स्थिर राहून त्याची तातडीने अंमलबजावणी सुरू केली तर सध्याची गोंधळाची स्थिती कमी होईल

आणि अखेरीस नाहीशी होईल. सध्याचे अनिश्चित वातावरण फक्त इंग्रजीचीच बाजू भरभक्कम करते आहे. पूर्वी कधीही नव्हती इतकी मुले सध्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांत जातात. जुन्या मध्यप्रदेशात शिक्षणखाते हिंदी आणि मराठीतून आपला कारभार पार पाडीत असे. पण संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर मध्यप्रदेशातल्या पूर्वीच्या मराठी भागांत सर्रास इंग्रजीचा वापर सुरू झाला आहे. मुंबईतील माध्यमिक शाळांमधल्या मुलांना शास्त्र आणि संस्कृत यातून एका विषयाची निवड करण्यास सांगितले जाते. साहजिकच हुशार मुले शास्त्र विषय घेतात. आणि फक्त काही मुली तेवढया संस्कृतचा अभ्यास करतात. हा पर्याय अत्यंत चुकीचा आहे. शास्त्र आणि संस्कृत या दोन्ही विषयांचा अभ्यास केला गेला पाहिजे. संस्कृत शिक्षणाचे राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने असणारे मोल लक्षातच घेतले जात नाही."

हिंदीच्या संदर्भात घेतला जाणारा आणखी एक आक्षेप म्हणजे बिगरहिंदी भाषिकांना हिंदी भाषिकांच्या तुलनेने काही तोटे सहन करावे लागतील. त्याबाबत श्री गुरुजी म्हणाले होते, "हा आक्षेप चुकीच्या दृष्टिकोनामुळे घेतला गेला आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, हिंदी म्हणून ओळखली जाणारी खडी बोली फक्त दिल्ली-मीरत भागातल्या काही लाख लोकांचीच मातृभाषा आहे. हिंदी भाषिकांपैकी इतर बहुसंख्य लोक आपापल्या घरांतून खडी बोली बोलत नाहीत, तर ते पहाडी, राजस्थानी, अवधी, मगधी, ब्रज, भोजपुरी किंवा मैथिली अशा विविध बोलीभाषांचाच वापर करतात. त्या सर्वांना हिंदी भाषा शिकावीच लागते– जशी बंगाली–मराठी–तेलगू किंवा मल्याळी भाषा शिकावी लागेल !"

राजभाषेसंबंधीच्या विधेयकाबद्दल त्यांचे मत काय होते? इंग्रजीचे राजभाषेचे स्थान काढून घेऊन फक्त हिंदीलाच ते स्थान देण्यास नकार देण्याचा अधिकार प्रत्येक राज्याला देण्याची त्या विधेयकात तरतूद होती. त्या संदर्भात श्री गुरुजी म्हणाले होते, "जर असेच करायचे असेल तर मग प्रत्येक नागरिकाला हा नकाराधिकार का बरे दिला गेला नाही? मूठभर लोकांनी बहुसंख्य लोकांवर जुलमाने वर्चस्व

गाजवण्याचा हा प्रकार आहे. भारतीय उद्योगपतींच्या नियंत्रणाखाली असणाऱ्या इंग्रजी वृत्तपत्रांनी भारतीय भाषांविरुद्ध घेतलेली कडवी भूमिका पाहून मला आश्चर्य वाटते. कदाचित विदेशी कंपन्यांबरोबरच्या त्यांच्या व्यावसायिक सहकार्याचाच तो एक भाग असावा."

मुसलमान भारतीयांबद्दलची श्री गुरुजींची भूमिका अगदी स्पष्ट होती. त्यांनी आपल्या धर्माचे योग्य रीतीने पालन करावे, आपली सांस्कृतिक वैशिष्टचे टिकवावीत, पण त्यांची देशावरची आणि राष्ट्रीय परंपरेवरची निष्ठा संशयातीत असावी, असे त्यांचे मत होते. 'सेक्युलॅरिझम'बाबतची आपली भूमिका स्पष्ट करण्यापूर्वी श्री गुरुजी समोरच्या माणसाला त्याची कल्पना स्पष्ट करायला सांगत. सर्व धर्मांबद्दल सारखा आदरभाव बाळगणे असा जर सेक्युलॅरिझमचा अर्थ असेल तर त्यांचा त्याला पूर्ण पाठिंबा होता. पण सर्व धर्मांबद्दल सारखाच अनादर बाळगणे किंवा एका धर्माला डावलून दुसऱ्या धर्माच्या अनुयायांचा अनुनय करणे असा जर सेक्युलॅरिझमचा अर्थ अभिप्रेत असेल तर त्याला मात्र त्यांचा विरोध होता.

'Secular' या इंग्रजी शब्दाचा शब्दकोशातला अर्थ पुढीलप्रमाणे आहे : 'Pertaining to the present world, or to things not spiritual: Civil, not acclesiastical : lay : not concerned with religion : not bound by monastic rules." या युरोपीय संकल्पनेमागे तिकडचा इतिहास उभा आहे. पंधराव्या शतकापर्यंत तिकडे धर्मसंस्थेचे सगळ्याच बाबतीत वर्चस्व होते. मग त्या बाबी राज्यविषयक असोत, सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनातल्या भौतिक प्रश्नांशी संबंधित असोत किंवा आध्यात्मिक असोत, धर्मसंस्थेचा शब्द अखेरचा मानला जात होता. त्यानंतर तिकडे प्रबोधनाचे युग अवतरले. प्राचीन काळातल्या ग्रीसचा नव्याने धांडोळा घेतला गेला आणि त्यातून नवा दृष्टिकोन पुढे आला. पृथ्वी आणि स्वर्ग यांच्या मध्ये रोमन चर्चव्यतिरिक्त आणखीही काही चांगल्या गोष्टी आहेत, याची लोकांना जाणीव झाली. त्यामुळे सुधारणावादाला आणि पर्यायाने धर्मसंस्थेच्या सुधारणेला चालना मिळाली. ल्यूथर आणि कॅल्व्हिनसारखे धर्मसुधारक पुढे आले. धर्मसंस्थेसमोर ही

आव्हानेच उभी राहिलेली होती, पण ख्रिस्ती धर्मसंस्था प्रबोधनाचे प्रवाह आपल्यात सामावून घेऊ शकली नाही की सुधारणावादाशी तडजोड करू शकली नाही. परिणामी धर्मसंस्था आणि प्रबुद्ध जनता यांच्यामध्ये दुरावा निर्माण झाला आणि तो पुढे वाढतच गेला.

याच सुमारास सामंतशाही युरोप राजेशाहीकडे झुकला. सगळ्याच बाबतींत धर्मसंस्थेची री ओढायच्या मन:स्थितीत राजेलोक नव्हते. त्यामुळे त्यांच्यापैकी अनेकांनी संपूर्ण युरोपवर अधिराज्य गाजवणाऱ्या रोमन चर्चऐवजी राष्ट्रीय धर्मसंस्थेच्या उभारणीला प्रोत्साहन दिले. आणि याच सुमारास वैज्ञानिक क्रांती घडून आली. विज्ञानाने धर्मसंस्थेची अनेक तत्त्वे चुकीची असल्याचे सिद्ध केले.

या अशा परिस्थितीत युरोपमध्ये बऱ्याच देशांत धर्मसंस्था आणि शासनसंस्था यांचे मार्ग वेगवेगळे झाले. आणि तरीही इंग्लंडमध्ये एक अधिकृत चर्च अस्तित्वात आहेच. ह्या चर्चचे धर्मगुरू नेमण्याची आणि त्यांना मानधन देण्याची जबाबदारी शासनसंस्थेकडे आहे, हे श्री गुरुजी दाखवून देत असत. आठव्या एडवर्डना राज्यत्याग करावा लागला तो केवळ एका घटस्फोटितेशी– श्रीमती सिम्प्सन यांच्याशी– त्यांना लग्न करायचे होते म्हणून नव्हे, तर ती वधू कॅथॉलिक आहे, हादेखील त्या प्रकरणातला मोठा महत्त्वाचा आक्षेप होता.

भारतातील स्थिती यापेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. काही आदेशांचा किंवा तत्त्वांचा समूह म्हणजे काही हिंदू धर्म नव्हे. ते एक दर्शन आहे, तो एक अनुभव आहे. आध्यात्मिक क्षेत्रात वेगवेगळे प्रयोग करण्यास हिंदू धर्माने आपल्या अनुयायांना पूर्ण स्वातंत्र्य दिलेले होते. त्यामुळेच बुद्ध, महावीर किंवा गुरू नानकांनी सुरू केलेल्या सुधारणावादी चळवळी म्हणजे असंतोषातून उभी राहिलेली बंडे ठरली नाहीत. उलट त्या चळवळींमुळे हिंदू विचार आणि जीवनपद्धती समृद्ध होत गेली.

हिंदू धर्मात चाकोरीबद्ध आदेश नसल्यामुळे– तुम्ही एका देवावर विश्वास ठेवू शकता, कोणत्याही देवावर विश्वास नाही असे म्हणू शकता किंवा लाखो देवदेवता मानू शकता आणि तरीही तुम्ही हिंदूच राहाता– विज्ञानामुळे खोट्या ठरणाऱ्या तत्त्वांचा प्रश्नच नाही. उलट,

अनेक हिंदू संकल्पना बरोबर असल्याचेच विज्ञानाने दाखवून दिले. प्राचीन भारत ही सतत पुढे जात राहिलेली, पण केव्हाही अनुभवता-पाहाता येणारी वस्तुस्थिती असल्यामुळे पुन्हा गवसलेल्या भूतकाळा-कडून अकार्यक्षम वर्तमानकाळ अस्थिर होण्याचा प्रश्नच नव्हता. आपल्याकडे संघटित अशी धर्मसंस्थाच अस्तित्वात नसल्यामुळे हिंदू भारतात शासनसंस्था आणि धर्मसंस्था एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करताना कधी दिसल्याच नाहीत. या दोन शक्तींमध्ये संघर्षाची वेळ कधी आलीच नाही, या दोन्ही शक्ती परस्परांशी सहकार्यच करीत होत्या.

अशा स्थितीत भारतात ज्याप्रमाणे धर्मविरोधी सेक्युलॅरिझम चालू शकणार नाही त्याचप्रमाणे राष्ट्रीय सत्व हिरावून घेणारा सेक्यु-लॅरिझमदेखील प्रभावी ठरणार नाही. हिंदू माणूस शासनसंस्थेकडून एका किमान नैतिक दर्जाची अपेक्षा बाळगून असतो. मात्र राजकारण आणि धर्म या दोन्ही क्षेत्रांची सांगड घालण्याच्या भानगडीत तो सहसा पडत नाही. म्हणूनच मुसलमान लोक इस्लाम धर्माचे पालन करण्यास आणि आपले वेगळे अस्तित्व राखण्यास मोकळे असावेत, असे श्री. गुरुजींना वाटत होते. १९७२ साली नवी दिल्लीत दीनदयाळ संशोधन संस्थेचे उद्घाटन करताना ते म्हणाले होते, " राज्यघटनेच्या मार्ग-दर्शक तत्त्वांमध्ये सर्व नागरिकांना समान नागरी कायदा लागू केला जावा, असे म्हटले असले तरी मुसलमानांसाठी त्यांचा वेगळा कायदा चालू राहायला काही हरकत नाही." समान नागरी कायद्यामुळे राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागणार नाही का, असे त्यांना विचारले असता त्यांनी उत्तर दिले की, " नाही, तशी काही आवश्यकता नाही. भारतात सदैव विपुल वैविध्य राहिले आहे, आणि तरीही, प्रदीर्घ कालावधीसाठी आपण समर्थ आणि संघटित राष्ट्र राहिलो आहोत. एकात्मतेसाठी आपल्याला सामंजस्य आणि सुसंवादी सौहार्द्र हवे आहे, त्यासाठी एक-सारखेपणाचीच गरज आहे, असे नाही." नेपोलियनच्या राजवटीत जी कायद्यांची समानता अस्तित्वात आली तिच्यामुळे युरोपमध्ये अनेक देशांच्या एकीकरणाला मदत झाल्याचे जेव्हा त्यांना सांगण्यात आले

तेव्हा ते म्हणाले, "आपल्याला हे विसरून चालणार नाही की, युरोप हे अगदी अलीकडची तरुण संस्कृती लाभलेले अगदी तरुण खंड आहे. ते काल अस्तित्वात नव्हते आणि कदाचित उद्या ते असणारदेखील नाही. अतिरेकी सारखेपणा निसर्गाला नको असतो, असे मला वाटते. युरोप-मध्ये आढळणाऱ्या त्या समानतेचा पाश्चिमात्य संस्कृतीवर भविष्य-काळात काय परिणाम होईल, हे इतक्या लौकर ठरवणे कठीण आहे. आपल्याला वर्तमानकाळाप्रमाणेच बऱ्याच पूर्वीच्या भूतकाळावर नजर टाकायला हवी, त्याचप्रमाणे लांबच्या भविष्यकाळाचेही भान ठेवायला हवे. अनेक कृतींचे परिणाम बऱ्याच उशिरा होत असतात, अप्रत्यक्षपणे होत असतात. आपल्याला या देशात हजारो वर्षांचा अनुभव परंपरेच्या रूपाने लाभला आहे. आपली जीवनपद्धती अनेक कसोटच्यांवर पारखली गेली आहे. आणि आपला अनुभव तर असा आहे की वैविध्य आणि एकात्मता यांची सांगड घातली जाऊ शकते, किंबहुना त्यांची सांगड घालणे अधिक श्रेयस्कर ठरते."

'आपले वेगळे अस्तित्व राखण्याच्या एकमेव हेतूने प्रेरित झाल्या-मुळेच मुसलमान समाज समान नागरी संहितेला विरोध करतो आहे, असे आपल्याला वाटत नाही का ?' या प्रश्नाला उत्तर देताना श्री. गुरुजींनी सांगितले होते की, "जोपर्यंत एखाद्या वर्गाचे, जमातीचे किंवा पंथाचे वेगळे अस्तित्व राष्ट्रभावनेच्या आड येत नाही तोपर्यंत त्या वेगळ्या अस्तित्वाला हरकत घेण्याची मला आवश्यकता वाटत नाही. मुसलमानांना चार बायका करण्याचा अधिकार असल्यामुळे मुसलमान लोकसंख्या इतरांच्या तुलनेने जास्त वेगाने वाढेल, असे वाटल्यामुळे काहीजण समान नागरी संहितेची मागणी करीत आहेत, असे मला वाटते. या प्रश्नाकडे पाहाण्याचा हा दृष्टिकोन माझ्या मते नकारात्मक आहे. हिंदू-मुसलमानांमध्ये खरा भ्रातृभाव नाही, ही खरी त्रासदायक गोष्ट आहे. सेक्युलॅरिस्ट म्हणवणारे लोकदेखील मुसलमानांना वेगळेच मानतात. अर्थात मुसलमानांच्या एक गठ्ठा मतावर डोळा ठेवून त्यांची खुशामत करणे हीच या लोकांची पद्धत असते. इतर काहीजण मुसल-मानांना वेगळे मानतात, त्यांची पद्धत असते– मुसलमानांचे वेगळेपण

नाहीसे करून त्यांना भुईसपाट करून टाकण्याची. या दोन्ही प्रकारच्या लोकांमध्ये मूलभूत फरक असा नाहीच. दोघेही मुसलमानांना आपल्यापेक्षा वेगळे मानतात, त्यांच्याशी जुळवून घेणे कठीण असल्याचे मानतात. आमचा या प्रश्नाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन पूर्णतः वेगळा आहे. या देशावर आणि इथल्या संस्कृतीवर ज्याचे प्रेम आहे अशा मुसलमानाने खाजगी जीवन आपल्या इच्छेनुसार, धार्मिक चालीरीतींनुसार घालवले तर त्याला आमची काहीच हरकत नाही. पण राजकारणी लोकांनी मुसलमानांची दिशाभूल केलेली आहे. केरळमध्ये मुस्लीम लीगचे पुनरुज्जीवन काँग्रेसनेच केले आहे आणि तसे करून संपूर्ण देशात मुस्लीम जातीयवादाला पुन्हा एकदा चालना दिली आहे."

बऱ्याच वर्षांपूर्वी, एका उर्दू महाविद्यालयातले पाच मौलवी चिदंबरम येथे श्री गुरुजींना भेटायला आले होते. त्यांच्याशी गप्पा मारताना त्यांना सहज गुरुजींनी विचारले होते, "काय हो, परमेश्वराला फक्त तुमचे कुराण आवडते आणि आमची गीता आवडत नाही, असे तुम्हाला वाटते का ? जर तुम्ही 'अल्ला' म्हणून पुकारलेत तरच तो तुमच्याकडे येईल आणि 'राम' म्हणून हाक मारलीत तर यायला नकार देईल, असे तुम्हाला वाटते का ? परमेश्वराला उर्दूशिवाय इतर भाषा समजतच नाहीत, असे तुमचे म्हणणे आहे काय ?" हिंदू जीवनदृष्टीबद्दल स्पष्टीकरण देताना मग ते म्हणाले होते, "प्रत्येक माणूस परमेश्वराची भक्ती आपल्याला हव्या त्या मार्गाने करू शकतो, असे आम्ही हिंदू मानतो. जर प्रयत्न प्रामाणिकपणे आणि निष्ठेने केलेला असेल तर कुणालाही— आणि सर्वांनादेखील— तो सापडू शकतो. आणि म्हणूनच हिंदू धर्म धर्मांतरे करीत सुटलेला नाही. 'माझा मार्ग तेवढाच खरा आहे आणि इतर सर्वांना त्याच मार्गावर आणले पाहिजे', असे गृहीत धरल्यामुळेच धर्मांतराची गरज भासू लागते."

'पण आता तर हिंदूंनी मुसलमानांचे आणि ख्रिश्चनांचे धर्मांतर करायला प्रारंभ केला आहे', असे एका मौलवींनी म्हणताच श्री गुरुजी म्हणाले, "हिंदू धर्माच्या दृष्टीने ते धर्मांतर नाही. पूर्वी परिस्थितीच्या

दबावाखाली ज्यांना आपला धर्म सोडून जाणे भाग पडले होते, त्यांना आपल्या पूर्वजांच्या धर्मात परत यायची ती एक संधी आहे. आपल्या देशात अवघे मूठभर मुसलमान बाहेरून आले होते, ही वस्तुस्थिती नाही काय ? इतर सर्वांनी वेगवेगळ्या कारणांसाठी धर्म बदलला, हे तर सर्वश्रुतच आहे. पूर्वजांच्या धर्मात परत येणे म्हणजे काही धर्मांतर ठरत नाही, ते एका वेगळ्या प्रकारचे स्वगृही परतणे आहे."

बऱ्याच वर्षांनंतर म्हणजे १९७१ साली विख्यात अरब विद्वान आणि पत्रकार डॉ. सैफुद्दिन जिलानी यांना कलकत्त्यात श्री गुरुजींनी सांगितले होते, "पाकिस्तानने पाणिनीची ५००० वी जयंती साजरी केली. का ? तर त्याचा जन्म आजच्या पाकिस्तानच्या प्रदेशात झाला होता. जर पाकिस्तान पाणिनीला आपला थोर पूर्वज मानू शकत असेल तर मग आमचे स्थानिक हिंदू मुसलमान मात्र– मी त्यांना मुद्दामच हिंदू मुसलमान म्हणतो– पाणिनी, व्यास, वाल्मीकी, राम, कृष्ण हे सर्व आपले थोर पूर्वज होते असे का बरे मानू शकत नाहीत ? रामकृष्णांना त्यांनी धार्मिक नेते मानण्याची गरज नाही, फक्त नेते मानावे. जसे सर्व इराणी लोक रुस्तुम आणि सोहराबला मानतात तसे !"

पारशी लोकांनी हिंदू समाजाशी आणि हिंदुस्थानशी कसे जुळवून घेतले आहे, ते मुसलमानांनी शिकावे, असा श्री गुरुजींनी सल्ला दिला. जर तसे झाले नाही तर अगदी पंडित नेहरूंसारख्या 'सेक्युलॅरिस्ट' नेत्याचा संयमदेखील सुटेल असे त्यांनी सांगितले. पंडित नेहरू एकदा म्हणाले होते, 'मी जेव्हा सेक्युलॅरिस्ट राज्याबद्दल बोलतो, तेव्हा त्याचा अर्थ काय असतो ? मद्रासमधल्या कुणातरी मुस्लीम लीगवाल्याला आवडत नाहीत म्हणून आम्ही आमच्या सर्व सांस्कृतिक संस्था मोडकळीला आणणार आहोत, त्याज्य मानणार आहोत की काय ? ज्याला या देशातल्या संस्कृतीबद्दल आदर वाटत नाही त्याने हा देश लौकरात लौकर सोडून गेलेले बरे ! जर या देशातले मुसलमान अजूनही मुस्लीम लीगच्या जुन्या तत्त्वज्ञानावरच विश्वास ठेवून असतील तर मग त्यांची पितृभूमी किंवा मातृभूमी किंवा जे काय असेल ते पाकिस्तान आहे, भारत नव्हे. भारतात खलिकुझ्झमान किंवा सुऱ्हावर्दी किंवा लारिस

यांच्यासारख्यांना मुळीच स्थान नाही, याबाबत माझ्या मनात तरी कोणताही संशय नाही."

जेव्हा सौदी अरेबियाच्या राजाने भारताच्या दौऱ्यावर असताना नेहरूंजवळ या देशातल्या मुसलमानांच्या स्थितीविषयी विचारपूस केली आणि मुसलमानांना चांगली वागणूक दिली जात असल्याचे जेव्हा नेहरूंनी त्याला सांगितले तेव्हा श्री गुरुजींनी पृच्छा केली, "मुस्लीम भारतीय हे भारतीय नागरिक आहेत, की सौदी अरेबियाचे आहेत ? सौदी राजाने अशी विचारपूस का करावी आणि त्याने केलीच तरी नेहरूंनी त्याला का म्हणून उत्तर द्यावे ?"

श्री गुरुजी नेहमी भारतीय जनसंघाच्या मद्रास शाखेचे पूर्वीचे अध्यक्ष बॅ. व्ही. व्ही. जॉन यांचे उदाहरण देत. श्री. जोन तामिळनाडूच्या सार्वजनिक जीवनातली एक बडी असामी होती. एके दिवशी इतर काही सद्गृहस्थांना बरोबर घेऊन ते गुरुजींच्या भेटीसाठी आले. त्या भेटीबद्दल खुद्द श्री गुरुजीच नंतर असे म्हणाले की, "भारतीय जनसंघाने मद्रास प्रांतातील त्यांच्या संघटनेचे अध्यक्षपद आपल्याला देऊ केल्याचे जोन यांनी सांगितले. मी जितका कट्टर हिंदू आहे तितकेच ते निष्ठावान ख्रिश्चन होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा जनसंघावर पगडा असल्याचा आरोप केला जातो, हे आपल्याला ठाऊक आहे का, असे मी त्यांना विचारले. त्यावर ते म्हणाले, 'अखेरीस हे हिंदू राष्ट्र आहे. प्रत्येकाने ही उघड वस्तुस्थिती मान्य केलीच पाहिजे. आणि म्हणूनच योग्य तो विचार करून मी ते अध्यक्षपद स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. हिंदू राष्ट्राबद्दलची आमची कल्पनाही अशीच आहे."

# प्रकरण सहावे : विचारधन

देशाची एकात्मता आणि स्वातंत्र्य, राज्यघटना, राष्ट्रसंरक्षण, परराष्ट्रीय धोरण, अर्थव्यवस्था आणि भाषाविषयक धोरण यांसारख्या वजनदार, गंभीर विषयांपुरतीच श्री गुरुजींनी आपल्या मतप्रतिपादनाची व्याप्ती मर्यादित ठेवलेली नव्हती. कोणत्याही लहानमोठ्या विषयांवर ते बारकाईने विचार करीत आणि त्यांच्या खास चुरचुरीत शैलीत भाष्यदेखील करीत.

हिंदू संहितेबद्दलचे विधेयक जेव्हा संमत झाले तेव्हा त्यांनी त्याला विरोध दर्शवला. पण त्यांचा तो विरोध त्या विधेयकातील तरतुदींपेक्षा त्याच्या संकल्पनेबाबत जास्त होता. हिंदू संहितेचे मनुस्मृतीबरोबर असणारे जुने नाते तोडून टाकण्यामागचे कारण त्यांना योग्य वाटत नव्हते. जनसामान्यांच्या दृष्टीने रूढीच सर्वश्रेष्ठ असते, असे सांगून ते म्हणाले होते, "युगानुयुगे आपल्याकडे अनेकानेक संहिता अंमलात आणल्या गेल्या आहेत आणि त्यांच्यामुळे आपले काही नुकसान झालेले नाही. अगदी परवापर्यंत केरळमध्ये मातृसत्ताक कुटुंबपद्धती अस्तित्वात होती. त्यामुळे कुठे काय बिघडले होते ? प्राचीन आणि आधुनिक अशा सर्व कायदेकारांनी रूढीचे कायद्यावरचे वर्चस्व मान्य केलेले आहे. 'शास्त्रात् रूढीर्वर्धयति ।' शास्त्रांपेक्षा रूढी अधिक कार्यक्षम असते, असे आपल्याला धर्मग्रंथ सांगतात. आणि रूढी म्हणजे स्थानिक गटाची संहिताच असते. सर्व समाजांमध्ये स्थानिक रूढीला किंवा संहितेला असणारा आधार व

महत्त्व मान्य करण्यात आले आहे."

अनुसूचित जातीजमातींच्या संदर्भात मत व्यक्त करताना श्री गुरुजी म्हणाले होते, "त्यांना आपण विनाकारण कमी दर्जाचे लेखत आहोत. आसाममध्ये 'आदिवासी टोळीवाले' म्हणून नोंदल्या गेलेल्या लक्षाधीशांच्या मुलांना केवळ ते 'टोळीवाले' आहेत म्हणून मोफत शिक्षण देणे किंवा त्यांच्याकडून आयकर वसूल न करणे हास्यास्पद आहे. ते या देशाचे अभिन्न अंग आहेत. हे तथाकथित आदिवासी टोळीवालेच राणा प्रताप आणि शिवाजीच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्य-सेनेचे आधारस्तंभ होते."

हे आदिवासी प्राण्यांची पूजा करतात म्हणून त्यांना बिगरहिंदू मानणे चुकीचे असल्याचे सांगून श्री गुरुजी म्हणत, "सगळे हिंदू प्राणि-मात्रांची पूजा करणारेच आहेत. मीसुद्धा पिंपळाच्या झाडाची आणि सापाची पूजा करतो. या देशातले लोक सर्व वस्तूंमध्ये परमेश्वर पाहा-तात आणि प्रत्येक संभाव्य प्रतीकाच्या माध्यमातून त्याची पूजा करतात. सुब्रह्मण्यमच्या मंदिरात मोरांची तर शिवालयात सापांची, विष्णु-मंदिरात माकडांची किंवा गरुडांची पूजा केली जाते. कोणत्या ना कोणत्यातरी स्वरूपात हिंदू माणूस प्रतीकांची पूजा करीत असतो. जीवनाची आणि निसर्गाची पूजा बांधणारा प्रत्येक माणूस त्या दृष्टीने प्राणिपूजक असतोच. नागांची पूजा केली जाते तो नागपंचमी हा सण हिंदू पंचांगातला अत्यंत महत्त्वाचा दिवस मानला जातो. आणि असे असूनही ख्रिस्ती पाद्रयांच्या सल्ल्यावरून, त्यांच्या आग्रहामुळे हिंदू नागांना बिगरहिंदू समजण्यात येते आणि त्यांना सापत्नभावाची वाग-णूक दिली जाते, हे खेदावह नाही काय ?"

"प्राण्यांच्या पूजेत असे विचित्र किंवा घृणास्पद काय आहे ? ज्ञानविज्ञानाचे भांडार असणाऱ्या आपल्या वेदांमध्ये यम, वरुण, वायू, सूर्य, अग्नी इत्यादींच्या प्रार्थना आढळतात, त्यांची आराधना करण्याचा मार्ग दिसतो. वैदिक संतांनी या साऱ्यांना दूरच्या शक्ती किंवा देवता मानले होते असे म्हणणे चुकीचे ठरेल. कारण खरी वस्तुस्थिती अशी आहे की वेगवेगळ्या देवतांच्या प्रार्थना करीत असतानादेखील त्या

असंख्य नावांच्या, आकारांच्या, खुणांच्या आणि प्रतीकांच्या मागे उभी असणारी शक्ती एकच आहे, हे त्या ऋषींनी न चुकता ठासून सांगितले होते. एकेश्वरवादाचे आणि अद्वैत तत्त्वज्ञानाचे थोर उद्गाते भगवान शंकराचार्य यांनीदेखील शिव, विष्णू, सूर्य, गणपती आणि शक्ती या पाच देवतांच्या वेगवेगळ्या आराधनेला मान्यता दिली होती. त्यांनी स्वतःच या पाच देवतांना एकत्र आणून, त्यांचे 'पंचायतन' कल्पून, त्या पंचायतनाची पूजा आपल्या देशात सुरू केली. वेगवेगळ्या आकार-आविष्कारांमागे उभी असणारी खरी मूळ शक्ती एकच आहे, ही तर आपली आधारभूत श्रद्धा आहे. परमेश्वराची भक्ती करणाऱ्या– मग ती भक्ती कोणत्याही पद्धतीने केलेली असो, दगडांची असो किंवा झाडांची असो, नद्यांची असो अगर पर्वतांची असो, मूर्तींची असो किंवा ध्येयांची असो– आपल्या सर्व लोकांची एकात्मता साधणे हाच तर आपला खरा हेतू आहे."

लोकसंख्या-नियंत्रणाच्या कृत्रिम पद्धतींची आपल्या देशाला खरी गरज नाही, असे श्री गुरुजींचे म्हणणे होते. १९५८ साली मला दिलेल्या एका खास मुलाखतीत ते म्हणाले होते, " जर तुम्ही माणसाला सुरक्षितता प्राप्त करून दिली आहे तर तो एका विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त मुलांना जन्मास घालत नाही, हे सर्वश्रुत आहे. खरा उपाय माणसाचे कुटुंब मर्यादित करणे नसून त्याला काम मिळवून देणे हा आहे. ज्यांना असाध्य रोगांनी पछाडले आहे किंवा जे अट्टल गुन्हेगार आहेत अशा पुरुषांवर नसबंदीची शस्त्रक्रिया केली गेली तर मी समजू शकतो, पण गरिबांवर ती का केली जावी, हे मला समजत नाही. गरीब असणे हा काही गुन्हा नाही. ते लोक जन्म-नियंत्रणाची भाषा बोलतात, पण स्वयं-नियंत्रणाची भाषा ते बोलत नाहीत. वाढवता येणे त्यांना शक्य आहे त्यापेक्षा जास्त मुले झाली नाहीत की त्यांचे काम झाले, मग त्या अनिर्बंध लैंगिक व्यवहारांमुळे काहीही सावळागोंधळ माजला तरी त्यांची काही हरकत नसते. गर्भातील जिवाचा खून करण्यास परवानगी देण्यासारखेच ते वर्तन आहे. अशा समाजातले लोक अनैतिक पशूच होतील."

विज्ञानामुळे, विशेषतः अँटिबायोटिक्सचा शोध लागल्यामुळे मृत्यूचे प्रमाण कमी झाले असून लोकसंख्या वाढते आहे. तेव्हा अशा स्थितीत जन्माचे प्रमाण कमी करण्यासाठी विज्ञानाचा उपयोग करून घेतला तर काय हरकत आहे, असे त्यांना विचारले असता श्री गुरुजी म्हणाले, "लोकसंख्येचे नियंत्रण आपोआपच होत असते. निसर्ग स्वतःच्या पद्धतीने वागत असतो. प्रत्येक युद्धापूर्वी आणि नंतर जन्माचे प्रमाण बरेच वाढल्याचे आढळून आले आहे. आपले अस्तित्व नष्ट होण्याच्या धोक्याची ती एक स्वयंस्फूर्त प्रतिक्रिया असते. त्याचप्रमाणे परिस्थिती सुधारली आणि माणसांना पुरेशी सुरक्षितता वाटू लागली की जनन-प्रमाणात आपोआपच घट होते. या जगात येणाऱ्या सर्व मुलांना जेवू-खाऊ घालण्याइतके आणि निवारा मिळवून देण्याइतके हे जग मोठे आहे, असे मला वाटते. अडचण आहे ती ही की माणसे या माता वसुंधरेचा मोकळेपणाने आणि सारखेपणाने फायदा करून घेत नाहीत. ते मोठमोठ्या भिंतींची कुंपणे उभारतात आणि जमिनीवरील मालकीची मक्तेदारी निर्माण करतात. आणि तरीही अजून मोकळी जागा बरीच आहे. ती मोकळी जागा ताब्यात घेऊन तिचा योग्य उपयोग करण्याचा विचारदेखील आपले सरकार करीत नाही, उलट राष्ट्रीय कुटुंब मर्यादित करण्याचाच त्याचा प्रयत्न आहे. हा सारा दृष्टिकोन पराभूत मनोवृत्तीचा द्योतक आहे. नवे उपक्रम हाती घेणे तर बाजूलाच राहिले, परदेशात राहाणाऱ्या आणि हताश झालेल्या भारतीयांशी संपर्क कायम राखणेदेखील आपल्याला जमलेले नाही. आपण त्यांच्यासाठी काहीही करत नाही, करू शकत नाही. अशा स्थितीत मायदेशी परतण्याचे धाडस फारच थोडे लोक करू शकतील."

स्थलांतरितांबद्दलच्या धोरणात आढळणाऱ्या वांशिक भेदभावांमुळे वंशयुद्धे उद्‌भवण्याचा धोका आहे, अशी भीती व्यक्त करताच ते म्हणाले, "मला नेमकी कल्पना नाही, पण तसे घडू नये असे मला वाटते. पण यदाकदाचित उद्या तसे युद्ध झालेच तर अधिक पुरुषार्थी लोक ते जिंकतील."

आणखी दहा वर्षांनी दिलेल्या दुसऱ्या एका खास मुलाखतीत

श्री गुरुजी म्हणाले होते, " या कार्यक्रमाला 'कुटुंबनियोजन' असे का म्हटले जाते हेच मला समजत नाही. कुटुंबे मर्यादित करण्यासाठी माणसांना मदत करण्याबरोबरच अपत्यहीन लोकांना मुले व्हावीत म्हणून करावयाच्या उपायांचाही या कार्यक्रमात समावेश असता तरच ते नियोजन ठरले असते. या कार्यक्रमात तर तशी कोणतीच तरतूद नाही. खूप मुले होण्यातल्या धोक्याबद्दलचा हा आरडाओरडा माझ्या मते वेगळ्याच खोडसाळ हेतूने केला जातो आहे. सरकारच्या अपयशाचे खापर 'लोकसंख्या खूप वाढली' या सबबीवर फोडण्याचा हा बेत आहे आणि भारतीय लोकसंख्या कमी होत असेल तर विदेशी शक्तींना ते हवेच आहे. त्या संदर्भात मदत करायला त्या उत्सुक असणे स्वाभाविक आहे. संख्याबळाचे महत्त्व, लोकसंख्या आणि सामर्थ्य यांचे नाते त्या शक्तींना पुरेपूर ठाऊक आहे." कृत्रिम संततिनियमनाच्या साधनांबद्दल बोलताना ते म्हणाले, "ही कृत्रिम साधने फार धोकादायक आहेत. ग्रंथींच्या कार्यात हस्तक्षेप करणारी नसबंदी माणसाच्या शरीरातला हार्मोन्सचा समतोल बिघडवून टाकते आणि त्या माणसाच्या आरोग्या-वर, मन:स्थितीवर विपरीत परिणाम घडवते. लाखो लोकांच्या आरोग्याशी, समाधानाशी आणि मानसिक स्वास्थ्याशी खेळ खेळण्याचा हा कार्यक्रम ज्या निष्काळजीपणाने सरकारतर्फे राबवण्यात येतो आहे तो पाहून मला आश्चर्य वाटते." नसबंदी झालेल्या माणसांची मानसिक शक्ती काही प्रमाणात कमी होते, असेही त्यांनी सांगितले.

निदान सामाजिक आणि धार्मिक समारंभात तरी आपण परदेशी वेष धारण करू नये, असा श्री गुरुजींचा आग्रह होता. पँट आणि कोट घातलेल्या वराला पाहून लग्नमंडपात न शिरताच ते परतल्याचे प्रसंगही काही वेळा घडले होते. १९४५ साली गुरुजी जयपूरहून दिल्लीला चालले होते. रेवरी स्थानकावर त्यांना भेटण्यासाठी दिल्लीचे एक स्वयं-सेवक आले होते. त्यांच्या नमस्काराचा स्वीकार केल्यावर गुरुजी त्यांना म्हणाले, "आता काय, तुम्ही अगदी इंग्रज होणार! सूट काय, टाय काय..." त्यांच्या बोलण्यात त्या पोशाखाबद्दलचा तिरस्कार प्रतिबिंबित झाला होता. ते ओळखून त्या स्वयंसेवकाने स्पष्टीकरण देऊ केले,

" इथल्या स्थानिक महाविद्यालयात गणिताचा प्राध्यापक म्हणून माझी नियुक्ती झाली आहे." त्यावर श्री गुरुजींनी विचारले, " तुमची नियुक्ती गणिताचे प्राध्यापक म्हणून झाली आहे, की परदेशी पोषाखाचे प्रदर्शक म्हणून !"

याच संदर्भातली एक आठवण सांगताना ते म्हणाले होते, " बनारस हिंदू विद्यापीठात मी तीन वर्षे अध्यापनाचे काम केले. पण माझ्या धोतरामुळे मी शिकवलेले प्राणिशास्त्र समजत नसल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी कधीच केली नाही. नागपूरच्या एक न्यायालयात मी एकदा वकील म्हणून उभा राहिलो. न्यायमूर्ती म्हणाले, तुमचा वेष योग्य नाही. मी त्यांना सांगितले की, माझा वेष योग्य आहे. माझा कुडता, उपरणे, धोतर आणि चपला जशा हव्यात तशाच आहेत. त्यानंतर मग त्यांनी कधी माझ्या पोशाखाबाबत तक्रार केली नाही."

खासदार जर क्रिकेटचा सामना खेळू शकतात तर मग ते कबड्डी मात्र का खेळत नाहीत, असा प्रश्न ते नेहमी विचारीत. ॲलोपथीबाबत ते म्हणत, " माझा त्या चिकित्सापद्धतीवरचा विश्वास आता अगदी संपुष्टात येत चालला आहे. ही अँटिबायोटिक्स फक्त रोगच नव्हे तर रोग्यालादेखील खलास करून टाकतात." आपल्या सैन्यातल्या वेगवेगळ्या आज्ञांबद्दल ते म्हणत, " एक तृतीयांश आज्ञा संस्कृतमध्ये आहेत, एक तृतीयांश इंग्रजीत तर उरलेल्या एक तृतीयांश पार्शियन भाषेत आहेत. राष्ट्रीय एकात्मता साधण्याचा हा प्रकार जरा विचित्रच आहे."

'नॅशनल डिसिप्लिन स्कीम'चे एक अधिकारी श्री गुरुजींना भेटायला आले. आपल्या योजनेत सहभागी झालेली माणसे रस्त्यावर आल्यानंतर इतर लोकांपेक्षा जास्तच बेशिस्तीने वागतात, असा त्यांचा अनुभव होता. शिस्त अंगी बाणावी म्हणून रा. स्व. संघ काय करतो, ते त्यांना जाणून घ्यायचे होते. श्री गुरुजींनी त्यांना एकाच शब्दात सांगितले– ध्येयवाद ! मातृभूमीवरचे प्रेम हेच संघाचे तत्त्वज्ञान होते आणि तोच ध्येयवाद संघकार्यकर्त्यांना शिस्तीने वागायचे धडे देत होता.

जाहिरातींमध्ये स्त्रियांचा वापर करणे गुरुजींना आवडत नसे. ते

म्हणत, "एखादी स्त्री दाखवल्याशिवाय अलीकडे कोणतीही जाहिरात पूर्ण होत नाही. दाढीच्या एका ब्लेडच्या जाहिरातीतही स्त्री आहे. कशासाठी ? रेझर ब्लेडशी स्त्रीचा काही संबंध तरी आहे का ? आपण किती खाली खाली जात चाललो आहोत, तेच यावरून दिसते आहे. महिलांनी याविरुद्ध आवाज उठवला पाहिजे."

अमानुष प्रयोगांसाठी वापरता यावीत म्हणून होणाऱ्या माकडांच्या निर्यातीचा वृत्तांत ऐकून त्यांना धक्काच बसला होता. त्याबाबत ते म्हणाले होते, "माणूस किती अमानुष झाला आहे ! कधीही न संपणाऱ्या आपल्या गरजा भागवता याव्यात यासाठी परमेश्वराने निर्माण केलेल्या सृष्टीतल्या एका प्राण्याचे असे शोषण करणे किती अन्याय्य आहे ! परमेश्वराने निर्मिलेले सारे जग पवित्र आहे. माझ्यापुरते बोलायचे झाले तर, मी एखाद्या मुंगीला अजाणतेपणाने जरी त्रास दिला तरी मला दुःख होते."

'जन गण मन' हे राष्ट्रगीत संपादित करण्याचा काहीजणांनी उद्योग आरंभला होता, त्याबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना श्री गुरुजी म्हणाले, "आपण सतत आपल्या सीमा संकुचित करीत आलो आहोत. त्यामुळे आपले संस्कार मर्यादित होऊ लागले आहेत." मुंबईतील काही नेते 'जनगणमन'मधील 'पंजाब सिंध गुजराथ मराठा द्राविड उत्कल बंगाल' या ओळीतला 'सिंध' हा शब्द काढून टाकण्याच्या प्रयत्नात होते, त्याला पंडित नेहरूंनीदेखील हरकत घेतली होती आणि अशी कोणतीही काटछाट न करता ती संपूर्ण ओळ म्हटली जावी असा आदेश दिला होता. नेहरूंची ती कृती अगदी योग्य असल्याचे मत गुरुजींनी व्यक्त केले होते.

दुधाचा तुटवडा लक्षात घेऊन पश्चिम बंगाल सरकारने संदेश मिठाईच्या निर्मितीला बंदी घातली तेव्हा गुरुजी म्हणाले, "मला या आदेशाचा अर्थच समजत नाही. अखेरीस दूध हे अन्न आहे; ते पूर्णान्न आहे असे म्हणतात. आणि त्या वस्तूचा तुटवडा पडला असेल तर उत्पादन वाढवणे हा त्यावरचा उपाय आहे. पण कुणीही तसा विचार करीत नाही. पंजाबमधल्या तरण्या गायी कलकत्त्याला नेल्या जातात

आणि त्या फक्त एकदा गाभण राहिल्या की नंतर सरळ कत्तलखान्यात पाठवल्या जातात. मुख्यमंत्री सेन यांनी या कत्तलीवर बंदी घालून पाहावी. तसे केल्यास त्यांना असे दिसेल की, बंगालला हवे तितके दूध सहज उपलब्ध होऊ शकते आहे– हो, अगदी 'संदेश'साठी देखील !"

१९६३ साली १४ कॅरट सोन्याबाबतचा आदेश निघाल्यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना ते म्हणाले होते, "आपण अगदी सोन्यात-देखील भेसळ करायला हवी का ?" कसायांना रोजगार मिळतो, या मुद्द्यावर सरकारने गोहत्येचे समर्थन केल्याचे कुणीतरी सांगताच ते म्हणाले, "सुवर्णनियंत्रण कायदा जारी करून हजारो सोनारांची घरे उद्ध्वस्त करताना ज्या सरकारला थोडीसुद्धा लाज वाटली नाही, त्या सरकारला गोहत्येवर जगणाऱ्या कसायांबद्दल एवढी कणव वाटावी, हे किती विकृत आहे !"

काही टीकाकार रा. स्व. संघाभोवतीच्या रहस्यमय वलयांबद्दल बोलत, त्या बाबतीत श्री गुरुजी म्हणाले होते, "नुकताच एका नियत-कालिकामध्ये– 'रा. स्व. संघाचे रहस्य'– असा लेख प्रसिद्ध झाला आहे. चांगले सुशिक्षित वाटणारे लोकदेखील रहस्याची आणि चमत्कारांची भाषा उच्चारताना पाहून मला आश्चर्य वाटते- जोपर्यंत एखादी गोष्ट तुम्हाला समजलेली नाही, तोपर्यंत ती तुम्हाला गूढ, रहस्यमय वाटणारच." आपले म्हणणे अधिक स्पष्ट करून सांगताना ते म्हणाले, "सुमारे तीस वर्षांपूर्वी मी डॉक्टरांना भेटण्यासाठी काही स्वयंसेवकांना घेऊन अकोला स्थानकावर गेलो होतो. गाडीने जेव्हा स्थानकात प्रवेश केला तेव्हा एक खेडूत धापा टाकीत पळत येताना आम्हाला दिसला. मी त्याला विचारले, 'तुम्हाला काय हवे आहे ?' त्यावर त्याने उत्तर दिले की, 'या गाडीच्या इंजिनात ती ओढण्यासाठी किती बैलांना जोडण्यात आले आहे ते मला पाहायचे आहे.' त्याने आगगाडी पूर्वी कधीच पाहिली नव्हती आणि साहजिकच तो गाडी ओढण्यासाठी घोडे जुंपले असतील असा विचारदेखील करू शकला नव्हता. त्याच्या डोक्यात आपली बैलगाडीच होती. रा. स्व. संघावर रहस्यमयतेचा आरोप करणाऱ्या लोकांकडे पाहून मला त्या खेडूताची आठवण होते.

फरक फक्त एवढाच की त्या खेडुताची निरागसता या लोकांजवळ नसते."

काही लोक म्हणत की रा. स्व. संघ गुप्तपणे काम करतो आणि खूप गोष्टींबाबत गोपनीयता पाळतो. त्याबाबत श्री गुरुजी म्हणत, "रा. स्व. संघ ही सगळ्यात जास्त खुली संघटना आहे. ती सार्वजनिक मैदानांवरच काम करते. तिची काम करण्याची पद्धत वेगळी आहे, सौम्य आहे. कारण हिंदू संस्कृतीच तशी आहे. उदाहरणार्थ– आपल्याकडे एखादा माणूस प्रवासाला निघाला असेल तर त्याची बायको अगदी शांत दिसेल, ती हसत राहाणार नाही किंवा रडतही बसणार नाही. फार फार तर ती आपल्या पायाने जमीन उकरत राहील. उलटपक्षी अशाच स्थितीत पाश्चिमात्य स्त्री वेगळ्या रीतीने वागेल. ती म्हणेल, 'मी त्याला कधीच सोडणार नाही, काय वाटेल ते झाले तरी सोडणार नाही!'"

स्वयंसेवकांच्या मनात श्री गुरुजींबद्दल अतीव आदर होता. ते मात्र स्वयंसेवकांकडे कमालीच्या मायेने, आस्थेने आणि सहानुभूतीने पाहात असत. एकदा एका समारंभात व्यासपीठावर पादत्राणे चढवताना त्यांच्या एका पायातली चप्पल खाली पडली. एक स्वयंसेवक ती चप्पल घेऊन धावत व्यासपीठावर गेला. त्याला गुरुजी म्हणाले, "कुणाचेही जोडे उचलणे हे स्वयंसेवकाचे काम नाही. त्याचे काम फक्त एकच आणि ते म्हणजे भारतमातेची सेवा!" एकदा संघस्थानावर एक स्वयंसेवक एकटा बसलेला त्यांनी पाहिला. वेदनांनी विव्हळत होता. त्यांनी विचारपूस केली तेव्हा त्याच्या पायात काटा मोडल्याचे त्याने सांगितले. गुरुजी पटकन खाली बसले आणि काय होते आहे हे त्या स्वयंसेवकाला कळण्यापूर्वीच क्षणार्धात तो काटा काढून टाकला.

गुरुजींच्या पन्नासाव्या वाढदिवशी दिल्लीच्या ओखला नावाच्या उपनगरात त्यांचे 'गुरुजी की जय' अशा घोषणांनी स्वागत केले. अशा व्यक्तीवाचक घोषणा थांबवायला त्यांनी सांगितले, पण तरीही घोषणा थांबेनात. तेव्हा ते सरळ आपल्या डब्यात जाऊन बसले आणि नंतर बाहेर यायला त्यांनी स्पष्ट नकार दिला. वृत्तपत्रीय प्रसिद्धीच्या आणि

छायाचित्रांच्या ते इतके विरुद्ध होते की, ‘माझे काढलेले प्रत्येक छायाचित्र माझे आयुष्य कमी करते आहे’ असे ते म्हणत,

पंडित नेहरूंनी त्यांना फारशी चांगली वागणूक दिली नव्हती. विशेषत: १९४७–४८ मध्ये गुरुजींना बरेच अपमानास्पद पद्धतीने वागवण्यात आले होते, पण गुरुजींचा त्यांच्याबद्दलचा दृष्टिकोन मात्र नेहमीच सौजन्यपूर्ण होता. व्यवस्थित सत्तांतर घडवून आणण्याचे श्रेय ते पंडित नेहरूंनाच देत. लंडनमध्ये काही भारतीयांनी जेव्हा नेहरूंविरुद्ध निदर्शने केली तेव्हा परक्या देशातल्या त्या निषेधाचा त्यांनी धिक्कार केला. सिंहगडावर शिवाजीच्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी नेहरू जाणार होते आणि त्यावेळी साम्यवाद्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर त्यांच्याविरुद्ध निदर्शने करण्याचा निर्णय घेतला होता. ‘त्या स्वागतार्ह कार्यासाठी नेहरू येत असताना त्यांचे स्वागतच व्हायला हवे,’ असे मत श्री गुरुजींनी त्यावेळी व्यक्त केले होते.

आणि आपल्या मुलीला सर्व दौऱ्यांत बरोबर नेल्याबद्दल जेव्हा काही लोकांनी पंडितजींवर टीका करायला सुरुवात केली तेव्हा त्यांनी पंडितजींचे समर्थन केले होते. “खरोखरच पंडितजींच्या या वर्तनामुळे या लोकांनी का अस्वस्थ व्हावे, हेच मला समजत नाही. अखेरीस, या उतारवयात, आयुष्याच्या या उत्तरार्धात नेहरूंजवळ त्यांच्या अशा खास कोणत्या वस्तू राहिल्या आहेत की ज्यांच्यापासून त्यांना थोडाफार दिलासा मिळू शकेल ? त्यांच्या एकुलत्या एक मुलीशिवाय त्यांच्याजवळ असे काय आहे ? मी जरी संसारी माणूस नसलो तरी पंडितजींच्या भावना मी समजू शकतो. पण इतर संसारी माणसांनादेखील हे समजू नये, हे आश्चर्यकारक नव्हे काय ?”

‘आपली मुलगी या देशावर लादण्याचा पंडितजी प्रयत्न करू शकतील.’ असे कुणीतरी म्हणताच गुरुजींनी सांगितले होते, “त्यात गैर काहीच नाही. आपली मुले मोठी व्हावीत आणि ते आपल्याला पाहायला मिळावे असे प्रत्येक पित्यालाच वाटत असते आणि तसे वाटण्यात चुकीचे काय आहे ? जवाहरलालजींना पुढे आणण्यासाठी पंडित मोतीलाल नेहरूंनीदेखील खूप प्रयत्न केले होतेच की ! अर्थात

सार्वजनिक क्षेत्रात नेतृत्व टिकवणे हे ज्याच्या त्याच्या अंगच्या गुणांवरच अवलंबून असते !"

पुढे बऱ्याच वर्षांनंतर जेव्हा इंदिराजींच्या बऱ्याच प्रसिद्धी लाभलेल्या तिरुपतीच्या यात्रेवर काहीजणांनी ती 'राजकीय यात्रा' असल्याचा आक्षेप घेतला तेव्हादेखील गुरुजींनी म्हटले होते, "ही टीका सौजन्यहीन आहे. मला तरी इंदिराजींची यात्रा राजकीय हेतूंनी प्रेरित झालेली वाटत नाही. त्यांनी ती भक्तिभावनेनेच केलेली असणार. लोकप्रियतेच्या, प्रतिष्ठेच्या आणि सत्तेच्या उपभोगात मग्न असणाऱ्या माणसाच्या आयुष्यातही असा एखादा क्षण येतो की त्याला त्या सर्व खेळात रस वाटत नाही. तो काहीसा अंतर्मुख होतो. मनातली सारी व्यवधाने बाजूला ठेवून परमेश्वराचे, जगन्नियंत्याचे चिंतन करण्यातले समाधान आणि दिलासा तो मिळवतो. ती ओढ– तो आतला साद– आपणा सर्वांतच अस्तित्वात आहे. ते सुप्त संस्कार कधीतरी उसळी मारून वर येतात आणि आपल्या खऱ्या स्वरूपाचे आपल्याला दर्शन घडवतात. इंदिराजींवर फार लहान वयातच असे सखोल आणि पवित्र संस्कार झाले होते, हे मला ठाऊक आहे. त्यांची आई म्हणजेच कमला नेहरू या अगदी भाविक हिंदू होत्या. जेव्हा जेव्हा त्या कलकत्त्याला जात तेव्हा तेव्हा त्या न चुकता बेलूर मठाला भेट देत. त्यावेळी त्यांच्याबरोबर त्या आपल्या मुलीला म्हणजेच इंदिरेलाही नेत. रामकृष्ण आश्रमातल्या अनेक ज्येष्ठ स्वामींना हे ठाऊक आहे. ही पार्श्वभूमी असताना भक्तीचे एक अग्रगण्य केंद्र असणाऱ्या देवळाला त्यांनी भेट दिली तर त्यात अनैसर्गिक असे काय आहे ? त्यांच्या त्या भेटीत राजकीय हेतू असावा, असे कुणीही का बरे मानावे ?"

आणि गांधीजींच्या मुसलमानांबद्दलच्या धोरणातल्या काही बाबींशी इतर अनेकांप्रमाणेच गुरुजींचाही मतभेद असला तरी गांधीजींबद्दल त्यांच्या मनात सर्वांत जास्त आदरभाव वसत होता. गांधी जन्मशताब्दीच्या वेळी ते म्हणाले होते, "आज एकाही गांधीवादी कार्यक्रमाची काँग्रेसकडून अंमलबजावणी होताना दिसत नाही. एक विशिष्ट पोशाख म्हणून काँग्रेसवाले खादी वापरतात, खेडेगावातल्या विणकराला मदत

व्हावी म्हणून नव्हे ! स्वातंत्र्यानंतर वीस वर्षे उलटून गेली असली तरीही आणखी सात वर्षांनी दारूबंदी करण्याची भाषा ते उच्चारतात आणि स्वतःचीच फसगत करून घेतात. आज सत्य कुठे आहे ? अहिंसा कुठे आहे ? स्वदेशी कुठे आहे ? जिथे अजून ग्रामराज्यही अस्तित्वात आलेले नाही तिथे रामराज्याची भाषा उच्चारण्यात काय अर्थ आहे ? जुन्या पंचायतीत वेगवेगळ्या जातींची आणि वर्गांची अनुभवी आणि वडील-धारी मंडळी असत. नव्या पंचायती म्हणजे केवळ भ्रष्टाचाराचे आणि जातीय राजकारणाचे अड्डे बनले आहेत. आज जर गांधीजींचा कार्यक्रम– मग तो गोरक्षणाचा असो किंवा हिंदीच्या प्रचाराचा असो– कुणी अमलात आणीत असेल तर ते आम्हीच आहोत."

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातला गांधीजींचा वाटा किती होता, याबद्दलचे मत व्यक्त करताना गुरुजी म्हणाले होते, "तो वाटा खूप मोठा आणि महत्त्वाचा होता, याबाबत माझ्या मनात मुळीच शंका नाही. स्वातंत्र्याचा संदेश त्यांनीच अगदी खेड्यापाड्यांपर्यंत पोचवला. ब्रिटिशांवर बहिष्कार घालण्यास त्यांनी जनसामान्यांना शिकवले. त्यांनी जनसामान्यांची तुरुंगात जायची तयारी करून घेतली. त्यांनी स्वातंत्र्य-लढ्याला विस्तृत असा जनमताच्या पाठिंब्याचा आधार प्राप्त करून दिला. लोकमान्य टिळकांचे अपुरे राहिलेले कार्य गांधीजींनीच आश्चर्य वाटेल इतक्या अल्पावधीत पूर्ण करून दाखवले."

'गांधीजींनी रा. स्व. संघाविरुद्ध कधी एक शब्द तरी उच्चारला होता काय ?' असे विचारल्यावर गुरुजींनी चटकन उत्तर दिले होते, "नाही, मुळीच नाही. माझ्या माहितीत तरी नाही. असफअलींनी एक लांबलचक तक्रार त्यांच्याकडे लिहून पाठवल्याचे मला आठवते. ती तक्रार त्यांनी 'हरिजन'मध्ये प्रसिद्ध केली होती– आणि त्याबरोबर अशी संपादकीय टिपणी जोडली होती की जर ही तक्रार खरी असेल तर ते दुर्दैव म्हणावे लागेल, परंतु रा. स्व. संघाच्या बाबतीतली ही तक्रार खरी असेल असे मला वाटत नाही."

गांधीजी आणि गुरुजी यांची फक्त एकदाच– १९४७ साली अखेरीस– भेट झाली होती. गुरुजींना भेटण्याची इच्छा गांधीजींनी व्यक्त

केली होती आणि त्यानुसार गुरुजी त्यांना जाऊन भेटले होते. नंतर काही वर्षांनी त्या भेटीची आठवण सांगताना श्री. गुरुजी म्हणाले होते, " आम्ही बोलत बसलो असताना गांधीजींनी आजूबाजूला सर्वत्र आढळणाऱ्या भयानक परिस्थितीचा उल्लेख केला. मी म्हटले, ' हे आपले दुर्दैव आहे. ब्रिटिश नेहमी म्हणत असत की ते इथून निघून गेले की आपण एकमेकांचे गळे आवळायला लागू. त्यांचे ते म्हणणे खरे करून दाखवण्याच्याच प्रयत्नात आपण आहोत. काही झाले तरी आपण हे थांबवायला हवे.' त्या संध्याकाळी, त्यांच्या प्रार्थनासभेत, त्यांनी माझ्या त्यांच्याबरोबरच्या चर्चेचा उल्लेख केला, श्रोत्यांना माझ्या भावना सांगितल्या आणि देशाचे नाव बद्दू होईल अशा प्रकारे न वागण्याचे त्यांनी आवाहनही केले."

गुरुजींचे हे सारे विचार आणि त्यांचे हे वेळोवेळी झालेले वर्तन संघ संस्कृतीचा अविभाज्य भाग बनले. कुणाच्याही विचारांना चालना देण्याचे बळ त्यात होते. कुणीही त्याची प्रशंसाच करी आणि म्हणूनच सरकारने जरी संघाला डावलण्याचे, नमवण्याचे प्रयत्न चालू ठेवले तरी देशातल्या अनेक सुविख्यात व्यक्तींनी संघाची ' एक अत्यावश्यक आणि मौलिक संघटना ' म्हणून प्रशंसाच केली. पंडित ओंकारनाथांसारख्या थोर संगीतकाराने अगदी बऱ्याच पूर्वी म्हणजे १९४९ साली सर्व गुजराथी तरुणांना संघात सामील व्हायचे आवाहन केले. दादरा आणि नगरहवेलीच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी काही संघस्वयंसेवकांना आर्थिक मदतीची गरज भासली तेव्हा लता मंगेशकरसारख्या जागतिक कीर्तीच्या गायिकेने त्यांच्यासाठी पुण्यात एक कार्यक्रम आनंदाने सादर केला होता. सर्व शंकराचार्यांनी आणि साधुसंतांनी संघाला आशीर्वाद दिले होते.

अनेक लष्करी अधिकाऱ्यांना संघ आवडला होता. १९५९ साली मंगलोर शाखेतील स्वयंसेवकांसमोर बोलताना त्या सर्व लष्करी अधिकाऱ्यांचे अग्रणी शोभतील असे जनरल करिअप्पा म्हणाले होते, " रा. स्व. संघाचे काम हे माझ्या मनातले काम आहे, मला मनापासून करावेसे वाटणारे काम आहे. जर मुसलमान लोक इस्लामाची प्रशस्ती गाऊ

शकतात, तर रा. स्व. संघ हिंदू धर्माची स्तवने गातो, यात काय चुकले ? माझ्या मित्रांनो, हितसंबंधी लोकांनी काढलेल्या अनुदार उद्गारांमुळे अस्वस्थ किंवा विचलित होऊ नका. या लोकोत्तर संघटनेचे संस्थापक डॉक्टर हेडगेवार यांनी मातृभूमीच्या निःसीम सेवेचे निःस्वार्थी व्रत घेण्याचे उज्वल ध्येय तुमच्या डोळ्यांसमोर ठेवले आहे. तेव्हा पुढे पाहा ! चालत राहा ! तुमच्याच सेवेची आज देशाला नितांत गरज आहे."

नामांकित भारतीय इतिहासकार डॉ. आर. सी. मुजुमदार यांनी १९६० साली कलकत्त्यातल्या हिवाळी शिबिरात भाषण करताना सांगितले होते, " डॉक्टर हेडगेवारांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची ध्येय-धोरणे मोठी काळजीपूर्वक ठरवली होती, आखली होती. माझ्या मनात त्यांच्याबद्दल अतीव आदरभाव वसतो आहे, राष्ट्रवादाच्या खऱ्या भावना जागवण्याचे आणि राष्ट्र खऱ्या अर्थाने समर्थ व शक्तिशाली बनवण्याचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून त्यांनी आपले कार्य सुरू केले होते. हिंदू हेच या देशातले खरे राष्ट्रीय लोक आहेत हे सत्य त्यांनीच मोठ्या धाडसाने जाहीर केले. अनेक लोकांना ही वस्तुस्थिती असल्याचे जाणवत असले तरी ते मान्य करायची लाज वाटते. पण हा देश हिंदू इतिहासाबद्दल, हिंदू संस्कृतीबद्दल आणि हिंदू परंपरेबद्दलच अभिमान बाळगू शकतो, हे आपण मान्य करायलाच हवे. या देशाच्या भव्य भूत-काळाबद्दल आणि थोर संस्कृतीबद्दल जे लोक बोलतात ते तो भूतकाळ हिंदू भूतकाळ होता आणि ती संस्कृती हिंदू संस्कृती होती असे म्हणा-यला का लाजतात, हेच मला समजत नाही."

पाकिस्तानातले भारताचे पहिले उच्चायुक्त श्री. श्रीप्रकाश यांनी डेहराडून शाखेच्या गुरुदक्षिणा उत्सवात बोलताना असे मत व्यक्त केले की, ' संस्कृती म्हणजे काही केवळ नाचगाणे नव्हे, तर सर्वांना हितावह ठरेल असे वर्तन करण्याची स्फूर्ती देणारी भावना होय.' भारतीय नीतिमूल्यांबद्दल रा. स्व. संघाला वाटणाऱ्या आस्थेची त्यांनी प्रशंसा केली. पुढे ते म्हणाले, " आपल्या देशाचे स्वातंत्र्य धोक्यात आणू

इच्छिणाऱ्या अनेक शक्ती आपल्याभोवती वावरत आहेत. भाषा, प्रांत, पंथ वगैरे भेदांवरून उद्भवणाऱ्या तंटयांमुळे या देशाची शकले उडतील, अशी भीती वाटू लागली आहे. पण संघातले तुम्ही कार्यकर्ते अखंडत्वाचे रक्षणकर्ते आहात. या देशाचे प्रश्न समजावून घ्या. या देशात एकात्मता निर्माण करण्यात आणि स्वातंत्र्य चिरकाल टिकवून धरण्यात तुम्ही यशस्वी व्हाल, असा माझा तुम्हाला आशीर्वाद आहे."

भारताचे सरन्यायाधीश या पदावरून निवृत्त झाल्यावर श्री. के. सुब्बाराव यांनी १९६८ साली बंगलोरच्या गुरुदक्षिणा उत्सवात भाषण केले होते. ते म्हणाले होते, "राष्ट्रीय एकात्मता ही ताजी घोषणा आहे. वृत्तपत्रे, आकाशवाणी, रेल्वेस्थानके यांच्या माध्यमातून– एवढेच नव्हे तर कायदे करूनदेखील– जनसामान्यांसमोर ती मांडण्याचा आता प्रयत्न केला जातो आहे. पण या तत्त्वाचे महत्त्व रा. स्व. संघाने मात्र फार पूर्वीच म्हणजे १९२५ सालीच ओळखले होते. रा. स्व. संघाबद्दल अनेक गैरसमज प्रचलित आहेत. 'सेक्युलर' नसल्याचा तिच्यावर आरोप केला जातो आहे. वस्तुस्थितीच अशी आहे की आपल्या राज्य-घटनेतही 'सेक्युलर' हा शब्द कुठे आढळत नाही, आपले सर्व विचार आणि जीवनपद्धती हिंदू धर्मातच सामावली गेली आहे. आता रा. स्व. संघ भारतात घरोघरी माहीत झाला आहे. देशाची या संघटनेकडून केली जाणारी निःस्वार्थ सेवा प्रत्येकाला माहीत झाली आहे. आपल्याला यापुढेही भरघोस यश मिळावे, अशी सदिच्छा मी व्यक्त करतो."

पुढे लोकसभेचे सभापती झालेल्या श्री. के. एस. हेगडे यांनी १९७३ साली असे उद्गार काढले होते की, 'रा. स्व. संघाच्या कार्य-पद्धतीची मला थोडीफार माहिती आहे आणि मला प्रभावित करणारे संघाचे तीन गुण म्हणजे प्रखर देशभक्ती, कमालीची शिस्त आणि आपल्या संस्कृतीवरची जाज्वल्य निष्ठा. सध्याच्या परिस्थितीतला नमुने-दार विरोधाभास कसा आहे तो पाहा. सरकारला असे वाटते की रा. स्व. संघाची संघटना पुरेशी देशभक्त नाही, ती राष्ट्रीय नाही, राष्ट्रीय प्रवाहात सहभागी झालेली नाही. पण त्याच वेळी जो पक्ष नेतृत्वासाठी, तत्त्वज्ञानासाठी, आणि मार्गदर्शनासाठी सतत एका परक्या देशाकडे

नजर लावून बसलेला आहे, ज्या पक्षाचे सदस्य त्या विदेशी सरकारचे हस्तक म्हणूनच इथे वावरतात तो पक्ष मात्र आपल्या सरकारला पुरेसा राष्ट्रीय वाटतो. सरकार त्या पक्षाशी सहकार्यदेखील करते. रा. स्व. संघापेक्षा साम्यवाद्यांमध्ये अधिक देशभक्ती आहे, असे सरकारला वाटणे आश्चर्यकारकच नाही काय ?"

पं. नेहरूंच्या मंत्रिमंडळात काही काळ गृहमंत्री आणि संरक्षणमंत्री असणाऱ्या डॉ. काटजूंनी अनेक वेळा रा. स्व. संघाच्या शिबिरांना आणि सभांना भेटी दिल्या होत्या. १९६३ साली अलाहाबादमध्ये संघाच्या अशाच एका सभेत बोलताना ते म्हणाले, "चिनी आक्रमणामुळे देशाला आपल्या विशेष एकात्मतेची चांगली जाणीव झाली आहे, पण ही एकात्मता सतत जपली पाहिजे– मग युद्ध असो किंवा शांततेचा काळ असो– रा. स्व. संघांच्या संस्थापकांना ही एकात्मताच संवर्धित करावयाची होती. हे राष्ट्र हिंदू राष्ट्र नाही, असे कोण म्हणतो ? रा. स्व. संघात त्या हिंदू राष्ट्राची छोटी प्रतिकृती पाहून मला आनंद झाला आहे."

उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश आणि पुढे १९६७ साली पंजाबचे झालेले मुख्यमंत्री श्री. गुरनामसिंग यांनी १९६३ साली लुधियाना शाखेच्या गुरुदक्षिणा उत्सवात भाषण केले होते. ते म्हणाले होते, "जो कुणी भारतमातेची पूजा करतो आणि तिच्यासाठी वाटेल तो त्याग करायला सिद्ध असतो तो प्रत्येकजण हिंदूच आहे. सैन्यातले शिपाई लढायला जातात ते साधा वेष परिधान करून जात नाहीत, तर त्यांचा ठरवून दिलेला गणवेष घालून जातात. हा वेगळा गणवेष घातला म्हणून काही कुणी त्यांना वेगळी जमात मानीत नाही. त्याचप्रमाणे हिंदू समाजावर होणारे हल्ले परतवून लावण्यासाठी गुरू गोविंदसिंहांनी योद्धयांची संघटना उभारली होती आणि त्या योद्धयांना गणवेष ठरवून दिला होता. (पंच क कार) त्यामुळे शीख ही काही वेगळी जमात ठरत नाही. ते आर्यसमाजी लोकांइतकेच हिंदू आहेत. गुरू गोविंदसिंगांनी 'संतसिपाही' तयार केले. म्हणजेच शांतताकाळात जे संन्यस्त वृत्तीने राहातील आणि ईशचिंतनात मग्न असतील पण अन्यायाविरुद्ध,

जुलमाविरुद्ध लढताना शस्त्रे धारण करतील असे संन्यस्त वीर निर्माण केले. आज रा. स्व. संघदेखील असे संतसिपाही तयार करण्याच्या कार्यातच गुंतलेला पाहून मला आनंद होत आहे."

१९७० साली जेव्हा सरकारने रा. स्व. संघावर बंदी घालण्याची धमकी दिली तेव्हा अनेक बुद्धिवंतांनी त्याचा स्पष्टपणे निषेध केला. 'सेक्युलर फोरम'चे प्रा. अ. भि. शहा म्हणाले, "देशात उद्भवणाऱ्या जातीय दंगलींना जबाबदार असल्याचा आरोप संघावर अनेक वेळा केला जातो. पण दयाळ आयोगानेदेखील– ज्या आयोगावर एक हिंदू, एक मुसलमान आणि एक ख्रिश्चन सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले होते– या निराधार आरोपातून संघाला पूर्ण मुक्त केले आहे." साम्यवादी नेते व श्रीमती सुभद्रा जोशींसारखे त्यांचे सहप्रवासी रा. स्व. संघावर बंदी घालण्याची मागणी करीत असताना तामीर-इ-मिल्लत इत्तेहदुल मुसलमीन किंवा काश्मीरमधील सार्वमत आघाडी यासारख्या उघडउघड जातीय संघटनांना मात्र सोयीस्करपणे विसरतात, हेदेखील प्रा. शहा यांनी दाखवून दिले होते.

स्वतंत्र पक्षाचे श्री. मधू मेहता म्हणाले होते, "रा. स्व. संघावर बंदी घालणे म्हणजे ज्वलंत देशभक्तीवर, शिस्तीवर आणि राष्ट्रीय उद्धाराच्या कार्याबद्दलच्या निष्ठेवर बंदी घालणे होय." सरकारने संघावर जर बंदी घातली तर संघाच्या अनुयायांची संख्या घटण्याऐवजी वाढेल आणि बंदीचे हत्यार एखाद्या बूमरँगप्रमाणे सरकारवरच उलटेल, असा इशाराही त्यांनी दिला होता.

'दि फायनान्शियल एक्स्प्रेस'चे संपादक श्री. जी. एम. लाड यांनी 'रा. स्व. संघ हे देशभक्तीचे आणि त्यागाचे उत्तम प्रतीक आहे. १९४७ साली आणि पुन्हा १९६५ साली संघाने आपण बावनकशी सोने आहोत हे सिद्ध केले आहे.' असे मत व्यक्त केले होते.

आणि संघाला खूप वर्षे विरोध करीत आलेल्या जयप्रकाश नारायणांनीदेखील १९६० साली गाझीपूर शाखेच्या स्वयंसेवकांसमोर केलेल्या भाषणात म्हटले होते की, "संघाची सगळी माहिती मला असल्याचा दावा मी करू इच्छित नाही. पण संघातले अनेक गुण आणि

अलीकडेच श्री गुरुजींबरोबर झालेले बोलणे यामुळे मी संघाकडे आकर्षिला गेलो आहे. माझी वृत्ती छिद्रान्वेषी नाही. संघ आणि सर्वोदय या दोन्ही चळवळी राजकारणापासून अलिप्त राहून समाजात क्रांतिकारक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. हे कार्यक्षेत्र खूप व्यापक आहे. विचारपद्धतीतील फरकामुळे एकमेकांना समजावून घेण्यात काही अडचणी येण्याची आवश्यकता नाही. पूर्वग्रहदूषित वृत्तीने न पाहाता वस्तुस्थितीचे अवलोकन केले तरच सत्य गवसू शकेल."

पूर असो किंवा दुष्काळ असो, युद्ध असो किंवा दुसरे कोणतेही आव्हान असो– लोकसेवेसाठी संघ कायम पुढे राहात आला आहे. १९६२ साली चीनने जेव्हा आपल्या देशावर आक्रमण केले तेव्हा रा. स्व. संघाने सरकारला संपूर्ण हार्दिक सहकार्य दिले. पंडित नेहरू त्यावेळी इतके प्रभावित झाले होते की, 'या जोशात फिरवली जाणारी ही लाठीसुद्धा बाँबचा यशस्वी मुकाबला करू शकेल' असे म्हणून त्यांनी संघकार्याची प्रशंसाच केली होती. १९६३ सालच्या दि. २६ जानेवारीच्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात भाग घेण्यासाठी त्यांनी रा. स्व. संघाच्या तुकडीला खास आमंत्रण दिले होते. अवघ्या तीन दिवसांचीच पूर्वसूचना मिळालेली असतानाही दिल्लीच्या २००० हूनही अधिक स्वयंसेवकांनी पूर्ण गणवेषात– पांढरा शर्ट, खाकी चड्डी, पट्टा, काळी टोपी आणि बूट घालून– संचलनात भाग घेतला. त्या संचलनाचे ते एक वैशिष्टच ठरले. संघस्वयंसेवकांच्या तुकडीमागे स्वयंसेवकांचाच वाद्यवृंददेखील होता. बॅगपाइप आणि बिगुल वाजवीत चालणाऱ्या त्या तुकडीनेही उपस्थित प्रेक्षकांवर छाप पाडली.

दि. २७ जानेवारी रोजी काँग्रेस संसदीय पक्षाच्या बैठकीत काही खासदारांनी प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात रा. स्व. संघाच्या सहभागाचा प्रश्न उपस्थित केला. पण पंडितजींनी त्यांना शांतपणे सांगितले की, सहभागी होण्याचे आमंत्रण सर्व नागरिकांना देण्यात आले होते आणि त्यानुसार संघाने भाग घेतला होता. त्यानंतर काही काँग्रेस खासदारांमध्ये गमतीशीर प्रश्नोत्तरे झाली, ती नंतर वृत्तपत्रांत प्रसिद्धही झाली. ती पुढीलप्रमाणे :

**एक खासदार** : दिल्लीतल्या काँग्रेस सेवादलानेही या संचलनात का भाग घेतला नाही ?

**दिल्लीतले एक ज्येष्ठ खासदार** : आम्ही भाग घेऊ शकलो असतो, पण आम्हाला गणवेशाची अडचण भासत होती.

**दुसरा खासदार** : कसली अडचण ?

**दिल्लीचे नेते असणारे खासदार** : अडचण म्हणजे ही की आमच्या-कडे फक्त २५० गणवेशच होते. रा. स्व. संघाचे लोक जास्त असणार, हे आम्हाला आधीपासूनच ठाऊक होते. त्यांच्या तुलनेने सेवादलाची कामगिरी अगदीच किरकोळ दिसली असती.

**पहिला खासदार** : रा. स्व. संघ आपल्या स्वयंसेवकांना गणवेश देत नाही. प्रत्येक स्वयंसेवक आपला गणवेश खरेदीच करतो.

१९६५ साली पाकिस्तानने भारतावर हल्ला केला तेव्हा श्री. लालबहाद्दुर शास्त्री पंतप्रधान होते. त्यांनी दि. ५ सप्टेंबर १९६५ रोजी तातडीने गुरुजींशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. गुरुजी त्यावेळी महाराष्ट्रात सांगलीला होते. शास्त्रीजींनी दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता दिल्लीत सर्व नेत्यांची बैठक बोलावलेली होती. त्या बैठकीला उपस्थित राहाण्याची गुरुजींना विनंती करून त्यांच्यासाठी मुंबईहून निघणाऱ्या सकाळच्या विमानात एक जागा आधीच आरक्षित करून ठेवल्याचे शास्त्रीजींनी सांगितले.

त्या बैठकीत गुरुजींनी रा. स्व. संघाच्या वतीने संपूर्ण सहकार्य देऊ केले. देशभरातल्या स्वयंसेवकांनी मोठ्या प्रमाणावर रक्तदान केले. खुद्द दिल्लीत, पोलिसांची काही कामे स्वयंसेवकांकडे सुपूर्त करण्यात आली. अधिक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडणे त्यामुळे पोलिसांना शक्य झाले. सीमेकडे चाललेल्या जवानांना भरपूर फळे पुरवण्यात आली. लढाई थांबल्यानंतर जनरल कुलवंतसिंग यांनी पंजाबमधील भारतीय जनसंघाचे आमदार श्री. कृष्णलाल मैनी यांच्याजवळ असे उद्गार काढले की, "पंजाब हा भारताचा खड्गहस्त आहे आणि रा. स्व. संघ हा पंजाबचा खड्गहस्त आहे."

असे होते गुरुजी– आणि असा आहे त्यांच्या हस्ते जडणघडण

होत गेलेला रा. स्व. संघ. त्यांच्या सहवासातला एखादा तास म्हणजे दीर्घकाळ पुरणारे प्रशिक्षणच होते. ते जेथे जेथे जात तेथे तेथे गोडव्याची आणि प्रकाशाची नुसती पखरण करून ठेवीत. त्यांचे डोळे इतके हसरे होते की, त्यांच्याकडे पाहाणारा कोणीही त्या स्मितहास्याने भिजून जायचा. 'तवाना बुवद हर की दाना बुवद' या पर्शियन म्हणीप्रमाणे (शहाणा माणूस नेहमी ताजातवाना असतो) गुरुजी सतत सुहास्यवदन होते. कर्करोगासारखा दुर्धर रोग झाल्यानंतरही त्यांची विनोदबुद्धी कमी झाली नाही. टाटा कॅन्सर हॉस्पिटलमध्ये त्यांच्या छातीवरची शस्त्रक्रिया पार पडल्यानंतर काही दिवसांनी रा. स्व. संघाच्या पंजाब शाखेचे कार्यवाह श्री. धर्मवीर त्यांना भेटायला गेले. तेव्हा गुरुजींनी खास पंजाबी ढंगात 'की गल ए बादशाहो' म्हणत हसून त्यांचे स्वागत केले आणि आपल्याला बरे वाटत असल्याचे, १० पौंड वजन वाढल्याचे सांगितले.

दि. ५ जून १९७३ रोजी जेव्हा गुरुजींचे निधन झाले तेव्हा पंतप्रधानांनी पाठवलेल्या शोकसंदेशात– त्यांच्याशी अनेक बाबतींत मतभेद असूनही– 'राष्ट्रजीवनात त्यांना त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या सामर्थ्यामुळे आणि स्वतःच्या मतांवरच्या अविचल निष्ठेमुळे प्राप्त झालेल्या आदरणीय स्थानाचा' गौरवपूर्ण उल्लेख होता. ते आपल्या संसदेचे कधीही सभासद नव्हते, पण अपवाद म्हणून संसदेने त्यांच्या निधनाबद्दल दुखवटा व्यक्त केला.

गुरुजींच्या निधनानंतरच उघडल्या आणि वाचल्या गेलेल्या तीन हिंदी पत्रांमध्ये त्यांनी सरकार्यवाह बाळासाहेब देवरस यांची सरसंघचालक म्हणून नियुक्ती केली होती, आपले कोणत्याही प्रकारे स्मारक उभारू नये अशी विनंती केली होती आणि 'चुकून कुणा स्वयंसेवकाला दुखावले गेले असेल तर त्याची हात जोडून माफी' मागितली होती. एका कालजयी लोकोत्तर पुरुषाने घेतलेला तो भावपूर्ण निरोप होता. आणि फार वर्षांपूर्वी म्हणजे १९४२ साली 'डॉक्टर हेडगेवारांचा दुसरा अवतार' अशा शब्दांत ज्या सहकाऱ्याचे त्यांनी वर्णन केले होते त्याच सहकाऱ्याची त्यांनी आपला उत्तराधिकारी म्हणून नेमणूक केली होती.

# प्रकरण सातवे : उत्कर्षाच्या शिखरावर

'डॉ. हेडगेवार कसे होते हे तुम्हाला जाणून घ्यायचे असेल तर या तरुण माणसाकडे पाहा. तो डॉक्टरांचीच हुबेहुब प्रतिकृती आहे,' अशा शब्दांत गुरुजींनी खूप वर्षांपूर्वी श्री. बाळासाहेब देवरस यांची स्वयंसेवकांना ओळख करून दिली होती. संघाचे संस्थापक प्रत्यक्ष काम करताना पाहाण्याचे भाग्य ज्यांना लाभले नव्हते अशा प्रशिक्षणार्थी स्वयंसेवकांसमोर ते बोलत होते.

श्री. मधुकर दत्तात्रय देवरस यांचा जन्म दि. ५ नोव्हेंबर १९१५ रोजी नागपूरच्या एका सुखस्तू कुटुंबात झाला. माता-पित्यांच्या नऊ मुलांमध्ये ते आठवे होते. ते कुटुंब मूळचे देवराजुलू होते आणि काही पिढ्यांपूर्वी ते आंध्र प्रदेशातून आलेले होते. कुटुंबाची थोडी जमीन होती आणि बाळासाहेबांचे वडील सरकारी नोकरीत होते. बाळासाहेब लहान असतानाच त्यांच्या पापण्यांचे केस अचानक पिकू लागले होते. त्यांच्या वडिलांनी त्यांना एका गुरूकडे नेले होते, गुरूंनी विभूत दिली होती आणि 'हा मुलगा मोठेपणी थोर माणूस होणार' असे भाकित वर्तवले होते. आपला मुलगा बडा सरकारी अधिकारी होणार असा याचा अर्थ बाळासाहेबांच्या वडिलांनी घेतला होता.

पण माणूस ठरवतो आणि परमेश्वर त्याचे सारे बेत फिसकटवून टाकतो. मधुकर अवघ्या बारा वर्षांचा होता तेव्हा तो डॉक्टर हेडगेवारांच्या संपर्कात आला. तो वडिलांचा लाडका तर होताच, आता

डॉ. हेडगेवारांच्या खास देखरेखीखालीही तो राहू लागला. न्यू इंग्लिश स्कूलमधून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्याने नागपूरच्या मॉरिस महाविद्यालयात प्रवेश घेतला.

रा. स्व. संघाच्या कुश पथकातले ते तरुण स्वयंसेवक होते. हे पथक क्रांतिकार्याची आवड असणाऱ्या तरुणांचे होते. त्यांच्यापैकी काही जणांनी तर बाँब तयार करण्याचे प्रयोगदेखील करून पाहिले होते. पण डॉक्टरांनी त्यांना दहा व्याख्यानांतून क्रांतिकार्यातला आपला अनुभव सांगितला होता आणि राष्ट्रउभारणीचा तो खरा मार्ग नसल्याचे त्या सर्वांना पटवून दिले होते. संस्कृत आणि तत्त्वज्ञान हे विषय घेऊन १९३५ साली बाळासाहेब पदवीपरीक्षा उत्तीर्ण झाले. दोन वर्षांनी त्यांनी कायद्याची पदवीही संपादन केली. सनददेखील घेतली. काळा झगा शिवून घेतला, नावाची पाटी रंगवून घेतली; पण त्याचा कधी उपयोग करण्याची वेळच आली नाही. वकिलीपेक्षा मोठी आणि महत्त्वाची कार्ये बाळासाहेबांच्या हातून व्हायची होती. त्याच वर्षी त्यांनी दरमहा २५ रुपये पगाराची अनाथ विद्यार्थी गृहाच्या शाळेतल्या शिक्षकाची नोकरी स्वीकारली. पैसा मिळवणे हा त्यामागचा हेतू नव्हता तर तरुणांशी सतत संपर्क ठेवण्याचा त्यांचा हेतू होता.

१९३९ साली बाळासाहेबांनी प्रचारक म्हणून बंगालमध्ये जावे, असे ठरवण्यात आले. ती बातमी समजताच त्यांचे वडील कमालीचे संतापले. आपल्या मुलाने प्रचारक होता कामा नये आणि कलकत्त्याला जाता कामा नये, असे त्यांचे म्हणणे होते. तरीदेखील ठरलेल्या दिवशी बाळासाहेब कलकत्त्याला जायचे ते गेलेच. त्यांच्या वडिलांनी कलकत्त्याला जाणाऱ्या गाडीत इथूनतिथून सगळीकडे त्यांना शोध शोध शोधले, पण बर्थवर एका चादरीत गुंडाळलेल्या अवस्थेत पडून राहिलेला त्यांचा मुलगा त्यांना दिसणार तरी कसा ? त्या दिवशी रेल्वेस्थानकावर ज्यांनी त्यांना पाहिले ते अजूनही त्यांचा तो संतापलेला चेहरा विसरू शकलेले नाहीत. त्यांनी त्या दिवशी डॉक्टरांना तर अगदी शिव्यांची लाखोलीच वाहिली होती.

१९४० साली जेव्हा डॉक्टर हेडगेवारांचे निधन झाले, तेव्हा

बाळासाहेब नगर कार्यवाह म्हणून नागपूरला परत आले. पुढे ते संयुक्त सरचिटणीस झाले आणि १९६५ मध्ये तर सरकार्यवाह झाले. दि. ५ जून १९७३ रोजी श्री गुरुजींचे निधन झाले आणि दुसऱ्या दिवशी बाळासाहेब सरसंघचालक झाल्याचे घोषित करण्यात आले.

त्या बाबतीत गुरुजींनी कधीकाळी काही सूचित केले होते का, असा प्रश्न जेव्हा बाळासाहेबांना नंतर विचारण्यात आला तेव्हा त्यांनी सांगितले होते, " नाही, मुळीच नाही. म्हणूनच मला तो अगदी आश्चर्य-कारक निर्णय वाटला. दि. ६ जून रोजी संध्याकाळी ५-३० वाजता एकत्र जमलेल्या लोकांसमोर श्री गुरुजींचे ते पत्र फोडण्यात आले आणि वाचून दाखवण्यात आले तेव्हाच मला तो निर्णय समजला. प्रांतीय संघचालकांबरोबर त्यांनी याबद्दल चर्चा केली होती, असे मला आता समजते आहे. पण त्यांनी माझ्याजवळ मात्र असा कधीच उल्लेख केला नव्हता."

याच विषयासंबंधी आणखी खुलासा करताना ते म्हणाले, " उलट, श्रीगुरुजींबरोबर यासंबंधी चर्चा करावी, असे मलाच अनेकदा वाटले होते, पण त्यांच्याशी हा विषय काढणे विचित्र वाटल्यामुळे ते तसेच राहून गेले. तब्बल ३३ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीत गुरुजींना किती शारीरिक ताण सहन करावा लागला होता, हे मी पाहिले होते आणि तसा ताण सहन करण्याइतपत माझी तब्येत मला साथ देईल की नाही, याबाबत मी साशंक होतो. त्यामुळे त्यांच्याशी बोलावे, असे मला वाटत होते. श्रीगुरुजींना करावा लागलेला सततचा प्रवास ही संघाच्या दृष्टीने गरजेची बाब होती. कारण त्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीमुळे एखाद्या विशिष्ट ठिकाणच्या संघकार्याला खरोखरच चांगली चालना मिळत असे. माझ्या उपस्थितीची आता तेवढी गरज राहिली आहे, असे मला वाटत नाही. उलट देशाच्या विविध भागात संघकार्याचे संचालन करणारे इतर ज्येष्ठ कार्यकर्ते त्या भागातील भावी कार्याच्या दृष्टीने तेथे राहाणे अत्यावश्यक आहे. मी एकटाच असा आहे की, ज्याच्या उपस्थितीची कुठेही अशी खास आवश्यकता भासणार नाही आणि म्हणूनच माझी सरसंघचालक म्हणून निवड केली गेली असावी."

'श्रीगुरुजींप्रमाणेच आपलादेखील अध्यात्माकडे कल आहे का ?' असे विचारले असता बाळासाहेब प्रामाणिकपणाने उत्तरले, "नाही, माझा अध्यात्माकडे कल आहे, असे मला वाटत नाही." ज्याबद्दल आपल्याला आस्था वाटते किंवा रस वाटतो असे संघाव्यतिरिक्त आणखी काही विषय आहेत का, असे विचारल्यावर ते म्हणाले, "हो, शेती करणे हा माझा आवडता छंद आहे. मी एक चांगला शेतकरी आहे आणि मी त्या क्षेत्रातल्या प्रावीण्याबद्दल काही सन्मानही प्राप्त केला आहे. मला त्या क्षेत्राबाबत खरोखरच आस्था वाटते. शेतकीच्या नव-नवीन तंत्रांबाबत मी भरपूर वाचतो आणि आधुनिक पद्धतीचा अवलंबही करतो." ट्रॅक्टर वापरता का, अशा प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, "नाही, मी ट्रॅक्टर वापरीत नाही, तर चांगले जुने, धट्टेकट्टे बैलच वापरतो. पण माझ्याजवळ विजेचा पंप आहे, फवारणीचे, मळणीचे यंत्र आहे, मी नवी बियाणे वापरतो. मी अन्नधान्याच्या संकरित जातींबद्दलचे बऱ्यापैकी ज्ञान बाळगून आहे. त्यामुळे मी दरवर्षी प्रथम भाताचे पीक घेतो आणि नंतर गव्हाचेही चांगले पीक काढतो. खेडेगावातले लोक माझे मार्गदर्शन घेतात. माझ्याकडे बियाण्यांचा साठा तयार असतो आणि माझ्या बांधवांना मदत करायला मला आवडते."

बाळासाहेबांना वृत्तपत्रव्यवसायाबद्दलही आपुलकी वाटते. मराठीत 'तरुण भारत' आणि हिंदीत 'युगधर्म' ही साखळी वर्तमानपत्रे प्रकाशित करणाऱ्या नागपूरच्या 'नरकेशरी प्रकाशना'चे ते अनेक वर्षे कार्यकारी संचालक होते.

१९७४ साली त्यांना प्रश्न विचारण्यात आला होता की, 'चांगल्या राज्यकर्त्याबद्दलची आपली कल्पना काय आहे ?' त्या प्रश्नाचे उत्तर देताना बाळासाहेबांनी चांगल्या राज्यकर्त्याच्या अंगी तीन गुणांची आवश्यकता असल्याचे मत प्रतिपादन केले होते. ते म्हणाले होते, "पहिला मुद्दा असा की, राज्यकर्ता प्रत्येक गोष्ट देशाच्या हितासाठी करतो आहे, की केवळ स्वार्थासाठी करतो आहे, हे पाहावे लागेल. आपल्या कल्पना साकार झालेल्या पाहण्यासाठी सत्ता उपयोगी पडते, हे मला मान्य आहे. पण तसे नेहमीच घडत नाही. बऱ्याच वेळा सत्ताधीश

आपल्याच स्वार्थसाधनेत आणि आपले स्थान सुरक्षित राखण्यातच मशगूल होतात. दुसरा मुद्दा असा की, त्या राज्यकर्त्याने आपल्याभोवती नवे, चांगले, पात्र आणि कर्तृत्ववान नेते तयार केले आहेत की नाहीत ? कार्यक्षम नेतृत्वाची दुसरी फळी उभारणे हे कोणत्याही चांगल्या राज्यकर्त्याचे प्रमुख कर्तव्य आहे, कारण कोणताच नेता अमरपट्टा घेऊन येत नसतो. तिसरा मुद्दा असा की त्या राज्यकर्त्याच्या राजवटीमुळे सामान्य माणसाचा काही फायदा झाला आहे की नाही ? त्या फायद्याचे प्रमाण– मग तुम्ही त्याला सामाजिक न्याय म्हणा किंवा सार्वजनिक कल्याण म्हणा– नेत्याच्या खऱ्या थोरवीप्रमाणे कमीजास्त होत असते."

१९५८ पासून जरी बाळासाहेबांना मधुमेहाचा त्रास होत असला तरी वर्षात पावसाळ्याचे दिवस सोडून एरवी सतत ते देशभर सर्वत्र फिरतच असतात.

सरसंघचालक झाल्यानंतर बाळासाहेबांनी प्रथम ज्यांची भेट घेतली त्या व्यक्तींमध्ये आचार्य विनोबा भावे यांचा समावेश होता. विनोबाजींनी त्यांना आशीर्वाद दिला. 'सभ्य' हा शब्द हिंदीत 'सुसंस्कृत' या अर्थाने वापरला जातो, तर गुजराथीत त्याचा अर्थ 'सभासद' असा होतो. 'सभ्य' या शब्दाचा असा द्व्यर्थी होणारा उपयोग लक्षात घेऊन विनोबाजी म्हणाले, "मैं संघ का असभ्य सभ्य हूँ।" (मी संघाचा सन्माननीय सभासद आहे.)

नोव्हेंबर १९७३ मध्ये बाळासाहेबांनी दिल्लीला भेट दिली तेव्हा कॉन्स्टिटयूशन क्लबमध्ये निवडक निमंत्रितांसमोर त्यांचे भाषण झाले. त्या भाषणात ते म्हणाले, "परमपूज्य डॉक्टर हेडगेवार आणि परमपूज्य गुरुजी गोळवलकर यांच्यासारख्या थोर व्यक्तींच्यानंतर मी सरसंघचालक झालो आहे. मला माझ्या मर्यादांची पुरेपूर जाणीव आहे. गोळवलकर गुरुजींच्या कुशल नेतृत्वाखाली कार्यक्षम व्यवस्थापक म्हणून मी काम केले असले तरी मी स्वतः स्वतंत्रपणे कितपत कर्तबगारी गाजवू शकेन, याबाबत 'दि स्टेटस्‌मन'सारख्या वृत्तपत्राने शंका व्यक्त केली आहे. माझ्याबद्दल लिहिताना त्यांनी व्यक्त केलेली शंका अगदी रास्त आहे. पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नेतृत्वानुवर्ती नसून ध्येयानुवर्ती आहे. आणि

म्हणूनच तो डॉक्टरांच्या निधनानंतरही वाढतच गेला. श्री गुरुजी गेल्यानंतरही संघकार्य वाढतच जाईल, याबाबत आम्हा सर्वांना खात्री वाटते आहे तीदेखील त्यामुळेच !"

त्या भाषणात बाळासाहेब पुढे म्हणाले, " राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आम्ही लोक असे मानतो की हे हिंदू राष्ट्र आहे. यात जातीयवादाचा लवलेशही नाही. अगदी अलीकडेच, रामेश्वरला पूजा केल्यावर आपल्या पंतप्रधान म्हणाल्या की, रामेश्वरम हे आपल्या एकात्मतेचे प्रतीक आहे. त्यांचे म्हणणे अगदी खरे आहे. आपण खरोखरच हजारो वर्षांपूर्वीपासून राष्ट्र म्हणून जगत आलो आहोत. श्री. गुरुजींच्या निधनानंतर आचार्य विनोबा भावे, जयप्रकाशजी आणि धर्माधिकारीजी या सर्वांनी जाहीरपणे असे सांगितले की गुरुजींचे कार्य संकुचित किंवा जातीय स्वरूपाचे नव्हते, मुसलमानांना राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घेण्यासाठी त्यांची धडपड होती. आज हिंदू समाज दुबळा आहे आणि असंघटित आहे. जर तो समर्थ आणि संघटित झाला तर संपूर्ण देशच समर्थ आणि संघटित होईल. एखादा देश सरकारमुळे किंवा सैन्यामुळे सामर्थ्यशाली होत नसतो तर समर्थ समाजातूनच बलिष्ठ सरकार आणि विजिगीषू सेना निर्माण होत असते. इंग्लिश समाज समर्थ होता म्हणूनच त्यातून चेंबरलेनप्रमाणे चर्चिलही पुढे आला आणि त्याने पराभवाच्या गर्तेतून देशाला वाचवले, एवढेच नव्हे तर विजयश्री देखील खेचून आणली. आज आपल्याला स्वातंत्र्य मिळून जवळजवळ पंचवीस वर्षे होऊन गेली आहेत. पण आपली कर्तबगारी काय दिसते ? आपल्या देशाची फाळणी झाली. निर्वासितांचे फार मोठे ओझे आपल्याला सहन करावे लागले, चार युद्धे झाली, वारंवार दुष्काळ पडले, ही सारी आपल्या अपयशाची किंवा अपुऱ्या यशाची कारणे सांगितली जातात. पण ही सर्व कारणे इस्रायलच्या बाबतीतही अस्तित्वात होतीच. तो देशही फाळणीमुळेच अस्तित्वात आला. त्याचे बहुसंख्य नागरिक निर्वासितच होते. त्यांना सातत्याने युद्धाला तोंड द्यावे लागले आहे. किंवा युद्धाच्या धोक्याची टांगती तलवार डोक्यावर बाळगावी लागली आहे. त्या देशाचा बराचसा भाग वाळवंटी आहे. आणि तरीदेखील तो लहानसा देश समर्थ आहे.

कारण त्या देशातला समाज समर्थ आहे. आपला या देशातला प्रश्न माणसाशीच संबंधित आहे. त्याला जागे करून, संघटित करून समर्थ बनवणे हेच आपले काम आहे. हिंदू संघटनेची भूमिका ही अशी आहे."

भाषणानंतर श्रोत्यांनी विचारलेल्या प्रश्नांना बाळासाहेबांनी उत्तरे दिली. तसे करताना ते म्हणाले, "संघ शहरात जेवढा प्रभावी वाटतो तितका तो खेडेगावांमध्ये प्रभावी वाटत नसेलही कदाचित, पण त्याचे खेडेगावांतून जाणवण्याइतके अस्तित्व खचित आहे. मी आत्ताच उत्तर प्रदेशच्या पूर्व भागाचा दौरा करून आलो आहे. गोरखपूर आणि काशी या दोन जिल्ह्यांमध्येच प्रत्येकी शंभरावर शाखा असल्याचे मला तेथे दिसले. त्यांतल्या हाताच्या बोटांवर मोजता येतील इतक्या शाखा सोडल्या तर बाकीच्या सर्व शाखा खेडेगावांमध्येच आहेत. अर्थात ग्रामीण भागातली केंद्रे म्हणजे छोटी शहरेच मानावी लागतील. संघाबद्दल अशीही एक गैरसमजूत प्रचलित आहे की ही संघटना उत्तर भारतात चांगली प्रभावी आहे, दक्षिणेत मात्र तिचा फारसा प्रभाव नाही. हेदेखील खरे नाही. मंगलोर, कालिकत आणि एर्नाकुलम जिल्ह्यांमध्येही प्रत्येकी शंभराहून जास्त शाखा आज कार्य करीत आहेत."

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा राजकीय पक्षांकडे पाहाण्याचा दृष्टिकोन कसा आहे, असे विचारले असता बाळासाहेब म्हणाले, "आपल्या आवडीच्या राजकीय पक्षात सहभागी होण्याचे पूर्ण स्वातंत्र्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपल्या स्वयंसेवकांना दिले आहे. त्या स्वातंत्र्याचा उपयोग केला जातो, असे मला वाटते. तरीदेखील तुम्ही असे म्हणाल की बहुतेक स्वयंसेवक फक्त जनसंघातच दाखल होताना दिसतात. त्याला एक कारण आहे. १९४६ सालच्या काँग्रेस अधिवेशनात रा. स्व. संघाचा निषेध करण्यात आला होता. १९४८ साली महात्माजींच्या खुनाची जबाबदारी रा. स्व. संघावर लादण्याचा काँग्रेसनेच प्रयत्न केला होता. श्री. गुरुजी आणि माझ्यासह हजारो संघकार्यकर्त्यांना इंडियन पिनल कोडाच्या कलम ३०२ खाली म्हणजे खुनाच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती. तब्बल एक आठवड्यानंतर प्रतिबंधक स्थानबद्धतेत तिचे रूपांतर करण्यात आले होते. संघाच्या दृष्टीने अत्यंत बिकट

आणि कसोटीच्या अशा या काळात, आमच्यासाठी एका पक्षानेदेखील शब्द टाकला नाही की आपले वजन वापरले नाही. त्या संदर्भात साधा प्रश्न विचारायला तयार असणारा एखादा खासदारदेखील आम्हाला भेटला नाही. ही परिस्थिती चालवून घेण्यासारखी नाही, असे आम्हाला वाटले. संघाच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेसमध्ये शिरावे असे सरदार पटेलांना वाटत होते. त्यातच राष्ट्रीय हित सामावलेले आहे, असे त्यांनी गुरुजींना लिहिलेल्या पत्रात म्हटलेदेखील होते. पण काँग्रेसमधील काही गटांना, विशेषतः समाजवाद्यांना, तसे काही घडू नये असे वाटत होते. आणि त्या दिशेने काहीच प्रगती होऊ शकली नाही. साहजिकच जेव्हा जनसंघ स्थापन झाला तेव्हा अनेक स्वयंसेवक आनंदाने त्या पक्षाचे सभासद झाले आणि त्यांच्यामुळेच आजचा जनसंघ दिसतो आहे. पण ही राजकीय अस्पृश्यता नाहीशी झाल्यावर मात्र आपापल्या कलानुसार स्वयंसेवकांनी विविध पक्षांत जावे, असेच आम्हाला वाटेल. जर मोरारजीभाई, कृष्णमेनन आणि सुभद्रा जोशी हे तिघेजण एकाच पक्षात काम करू शकतात तर इतरांनीही तसे का बरे करू नये ?"

दुसऱ्या एका प्रश्नाला उत्तर देताना बाळासाहेबांनी सांगितले की, "आमच्या संघटनेत होते त्यापेक्षा जास्त व्यापक, विस्तृत आणि मनमोकळी चर्चा जिथे घडते अशी संघटना मला माहीत नाही. पण काही लोकांच्या मनात लोकशाही म्हणजे अव्यवस्थितपणा अशी समजूत घर करून बसलेली असते. कुठे शिस्त दिसली की तिथे हुकमशाही असलीच पाहिजे असे त्यांना वाटते. रा. स्व. संघाचा लोकशाहीवरही विश्वास आहे आणि शिस्तीवरही विश्वास आहे."

जेव्हा जयप्रकाशांचे आंदोलन पसरत चालले, तेव्हा एक संघटना म्हणून रा. स्व. संघ त्यात सामील झाला नाही. पण त्यात भाग घेण्याचे स्वयंसेवकांना पूर्ण स्वातंत्र्य होते. आणि खरोखरच बिहारमध्ये अनेक स्वयंसेवक त्यात सामील झालेही होते.

पाटण्यातील सचिवालयासमोर निदर्शने करणाऱ्या निःशस्त्र जमावावर पोलिसांनी जेव्हा गोळीबार केला तेव्हा साहजिकच लोक संतापले. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे नेते श्री. रामबहादुर राय

आणि पाटणा विद्यापीठ विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री. सुशील मोदी (तेही अ. भा. वि. प. चे कार्यकर्ते होते) हे दोघे जयप्रकाशांना जाऊन भेटले आणि तेव्हा गती घेत असलेल्या जनआंदोलनाचे नेतृत्व करण्याची त्यांनी जयप्रकाशजींना विनंती केली. एकूण परिस्थितीचा साधकबाधक विचार करण्यासाठी जयप्रकाशजींनी काही दिवसांची मुदत मागून घेतली. आणि 'कोणत्याही परिस्थितीत संपूर्ण अहिंसेचे पालन केले जाईल' असे स्पष्ट आश्वासन मिळाल्यावरच आंदोलनाचे नेतृत्व करण्यास त्यांनी मान्यता दिली. मग त्यांनी बिहारमधील आमदारांना आपापल्या जागांचे राजीनामे देण्याचे आवाहन केले. अनेकांनी त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन खरोखरच आमदारकी सोडली आणि मग जयप्रकाशांचे आंदोलन सुरूच झाले.

बाळासाहेबांनी त्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवला आणि डिसेंबर १९७४ मध्ये दिल्लीत ते असे म्हणाले की, "राजकारणातला भ्रष्टाचार आणि इतर उणिवा दूर करण्याचा जयप्रकाश प्रयत्न करीत आहेत. तसे सत्तेपासून अलिप्त राहाणाऱ्या पण वेळ पडल्यावर मार्ग चुकणाऱ्या राज्यकर्त्यांना वठणीवर आणण्यासाठी जनतेचे नेतृत्व करण्यास न कचरणाऱ्या जुन्या संन्याशांप्रमाणे आज जयप्रकाश हे आंदोलन चालवीत आहेत. ज्यांना सत्तेचा मोह पडला नाही आणि जे निःस्वार्थपणे जनसेवेसाठी झटले अशा महात्मा गांधी, आचार्य विनोबा भावे आणि गोळवलकर गुरुजी यांच्यासारख्या थोर नेत्यांचे कार्यच आज जयप्रकाश पुढे नेत आहेत, पूर्ण करीत आहेत."

त्यानंतर मुंबईत असताना बाळासाहेबांनी स्पष्ट केले की, 'रा. स्व. संघावर बंदी घालण्याची मागणी साम्यवादी पक्षातर्फे केली जात आहे, कारण राष्ट्रवादाची भक्कम तटबंदी उभारलेली असेल तर देशबाह्य निष्ठांवर आधारलेले परकीय तत्त्वज्ञान या देशातील जनतेत रुजूच शकणार नाही. साम्यवाद्यांच्या मार्गातील सर्वांत मोठा अडथळा रा. स्व. संघच असल्यामुळे सरकारने संघावर बंदी घालावी, यासाठी त्यांचे प्रयत्न चालू आहेत.' जयप्रकाशांचे आंदोलन जसजसे खूप विस्तारत चालले तसतसा सरकारचा तोल ढळू लागला आणि त्याने एका झटक्या-

सरशी साम्यवाद्यांची मागणी मान्य करून टाकली. सरकारने राष्ट्रीय आणीबाणी जाहीर केली आणि त्याचवेळी रा. स्व. संघावर बंदीही घातली. आणीबाणीच्या पहिल्या काही दिवसांत बाळासाहेबांसह सुमारे ५००० संघकार्यकर्त्यांना 'मिसा'खाली स्थानबद्ध करून ठेवण्यात आले. पुढील काही महिन्यांमध्ये आणखी २५००० जणांना 'मिसा'खाली डांबण्यात आले. सरकारच्या या अशा कृतीमुळे संघाला जरी आश्चर्याचा धक्का बसला तरी त्या धक्क्यातून संघाचे नेतृत्व आत्मविश्वासपूर्वक सावरून उभे राहिले. श्री. माधवराव मुळे, प्रा. राजेंद्रसिंहजी, श्री. भाऊराव देवरस, श्री. मोरोपंत पिंगळे, श्री. ब्रह्मदेव आणि श्री. बापूराव मोघे हे रा. स्व. संघाचे ज्येष्ठ व वरिष्ठ नेते सगळ्या हालचालींचे नियोजन व नियंत्रण करू लागले. सुमारे ५०००० संघ कार्यकर्ते भूमिगत झाले. त्यांच्याविरुद्ध अटकेचे आदेश काढण्यात आले असले तरी ते पकडले जाऊ शकले नाहीत. त्यांच्यापैकी बहुतेकांनी आपला नेहमीचा सदरा-धोतर हा पोशाख काही काळापुरता बाजूला ठेवला आणि पँट-बुशशर्टचा वापर सुरू झाला. केसांना रंग लावून आणि केस वाढवून रूपांतर पूर्ण केले गेले. उदाहरणार्थ, सुब्रह्मण्यम स्वामी सरदार बनले. त्यांना पंजाबी येत नव्हते तरी ते कॅनडातून आलेले शीख आहेत असे भासवण्यात यश मिळाले. श्री. नाना वाघ यांनी श्री. नानाजी देशमुख यांची केलेली रंगभूषा एवढी परिणामकरीत्या यशस्वी झाली होती की, त्यांच्या छायाचित्रांबरोबर त्यांचे रूपरूप ताडून पाहाणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचादेखील ते नानाजीच आहेत, यावर विश्वास बसला नाही.

आणीबाणीला उघडपणे विरोध करून– अर्थातच कोणत्याही परिस्थितीत हिंसाचार होऊ न देता– जनतेतील भयगंड नाहीसा करण्याचा निर्णय घेण्यात आला. आणि या दोन्ही उद्दिष्टांबाबत संघ पूर्णतः यशस्वी ठरला. जॉर्ज फर्नांडिस यांच्या प्रेरणेने झालेला थोडाफार हिंसाचार वगळता कोठेही हिंसक प्रकार घडले नाहीत आणि प्रतिकाराची ज्योत मात्र तेवतीच राहिली.

जुलै १९७५ मध्ये संसदेचे अधिवेशन सुरू झाले त्या दिवशी संघ-

कार्यकर्त्यांनी दिल्लीत व इतरत्र सार्वजनिक ठिकाणी गटागटाने सत्याग्रह केला. दिल्लीतल्या सत्याग्रह्यांमध्ये त्या शहराचे अनेक वर्षे महापौर असणाऱ्या लाला हंसराज गुप्ता यांचाही समावेश होता. पुढील काही दिवसांत सुमारे २५००० संघ स्वयंसेवकांनी सत्याग्रह करून तुरुंगवास पत्करला. ज्यांच्याविरुद्ध वॉरंटस् निघालेली होती ते स्वयंसेवक यात नव्हते. एवढ्या मोठ्या प्रमाणावर धरपकड होऊनही, काही आठ-वड्यांच्या अवधीतच येरवड्याहून म्हणजे बाळासाहेब जेथे होते तेथून संघाची शाखा असणाऱ्या छोट्यात छोट्या खेडेगावापर्यंतची भूमिगत कार्यकर्त्यांमार्फत जाणारी संदेशवहन यंत्रणा पूर्णपणे सिद्ध झाली होती.

ऑक्टोबर १९७५ मध्ये राष्ट्रकुलातील देशांची संसदीय परिषद दिल्लीत भरली होती. त्या प्रतिनिधींसाठी आयोजित करण्यात आलेल्या लाल किल्ल्यातील स्वागतसमारंभात काही संघकार्यकर्त्यांनी घोषणा दिल्या आणि भूमिगत साहित्यदेखील वाटले. त्या कार्यकर्त्यांना बेदम मारहाण करण्यात आली पण त्या एका प्रसंगामुळे इंदिराजींच्या आणी-बाणीत सारे काही सुरळीत चाललेले नाही हे जागतिक वृत्तपत्रांना समजून चुकले. जेव्हा ब्रिटनच्या संसदेचे प्रतिनिधी ताजमहाल पाहाण्या-साठी आग्र्याला गेले तेव्हा त्यांना 'Better Conditions In India' अशा फसव्या शीर्षकाचे विरोधी पत्रक दिले गेले. जेव्हा ते जेवायला बसले तेव्हा त्यांना प्रत्येक हातरुमालाखाली आणखी असेच सरकारविरोधी साहित्य नीट ठेवलेले आढळले.

श्रीमती गांधी या सगळ्या प्रकारामुळे कमालीच्या निराश आणि अस्वस्थ झाल्या होत्या. दि. २७ डिसेंबर १९७५ रोजी चंदिगड येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात बोलताना त्या म्हणाल्या, " ज्या ठिकाणी रा. स्व. संघाबद्दल थोडीशीदेखील माहिती नव्हती, अशा ठिकाणीसुद्धा या संघटनेने आपले पाय रोवले आहेत. बंदी घातल्यानंतर या संघटनेच्या कार्यक्रमांत कुठेही शिथिलता आलेली नाही. संघटित रीतीने पण भूमि-गत राहून त्यांचे काम पद्धतशीर चालू आहे. अगदी केरळसारख्या प्रांतातदेखील त्यांनी घट्ट पाय रोवले आहेत. "

ऑक्सफर्डचे प्राध्यापक डेव्हिड सेलबर्न यांना श्रीमती गांधीं-

बरोबरच्या भेटीत एक मनोरंजक अनुभव आला. आणीबाणीच्या काळात इंदिराजींना भेटू शकलेल्या फारच थोड्या विद्वानांपैकी ते एक होते. 'तुम्ही संघाला नेहमी फॅसिस्ट म्हणता. तुम्हाला त्याचा नेमका कोणता अर्थ अभिप्रेत आहे,' असे सेलवर्न यांनी इंदिराजींना विचारले तेव्हा त्या म्हणाल्या, 'ते लोक माझ्याविरुद्ध अफवा उठवतात, म्हणून मी त्यांना फॅसिस्ट म्हणते.' सेलवर्ननी पुढे या प्रसंगाबाबत लिहिताना मुद्दाम असे म्हटले की 'फॅसिझमची ती व्याख्या अगदी आगळीवेगळी अशीच होती.'

आणीबाणी जारी केल्यानंतर दोन महिन्यांनी बाळासाहेबांनी श्रीमती गांधींना एक पत्र लिहिले, 'रा. स्व. संघावरचे आपण करीत असलेले सर्व आरोप खोटे असून आपण आमच्या संघटनेवरची बंदी त्वरित उठवावी,' असे त्या पत्रात लिहिलेले होते. त्या पत्राला कोणतेही उत्तर आले नाही. आणखी तीन महिने लोटल्यानंतर बाळासाहेबांनी श्रीमती गांधींना दुसरे पत्र लिहिले. इंदिराजींची निवडणूक वैध ठरल्याबद्दल त्यांचे त्या पत्रात अभिनंदन करण्यात आले होते. शिवाय 'समाजाच्या उद्धाराचे काम देशात दुफळी माजलेली असताना पूर्ण करता येणार नाही हे लक्षात घेऊन, सर्व पूर्वग्रह बाजूला सारून संघावरची बंदी उठवण्यात यावी' अशी विनंतीदेखील त्या पत्रात करण्यात आली होती. आणखी दोन पत्रे विनोबाजींना पाठवण्यात आली होती. 'श्रीमती गांधींना सर्व परिस्थिती समजावून सांगण्याची आणि संघावरील बंदी उठवायला सांगण्याची' त्या दोन्ही पत्रांमध्ये विनंती करण्यात आली होती.

आणीबाणीत आणि त्यानंतरही भारतीय लोकदलामधील काही मित्रांनी या प्रदीर्घ पत्रांचा फक्त पहिला आणि शेवटचा परिच्छेद सगळीकडे फिरवून असा ग्रह निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता की संघाने तडजोडीची तयारी दाखवली होती. इंदिराजींची पूर्वी जी निवडणूक अवैध ठरली होती ती शंकास्पद परिस्थितीत वैध ठरवण्यात आल्याबद्दल बाळासाहेबांनी त्यांचे अभिनंदन केले, यावर काही लोकांनी टीका केली आहे. पण वस्तुस्थितीच अशी आहे की, भारतीय लोकदलाचा समावेश असणाऱ्या लोकसंघर्ष समितीनेच इंदिराजींची निवडणूक

वैध ठरवण्याचा तो निर्णय मान्य केला होता, एवढेच नव्हे तर त्यांच्या राजीनाम्याची मागणीदेखील अधिकृतपणे मागे घेतली होती. शिवाय संयुक्तरीत्या सुरू केलेल्या आंदोलनातून एकतर्फी माघार घेण्याबद्दलचा ठरावदेखील भारतीय लोकदलाने मंजूर केला होता.

संपूर्ण पत्रे उपलब्ध होऊ शकत असताना त्यातले संदर्भरहित तुकडे प्रसिद्ध करण्यात आले, यावरूनच त्या महाभागांचा हेतू 'सत्य, पूर्ण सत्य आणि सत्याशिवाय दुसरे काहीही नाही' अशाचा शोध घेण्याचा नसून खोडसाळ प्रचार करण्याचा आहे, हे स्पष्ट होत होते. 'आपण ती पत्रे का लिहिली ?' याबद्दलचा खुलासा करताना बाळासाहेब म्हणाले, "तशी पत्रे लिहिण्यात गैर काहीच नव्हते. आणीबाणीमुळे तुरुंगात पडलेल्या कैद्यांपैकी ८० टक्के लोक रा. स्व. संघाचे कार्यकर्ते होते. त्यांच्याबाबत, त्यांच्या कुटुंबियांबाबत माझे काहीच कर्तव्य नव्हते की काय ? सन्माननीय तडजोड घडवून आणण्यासाठी राज्यकर्त्यांशी संवाद सुरू करण्याचा मी प्रयत्न केला तर त्यात काय चुकले ?" मजेशीर गोष्ट म्हणजे खुद्द गांधीजीसुद्धा एखादे आंदोलन उभारल्यानंतर लगेचच व्हाइसरॉयला पत्र पाठवीत असत. संपर्काचे माध्यम उपलब्ध असावे, हाच त्यांचा तशी पत्रे पाठवण्यामागचा हेतू असे. 'चले जाव' चळवळीच्या वेळी तुरुंगात गेल्यानंतर एका आठवड्यातच त्यांनी व्हाइसरॉयला पत्र पाठवले होते. आणि त्याहूनही लक्षात घेण्याजोगी महत्त्वाची गोष्ट म्हणजे रा. स्व. संघाच्या सत्याग्रहाच्या सगळ्या योजना नेमक्या याच काळात निश्चित केल्या जात होत्या. बाळासाहेबांनी इंदिराजींना लिहिलेले दुसरे पत्र होते दि. १० नोव्हेंबर १९७५ चे. आणि अवघ्या चारच दिवसांनी रा. स्व. संघाने अशा सत्याग्रहाचे रणशिंग फुंकले की ज्यात सहभागी होऊन ८००० हून अधिक कार्यकर्ते तुरुंगात गेले आणि ज्यामुळे आणीबाणीतले प्रशासन मुळापासून हादरले. यावरून हे स्पष्ट होते की ती पत्रे लिहून बाळासाहेब कोणतीही, कसलीही तडजोड करीत नव्हते. उलट सन्माननीय माघार घेण्याची एक संधी ते सरकारला उपलब्ध करून देत होते.

प्रारंभी जनतेला घाबरवून टाकून गप्प बसवण्यात सरकार

यशस्वी झाले. ‘आता आगगाड्या वेळेवर धावू लागल्या आहेत’ हे कारण सांगून परदेशात आणीबाणीचे समर्थन केले जात होते. पण लौकरच सरकारला प्रचारयुद्धात मार खाणे, माघार घेणे भाग पडले. ‘सत्य समाचार’ व तशाच प्रकारची इतर प्रकाशने देशात सर्वत्र नियमितपणे प्रसिद्ध होऊ लागली.

आता हे सांगायला हरकत नाही की, ‘सत्य समाचार’च्या पहिल्या अंकाच्या चक्रीमुद्रणासाठी आवश्यक ती स्टेन्सिल्स कापण्याचे काम खुद्द संसदभवनातच पार पाडण्यात आले होते. ओम मेहतांना तसा संशय आलाही होता आणि संसदभवनातील विरोधकांच्या खोल्यांची झडती घेण्याचीही त्यांची इच्छा होती. पण त्यावेळचे सभापती बळीराम भगत यांनी तशा झडतीला स्पष्ट विरोध दर्शवल्यामुळे ती कारवाई बारगळली. सरकारचा वीस कलमी कार्यक्रम कसा फसवा आहे हे सांगणारी ‘श्रीमती गांधींची वीस असत्ये’ (The Twenty Lies of Mrs. Gandhi) ही पुस्तिका प्रसिद्ध झाली. त्याचप्रमाणे राइशस्टॅगच्या इमारतीला लागलेल्या रहस्यमय आगीनंतरचा हिटलरचा कट आणि दि. २६ जून १९७५ चा श्रीमती गांधींचा कट यांच्यातील साम्य उलगडून दाखवणारा ‘दोन आणीबाणींची कथा’ (The Tale of Two Emergencies) हा श्री. लालकृष्ण अडवानींचा लेख प्रसिद्ध झाला ‘दि मदरलँड’ या दैनिकात दि. २६ जानेवारी १९७५ रोजी ‘श्रीमती गांधी देशावर कृत्रिम आणीबाणी लादतील’, असे जे ज्योतिषशास्त्रीय भाकित प्रसिद्ध झाले होते त्याचे पुनर्मुद्रण करण्यात आले व ते अत्यंत लोकप्रिय ठरले.

हे सारे साहित्य कोण छापते आहे, हे शोधून काढण्यासाठी दिल्लीतल्या अनेक छापखानेवाल्यांना बडवण्यात आले, पण त्यामुळे संपूर्ण छापखाना-व्यवसाय सरकारच्या विरोधात उभा राहिला. खरे मुद्रक शोधून काढणे त्यांना शक्य झाले नाही ते नाहीच.

प्रचारयुद्धातला हा विजय फक्त स्वदेशी स्वरूपाचाच नव्हता तर विदेशातही त्याचे पडसाद उमटत होते. लंडनहून प्रसिद्ध होणाऱ्या ‘दि इकॉनॉमिस्ट’ या जागतिक प्रतिष्ठेच्या साप्ताहिकाने आपल्या

दि. ४ डिसेंबर १९७६ च्या अंकात त्या भूमिगत चळवळीचा 'डाव्या विचारसरणीची नसूनही क्रांतिकारी असलेली जगातली एकमेव शक्ती' अशा शब्दांत गौरव केला होता आणि पुढे म्हटले होते, "जरी सतत नवे रक्त या चळवळीला येऊन मिळत असले तरी प्रामुख्याने या चळवळीवर प्रभाव पडला आहे तो रा. स्व. संघाच्याच हजारो कार्यकर्त्यांचा आणि 'भारतात लोकशाहीची पुनर्स्थापना करणे' हाच एकमेव कार्यक्रम सध्या त्यांच्या डोळ्यासमोर आहे. या चळवळीला जनतेचा पूर्ण पाठिंबा मिळतो आहे. ६०,००० ते ७०,००० लोकांच्या छोट्या देणग्यांतून चळवळीचा खर्च चालवला जातो आहे. सरकारला हव्या असणाऱ्या सुमारे ३०,००० लोकांना पूर्ण संरक्षण देण्यात आले असून एकही माणूस फितुरीमुळे पकडला गेलेला नाही. भूमिगत प्रचारसाहित्य सर्व भारतात छापले आणि वाटले जाते आहे. अशा रीतीने राजकीय जागृती वाढत गेली तर एखादी साधी ठिणगीदेखील क्रांतीची ज्वाला पेटवू शकेल." संघाची कामगिरी पाहून मार्क्सवादी खासदार ए. के. गोपालन हेदेखील इतके प्रभावित झाले की, 'कोणतेतरी उदात्त ध्येय समोर असल्याशिवाय अशा प्रकारची शौर्याची कृत्ये करण्याची आणि एवढा त्याग सहन करण्याची प्रेरणा मिळू शकणार नाही', असे त्यांना म्हणावे लागले.

आणीबाणीच्या काळातील संघकार्याचा एक महत्त्वाचा लक्षणीय पैलू म्हणजे तुरुंगात असणाऱ्या कार्यकर्त्यांच्या कुटुंबांची बाहेरच्या स्वयंसेवकांनी घेतलेली काळजी. एकदा तर अशा कुटुंबांची संख्या चाळीस हजारांवर जाऊन पोचली होती. या कुटुंबियांची नीट व्यवस्था व्हावी म्हणून आपला सगळा जनरल प्रॉव्हिडंट फंड देऊन टाकणारे सरकारी कर्मचारीही बरेच होते. अगदी काही काँग्रेसवालेसुद्धा पुढे आले आणि त्यांनी रा. स्व. संघाच्या या योजनेला हातभार लावला होता.

तुरुंगातील आयुष्याचा विधायक पैलू म्हणजे रा. स्व. संघ आणि इतर संघटना– विशेषतः जमाते इस्लामी– यांच्यात निर्माण झालेला मैत्रीभाव. 'रा. स्व. संघाची माणसे भयानक असतात', असे जरी मुसलमानांना सांगितले गेलेले असले तरी प्रत्यक्ष तुरुंगात मात्र ते सारे

निबंध ७७१४२८४



एकत्र राहू– जेवू– खेळू– बोलू शकत होते. परस्परांत संपूर्ण सामंजस्य निर्माण करू शकत होते. हे जेव्हा राष्ट्राध्यक्ष फक्रुद्दीन अली अहमद यांना समजले, तेव्हां त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. त्यांचा त्यांच्या कानांवर विश्वासच बसेना. काँग्रेसला अनुकूल असणारे जमियत-उल्-उलेमाचे लोक रा. स्व. संघाच्या लोकांना आणि जमाते इस्लामीच्या लोकांना वेगवेगळे ठेवण्याची मागणी करीत होते, पण त्यांच्या दुर्दैवाने हिंदू-मुसलमानांसाठी वेगवेगळे वॉर्डस् नव्हतेच मुळी !

या काळाचे आणखी एक गमतीचे वैशिष्टच म्हणजे अनेक सरकारी अधिकाऱ्यांनी संघाबद्दल दाखवलेली सहानुभूती. राष्ट्राध्यक्षांनी आणीबाणीच्या जाहीरनाम्यावर सही करण्यापूर्वी काही तास एका वरिष्ठपोलीस अधिकाऱ्याने रा. स्व. संघ आणि भारतीय जनसंघाच्या एका नेत्याला दूरध्वनीवरून असे सांगितले होते की, ‘देशभरात सर्वत्र काही तरी गंभीर घडणार आहे आणि तुम्ही व तुमच्या मित्रांनी भूमिगत झालेले चांगले ठरेल.’ काही वरिष्ठ अधिकारी सरकारच्या गुप्त योजनांची माहितीदेखील भूमिगत संघनेत्यांना वेळोवेळी कळवीत असत. सुब्रह्मण्यम स्वामी देश सोडून बाहेर गेले, परंतु आले आणि पुन्हा गेले... आणि तरीदेखील पकडले गेले नाहीत ते अशा सरकारी अधिकाऱ्यांच्या सहकार्यामुळेच !

स्वामींचा राज्यसभेतला नाट्यपूर्ण प्रवेश आणि त्याहूनही नाट्यपूर्ण असे त्यांचे सभागृहातून अदृश्य होणे म्हणजे आणीबाणीविरुद्धच्या लढ्याला कलाटणी देणारी अशीच घटना होती. त्यामुळे सगळ्या देशातल्या जनतेसमोर इंदिराजींची राजवट हास्यास्पद ठरली. आपल्या शासनाची बोट बुडू लागल्याची त्यांना जाणीव झाली. विरोधकांना निर्दयपणे नेस्तनाबूत करता यावे यासाठी जनतेकडून नव्याने कौल घ्यावा असे त्यांना वाटू लागले आणि मग त्यांनी निवडणुकांच्याच दिशेनेच– आणि पर्यायाने निर्णायक अशा पराभवाच्या दिशेने– पावले टाकायला सुरुवात केली.

हुकुमशाहीविरुद्धच्या लढ्यात आघाडीवर असणाऱ्या संघाने जनतेच्या निशाणाला विजयश्री मिळवून देण्याच्या प्रयत्नांतही मोठी महत्त्वाची भूमिका बजावायचे ठरवले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ त्यावेळी

जणू उत्कर्षाच्या शिखरावरच पोचलेला होता. म्हणूनच फेब्रुवारी १९७७ च्या शेवटच्या आठवड्यात इंदिराजींनी रा. स्व. संघाशी संपर्क प्रस्थापित केला. पाच ज्येष्ठ भूमिगत संघनेत्यांना भेटण्याची कामगिरी एका वरिष्ठ अधिकाऱ्याकडे सुपूर्त करण्यात आली. जर संघाने आपले कार्यकर्ते जनता मोहिमेतून काढून घेतले तर सरकार संघावरची बंदी उठवण्यास आणि तुरुंगातल्या ३०,००० लोकांना मुक्त करण्यास तयार आहे, असा तो तडजोडीचा मसुदा होता. ती 'ऑफर' संघाने साफ नाकारली. त्यावेळी इंदिराजींना असे वाटत होते की निवडणूक आपणच जिंकणार आहोत. फक्त रा. स्व. संघाचे कार्यकर्ते मोहिमेतून मागे सरले तर आपले काम कमी कठीण होईल अशी त्यांची कल्पना होती.

संघाच्या नेत्यांनी ती तडजोड अमान्य करताना असे स्पष्टपणे सांगितले की, 'इंदिराजी आमच्यापासून खूप लांब गेल्या आहेत. सरसंघचालकांच्या पत्रांना साधी पोचदेखील देण्यात आलेली नाही. साहजिकच निवडणुकीच्याद्वारे या प्रश्नाचा निकाल लावण्याचा स्वयंसेवकांनी चंग बांधला आहे. आणि उद्या यदाकदाचित इंदिराजी निवडणुकीत विजयी झाल्याच तर रा. स्व. संघ त्यांना तेथून हटवण्यासाठी याहीपेक्षा अधिक मोठा लढा सुरू करील.'

'संघावरची बंदी उठवण्याच्या मोबदल्यात इंदिराजींना काहीतरी मिळाले पाहिजे', असे त्या सरकारी प्रतिनिधीने सांगितले. पण 'आपणच केलेला अन्याय दूर करण्याबद्दल आणि तोही बऱ्याच उशिरा दूर करण्याबद्दल इंदिराजींना पारितोषिक देण्याची मुळीच आवश्यकता नसल्याचे' स्पष्ट मत संघनेत्यांनी व्यक्त केले. ते म्हणाले, "तुम्ही हजारो कुटुंबे उद्ध्वस्त केली आहेत. हजारो लोकांची उदरनिर्वाहाची साधने तुम्ही हिसकावून घेतली आहेत आणि असंख्य कार्यकर्त्यांचा छळ केला आहे. तेव्हा आता जर तुम्ही आपणहून बंदी उठवलीत आणि निरपराध लोकांची स्थानबद्धतेतून सुटका केलीत तर आत्तापर्यंत निर्माण झालेली कटुता सौम्य होण्याची आणि प्रक्षोभ कमी होण्याची थोडीफार आशा बाळगता येईल."

तो अधिकारी म्हणाला, "तुम्ही लोक गेले २१ महिने तुरुंगात

खितपत पडला आहात. लौकरच तुमच्यापैकी अनेक लोक शरण येऊ लागतील. आणखी किती काळ तुम्ही अशी तग धरू शकाल ?" तेव्हा त्याला असे सांगितले गेले की, "तुरुंगात असणाऱ्या लोकांशी बाहेर असणाऱ्यांचा सतत संपर्क आहे. तुरुंगात असणाऱ्यांचे मनोधैर्य उत्तम प्रतीचे आहे, भूमिगत चळवळीतही शैथिल्य आलेले नाही, त्यामुळे आणखी तीन-चार वर्षे लढा द्यावा लागला तरी तो आम्हाला कठीण वाटणार नाही. शिवाय तुरुंगातले स्वयंसेवक जुलमाबरोबरची अशी कोणतीही तडजोड सहन करणार नाहीत की जिच्यामुळे त्यांचा त्याग निरर्थक ठरेल आणि तुरुंगातून बाहेर पडल्यावर राष्ट्रीय पुनरुत्थानाच्या कार्यातली भूमिका बजावीत असताना ताठ मानेने जगणे त्यांना अशक्यप्राय होईल."

'जर कोणतीही तडजोड व्हावी असे वाटत असेल तर ती दोन्ही बाजूंना सन्माननीय वाटेल अशी असली पाहिजे. संघावरची बंदी उठवणाऱ्या अधिकृत घोषणेत संघावर टीका करणारा एक शब्ददेखील असता कामा नये. जर तशी टीका झाली तर दोन्ही पक्षांत कायमची दरी निर्माण होईल. शिवाय नोकरीवरून कमी केले गेलेले सर्व लोक आपापल्या जागी परत घेतले गेले पाहिजेत आणि जमा केलेल्या सर्व संस्थांची मालमत्ता परत मिळाली पाहिजे तरच तडजोड होऊ शकेल.' हे सांगितल्यानंतर वाटाघाटी मोडल्या. त्या प्रतिनिधीने मनमोकळेपणाने हे मात्र कबूल केले की, "रा. स्व. संघाच्या नेतृत्वाकडून अशाच स्वाभिमानी आणि तडफदार पवित्र्याचीच माझी अपेक्षा होती. बंदी घातली गेलेली असतानाही तुमची संघटना पूर्वी जशी होती तशीच शाबूत आहे, हे लक्षात घेता तुमची भूमिका अगदी स्वाभाविक आहे, असेच म्हटले पाहिजे. तुरुंगात तुमचे बहुतेक सगळे जुने म्हातारे स्वयं-सेवक आहेत. तरुण कार्यकर्ते मात्र बाहेरचे काम अगदी सुरळीतपणे— एरवी सारे ठाकठीक असताना चालेल तसेच— पार पाडीत आहेत. स्थानबद्धांच्या कुटुंबियांची योग्य ती काळजी घेतली जाते आहे. तुमचे नेते देशभर संचार करीत आहेतच. आणीबाणीचा तुमच्यावर कोणताही विपरीत परिणाम झालेला नाही. त्यामुळे मी तुमच्याकडून तुम्ही आता

दिलेत त्याच उत्तराची अपेक्षा करीत होतो."

एखादी झुळुक यावी त्याप्रमाणे सुरू झालेल्या निवडणूक मोहिमेने पाहाता पाहाता वादळी स्वरूप धारण केले आणि आणीबाणी लादणाऱ्या राजवटीला उखडून इतिहासाच्या कचरापेटीत फेकून दिले. संघावर जरी बंदी कायम होती तरी जनता निवडणूक क्रांतीत त्याने मोठा वाटा उचलायचा तो उचललाच. त्या विजयानंतर सर्वत्र जो अभिनंदनाचा वर्षाव झाला त्यामुळे एखादा सामान्य नेता हुरळून गेला असता. पण बाळासाहेबांनी कुठेही अहंकार किंवा अभिमान दर्शवला नाही की कुठे पूर्वग्रह व्यक्त केला नाही. 'क्षमा करा आणि विसरून जा' अशी त्यांची प्रतिक्रिया होती. १९४९ साली संघावरची बंदी सरकारने विनशर्त मागे घेतल्यावर 'आपल्याच दातांनी जीभ चावली म्हणून काही आपण आपले दात पाडून टाकीत नाही' अशी प्रतिक्रिया श्री गुरुजींनी व्यक्त केली होती, त्याचीच ही पुनरुक्ती होती.

-x-

# प्रकरण आठवे : आजचा संघ

आणीबाणीनंतरच्या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दृष्टीने बिगरहिंदूंसाठी आपली दारे औपचारिक रीतीने उघडण्याइतकी दुसरी कोणती सोपी गोष्ट नव्हती. तसे केले गेले असते तर जे काही थोडेफार टीकाकार उरले होते त्यांची तोंडेदेखील बंद झाली असती. पण रा. स्व. संघाने तसे केले नाही. लोकांना खूष करण्यासाठी एखादी गोष्ट करणे हा या संघटनेचा पिंडच नाही.

वयोवृद्ध स्वातंत्र्ययोद्धे आणि नागपूर विद्यापीठातल्या गांधी-भवनाचे संचालक श्री. एम. जे. कानिटकर यांनी या संदर्भात म्हटले होते की, " बिगरहिंदूंना संघात प्रवेश द्यावा किंवा देऊ नये हा प्रश्न नाजूक आहे तसाच महत्त्वाचाही आहे. एखादे थातुरमातुर उत्तर किंवा चुकवाचुकवी करणारे उत्तर देऊन चालण्यासारखे नाही. या प्रश्नाचे उत्तर निःसंदिग्ध आणि टिकाऊ स्वरूपाचे हवेच पण ते तर्कशुद्धही हवे. माझे या प्रश्नाला स्पष्ट उत्तर नकारार्थी आहे." आपल्या भूमिकेचे स्पष्टीकरण करताना त्यांनी सांगितले होते, " सर्व धर्मांची समानता हे आपले अंतिम उद्दिष्ट आहे. वेगवेगळ्या धर्मांच्या अनुयायांमध्ये सहकार्यावर आणि खऱ्याखुऱ्या सौहार्दावर आधारलेले मैत्रीसंबंध व्यावहारिक पातळीवर प्रस्थापित होण्याच्या दृष्टीने आपले हे उद्दिष्ट पुरेसे व्यापक आहे. धार्मिक दृष्टीने संघटनात्मक वेगळेपण कायम राखणे हे त्या उद्दिष्टाशी मुळीच विसंगत नाही; उलट, हे धार्मिक वेगळेपण कायम

टिकवत असतानाच, परस्परांतील बंधुभाव कायम राहावा म्हणून उच्च पातळीवरील मानवतेची जी आराधना आपल्याला करावी लागेल ती समाजाच्या उद्धारासाठी अत्यंत उपयुक्त ठरेल. ही पद्धत बदलण्याची मुळीच गरज नसून दृष्टिकोन बदलण्याने कार्यभाग साधला जाऊ शकेल."

श्री. कानिटकर पुढे म्हणाले होते की, "अलीकडे मुसलमानांमधील प्रतिष्ठित धार्मिक नेत्यांबरोबर सरसंघचालकांच्या वारंवार भेटीगाठी झाल्या आहेत. त्या विचारविनिमयामुळे मनातली किल्मिषे दूर झाली आहेत. त्यामुळे हिंदू-मुसलमानांच्या एकतेचा मार्ग खुला झाला आहे. हीच एकी साध्य करण्यासाठी महात्मा गांधी आयुष्यभर प्रयत्न करीत राहिले, याचसाठी त्यांनी टीका सहन केली, संशयी नजरा त्यांच्यावर रोखलेल्या राहिल्या आणि शेवटी त्याचसाठी त्यांनी आपले प्राणही दिले. तेव्हा हिंदू-मुसलमान एकीच्या सध्या दिसून येणाऱ्या चांगल्या भवितव्याबद्दल कोणत्या गांधीवादी माणसाला आनंद झाल्याशिवाय राहील ?"

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही एक सांस्कृतिक संघटना आहे. जमात-इ-इस्लामी किंवा जमियत-उल-उलेमा या संघटनांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी जसे हिंदू लोक रांगा लावणार नाहीत, त्याचप्रमाणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघात प्रवेश मिळवण्यासाठी आत्ता मुसलमानही रांगा लावून उभे राहिलेले नाहीत. सांस्कृतिक संघटना सांस्कृतिकच राहाणे आणि त्यांनी असंस्कृत पद्धतींचा अवलंब करून कोणत्याही 'स्टंट'च्या–देखाव्याच्या– नादी न लागणे हेच श्रेयस्कर ठरेल. दोन जमातींचे यांत्रिक स्वरूपातले एकत्र येणे महत्त्वाचे नसून परस्परांबद्दलचे वैर त्यांनी मनातून काढून टाकणे महत्त्वाचे आहे, असे संघाला वाटते. अखेरीस मुसलमानांना जबरदस्तीने हिंदू संघटनांमध्ये घालणे किंवा हिंदूंना मुस्लीम संघटनांमध्ये कोंबणे हे भांडवलदारांना कामगारसंघटनांमध्ये आणि साम्यवाद्यांना 'फिक्की'सारख्या संघटनेत कोंबण्याइतकेच निरर्थक ठरणार आहे. त्यामुळे सध्यातरी विविध जमातींच्या नेत्यांना एक समान व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे रा. स्व. संघाने ठरवले आहे आणि रक्षाबंधन, होळी, दसरा व इतर सणांच्या दिवशी देशात सर्वत्र गाठीभेटी-

पणे तो उपक्रम अमलातही आणला गेला आहे.

रा. स्व. संघ आणि मुसलमानांमध्ये तुरुंगवासाच्या काळात निर्माण झालेले चांगले संबंध बिघडावेत, यासाठी काही राजकीय महाभाग अहोरात्र झटत आहेत. या संदर्भात ही गोष्ट लक्षणीय आहे की संघावरचे हे हल्ले मुसलमानांकडून चढवले जात नसून राजकारण्यांच्या विशिष्ट गटाकडूनच केले जात आहेत. हेही लक्षात घेण्यासारखे आहे की, रा. स्व. संघाचे दरवाजे बिगरहिंदूंसाठीही उघडे केले जावेत, ही मागणीदेखील मुसलमानांकडून केली गेली नसून राजकारण्यांच्या त्याच गटाकडून केली जाते आहे. कारण अगदी साधे आहे. आपले धार्मिक वेगळेपण कायम राखण्याच्या बाबतीत मुसलमान हिंदूंपेक्षा अधिक जागरूक आहेत आणि कोणत्याही अखिल भारतीय संघटनेच्या सदस्यत्वाचा परिणाम होणार तो सदस्यांचे भारतीयीकरण म्हणजेच हिंदूकरण होण्यात– अगदी अहिंदू सदस्यांचेदेखील– होणार !

आणि म्हणूनच आपल्या घटनेत औपचारिक पद्धतीने काही दुरुस्ती करून, तांत्रिकदृष्टया आपल्या संघटनेचे सदस्यत्व बिगरहिंदूंसाठी उपलब्ध करून देण्याचा, त्यांच्यापैकी काहीजणांचे ' राष्ट्रीय मुसलमान' म्हणून प्रदर्शन मांडण्याचा आणि नंतर त्यांना सोयीस्कररीत्या विसरून जाण्याचा मोह रा. स्व. संघाने टाळला आहे. त्याऐवजी विविध जमातींमध्ये आणि त्यांच्या संघटनांमध्ये चांगले संबंध प्रस्थापित करण्यावर व ते सुधारण्यावर भर देण्याचे संघाने ठरवले.

त्याचबरोबर संघाने हळूहळू आणि स्वाभाविक रीतीने अनेक बिगरहिंदूंना आपल्या संघटनेत प्रवेशही दिला आहे. आज शेकडो मुसलमान दररोज शाखांवर आपली उपस्थिती लावीत आहेत. मुंबईतल्या मराठा मंदिर प्रशाळेतील शिक्षक व संस्कृत-अरबी भाषांचे विद्वान श्री. गुलाम दस्तगीर १९७७ पासून आपल्या मुलांसह शाखेवर येत आहेत. जनता सरकारमधील एक मंत्री श्री. जाफर शरीफ हे आणीबाणीपूर्वीच कर्नाटकात संघस्वयंसेवक झाले होते. ते तीन वर्षे शाखेवर येत होते, त्यांनी प्रशिक्षणवर्गातही भाग घेतला होता. काही मुसलमान सद्गृहस्थांच्या आग्रहाखातर त्यांनी शाखेवर जाणे बंद केले असले तरी

अजूनही संघगीते ते गुणगुणत असतात. संघातील लोकांना आपल्या 'सेक्युलॅरिझम'चा पुरावा म्हणून या उदाहरणाचा गवगवा करण्याची आवश्यकता जाणवली नाही किंवा त्यांना ते योग्यदेखील वाटले नाही.

राजस्थानातील वनस्वारा गावचा बी. कॉम.चा विद्यार्थी अझीझ हुसेन याने तर रा. स्व. संघाचा महिन्याभराचा प्रशिक्षणवर्गदेखील पूर्ण केला होता. त्यानंतर पत्रकारांचे आपल्याबद्दलचे कुतुहल लक्षात घेऊन त्याने अशी माहिती सांगितली होती की, "माझे वडील दुबईला असतात. ते जेव्हा मार्च १९७९ मध्ये इकडे आले तेव्हा काही मुसलमान सद्गृहस्थांनी त्यांच्याकडे माझ्या संघात जाण्याबद्दल तक्रार केली. वडिलांनी मला जेव्हा त्याबद्दल विचारले तेव्हा माझी आई मध्ये पडली आणि तिने स्थानिक प्रचारक मनफूलजी यांचे सौहार्दपूर्ण वागणे, मी संघात जाऊ लागल्यापासून माझ्यात झालेला चांगला बदल वगैरेबद्दल बरेच काही वडिलांना सांगितले. त्यानंतर मनफूलजी एकदा आमच्याकडे जेवायला आले आणि त्यावेळी वडिलांचे त्यांच्याबरोबर अनेक विषयांवर बोलणे झाले. त्या चर्चेनंतर माझ्या वडिलांनी मला एकट्यालाच नव्हे, तर माझा धाकटा भाऊ इल्यास यालादेखील शाखेत जाण्याची परवानगी दिली."

केरळमध्येसुद्धा काही मुसलमान संघात सामील झाले आहेत. कन्हानगडजवळ कोट्टापारा येथे झालेल्या १९७९ सालच्या रा. स्व. संघाच्या हिवाळी शिबिरात रात्रीच्या पहारेकऱ्यांचे काम अब्दुल्ला आणि अब्दुल रहमान या दोघा मुस्लीम स्वयंसेवकांनीच केले होते.

श्री. बाळासाहेब देवरस यांनी अलीकडे असे जाहीरपणे सांगितले की, बऱ्याच मोठ्या संख्येने मुसलमान आणि ख्रिश्चन लोक संघात येऊ लागले आहेत, पण संघ कधीही त्यांचा देखावा करणार नाही. शांतपणे राष्ट्रउभारणीचे कार्य करीत राहाण्यावर आमची श्रद्धा आहे. कोणत्याही गोष्टीचे प्रदर्शन मांडण्यात आम्हाला स्वारस्य नाही."

एप्रिल १९७९ मध्ये वृत्तपत्रांतून एक बातमी प्रसिद्ध झाली होती. ती अशी होती :

"वाराणसी, दि. २४ एप्रिल: गोदोव्लिया क्रॉसिंगजवळच्या राम-

मंदिरात काल शहारातल्या मुसलमानांनी नमाझ पढला. रा. स्व. संघाचे पूर्वांचलाचे संघटक श्री. के. एस. सुदर्शन यांनी नमाझाची सर्व व्यवस्था केली होती. त्या देवळात रा. स्व. संघातर्फे आयोजित करण्यात आलेल्या एका बैठकीत भाग घेण्यासाठी हे मुसलमान तेथे आले होते. हिंदू धर्म आणि इस्लाम धर्म यांच्या वेगवेगळ्या पैलूंवर चर्चा चालू असतानाच नमाझाची वेळ झाली. तेव्हा रा. स्व. संघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य असणाऱ्या श्री. सुदर्शन यांनी देवळाच्या आवारातल्याच एका खोलीत नमाझ पढण्याची व्यवस्था करण्यास आपल्या स्वयंसेवकांना सांगितले."

अर्थात यात नवीन असे काहीच नव्हते. त्यापूर्वी पाहुण्या मुसलमान नेत्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यालयांमध्येही नमाझ पढला होता. काही वर्षांपूर्वी 'ऑर्गनायझर'च्या कार्यालयातही अशीच घटना घडली होती.

१९६० साली डॉक्टर हेडगेवारांच्या सन्मानार्थ समाधी उभारण्याचा निर्णय घेतला गेला तेव्हा प्रमुख 'संगतराश' म्हणून राजस्थानातले तज्ज्ञ मुसलमान शिल्पकार हकीमभाई यांची त्या कामासाठी निवड करताना कुणीही खळखळ केली नव्हती किंवा आढेवेढे घेतले नव्हते. श्री. गुरुजी जेव्हा जेव्हा बांधकामाच्या ठिकाणी जात तेव्हा तेव्हा ते हकीमभाईंना भेटत, त्यांची विचारपूसही करीत. काम पूर्ण झाल्यानंतर गुरुजींनी त्यांना खास शाल देऊन त्यांच्या कामाचे कौतुकही केले होते.

रा. स्व. संघ आणि मुसलमान यांच्यातल्या या नव्या मैत्रीत खरे म्हटले तर आश्चर्य करण्याजोगे काहीच नाही. कारण संघ कधीही मुस्लीमविरोधी नव्हता. भारताच्या एकात्मतेला आणि अखंडत्वाला विरोध करणाऱ्यांचा तो विरोधक होता आणि आहे. या शतकाच्या चाळिशीत पाकिस्तानवाल्यांविरुद्ध संघ उभा राहिला तो ते मुसलमान होते म्हणून नव्हे, तर ते भारतमातेला छिन्नविच्छिन्न करायला निघाले होते म्हणून ! जर दुसऱ्या कुणी भारताची दुसऱ्या प्रकारची फाळणी मागितली असती तर संघाने त्यालादेखील तितकाच कडवा विरोध केला असता.

भारताच्या एकात्मतेशी आणि अखंडत्वाशी खेळ खेळणाऱ्या

कोणत्याही शक्तिविरुद्ध संघ उभा ठाकणार, हे स्पष्टच आहे. त्यामुळेच भारताची फाळणी करू इच्छिणाऱ्यांविरुद्ध तो उभा राहिला. त्यामुळेच तो गोवा मुक्तीच्या आंदोलनात आघाडीवर राहिला आणि भारतीय भूमीवरच्या चिनी अतिक्रमणांविरुद्ध त्याने आवाज उठवला तोही त्यामुळेच ! संघाने केवळ पूर्व बंगालला बेरुबारी देऊन टाकण्यालाच विरोध केला नाही, तर श्रीलंकेला कच्छतिवू देऊन टाकण्यासही विरोध केला.

फाळणीनंतरही अनेक वर्षे, भारतात राहणाऱ्या कित्येक मुसलमानांना समाधान वाटत नव्हते. पाकिस्तानने भारतावर हल्ला करून काही प्रदेश 'मुक्त' केला असता तर त्यांना समाधान वाटले असते. अशा परिस्थितीत हिंदू-मुसलमानांत तणाव निर्माण होणे अटळ होते. पण १९६५ आणि १९७१ च्या युद्धांमुळे पाकिस्तानला त्याची खरी जागा समजावली गेली. मुसलमान भारतीयांना आता पूर्वीइतका पाकिस्तानात रस राहिलेला नाही. लौकरच अशी स्थिती येण्याची शक्यता आहे की, या देशातल्या मुसलमानांना इजिप्त–तुर्कस्थानबाबत जेवढी आस्था आहे तेवढीच पाकिस्तानबाबत राहील. यामुळे हिंदू-मुसलमान सामंजस्य शक्य झाले आहे. तुरुंगात एकत्र राहिल्यामुळे ही वस्तुस्थिती अधिक प्रकर्षाने जाणवू लागली आहे, इतकेच. रा. स्व. संघ पूर्वी मुसलमानांचा विरोधक नव्हता आणि आता तो मुसलमानांचा समर्थकही नाही. मुसलमानांनीच आपली भूमिका बदलली आहे. संघाने मात्र आपले उद्दिष्ट कायम ठेवले आहे.

संघावर होणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या टीकांबाबतची बाळासाहेबांची प्रतिक्रिया शांत व संयमी असते. ते म्हणतात, "विरोधक नेहमी विरोध करीतच राहाणार, तिकडे लक्ष न देता कार्यकर्त्यांनी काम करीत राहायला हवे. संघाचा विकास सरकारी पाठिंब्यामुळे झाला नाही आणि सरकारने विरोध केल्यामुळे तो विकास खुंटणारही नाही."

एप्रिल १९७८ मध्ये दिल्लीत केलेल्या आपल्या पहिल्या मोठ्या भाषणात बाळासाहेब म्हणाले होते की, "डॉ. हेडगेवारांच्या कारकीर्दीत

संघाचा कल राजकीय गोष्टींकडे अधिक होता. श्री. गुरुजींच्या नेतृत्वाखाली सांस्कृतिक पुनर्रचनेच्या कार्यावर भर दिला गेला. नव्या परिस्थितीत त्या कार्याला नवी दिशा द्यावी लागेल. आता यापुढे आपल्या सगळ्या कार्याला सामाजिक आशय असेल."

प्रौढ साक्षरता कार्यक्रमात मोठ्या प्रमाणावर भाग घेण्यास संघाने यापूर्वीच प्रारंभ केला आहे. संघाच्या या क्षेत्रातील 'घुसखोरी' बाबत जी राजकीय चर्चा चालते तिची टर उडवताना बाळासाहेब म्हणाले, "लोक म्हणतात, आम्ही सैन्यात, प्रशासकीय सेवांमध्ये, वृत्तपत्रांमध्ये आणि इतर ठिकाणीही सर्वत्र घुसत आहोत, घुसखोरी करीत आहोत. हे म्हणणे हास्यास्पद आहे. स्वयंसेवकांनी कोणत्याही नोकरीसाठी अर्ज करायचा नाही की काय? कोणत्याही व्यवसायात पडायचे नाही की काय? घर आणि शाखा यात सारखी जा-ये करण्याव्यतिरिक्त स्वयंसेवकांनी दुसरे काहीही करायचे नाही की काय? आम्ही वर्चस्व गाजवतो असा आमच्यावर आरोप केला जातो. कुणाचीतरी हकालपट्टी करून सर्व सूत्रे आपल्या हाती घेणे याला वर्चस्व गाजवणे असे म्हणतात. आणि आम्ही तर कुणालाही हाकलण्याचा विचार करण्याऐवजी टीकाकारदेखील संभाव्य स्वयंसेवकच आहेत, अशी समजूत बाळगून असतो. नाही, आम्ही कुठेही घुसखोरी करीत नाही किंवा वर्चस्वही गाजवीत नाही. पण आदिवासी, वनवासी, मच्छीमार वगैरे लोकांमध्येही काम करणाऱ्या या प्रचंड संघटनेचा प्रत्येक गोष्टीवर आणि प्रत्येकावर ठसा उमटणे अपरिहार्य आहे. आम्ही डॉक्टरसाहेबांना विचारीत असू की, 'आपण काय फक्त दक्ष– आरम हेच का करीत राहायचे?' ते म्हणत, 'नाही. संघ हे एक वीजनिर्मिती केंद्र आहे. इथे जी वीज तयार होईल ती रोषणाईसाठी, पाणी तापवण्यासाठी, पदार्थ थंड ठेवण्यासाठी किंवा यंत्रे चालवण्यासाठी वापरली जाईल.' संघ असाच होता, आहे आणि नेहमी राहील– राष्ट्रसेवेला आवश्यक असणारी वीज पुरवणारे केंद्र! नागपूरच्या एका वृत्तपत्राने 'संघ रंगहीन, वासहीन, बेचव आणि कर्तृत्वशून्य असल्याचे' मत व्यक्त केले आहे. आम्ही फार प्रभाव गाजवतो

असे काहीजण म्हणत आहेत, तर आम्ही काहीही करत नाही असे काहीजण म्हणत आहेत, ही मोठी गमतीशीर परिस्थिती आहे. आम्ही स्थितिप्रिय लोक आहोत, असे काहींना वाटते. पण आम्ही लोक तसे नाही. हा आजारी, दुबळा समाज निरोगी, हसरा आणि समर्थ बनवण्याच्या इच्छेने प्रेरित झालेले आम्ही खूप असंतुष्ट आहोत. असंतोष हे समृद्धीचे मूळ आहे, अशा आशयाचे 'असंतोषः श्रेयमूलम् ।' हे संस्कृत वचन प्रसिद्ध आहे. पण बदल म्हणजे विनाश अशी आमची कल्पना नाही. महाभारतात म्हटल्याप्रमाणे बेकायदेशीरपणा करून कोणतेही प्रश्न सुटत नसतात. 'अराजकेषु राष्ट्रेषु धर्मो न परस्परं तस्मादिग्रजकाम संतिष्ठते ।' म्हणजे आपापसात भांडणाऱ्या लोकांच्या देशात अराजक माजते आणि तेथे धर्म टिकत नाही. म्हणूनच अराजक हा शाप आहे ! बदल हा घटनात्मक आणि शांततापूर्णच व्हावा, असे आम्हाला वाटते. दुसऱ्या लोकांचा स्वभाव उसना घेण्यात काहीच अर्थ नाही. अतिरेकी भूमिका घेऊन वावरणाऱ्यांबरोबर आम्हाला स्पर्धा करावयाचीच नाही!"

बाळासाहेब पुढे म्हणाले होते की, "आज निम्म्याहूनही अधिक विद्यापीठांमधील परीक्षा पुढे ढकलल्या गेल्याचे दृश्य दिसते आहे. कुलगुरूंना घेराओ घातला जात आहे. काही विद्यार्थी 'पढाई के साथ लडाई'— अभ्यास आणि मारामाऱ्या एकाच वेळी करण्याचा मनसुवा बाळगून आहेत. हे असे चालणार नाही. आम्ही अभ्यासाच्या बाजूने आहोत, लढाईच्या बाजूने नाही." भाषणाच्या अखेरीस ते म्हणाले होते की, "आपल्या वैयक्तिक जीवनावर, कौटुंबिक आणि सामाजिक जीवनावर संघाचा प्रभाव पडला पाहिजे. संघाचा स्वयंसेवक ज्या कुठल्या क्षेत्रात असेल त्या क्षेत्रात इतरांपेक्षा चांगला असायला हवा आणि तो उत्तम नागरिकही असायला हवा. संस्कृतीच्या गोष्टी करीत असताना कौटुंबिक पत्रेसुद्धा इंग्रजीतून लिहायची, हा प्रकार उपयोगी पडणार नाही. आपण कमी बोलायला आणि जास्त काम करायला शिकले पाहिजे. समस्यांची यादी करण्यात आपण समाधान मानता कामा नये, त्या समस्यांवरचे तोडगेदेखील आपण शोधून काढले पाहिजेत आणि संघाच्या शाखा हाच संघसामर्थ्याचा मूलस्रोत आहे. हे आपण कधीही

विसरता कामा नये. आणखी शाखा निघाल्या पाहिजेत, त्यातील स्वयंसेवकांची संख्या वाढली पाहिजे आणि त्यांची गुणवत्ताही वाढली पाहिजे. ''

त्यानंतर मुंबईत बोलत असताना बाळासाहेबांनी ' हिंदूंच्या संघटनेचे काम करणे म्हणजे काही पाप नाही ', हे स्पष्ट केले. न्यायमूर्ती रानडे, डॉक्टर आंबेडकर आणि इतर अनेक थोर लोकांनी फक्त हिंदूमध्येच कार्य केल्याचे त्यांनी दाखवून दिले. त्या सर्वांवर किंवा त्या सर्वांच्या कार्यावर ' जातीय ' म्हणून शिक्का मारणे चुकीचे ठरेल. ते म्हणाले, " हिंदूंना सेक्युलॅरिझमबद्दलच्या कुणाच्याही प्रशस्तिपत्रकाची गरज नाही. आम्ही या जगातले सगळ्यात जास्त सेक्युलर लोक आहोत. भारतात मुसलमानांची किंवा ख्रिश्चनांची सत्ता प्रस्थापित होण्यापूर्वी अनेक वर्षे त्यांची धर्मस्थाने बांधण्याची त्यांना परवानगी दिली गेली होती. आपल्याच मायभूमीत होणाऱ्या छळाला कंटाळून पारशी लोक जेव्हा भारतात आले तेव्हा या देशाने त्यांना मोठ्या औदार्याने आश्रय दिला होता. याउलट आज विसाव्या शतकातदेखील सौदी अरेबियात किंवा इतर मुसलमान देशांमध्ये हिंदू रहिवासी एखादे देऊळ उभारू शकत नाहीत आणि या गोष्टीचा मात्र एकाही तथाकथित ' सेक्युलॅरिस्ट ' नेत्याने निषेध केलेला नाही. ''

राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर महाराष्ट्रीय ब्राह्मणांचे वर्चस्व आहे, या आक्षेपाचा उल्लेख करून बाळासाहेब म्हणाले, " संघाचे अनेक ज्येष्ठ कार्यकर्ते नागपूर भागातले आहेत कारण संघाचा जन्मच मुळी तेथे झाला आहे. रामकृष्ण मिशनचे बहुसंख्य संन्यासी बंगालमधले असण्याचेही कारण तेच आहे. अर्थात दोन्ही बाबतींत ते स्वरूप काही संकुचितपणाचे लक्षण मानता येणार नाही.''

संघाचे विरोधक संघावर अगदी हास्यास्पद आक्षेप घेतात किंवा टीका करतात ती या अपेक्षेने की आम्ही त्यांचे खंडन केले म्हणजे त्यांना आपोआपच प्रतिष्ठा प्राप्त होईल, असे सांगून बाळासाहेबांनी सरकार्यवाहाच्या पदाबद्दल पसरवल्या जाणाऱ्या खोट्यानाट्या बातम्यांचा उल्लेख केला. " माधवरावजी मुळे यांची तब्येत खालावत

चालली होती तेव्हा म्हणजे मार्च १९७८ मध्ये प्रा. राजेंद्रसिंहजी यांनी सरकार्यवाह म्हणून सूत्रे हाती घेतली. पण संघविरोधी असणाऱ्या काही नियतकालिकांनी असा खोटा प्रचार आरंभला की, माधवरावजी मुळीच आजारी पडले नसून त्यांना हटवण्यासाठी मुद्दाम कारस्थान रचण्यात आले आहे. काही लोकांना असे वाटते की मी अशा खोटचा आणि खोडसाळ अफवांचा जाहीर इन्कार करावा. म्हणजे मी काय करावे ? वैद्यकीय दाखला सादर करायचा की ध्वनिक्षेपक लावलेल्या जीपमध्ये बसवून, माधवरावांना शहरातून फिरवायचे आणि त्यांचे आजारीपण सिद्ध करायचे ? तेवढचानेसुद्धा टीकाकारांचे समाधान होईल याची खात्री काय ? 'हा माणूस आजारी आहे, हे कबूल; पण हेच माधवराव आहेत, दुसरे कुणी नाहीत, हे आम्ही कसे मानायचे,' असे ते महाभाग म्हणू शकतील. खरोखरच दिल्लीहून प्रसिद्ध होणाऱ्या 'लिंक' या नियतकालिकाने अशी बातमी प्रसिद्ध केली होती की माधवराव मुळीच आजारी नाहीत. ब्राह्मण नसणाऱ्या रज्जूभैय्यांची सरकार्यवाहपदी नियुक्ती झाल्यामुळे महाराष्ट्रातील संघजनांमध्ये मोठचा प्रमाणावर असंतोष धुमसू लागला आहे. महाराष्ट्रातले ब्राह्मण लौकरच सरसंघचालकांविरुद्ध बंड पुकारण्याच्या मनःस्थितीत आहेत.' अशा प्रचाराचा इन्कार करण्याइतकी तरी किंवा त्याची नोंद घेण्याइतकी तरी त्याची पात्रता आहे काय ? जेव्हा माधवरावजींचे दि. ३० सप्टेंबर १९७८ रोजी निधन झाले तेव्हा त्यांना श्रद्धांजली वाहण्याचे साधे सौजन्यदेखील या नियतकालिकांनी दाखवले नाही, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे."

मार्च १९७९ मध्ये दिल्लीत केलेल्या दुसऱ्या एका महत्त्वपूर्ण भाषणात बाळासाहेब म्हणाले, "प्रत्येक हिंदू हा जन्मजात सेक्युलरच असतो. 'एकं सत् विप्राः बहुधा वदन्ति ।' 'एकच सत्य विद्वान लोक वेगवेगळचा रीतीने वर्णितात–' यावर त्याची श्रद्धा असते. तेव्हा एखाद्या हिंदू माणसाला सेक्युलॅरिझम शिकवणे म्हणजे न्यूकॅसलला कोळसा घेऊन जाण्यासारखेच आहे. सर्व धर्म सारखेच चांगले आहेत, हे मानायला नकार देणाऱ्या कार्डिनल ग्रेशससारखे हिंदू लोक असे मानीत नाहीत की आपण जर एका प्रकारचा साबण विकत असलो

तर दुसऱ्या सावणाची आपण स्तुती करताच कामा नये."

'रा. स्व. संघ म्हणजे काहीतरी भयानक संघटना आहे, असा भ्रम जोपासणारे लोक कोणत्याही मार्गाने का होईना पण निवडणुका जिंकू इच्छित असतात आणि त्यांना संघाचा बागुलबुवा दाखवून अल्पसंख्याकांची सर्व मते मिळवायची असतात.' असे सांगून बाळासाहेब म्हणाले, "हे सारे क्षुद्र राजकारणी लोक येत्या निवडणुकीनंतरचे काही पाहू शकत नाहीत. आज खरी गरज आहे ती पुढच्या पिढीचे हित लक्षात घेऊन विचार करू शकणाऱ्या दूरदर्शी नेत्यांची ! रा. स्व. संघावर जातीयवादाचा आरोप करणाऱ्या या लोकांनी तोंडपुजेपणाने अल्पसंख्याकांची तळी उचलून धरण्याव्यतिरिक्त त्यांच्यासाठी प्रत्यक्षात काहीही केलेले नाही. उलट संघाने मात्र आंध्र–तामिळनाडूमधील वादळाच्या वेळी किंवा दिल्लीत महापुराच्या वेळी मुसलमानांना व ख्रिश्चनांना प्रत्यक्ष मदत दिली आहे. दिल्लीत पूरग्रस्तांच्या मदतीसाठी संघाने उभारलेल्या छावण्यांमध्ये रमझानची प्रार्थना म्हणणे मुसलमानांना शक्य व्हावे यासाठी खास व्यवस्था करण्यात आली होती. आंध्रमध्ये वादळग्रस्तांसाठी उभारण्यात आलेल्या दीनदयालपुरम्च्या प्रकल्पात मुसलमानांनाही योग्य तो वाटा देण्यात आला होता. मद्रासमध्ये संघातर्फे पूरग्रस्तांसाठी चालवण्यात येणाऱ्या आरोग्य केंद्रांद्वारा दिली जाणारी वैद्यकीय सेवा अनेक ख्रिश्चनांनी गौरवली आहे. त्या सेवेबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांनी माझ्या सन्मानार्थ चर्चमध्ये एक समारंभदेखील अगत्यपूर्वक आयोजित केला होता."

'एखाद्या माणसाने धर्म बदलला म्हणून त्या माणसाचे राष्ट्रीयत्व काही बदलत नाही,' असे सांगून बाळासाहेब म्हणाले, "इंडोनेशिया हे याचे उत्तम उदाहरण आहे. त्या देशातले बहुसंख्य लोक मुसलमान झाले, पण त्यांनी श्रीरामाभोवती विकसित झालेली आपली राष्ट्रीय संस्कृती तशीच कायम राखली." ते पुढे असेही म्हणाले की, "जर फ्रान्स आणि जर्मनी एकत्र येऊ शकतात तर भारत, पाकिस्तान व बांगलादेश सामायिक बाजारपेठेपासून सुरुवात करून हळुहळू एकत्र का बरे येऊ शकणार नाहीत ?"

बाळासाहेब मलाच एकदा म्हणाले होते की, " दुसऱ्या कोणत्याही लोकसंघटनेपेक्षा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अधिक गांधीवादी आहे. त्यांच्या मुसलमानांबद्दलच्या धोरणाशी आम्ही सहमत नव्हतो, हे खरे आहे. पण चांगल्या मित्रांमध्येदेखील प्रामाणिक मतभेद असू शकतात. शंभर टक्के समानता फक्त गाण्यांच्या ध्वनिमुद्रिकांमध्येच आढळू शकते." या संदर्भात हे लक्षात घेण्यासारखे आहे की गांधीजींनी संघावर कधीही टीका केली नाही आणि संघनेत्यांनीदेखील गांधीजींवर कधी टीकास्त्र सोडले नाही. बाळासाहेब म्हणाले, " तुम्हाला ठाऊकच आहे. १९३४ साली गांधीजींचे डॉक्टर हेडगेवारांबरोबर प्रदीर्घ संभाषण झाले होते. श्री गुरुजी गांधीजींना १९४७ साली भेटले होते. दोघांचाही मनात एकमेकांबद्दल सदिच्छा आणि आदर वसत होता." ध्येयधोरणांच्या आणि जीवनविषयक सर्वसामान्य दृष्टिकोनाच्या बाबतीत रा. स्व. संघ आणि गांधीजी यांच्यात खूप साम्य असल्याचे सांगून बाळासाहेब म्हणाले, " शांतपणे विधायक कार्य करण्यावर गांधीजींचा भर होता, रा. स्व. संघ तेच करीत आहे. आत्ता संघाचे स्वयंसेवक हजाराहूनही अधिक विधायक-रचनात्मक प्रकल्पांत भाग घेऊन गोरगरिबांची आणि पददलितांची सेवा करीत आहेत. मी फक्त दोनच उदाहरणे देतो. आंध्रमधील वादळात रा. स्व. संघाने केलेले कार्य तर आता सर्वश्रुतच आहे. आणि आमच्या मधू देवलांनी सांगलीजवळच्या महिसाळच्या हरिजनांसाठी जे कार्य केले आहे तो एक चमत्कारच मानावा लागेल. संघाचा अहिंसेवर गांधीजींइतकाच विश्वास आहे. श्रीमती इंदिरा गांधींना मध्यंतरी झालेली अटक हे निमित्त खूप मोठा हिंसाचार घडवण्यास पुरेसे ठरले. त्यावेळी कितीतरी बसगाड्या जाळण्यात आल्या, आगगाड्या रुळावरून खाली घसरवण्यात आल्या, प्रवाशांना जिवंत जाळण्यात आले आणि अगदी एक विमानसुद्धा पळवून नेण्यात आले. पण १९४८-४९ साली आणि पुन्हा १९७५-७७ साली अत्यंत प्रक्षोभक परिस्थिती आजूबाजूला असतानादेखील रा. स्व. संघाने कधीही जीवितवित्ताचे नुकसान होईल अशी कृती केली नाही, अन्यायाचा मुकाबला अहिंसक मार्गांनीच केला."

मार्च १९७९ मध्ये बाळासाहेबांनी 'प्रेस क्लब ऑफ इंडिया'

आणि 'फॉरिन प्रेस कॉरस्पॉण्डण्टस् असोसिएशन' यांच्यासमोर भाषण केले. त्यावेळी झालेल्या प्रश्नोत्तरांच्या कार्यक्रमात त्यांना 'रा. स्व. संघाच्या कार्यक्रम-उपक्रमांचे स्वरूप राजकीयसदृश असल्याच्या (akin to political) प्रतिज्ञापत्रा'बद्दल विचारणा करण्यात आली. उत्तरादाखल बाळासाहेब म्हणाले, "त्यात आक्षेपार्ह असे काहीही नाही. १९४७ पूर्वी रा. स्व. संघ भारतीय स्वातंत्र्याशी प्रतिज्ञाबद्ध होता आणि तेव्हापासून आजतागायत देशाच्या सर्वांगीण विकासासाठीच कार्य करीत आला आहे. ही उद्दिष्टे राजकीय स्वरूपाची आहेत, असे म्हणता येऊ शकेल."

"मी जिथे जिथे जातो तिथे तिथे केवळ वयस्कर मुसलमानांनाच भेटतो, असे नाही तर तरुण मुसलमान शिक्षकांना, डॉक्टरांना आणि वकिलांनाही भेटतो. त्यांच्यापैकी अनेकजण आमच्याशी सहमत होतात आणि काहीजण तर शाखांवरदेखील येऊ लागतात." असेही बाळासाहेबांनी सांगितले.

अल्पसंख्य आयोगाबाबत मत व्यक्त करताना ते म्हणाले, "त्या आयोगाची कार्यकक्षा वाढवून तो मानवी हक्क आयोग बनवण्यात आला पाहिजे म्हणजे समाजातल्या कोणत्याही घटकाला आपल्यावरच्या अन्यायाची दाद मागणे शक्य होईल." जे लोक रा. स्व. संघाला जातीयवादी ठरवून मोकळे होतात तेच मुस्लीम लीगला मात्र सेक्युलर मानतात, हे पाहून आपल्याला गंमत वाटत असल्याचेही त्यांनी सांगितले.

आर्थिक प्रश्नांबाबतची मते विचारली असता ते स्पष्टपणे म्हणाले, "सर्व समस्यांवरचा रामबाण तोडगा रा. स्व. संघाजवळ आहे, असा आमचा दावा नाही. या प्रश्नांवर बरीच मतभिन्नता आढळते. पूर्वीची एक विचारसरणी तर खाजगी मालमत्ता असूच नये, असेल तर ती मालकी रद्द करावी, अशी होती. गांधीजींची विश्वस्त-संकल्पनादेखील विचारार्ह होती."

आणीबाणी उठवली गेल्यानंतर संघाचे कार्य ३० टक्क्यांनी वाढले असल्याचे बाळासाहेबांनी पत्रकारांना सांगितले. ते म्हणाले, "पूर्वीच्या ९,५०० शाखांऐवजी आता आमच्या १३,००० शाखा

आहेत. केरळमध्ये संघ सर्वांत जास्त वेगाने वाढतो आहे. केरळ प्रांत साम्यवाद्यांचा पूर्वीपासूनच बालेकिल्ला असल्यामुळे संघाचा तेथील विकास व विस्तार खरोखरच लक्षणीय ठरला आहे. गमतीची गोष्ट म्हणजे तिथे भारतीय कम्युनिस्ट आणि मार्क्सवादी हे दोन्ही पक्ष एकमेकांवर रा. स्व. संघाच्या वाढीला जबाबदार असल्याचा आरोप करीत आहेत. पण आणीबाणीच्या काळात मुख्यमंत्री, नंतर विरोधी पक्षनेते व पुन्हा आता मुख्यमंत्री झालेले श्री. करुणाकरन यांनी स्पष्ट-पणे म्हटले होते की, " मार्क्सवाद्यांच्या हिंसाचाराला तोंड देण्यासाठी रा. स्व. संघाकडेच आशेने लोक पाहात आहेत, अशी वेळ आता येऊन ठेपली आहे." ' देशाभिमानी ' या साम्यवादी पक्षाच्या दैनिकाचे माजी संपादक श्री. इंदुचुदन यांनी रा. स्व. संघाच्या अल्वायी येथील मेळाव्याचे अध्यक्षपद स्वीकारले आणि रा. स्व. संघाला साम्यवाद्यांकडून व सरकार-कडून केल्या जाणाऱ्या विरोधाचा आपल्या भाषणात स्पष्ट निषेध केला तेव्हाच केरळमधील या बदलत्या वातावरणाची चाहूल स्पष्टपणे लागली होती.

दि. २३ फेब्रुवारी १९७८ रोजी दिल्लीच्या जामा मशिदीचे शाही इमाम यांनी आपणहून पंजाबमधील फाझिल्का शाखेला भेट दिली. त्या प्रसंगी बोलताना ते म्हणाले " कोणत्याही स्वरूपात केल्या जाणाऱ्या जुलमाविरुद्ध लढा देणे हे रा. स्व. संघाप्रमाणेच माझेही उद्दिष्ट आहे." ब्रिटिश आणि काँग्रेस या दोन्ही राज्यकर्त्यांनी ' फोडा आणि झोडा ' ही नीती अनुसरली असली तरी आणीबाणीच्या काळात भोगलेल्या सारख्या हालअपेष्टांमुळे हिंदू-मुसलमानांची मैत्री घनिष्ठ झाली आहे, असेही त्यांनी सांगितले.

दिवाळीच्या वेळी रा. स्व. संघाने आयोजित केलेल्या विविध जमातींमधील सामाजिक कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलताना मुंबईचे इमाम मौलाना गुलाम जिलानी नदवी यांनी ' सर्व भारतीय लोकांमध्ये बंधुभाव वाढीस लागला पाहिजे, ' असे सांगितले तर ' भारतात अनेक धर्म नांदत असले तरी आपणा सर्वांची संस्कृती एकच आहे, ' असे उद्गार फादर ऑरलॅण्डो रॉड्रिग्ज यांनी काढले.

नोव्हेंबर १९८० मध्ये रा. स्व. संघाने दोन आठवड्यांचे ' जन-संपर्क अभियान ' आयोजित केले. त्या उपक्रमात संघाचे सुमारे १ लाख कार्यकर्ते सहभागी झाले आणि जवळजवळ ९५,००० खेडेगावांशी नव्याने संपर्क साधण्यात आला. शहरांत आणि तालुक्यांच्या गावांत प्रत्येक पेठेशी आणि वॉर्डशी संपर्क साधण्यात आला. अंदाजे १ कोटी कुटुंबांना संघाची माहिती सांगितली गेली आणि रा. स्व. संघाची ध्येय-धोरणे विशद करणाऱ्या जवळजवळ तेवढ्याच सर्व भाषांमधील पुस्तिका लोकांना वाटण्यात आल्या.

सर्वत्र आपले स्वागत होत असलेले पाहून स्वयंसेवकांना सुखद आश्चर्याचा धक्का बसला. ज्या काही तुरळक ठिकाणी थोडाफार विरोध झाला तेथेदेखील असे सांगण्यात आले की, " व्यक्तिशः आमचा संघाला विरोध नाही, पण आमच्या पक्षांकडून आम्हाला तसे आदेश आले आहेत. " उलट, मते मागायला न येता केवळ सर्व बाजूंनी होत असलेल्या अधःपतनाची कारणमीमांसा समजावून सांगायला आमच्या-कडे येणारे तुम्हीच पहिले आहात, असे बऱ्याच लोकांनी सांगितले. आपल्या जवळपास लौकरात लौकर शाखा सुरू करण्याची अनेकांनी विनंती केली. लेखक, विचारवंत आणि वेगवेगळ्या मतांचे सामाजिक कार्यकर्ते या मोहिमेतील सभांमधून बोलले. अनेक ठिकाणी वक्त्यांमध्ये मुसलमान व ख्रिश्चन मित्रांचाही समावेश होता.

मार्च १९८० मध्ये बाळासाहेबांनी केरळमधील ख्रिस्ती धर्म-संस्थेच्या नेत्यांशी प्रदीर्घ बोलणी केली. अपवाद होता तो फक्त रोमन कॅथॉलिक पंथाच्या नेत्यांचाच. या मनमोकळ्या गप्पांच्या ओघात बाळासाहेबांनी असे सांगितले की, " या देशातले सर्व रहिवासी हिंदूच आहेत– मग त्यांचा धर्म कोणताही असो– असे आम्ही मानतो. राज्य-घटनेमुळे या देशात सेक्युलॅरिझम प्रस्थापित झालेला नसून हिंदू विचार-सरणीमुळेच तसे घडले आहे." त्या चर्चेच्या अखेरीस ते ख्रिस्ती नेते म्हणाले, " ही चर्चा अनेक बाबतीत तुमच्या भूमिकेवर प्रकाश टाकणारी ठरली, आमचे अनेक गैरसमज दूर झाले, इतर प्रांतांतील आमच्या लोकांशीदेखील तुम्ही अशाच भेटी द्याव्यात, आणि जर एकत्र येऊन

काम करू लागलो तर बरेच काही चांगले घडू शकेल."

१९७९ मध्ये बाळासाहेबांनी शेख अब्दुल्लांची जम्मूमध्ये भेट घेतली. जम्मूच्या महापौरपदासाठी एप्रिल १९८० मध्ये झालेल्या निवडणुकीत त्यांच्या नॅशनल कॉन्फरन्सने भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराला पाठिंबा दिला. तेव्हा इंदिरा काँग्रेसच्या काही लोकांनी त्यांना विचारले की, " रा. स्व. संघाची पार्श्वभूमी असलेल्या जनसंघी लोकांना तुम्ही कसा काय पाठिंबा देत आहात ?" तेव्हा अब्दुल्लांनी ताडकन प्रतिप्रश्न विचारला, " का, जनसंघीय भारतीय नाहीत की काय ? की ती माणसे नाहीत ?"

केरळचे माजी मुख्यमंत्री आणि मुस्लीम लीगचे नेते श्री. सी. एच मोहंमद कोया यांनी दि. २६ मार्च १९८० रोजी राज्य विधानसभेत असे सांगितले की, " रा. स्व. संघाचा बागुलबुवा दाखवून यापुढे आम्हाला घाबरवता येणार नाही." मार्क्सवाद्यांच्या नेतृत्वाखालील सरकार पाडण्यासाठी रा. स्व. संघाने इंदिरा काँग्रेसशी हातमिळवणी केली होती, या आपल्या आरोपाच्या पुष्टचर्थ पुरावा सादर करण्यास सरकारने नकार देताच त्याच्या निषेधार्थ मुस्लीम लीग आणि इतर विरोधी गटांनी सभात्याग केला होता.

अनामिक राहू इच्छिणाऱ्या एका सेवानिवृत्त राजनैतिक अधिकाऱ्याने दि. ९ सप्टेंबर १९७९ च्या ' ऑर्गनायझर 'च्या अंकात ' सव्यक्ष ' या टोपणनावाने लिहिलेल्या लेखात म्हटले होते की, " राजकारणी नेते रा. स्व. संघाबाबतची आपली मते सोयीगैरसोयीप्रमाणे बदलत असले तरी रा. स्व. संघाची खरी भीती वाटते आहे ती पाश्चिमात्य संस्कृतीच्या अतिरेकी प्रभावखाली वावरणाऱ्या सत्ताधारी वर्गालाच ! याच वर्गाकडून हिंदू धर्मावरचे आणि संस्कृतीवरचे बेछूट, विखारी हल्ले केले जातात किंवा निदान तसे हल्ले चढवण्यासाठी प्रोत्साहन तरी दिले जाते. खऱ्याखुऱ्या भारतीय सांस्कृतिक क्रांतीची लक्षणे दिसू लागताच हा वर्ग घाबराघुबरा होतो आणि ' हिंदू पुनरुत्थानवाद ' असा शिक्का मारून ती क्रांती अडवू पाहातो." त्यांनी पुढे लिहिले होते की, ' आज हिंदू मनात जे वादळ गाजले आहे– अजूनही जरी ते शांत असले तरी ते

वादळच आहे– त्याचे वर्णन करण्याच्या दृष्टीने पुनरुत्थानवाद हा शब्द अयोग्य आहे. भारतीय जनसामान्यांच्या स्वयंस्फूर्त जागृतीच्या पार्श्व-भूमीवर उदयाला येत असणाऱ्या सांस्कृतिक क्रांतीचे बीजारोपण करणारे हे वादळ आहे. आणि याच संदर्भात रा. स्व. संघाची भूमिका विचारात घ्यावी लागते. जात, धर्म, रंग किंवा भाषा यांच्या आधारावरच्या कोणत्याही भेदभावाला हिंदू धर्माने मान्यता दिलेली नाही, हे संघाने आपल्या कृतीद्वारे स्पष्टपणे दाखवून दिले आहे. निःस्वार्थीपणे समाज-सेवा करण्याची हिंदू धर्माची क्षमतासुद्धा संघाने दाखवून दिली आहे. हिंदू धर्माच्या सर्वसमावेशक दृष्टिकोनात अनेक धार्मिक श्रद्धांचा अंतर्भाव झाला असला तरीही तो स्वसंरक्षण करण्यास पूर्ण समर्थ आहे, हेदेखील संघाने सिद्ध केले आहे. थोडक्यात सांगायचे झाले तर असे म्हणता येईल की, सामाजिक कृतीच्या संदर्भात हिंदू विचारांचा आविष्कार घडवण्याचे एक साधनच संघाच्या रूपाने उपलब्ध झालेले आहे."

थोर विचारवंत– साहित्यिक आणि ज्ञानपीठ पारितोषिक विजेते श्री. सच्चिदानंद वात्स्यायन 'अज्ञेय' यांनी दिल्लीहून प्रसिद्ध होणाऱ्या 'साप्ताहिक हिंदुस्थान'च्या दि. २७ एप्रिल १९८० च्या अंकात लिहिलेल्या लेखात हाच मुद्दा मांडला होता, त्यांनी लिहिले होते की, "भारत हा जगातला दुसऱ्या क्रमांकाचा मुस्लिम देश आहे, असे श्रीमती गांधींनी देवबंदच्या दारूल उलूम येथे बोलताना सांगितले. त्याच निकषावर भारत हे जगातले पहिल्या क्रमांकाचे हिंदू राष्ट्र आहे. आणि तरीही ही वस्तुस्थिती मान्य करायला आपले राजकीय नेते लाजतात, घाबरतात. आजच्या काळात 'हिंदू धर्माधिष्ठित सेक्युलर राज्य' अशी प्रतिमा असणारा जगातला सर्वात मोठा हिंदू देश म्हणून भारताची प्रतिष्ठापना करण्याचीच खरी गरज आहे. तसे झाले तरच हा देश केवळ प्रचंड लोकसंख्या असणारा मोठा देश न ठरता उत्कृष्ट जीवनविषयक तत्त्वज्ञान लाभलेला थोर देश ठरेल."

आणि कांची कामकोटी पीठाचे शंकराचार्य म्हणाले, "नैतिक मूल्यांची शिकवण देण्यात, वैयक्तिक चारित्र्य घडवण्यात, मातृभूमी-बद्दलचे प्रेम जोपासण्यात आणि मानवतेची निःस्वार्थी सेवा करता यावी

म्हणून शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक सामर्थ्याची आराधना करण्यात– रा. स्व. संघ जे कार्य करत आला आहे ते करण्यात– चूक काय आहे? अखेरीस त्या संघटनेची 'सत्यं वद धर्मं चर।' हीच तरुणांना शिकवण असून ती तर सरकारी बोधचिन्हांवरही आढळते. माणसांना पुरुषार्थी बनवण्याचीच आज खरी गरज आहे आणि त्यासाठी खरे म्हणजे संघासारख्या अनेक संघटना हव्यात.

जेव्हा काही क्षुद्र राजकारणी लोकांनी संघावर चिखलफेक करायची सुरुवात केली तेव्हा भारतातल्या समाजवादी चळवळीचे एक अध्वर्यू श्री. अच्युत पटवर्धन यांनीच त्यांना परस्पर उत्तर दिले. ते म्हणाले, "राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही उत्तम पद्धतीने बांधलेली, शिस्तबद्ध आणि असंख्य स्वयंसेवकांचा मजबूत पाया असणारी संघटना आहे. मी त्यांना सतत प्रखर राष्ट्रभक्त म्हणूनच ओळखत आलो आहे. आर्थिक किंवा राजकीय क्षेत्रातील शासकीय धोरणात सुधारणावादी किंवा पुरोगामी बदल होऊ देण्याच्या ही संघटना विरुद्ध आहे, या आक्षेपाला काही सबळ आधार आहे असे दिसत नाही. 'संघ फॅसिस्ट आहे', या आरोपाची कंटाळा येईल इतक्या अगणित वेळा उजळणी करणाऱ्या श्रीमती गांधी आणि साम्यवादी पक्षावर तो चांगलाच उलटला आहे आणि जुन्या काळच्या साम्यवादी सहकाऱ्यांबरोबर तोच आरोप करून श्री. मधू लिमये यांनी आपल्याच शहाणपणावर अन्याय केला आहे. रा. स्व. संघ ही राजकीय संघटना नाही. तिच्या स्थापनेपासूनच ती हिंदू संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाची आकांक्षा बाळगणाऱ्यांच्या वतीने दिल्या जाणाऱ्या सामाजिक शिक्षणाचे शक्तिकेंद्र ठरली आहे. या देशात हजारो अनुयायी असणारी संघ ही अशी एकमेव संघटना आहे की जिने शीलाचे मोल जाणले आहे, कुणालाही आदर वाटावा अशी नैतिक संहिता अनुसरली आहे. सांस्कृतिक पुनरुज्जीवनाची जबाबदारी आपल्या खांद्यावर पेलण्याची तिची तयारी झाली असलीच पाहिजे."

तथापि संघाचा सर्वांत चांगला गौरव अर्थातच लोकनायक जयप्रकाश नारायणांच्या कडून झाला. खूप पूर्वीपासून त्यांच्या मनात संघाबद्दल एक प्रकारचा पूर्वग्रह वास करून होता, एक प्रकारची अढी

होती. पण संघकार्यकर्त्यांबरोबरचा संपर्क वाढत गेल्यावर आणि श्री. गुरुजींशी चर्चा झाल्यावर त्यांचा दृष्टिकोन बदलू लागला. १९६६ सालच्या बिहारमधल्या दुष्काळाच्या वेळी मदतकार्यासाठी जास्तीत जास्त निधी कमीत कमी खर्चात गोळा करण्याचे आणि जमलेल्या निधीचे जास्तीत जास्त चांगल्या रीतीने वाटप करण्याचे संघाने केलेले कार्य पाहून ते खूपच प्रभावित झाले होते. त्यानंतर संघाबरोबरचा त्यांचा संबंध सतत वाढतच गेला. मार्च १९७५ मध्ये त्यांनी दिल्लीत भारतीय जनसंघाच्या अधिवेशनात भाषण करताना सांगितले, "जर जनसंघ जातीय असेल तर मग मीदेखील जातीयच आहे" (त्यानंतर कलकत्त्यात मार्क्सवाद्यांनी लगेच 'जे पी-जनसंघ एक आछे– जे पी आणि जनसंघ एक आहेत.' अशी घोषणा असणारी भित्तिपत्रके सर्वत्र लावली होती.) भारतीय जनसंघ म्हणजे संघच असे म्हणून दोघांनाही जातीयवादी ठरवू पाहाणाऱ्यांना जयप्रकाशजींनी दिलेले ते रोखठोक उत्तर होते.

आणीबाणीनंतर दि. ३ नोव्हेंबर १९७७ रोजी पाटणा येथे रा. स्व. संघाच्या मोठ्या प्रशिक्षणवर्गासमोर जयप्रकाशजींचे भाषण झाले. त्या भाषणात ते म्हणाले, "राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही एक क्रांतिकारी संघटना आहे. त्याबाबतीत तिच्याशी जवळपास फिरकू शकणारी दुसरी कोणतीही संघटना या देशात नाही. समाजपरिवर्तन घडवून आणण्याचे, जातिभेद नष्ट करून गोरगरिबांच्या डोळ्यांतली आसवे पुसण्याचे सामर्थ्य फक्त याच संघटनेजवळ आहे. तिचे नावच मुळी राष्ट्रीय आहे. हे मी तुमची स्तुती करण्यासाठी सांगत नाही. तुम्हाला एक मोठी ऐतिहासिक भूमिका बजावायची आहे, असे मला वाटते."

जातिभेद आणि धर्मभेदांवर मात करून आपण राष्ट्र भक्कम पायांवर उभे केले पाहिजे, असे सांगून भारताच्या जगाच्या संदर्भातल्या ऐतिहासिक भूमिकेबद्दल बोलताना ते म्हणाले, "नवा भारत घडवण्याचे आव्हान स्वीकारणाऱ्या या संघटनेकडून माझ्या खूप अपेक्षा आहेत. तुमच्या या साहसी कार्यात माझा तुम्हाला हार्दिक पाठिंबा आहे. यापूर्वी मी कधी तुम्हाला सल्ला देऊ केला असेन तर कधी टीकादेखील केली

असेन. पण ती टीका मित्रत्वाच्या नात्याने केलेली होती, हे लक्षात घ्या. माझे बळ किती आहे आणि तुमच्या सामर्थ्याची व्याप्ती वाढणे किती शक्य आहे, ते मला समजते, तुमच्याशी बरोबरी करू शकेल, अशी संघटना आज आपल्या देशात नाही.''

जयप्रकाशजी पुढे म्हणाले, ', तुम्ही स्वतःला म्हणजेच या संघटनेला ' हिंदू स्वयंसेवक संघ ' म्हणवून न घेता ' राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ' म्हणवता. हे नाव बऱ्याच विचारविनिमयांती ठेवण्यात आले आहे आणि म्हणूनच भारतात क्रांती घडवून आणण्यास तुम्ही सहाय्यभूत व्हावे, अशी माझी इच्छा आहे. ब्राह्मण आणि क्षत्रियांसारख्या उच्च मानल्या गेलेल्या जातींतील तुम्ही लोकांनी सुरू केलेली क्रांती जनतेच्या अधिक आदराला पात्र ठरेल, अधिक स्वीकारार्ह ठरेल. छात्र संघर्ष समितीने सुरू केलेली क्रांती निदान हिंदू समाजात तरी इतक्या सहजासहजी स्वीकारली जाणार नाही !''

गरिबांच्या दुर्दशेबद्दल चिंता व्यक्त करताना ते म्हणाले, " राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने या बाबतीत विचार करायला हवा. आर्थिक परिवर्तन कसे घडवून आणता येईल ? खेडेगावात बदल कसा घडवता येईल ? महात्मा गांधींसह आपल्या सर्व थोर नेत्यांनी त्यासाठी प्रयत्न केले आहेत. तुम्ही तुमच्या प्रातःस्मरणात महात्मा गांधींच्या नावाचा समावेश केला आहे. खरोखरच त्यांचे नाव प्रातःस्मरणीय आहेच. तुम्ही ही फार चांगली गोष्ट केली आहे. जर ते थोडा काळ आणखी जगले असते तर हिंदू समाजातून अस्पृश्यता आणि इतर अनिष्ट रूढी दूर करण्याबाबत त्यांनी आपल्याला खचितच आणखी मार्गदर्शन केले असते. पण आता मार्ग स्पष्ट आहे आणि हे काम माझ्यापेक्षा तुम्हीच अधिक चांगल्यारीतीने पार पाडू शकाल. तुम्ही आपल्या परंपरा, आपली संस्कृती आणि धर्म सातत्याने विचारात घेता, तुम्ही हे काम मनावर घ्यावे, अशी माझी तुम्हाला विनंती आहे.''

भाषणाच्या अखेरीस जयप्रकाशजी म्हणाले, " हा समाज, त्याचा वैभवशाली इतिहास, आपल्या पूर्वजांचा दिव्य वारसा, या देशाच्या शिल्पकारांनी त्याग करून मिळवलेली सिद्धी आणि आपण जिंकलेले

स्वातंत्र्य– या सर्वांचे तुम्ही वारसदार आहात आणि या साऱ्या साधनांचा उत्तम उपयोग करणे तुमच्या हाती आहे. तुमची तोंडपुजी स्तुती करण्यासाठी मी हे सांगत नसून तुम्हाला वस्तुस्थिती कळण्यासाठी मी हे बोलतो आहे. तुमच्या शब्दाचा परिणाम दूरवर जाऊन पोचणार आहे. ब्रह्मत्वाची आणि आपल्या हजारो वर्षांच्या प्राचीन संस्कृतीची सारी ताकत तुमच्या पाठीशी उभी आहे. आपल्या डोळ्यांसमोर घडणाऱ्या परिवर्तनाच्या अग्रभागीही तुम्हीच आहात. या बदलाचे परिणामही तुम्ही पाहू शकता आहात. मित्रांनो, मी जेव्हा विचार करू लागतो तेव्हा भारावला जातो. मी आता फार काळ जगू शकणार नाही, हे मला जाणवते. उधार उसनवारीने घेतलेले आयुष्य मी कंठतो आहे, मरणाच्या उंबरठ्यावर मी उभा आहे. आणि तरीही माझ्या शरीरात त्राण असेपर्यंत, अगदी अखेरच्या श्वासापर्यंत माझ्या देशाची, माझ्या समाजाची, माझ्या लोकांची, त्यातल्या त्यात गरिबांची आणि दुःखितांची सेवा करण्याचा माझा निर्धार आहे. तुम्ही देखील सेवा, विरक्ती, त्याग हीच उद्दिष्टे ठेवावीत, असे मी म्हणेन. तुमच्यासमोर हीच उद्दिष्टे आहेत, तुम्ही स्वार्थत्यागी व उदात्त वर्तनाचे आहात, याबद्दल माझ्या मनात यत्किंचितही शंका नाही. तुमच्यासमोर या विशाल देशाचे क्षेत्र पसरले आहे. तुम्ही बरेच काही साध्य करू शकाल. परमेश्वर तुम्हाला उदंड सामर्थ्य देवो आणि तुमच्याबद्दलच्या माझ्या या अपेक्षा पूर्ण होवोत !"

# प्रकरण नववे : संघ आणि राजकारण

आणीबाणी जाहीर झाल्यानंतर काही दिवसांनी तुरुंगातले एक मोठे नेते असे बोलताना ऐकू आले, " रा. स्व. संघ ? कोण आहेत ही माणसे ? काय करतात ती ? त्यांना तसेच नामशेष करून टाकता येणे शक्य आहे. "

नऊ महिन्यांनंतर तेच नेते त्याच तुरुंगात असे म्हणताना ऐकू आले, " मला रा. स्व. संघ द्या आणि मी संपूर्ण देशाचे चित्रच तुम्हाला पालटवून दाखवतो." त्यावर भारतीय जनसंघाचे एक नेते (जे पुढे मुख्यमंत्रीसुद्धा झाले होते) त्यांना म्हणाले, " म्हणजे तुम्ही रा. स्व. संघात सामील होणार की काय ?" ते मोठे नेते म्हणाले, " नाही, नाही, तसे नाही मी करणार. मी संघात सामील झालो तर ते माझे स्वतंत्र अस्तित्व शिल्लकच ठेवणार नाहीत. मी संघात सामील होणार नाही. मला संघाचे नेतृत्व हवे आहे आणि ते मिळाले तर मी बघता बघता हा देश हुकुमशाहीच्या जोखडातून मुक्त करून दाखवीन."

ते मोठे नेते मोरारजीभाईंच्या सरकारमध्येही मंत्री होते आणि चरणसिंगांच्या सरकारमध्येही ते मंत्री होते. ते निदान याबाबतीत प्रामाणिक तरी होते. पण त्यांचे मत तसे प्रातिनिधिक स्वरूपाचेच होते. राजकारणी लोक रा. स्व. संघाकडे सर्वसाधारणपणे याच दृष्टीने पाहातात. या संघटनेचा आपल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी उपयोग झाला तर तो त्यांना हवा असतो. आणि ते शक्य नसेल तर

मात्र ही संघटना नेस्तनाबूत करून टाकावी, असे त्यांना वाटू लागते. ही संघटना आपल्या मर्जीप्रमाणे वाकवता येत नाही किंवा मोडूनही टाकता येत नाही, हे पाहिल्यानंतर अशा नेत्यांच्या संतापाला पारावार राहात नाही– आणि मग ते संघावर बेछूट आगपाखड करू लागतात.

डॉ. हेडगेवार आणि त्यांचे निकटवर्ती मित्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची त्यांनी स्थापना करण्यापूर्वी क्रियाशील, लढाऊ काँग्रेस कार्यकर्ते होते. स्वातंत्र्यापूर्वीची काँग्रेस आजच्या काँग्रेसपेक्षा खूपच वेगळी आणि बरीच चांगली संघटना होती. आणि तरीदेखील ब्रिटिशांविरुद्ध लढण्यासाठी किंवा स्वप्नातल्या भारताची पुनर्बांधणी करण्यासाठी ती योग्य व पुरेसे समर्थ माध्यम ठरणार नाही, असे डॉक्टरांना वाटले. राजकारण हा सत्तासंघर्षाचा खेळ आहे आणि राष्ट्रउभारणीच्या व चारित्र्यसंवर्धनाच्या कार्याचे राजकारण हे साधन बनू शकणार नाही, असे त्यांना जाणवले. आणि म्हणूनच जरी राष्ट्रीय प्रश्नांमध्ये संघाला रस वाटत असला– १९५७ आणि १९६२ च्या निवडणुकांच्या वेळी मतदारांनी कुणाला मत द्यावे याबाबत श्री. गुरुजींनी मार्गदर्शन केले होते– तरी रा. स्व. संघ नेहमीच राजकारणापासून अलिप्तच राहिला आहे.

श्री गुरुजींचे राजकारणाबद्दल आणि राजकीय नेत्यांबद्दलचे मतसुद्धा फारसे चांगले नव्हते. किंबहुना राजकारणाचे जीवनाच्या सर्वच क्षेत्रांवर होणारे दुष्परिणाम, राजकीय नेते हेच समाजाचे खरे आधारस्तंभ मानण्याची वाढती प्रवृत्ती त्यांना अस्वस्थ करीत होती. त्यामुळे नैतिक मूल्यांचे अध:पतन होऊ लागले असून जीवनाच्या सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचार बोकाळू लागला आहे. ही परिस्थिती राष्ट्रजीवन पोखरून टाकते आहे, असे श्री गुरुजींना वाटत होते. राजकीय नेत्यांना प्रमाणाबाहेर महत्त्व देण्याची पद्धत रूढ होत चालल्याबद्दल टीका करताना ते एकदा म्हणाले होते, "एखाद्या देवळाच्या कळसावर बसला म्हणून काही कावळा जगातला सर्वांत सुंदर पक्षी ठरत नाही."

रा. स्व. संघावरचा पहिला राजकीय हल्ला बऱ्याच वर्षांपूर्वी म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळात १९३४ साली चढवण्यात आला होता.

मुसलमानांना हिंदूंविरुद्ध, ब्राह्मणेतरांना ब्राह्मणांविरुद्ध उभे करण्याचे ब्रिटिशांचे प्रयत्न चालू होते. मध्यप्रांतात आणि वऱ्हाडात ते ब्राह्मणांविरुद्ध ब्राह्मणेतरांना मदत करीत होते. स्वातंत्र्यलढ्यात फूट पाडण्याचा त्यांचा हेतू होता. रा. स्व. संघाच्या प्रभावामुळे जेव्हा लोकांनी ब्रिटिशांचा डाव हाणून पाडायला सुरुवात केली, तेव्हा सरकारने एक आदेश जारी करून जिल्हा स्थानीय मंडळांच्या नोकरांनी रा. स्व. संघाचे सदस्य होण्यावर बंदी घातली. तसे पाहिले तर जेमतेम पाच-सहा सरकारी नोकर त्यावेळी नियमितपणे शाखेवर जात होते. तरी सरकारला संघाची भीती वाटत होती, म्हणून तशी बंदी घालण्यात आली होती. त्यावेळी संघ तसा बाल्यावस्थेत होता, पण प्रादेशिक विधिमंडळातील सर्व राष्ट्रवादी सदस्यांचा पाठिंबा मिळवून या विषयावरच्या एका कपात सूचनेवर सरकारचा पराभव करून दाखवण्यात तो यशस्वी झाला.

गांधीजींचे जमनालाल बजाजांवर पोटच्या मुलासारखे प्रेम होते. जमनालालजी काँग्रेसच्या कार्यकारिणीचे सभासद होते आणि पक्षाचे खजिनदारही होते. त्यांनी जेव्हा संघाचे स्वरूप पाहिले तेव्हा लगेच ते इतके प्रभावित झाले की संघ काँग्रेस संघटनेचा एक अंतर्गत भाग व्हावा, असे त्यांना वाटू लागले. त्यासाठी त्यांनी प्रदेश काँग्रेस समितीचे एकेकाळी चिटणीस असणारे वर्ध्याचे संघचालक श्री. अप्पाजी जोशी यांना 'आपली डॉ. हेडगेवारांशी भेट घालून द्या,' अशी विनंती केली. डॉक्टरांचा संघाबद्दलचा दृष्टिकोन अप्पाजींना चांगला माहीत होता, त्यामुळे त्यांनी जमनालालजींना परोपरीने त्यांच्या योजनेची निरर्थकता समजावून सांगितली. राजकारणापासून आणि पक्षीय भांडणांपासून संघ नेहमी दूर राहावा, असे डॉक्टरांना वाटत होते. त्यामुळे डॉक्टरांकडे जायचे आणि त्यांच्याकडून प्रतिसाद मिळत नाही, हे पाहून परतायचे, असे घडणे आपल्याला विचित्र वाटेल,' हे त्यांनी जमनालालजींना पटवून देण्याचा प्रयत्न केला. पण काही आले तरी प्रयत्न करायचाच, असा जमनालालजींचा निर्धार होता. उलट आपल्याला डॉक्टरांकडे घेऊन जाणे अप्पाजी मुद्दाम टाळत असावेत, असा त्यांचा ग्रह झाला. त्यामुळे त्यांनी स्वतंत्रपणे डॉक्टरांची भेट घ्यायचे ठरवले. काही

दिवसांनी म्हणजे दि. ३१ जानेवारी १९३४ रोजी डॉक्टरांचे एक जवळचे मित्र श्री. गणपतराव टिकेकर यांना बरोबर घेऊन जमनालालजी डॉक्टरांना भेटायला गेले. 'काँग्रेसच्या नियंत्रणाखाली संघ चालवला जावा,' अशी त्यांनी डॉक्टरांना विनंती केली. 'तसे केल्यास सर्व प्रकारची मदत मिळेल, कोणतीही आर्थिक विवंचना राहाणार नाही आणि तुम्हाला हवा त्याप्रमाणे अखिल भारतीय दर्जाही प्राप्त होईल', असे त्यांनी सांगितले.

'काँग्रेस ही एक मोठी राजकीय संघटना आहे. आणि मी तिचा सभासद होतो हे मला मान्य आहे. पण रा. स्व. संघाने आपल्या अंगच्या सामर्थ्याच्या आधारावरच स्वतंत्रपणे विकसित व्हावे असा माझा आग्रह आहे', डॉक्टरांनी त्यांना सांगितले, "मोठ्या वृक्षांच्या छायेत रोपटीं वाढत नाहीत, असा आमचा अनुभव आहे. राजकीय नेत्यांचे राजकारण करण्यासाठी स्वयंसेवक तयार करण्याची माझी इच्छा नाही. स्वयंसेवकांनी केवळ वरिष्ठांचे आदेश पाळत राहावेत, असे संघाला वाटत नाही. आपल्या राष्ट्रीय जीवनाचे सर्व पैलू विचारात घेऊ शकणारे आणि देशाला स्वसामर्थ्याच्या बळावर प्रगतिपथावर पुढे नेणारे स्वयंसेवक तयार व्हावेत, हा माझा हेतू आहे. हे काम सध्याचा कोणताही पक्ष किंवा राजकीय नेता करू शकणार नाही. संघ आज स्वावलंबी आहे. स्वयंसेवकांच्या श्रमातून आणि त्यागातूनच तो विकसित होत जाणार आहे. आम्हाला दुसऱ्या कोणाकडूनही आर्थिक किंवा इतर स्वरूपाची मदत घ्यायची नाही कारण तशी मदत घेतल्यास आम्ही त्या मदतीवर अवलंबून राहायला लागू. आम्ही स्वतंत्रपणे उभे राहू. तसा आमचा निर्धार आहे आणि म्हणूनच मी आपल्याशी सहमत होऊ शकत नाही."

निराश होऊन जमनालालजी परतले.

या संदर्भात पुढे काय घडले ते नोंदवताना श्री. अप्पाजी जोशींनी लिहिले आहे की, "त्यानंतर जमनालालजींनी बऱ्याच व्यायामशाळा संघटित करण्याचा प्रयत्न केला. ते त्या व्यायामशाळांना बँडसाठी लागणारी सर्व वाद्ये देत. दोन-एक वर्षे तो सर्व प्रकार आम्हाला डोकेदुखी निर्माण करणारा ठरला होता. पण त्या उपक्रमाने काहीच साध्य झाले

नाही. एखादी संघटना चालवणे म्हणजे सोपी गोष्ट नाही, हे जमनालालजींच्या लक्षात आले. ते मोठे विशाल हृदयी आणि सुसंस्कृत होते. आम्ही जरी त्यांना निराश केले होते, तरी ते आमच्यावर रागावले नव्हते. शेवटपर्यंत त्यांचे आमच्यावर प्रेम होते. ते आम्हाला मदत करीत असत. पण काँग्रेस संघटनेतले बरेच लोक– विशेषतः समाजवादाच्या वेगवेगळ्या छटा उराशी बाळगून आपापल्या विश्वात रममाण होणारे लोक संघाचा द्वेष करू लागले. त्यांच्या संकुचित राजकीय स्वार्थासाठी ही संघटना राबवता येणार नाही, हे स्पष्ट झाल्यामुळे तो द्वेष निर्माण झाला होता. त्यांच्यापैकी अनेकांनी रा. स्व. संघाच्या धर्तीवर दल, सेना किंवा संघ स्थापन करण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना त्यात यश आले नाही. तात्त्विक मुद्द्यांवर मतभेद झाल्यामुळे आमचे टीकाकार आमच्यावर रागावलेले नसून संघाचा हवा तसा उपयोग करून घेणे त्यांना जमलेले नाही आणि संघाचे बळ मात्र दिवसेंदिवस वाढतच चालले आहे, हे पाहून ते चिडले आहेत. संघ कुणाचाही द्वेष करीत नसला तरी काही लोक मात्र संघाचा द्वेष करतात, याचे कारण हे आहे."

काँग्रेस जितकी निराश झाली त्याहून अधिक हिंदुमहासभा निराश झाली. दोन्ही संघटना हिंदुत्व मानणाऱ्या असल्यामुळे हिंदुमहासभेचे लोक असे गृहीत धरून चालले की, राजकीय क्षेत्रात त्यांना रा. स्व. संघाचा पाठिंबा मिळेल. महासभेचे नेते डॉ. बी. एस. मुंजे यांचे डॉक्टर हेडगेवारांशी अनेक वर्षे थोरल्या भावासारखे संबंध होते, त्यामुळे तर त्यांची निराशा अधिक व्यापक होती, जोपर्यंत डॉ. मुंजे काँग्रेसमध्ये होते तोपर्यंत कोणतीही समस्या निर्माण झाली नाही. पण ते काँग्रेसमधून बाहेर पडले आणि महासभेत दाखल झाले त्यानंतर मात्र गंभीर प्रश्न निर्माण झाला. रा. स्व. संघाने काँग्रेसविरुद्ध महासभेला पाठिंबा द्यावा, असा त्यांनी आग्रह धरला. या संदर्भात श्री. अप्पाजी जोशींनी लिहून ठेवले आहे ते असे की, "त्यांना स्पष्ट शब्दांत नकार देण्याची वेळ केव्हा ना केव्हातरी येणार, हे ठरलेलेच होते. जेव्हा ती वेळ आली तेव्हा डॉक्टरांनी सांगितले की, संघ ही राजकारणापासून पूर्णपणे अलिप्त असणारी संघटना आहे. म्हणूनच ती कोणत्याही पक्षासाठी काम करणार

नाही. संघाच्या प्रत्येक स्वयंसेवकाला कोणत्याही राजकीय पक्षात जाण्याची आणि त्या पक्षाचे काम करण्याची पूर्ण मुभा देण्यात आली आहे. निवडणुकांमध्येदेखील तो सक्रिय सहभाग घेऊ शकेल. पण संघटना त्यांच्यामागे जाणार नाही. राजकीय पक्षांपासून ती अलिप्तच राहील. आणि कोणत्याही कारणासाठी ही भूमिका बदलण्यात येणार नाही."

असे स्पष्ट सांगितले गेल्यामुळे हिंदुमहासभेचे लोक रागावले. त्यांनी 'राम सेना' नावाची एक नवी संघटना काढली. नागपुरात काँग्रेस पक्षाची एक 'वानरसेना' नावाची संघटना पूर्वीपासून होतीच. अशा रीतीने दोन परस्परविरोधी पक्षांनी रामाच्या नावाने आपापल्या सेना सुरू केल्या होत्या. नंतर रामसेना आणि रा. स्व. संघ यांच्यात काही ठिकाणी खटके उडाले, मारामाऱ्या झाल्या. त्यामुळे डॉक्टरांना खूप वाईट वाटले. अप्पाजींनी डॉ. मुंजे यांच्याकडे जाऊन त्यांना संघाची भूमिका समजावून सांगितली व त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला. ध्येयधोरणे किंवा कार्यक्रम याबाबत संघाबरोबर कोणतेही तात्त्विक मतभेद नसणाऱ्या हिंदुमहासभेसारख्या हिंदुत्ववादी संघटनेचेही संघा-बरोबर व्यवहारात जमले नाही, याचे प्रमुख कारण हेच होते की त्यांच्या राजकीय हेतूसाठी संघ त्यांना राबवता आला नाही. अप्पाजींनी याबाबतीत पुढे बऱ्याच वर्षांनी लिहिताना असे म्हटले की, "हिंदुमहा-सभावाले संघाच्या सध्याच्या नेतृत्वावर (श्री गुरुजींवर) टीका करताना डॉक्टरांची स्तुती करतात, ते उत्तम महासभावाले होते असे सांगतात. पण तुम्ही हिंदुमहासभेचे मुखपत्र असणाऱ्या 'वंदेमातरम्'चे तेव्हाचे अंक काढून चाळलेत तर याच नेत्यांनी डॉक्टरांविरुद्ध गरळ ओकणारे भरपूर लेखन केल्याचे आढळेल."

अनेक वर्षे हिंदुमहासभेचे अध्यक्ष असणारे वीर सावरकरदेखील संघाने त्यांच्या राजकीय उपक्रमांना साथ न दिल्यामुळे संघावर नाराजच होते. त्यांनी एकदा लिहिले होते– "संघाच्या स्वयंसेवकाचा मृत्युलेख पुढीलप्रमाणे असेल– 'तो जन्माला आला, त्याने रा. स्व. संघात प्रवेश केला, तो मरण पावला.' पुढे कितीतरी वर्षांनी त्यांनी संघाचा राजकारणापासून दूर राहाण्याचा निर्णय योग्य आणि बरोबर

असल्याचे मान्य केले.

१९३७ साली काँग्रेस जेव्हा प्रथम सत्तेवर आली तेव्हा संघाचे काम सुरू होऊन बारा वर्षे पूर्ण झाली होती. या बारा वर्षांच्या अवधीत काँग्रेसवाल्यांनी संघाविरुद्ध चकार शब्ददेखील काढलेला नव्हता. उलट अनेक काँग्रेसवाले संघाचे क्रियाशील कार्यकर्ते होते. पण आता ते सत्तेवर आल्यानंतर रा. स्व. संघ हा आपला संभाव्य राजकीय प्रतिस्पर्धी आहे, असे त्यांना वाटू लागले. मध्य प्रांत आणि वऱ्हाड प्रदेश काँग्रेस समितीचे चिटणीस श्री. ई-एस. पटवर्धन यांनी डॉक्टर हेडगेवारांना पत्र पाठवून संघाची ध्येयधोरणे काय आहेत आणि काँग्रेसविषयी काय दृष्टिकोन आहे, अशी विचारणा केली. आपल्या सहकाऱ्यांशी विचारविनिमय केल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना उत्तर पाठवले, " रा. स्व. संघ ही पुरेशी जुनी संघटना आहे, ती कशी आहे हे या भागातल्या प्रत्येक राजकीय कार्यकर्त्याला माहीत असायला काही अडचण पडू नये." संघाचा काँग्रेसला मुळीच विरोध नाही आणि अनेक क्रियाशील काँग्रेसवाले संघाचेही निष्ठावंत कार्यकर्ते आहेत, हेही त्यांनी त्या पत्रात नमूद केले. 'आपण पाठवलेल्या उत्तरांनी माझे समाधान झाले नाही,' असे श्री. पटवर्धनांनी परत कळवले आणि भली मोठी प्रश्नावली संघाकडे पाठवली. त्या प्रश्नांची सविस्तर उत्तरे त्यांना हवी होती. त्यावर डॉक्टरांनी असे उत्तर पाठवले की, " संघाच्या लोकांनी शाळा सोडून आता बरेच दिवस झाले आहेत आणि त्यामुळे प्रश्नपत्रिका पाहून उत्तरे लिहिण्याची त्यांची सवय आता गेली आहे." आणि त्यानंतर लौकरच काँग्रेस मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले.

पुढील दहा वर्षांच्या कालावधीत संघ भारताच्या कानाकोपऱ्यांत जाऊन पोचला. त्यावेळी काँग्रेसने संघाविरुद्ध पुन्हा एकही शब्द उच्चारला नाही. पण १९४६ साली पुन्हा सत्तेवर येताच त्यांना संघ हा आपला संभाव्य राजकीय प्रतिस्पर्धी ठरू शकेल असे वाटले. म्हणून काँग्रेसच्या कार्यकारिणीने रा. स्व. संघावर बंदी घालण्यात यावी, असे काँग्रेस सरकारला सांगितले. पंडित नेहरूंनी पंजाबचे तत्कालीन मुख्यमंत्री डॉ. गोपीचंद भार्गव यांना पत्र पाठवून रा. स्व. संघावर आणि

अकाली दलावर बंदी घालण्यास सांगितले. प्राप्त परिस्थितीत आपले अधिकार वापरून कुणावरही बंदी घालू नये असे पंजाब सरकारने ठरवले आणि व्यवहारबुद्धी दाखवली. पुढील तीन वर्षांच्या कालावधीत एकीकडे सरदार पटेल काँग्रेस-रा. स्व. संघ यांच्या सहकार्यासाठी प्रयत्नशील होते तर दुसरीकडे नेहरू रा. स्व. संघ दडपून टाकण्याच्या तयारीत होते. 'पक्षातील संघर्षांत जर संघाला अनुकूल असणाऱ्या गटाने आपला पराभव केला तर आपण परदेशी जाऊ आणि तेथून लढा देऊ' असे म्हणण्यापर्यंत त्यांच्या संघविरोधाची मजल गेली होती. तसे करणे राष्ट्रविघातक कारवाई ठरू शकेल याचेदेखील त्यांना भान राहिले नव्हते. गांधीजींच्या खुनानंतर त्यांनी संघ नामशेष करण्याचे शर्थीचे प्रयत्न केले, पण ते अयशस्वी ठरले.

सप्टेंबर १९४९ मध्ये बिहार प्रदेश काँग्रेस समितीने बिचारणा केल्यामुळे काँग्रेस कार्यकारिणीने बराच विचारविनिमय केला आणि रा. स्व. संघाचे कार्यकर्ते काँग्रेस पक्षात येऊ शकतील, असा निर्णय घेतला. (हे फारसे आश्चर्यकारक नव्हते. अगदी १९७४ साली सुद्धा बिहार प्रदेश काँग्रेस अध्यक्षांनी असे जाहीर केले होते की जनसंघात नाहीत एवढे संघवाले काँग्रेसमध्ये आहेत.) त्यानंतर कानपूरमध्ये काँग्रेस कार्यकर्त्यांसमोर बोलताना तत्कालीन अध्यक्ष पट्टाभी सीतारामय्या म्हणाले होते, "रा. स्व. संघ हा काही काँग्रेसचा शत्रू नाही. ती जातीयवादी राजकीय संघटनाही नाही." काँग्रेस कार्यकारिणीने हा निर्णय घेतला तेव्हा पंडित नेहरू प्रदीर्घ विदेशदौऱ्यावर गेले होते. परत येताच त्यांनी जाहीर केले की काँग्रेस सेवादलाव्यतिरिक्त इतर कोणत्याही स्वयंसेवक संघटनेचे सदस्य काँग्रेसचे सभासद होऊ देणे काँग्रेसच्या नियमांत बसत नाही. काँग्रेस सेवा दल फक्त नावापुरतेच शिल्लक होते, रा. स्व. संघ ही काही स्काऊटसारखी किंवा सेवादलासारखी स्वयंसेवक संघटना नव्हती, अनेक काँग्रेस नेते आर्य वीर दलाचेहीं नेते होते, वगैरे वस्तुस्थिती पंडित नेहरूंनी सरळ नजरेआड केली होती. शिवाय जमियत–उल–उलेमा किंवा मुस्लीम लीगचे कार्यकर्ते जर काँग्रेसचे सदस्य होऊ शकतात तर फक्त रा. स्व. संघाचे स्वयंसेवकच काँग्रेसचे सदस्य का

होऊ शकत नाहीत, या प्रश्नाला त्यांच्याजवळ उत्तर नव्हते. या सर्व प्रकरणात गमतीदार गोष्ट घडली होती, ती म्हणजे पंडित नेहरूंच्या दि. २० नोव्हेंबर १९४९ रोजी रामलीला मैदानावर झालेल्या सभेची व्यवस्था 'अहरार' या मुसलमान संघटनेच्या लाल गणवेषातील स्वयंसेवकांकडे सोपविण्यात आली होती.

काँग्रेसच्या दुटप्पी धोरणाचा स्वामी श्रद्धानंदांना जो अनुभव आला होता, त्याचीच आठवण करून देणारी ही सर्व परिस्थिती होती. स्वामीजींनी लिहून ठेवले होते की, "दि. १३ फेब्रुवारी १९२३ रोजी मलकाना रजपुतांच्या शुद्धीकरणाऱ्या चळवळीचे नेतृत्व करण्यासाठी मला बोलावणे आले होते. तेथे गेल्यावर मला आश्चर्याचा धक्काच बसला. तबलीगचे म्हणजे धर्मांतराचे काम उघडपणे करणाऱ्या मुसलमान नेत्यांना काँग्रेसचे ध्येयधोरण ठरवण्याची किंवा त्या संघटनेचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याची परवानगी दिली जात असतानाच हिंदू समाजाचे विघटन थोपवून धरू पाहाणाऱ्या लोकांना मात्र अगदी निषिद्ध मानले जात होते, काँग्रेस कार्यकारिणीतून वगळण्यात येत होते."

स्वयंसेवकांना काँग्रेसचे सभासदत्व मिळवून देण्याच्या प्रश्नावर लढण्याइतके बळ सरदार पटेलांच्या अंगी उरले नव्हते. पण त्यांनी श्री. पुरुषोत्तमदास टंडन यांना काँग्रेस अध्यक्ष म्हणून निवडून आणले. श्री. टंडन काँग्रेस व रा. स्व. संघ यांना एकत्र आणू शकतील, अशी त्यांना आशा वाटत होती. याच संदर्भात असे म्हटले जाते की, पटेलांच्या गटाचा काँग्रेसमध्ये वरचष्मा झाल्यास आपल्याला पक्षाबाहेर पडून कार्य करता यावे म्हणून खुद्द पंडित नेहरूंनीच त्यावेळी समाजवाद्यांना काँग्रेसचा त्याग करून नवा पक्ष काढण्याचा सल्ला दिला होता. तथापि वर्षभरातच पटेलांचे निधन झाले. त्यानंतर नेहरूंनी तातडीने टंडन यांची हकालपट्टी केली, स्वतःकडे काँग्रेसचे अध्यक्षपद घेतले आणि समाजवाद्यांशी झालेली सगळी चर्चा ते सोयिस्कररीत्या विसरून गेले.

या साऱ्या घडामोडी संघजनांची करमणूक करीत होत्या. रा.स्व. संघासाठी काँग्रेसची दारे बंद करण्यावर भाष्य करताना श्री. बाबासाहेब आपटे यांनी दिल्लीच्या विद्यार्थ्यांना सांगितले होते, बंद करून घेता

येतील, अशी आमच्या संघटनेला दारेच नाहीत. दारे कशाला, आम्हाला भिंतीदेखील नाहीत. आम्ही उघड्या मैदानावर खेळणारी माणसे आहोत,"

रा. स्व. संघाबद्दलची ही द्वेषभावना फक्त नेहरूंपुरती मर्यादित नव्हती. पाकिस्तानी राज्यकर्तेही संघाचा तसाच आणि तितकाच द्वेष करीत होते. पूर्व बंगालमध्ये १९५३ साली भाषिक प्रश्नावरून दंगली उद्‌भवल्या, त्यांचे खापर 'डॉन' या वृत्तपत्राने 'रा. स्व. संघाच्या आणि साम्यवाद्यांच्या' माथ्यावर फोडले. आणि जेव्हा पूर्व पाकिस्तानातील १९५४ च्या निवडणुकांमध्ये हक-सुऱ्हावर्दी-मुजीब आघाडीने मुस्लीम लीगचा दणदणीत पराभव केला, तेव्हा दि. १८ मे १९५४ रोजी 'डॉन'ने आपल्या अंकात एक व्यंगचित्र प्रसिद्ध केले. त्या व्यंगचित्रात फझलुल हक यांनी पाकिस्तानी तत्त्वज्ञानाच्या भिंतीला खिंडार पडले असून त्यातून पाकिस्तान काबीज करण्याचा मनसुबा असणाऱ्या पंचमस्तंभी संघवाल्यांना आत घेतले आहे असे दाखवण्यात आले होते.

१९४८ साली सुमारे १७००० संघ कार्यकर्त्यांना त्यांच्यावर कोणतेही खटले न भरता अन्यायाने तुरुंगात डांबण्यात आले होते. नंतर ६०००० हूनही अधिक स्वयंसेवकांनी सत्याग्रह केला होता. तुरुंगात मिळणाऱ्या वागणुकीचा निषेध करण्यासाठी हजारो लोकांनी काही आठवडे उपोषण केले होते. हा सगळा जुलूम चालू असताना या देशातल्या एकाही आमदार–खासदाराने या प्रश्नावर विधिमंडळात प्रश्न विचारला नाही. विधिमंडळात काँग्रेसजनांची आणि त्यांच्या होयबांची भरती झाली होती आणि ते सर्वजण संघ नामशेष करायला निघाले होते. या राजकीय जंगलात संघकार्य शांततेने पार पाडता येईल की एखादी संरक्षणात्मक राजकीय ढाल आवश्यक आहे, याचा कार्यकर्ते विचार करू लागले होते. आणि तरीही त्यांना योग्य वाटेल असा एकही पक्ष अस्तित्वात नव्हता. नेहरूंची काँग्रेस तर रुसलेलीच होती. समाजवाद्यांचे स्वयंसेवकांबरोबर कधीच भावनिक नाते जुळलेले नव्हते. साम्यवादी पक्ष विचारात घेण्याजोगा नव्हता आणि हिंदुमहासभा जवळजवळ मृतप्राय झालेली होती. अशा स्थितीत पूर्वाश्रमीचे हिंदुमहासभा-

वाले डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी पूर्व बंगालमधील हिंदूंचा विश्वासघात केल्याच्या प्रश्नावरून राजीनामा देऊन नेहरूंच्या मंत्रिमंडळातून बाहेर पडले होते आणि नवा पक्ष काढण्याच्या विचारात होते. एकाच दिशेने वाहणाऱ्या या दोन विचारधारा एकत्र आल्या आणि त्यातून भारतीय जनसंघाचा जन्म झाला. डॉ. मुखर्जी नव्या पक्षाचे अध्यक्ष झाले आणि रा. स्व. संघाचे एक नेते डॉ. भाई महावीर हे सरचिटणीस झाले. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीतच जनसंघाने अखिल भारतीय पक्ष म्हणून मान्यता मिळण्यासाठी आवश्यक तेवढी मते मिळवली.

भारतीय जनसंघ जसजसा वाढू लागला तसतसे लोक त्याच्या संघाबरोबरच्या संबंधांबाबत प्रश्न विचारू लागले. त्या सर्व प्रश्नांची उत्तरे देणारा आणि सर्व घटनांची ऐतिहासिक नोंद करणारा श्री. गुरुजींचा एक लेख दि. २५ जून १९५६ च्या 'ऑर्गनायझर'च्या अंकात प्रसिद्ध झाला. 'सरकारमधून राजीनामा देऊन बाहेर पडल्यानंतर डॉ. मुखर्जींना सध्या अस्तित्वात असणारा कोणताही पक्ष सोयीस्कर न वाटल्यामुळे नवा पक्ष काढण्याच्या ते विचारात होते. त्याच संदर्भात माझा सल्ला व सहकार्य घेण्यासाठी ते मला भेटले,' असे सांगून श्री. गुरुजींनी पुढे लिहिले होते, "विषय महत्त्वाचा असल्यामुळे आम्ही वारंवार भेटलो आणि सर्व संबंधित मुद्द्यांची तपशीलवार चर्चा केली. रा. स्व. संघाला राजकारणाच्या रिंगणात खेचता येणार नाही, राष्ट्राच्या खऱ्याखुऱ्या सांस्कृतिक पुनरुत्थानाच्या कार्यात गुंतलेली कोणतीही संघटना राजकीय पक्षांच्या हातातली बाहुली बनली तर कधीच यशस्वी ठरणार नाही आणि म्हणूनच संघ कोणत्याही राजकीय पक्षाचे वर्चस्व मानणार नाही, हे मी त्यांना प्रारंभीच स्पष्ट करून सांगितले. त्यांना आमची भूमिका समजली आणि ती बरोबर असल्याचे त्यांनी मान्य केले. त्याचवेळी त्यांनीही हे स्पष्ट केले की नवा पक्ष जर योग्यरीतीने विकसित व्हायचा असेल तर तोदेखील दुसऱ्या कोणत्याही संघटनेशी दुय्यम दर्जाच्या नात्याने संबंध ठेवू शकणार नाही."

रा. स्व. संघ आणि प्रस्तावित पक्ष यांच्यातील संबंधांबाबतच्या या मूलभूत मुद्द्यावर आमचे एकमत झाल्यानंतर विचारात घ्यावयाचा

महत्त्वाचा मुद्दा होता तो नव्या पक्षाच्या ध्येयवादाबद्दलचा ! रा. स्व. संघाची ध्येयधोरणे आणि कार्यपद्धती पूर्वीच निश्चित झालेली होती. त्यामुळे अशा संघटनेच्या कोणत्याही सभासदाचे सहकार्य हवे असेल तर त्या राजकीय पक्षाच्या ध्येयवादात संघाच्या ध्येयधोरणांचे प्रतिबिंब पडलेले असायला हवे."

या बाबतीतही आमचे पूर्ण एकमत झाले. एका पत्रकारपरिषदेत डॉ. मुखर्जींनी असे मत व्यक्त केले होते की, हिंदुमहासभेचा हिंदुराष्ट्रावर विश्वास असल्यामुळे ती जातीय आहे. त्याचा उल्लेख करून मी त्यांना असे सांगितले की, भारतीय राष्ट्र हे हिंदुराष्ट्रच आहे असे रा. स्व. संघ मानीत आला आहे. त्यामुळे हिंदुमहासभेइतकेच संघालाही तुम्ही दूर ठेवले पाहिजे आणि हिंदुराष्ट्राची पुनर्स्थापना करण्याचे ध्येय बाळगून त्यासाठी अविरत धडपडणाऱ्या माझ्या सहकाऱ्यांपैकी कुणाचीही सहानुभूती किंवा मदत तुम्ही गृहीत धरू नये. त्यावर त्यांनी तो अभिप्राय चुकीने व्यक्त केला गेल्याचे मान्य केले. हिंदुराष्ट्राची आमची संकल्पना आपल्याला मान्य असल्याचे त्यांनी सांगितले. भारतीय राष्ट्रीयत्व स्पष्ट करण्यात राज्यघटना अपयशी ठरल्याचे मत व्यक्त करून ते असेही म्हणाले की, 'हिंदू राष्ट्राची पुन्हा एकदा संपूर्ण वैभवात प्रस्थापना करण्याचे ध्येय लोकशाही राज्याच्या आधुनिक संकल्पनेशीही विसंगत नाही. जोपर्यंत बिगरहिंदू जमातीचे लोक अराष्ट्रीय कारवाया करीत नाहीत किंवा सत्ता हस्तगत करून वैभवशाली मार्गावरून राष्ट्राला मागे खेचण्याची कटकारस्थाने रचत नाहीत तोपर्यंत त्यांना पूर्ण नागरी स्वातंत्र्य आणि राजकीय-धार्मिक-सांस्कृतिक क्षेत्रात समान दर्जा मिळेल अशी हमी हिंदू राष्ट्राच्या संकल्पनेत अभिप्रेत आहेच.' नव्या राजकीय पक्षाच्या धोरणविषयक मसुद्यात ही वस्तुस्थिती जाहीरपणे स्पष्ट करण्याची तयारीही डॉ. मुखर्जींनी दाखवली."

"जेव्हा असे एकमत झाले तेव्हा मी माझे काही सहकारी, निष्ठावंत आणि विश्वासू कार्यकर्ते निवडले. नवा पक्ष स्थापन करण्याची जबाबदारी जे निस्वार्थीपणे व अविचल निष्ठेने पेलू शकतील, अखिल भारतीय स्वरूपाच्या लोकप्रिय राजकीय पक्षाला व्यापक व भक्कम

पाया जे घालू शकतील असे ते कार्यक्षम कार्यकर्ते मी डॉ. मुखर्जींना दिले आणि मग त्यांनी भारतीय जनसंघ या नावाच्या पक्षाची स्थापना करून आपली महत्त्वाकांक्षा साकार करून दाखवली." त्या लेखात पुढे श्री गुरुजींनी लिहिले होते की, "माझ्या कार्यकर्त्यांचा एक संच डॉ. मुखर्जींना देऊन टाकल्यावर आमच्या धारणांप्रमाणे मी जनसंघाच्या पुढील सर्व कार्यक्रमांपासून आपणहून अलिप्त झालो आणि हिंदूंची सांस्कृतिक संघटना बांधण्याच्या कार्यावरच माझे सर्व लक्ष केंद्रित केले. पण वेळोवेळी जेव्हा आम्ही भेटत असू तेव्हा ते मला जनसंघाच्या प्रगतीची किंवा संकल्पित कार्यक्रमांची व चळवळींची माहिती सांगत असत. मीदेखील संघकार्यात त्यांची मदत व सहकार्य मागत असे. जिथे जिथे आमच्या कार्यकर्त्यांना त्यांची गरज भासेल तिथे तिथे ते जातही असत. सार्वजनिक जीवनातल्या निव्वळ मैत्रीपेक्षा पुढचे स्नेहभावाचे निकटचे नाते आमच्यात निर्माण झाले होते आणि दिवसेंदिवस ते दृढतरच होत गेले. आमच्या आपापल्या क्षेत्रांत आम्ही जे जे कार्यक्रम आखले किंवा जी जी पावले उचलली त्या त्या सर्वांबाबत आम्ही एकमेकांचा सल्ला घेतला. अर्थात परस्परांच्या संघटनांमध्ये हस्तक्षेप होणार नाही किंवा एकाचे निर्णय दुसऱ्यावर लादले जाणार नाहीत, याची आम्ही खबरदारीदेखील घेत होतो."

अशा रीतीने रा. स्व. संघ आणि जनसंघ या दोन पूर्णपणे वेगळ्या आणि स्वतंत्र संघटना होत्या. एक सांस्कृतिक होती तर दुसरी राजकीय होती. संघाच्या घटनेत तर अशी तरतूदही करण्यात आलेली होती की त्या संघटनेतील कोणत्याही पदाधिकाऱ्याने कोणत्याही राजकीय पक्षाचे पदाधिकारी होता कामा नये.

राजकारणाकडे पाहाण्याची संघाची पन्नास वर्षांपूर्वी जी दृष्टी होती, तीच आजही कायम आहे. संघ राजकारणात पडणार नाही आणि सत्तेमागे धावणार नाही. रा. स्व. संघाचे अनेक वर्षे सरचिटणीस राहिलेले श्री. भय्याजी दाणी असे म्हणत असत की, 'या शतकाच्या चाळिशीत मध्य भारतातील अनेक प्रजामंडळे ताब्यात घेणे रा. स्व. संघाला सहज शक्य होते. तसे करून त्या संस्थानांमध्ये तो आपोआप

सत्तेवर येऊ शकला असता. पण तसे करणे या संघटनेने मुद्दाम टाळले. चारित्र्यसंवर्धनाच्या व राष्ट्रउभारणीच्या कार्यात संघाने स्वतःला गुंतवून घेतले आहे. देशाच्या प्रश्नांमध्ये त्याला जरूर आस्था वाटते आणि त्या प्रश्नांवर सखोल, गंभीर विचार करून वेळोवेळी समतोल आणि विवेकयुक्त मत व्यक्त करण्याचे कामही संघाच्या प्रवक्त्यांनी पार पाडले आहे. व्यासवसिष्ठांपर्यंत जाऊन पोचणाऱ्या प्राचीन भारतीय परंपरेला साजेल असेच हे धोरण आहे. अलीकडच्या काळात समर्थ रामदासांनी शिवाजी महाराजांचे मार्गदर्शक म्हणून अशीच कामगिरी बजावली. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात गांधीजींनी आणि जनता क्रांतीच्या काळात जयप्रकाशजींनी हीच भूमिका बजावली आहे. अगदी पंडित नेहरूदेखील आचार्य विनोबा भावे यांच्याकडून नैतिक मार्गदर्शन घेण्यासाठी त्यांना नियमित भेटत असत.

रा. स्व. संघाचे जनसंघाबरोबरचे संबंध तशाच प्रकारचे होते. वेगवेगळी ध्येयधोरणे, उद्दिष्टे, नेतृत्व, घटना, ध्वज, निधी आणि कार्यक्रम असणाऱ्या या दोन भिन्नभिन्न संघटना होत्या. जेव्हा जेव्हा गरज भासेल तेव्हा तेव्हा भारतीय जनसंघाचे नेते संघाच्या नेत्यांबरोबर विचारविनिमय करीत, पण ते त्यांचा मार्ग मात्र स्वतंत्रपणे आखीत. उदाहरणार्थ– कृत्रिम साधनांनी कुटुंबनियोजन करण्यास श्री गुरुजींचा विरोध होता, पण जनसंघाचा नव्हता. श्री गुरुजींनी सर्व पंजाबी हिंदूंना 'पंजाबी ही आपली मातृभाषा माना' असा सल्ला दिला होता, तर अनेक जनसंघीय कार्यकर्त्यांनी हिंदीचाच आग्रह धरला होता. श्री गुरुजींनी भारत-सोव्हिएत मैत्रीकराराला विरोध केला होता तर जनसंघाने त्याचे स्वागत केले होते. श्री गुरुजींनी असे दाखवून दिले होते की, 'संघ नागपुरात बराच शक्तिशाली आहे. पण जनसंघाच्या उमेदवाराने तेथील एकाही निवडणुकीत यश मिळवलेले नाही. दोन संघटनांच्या स्वरूपातील व ध्येयधोरणांतील फरकाचेच ते उत्तम निदर्शक आहे."

आणि तरीही रा. स्व. संघाला त्रास देण्यात, आपल्या अपयशाचे खापर त्याच्या माथी फोडण्यात स्वारस्य असणाऱ्या राजकीय नेत्यांनी

संघाला राजकीय संघटना म्हणून हिणवणे चालूच ठेवले. जणू काही राजकीय असणे पाप आहे आणि स्वेच्छेशिवाय दुसरीच कोणतीतरी शक्ती संघाला प्रत्यक्ष राजकारणात उतरण्यापासून मागे खेचते आहे!

संघाबद्दलच्या या दुस्वासामुळेच १९६४-६५ साली एक आंतरराष्ट्रीय प्रकरण उद्भवले. नेपाळनरेशांनी कोइराला यांची पंतप्रधानपदावरून उचलबांगडी केल्यानंतर भारत-नेपाळ संबंध काहीसे बिघडलेलेच होते. नेपाळमध्ये सशस्त्र भुरटे हल्ले चढवण्यास भारत सरकार प्रोत्साहन देत होते, तर चीन-पाकिस्तानशी संबंध वाढवून नेपाळने प्रत्युत्तर दिले होते. १९६३ साली श्रीगुरुजी पशुपतिनाथाचे दर्शन घेण्यासाठी नेपाळला गेले होते. त्या भेटीत त्यांनी राजे महेंद्रांची भेट घेतली होती. हिंदू समाजासमोर आणि धर्मासमोर उभ्या राहिलेल्या समस्यांवर उभयतांची चर्चा झाल्यावर गुरुजींनी नेपाळनरेशांना रा. स्व. संघाच्या एका मेळाव्यात भाषण करण्यासाठी येण्याचे आमंत्रण दिले होते. त्या आमंत्रणाला अनुकूल असा प्रतिसाद मिळाला होता. भारतात परतल्यावर श्रीगुरुजींनी पंतप्रधान पंडित नेहरूंना हे सर्व कळवले होते आणि नेहरूंनी ताबडतोब त्या पत्राची पोचही दिली होती.

या पार्श्वभूमीवर दि. २५ डिसेंबर १९६४ रोजी नेपाळ नभोवाणीने असे जाहीर केले की, दि. १४ जानेवारी १९६५ रोजी नागपूर येथे होणाऱ्या रा. स्व. संघाच्या मकरसंक्रांती उत्सवात राजे महेंद्र सहभागी होणार आहेत. त्या घोषणेने चीन व पाकिस्तानला हादरा बसला. भारत-नेपाळ संबंधातली महत्त्वपूर्ण सुधारणा म्हणून नवी दिल्लीने या घोषणेचे स्वागत करायला हवे होते, पण पिंडी किंवा पेकिंगला बसला नसेल इतका हादरा दिल्लीला बसला. राजे महेंद्रांच्या त्या भेटीमुळे रा. स्व. संघाला व भारतीय जनसंघाला भरपूर प्रतिष्ठा लाभेल या भीतीपोटी 'आपण आला नाहीत तर बरे होईल!' असे नेपाळनरेशांना कळवण्यात आले.

दिल्लीच्या त्या संदेशाबद्दल आश्चर्य व्यक्त करताना नेपाळचे पंतप्रधान श्री. तुलसी गिरी म्हणाले होते, "राजे महेंद्रांनी रा. स्व. संघाच्या मेळाव्यात भाग घेतला असता तर काय बिघडले असते?

मुंबईत भरलेल्या युकॅरिस्टिक काँग्रेससमोर पोपने भाषण करण्यास कोणी हरकत घेतली नाही ! मग एका हिंदू राजाने एका हिंदू संघटनेच्या मेळाव्यात भाग घेऊन हिंदू समाजाची एकी दाखवून दिली असती तर त्यात हरकत घेण्यासारखे असे काय होते ?"

व्हॅटिकनचा राज्यप्रमुख असणारा पोप मुंबईला आला तेव्हा त्याचे स्वागत करण्यासाठी आपले राष्ट्रपती आणि पंतप्रधान मुंबईला धावले होते, पण नेपाळच्या हिंदू राज्याच्या प्रमुखांनी जेव्हा एका हिंदू मेळाव्यात भाग घेण्याची इच्छा व्यक्त केली तेव्हा मात्र त्यांचा दौराच रद्द करण्याबाबत त्यांच्यावर दडपण आणण्यात आले. हिंदूंच्या धार्मिक परंपरेत नेपाळनरेशांना खास महत्त्वाचे स्थान आहे. पुरीच्या जगन्नाथावर हिऱ्यांचा मुकुट ठेवण्याचा अधिकार फक्त नेपाळनरेशांचा आहे. पुरीचे महाराजा जरी त्या मंदिराचे स्वामी असले तरी त्यांनादेखील हा अधिकार नाही. रामेश्वरमच्या गाभाऱ्यात आराधना करण्याचा अधिकार तेथील प्रमुख पुरोहित आणि शृंगेरी मठाचे शंकराचार्य यांच्याव्यतिरिक्त फक्त नेपाळनरेशांनाच आहे. हे सारे आपल्या सरकारला सांगण्यात आले, पण त्याचा 'सेक्युलर' सरकारवर काहीही परिणाम झाला नाही. 'एका हिंदू समारंभात आपल्याला भाग घेता येत नाही, याचे मला अतिशय दुःख होते आहे', असे राजे महेंद्रांनी दि. ११ जानेवारी १९६५ रोजी गुरुजींना पाठवलेल्या पत्रात म्हटले होते. त्या पत्राबरोबर त्यांनी एक संदेश पाठवला होता व तो त्या मेळाव्यात वाचून दाखवण्यास सांगितले होते. हिंदूंची जगातील भूमिका आणि रा. स्व. संघाचा त्यातील वाटा याबद्दल त्या संदेशात गौरवोद्गार काढण्यात आले होते.

याच सुमारास म्हणजे दि. २७ नोव्हेंबर १९६४ रोजी राज्यसभेत रा. स्व. संघ आणि राजकारण याबद्दल गंमतशीर प्रश्नोत्तरे झाली होती. 'रा. स्व. संघ हा राजकीय पक्ष असल्याचे का घोषित करण्यात आलेले नाही ?' असा प्रश्न श्री. अबीद अली यांनी विचारला होता. त्याला गृहखात्याचे राज्यमंत्री श्री. जयसुखलाल हाथी यांनी असे उत्तर दिले होते की, 'राजकीय पक्षांच्या याद्या निवडणूक आयोग तयार करते किंवा लोकसभेचे सभापती तयार करतात. या दोघांच्याही

याद्यांत रा. स्व. संघाचा समावेश केलेला नाही.' रा. स्व. संघाने आपल्याला राजकीय पक्ष म्हणून मान्यता मिळावी असा अर्ज केलेलाच नसताना त्याचा या यादीत समावेश कसा करता येईल, अशी शंका श्री. जी. रामचंद्रन यांनी विचारली होती. नंतर गृहमंत्री श्री. गुलझारीलाल नंदा यांनी असे मान्य केले होते की, 'संघाच्याच घटनेप्रमाणे संघ ही राजकारणात लुडबूड न करणारी एक सांस्कृतिक संघटना आहे.'

आणि तरीदेखील सत्ताधारी पक्षाने रा. स्व. संघाविरुद्धचे आपले युद्ध चालूच ठेवले.

# प्रकरण दहावे : रा. स्व. संघ आणि जनता

गमतीची गोष्ट अशी की जनता पक्षानेही रा. स्व. संघाबरोबर काँग्रेसपेक्षा काही चांगले संबंध प्रस्थापित केले नाहीत. जोपर्यंत संघाचे स्वयंसेवक तुरुंगात जात होते आणि पुढे निवडणुकीच्या वेळी मदत करीत होते तोपर्यंत संघ चांगला होता. पण एखाद्या नेत्याला पंतप्रधान होण्यासाठी संघाने मदत केली नाही की लगेच तो ' जातीय ' आणि 'फॅसिस्ट' ठरवला जात होता. मोरारजीभाईंनी चरणसिंगांना आपल्या मंत्रिमंडळातून जेव्हा अर्धचंद्र दिला तेव्हा चरणसिंगांनी पहिली गोष्ट केली ती म्हणजे झंडेलवाला येथील संघाच्या दिल्ली कार्यालयाशी दूरध्वनीने संपर्क साधला. श्री. बाळासाहेब देवरस कुठे आहेत, असे त्यांनी विचारले. त्यांना सरसंघचालकांशी तावडतोब चर्चा करायची होती. ' बाळासाहेब विमानतळावर जायला निघाले असून दिल्लीला पुन्हा आल्यावर ते आपली अवश्य भेट घेतील,' असे त्यांना सांगण्यात आले. बाळासाहेबांनी नंतरच्या भेटीत चरणसिंगांची भेट घेतलीदेखील.

आणीबाणीत फक्त काँग्रेसमध्येच आपला पक्ष विलीन करू असा चरणसिंगांचा हट्ट होता, तसा आणीबाणीपूर्वी ते फक्त जनसंघात आपल्या पक्षाचे विलीनीकरण करू इच्छीत होते. ' The People Betrayed ' या आपल्या पुस्तकात श्री. लालकृष्ण अडवानी यांनी लिहिले आहे, " जेव्हा विलीनीकरणाबाबत आमचे एकमत होऊ शकले नाही तेव्हा चरणसिंग

केवळ रा. स्व. संघाचे सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरस यांना भेटण्यासाठी मोटारीने लखनौहून कानपूरला गेले. 'आपला जनसंघावरचा प्रभाव उपयोगात आणून माझ्या योजनेला मान्यता देण्यास त्यांना भाग पाडा' अशी त्यांनी सरसंघचालकांना विनंती केली. आपल्या या संदर्भातील भूमिकेला अनुसरून श्री. देवरस यांनी त्यांना या प्रकरणी पुन्हा जनसंघाशीच थेट संपर्क साधण्यास सांगितले." पण हेच चरणसिंग पुढे रा. स्व. संघावर 'जनता पक्षात हस्तक्षेप करण्याचा' आरोप करू लागले होते. प्रत्यक्षात मात्र हेच नेते रा. स्व. संघातील घडामोडींत हस्तक्षेप करू इच्छीत होते.

दि. २० ऑक्टोबर १९७७ रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या पत्रकारपरिषदेत श्री. कर्पूरी ठाकूर यांनी 'जमीनसुधारणाविषयक कायद्यांच्या अंमलबजावणीत आणि जमिनीच्या पुनर्वाटपात रा. स्व. संघाचे मौलिक सहकार्य लाभत असल्याचे' सांगितले होते, पण पुढे याच कर्पूरी ठाकुरांनी संघ 'प्रतिक्रियावादी' असल्याचा शोध लावला होता.

श्री. मधु लिमये यांनी तुरुंगातून आपल्या पत्नीला पाठवलेल्या पत्रात लिहिले होते की, "जर तुरुंगातून बाहेर येताना मी रा. स्व. संघाच्या गणवेशात असलो तर माझ्या मित्रांनी आश्चर्य वाटून घेऊ नये." पण हेच लिमये सोव्हिएत रशियाच्या कच्छपी लागल्यावर म्हणू लागले की, "रा. स्व. संघ इंदिरा गांधींपेक्षा जास्त खतरनाक आहे." खरे म्हणजे दि. १ मे १९७७ रोजी म्हणजे जनसंघ आणि इतर पक्षांचे विलीनीकरण होऊन जनता पक्ष स्थापन झाला त्याच दिवशी श्री. लिमये यांनी आपल्या 'समविचारी' मित्रांना आपल्या नव्या व्यूहरचनेची कल्पना देताना सांगितले होते– "राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विसर्जन व्हावे आणि जनसंघ गुदमरावा, यासाठी प्रयत्न केले पाहिजेत." जनता पक्षातील विविध घटकांच्या स्वयंसेवक संघटनांमध्ये रा. स्व. संघाने विलीन होऊन जावे असे सांगताना त्यांच्या मनात ही व्यूहरचना होती. चरणसिंगांच्या पक्षत्यागानंतर जनताच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची जी पहिली बैठक झाली तिच्यात रामधन यांनी लिमयेंच्या उपस्थितीत एक गौप्यस्फोट केला होता. त्यांनी सांगितले होते, "या लिमयेंनी मला

विचारले– ' हे तुम्ही काय करीत आहात ? चौधरी चरणसिंगांना आणि भारतीय लोकदलाला बाहेर हाकलता आहात ते कशासाठी ? ज्याची हकालपट्टी झाली पाहिजे असा खरा खत्रू आहे रा. स्व. संघ !" या गौप्यस्फोटानंतर लिमये नुसते गप्प बसून राहिले होते– त्यांचा चेहरा मात्र पाहाण्यासारखा झाला होता.

" रा. स्व. संघ मार्क्सवाद्यांपेक्षाही अधिक पुरोगामी आहे " असे म्हणणारे श्री. राजनारायण पुढे बदलले– त्यांनी श्री. संजय गांधी यांच्याबरोबर घसट वाढवण्यास सुरुवात केली. तेवढयाने समाधान झाले नाही म्हणून ' रा. स्व. संघाने आपला खून करण्याचे कारस्थान रचल्याची ' थापदेखील त्यांनी ठोकली. ' मला वाराणसीला ठार करावयाचे की दिल्लीला की मिर्झापूरला हे संघवाल्यांनी अजून निश्चित केले नसल्यामुळेच मला मारण्याचा अजून प्रयत्न झाला नाही, ' असे त्यांनी सांगितले. (नॅशनल हेराल्डचा दि. ३१ जानेवारी १९७९ चा अंक.)

उत्तर प्रदेश विधानसभेचे सभापती श्री. बनारसी दास जून १९७८ मध्ये रा. स्व. संघाच्या संभल येथील एका शिबिरात अध्यक्षपदावरून बोलताना म्हणाले होते की, " तुमच्यासारख्या देशभक्त आणि निष्ठावंत लोकांमध्ये चार क्षण घालवण्याची मला आज ही जी संधी मिळाली तिच्यामुळे माझा आपण सन्मानच केला आहात, असे मी मानतो. गेली तीस वर्षे सत्तेवर असणाऱ्या कॉंग्रेसवाल्यांनी संघकार्याबद्दल जनतेची दिशाभूल करण्याचा सतत प्रयत्न केला. संघ हा तुमचा शत्रू आहे, असे मुसलमानांच्या गळी उतरवण्याचाही प्रयत्न केला गेला. पण मला हे पूर्वीपासूनच माहीत होते आणि आज मी ते पुन्हा एकदा जाहीरपणे सांगू इच्छितो की, या देशाच्या पुनर्बांधणीसाठी सर्व जातीजमातींना बरोबर घेऊन जाण्याचा प्रयत्न करणारी रा. स्व. संघ ही या देशातली एकमेव संघटना आहे."

त्याच भाषणात श्री. बनारसी दास पुढे म्हणाले होते, " काही महिन्यांपूर्वी संभल परगण्यात जातीय दंगल उद्‌भवली होती. रा. स्व. संघ मुस्लिमविरोधी असल्याचा आरोप किती निराधार आणि खोटा आहे, हे त्या वेळी स्पष्टपणे सिद्ध झाले. हातची सत्ता गमावून बसलेले

लोक आपले राजकीय महत्त्व वाढवण्यासाठी हिंदूंना आणि मुसलमानांना आपापसात लढवत ठेवून आणि मुसलमानांमध्ये एकप्रकारचा भयगंड निर्माण करून कोणता खेळ खेळत बसतात, ते त्या निमित्ताने उघडकीस आले." 'संघाचे शहरप्रमुख श्री. अंबा दत्त यांच्याबरोबर व्यासपीठावर बसलेले मुस्लीम आमदार श्री. मुफिसुर रहमान या गोष्टींची साक्ष देऊ शकतील.' अशी पुष्टीदेखील श्री. बनारसी दास यांनी जोडली होती. पण याच बनारसीदासांनी पुढे मुख्यमंत्री झाल्यावर पूर्वाश्रमीच्या भारतीय जनसंघाच्या कोणत्याही कार्यकर्त्याला मंत्री म्हणून आपल्या मंत्रिमंडळात घ्यायला साफ नकार दिला. हे लोक 'जातीय आणि फॅसिस्ट' रा. स्व. संघाचे सदस्य आहेत, ही सबब त्यांनी त्यासाठी पुढे केली.

राजनारायण यांचे उत्तर प्रदेशातले उजवे हात समजले जाणारे श्री. रमाशंकर कौशिक महसूल व आरोग्यखात्याचे मंत्री असताना जून १९७८ मध्ये आपणहून चंदौसी येथील संघाच्या शिबिराला भेट देण्यासाठी गेले होते. तेथे स्वयंसेवकांसमोर भाषण करताना त्यांनी 'संघकार्य लौकरात लौकर, जितक्या वेगाने शक्य होईल तितक्या वेगाने वाढवण्याचा आणि गावोगावी शाखा सुरू करून शाखांचे ग्रामीण भागात जाळे विणण्याचा' सल्ला दिला होता. पण पुढे हेच मंत्रीमहोदय राज्यातल्या संघविरोधी प्रचारमोहिमेत आघाडीवर होते.

अल्पसंख्य आयोगाचे सदस्य प्रा. व्ही. व्ही. जोन यांनी या राजकारण्यांचा संधिसाधूपणा उघड करून लोकांसमोर मांडताना म्हटले होते की, "निवडणुकीच्या काळातली एक घोषणा म्हणून सेक्युलॅरिझमची विकृत आवृत्ती सध्या अनेक लोक वापरताना दिसत आहेत. सध्याच्या राजकारणात आपण सेक्युलर आहोत हे सिद्ध करण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टीका केली की काम भागते. मग जातीय पक्षांबरोबर तडजोड केली, धर्मांध नेत्यांचा राजकीय पाठिंबा मिळवला तरी चालते."

जनता पक्षात 'दुहेरी सदस्यत्वा' चा वाद याच लोकांनी उपस्थित केला. त्या वेळी असा युक्तिवाद केला गेला की रा. स्व. संघ हा एक राजकीय पक्ष आहे आणि म्हणून पूर्वाश्रमीच्या जनसंघाच्या सदस्यांनी एकतर रा. स्व. संघाबरोबरचे संबंध तोडले तरी पाहिजेत किंवा त्यांना

जनता पक्षातून काढून तरी टाकले गेले पाहिजे. मुलीने लग्न झाल्यावर आई-वडिलांशी कोणत्याही तऱ्हेचा संबंध ठेवू नये, अशी अपेक्षा करण्यासारखाच तो युक्तिवाद होता. डॉ. हरेकृष्ण मेहताब यांनी म्हटल्याप्रमाणे 'दोन-तीन मुले झाल्यावर बायकोची जात विचारण्यातलाच तो प्रकार होता.'

तत्कालीन पंतप्रधान श्री. मोरारजीभाई देसाई यांनी 'रा. स्व. संघ ही स्वतंत्र सांस्कृतिक संघटना आहे.' हे पटवून देण्याचा खूप प्रयत्न केला, पण व्यर्थ ! श्री. जगजीवनराम यांनीदेखील असा खुलासा केला की, "एखादा राजकीय पक्ष त्याची ध्येयधोरणे मान्य करणाऱ्या आणि त्यांच्या अंमलबजावणीसाठी काम करायला तयार असणाऱ्या सर्व लोकांना सामावून घेत असतो. पक्षाचा कार्यक्रम मान्य आहे, अशा घोषणापत्रकावर सही करणाऱ्या प्रत्येक सदस्याचा भूतकाळ तपासून पाहण्याची काहीच आवश्यकता नसते. पक्षाचे सदस्यत्व स्वीकारणाऱ्याने ते प्रामाणिकपणे स्वीकारले आहे आणि तो एक सभ्य माणूस आहे, असे गृहीत धरूनच राजकारणात पुढे जायचे असते. एकदा सभासदाने सदस्यत्वाच्या सर्व अटी मान्य केल्यानंतर त्याच्यावर दुहेरी सदस्यत्वाचा आरोप करणे व्यर्थ आहे. जनता पक्ष आपले दरवाजे अशा रीतीने कुणाला बंद करू शकेल ? हा प्रश्नच मुळी उद्भवू शकत नाही." संघाचे स्वयंसेवक जनता पक्षाच्या तत्त्वांवर विश्वास ठेवीत नाहीत, या आरोपाला मुळीच आधार नाही, मला तसा कधीही अनुभव आलेला नाही, असेही जगजीवनरामबाबूंनी सांगितले.

श्री. सिकंदर बख्त यांनी असे मत व्यक्त केले की, "रा. स्व. संघाचे किंवा जनसंघाचे लोक फॅसिस्टही नाहीत आणि जातीयवादीही नाहीत. ज्याला संघाचा स्पर्श होतो त्या प्रत्येक माणसाच्या मनात एवढी देशभक्तीची भावना जागृत करण्यात संघाचे लोक कसे यशस्वी होतात, याचेच मला आश्चर्य वाटते." आणीबाणीमध्ये याच लोकांनी सगळ्यात जास्त हालअपेष्टा सहन केल्या होत्या, असेही त्यांनी सांगितले.

एप्रिल १९७९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेत रा. स्व. संघाविषयी झालेल्या प्रदीर्घ चर्चेत भाग घेताना विरोधी पक्षनेते श्री. मोहिते—ज्यांनी

संघावर बंदी घालण्याची मागणी केली होती. ते– म्हणाले, " रा. स्व. संघापुरते बोलायचे झाल्यास त्यांच्या विशुद्ध वर्तनाबाबत संशय घ्यायला मुळीच जागा नाही." आणि पूर्वाश्रमीचे समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते श्री. गुलाबराव पाटील म्हणाले, " मी गेली १९ वर्षे रा. स्व. संघाच्या एका शाखेजवळ राहातो आहे. त्यांच्यासारखी खरीखुरी अखिल भारतीय संघटना आपण उभारू शकत नाही अशी स्थिती असताना त्यांचे दोष काढीत बसणे योग्य ठरणार नाही. संघ गुप्त हालचाली करीत असतो असा आक्षेप एकीकडून घेतला जात असताना श्री. मोहिते त्यांच्यावर बंदी घालून, मोकळ्या मैदानावर चालणाऱ्या त्यांच्या कवायतींवर बंदी घालून त्यांनी भूमिगत व्हावे अशी दुसरीकडे तजवीज करीत आहेत." 'गुरुदक्षिणेच्या मार्गाने निधी संकलन करीत असल्याबद्दल संघाचे कौतुकच करायला हवे, नाहीतर तुम्ही ! तुम्हा काँग्रेसजनांना निवडणूक-निधीसाठी दरवेळी माताजींच्या तोंडाकडे बघत बसावे लागते', असा टोमणादेखील श्री. पाटील यांनी मारला होता. १९५२ साली महाराष्ट्रात दुष्काळ पडला होता, त्यावेळी संघाने स्वस्त दरात पुरवलेल्या अन्नपिशव्यांचे ग्रामीण भागात स्वाभाविकपणे स्वागत झाले होते. त्याचा उल्लेख करून ते म्हणाले होते, " तुम्ही गेली तीस वर्षे सामाजिक सेवा, सामाजिक सेवा असे नुसते तोंडपुजलेपणाने म्हणत आलात, प्रत्यक्षात मात्र मेजवान्याच झोडीत राहिलात. तुमच्या हातांत सत्ता असतानाही तुम्ही कोणतेच भरीव कार्य केले नाही. त्या दुष्काळात युवक काँग्रेस दल किंवा राष्ट्रसेवादल कुठे गेले होते ? अशा स्थितीत तुम्ही संघावर टीका करणे म्हणजे वांझ बाईने मातृपद प्राप्त झालेल्या स्त्रीवर आगपाखड करण्यासारखे आहे !"

संघावर टीकास्त्र सोडण्यास उत्सुक असणाऱ्या लोकांनी त्यानंतर एक नवा मुद्दा उपस्थित केला. आयकरासंबंधीच्या एका प्रकरणात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात रा. स्व. संघाने आपले कार्यक्रम राजकीयसदृश आहेत. (akin to political) असे नमूद केले आहे, असे या लोकांचे म्हणणे होते. त्यांचा आक्षेप दुधारी होता– एक म्हणजे आपण राजकीय संघटना आहोत हे खुद्द संघानेच कबूल केले आणि दुसरे म्हणजे संघ

आयकर चुकवतो आहे.

त्या प्रकरणाबाबतची वस्तुस्थिती मात्र पूर्णपणे वेगळी होती. ते तथाकथित प्रतिज्ञापत्र कोणत्याही आयकरविषयक न्यायालयासमोर सादर करण्यात आलेले नव्हते. रा. स्व. संघाचे कार्यक्रम धार्मिक वा राजकीय स्वरूपाचे नाहीत, हे आयकर आयुक्तांनी केव्हाच मान्य केले होते. नागपूरच्या धर्मादाय उपायुक्तांनीदेखील दि. २२ मे १९७४ रोजी असा निकाल दिला होता की, "कागदोपत्री नोंदला गेलेला आणि तोंडी पुरावा लक्षात घेता रा. स्व. संघाचा हेतू राष्ट्रीय आहे– पण तो धार्मिक नाही किंवा धर्मादायही नाही. रा. स्व. संघ या संघटनेची उद्दिष्टे धार्मिक किंवा धर्मादाय उद्दिष्टांपेक्षा वेगळी असून ती राजकीय उद्दिष्टां-सारखी आहेत." पण धर्मादाय सहआयुक्तांनी तो निर्णय बदलला होता. त्यांच्या त्या बदललेल्या निर्णयाविरुद्ध रा. स्व. संघाने नागपूरच्या जिल्हा न्यायाधीशांकडे अपील केले होते. आणि त्या न्यायाधिशांना सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रकात संघातर्फे असे निवेदन करण्यात आले होते की, "संघाचे कार्य हे धार्मिक स्वरूपाचेही नाही आणि धर्मादायही नाही. संघाची उद्दिष्टे सांस्कृतिक व राष्ट्रीय स्वरूपाची आहेत. धार्मिक किंवा धर्मादाय स्वरूपाच्या उद्दिष्टांपेक्षा ती उद्दिष्टे स्पष्टपणे वेगळी आहेत. ती आज राजकीयसदृश आहेत– जरी संघ हा सध्या राजकीय पक्ष नसला तरी !" लोकमान्य टिळक हे फार मोठे राजकीय नेते असल्यामुळे त्यांचा 'केसरी' ट्रस्ट हा राजकीयसदृश उद्दिष्टांचाच मानण्यात आला, उदाहरण मुद्दाम देण्यात आले होते. रा. स्व. संघाच्या बाबतीत संस्थापक डॉक्टर हेडगेवार हेदेखील एक प्रमुख राजकीय पुढारी म्हणून गणले गेले होते.

त्या प्रतिज्ञापत्रकात १९२३ सालच्या टिटले प्रकरणातील लॉर्ड हाल्डेन यांचे धर्मादाय व राष्ट्रीय उद्दिष्टांमधील फरक स्पष्ट करून सांगणारे निवेदन मुद्दाम उद्धृत करण्यात आले होते. "धर्मादाय हेतूने जेव्हा एखादी देणगी दिली जाते तेव्हा लोकांना काहीतरी फायदा व्हावा असा प्रमुख उद्देश असतो. ती देणगी दिल्याशिवाय लोकांचा फायदा होणार नसतो. राष्ट्रीय उद्देशाने केल्या जाणाऱ्या कार्यात आपल्या

देशाचे भले व्हावे हाच हेतू असतो. हे दोन्ही हेतू वेगवेगळे आहेत, यात शंकाच नाही." रा. स्व. संघ ही निःसंशय राष्ट्रीय संघटना आहे. एखादी धर्मादाय कार्य करणारी संस्था नाही, हे निश्चित !

जे लोक राजकीय कारणांसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला राजकीय संघटना ठरवू पाहात होते, तेच लोक कायदेशीर कारणांसाठी मात्र संघाला 'राजकीयसदृश' संघटना मानायलादेखील तयार होत नव्हते. मोठी गमतीची गोष्ट होती. कारण साधेसुधे होते. त्या लोकांना सत्य शोधायचे नव्हतेच मुळी ! त्यांना केवळ सरकार पाडायचे होते, खाली खेचायचे होते. जनता पक्षातील समाजवादी खासदार श्री. समर गुहा यांनी म्हटल्याप्रमाणे रा. स्व. संघ हे केवळ शिखंडीसारखे एक निमित्त मात्र होते. खरे लक्ष्य जनता सरकार हेच होते आणि ते पाडण्यात अखेरीस त्यांना यश मिळालेदेखील.

या सर्व प्रकरणातला सगळ्यात वाईट भाग कोणता असेल तर तो म्हणजे विदेशी शक्तींचा सहभाग. दुसऱ्या देशांवर वर्चस्व गाजवू इच्छिणारा कोणताही बडा देश कोणत्याही देशात समर्थ राष्ट्रवादी चळवळ यशस्वी व्हावी म्हणून प्रयत्नशील नसतो. म्हणूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल अमेरिकेचे किंवा सोव्हिएत रशियाचे मत कधीच अनुकूल नव्हते. मात्र अमेरिकेने संघावर कधीही उघड टीका केली नाही. उलट सोव्हिएत रशिया मात्र गेली दहा-पंधरा वर्षे रा. स्व. संघावर सातत्याने हल्ले चढवीत आला आहे. एका दगडात चार पक्षी मारण्याचा त्या देशाचा हा प्रयत्न आहे. या देशातल्या साम्यवाद्यांना मदत करणे, भारतातल्या मुसलमानांना संतुष्ट ठेवणे, भारतातील संघविरोधी सत्ताधाऱ्यांवर उपकार करणे आणि खुद्द सोव्हिएत युनियनमधील मुसलमानांना व अरबांना त्यांचे धर्मयुद्ध त्यांच्यासाठी आपण लढत असल्याचे दाखवणे असे चार उद्देश या सोव्हिएत रशियाच्या संघविरोधी हल्ल्यामागे असतात.

बऱ्याच वर्षांपूर्वी म्हणजे नोव्हेंबर १९६६ मध्ये सुभद्रा जोशी, केशवदेव मालवीय वगैरेंसारखे मॉस्कोवादी देशभक्त दिल्लीत एकत्र जमले होते. त्यांच्या त्या मेळाव्यात तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा

निबंध २४७८६ ९७।४।८४



गांधी आणि गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांची भाषणे झाली होती. या जातीयवादी साम्यवाद्यांच्या परिषदेत 'रा. स्व. संघ हा राजकीय पक्ष आहे' असे जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आला. एका जाणकार निरीक्षकाने म्हटल्याप्रमाणे 'कायदा करून एखाद्या व्यक्तीचे लिंग बदलण्याचाच तो प्रकार होता!'

पण श्री. चव्हाण यांनी शब्दांची कसरत करून तोच चमत्कार करून दाखवण्याचा घाट घातला होता. दि. ३१ जुलै १९६८ रोजी एका साम्यवादी खासदाराने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते राज्यसभेत म्हणाले होते, "मी हे सांगू इच्छितो की आम्ही त्यांना राजकीय पक्ष मानीत नाही. पण त्यांना राजकीय तत्त्वज्ञान आहे, त्यांचा विशिष्ट राजकीय कल आहे असे मात्र आम्ही ठामपणे म्हणतो, आणि म्हणूनच रा. स्व. संघाच्या कार्यक्रमात सहभाग म्हणजे एखाद्या राजकीय संघटनेतल्या सहभागासारखेच ठरेल, असे आम्ही मानतो."

त्यानंतर मॉस्कोच्या तथाकथित 'शांततावादी व प्रगतिप्रिय' नभोवाणीने– 'रेडिओ पीस अॅण्ड प्रोग्रेस'ने– रा. स्व. संघावर टीकेची झोड उठवण्यास सुरुवात केली. गांधीजी व सुभाषचंद्र बोसांवर ते फॅसिस्ट असल्याचा आणि साम्राज्यवाद्यांचे हस्तक असल्याचा आरोप याच नभोवाणीवरून पूर्वी करण्यात आला होता. त्या नभोवाणीवरून असे सांगण्यात आले की, "रा. स्व. संघाच्या १५००० गुंडांकरवी स्त्रियांची अब्रू लुटण्यात येईल आणि मालमत्तेचा विध्वंस करण्यात येईल अशी केदारनाथ सहानींनी धमकी दिली आहे." जयप्रकाश नारायणांचे आंदोलन जसजसे तीव्र होत चालले तसतसे रा. स्व. संघावरचे सोव्हिएत हल्ले अधिक तीव्र होऊ लागले आणि पूर्वीपेक्षा लौकर लौकर होऊ लागले. जेव्हा आणीबाणी लादण्यात आली तेव्हा मॉस्कोने तिचे स्वागत केले. आणि माहिती व नभोवाणीखात्याचे मंत्री श्री. विद्याचरण शुक्ला यांनी सोव्हिएत रशियाच्या भारतातील प्रतिनिधींना असे आश्वासन दिले की, 'रा. स्व. संघावरची बंदी आता यापुढे कधीही उठवली जाणार नाही.'

आणीबाणी उठवली गेल्यानंतर परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयी

यांच्या चीन भेटीचा सेत उधळून लावण्याचा रशियनांनी प्रयत्न केला. आणि बांगला देश व पाकिस्तान या दोन्ही शेजारी देशांबरोबरचे आपले संबंध जरी सुधारले तरीदेखील या मॉस्कोवादी लोकांनी असा ठेका धरला की, ' रा. स्व. संघाचा पुनरोदय झाल्यामुळे या दोन मुसलमान देशांबरोबरचे आपले संबंध सुधारण्याच्या मार्गात अडथळे निर्माण होत आहेत.' मॉस्कोचा डाव अगदी सरळ, साधा होता. आपल्या कुणातरी हस्तकाकरवी किंवा एखाद्या मुखपत्राकरवी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टीका करवून घ्यायची आणि मग हीच टीका भारतीय वृत्तपत्रांची आणि जनसामान्यांची प्रातिनिधिक प्रतिक्रिया म्हणून ध्वनिक्षेपित करायची, असा त्यांचा खाक्या होत्या. ' राष्ट्रीय स्वयंसेवक संघ म्हणजे निमलष्करी, हिंसाचारी हिंदू संघटना आहे ' अशी टीका बीजू पटनाईक यांच्या तोंडी घालून ' टास ' या रशियन वृत्तसंस्थेने तर अगदी कहरच केला. त्या वृत्तसंस्थेने दि. ८ फेब्रुवारी १९७९ रोजी पाठवलेल्या ' रा. स्व. संघाच्या घातपाती कारवाया ' अशा शीर्षकाच्या वृत्तांतात अलिगड, बनारस आणि कानपूर येथील दंगलींचे खापर संघाच्या माथी फोडण्यात आले होते. शेकडो माणसे त्या दंगलीत मारली गेली किंवा जखमी झाली आणि असंख्य घरे-कार्यालये जाळण्यात आली, असेही त्या वृत्तात म्हटले होते. त्यानंतरच्या महिन्यात संघनेते श्री. भाऊराव देवरस यांनी या सोव्हिएत प्रचारमोहिमेची दखल घेतली. आणि ते उज्जैनमध्ये एका भाषणात असे म्हणाले की, " निस्वार्थी समाजसेवा करणाऱ्या राष्ट्रीय कार्यकर्त्यांची शक्ती उभी करण्याच्या कार्याला खीळ घालण्याचा संघविरोधी कट आजपर्यंत देशातल्या देशातच मर्यादित होता. आता त्याने आंतरराष्ट्रीय स्वरूपही धारण केले आहे." त्यानंतर घडलेल्या घटनांवरून त्यांचे निरीक्षण अगदी यथार्थ असल्याचेच स्पष्ट झाले.

संजय आणि सोव्हियत रशिया हे दोघेही वेगवेगळ्या कारणांनी पण याच निष्कर्षाप्रत आले होते की जनता सरकार पडले पाहिजे आणि रा. स्व. संघावर चहुबाजूंनी हल्ला चढवला तरच जनता सरकार कोसळेल. ' Last Days of the Morarji Raj ' या आपल्या पुस्तकात श्री. वरुन

सेनगुप्ता यांनी त्या वेळची परिस्थिती विस्ताराने वर्णन केली आहे. संजयने राजनारायणना सांगितले होते की, ‘ तुम्ही जर जनसंघ-संघाच्या प्रश्नावर त्यांना घाबरवू शकलात तर समाजवाद्यांपैकी आणि संघटना काँग्रेसवाल्यांपैकी अनेकजण तुमच्याबरोबर येतील.’ दुसऱ्या एका प्रसंगी त्याने राजनारायणना सल्ला दिला होता की, ‘ फक्त मोरारजींवरच तुमचे हल्ले केंद्रित करू नका. मोरारजी आणि जनसंघ या दोघांवरही एकाच वेळी हल्ले चढवीत राहा. तसे केले नाहीत तर मग मोरारजी सरकारला खाली खेचणे अशक्य होईल.”

सोव्हिएत रशियाचे धोरणही असेच होते. अमेरिका आणि रशिया या दोघांनाही सारख्याच अंतरावर ठेवणारा भारतीय पंतप्रधान त्यांना चालण्यासारखा नव्हता. त्याचप्रमाणे प्रखर राष्ट्रवादी अशी रा. स्व. संघ– भारतीय जनसंघाची पार्श्वभूमी असलेला भारतीय परराष्ट्रमंत्री-देखील त्यांना रुचणे शक्य नव्हते. आणि म्हणूनच मॉस्कोचे हस्तक असणाऱ्या मधू लिमयेंनी १९७७ च्या निवडणुकीनंतर लगेचच ‘ रा. स्व. संघाला हाकलायला हवे, अन्यथा जनता सरकार कोसळलेच म्हणून समजा, ’ असे विधान केले होते.

श्री. सेनगुप्ता यांनी आपल्या पुस्तकात या बाबतीत असे लिहिले आहे की, “ मधूचे म्हणणे संजयसारखेच होते. रा. स्व. संघ आणि जनसंघ यांच्यावर टीका करा, त्यांना एकटे पाडा म्हणजे मग मोरारजींना राजीनामा द्यायला भाग पाडणे सोपे जाईल. हे पटल्यामुळे राजनारायण यांनी संजयला कसलेही आढेवेढे न घेता आश्वासन देऊन टाकले की मी आता सर्व टीका रा. स्व. संघ-जनसंघ यांच्याच विरुद्ध केंद्रित करीन.” (पृष्ठ ८३) आता संघ ‘ जातीयवादी व फॅसिस्ट ’ असल्याचा शोध लावूनच राजनारायण गप्प बसले नाहीत तर ‘ संघाने कोटयवधी रुपये नेपाळमध्ये नेऊन दडवून ठेवले आहेत आणि चीनकडून संघाला शस्त्रास्त्रेही मिळत आहेत ’ हे दोन नवे पण धादांत खोटे आरोपही त्यांनी केले. आणि त्यांची ही मुक्ताफळे खोटी आहेत हे ठाऊक असूनही भारतीय वृत्तपत्रांनी वृत्तपत्रस्वातंत्र्याच्या नावाखाली ती छापली आणि आपल्या वाचकांची भरपूर करमणूक केली. अर्थात वृत्तपत्रांची ती मौज

जनताचा मृत्यू घडवण्यास सहाय्यभूत ठरली.

भूपेश गुप्तांनी मनमोकळेपणाने सेनगुप्ताजवळ अशी कबुली दिली की, 'ती बिकट परिस्थिती देशांतर्गत आणि बाह्य अशा दोन्ही कारणांनी निर्माण झाली होती.' आणि त्यानुसारच दि. १७ मे रोजी विविध राजकीय पक्षांमधील मॉस्कोवादी लोकांची एक बैठक मधू लिमये यांच्या अध्यक्षतेखाली भरली. जनता सरकार पाडण्याची व्यूहरचना आखण्यासाठी घेण्यात आलेली ती बैठक म्हणजे अशुभसूचक घटना होती, पण तिचे महत्त्व जनता पक्षातल्या अडाणी महाभागांना उमगलेच नाही.

श्री. बरून सेनगुप्ता म्हणतात, "मार्क्सवादी पक्षाच्या राममूर्ती आणि सुजित यांच्यासारख्या नेत्यांनी जनता सरकार पाडण्याच्या मधू लिमयेंच्या कारस्थानात सहभागी होण्यापर्यंत मजल कशी मारली, हे एक गूढच आहे. हे दोन्ही मार्क्सवादी नेते राजकारणात अनभिज्ञ नाहीत. उलट त्या दोघांनीही राजकारणात बरीच वर्षे घालवलेली असून हुशार म्हणून त्यांना ओळखले जाते. मार्क्सवाद्यांपैकी बहुसंख्य खासदार मोरारजी सरकार पाडण्याच्या ठाम विरुद्ध होते, हे सर्वांना ठाऊक आहे. ज्योतिर्मय बसूंसारखा एक प्रमुख मार्क्सवादी खासदार पक्षाच्या पॉलिटब्यूरोच्या सर्व सभासदांना जातीने जाऊन भेटला होता आणि त्याने जनता सरकार कोसळण्याचे काय परिणाम होतील, याची त्यांना पुरेपूर कल्पनाही दिलेली होती... मोरारजींचे मार्क्सवाद्यांशी चांगले संबंध होते. त्यांनी मार्क्सवाद्यांच्या सरकारांना यत्किंचितही त्रास दिला नव्हता. एवढेच नव्हे तर ज्योतिर्मय बसूंच्या सूचनेवरून श्री. टी. एन. सिंग यांना पश्चिम बंगालचे राज्यपाल म्हणून नियुक्त करण्यासही त्यांनी मान्यता दिली होती. मग अचानक मोरारजीभाईंना विचित्र रीतीने खाली खेचण्याच्या कटाला मार्क्सवाद्यांच्या पॉलिटब्यूरोने मान्यता का बरे दिली असेल? या प्रश्नाचे कोणतेही तर्कशुद्ध उत्तर मिळत नाही."

त्या प्रश्नाला तर्कशुद्ध उत्तर मिळत नाही, हे खरे. पण ते उत्तर रशियन तर्कशास्त्रात बसणारे होते. जनता सरकारने चीनबरोबरचे

संबंध सुरळीत करण्याचे प्रयत्न आरंभले होते, कांपुचियातल्या रशियाच्या हस्तक राजवटीला मान्यता देण्याचे टाळले होते, इजिप्त-इस्राएल मैत्री-कराराचा निषेध केला नव्हता. यामुळे रशियाला संताप येणे स्वाभाविक होते. आणि या 'अपराधा' बद्दल जनता सरकारला अद्दल घडवायचीच, असा त्यांनी निर्णय घेतला होता. त्यांच्या दृष्टीने त्यांचे परराष्ट्रीय धोरणाचे उद्देश जास्त महत्त्वाचे होते. भारतीय साम्यवाद्यांच्या स्थितींचे त्यांना फारसे सोयरसुतक नव्हते. काँग्रेसचे खासदार श्री. सौगतराय यांनी वरून सेनगुप्तांना दिलेल्या माहितीनुसार 'मार्क्सवादी लोकांची मधू लिमये, बहुगुणा आणि बिजू पटनाईक यांच्याशी बराच वेळ चर्चा झाली. राममूर्ती आणि सुजित हे दोघे तर बिजू पटनाईक यांच्या घरी बऱ्याच वेळा दिसले होते.' म्हणजे हे मार्क्सवादी नेते आपल्या पॉलिटब्यूरोतल्या किंवा संसदेतल्या सहकाऱ्यांपेक्षा– ज्योती बसू व ज्योतिर्मय बसू यांच्यापेक्षा– मॉस्कोला जवळचे होते, हेच स्पष्ट दिसून आले.

संजयने जेंव्हा राजनारायणना विचारले की, 'लोकदल इंदिरा-विरोधी आणि सोव्हिएत रशियावादी असे धोरण का अनुसरीत आहे?' तेव्हा राजनारायणनी सारा दोष बहुगुणा, मधू लिमये, चंद्रजित यादव यांचा असल्याचे सांगितले. बिगरसाम्यवादी भारतीय पक्षांमधली सोव्हिएत रशियाची हस्तक असणारी ही त्रिमूर्ती दोषी असल्याचे सांगून ते म्हणाले, "चौधरीसाहेब या सगळ्या लोकांचे ऐकतात तेव्हा मी एकटा काय करू शकणार ?"

दि. १४ जुलै १९७९ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या 'सोव्हिएट लँड' या नियतकालिकाच्या मुखपृष्ठावर पंतप्रधान मोरारजीभाईंचे बहुरंगी छायाचित्र छापण्यात यायचे होते. पण दि. ९ जुलै रोजीच– ज्या दिवशी मोरारजीभाईंच्या सरकारविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडला गेला त्या दिवशीच– ते रद्द करून त्याऐवजी कांपुचियातल्या एका सामुदायिक शेताचे चित्र टाका, असा आदेश दिला गेला. सरकार कोसळणार हे सोव्हिएत लोकांना ठाऊक होते. सभागृहाच्या नेत्याला किंवा विरोधी पक्षनेत्याला मात्र सोव्हिएत भटारखान्यात काय शिजते, याची पुसटशी-

सुद्धा कल्पना नव्हती.

त्या भारतीय निवडणुकीत कोटचवधी रुपयांचे परकीय चलन वापरले गेले. दि. ११ फेब्रुवारी १९८० च्या अंकात 'दि स्टेटस्मन'ने दाखवून दिल्याप्रमाणे रुपयाचा जगातल्या काळ्या बाजारातला भाव त्यावेळी खूपच वधारला होता. एरवी दर्शनी किमतीपेक्षा कमी किमतीला विकला जाणारा रुपया चढचा भावाने विकला जाऊ लागला होता. दि. ४ जानेवारीचा अधिकृत विनिमय दर होता एका डॉलरला ७·९१ रुपये तर अनधिकृत दर होता फक्त ७·२० रुपये! "चलनाच्या बाजारपेठेवर बारकाईने नजर ठेवणाऱ्या लोकांच्या मते भारतीय चलनाच्या काळ्या बाजारातील या भाववाढीचे कारण रुपयाची अंगभूत शक्ती वाढली हे नसून अज्ञात खरेदीदारांकडून—परदेशी सरकारांसह— आपल्या मित्रांना निवडणुकीत उपयोगी पडाव्यात म्हणून द्यावयाच्या मोठचा रकमांची तरतूद करण्यासाठी दिल्या गेलेल्या बडचा ऑर्डर्स कारणीभूत होत्या." निवडणुकीनंतर फेब्रुवारीच्या पहिल्या आठवडचात डॉलरचा भाव पुन्हा आठ रुपयांपर्यंत गेला हे लक्षात घेण्याजोगे होते !

अर्थात त्या निवडणुकांचे जे निकाल लागले त्यामुळे रशियाला समाधान वाटणे शक्यच नव्हते. माणसाने—मार्क्सवादी माणसाने हुशारीने आखलेल्या अनेक योजना बऱ्याच वेळा सपशेल फसतात, या बाबतीतही तोच अनुभव आला. रशियाला अनुकूल असणारे लोकदलाचे सरकार किंवा विविध पक्षांच्या आघाडीचे दुबळे सरकार स्थापन करण्याचे रशियनांचे सगळे मनसुबे हवेत विरून गेले. पण तसे होत असताना जनता पक्षाचेही तुकडे तुकडे झाले. दुहेरी सदस्यत्वाच्या विखारी प्रश्नाने मारलेला डंख त्या पक्षाला सहन करता येणे शक्यच नव्हते.

संघाच्या कोणत्याही पदाधिकाऱ्याने कुठल्याही राजकीय पक्षातले अधिकारपद स्वीकारू नये किंवा एखाद्या राजकीय पक्षातल्या पदाधिकाऱ्याला संघात कोणतेही अधिकारपद दिले जाऊ नये, अशी संघाच्या घटनेतच तरतूद केलेली आहे. जनता पक्षाचे अध्यक्ष चंद्रशेखर यांनी 'पदाधिकारी' या संज्ञेच्या व्याख्येत आमदार-खासदार यांचाही समावेश केला जावा, अशी विनंती केली. आणीबाणीच्या काळातील मित्रांना

त्यांच्यावरील राजकीय संकटात मदत करण्याची तयारी संघाचे सर-कार्यवाह प्रा. राजेंद्रसिंहजी यांनी दाखवली. मार्च १९८० मध्ये घेण्यात येणाऱ्या रा. स्व. संघाच्या प्रतिनिधीसभेच्या बैठकीत ही सूचना चर्चेला घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि आमदार-खासदारांनी रा. स्व. संघाच्या दैनंदिन कामकाजात भाग घेण्यावर बंधन घालण्यात यावे, अशीही चंद्रशेखर यांची मागणी होती. आपल्यासाठी अमुक करा, तमुक करा असे जनता पक्षाने संघाला सांगणे विचित्र होते आणि तरीदेखील, केवळ जुन्या मैत्रीसंबंधांमुळे, रज्जूभैय्यांनी तो मुद्दादेखील प्रतिनिधीसभेपुढे चर्चेला घेण्याचे मान्य केले. तो दिवस होता २४ जुलै १९७९ चा !

पण ' दुहेरी सदस्यत्वा 'चा हा वाद ज्या लोकांनी हेतुतः उपस्थित केला होता, त्यांना तो मिटवण्यात मात्र फारशी आस्था नव्हती. सतत नवनवीन समस्या निर्माण करण्यातच त्यांना रस वाटत होता. जनता सरकार कोसळवण्यात यशस्वी झाल्यानंतर आता जनता पक्षदेखील फोडण्याकडे त्यांचे लक्ष लागले होते. तसा त्यांचा निर्धार झालेला होता आणि त्यासाठी आपणहून काम करायला अनेक लोक तयार होते. पूर्वाश्रमीच्या जनसंघाला १९८० सालच्या निवडणुकीत १९७७ च्या तुलनेने जनता पक्षाची बरीच कमी तिकिटे देण्यात आली. वस्तुतः भारतीय लोकदल जनता पक्षातून बाहेर पडल्यानंतर जनसंघाचा वाटा वाढायला हवा होता आणि इतके सारे होऊनदेखील कृष्णकांतांसारखे संघाचे टीकाकारदेखील असे म्हणताना दिसत होते की, " केवळ संघ-कार्यकर्त्यांनाच काय, त्यांच्या बापालासुद्धा माझ्यासाठी काम करावे लागेल. त्यांना तसे करण्याशिवाय गत्यंतरच नाही. त्यांनी तसे केले नाही तर जनता पक्ष फुटलाच म्हणून समजा. "

जनता पक्षातील अंतर्गत कलहाने लोक वैतागले होते. इंदिरा काँग्रेसच्या प्रचारामुळे जनता पक्षाला बचावात्मक पवित्रा घेणे भाग पडले होते. जनता पक्षनेत्यांच्या रा. स्व. संघावरील टीकेमुळे जनता पक्षाचे कार्यकर्ते गोंधळून गेले होते. आणि एका मतदारसंघातून एकच

प्रतिनिधी निवडून द्यायची तरतूद असणाऱ्या आपल्या खास निवडणूक पद्धतीने बाकीचा कार्यभाग उरकला. त्यामुळे जनता पक्षाचा पराभव झाला यात आश्चर्य वाटण्याजोगे काहीच नव्हते. अर्थात त्या पक्षाचा झाला इतका दारुण पराभव होईल, असे मात्र कुणाला वाटले नव्हते.

त्या पराभवामुळे जनता पक्षाच्या नेत्यांनी शहाणे व्हायला हवे होते आणि आपापसातले मतभेद मिटवून टाकायला हवे होते, पक्षाच्या पुनर्बांधणीचे कार्य संघटितपणे पुन्हा हाती घ्यायला हवे होते. त्याऐवजी आपल्या पराभवाचे खापर रा. स्व. संघाच्या माथ्यावर फोडण्याचा मार्ग त्यांनी स्वीकारला. 'रा. स्व. संघाने जनता पक्षाचे काम केले नाही म्हणून आमचा पराभव झाला,' असे जगजीवनराम म्हणाले. इंदिरा काँग्रेस यशस्वी व्हावी म्हणून संघाने प्रयत्न केले, असा आरोप करण्यापर्यंत त्यांची मजल गेली. ही मोठी विचित्र परिस्थिती होती– संघ कार्यकर्त्यांनी जनता पक्षासाठी काम केले तर ते वर्चस्व गाजवू पाहतात, असा त्यांच्यावर आरोप करण्यात येत होता आणि जर त्यांनी जनता पक्षासाठी काम केले नाही तर त्यांच्यावर घातपाताचा आरोप केला जात होता.

श्री. बाळासाहेब देवरस यांनी स्थितप्रज्ञ वृत्तीने परिस्थितीचे मूल्यमापन केले. ते म्हणाले, "जनतेने स्थैर्यासाठी आणि केन्द्रस्थानी समर्थ अशा सरकारसाठी मतदान केले आहे, हे स्पष्ट झाले आहे." जनता पक्षाचे काही नेते संघाला बळीचा बकरा बनवू पाहात होते, तिकडे त्यांचे लक्ष वेधले असता ते म्हणाले, "विजयाचे पितृत्व आपल्याकडे घ्यायला अनेकजण तयार असतात, पराभव मात्र अनाथ असतो." त्यांनी हे देखील स्पष्ट केले की १९७७ साली संपूर्ण देशात आणीबाणीची अत्यंत असाधारण परिस्थिती होती तेव्हाचा एकमेव अपवाद वगळता रा. स्व. संघाने कधीही निवडणुकीत भाग घेतला नव्हता. अर्थात स्वयंसेवक वैयक्तिकरीत्या आपापल्या पसंतीच्या उमेदवारांना आणि चळवळींना पाठिंबा देण्याइतके स्वतंत्र होते.

लंडनच्या 'दि टाइम्स'ने या बाबतीत लिहिताना म्हटले होते की, "रा. स्व. संघाच्या लोकांनी निवडणूक मोहिमेत सक्रीय भाग न

घेतल्यामुळे जनता पक्षाचा दारूण पराभव झाला, असे बोलले जात आहे." अनेक लोक या कारणमीमांसेशी सहमत होते. इतर काही जणांना मात्र असे वाटत होते की, त्या पराभवामुळे रा. स्व. संघ हा फक्त कागदी वाघ असल्याचे स्पष्ट झाले आहे. या बाबतीत श्री. बाळासाहेब देवरस म्हणाले, "जेव्हा आणीबाणी जाहीर करण्यात आली आणि रा. स्व. संघावर बंदी घालण्यात आली तेव्हा त्याची कोणतीही तावडतोब प्रतिक्रिया उमटली नाही की विरोधही झाला नाही. त्यावेळीदेखील रा. स्व. संघ हा कागदी वाघ आहे, अशीच समजूत अनेकांनी करून घेतली होती. पण त्या लोकांना अल्पावधीतच संघाविषयीचे आपले मत बदलावे लागले होते. आपण वाघ असल्याचा आव– मग तो कोणत्याही प्रकारचा असो– संघाने कधीही आणला नाही. संघाच्या वर्णनासाठी एखादे प्राण्याचे प्रतीकच हवे असेल तर गाय हे योग्य प्रतीक ठरेल. गाय ही अगदी कमालीची शांत असते; सहसा ती रागावत नाही. पण तिला सतत सतावणाऱ्यांना बाजूला सारण्यासाठी तिला चांगली शिंगेदेखील असतात.

या प्रकरणातली वस्तुस्थिती अशी होती की, जनता पक्षाच्या उमेदवारांबरोबरचे जुने मैत्रीसंबंध– विशेषतः आणीबाणीच्या काळात वृद्धिंगत झालेले मैत्रीसंबंध– लक्षात घेऊन रा. स्व. संघाच्या अनेक स्वयंसेवकांनी त्या निवडणुकांमध्ये रस घेतला आणि त्या उमेदवारांसाठी काम केलेदेखील. पण त्यांच्यापैकी कित्येकजण जनता पक्षाने मधल्या तीस महिन्यांच्या कालावधीत मधून मधून केलेल्या विनाकारण आगपाखडीमुळे दुखावले गेले होते. जनता पक्ष आणि स्वयंसेवक यांच्यात एक प्रकारचा दुरावा निर्माण झाला होता. उन्हापावसापासून रक्षण करायला उपयोगी पडणारी आणि घरी आल्यावर कुठेतरी कोपऱ्यात धूळ खात ठेवून दिली तरी चालणारी छत्री असते, त्याप्रमाणे अनेक जनता पक्षनेत्यांनी संघस्वयंसेवकांना वागणूक दिली होती. कोणताही राजकीय कार्यकर्ता अशा स्थितीत वावरणे मान्य करणार नाही. साहजिकच संघाच्या कार्यकर्त्यांनी त्या निवडणुकीत मनापासून काम केले

नाही किंवा भागच घेतला नाही, यात आश्चर्य वाटण्याजोगे काही नाही.

रा. स्व. संघ राजकीय पक्षांपासून नेहमीच बाजूला राहिला आहे. कारण त्याची नजर पुढच्या निवडणुकीवर नसून पुढच्या पिढीवर आहे. सत्तेच्या राजकारणात त्याला मुळीच रस नाही. भारताच्या एकात्मतेबद्दल आणि अखंडतेबद्दल, भारताच्या सामर्थ्याबद्दल आणि समृद्धीबद्दल मात्र संघाला अपरंपार आस्था आहे. आणि म्हणूनच १९७७ सालच्या निवडणुका झाल्यावर राष्ट्रीय सामंजस्य निर्माण करण्याच्या उद्देशानेच संघाने 'झाले गेले विसरून जाऊ या, चुकलेल्यांना क्षमा करू या,' अशी भूमिका घेतली होती, इतरांनीही तशीच भूमिका घ्यावी असा आग्रह धरला होता. आणि १९८० मधील निवडणुका झाल्यानंतरदेखील नव्या सरकारला आपली पूर्ण मुदत शांतपणे कार्य करता यावे अशी जी इच्छा श्री. बाळासाहेब देवरस यांनी व्यक्त केली होती, तिच्यामागेही हीच दृष्टी होती.

दि. १२ फेब्रुवारी १९८० रोजी अहमदाबाद येथे झालेल्या पत्रकारपरिषदेत बाळासाहेबांना असा प्रश्न विचारण्यात आला होता की, 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि श्रीमती गांधी यांच्यात सहकार्य होण्याची काही शक्यता आहे काय?' त्यावर ते उत्तरले होते, "होय, तशी बरीच शक्यता आहे. देशहितासाठी काम करणाऱ्या प्रत्येकाबरोबर आम्ही सहकार्य करू शकतो." १९४७-४८ मध्ये काश्मीरवरील आक्रमणाच्या वेळी तसेच १९६२, १९६५ आणि १९७१ मध्ये झालेल्या युद्धांच्या वेळी आणि अलीकडेच उद्‌भवलेल्या आंध्रमधील वादळ किंवा मोरवीतील पूर यांसारख्या नैसर्गिक संकटांच्या वेळी मदत-पुनर्वसन कार्यात संघाने सरकारला कशी आणि किती मदत केली होती, हेदेखील त्यांनी सांगितले.

रा. स्व. संघाची ही बिगरराजकीय आणि निःपक्षपाती भूमिका समजावून घेऊन तिचे कौतुक करण्याऐवजी काही लोकांना यात 'संघ-इंदिरा काँग्रेस यांच्या गुप्त सहकार्याचा' वास आला. काही जनतापक्षीय नेत्यांनी संघावरचे हल्ले अधिक धारदार करण्याचा निर्धार केला,

संघाशी कोणत्याही प्रकारे संबंध ठेवू नये, असे आपल्या कार्यकर्त्यांना ते सांगू लागले. अशा परिस्थितीत संघाच्या सरकार्यवाहांनी दि. २१ मार्च १९८० रोजी अखिल भारतीय कार्यकारी मंडळाच्या भरलेल्या बैठकीत सारे संदर्भ स्पष्ट करून सांगितले आणि दि. २४ जुलै १९७९ रोजी केलेले निवेदन कोणत्या भावनेने केलेले होते तेदेखील पुन्हा एकदा स्पष्ट केले. विचारविनिमय करून राष्ट्रीय कार्यकारी मंडळाने असे ठरवले की त्या संदर्भात काहीही करण्याची गरज नाही. दि. २३ मार्च १९८० रोजी हा मुद्दा अखिल भारतीय प्रतिनिधीसभेपुढे विचारार्थ ठेवण्यात आला आणि तेथेही कार्यकारी मंडळाच्या निर्णयाशी पूर्ण सहमतीच व्यक्त करण्यात आली. 'दुहेरी सदस्यत्वा'चा वाद निदान रा. स्व. संघापुरता तरी संपुष्टात आला होता. जनता पक्ष मात्र वाटेल तितका वेळ तो वाद उराशी कवटाळू शकत होता. त्याच्याशी संघाला काहीच देणेघेणे नव्हते.

दि. १२ फेब्रुवारी रोजी त्या पत्रकारपरिषदेत एका पत्रकाराने बाळासाहेबांना विचारले, "जनता पक्ष आता गतप्राण होईल काय ?" त्यावर त्यांनी सांगितले की, "जनता पक्ष चालवायची जबाबदारी आमची नाही. ती जबाबदारी जनता पक्षाच्या नेत्यांची आहे. ते जर आपापसात भांडायलाच उत्सुक असले तर दुसरे कुणी काय करू शकणार ?"

'रा. स्व. संघ राजकारणात का पदार्पण करीत नाही ?' असा प्रश्न वारंवार विचारला जातो. हा प्रश्न विचारण्यामागचा हेतू चांगला असला तरी राजकारणाचे स्वरूप आणि संघाची ध्येयधोरणे यांच्यातील फरकाकडे दुर्लक्ष करूनच तो विचारला जातो. पाणी आणि तेल कधी एकमेकांत मिसळले जात नाही तसेच संघाचे आणि राजकारणाचे आहे. काही वर्षांपूर्वी 'रा. स्व. संघ हा एक राजकीय पक्ष आहे' असे जाहीर करण्याची धमकी काँग्रेस सरकारकडून दिली जात होती, तेव्हा राजस्थान जनसंघाचे नेते भैरोसिंग राज्य विधानसभेत म्हणाले होते, "तुम्ही खरोखरच तसे जाहीर कराल, अशी मी आशा करतो." त्यावर त्या वेळचे मुख्यमंत्री श्री. सुखाडिया म्हणाले होते, "नाही, आम्ही तशी

चूक कधीही करणार नाही," त्यांच्या म्हणण्याचा गर्भितार्थ स्पष्ट होता. जर संघाने खरोखरच आपले सध्याचे काम सोडून राजकारण करायचे ठरवले तर सत्ताधारी पक्षाला ते खरोखरच महागात पडेल. पण एखाद्या सरकारला मदत करणे किंवा अडचणीत आणणे हे संघाचे कधीच उद्दिष्ट नव्हते. संघ मग्न आहे तो एका निराळ्याच उदात्त कार्यात. राष्ट्र-उभारणीच्या आणि चारित्र्यसंवर्धनाच्या दुहेरी कार्यात संघ गुंतलेला आहे. हे कार्य जर त्याने सोडून दिले तर संघाची आधारशिलाच ढासळून पडेल. आणि मग अल्पावधीतच इतर राजकीय पक्षांसारखा तोही उतरणीला लागेल. बायबलमध्ये असे एक वचन आहे की, "you are the salt of the earth; but if the salt loseth its savour, wherewith shall it be salted ?" मिठाने आपली चव गमावली तर जसे चालायचे नाही, तसेच रा. स्व. संघाचे आहे.

जनतामधील जनसंघीय लोकांबद्दल लोकांची मते चांगली होती. ते चांगले वागले, कार्यक्षम रीतीने त्यांनी कारभार केला, याबाबत सर्वांचे एकमत होते का ? तसे झाले कारण त्यांच्यावर संघाचे संस्कार होते. आणि संस्कार हे नेहमी राजकारणाहून अधिक महत्त्वाचे असतात. काँग्रेस संघटना बरीच वर्षे वाढत गेली, फोफावली ती गांधीजींनी त्या संघटनेला दिलेल्या नैतिक दिशेमुळे ! आणि जनसंघाची माणसे इतर पक्षीयांपेक्षा चांगली वागत असतील तर ती संघाबरोबरच्या संबंधांतून त्यांच्या वागण्याला जे नैतिक वळण मिळाले त्यामुळे !

नेहरू एकदा म्हणाले होते की, 'संघ प्रत्येक गोष्टीवर आणि प्रत्येक व्यक्तीवर आपला प्रभाव पाडण्याच्या प्रयत्नात आहे.' त्यानंतर थोड्याच काळाने मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री श्री. रविशंकर शुक्ला यांची श्रीगुरूजींशी भेट झाली. शुक्लाजी हे रायपूरमध्ये संघाची शपथ सर्वात प्रथम घेणारे स्वयंसेवक होते. त्यांनी गुरुजींना विचारले, "प्रत्येकावर प्रभाव पाडण्याचा तुम्ही प्रयत्न करीत आहात, हे खरे का ?" श्रीगुरुजी हसले आणि म्हणाले, "हो, बरेचसे खरे आहे. मी तुमच्यावरही प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करीत आहेच." मग दोघेही मनसोक्त हसले.

आपल्या कृतीने आणि उक्तीने संघ खरोखरच सर्वांवर आणि

सर्वत्र आपली छाप पाडण्याचा प्रयत्न करीत आहे. फक्त राजकारणावर— जनतापक्षीय राजकारणावरच नव्हे तर सर्वच क्षेत्रांवर ! एखाद्या लोकशाही समाजात प्रत्येक संघटना हाच प्रयत्न करीत असते. फक्त त्या संघटनांमध्ये एकच फरक असतो— काही संघटना आपल्या ध्येयवादाच्या अधिक आकर्षक स्वरूपामुळे इतरांपेक्षा अधिक यशस्वी होत असतात आणि संघ तसा यशस्वी झाला आहे !

## प्रकरण अकरावे :
## दंगली... वस्तुस्थिती... न्यायालये...

कुठेही, केव्हाही दंगल झाली की, राजकारणी लोकांचा एक विशिष्ट गट मागचापुढचा विचार करीत न बसता तावडतोब रा. स्व. संघावर त्या दंगलीची जबाबदारी टाकून मोकळा होत असतो. वस्तुस्थिती मात्र अशी आहे की, संघविरोधकांच्या हातात प्रशासन असूनही रा. स्व. संघाचा एकही माणूस आजपर्यंत अशा स्वरूपाच्या कोणत्याही आरोपाला पात्र ठरलेला नाही, एकाही स्वयंसेवकावर तसा आरोप सिद्ध होऊ शकलेला नाही.

१९४७ मध्ये जे काही घडले ते तर दंगलींहूनही अधिक भयंकर होते. भारतीय राज्य जनतेच्या संमतीशिवाय, तिच्या इच्छेविरुद्ध खंडित करण्यात आले होते. त्यात भरीस भर म्हणून लॉर्ड माउंटबॅटननी एखादा केक कापावा तशा थाटात ती फाळणी काही आठवड्यांतच झटपट उरकली होती. एखाद्या मोठ्या शस्त्रक्रियेत जसा बराच रक्तस्राव अपरिहार्य असतो, तसाच तो त्या परिस्थितीतही होता. त्या वेळी हिंदू-समुदाय विरुद्ध मुसलमान समुदाय असेच चित्र दिसत होते. एक संघटना दुसऱ्या संघटनेविरुद्ध झगडते आहे, असे दिसत नव्हते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा एक संघटना म्हणून त्या दंगलींशी काहीच संबंध नव्हता. उलट, व्यक्तिगतरीत्या, अनेक स्वयंसेवकांनी संकटात सापडलेल्या मुसलमानांना त्यावेळी वाचवले होते.

तामिळनाडू सरकारचे माजी आर्थिक सल्लागार डॉ. बी. नटराजन

१९४७ साली दिल्लीत होते. त्यांनी त्या कालखंडाविषयी लिहून ठेवले आहे की, " माझ्याकडे एक मुसलमान नोकर होता. तो शांत, सुस्वभावी आणि कष्टाळू होता. त्याला वाचवण्यासाठी आम्ही त्याला एका हिंदू नावाने हाका मारीत असू. पण आमची ही युक्तीही फसली. तो मुसलमान आहे, हे लपून राहिले नाही आणि त्याच्या जिवाला धोका उत्पन्न झाला. एक दिवस माझे मित्र असणारे रा. स्व. संघाचे एक नेते माझ्याकडे आले आणि हिंदू नावाचा असला तरी असा मुसलमान नोकर घरात ठेवणे किती धोक्याचे आहे ते मला सांगू लागले. पण सगळ्यात मन हेलावणारी गोष्ट म्हणजे त्यांनीच त्या नोकराचे रक्षण करायची हमी घेतली. एक दिवस ते लष्करी गणवेशात जीप घेऊन माझ्याकडे आले आणि त्यांनी त्याला जीपमधून उत्तर प्रदेशातल्या त्याच्या गावी नेऊन त्याला सोडले. त्या मुसलमानाचे प्राण माझ्या संघातल्या मित्रांनी अशा रीतीने वाचवले होते. मानवी दयाबुद्धीचा झरा धार्मिक संकुचितपणाच्या सीमा ओलांडून वाहात जाताना मला पाहायला मिळाला होता."

दि. ९ सप्टेंबर १९४७ रोजी दिल्लीत जेव्हा मोठी हिंसाचाराची लाट उसळली तेव्हा दिल्लीचे तत्कालीन संघकार्यवाह आणि सध्याचे संघचालक श्री. प्रकाशदत्त भार्गव यांनी दि. ११ सप्टेंबर रोजी एक निवेदन प्रसिद्ध केले होते. " पश्चिम पंजाबमध्ये हिंदूंवर– त्यात शीखही आलेच– चाललेल्या अत्याचारांची आणि इथल्या मुसलमानांनी जमा केलेल्या बेकायदेशीर शस्त्रास्त्रांच्या साठ्यांची प्रतिक्रिया म्हणून सध्या दिल्लीत अशांतता माजली आहे. दिल्ली प्रशासनाने कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी केलेल्या उपाययोजनांना मुसलमानांनी केलेल्या विरोधामुळे वातावरण अधिकच बिघडले होते. तथापि आता परिस्थिती बरीच सुधारली आहे आणि आमची अशी खात्री आहे की सर्व बेकायदेशीर शस्त्रास्त्रे सरकार जप्त करील आणि निरपराध लोकांविरुद्ध ती शस्त्रास्त्रे वापरली जाण्याची शक्यताच शिल्लक ठेवणार नाही. हिंदूंनी आपल्या मनाचा समतोल ढळू देऊ नये, असे आमचे त्यांना आवाहन आहे. कारण ही अशांतता निर्वासितांना मदत पोचवण्याच्या किंवा त्यांच्या

पुनर्वसनाच्या कार्यात अडथळे निर्माण करते. ते काम आज सर्वाधिक महत्त्वाचे आहे आणि ते जर कार्यक्षम रीतीने पार पाडायचे असेल तर परिस्थिती सुरळीतच असायला हवी. रा. स्व. संघाच्या प्रतिनिधींनी या संदर्भात शुक्रवारी महात्मा गांधी, सरदार पटेल आणि डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांची भेट घेतली आणि आपले विचार त्यांच्या कानांवर घातले.

१९४७ सालच्या हिंसाचाराच्या आणि रक्तपाताच्या पार्श्वभूमीवर सरकारने अवघा एक खटला दाखल केला होता. उत्तर प्रदेशातल्या मुझफ्फरनगर जिल्ह्यामधल्या कांडला गावच्या काही संघ कार्यकर्त्यांवर तो भरण्यात आला होता. त्या खटल्याचा निकाल ऑक्टोबर १९४८ मध्ये म्हणजे संघावरची बंदी कायम असताना लागला. न्यायमूर्तींनी सर्व आरोपींना निर्दोष ठरवून सन्मानपूर्वक मुक्त केले होते. १९४७ च्या दंगलींमधला रा. स्व. संघाचा सहभाग हा असा आणि एवढाच होता.

त्यानंतर पुढे कित्येक वर्षांनी दि. ८ मे १९७५ रोजी तत्कालीन गृहमंत्री श्री. ब्रह्मानंद रेड्डी यांनी राज्यसभेत असे सांगितले होते की, हिंसाचारी कृत्यांमध्ये भाग घेतल्याबद्दल अनेक खटल्यांमध्ये साम्यवादी पक्षाचे कार्यकर्ते दोषी ठरले असले तरी रा. स्व. संघ मात्र एकाही प्रकरणात दोषी ठरलेला नाही.

स्वतंत्र भारतात गेल्या काही वर्षांच्या कालावधीत अनेक दंगली झाल्या. त्यापैकी जबलपूर, जमशेदपूर, रांची आणि अहमदाबाद येथे झालेल्या दंगलींचे स्वरूप विशेष गंभीर होते. या दंगलींची चौकशी करण्यासाठी जे आयोग नेमण्यात आले होते त्यापैकी एकाही आयोगाने रा. स्व. संघावर ठपका ठेवला नाही. रांचीमधील दंगलींची चौकशी करणाऱ्या त्रिसदस्य आयोगावर एक सदस्य हिंदू तर दुसरा मुसलमान आणि तिसरा ख्रिश्चन होता, हे मुद्दाम लक्षात घेण्यासारखे आहे. तेल्लीचेरी दंगलीबद्दलच्या अहवालात असे म्हटले होते की काँग्रेस, जनसंघ आणि साम्यवादी यांच्यासह सर्व पक्ष जातीय आधारावर विभागले गेले होते आणि सर्वांनीच दंगलीत भाग घेतला होता. भिवंडीमधील दंगलीत आयोगाने शिवसेनेवर ठपका ठेवला होता पण त्या

संघटनेबरोबरची मैत्री सत्ताधारी पक्षाने पुढे चालूच ठेवली. राष्ट्रीय एकात्मता समितीला गृहखात्याकडून मे १९६९ मध्ये असे कळवण्यात आले होते की, '१९६८ चे पूर्ण वर्ष आणि १९६९ मधील पहिले तीन महिने एवढ्या पंधरा महिन्यांच्या कालावधीत देशात झालेल्या एकूण २३ दंगलींपैकी २२ दंगली मुसलमानांनी सुरू केल्याचे निष्पन्न झाले आहे.' ए. आर. शेरवानी यांनी म्हटल्याप्रमाणे या दंगलींमुळे मुसलमानांपेक्षा हिंदूंचेच जास्त नुकसान होते, असेही म्हणता येईल.

१९७० साली काही ज्येष्ठ संपादकांबरोबरच्या वार्तालापात त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत असताना श्री गुरुजींनी या विषयाची नीट मांडणी केली होती. ते म्हणाले होते, "भारतात हिंदू-मुसलमानांमध्ये जो तणाव असलेला दिसतो त्याचे मुख्य कारण म्हणजे भारतीय मुसलमान अजूनही भारताबरोबर, इथल्या लोकांबरोबर, इथल्या संस्कृतीबरोबर पूर्णार्थाने तादात्म्य पावलेले नाहीत. हा देश माझा आहे, इथले सारे लोक माझे बांधव आहेत असे प्रत्येक भारतीय मुसलमानाला वाटायला लागले तर हा प्रश्न अस्तित्वातच राहाणार नाही. त्यांची मानसिक ठेवण बदलण्याचीच काय ती गरज आहे. रा. स्व. संघाचा नेता जेथे जेथे जातो, तेथेतेथे दंगल माजते, असे काहीजण म्हणतात. आमचा तर देशभर सततच प्रवास चालू असतो. तेव्हा त्या लोकांच्या म्हणण्यात जर थोडेफार तथ्य असते तर एव्हाना संपूर्ण देशच आगीच्या भक्ष्यस्थानी पडायला हवा होता. गेल्या दोन महिन्यांतच मी दिल्लीला सहा वेळा भेट दिली आहे, त्याअर्थी दिल्लीत सहा दंगली व्हायला हव्या होत्या... या तथाकथित जबाबदार लोकांकडून जी बेजबाबदार वक्तव्ये केली जातात, ती ऐकून मी खरोखरच थक्क होतो."

"मुसलमान लोकसंख्या असणारे बरेच देश आहेत, पण दंगली मात्र फक्त भारतातच होतात", असे एक संपादक महाशय म्हणताच श्रीगुरुजी म्हणाले, "नाही, वस्तुस्थिती तशी नाही. रशियात मुस्लीम समस्या आहे, चीनमध्येही मुस्लीम समस्या आहे आणि बाल्कन राष्ट्रांनाही त्या समस्येने सतावले आहे. सुमारे तीस वर्षांपूर्वी सिकियांगमध्ये चिनी लोक आणि मुसलमान लोक यांच्यात खूप मोठी दंगल झाल्याचे मला

अजून स्मरते. तो सारा प्रकार मुसलमानांकडून सुरू केला गेला आणि मग चिन्यांनी त्याला रोखठोक प्रत्युत्तर दिले, असे म्हटले गेले. जवळजवळ दहा लाख लोक त्यावेळी मरण पावले होते. अगदी गेल्या आठवड्यातदेखील सिकियांगमध्ये बराच मोठा तणाव निर्माण झाल्याच्या बातम्या होत्या. माझे म्हणणे अगदी सरळ, साधे आहे. जर इराणी मुसलमान रुस्तुमसारख्या मुसलमान नसणाऱ्या व्यक्तीकडे राष्ट्रपुरुष म्हणून पाहू शकतात तर भारतीय मुसलमान रामाला आदर्श का मानू शकत नाहीत ? जेथे इंडोनेशियातले मुसलमान रामाची भक्ती करू शकतात, तेथे भारतीय मुसलमानांना मात्र ते का शक्य होऊ नये ?"

हाच मुद्दा अधिक स्पष्ट करताना श्रीगुरुजी म्हणाले होते, " मुसलमानांनी हे लक्षात घ्यायलाच हवे की आपण सारे एक आहोत, आपल्या सर्वांच्या धमन्यांमधून वाहाणारे रक्त एकसारखेच आहे. ते अरब नव्हेत तसेच तुर्की किंवा मंगोलही नव्हेत. ते फक्त भारतीय बाटगे आहेत. या देशाची फाळणी करणे मुसलमानांमुळे भाग पडले म्हणून हिंदू लोक मुसलमानांकडे संशयी नजरेने पाहतात. आजही भारतात 'पाकिस्तान झिंदाबाद' अशा घोषणा देणारे मुसलमान आहेत. याउलट 'भारतमाता की जय' असे उच्च स्वरात म्हणणारे किती बरे मुसलमान आहेत ! पाकिस्तानी संघाने भारतीय संघावर विजय मिळवला, अशी बातमी ऐकून कितीतरी भारतीय मुसलमान आपल्या रेडिओला हार घालतात, हे मला माहीत आहे."

दुसऱ्या एका संपादकांनी प्रश्न विचारला की, "तुम्हाला जे हिंदूंचे वर्चस्व हवे आहे ते मिळवण्यासाठी घटनादुरुस्ती करावी, असे तुम्हाला वाटते का ?" त्यावर श्री गुरुजी म्हणाले, " हिंदूंचे वर्चस्व आजही आहेच. लोकशाही यंत्रणेत ते तसे होणारच. मला हवा आहे तो आरोग्यसंपन्न समाज आणि त्यासाठी घटनादुरुस्ती करण्याची मुळीच गरज नाही. सर्वांना समान अधिकार देते ती खरी राज्यघटना. आणि हिंदू माणूस हा तर जन्मतःच सर्वधर्मसमभाव राखणारा असतो. परमेश्वराच्या प्राप्तीचे अनेक मार्ग असू शकतात, हे सत्य त्याने स्वीकारलेले असते. उलट सर्व बिगरमुसलमान नरकात जातील, अशी मुसलमान

माणसाची धारणा असते." त्यावर कुणीतरी म्हणाले की, मौलाना आझादांनी इस्लामचा नवा, आधुनिक अन्वयार्थ लावला आहे. त्यावर श्री गुरुजींनी विचारले, "पण किती मुसलमानांनी आझादांचे अनुयायित्व पत्करले आहे ? सर्वधर्मसमभावी हिंदू हा नियम आहे आणि जातीय, धर्माग्रही हिंदू हा अपवाद आहे. उलट मुसलमानांमध्ये धर्माग्रही मुसलमान हा नियम आहे आणि सेक्युलर मुसलमान हा अपवाद ! हाच फरक महत्त्वाचा आहे."

आणखी एक संपादक म्हणाले, "मुसलमान पाकिस्तानकडे पाहात बसतात, म्हणून तुम्ही त्यांचा धिःक्कार करता. पण चीन आणि रशियाकडे डोळे लावून बसलेले अनेक हिंदूदेखील आपल्या देशात आहेत." त्यावर लगेच श्री गुरुजी उत्तरले, "मी त्यांचाही तितकाच कडक निषेध करतो, तीव्र धिक्कार करतो."

पुढचा प्रश्न होता, "पण आपण काय करू शकतो ? हा प्रश्न आपण कसा काय सोडवू शकू ? या देशात चांगले सहा कोटी मुसलमान आहेत." त्याला उत्तर देताना श्री गुरुजी म्हणाले, "हा देश आणि या देशाची प्राचीन संस्कृती आपली मानून भारतीय मुसलमानच हा प्रश्न सोडवू शकतील आणि त्यांनीच तो तसा सोडवायला हवा. भारतीय इतिहास महंमद गझनीपासून सुरू झालेला नाही, हे त्यांनी लक्षात घ्यायलाच हवे."

श्री गुरुजींना आणखी एक असा प्रश्न विचारण्यात आला की, "तुम्ही फक्त हिंदूबद्दलच का बोलता ? हिंदुस्थानी लोकांबद्दल का बोलत नाही ? तुमच्या कार्यात तुम्ही मुसलमानांना का बरे सामावून घेत नाही ?" श्री गुरुजी म्हणाले, "महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली हिंदू माणूस हा जवळजवळ हिंदुस्तानीच झाला होता. त्याला मुसलमानांकडून प्रतिसाद मिळाला का ? मुसलमान हिंदुस्तानी झाले का ? उलट मौलाना महंमद अलींसारख्यांनी तर असे म्हणण्यापर्यंत मजल गाठली की महात्मा गांधींसारख्या एखाद्या सर्वोत्कृष्ट हिंदू माणसापेक्षाही एखादा निकृष्ट मुसलमानच अधिक श्रेष्ठ आहे ! केवळ मुसलमानांची एकगठ्ठा मते आपल्याला मिळावीत म्हणून बहुतेक सर्व

राजकीय पक्ष मुसलमानांना त्यांचा विभक्तवाद कायम ठेवण्यास सतत प्रोत्साहन देत असतात. त्यांना हिंदुस्तानी बनवण्याचा का तो मार्ग आहे ? आपण इतिहासाचे पुनर्लेखन करण्याच्या प्रयत्नात न पडता इतिहास नीट वाचून, त्यातले धडे गिरवायला हवेत. आपल्या इतिहासाला सामोरे जाण्याइतके आपण प्रौढ झालेच पाहिजे."

"हिंदू जर संघटित झाले तर मुसलमानदेखील संघटित होणार नाहीत काय ?" या प्रश्नाला उत्तर देताना श्री गुरुजींनी सांगितले, "मुसलमान सध्यादेखील खूप संघटित आहेत !"

शेवटचा प्रश्न होता, "या देशाशी आणि इथल्या संस्कृतीशी समरस होण्याची शिकवण मुसलमानांना देणार कोण ?" त्यावर श्री गुरुजी उत्तरले, "तुम्ही–आम्ही–सर्वांनीच ते काम करायला हवे."

इकडे मध्यंतरीच्या काळात भारतात काही ठिकाणी वेळोवेळी जातीय दंगली उद्भवत होत्याच. काय बरे कारण होते त्यांच्या मुळाशी ?

या सगळ्याच्या मुळाशी आहे इतिहास. मुसलमानाला असे वाटते की, आपण शूर आहोत, पूर्वी आपण भारत जिंकलेला आहे आणि पुन्हा आपण भारतावर राज्य गाजवू शकू. मध्य आशियातून जे मुसलमान आक्रमक आले त्यांचा वारसा सांगणाऱ्या या भारतीय मुसलमानांबद्दल हिंदूंच्या मनात साहजिकच एक प्रकारची अढी आहे, तिरस्काराची भावना आहे.

खिलाफतीचा काँग्रेसने केलेला पुरस्कार सपशेल अपयशी ठरला. त्यामुळे मुस्लीम मनातल्या दुराग्रहाला मात्र खतपाणी घातले गेले. त्यामुळे जे विषारी जातीय वातावरण निर्माण झाले त्याचाच परिणाम म्हणून शौकतअलींसारख्या मुसलमान नेत्याने हिंदू-मुसलमान प्रश्न कायमचा सोडवण्याकरता पानिपतची चौथी लढाई व्हावी, अशी इच्छा प्रदर्शित केली आणि अगदी मवाळ स्वभावाच्या मालवीयजींनादेखील दोन्ही जमातींमधल्या कायमच्या कटकटीपेक्षा तसे निर्णायक युद्ध बरे ठरेल, असे वाटले.

ब्रिटिश राजवट सुरू होईपर्यंत मुसलमान केवळ राज्यकर्ते म्हणूनच आघाडीवर नव्हते, तर संपन्न सरदार आणि जमीनदारदेखील

म्हणून त्यांचा दबदबा होता. हिंदू माणसे आपली बाबूगिरी करीत, व्यापारउदीम बघत आणि अध्ययन-अध्यापनाची परंपरा राखत. ब्रिटिशांच्या राजवटीत हिंदूंनी हळूहळू मुसलमान जमीनदारांकडून जमीनखरेदी आरंभली. पुढे जमीनदारी नाहीशी करणारा आदेश निघाला त्यावेळी हिंदू जमीनदारांपेक्षा मुस्लीम जमीनदारच जास्त असल्यामुळे त्या प्रमाणात नुकसानही त्यांचेच जास्त झाले. याच सुमारास युद्धतंत्रात आधुनिक बदल होत गेले, जुन्या पद्धतीची हातघाईची लढाई कालबाह्य ठरू लागली. नव्या परिस्थितीत शारीरिक सामर्थ्य कमी असणारा पण भरपूर जिद्द बाळगणारा हिंदू माणूस भावनाप्रधान मुसलमानापेक्षा अधिक चांगल्या पद्धतीने रायफल चालवायला शिकला.

आणि या सगळ्यात भरीस भर म्हणून लोकशाही राज्यपद्धतीने प्रत्येक माणसाला एकेक मत दिले. जेव्हा एखाद्याचे डोके उडवून सरकार बदलवता येत असे किंवा नवे राज्य स्थापता येत असे, तेव्हा मुसलमान आघाडीवर होते. आता बदललेल्या परिस्थितीत कुणाच्या बाजूला किती डोकी आहेत हे पाहून सरकारे स्थापन केली जाऊ लागली. या बाबतीत हिंदू बरेच पुढे गेले. शिवाय मध्यंतरीच्या काळात हिंदूंनी आपली शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रगती चालूच ठेवली होती. काळाबरोबर ते पुढे जात राहिले होते. साहजिकच मुसलमान नव्या परिस्थितीमुळे खंतावले आहेत, पण परिस्थितीचे स्वरूप समजावून घेण्याचा ते प्रयत्नच करीत नाहीत. लोकशाही आणि समाजवाद या संकल्पनांच्या आणि त्या संकल्पना प्रत्यक्षात उतरवू पाहाणाऱ्या यंत्रणांच्या बरोबर विरुद्ध आपण उभे आहोत, हे समजून घेण्याचा त्यांच्याकडून प्रयत्न केला जात नाही. ते फक्त हिंदूंकडे पाहातात आणि आपल्या सर्व समस्यांचे खापर हिंदूंच्या माथी मारून मोकळे होतात.

एवढ्यात एखादा हितसंबंधी हिंदू राजकीय नेता येतो आणि मुसलमानांना सांगू लागतो की त्यांच्या या परिस्थितीला खरा जबाबदार तो हिंदू समाजच आहे. परिणामी मुसलमानांचा तो (गैर) समज पक्का होतो. तेवढ्यात एखादा अरब राजनैतिक अधिकारी भारतातल्या मुसलमानांच्या कत्तलींबद्दल गंभीर चिंता व्यक्त करतो, वातावरण

पेटवून चालता होतो.

लखनौहून प्रसिद्ध होणाऱ्या 'कौमी आवाज' या नेहरू घराण्याच्या उर्दू दैनिकाचे संपादक श्री. हयात अन्सारी यांनी दि. १३ जुलै १९६८ रोजी लिहिलेल्या एका लेखात म्हटले होते, "नद-ए-मिल्लतकडून काँग्रेसवर, भारतावर आणि हिंदूंवर विखारी टीका करण्याचे आणि तसे करीत असतानाच मुसलमानांमध्ये निराशा आणि वैफल्य निर्माण करण्याचे जे धोरण अंगिकारले आहे ते निव्वळ फसवे आणि निरर्थक आहे. ते धोरण अनुसरीत असताना मुसलमानांना भडकावून देणे आणि आपणच खरे मुसलमानांचे हितचिंतक असून त्यांच्याबद्दल सहानुभूती बाळगून आहोत असे भासवणे हे अगदी सोपे आहे. हे धोरण भारतातल्या सर्व मुसलमान वृत्तपत्रांनी एखाद्या चलनी नाण्याप्रमाणे अवलंबले आहे. एखाद्या तीक्ष्ण पात्याच्या सुरीप्रमाणे धोकादायक असणारे हे धोरण त्या वृत्तपत्रांतून वेळोवेळी प्रसिद्ध होणाऱ्या लेखनातून प्रतिबिंबित होत असते. त्यांचे वाचक ते वाचत जातात आणि तसल्या लेखनाची प्रशंसाही करीत राहातात. हे लेखन सर्वार्थाने चुकीचे आहे, असे सांगू शकणारे वाचक फारच थोडे आहेत. ही आहे सध्याची स्थिती."

अशी स्थिती असल्यामुळेच इंदिरा सरकारमध्ये काही काळ कायदामंत्री असणाऱ्या युनुस सलीमसारख्या नेत्यांनासुद्धा '१९४८ सालच्या हैद्राबादेतल्या पोलीस कारवाईत एक लाख मुसलमानांना ठार मारण्यात आले होते.' हे अतिरंजित खोटे विधान खरे वाटू लागते. 'शाबिस्तान' नावाच्या एका उर्दू साप्ताहिकाला मे १९६९ मध्ये दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी मुसलमानांच्या दृष्टीने काँग्रेस पक्ष कसा व किती उपयुक्त आहे, याबाबत जे मतप्रदर्शन केले होते ते पाहाण्यासारखे होते. ते म्हणाले होते, "फक्त मुसलमानच काँग्रेस पक्ष वाचवू शकतील, असा माझा विश्वास आहे." काँग्रेसचे तत्त्वज्ञान मुसलमानांनी मान्य केलेले नाही, हे कबूल करून त्यांनी मुसलमानांची काँग्रेसबरोबरची युती 'संधिसाधू' असल्याचे म्हटले होते. 'प्रवाशांचे एखाद्या आगगाडीबरोबरचे जसे नाते असते तसेच आमचे काँग्रेसबरोबरचे नाते

आहे', असेही त्यांनी स्पष्ट केले होते.

पण ही आगगाडी त्यांना कुठेच घेऊन जाऊ शकत नाही, हीच तर खरी मुख्य अडचण आहे. कारण सोपे आहे. भारत सरकार– मग त्याचे राजकीय स्वरूप कसेही असो, ते काँग्रेसी असो किंवा साम्यवादी असो, समाजवादी असो किंवा जनसंघी असो– कायम हिंदूच असणार, ही वस्तुस्थिती मुसलमानांनी समजावून घेतली पाहिजे आणि ती मान्यही केली पाहिजे. हमीद दलवाई असे नेहमी सांगत असत. कोणतेही भारतीय सरकार एका विशिष्ट मर्यादेबाहेर जाऊन मुसलमानांची मदत करू शकणार नाही. तशी मदत ते करू पाहील तर हिंदू लोकमत त्याच्याविरुद्धच जाईल आणि तसे होऊ देणे लोकशाहीत कोणत्याही सरकारला परवडणारे नाही. आणि म्हणूनच 'ऑर्गनायझर'पेक्षाही 'दि टाइम्स ऑफ इंडिया' आपल्यावर अधिक कडक टीका करतो' किंवा 'जनसंघाइतकेच जयप्रकाशजीही उर्दूच्या विरुद्ध आहेत' हे लक्षात येताच मुस्लीम वृत्तपत्रे संभ्रमित होतात. आपण जनसंघाविरुद्ध किंवा जे. पीं.विरुद्ध लढत नसून लोकशाहीच्या आणि समाजवादाच्या प्रभावाविरुद्ध लढतो आहोत, हे त्यांच्या लक्षातच येत नाही.

आणि हिंदू लोक असे पाहातात की, 'इस्लाम खतरे में है' असे १९४७ साली ओरडत सुटलेले लोकच आज 'सेक्युलॅरिझम धोक्यात असल्याच्या' आरोळ्या ठोकीत आहेत. साहजिकच त्या आरोळ्यांचा त्यांच्यावर काहीच प्रभाव पडत नाही.

गमतीची गोष्ट अशी की, काही राजकीय हितसंबंधीयांचे गट सगळ्या आणि कुठल्याही हिंसाचाराबद्दल रा. स्व. संघावर टीका करीत असतानाच इतर काही गट संघ-कार्यकर्त्यांवर खरोखरच हल्ले चढवीत आले आहेत. गांधीजींचा खून झाल्यावर काँग्रेसमधल्या लोकांनी आणि समाजवाद्यांनी दक्षिण महाराष्ट्रातल्या ब्राह्मणांविरुद्ध आणि त्यातल्या त्यात संघ कार्यकर्त्यांविरुद्ध मोठ्या प्रमाणावर हिंसाचाराचे सत्र आरंभले होते. १९४८ मध्ये संघावर बंदी घातली जाण्यापूर्वी आणि नंतर समाजवादी लोक आणि त्यांचे राष्ट्रसेवादल संघकार्यकर्त्यांवर हल्ले चढवण्यात चांगलेच आघाडीवर होते. जे. ए. करन यांच्या शब्दांत सांगावयाचे

झाले तर 'राष्ट्रसेवादलाबरोबर चकमकी उडू नयेत, त्या टाळल्या जाव्यात म्हणून संघाने कितीही यशस्वी प्रयत्न केले तरी समाजवादी पक्षाचे सामान्य कार्यकर्ते संघकार्यात अडथळे आणण्यास बरेच उत्सुक असत."

दि. ३ डिसेंबर १९६७ रोजी आंध्र प्रदेशातल्या कर्नूल येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एका संचलनावर काही मुसलमानांनी हल्ला केला. त्या संचलनासाठी पोलीस उपायुक्त श्री. सत्तार यांची रीतसर लेखी परवानगी घेण्यात आलेली होती. तरी तसा हल्ला केला गेला. त्याबद्दल योग्य ती तक्रार नोंदवण्यात आली. भारतीय दंडविधानाच्या १४७, १४८, ३२३, ३२४ आणि ३४१ या कलमांखाली कर्नूल गावच्या दहा मुसलमानांवर खटला भरण्यात आला. बेकायदेशीररीत्या एकत्र जमून रा. स्व. संघाच्या स्थानिक कार्यकर्त्यांचे कायदेशीर संचलन उधळून लावण्यासाठी दंगल माजवण्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. कर्नूलच्या प्रमुख मुन्सिफ मॅजिस्ट्रेटनी त्यांपैकी ५ आरोपी दोषी असल्याचा निकाल दिला आणि ८० ते २०० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. तो दंड भरला गेला नाही तर तीन ते सहा आठवडे सक्त-मजुरीच्या शिक्षेचीदेखील तरतूद करण्यात आली होती.

फिर्यादी पक्षातर्फे असे सांगण्यात आले की अत्यंत संयमाने आणि शांतपणे चाललेले रा. स्व. संघाचे संचलन एकूण तीन वेळा– प्रत्येक वेळी एकेका मशिदीसमोर– उधळून लावण्याचा प्रयत्न झाला. आरोपीं-पैकी काहीजणांनी 'पाकिस्तान झिंदाबाद' आणि 'काफिरोंको मारो' अशा घोषणा दिल्या. रा. स्व. संघाच्या संचलनातील वाद्यवृंदाने वाजव-लेल्या संगीतामुळे मशिदींसमोर गोंधळ माजला, हा बचाव पक्षाचा युक्तिवाद न्यायमूर्तींनी फेटाळून लावला. वाद्ये वाजवणे आणि तीदेखील मशिदींत प्रार्थना म्हटल्या जात नसताना वाजवणे हा काही गुन्हा ठरत नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले. शिवाय वाद्ये न वाजवण्याबाबत उभय पक्षात कोणताही समझोता झालेला नव्हता आणि एरवीदेखील वाद्ये वाजवण्याच्या अधिकारावर निर्बंध घालता येणार नाहीत, असेही ते म्हणाले. संघाचे स्वयंसेवक लाठ्या घेऊन जात असल्यामुळे ते संचलन

बेकायदेशीर होते, हा बचाव पक्षाचा दुसरा युक्तिवाददेखील न्यायमूर्तींनी फेटाळून लावला. 'दंड हा संघाच्या गणवेषाचाच एक भाग असल्यामुळे आणि ते बेकायदेशीर हत्यार नसल्यामुळे तो युक्तिवाद मान्य करता येणार नाही ', असे ते म्हणाले.

फेब्रुवारी १९६८ मध्ये तेलंगणात काही साम्यवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी संघकार्यकर्त्यांवर हल्ला केला. नालगोंडा जिल्ह्यातल्या थोंडा गावात आजूबाजूच्या पाच गावांमधले सुमारे २०० संघकार्यकर्ते एकत्र जमले होते. प्रार्थना म्हणून झाल्यावर जेव्हा बहुतेक स्वयंसेवक आपापल्या घरी निघून गेले आणि फक्त पंधराजण चर्चा करीत मागे राहिले, तेव्हा २५० लोकांनी त्यांच्यावर लाठ्यांसह हल्ला केला. त्यानंतर जिल्हा प्रचारकांसह पाच जणांना रुग्णालयात दाखल करावे लागले. आंध्रचे विभागीय प्रचारक श्री. सोमय्या यांनाही मार बसला. दोनच दिवसांनी दुसऱ्या एका खेडेगावात २०० लोकांनी ५० स्वयंसेवकांवर हल्ला केला. चार स्वयंसेवकांची हाडे मोडली. पोलिसांनी १८ लोकांना अटक केली, ते सर्व डावे साम्यवादी होते. त्या पक्षाच्या एका आमदाराविरुद्धही अटकेचे वॉरंट काढण्यात आले, पण तो फरारी झाला. रा. स्व. संघाचे नेते या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांना भेटले तेव्हा त्यांनी पूर्ण संरक्षण देण्याचे आश्वासन दिले. साम्यवाद्यांच्या त्या जुन्या बालेकिल्ल्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी चार नवी पोलीस ठाणी स्थापन करण्यात आली.

दि. १९ एप्रिल १९७० रोजी म्हैसूरमधल्या चामराजनगरमध्ये पोलिसांच्या परवानगीने निघालेल्या संघकार्यकर्त्यांच्या संचलनावर चाकू-सुरे घेतलेल्या ३०० मुसलमानांनी हल्ला केला. कडकपारा येथील मशिदीत एकत्र जमलेल्या या हल्लेखोरांनी संचलन एका सार्वजनिक सभेच्या ठिकाणी जाऊन पोचण्यापूर्वी अगदी थोडा वेळ तो हल्ला चढवला होता. स्वसंरक्षणासाठी सुमारे चाळीस मिनिटे लढा दिल्यानंतर संघकार्यकर्ते तेथून पुढे सरकले, पण पुन्हा त्यांच्या रस्त्यात लाकडी ओंडके टाकून अडथळे निर्माण केल्याचे आढळले. या प्रकाराच्या निषेधार्थ

संपूर्ण शहरात हरताळ पाळण्यात आला.

दि. ५ जून १९७४ रोजी ओरिसातल्या कलाहंदी येथे एका सभागृहात श्री. बाळासाहेब देवरस यांचे भाषण होणार होते. त्यांच्या स्वागतासाठी सभागृहाबाहेर उभ्या असणाऱ्या संघस्वयंसेवकांवर युवक काँग्रेसच्या गुंडांनी हल्ला केला. उत्कल प्रांत प्रचारक पालढीकर यांच्यावर हल्ला करण्यात आला, काही छायाचित्रांची नासधूस केली गेली. घटनास्थळी पोलीस आल्यावर मात्र हल्लेखोर पळून गेले.

मंगलोर येथील 'दिव्यवाणी' या कानडी दैनिकाचे संपादक आणि रा. स्व. संघाचे कार्यकर्ते श्री. राघवेन्द्र नागोरी यांच्यावर दिनांक २ सप्टेंबर १९७७ रोजी त्यांच्या कार्यालयात हल्ला करण्यात आला. त्यांना भोसकून ठार करण्यात आले. पूर्वी त्यांना 'मिसा'खाली स्थानबद्ध करण्यात आले होतेच.

आणीबाणी उठवण्यात आल्यावर केरळमध्ये मार्क्सवाद्यांनी अनेक संघकार्यकर्त्यांचे –त्यापैकी बरेचजण हरिजन होते– खून केले. केरळमधील तेल्लीचेरीचे श्री. एम. व्ही. राजगोपालन आणि पाँडिचेरीमधील माहेचे श्री. के. व्ही. राघवन या दोघा मार्क्सवादी आमदारांसह अन्य दहा मार्क्सवाद्यांना दि. २५ जुलै १९८० रोजी जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली. तेल्लीचेरीचे जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. ए. अँटनी यांनी त्या सर्वांना दि. २ नोव्हेंबर १९७८ रोजी पन्न्यनूर (तेल्लीचेरी) येथील के. रवींद्रन नावाच्या संघकार्यकर्त्याचा खून केल्याच्या आरोपाखाली दोषी मानले होते.

एकीकडे संघकार्यकर्त्यांवर असे हल्ले चढवले जात असताना दुसरीकडे संघ मात्र आपल्या परीने दंगली आटोक्यात ठेवण्याचा आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत राहिला आहे. दि. ९ जून १९६८ रोजी नागपूर येथे बुद्धजयंतीनिमित्त निघालेल्या मिरवणुकीवर दगडफेक झाल्यानंतर मुसलमान आणि नवबौद्ध यांच्यामध्ये फार मोठी दंगल उसळली होती. किमान २९ जण मृत्युमुखी पडले होते. त्यावेळी संघनेते श्री. बच्छीराज व्यास आणि श्री. सुंदरलाल राय यांनी यशस्वीपणे मध्यस्थी केली होती. भारतीय जनसंघाच्या स्थानिक कार्यालयातच

सर्वपक्षीय शांतता समितीची बैठक भरली होती. शांतता-प्रस्थापनाच्या कामात संघाने दिलेल्या मदतीबद्दल स्थानिक लोकांनी संघाला हार्दिक धन्यवाद दिले होते.

मे १९६९ मध्ये लखनौत शिया-सुन्नी दंगल उसळली होती. इमामवाडे उद्ध्वस्त करण्यात आले होते, तेराजण मृत्युमुखी पडले होते. त्यावेळी शिया मुसलमानांनी संघाकडे संरक्षण मागितले होते आणि ते दिले गेले होते. शिया नेते मौलाना अली नासिर सैयद यांच्या-सह श्री. नानाजी देशमुख यांनी शहराचा दौरा केला होता आणि त्या दोघांनीही संयुक्त पत्रकारपरिषदेतच शांतता व न्याय प्रस्थापित कर-ण्याचे आवाहन केले होते.

सरकार मात्र रा. स्व. संघाची बदनामी करूनच थांबत नाही, ते सरकारी नोकरीमधील संघकार्यकर्त्यांना सतत या ना त्या कारणावरून त्रास देत राहिले आहे. अर्थात त्याला प्रत्येक वेळी माघार घेणे भाग पडले आहे कारण एका पाठोपाठ एकेक उच्च न्यायालयांनी सरकारच्या मनमानी कृतीला अवैध ठरवणारे निर्णय घोषित केले आहेत.

बऱ्याच वर्षांपूर्वी म्हणजे १९५५ साली मध्यभारत उच्च न्याया-लयाचे न्यायमूर्ती श्री. व्ही. आर. नेवासकर आणि श्री. एस. एम. संवत्सर यांनी मंदसौर येथील शेतकी खात्यातले कारकून श्री. किशन-लाल सेठी यांना ते रा. स्व. संघाचे सदस्य आहेत म्हणून कामावरून काढून टाकण्याचा सरकारचा निर्णय अवैध असल्याचे जाहीर केले होते. (१९५४ सालचा दिवाणी संकीर्ण दावा क्र. ७) १९५५ सालीच रा. स्व. संघाचे, भारतीय जनसंघाचे आणि गोहत्या-निरोध समितीचे कार्य-कर्ते श्री. सीताराम किशोरपुरिया यांना प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्या-खाली अटक करण्यात आली होती. 'देशाच्या फाळणीला आणि भार-तात चालू राहिलेल्या गोहत्येला पंतप्रधान जबाबदार आहेत,' असे विधान केल्याबद्दल त्यांना अटक करण्यात आली होती. पण पाटणा उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. सहाय आणि श्री. मिश्रा यांनी त्यांच्या सुटकेचा आदेश दिला होता.

रा. स्व. संघाचे कार्यकर्ते आणि पाटण्याहून प्रसिद्ध होणाऱ्या

'सावधान'चे संपादक श्री. प्रभाकर शर्मा यांनी १९५५ साली गोरक्षणाचे समर्थन करणारा एक कडक लेख लिहिला होता. खालच्या न्यायालयाने त्यांना त्या लेखाबद्दल ३ महिने सक्तमजुरीची आणि ५०० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली होती. पण पाटणा उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नकवी इमाम यांनी त्यांना निर्दोष मुक्त केले. न्यायमूर्तींनी निकालपत्रात म्हटले होते की, "आपल्या देशासारख्या लोकशाहीप्रधान देशात थोडेफार भाषणस्वातंत्र्य आवश्यकच आहे. सरकारव्यतिरिक्त शासकीय अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकारांचा अतिरेक केला आहे, असे जर लेखकाचे मत झाले असेल तर ते व्यक्त करण्याचा त्याला पूर्ण अधिकार आहे. आणि जर ते मत व्यक्त करीत असताना त्यांनी थोडे मर्यादा उल्लंघन केले असेल तर त्यावर भर देण्यापेक्षा शीर्षकासह एकंदर लेख साधारणतः कोणता ठसा उमटवतो हे पाहायला हवे. त्यामुळे या लेखात कुठेही राजद्रोह आढळत नाही, असे मला वाटते."

पाटण्याच्या 'सर्चलाईट'ने दिनांक १० मार्च रोजी लिहिलेल्या 'न्यायाची प्रतिष्ठापना' शीर्षकाच्या लेखात म्हटले होते, "जर या प्रकरणातल्या आरोपीने अपील केले नसते तर जनतेच्या नजरेत सरकारची प्रतिष्ठा खचितच खालावली असती. न्यायमूर्ती इमाम यांनी आता ती प्रतिष्ठाच वाचवली आहे. त्या वादग्रस्त लेखात जनरल डायर आणि जालियनवाला बाग याबद्दलचे केलेले उल्लेख सरकारला टोचलेबोचले असले तरी ती तशी तुलना म्हणजे लेखकाचे मत होते.'

श्री. भास्कर गोविंद केदार हे मध्यप्रांत आणि वऱ्हाडच्या अकौंटंट जनरलच्या नागपूरमधील कार्यालयात यूडीसी म्हणून १९४४ पासून काम करीत होते. १९४८ पासून त्यांना नोकरीत कायम करण्यात आले होते. त्यांना 'रा. स्व. संघाशी संबंध ठेवल्यामुळे' १९६० साली सक्तीने निवृत्त करण्यात आले. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. कोतवाल आणि श्री. अभ्यंकर यांनी तो निवृत्तीचा आदेश रद्द केला.

श्री. चिंतामण नूरगावकर हे १९५७ पासून पुण्यात पोस्टल क्लार्क म्हणून काम करीत होते. घातपाती कारवाया करीत असल्याच्या आरोपावरून त्यांना १९६१ साली नोकरीवरून कमी करण्यात आले.

त्यांच्या विरुद्धच्या तक्रारी खालीलप्रमाणे होत्या :

१) नागपूरच्या टिळक पुतळ्याजवळील पोस्ट ऑफिसातील सब-पोस्टमास्तर पूर्वीपासूनच रा. स्व. संघाशी संबंध ठेवून आहेत आणि त्या संघटनेच्या कार्यक्रमात ते भाग घेत आले आहेत.

२) दिनांक १७ नोव्हेंबर १९५७ रोजी रा. स्व. संघातर्फे नागपूरच्या 'स्टारकी पॉइंट'ला नेण्यात आलेल्या सहलीत ते सामील झाले होते.

३) दि. १४ जानेवारी १९६० रोजी नागपूरच्या मोहिते मैदानावर रा. स्व. संघातर्फे साजऱ्या झालेल्या संक्रांती महोत्सवात त्यांनी भाग घेतला होता.

४) त्यांनी रा. स्व. संघाच्या नागपूरमधील कार्यालयाला दि. २३ जानेवारी १९६० रोजी भेट दिली होती.

(अशाच कारणांस्तव श्री. काशीनाथ दिडोलकर यांनादेखील नोकरीवरून दूर करण्यात आले होते.) या संदर्भातल्या दाव्याचा निकाल देताना मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. अभ्यंकर आणि श्री. पालेकर यांनी दिलेल्या संयुक्त निकालपत्रात (१९६२ चा खास दिवाणी दावा क्र. ६२) असे म्हटले होते की, "राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही काही बेकायदेशीर संघटना असल्याचे घोषित करण्यात आलेले नाही. शिवाय रा. स्व. संघाचे असे कोणते कार्यक्रम आहेत की ज्या कार्यक्रमांत सहभागी होणे किंवा ज्यांच्याशी संबंध ठेवणे हे घातपाती कारवायांत भाग घेतल्यासारखे ठरते, हेदेखील आरोपात स्पष्ट करण्यात आलेले नाही." निकालपत्रात पुढे म्हटले होते, "चिंतामणने दि. १७ नोव्हेंबर १९५७ रोजी रा. स्व. संघाच्या स्टारकी पॉइंटला गेलेल्या सहलीत भाग घेतला होता, अशी दुसरी तक्रार होती. या बाबतीत देखील त्या सहलीचा उद्देश कोणता होता, त्या सहलीत भाग घेण्यामुळे किंवा स्टारकी पॉइंटला नुसती भेट देण्यामुळे घातपाती कारवायांत भाग घेतल्यासारखे का ठरत होते, याबद्दल कोणताही खुलासा देण्यात आलेला नाही. चित्तामणविरुद्धचा तिसरा मुद्दा असा की त्याने दि. १४ जानेवारी १९६० रोजी नागपूरच्या मोहिते मैदानावर रा. स्व. संघातर्फे साजऱ्या

झालेल्या संक्रांती महोत्सवात भाग घेतला होता. खरे पाहिले तर साधारणत: प्रत्येक हिंदू माणूस हा सण साजरा करीत असतो किंवा त्यात भाग घेत असतोच. हिंदूमध्ये साजऱ्या केल्या जाणाऱ्या अनेक सणांपैकी हा उत्सव सगळ्यात जास्तीत जास्त सेक्युलर आहे, त्यात इतर जमातींचे लोकही सहभागी होत असतात, हेही सर्वांना माहीत आहे. म्हणूनच अशा अगदी निरुपद्रवी सामाजिक समारंभात सहभागी होणे कसे काय समाजविरोधी ठरवले जाऊ शकते, हे समजणे खरोखरच कठीण आहे. शेवटचा मुद्दा म्हणजे चिंतामणने दि. २३ जानेवारी १९६० रोजी नागपूरमधील रा. स्व. संघाच्या कार्यालयाला भेट दिली होती. एखाद्या संघटनेच्या कार्यालयाला केवळ भेट दिली म्हणून समाजविरोधी कारवायांमध्ये तो माणूस सहभागी होत असल्याचे अनुमान कसे काय काढले जाऊ शकते, हेच आम्हाला समजू शकत नाही." दोन्ही दावे सर्व खर्चासह मान्य करण्यात आले होते.

श्री. जयकिशोर मेहरोत्रा हे एम. कॉम. झालेले गृहस्थ उत्तर प्रदेशामधील अकौंटंट जनरलच्या कार्यालयात १९५३ पासून यूडीसी होते. १९५८ मध्ये ते नोकरीत कायम करण्यात आले होते. पण १९६१ मध्ये ते 'रा. स्व. संघाचे पूर्ण कार्यकर्ते असल्याच्या' आधारावर त्यांना नोकरीवरून काढून टाकण्यात आले. तो आदेश अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. एस. एन. द्विवेदी यांनी १९६३ साली रद्द ठरवला. आपल्या निकालपत्रात त्यांनी म्हटले होते, "राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटना स्वतंत्रपणे किंवा इतरांच्या मदतीने समाजविरोधी कारवाया करीत आहे किंवा करीत असल्याचा संशय आहे, असे संपूर्ण आरोपपत्रात कुठेही म्हटलेले नाही. ती बेकायदेशीर संघटना नाही हे उघड आहे. त्यामुळे अर्जदार हा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सदस्य आहे असे जरी गृहीत धरले तरीदेखील केवळ त्या संघटनेचे सदस्य झाल्यामुळे तो समाजविरोधी कारवायांमध्ये स्वतंत्रपणे किंवा इतरांच्या मदतीने गुंतलेला आहे, असे म्हणणे मुळीच योग्य ठरणार नाही. १९५७ ते १९६१ या काळात अर्जदाराने त्या संघटनेच्या ज्या बैठकींमध्ये भाग घेतला त्या बैठकींत अशा समाजविरोधी कारवायांची रूपरेषा ठरवण्यात

आली होती, असेदेखील अर्जदाराविरूद्धच्या आरोपांबद्दलच्या तपशीलात म्हटलेले नाही."

याच्या पाठोपाठ जोधपूरच्या राजस्थान उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. दवे आणि श्री. कानसिंग यांनी असाच एक निकाल दिला. रा. स्व. संघाच्या कार्यक्रमांत भाग घेतल्यावरून श्री. केदारलाल आगरवाल यांना नोकरीवरून काढून टाकण्याचा आदेश रद्द करणारा तो निकाल होता. (घटनेच्या कलम २२६ खाली गुदरण्यात आलेल्या दिवाणी संकीर्ण दावा क्र. ७०३ चा निकाल)

श्री. मनोहर आंबोकर हे नागपूरच्या तार-टपाल खात्यात एल. डी. सी म्हणून १९४५ पासून काम करीत होते. १९६२ मध्ये त्यांना सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आले. कारणे काय तर संघनेते श्री. दत्तोपंत ठेंगडी यांच्या एका सभेला ते उपस्थित होते, गुरुपूजा उत्सवात त्यांनी भाग घेतला होता आणि नागपूरमधील संघकार्यालयात ते गेले होते. पंजाब उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री- एच, आर. खन्ना– पुढे हेच विधी आयोगाचे अध्यक्ष झाले– यांनी तो आदेश रद्द ठरवला. नूरगावकरांच्या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने ज्या आधारावर निकाल दिला होता, त्याच आधारावर खन्ना यांनीही आपला निर्णय दिला होता.

कर्नाटकातल्या रायचूर जिल्ह्यातल्या येलबर्ग्याचे ॲडव्होकेट श्री. रंगनाथाचारी यांची १९६५ साली मुन्सीफ म्हणून निवड झाली होती, पण त्यांची नेमणूक मात्र केली गेली नाही. 'ज्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यक्रम आणि ध्येयधोरणे समाजविरोधी, गुप्त आहेत, सेक्युलॅरिझमविरोधी आहेत त्याचप्रमाणे राज्यघटनेने मान्य केलेल्या भारताच्या फाळणीविरुद्ध आहेत त्या रा. स्व. संघाशी ' संबंध असल्याच्या आधारावर तसे करण्यात आले होते. त्या निर्णयाविरुद्ध न्यायालयात दाद मागण्यात आली तेव्हा अर्जदाराच्या बाजूने निकाल देताना न्यायमूर्ती श्री. सदाशिवय्या व श्री. तुकोल यांनी म्हटले होते, " रा. स्व. संघ ही राजकीय संघटना नसून निव्वळ सांस्कृतिक संघटना आहे, असे अर्जदाराच्या वतीने सांगण्यात आले आहे. आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ

त्याने राज्यसभेत दि. २७ नोव्हेंबर १९६४ रोजी झालेल्या प्रश्नोत्तरांची प्रत सादर केली आहे. त्यावेळी गृहखात्याच्या राज्यमंत्री श्री. हाथी यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना असे सांगितले होते की, निवडणूक आयुक्तांनी आणि लोकसभेच्या सभापतींनी निवडणुकांमध्ये भाग घेणाऱ्या ज्या राजकीय पक्षांच्या याद्या तयार केल्या आहेत आणि ज्या पक्षांमध्ये सरकारी नोकरांनी भाग घ्यायला प्रतिबंध करण्यात आला आहे त्यामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा समावेश नाही. अर्जदाराच्या वकिलांनी असेदेखील सांगितले आहे की, रा. स्व. संघाच्या कार्यक्रमांमध्ये गुप्त असे काहीही नाही, हिंदू संस्कृतीचे संवर्धन करणे हाच या संघटनेचा एकमेव हेतू आहे, ही संघटना मुळीच राजकीय स्वरूपाची नाही आणि बिगर-हिंदू संघटनांबद्दल ही संघटना कोणत्याही प्रकारचा दुस्वास बाळगत नाही. संघाच्या घटनेतील चौथ्या कलमामध्ये असे स्पष्टपणे म्हटले आहे की, संघाला कोणतेही राजकारण करावयाचे नसून पूर्णपणे सांस्कृतिक कार्यातच गुंतवून घ्यायचे आहे. कलम ४ (ब) नुसार स्वयंसेवकांना हिंसक आणि गुप्त पद्धती अनुसरणाऱ्या कोणत्याही राजकीय पक्षात सहभागी व्हायला मज्जाव करण्यात आलेला आहे, त्याचप्रमाणे अशा पक्षांच्या अनुयायांना किंवा अशा पद्धतींवर विश्वास ठेवणाऱ्यांना संघात थारा दिला जाणार नाही, असेही स्पष्टपणे म्हटले आहे, इकडे आमचे लक्ष वेधण्यात आले आहे. त्याचप्रमाणे आम्हाला हे मुद्दाम दाखवून देण्यात आले आहे की, राष्ट्रीय ध्वजाशी एकनिष्ठ राहाणे, त्याचा योग्य तो मान राखणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असल्याचे संघाच्या घटनेतील पाचव्या कलमात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. संघाच्या लिखित घटनेत घोषित करण्यात आलेली ध्येयधोरणे लक्षात घेता 'रा. स्व. संघाची धोरणे समाजविरोधी, गुप्त आणि सेक्युलॅरिझमविरोधी आहेत' या प्रतिप्रतिज्ञापत्रकात (counter affidavit) करण्यात आलेल्या आरोपात मुळीच तथ्य नाही, असे आम्हाला वाटते."

प्रतिवादीतर्फे केरळमधल्या एका प्रकरणाचा उल्लेख करण्यात आला होता. त्या प्रकरणात यशस्वी ठरलेला उमेदवार साम्यवादी असल्याचे उघडकीस आले होते. या बाबतीत न्यायमूर्तींनी इंग्लंडमधील

प्री. व्ही. कौन्सिलच्या सदस्यांच्या एका परिषदेचा वृत्तांत तपासून पाहिला. साम्यवादी तत्त्वज्ञानावरचा विश्वास अनेक वेळा माणसाच्या सर्वसाधारण राष्ट्रनिष्ठेवर मात करतो, साम्यवादी पक्षाला किंवा वेळप्रसंगी साम्यवादी असणाऱ्या एखाद्या परक्या देशालादेखील गुप्त माहिती पुरवणे समर्थनीय आहे, असे वाटू लागते. त्या न्यायमूर्तींचा असा निष्कर्ष होता की, जेथे राज्याबद्दलची निष्ठा अत्यंत महत्त्वाची आहे अशा एखाद्या ठिकाणी एखाद्या निष्ठावंत साम्यवाद्याला नेमणे अयोग्य आहे असे जर सरकारने ठरवले असेल तर तो निर्णय बदलायला लावून त्या साम्यवाद्याची त्या जागी नेमणूक करायला शासनाला भाग पाडण्याची न्यायालयीन कृती मुळीच समर्थनीय ठरणार नाही. शिवाय, केरळमधील त्या प्रकरणाचा सर्व तपशील ज्या फाइलीमध्ये होता ती फाइलही न्यायमूर्तींसमोर ठेवण्यात आली. सरकारचा त्या प्रकरणातील निर्णय असंबंधित विचारांनी प्रेरित झालेला नव्हता, याबाबत न्यायमूर्तींनी आपली खात्री करून घेतली.

"आमच्यासमोर आलेल्या पुराव्यावरून केरळमधील प्रकरणात त्या साम्यवाद्याविरुद्ध घेण्यात आलेल्या हरकतीसारखी हरकत या अर्जदाराच्या बाबतीत घेता येईल, असे आम्हाला वाटत नाही. अर्जदाराच्या चारित्र्यात एखादा दोष आहे किंवा त्याने कधी गैरवर्तन केले आहे, असेदेखील दाखवण्यात आलेले नाही." असे स्पष्टपणे नोंदवून न्यायमूर्तींनी निकालपत्रात पुढे म्हटले होते, "यापूर्वी जे सांगितले गेले आहे, त्यावरून हे स्पष्ट आहे की, अर्जदार मुन्सीफाच्या जागेवर नेमणूक होण्यास अपात्र आहे हे सरकारचे मत अर्जदार रा. स्व. संघाचा सदस्य आहे, त्याने आपल्या गावात त्या संघटनेची शाखा काढण्यात पुढाकार घेतला होता, वगैरे गोष्टींवर आधारलेले असून त्या गोष्टींचा नेमणुकीच्या प्रश्नाशी अर्थाअर्थी कोणताही संबंध नाही. संबंधित नसलेल्या गोष्टींच्या आधारे बनवलेले मत म्हणजे सरकारची मनमानी असून ती या न्यायालयाला मान्य करता येणे शक्य नाही."

नंतर दि. ३१ ऑगस्ट १९६६ रोजी त्या दोन्ही न्यायमूर्तींनी राज्य सरकारला या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाकडे अपील करण्याची

परवानगीदेखील नाकारली.

श्री. रामफल हे पंजाबमधल्या जिंद येथे ट्रेझरी क्लार्क म्हणून काम करीत होते. रा. स्व. संघाच्या एका सभेला हजर राहिल्याबद्दल त्यांना अचानक नोकरीवरून काढून टाकण्यात आले. पंजाब उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. पी. डी शर्मा यांनी तो सरकारी आदेश रद्द ठरवला. केदारलाल आगरवाल यांच्या प्रकरणी निकाल देताना राजस्थान उच्च न्यायालयाने जी कारणमीमांसा केली होती तीच न्यायमूर्ती शर्मा यांनीदेखील आपल्या निकालपत्रात नमूद केली. त्यांनी लिहिले, " प्रतिवादी क्र. ३ ने आरोपपत्रात असे स्पष्टपणे नमूद करायला हवे होते की, रा. स्व. संघ ही एक राजकीय संघटना आहे. अर्जदाराचे रा. स्व. संघाचे सदस्यत्व म्हणजे अधिनियमांतील क्र. २२ च्या नियमाखाली शिक्षापात्र अशा राजकीय चळवळीतला सहभाग आहे किंवा त्या चळवळीला मदत करण्यासारखे आहे, हा निष्कर्ष काढण्यासाठी प्रतिवादीने जो पुरावा ग्राह्य धरला तोदेखील अर्जदारासमोर ठेवला जाणे आवश्यक होते."

गुजराथमधील तलाजा येथील दिवाणी न्यायालयातील एक क्लार्क श्री. डी. बी. गोएल यांना ते रा. स्व. संघाचे कार्यकर्ते आहेत, या आरोपावरून अचानक १९६७ साली कामावरून कमी करण्यात आले. त्या प्रकरणी दिलेल्या निकालपत्रात गुजराथ उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. ए. डी. देसाई आणि श्री. एस. एच. शेठ यांनी म्हटले होते, " जोपर्यंत अधिनियम ३०(१)(i) च्या तरतुदीनुसार रा. स्व. संघ ही एक राजकीय संघटना असल्याचे सिद्ध होत नाही तोपर्यंत त्या नियमावर बोट ठेवून अर्जदाराचे वर्तन आक्षेपार्ह मानण्यात काही अर्थ नाही. संघ ही राजकीय संघटना आहे की नाही हे त्या संघटनेचे नियम, ध्येय-धोरणे आणि कार्यक्रम तपासूनच ठरवावे लागेल. इन्क्वायरी ऑफिसर आणि कॉम्पीटंट ऑफिसर या दोघांपैकी कुणासमोरही तशी तपासणी करण्याइतपत पुरावा आलाच नाही, त्यामुळे तशी तपासणी त्यांनी केली नाही. म्हणूनच आमच्या मते या प्रकरणात सादर करण्यात आलेल्या पुराव्यावरून तरी रा. स्व. संघ ही राजकीय संघटना असल्याचे सिद्ध होत नाही."

श्री. रेवत प्रकाश पांडे या उत्तर प्रदेशातल्या सहाय्यक शिक्षकांना त्यांच्या रा. स्व. संघाबरोबर असलेल्या संबंधांमुळे कामावरून काढून टाकण्याचा सरकारी आदेश अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. एस. एन. द्विवेदी आणि श्री. एच. सी. पी. त्रिपाठी यांनी दि. १९ जानेवारी १९७४ रोजी रद्द ठरवला.

श्री. के. दक्षिणामूर्ती यांच्या प्रकरणात मद्रास उच्च न्यायालयाने म्हटले होते, "अर्जदाराच्या विरुद्धचा आरोप असा आहे की या संबंधित पत्रामुळे त्यांच्या अंतर्मनाचा कल– एका विशिष्ट राजकीय पक्षाकडे त्याचे झुकणे– समजू शकते आहे. एखादा विशिष्ट पक्ष आपल्या देशावर चांगल्या रीतीने राज्य करण्यास सर्वांत जास्त पात्र आहे असा विचार करण्यास किंवा मनात आणण्यास सरकारी सनदी नोकरांना मज्जाव करणारा कोणताही नियम आम्हाला ठाऊक नाही. लोकशाही रचनेत असा नियम असणे शक्यच नाही. कारण निवडणुकीमध्ये तो नोकर आपल्या अंतर्मनातील विश्वासाप्रमाणेच आपला मतदानाचा अधिकार बजावू शकतो. राजकीय मते असण्याचे स्वातंत्र्य हा कोणत्याही लोकशाही राज्यात नागरिकाचा मूलभूत अधिकारच आहे. राज्याच्या सनदी नोकरालादेखील ते स्वातंत्र्य उपभोगण्याचा अधिकार आहे. फक्त शासकीय नोकर म्हणून त्याचे खास स्थान व जबाबदारी लक्षात घेता त्याने आपली राजकीय मते व्यक्त करण्यावर मात्र निर्बंध घालण्यात आलेले आहेत. सरकारचा एकनिष्ठ सेवक या नात्याने कर्तव्य बजावण्यात, अधिकृत कामे पार पाडण्यात कोणतीही कसूर होऊ नये– किंवा त्याच्यासारखा सार्वजनिक स्थानावर बसण्याचा फायदा ज्यांना मिळालेला नाही त्यांच्यापेक्षा त्याच्या मतांचा प्रभाव अधिक पडू नये, हा एवढाच त्या निर्बंधामागचा हेतू आहे. वर्तनाबद्दलचा उपरोल्लेखित नियम हा या तत्त्वावरच आधारलेला आहे. जोपर्यंत एखाद्या सरकारी नोकराच्या मनात असणारी एखाद्या विशिष्ट राजकीय पक्षाबद्दलची आत्मीयता आक्षेपार्ह रीतीने व्यक्त केली जात नाही तोपर्यंत तशी आस्था बाळगण्यापासून त्या नोकराला परावृत्त करू शकेल, असा कोणताही निर्बंध कामकाजविषयक नियमांत समाविष्ट करण्यात आलेला नाही, हे आम्ही

पुन्हा एकदा सांगू इच्छितो."

त्या आधी सरकारनेतर श्रीगुरुजींवरही खटला भरण्याचा प्रयत्न करून पाहिला होता. १९५४ साली दरभंग्याच्या टाऊन हॉलमध्ये केलेल्या एका भाषणाकरता तेथील मुन्सीफ मॅजिस्ट्रेट श्री. के. पी. सिन्हा यांनी गुरुजींना भारतीय दंडविधानाच्या १५३–अ कलमाखाली दोषी ठरवले होते, ५०० रुपये दंडाची आणि दंड न भरल्यास सहा महिने साध्या कैदेची शिक्षा ठोठावली होती. दरभंग्याचे सत्र न्यायाधीश श्री. के. के. दत्त यांनी ती शिक्षा कायम केली. ह्या निर्णयाविरुद्ध पाटणा उच्च न्यायालयात अपील करण्यात आले. दि. २४ नोव्हेंबर १९६१ रोजी न्यायमूर्ती श्री. जी. एन. प्रसाद आणि श्री. यू. एन. सिन्हा यांनी पूर्वीचा निकाल रद्द करून श्रीगुरुजींची निर्दोष मुक्तता केली. त्यांनी निकालपत्रात म्हटले होते, "संपूर्ण भाषण ऐकल्यानंतर वक्त्याचा भारतातल्या वेगवेगळ्या जातीजमातींच्या नागरिकांमध्ये म्हणजेच हिंदू एका बाजूला तर मुसलमान व ख्रिश्चन दुसऱ्या बाजूला अशा गटांमध्ये वैरभाव किंवा द्वेष निर्माण करण्याचा हेतू किंवा त्याचा तसा प्रयत्न होता, असा निष्कर्ष काढणे कठीण आहे, असे आमचे मत झाले आहे."

याप्रकारे अनेक उच्च न्यायालयांनी रा. स्व. संघाच्या कार्यकर्त्यांविरुद्ध सरकारने केलेली कारवाई रद्द ठरवली असली तरीदेखील सरकार आपल्या नोकरांपैकी संघकार्यकर्ते असणाऱ्यांना त्रास देतच राहिले आहे– कारण त्याला हे पूर्णपणे ठाऊक आहे की सर्वजणच काही अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी न्यायालयात जाऊ शकणार नाहीत आणि यदाकदाचित जरी कुणी गेले तरी त्याच्या अर्जाचा निकाल लागेतो बऱ्याच वर्षांचा कालावधी लोटेल !

## प्रकरण बारावे : चांगले कार्य

सामान्य परिस्थितीत संघ दिवसन्दिवस आणि वर्षानुवर्षे शाखेच्या कामातच गढून गेलेला असतो. पण जेव्हा देशावर एखादे संकट कोसळते– मग ते नैसर्गिक असो अगर मानवनिर्मित असो– तेव्हा मदतीसाठी धावून जाण्यात संघ सदैव आघाडीवर असतो.

संघाने हाती घेतलेली पहिली मोठी मदतमोहीम १९४७ सालची होती. त्या वर्षी १५ ऑगस्टपूर्वीपासूनच पाकिस्तानमध्ये समाविष्ट होणार असलेल्या प्रांतांमधून निर्वासितांचे लोंढे येऊ लागले होते. रा. स्व. संघाने हिंदू सहायता समिती स्थापन करून सरकारी मदतकार्य सुरू होण्यापूर्वीच हजारो निर्वासितांना आसरा दिला होता आणि जेवूखाऊ घातले होते. निर्वासितांचे पुनर्वसन करताना मदत करणे सोपे जावे म्हणून त्यांची तपशीलवार शैक्षणिक व इतर माहिती विचारणारी एक प्रश्नावलीदेखील संघातर्फे त्यावेळी प्रसृत करण्यात आली होती.

१९५० साली प्रारंभीच पूर्व पाकिस्तानातून निर्वासितांचे लोंढे येऊ लागले तेव्हा रा. स्व. संघाने 'बास्तुहारा सहायक समिती' स्थापन केली आणि सुमारे ३०,००० निर्वासितांची छावण्यांमधून व्यवस्था केली होती. कलकत्त्यातल्या ५,००० घरांमध्ये भांडी ठेवून दररोज निर्वासितांसाठी मुष्टिदान गोळा करण्याचीही संघातर्फे व्यवस्था करण्यात आली होती.

१९५२ साली रायलसीमा भागात मोठा गंभीर दुष्काळ पडला

तेव्हा संघाने ५६ छावण्या उभारून लोकांना अन्न पुरवण्याची व्यवस्था केली होती. त्या मदतकार्याचे प्रमुख संचालक श्री. अनंतचारी नंतर एकदा त्यावेळचे मद्रास इलाख्याचे मुख्यमंत्री असणाऱ्या राजाजींना भेटले, त्यावेळी त्या दोघांमध्ये मोठा गमतीशीर संवाद झाला.

**राजाजी** : हे हिंदुसभेतर्फे चालवले जाणारे मदतकार्य आहे, नाही का ?

**अनंतचारी** : माफ करा, पण आमचा हिंदुमहासभेशी काहीही संबंध नाही.

**राजाजी** : असं का ? मग तुम्ही हे काम कशासाठी हाती घेतले आहे ?

**अनंतचारी** : कारण आमचे बांधव संकटात आहेत आणि त्यांना मदत करणे आम्हाला शक्य आहे. कोणतेही काम करायला तयार असणारे असंख्य तरुण आमच्याजवळ आहेत, ही आमची जमेची बाजू आहे. आज सुमारे शंभर संघकार्यकर्ते पूर्णवेळ या भागात मदतकार्य करण्यात गुंतले आहेत.

**राजाजी** : अच्छा, म्हणजे त्या कार्यकर्त्यांना कोणत्या ना कोणत्या तरी कामात तुम्ही गुंतवू इच्छीत होतात आणि म्हणून हे काम हाती घेतलेत, असेच ना ?

**अनंतचारी** : नाही, तसे नाही. या कामाशिवाय आमचे नेहमीचे ठरलेले कार्यक्रम आहेतच. तेच खरे आमचे कार्य आहे.

**राजाजी** : तुम्ही कोणते कार्यक्रम अमलात आणता ?

**अनंतचारी** : आम्ही दररोज गटवार कार्यक्रमासाठी भेटतो आणि मधूनमधून प्रशिक्षण शिबिरेही आयोजित करतो.

**राजाजी** : तुम्ही या मुलांना दररोज काय शिकवता ? रसायनशास्त्र ? की बॉंब बनवण्याची विद्या ?

**अनंतचारी** : नाही, तो आमच्याबद्दलचा विकृत पूर्वग्रह आहे.

**राजाजी** : मग तुम्ही तुमच्या दररोजच्या बैठकीत करता तरी

काय ?

**अनंतचारी** : जीवनाबद्दलचा एक सर्वांगीण दृष्टिकोन विकसित व्हावा या हेतूने आम्ही वेगवेगळे शारीरिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करीत असतो.

**राजाजी** : सांस्कृतिक कार्यक्रम ? संस्कृती म्हणजे काय हो ? मला जरा स्पष्ट करून सांगता का ?

**अनंतचारी** : उपनिषदांचे तत्त्वज्ञान ही भारताची मूळ संस्कृती आहे, असे समर्थपणे प्रतिपादन करणाऱ्या व्यक्तीला संस्कृती काय आहे हे स्पष्ट करून सांगणे माझ्या दृष्टीने मुळीच सोपे नाही. (यावर चक्रवर्ती राजगोपालाचारी हसले. कारण ते स्वत: 'The Basic Culture of India : Philosophy of Upanishads' या पुस्तकाचे लेखक होते.)

**राजाजी** : म्हणजे तुम्ही उपनिषदे शिकवता काय ?

**अनंतचारी** : होय. आम्ही उपनिषदांतल्या आणि रामायण-महाभारतातल्या गोष्टी सांगतो, राष्ट्रवीरांच्या पराक्रमाच्या कथा सांगतो. स्वयंसेवकांचे राष्ट्रीय आणि वैयक्तिक चारित्र्य घडवणे आणि ते विकसित करणे हाच आमचा मुख्य हेतू आहे.

**राजाजी** : म्हणजे तुमची संघटना ही आपल्या देशातल्या अनेक राजकीय पक्षांपैकी एक आहे, होय ना ?

**अनंतचारी** : नाही, आमची संघटना म्हणजे राजकीय पक्ष नाही. आम्ही वेगळ्या धर्तीवर काम करतो.

**राजाजी** : तुम्ही कोणत्या राजकीय पक्षाला पाठिंबा देता ?

**अनंतचारी** : कोणत्याही एका विशिष्ट राजकीय पक्षाला आम्ही पाठिंबा देत नाही. पण आम्ही आमच्या संस्कृतीच्या विकासाला पोषक नसणाऱ्या एकाधिकारशाही शक्तींविरुद्ध आहोत. उदारमतवादी लोकशाही शक्तींना आम्ही अनुकूल आहोत.

**राजाजी** : सध्या लोकशाहीच्या नावाखाली काहीही खपून जाते. ते काहीही असो; तुम्ही साम्यवाद्यांच्या विरुद्ध आहात, असाच तुमच्या म्हणण्याचा अर्थ घ्यायचा का ?

**अनंतचारी** : आमची जीवनपद्धती आणि विचारधारा साम्यवादी जीवनपद्धती आणि विचारधारेपेक्षा कमालीची वेगळी आहे, दोघांत दोन ध्रुवांइतके अंतर आहे, हे सगळ्यांना ठाऊक आहे.

**राजाजी** : या भागात तुम्ही पुरेसे शक्तिशाली आहात काय ?

**अनंतचारी** : आमचे आंध्रमधले बळ पुरेसे आहे.

**राजाजी** : हे मदतकार्य तुम्ही खुद्द श्री. गोळवलकरांच्या प्रत्यक्ष सूचनेवरून करीत आहात काय ?

**अनंतचारी** : श्रीगुरुजींच्या संमतीने आंध्रप्रदेश रा. स्व. संघाने हे हाती घेतले आहे.

१९५५ साली पंजाबमध्ये महापुराने थैमान घातले होते. अकालींनी अशी समजूत करून घेतली होती की, आपण केवळ पंजाबी सुभ्याची मागणी करीत आहोत म्हणून पंतप्रधान पंडित नेहरूंनीच मुद्दाम काही बंधारे फोडायला लावले असून संपूर्ण सहा जिल्ह्यांना पुराकरवी संत्रस्त करवले आहे. पण तेथे सैनिकांच्या तुकड्या पोचण्यापूर्वीच संघाच्या कार्यकर्त्यांनी काम सुरू केले होते. कर्नाल जिल्ह्यात फुटलेल्या ११ धरणांची त्यांनी दुरुस्ती केली आणि पानिपतमध्ये पुराचे नियंत्रण करण्यासाठी वाळूची १५००० पोती त्यांनी उपयोगात आणली.

त्याच वर्षी थोड्या कालावधीनंतर तामिळनाडूला एका वादळाने दिलेल्या तडाख्यामुळे एकट्या तंजावर जिल्ह्यात ३०० माणसे ठार झाली होती. रा. स्व. संघाने त्यावेळी तीन दिवस २०० कुटुंबांसाठी अन्नछत्र चालवले आणि सुमारे १५००० कपड्यांचेही वाटप केले.

१९५६ साली कच्छमध्ये अंजार येथे भूकंप झाला. रा. स्व. संघ लगेच मदतीला धावला. काही दिवसांनी थोडे काँग्रेसवाले तेथे आले. भारतीय समाचार दर्शनचा छायाचित्रकार तेथे आल्यावर मात्र त्यांनी

कामात गढून गेल्याचे 'दर्शन' घडवले. अशा रीतीने वागण्याचे कारण त्यांना विचारले असता ते म्हणाले, "आज नाही तर उद्या तुमचे काम लोक विसरून जातील, कारण त्यांची आठवण तशी अल्पजीवी असते, पण ही छायाचित्रे मात्र आमच्या बाजूने कायम बोलत राहातील."

१९७७ साली प्रचंड वादळाने आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीला जबरदस्त तडाखा दिला, त्या वादळात २०,००० माणसे मृत्युमुखी पडली. शेकडो प्रेते सडत, कुजत इतस्ततः विखुरली होती. त्यावेळी केलेल्या मदतकार्यामुळे रा. स्व. संघ त्या भागात इतका लोकप्रिय ठरला होता की साम्यवादी पक्षाच्या स्थानिक शाखेनेदेखील मदत मागू इच्छिणाऱ्या खेडुतांना आपल्याकडे खेचण्यासाठी आपल्या छावणीलाही 'आर. एस. एस.' असेच नाव दिले होते. श्रीमती इंदिरा गांधींनी जेव्हा त्या भागाला भेट दिली तेव्हा फक्त रा. स्व. संघाचे कार्यकर्ते काम करीत असल्याचे पाहून त्यांची मोठी विचित्र परिस्थिती झाली. दि. २७ नोव्हेंवर १९७७ रोजी 'समाचार'ने भवदेवारपल्ली खेडेगावातून पाठवलेली बातमी अशी होती की, "आज श्रीमती इंदिरा गांधी वादळग्रस्तांचे सांत्वन करण्यासाठी इथे आल्या. पण इथे त्यांना जे दृश्य दिसले त्यामुळे त्यांना आणि त्यांच्याबरोबरच्या इतर काँग्रेसनेत्यांना धक्का देणारे ठरले. प्रेते आणि सांगाडे गोळा करून त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्याचे काम फक्त संघाचे स्वयंसेवकच करीत होते. त्या संपूर्ण भागातल्या काँग्रेस सेवादलाचे कुणीही तिथे नव्हते. युवक काँग्रेसच्या एका प्रतिनिधीच्या सांगण्यावरून 'ते सगळे सुरक्षित जागी काम करीत होते.'

मद्रासच्या 'दि हिंदू' या वृत्तपत्राने मदतकार्य करणारे संघकार्यकर्ते हेच खरे मदतमोहिमेमधले नेते आहेत, 'हीरो' आहेत असे म्हटले होते तर आंध्र प्रदेशमधील सर्वोदयी नेते श्री. प्रभाकर इतके भारावून गेले होते की "R. S. S. stands for Ready for Selfless Service" असे उद्‌गार त्यांनी काढले. पुढे रा. स्व. संघाच्या प्रेरणेने वादळग्रस्तांसाठी जेव्हा दीनदयालपुरम् हे आदर्श गाव उभे राहिले तेव्हा आंध्र प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री डॉ. चेन्ना रेड्डी यांनी संघ-

कार्यकर्त्यांच्या निष्ठेची आणि सेवावृत्तीची भरपूर प्रशंसा केली होती.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रशिक्षणाचा लक्षणीय पैलू म्हणजे आता अनेक स्वयंसेवक स्वत: पुढाकार घेऊन वेगवेगळे लहानमोठे लोक-कल्याणकारी प्रकल्प हाती घेऊ लागले आहेत. महात्माजींचे नातू श्री. अरुण गांधी यांनी दि. २ डिसेंबर १९७७ रोजी 'टाइम्स ऑफ इंडिया'त लेख लिहून एक उत्तम उदाहरण लोकांसमोर आणले. त्यांनी लिहिले होते, "सांगली जिल्ह्यातल्या म्हैसाळ गावी एक निळ्या डोळ्यांचा चित्पावन ब्राह्मण हरिजनांमध्ये कार्य करीत आहे. आपण गांधीवादी आहोत, असा त्याचा दावा नाही. उलट महाविद्यालयीन शिक्षण संपल्यावर तो रा. स्व. संघातच दाखल झाला होता. त्र्यंबक महादेव देवल हे म्हैसाळ गावचे जमीनदार. शिक्षण संपल्यावर आपल्या वाड-वडिलार्जित इस्टेटीची देखरेख करण्यासाठी जेव्हा ते आपल्या गावी परतले तेव्हा हरिजनांची गरिबी पाहून त्यांचे हृदय द्रवले. त्यांना मदत हवी होती आणि ती मदत देण्याचे देवलांनी ठरवले. त्यांनी हरिजनांसाठी काम करावे असे गांधीजी म्हणाले होते म्हणून नव्हे तर त्यांचे अंतर्मन त्यांना तसा आदेश देत होते म्हणून !"

श्री. देवल यांनी स्थानिक हरिजनांना जमीन मिळवून देण्यात, घरे बांधण्यात आणि दुग्धव्यवसाय चालवण्यात कसकशी मदत केली, याचे श्री. अरुण गांधी यांनी त्या लेखात अगदी सविस्तर वर्णन केले होते ! श्री. देवल यांच्या प्रयत्नामुळे त्या हरिजनांचे जे उत्पन्न १९६९ साली फक्त ४४,००० रुपये होते ते अवघ्या १४–१५ वर्षांत ४ लाख रुपयांवर जाऊन पोचले आहे. तो भाग विश्वास बसणार नाही इतका बदलून गेला आहे. आपल्या लेखाच्या शेवटी श्री. गांधींनी लिहिले होते, "म्हैसाळ गाव हे महात्मा गांधींचे खरेखुरे स्मारक ठरू शकणार नाही का ? आणि जर गांधीवादी माणसांची गणती करावयाची झाली तर श्री. देवल हे अस्सल गांधीवादी ठरणार नाहीत का ?"

अलीकडे रा. स्व. संघाने आपल्या मदत आणि पुनर्वसन कार्याचे कायम नियंत्रण व संचालन करण्यासाठी 'सेवाभारती' सुरू केली आहे. 'दि इलस्ट्रेटेड वीकलीचे त्यावेळचे संपादक श्री. एम. व्ही. कामथ यांनी

त्या संदर्भात लिहिले होते की, "तुम्ही रा. स्व. संघाबद्दल काहीही म्हणा-पण जेव्हा देशबांधवांची सेवा करण्याची वेळ येते तेव्हा संघाचे कार्यकर्ते अगदी बाह्या सरसावून तयार असतात. ते झटून काम करतात आणि शिवाय कोणत्याही प्रकारे परतफेडीची त्यांची अपेक्षा नसते– अगदी 'विकली'त एखादे छायाचित्र छापून यावे, एवढीदेखील अपेक्षा नसते. तुम्ही एरवी त्यांना कितीही दूषणे द्या, पण कधीतरी थांबून विचार करा आणि त्यांनी आजपर्यंत जे कार्य केले आहे त्याबद्दल त्यांना धन्यवादही द्या !"

रा. स्व. संघाची ही मदत आणि हे पुनर्वसनकार्य फक्त संकटात सापडलेल्या लोकांसाठीच मर्यादित राहिलेले नाही. स्वातंत्र्योत्तर काळात आपण जी चार युद्धे लढलो, त्या चारही युद्धांच्या वेळी लष्कराशी नागरिकांनी केलेल्या सहकार्यात रा. स्व. संघ सदैव आघाडीवर राहिला आहे.

ऑक्टोबर १९४७ मध्ये जेव्हा खुद्द महाराजा आणि शेख अब्दुल्ला-देखील काश्मीरखोरे सोडून आले होते, त्यावेळी संघकार्यकर्ते मागे राहिले आणि त्यांनी जम्मूचा विमानतळ बांधला आणि श्रीनगर विमान-तळाची धावपट्टी रुंद करण्यास मदत केली. दारुगोळा भिजू नये म्हणून तो पाठीवर घेऊन त्यांनी माधोपूर येथे रावी नदी ओलांडली. काही ठिकाणी तर पाकिस्तान्यांनी पेरलेले सुरुंग बाजूला काढण्यातदेखील त्यांनी जवानांना मदत केली.

गोव्याच्या मुक्तिसंग्रामात भाग घेतलेल्या वसंतराव ओकांसारख्या संघनेत्यांना तोफगोळ्यामुळे जखमा झाल्या होत्या तर जगन्नाथराव जोशींनी पणजीच्या तुरुंगात काही वर्षे काढली होती. दि. २ ऑगस्ट १९५४ रोजी सुमारे २०० संघकार्यकर्त्यांनी नाना काजरेकर आणि सुधीर फडके या दोघांच्या नेतृत्वाखाली दादरा–नगरहवेली ही पोर्तु-गीजांच्या ताब्यातली दोन ठाणी मुक्त केली आणि बंदुका, ब्रेनगन्स, स्टेनगन्सनी सज्ज असणाऱ्या १७५ पोर्तुगीज सैनिकांना पळवून लावले.

१९७१ साली द्वारकेजवळच्या ओखा बंदरावर बाँबफेक करण्या-साठी पाकिस्तानी विमाने खालून उड्डाणे करीत होती तेव्हा श्री. गणपती

भाई लक्ष्मणभाई भट्ट यांनी दोन सेबरजेटस् खाली पाडली. अहमदाबादच्या सहार बझार कँप, हनुमान शाखेचे मुख्य शिक्षक असणारे गणपतीभाई राज्य परिवहन महामंडळाच्या ओखा येथील यंत्रशाळेत त्यावेळी काम करीत होते. त्यापूर्वी प्रादेशिक सेनेच्या वतीने घेण्यात आलेल्या हवाई संरक्षणविषयक प्रशिक्षणशिबिरात त्यांनी भाग घेतलेला होता. जेव्हा त्यांचे अभिनंदन करण्यात आले तेव्हा हा संघस्वयंसेवक म्हणाला, "मी फक्त माझे कर्तव्य केले आहे!" नंतर पाकिस्तानी विमानांनी लावलेल्या आगी विझवण्यातही संघकार्यकर्त्यांनी मदत केली.

डॉक्टर हेडगेवार म्हणत असत की, 'संघ हे समाजाला बीजपुरवठा करणारे केंद्र ठरेल. विशुद्ध चारित्र्याची आणि ज्वलंत देशभक्तीने भारलेली माणसे संघात तयार होतील आणि मग आपण ज्या ज्या क्षेत्रात काम करू तेथे तेथे नवी दिशा देण्याचे आणि अधिक चांगले वातावरण निर्माण करण्याचे काम त्यांना पार पाडावे लागेल.' आता तसेच घडते आहे. संघापासून स्फूर्ती घेऊन अनेक लोकांनी वेगवेगळ्या क्षेत्रात वेगवेगळ्या संघटना उभारल्या आहेत. मात्र या सर्व संघटना संघापासून वेगळ्या आहेत. हरिजन सेवक संघ, आदिजमाती संघ, खादी ग्रामोद्योग संघ, नई तालीम या सर्व संघटनांनी जरी गांधीजींपासून स्फूर्ती घेतली असली तरी त्या सर्व संघटना काँग्रेसपासून जशा वेगळ्या होत्या, स्वतंत्र होत्या तशाच या संघटना संघापासून वेगळ्या आहेत.

या सर्व संघटनांमधली सर्वात जास्त जुनी संघटना म्हणजे रा. स्व. संघाच्या धर्तीवरची स्त्रियांची राष्ट्रीय सेविका समिती ही संघटना. १९३६ साली श्रीमती लक्ष्मीबाई केळकर ऊर्फ 'मावशी' डॉक्टर हेडगेवारांना भेटल्या, त्यांचा मुलगा संघस्वयंसेवक होता. रा. स्व. संघाचे कार्य पाहून त्या खूप प्रभावित झाल्या होत्या आणि स्त्रियांसाठी तशीच संघटना असावी, असे त्यांना वाटत होते. डॉक्टरांनी त्यांच्या सूचनेचे स्वागत केले. पण त्यांनी स्त्रीसंघटना उभारताना आपल्या मुलाचीसुद्धा मदत घेऊ नये, आवश्यकता वाटल्यास फक्त वडीलधाऱ्या अप्पाजी जोशींचा सल्ला घ्यावा असे डॉक्टरांनी मावशींना सांगितले. ते म्हणाले,

" संघ आणि समिती यांनी परस्परांना समांतर असे काम केले पाहिजे- पण रेल्वेचे रूळ कितीही दूर गेले तरी जसे एकमेकांत मिसळत नाहीत तसेच कितीही काळ लोटला तरी या दोन्ही संघटना वेगवेगळ्याच राहिल्या पाहिजेत."

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संघापासून स्फूर्ती घेतलेल्या लोकांनी सुरू केलेली पहिली संघटना म्हणजे अखिल भारतीय विद्यार्थी परिषद. तिच्या स्थापनेच्या वेळी तर संघावरची बंदी कायम होती. सुरुवातीलाच अ. भा. वि. प. ने घटनासमितीला ५०,००० विद्यापीठविद्यार्थ्यांच्या सह्या असलेले एक निवेदन सादर केले. देशाचे नाव भारत असे ठेवावे, हिंदी ही अधिकृत राजभाषा मानण्यात यावी आणि 'वंदे मातरम्' हे राष्ट्रगीत म्हणून स्वीकारण्यात यावे, अशा मागण्या त्या निवेदनात नोंदवण्यात आल्या होत्या. काही वर्षांनी ही संघटना इतकी सामर्थ्यवान झाली की आणीबाणी लादली जाण्यापूर्वी निम्म्याहून अधिक विद्यापीठां- मध्ये– दिल्ली, बनारस, उस्मानिया, अलाहाबाद आणि बंगलोर यांच्या- सारख्या प्रतिष्ठित विद्यापीठांसह विद्यापीठांतर्गत विद्यार्थी संघटना अ. भा. वि. प. च्याच असत. १९७७ साली तर परिषदेने पूर्वीपेक्षा अधिक उज्वल यश संपादन केले. पण पुढच्याच वर्षी असा निर्णय घेण्यात आला की निवडणुकांमुळे विद्यार्थ्यांमध्ये फूट पडते, गट तयार होतात आणि अधिक महत्त्वाच्या कामांवरून लक्ष विचलित होते, म्हणून आणखी काही वर्षे निवडणुकांमध्ये भाग घ्यायचा नाही.

१९७४–७५ साली झालेल्या गुजराथ आणि बिहार आंदोलनां- मध्ये अ. भा. वि. प. ने महत्त्वाची भूमिका पार पाडली. त्या आंदोल- नांचे जयप्रकाशजींनी नेतृत्व करावे, यासाठी परिषदेने त्यांचे मन वळवले. आणीबाणीत अ भा वि प च्या ४५० कार्यकर्त्यांना 'मिसा' खाली स्थानबद्ध करण्यात आले होते आणि ४००० हूनही अधिक प्रति- निधींना सत्याग्रह केल्यानंतर भारत संरक्षण कायद्याखाली अटक करण्यात आली होती.

विद्यार्थीदशेतील आंतरराज्यीय सहजीवनाचा एक प्रकल्प अ. भा. वि. प. तर्फे गेली काही वर्षे चालवण्यात येत आहे. ईशान्य भारतातील

आदिवासी भागांमधल्या विद्यार्थ्यांना मुंबईत आणि इतर शहरांत आणून स्थानिक कुटुंबांमध्ये काही काळ ठेवणाऱ्या या प्रकल्पाचे नाव आहे 'मेरा घर भारत देश !' त्याचप्रमाणे विविध परीक्षांमध्ये पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देणे, पुस्तक-बँका चालवणे, रक्तदानमोहिमा आयोजित करणे, व्यावसायिक मार्गदर्शन पुरवणे, सुट्टीत गरजू विद्यार्थ्यांना रोजगार मिळवून देणे, ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्यात विद्यार्थ्यांना सहभागी करून घेणे वगैरे इतर कार्यक्रमही अ. भा. वि. प. तर्फे आयोजित केले जातात.

आज अ. भा. वि. प. ही देशातली सर्वांत मोठी विद्यार्थी संघटना ठरली आहे, आणि विशेष म्हणजे सर्वोत्कृष्ट संघटनादेखील तीच आहे. काही काळापूर्वी अ. भा. वि. प. चे कार्यकर्ते आपल्या एका समारंभाचे अध्यक्षपद स्वीकारावे, अशी विनंती करण्यासाठी मीरत विद्यापीठाच्या कुलगुरूंना भेटण्यासाठी गेले होते. ते कुलगुरू अ. भा. वि. प. ला फारसे अनुकूल नव्हते. पण जेव्हा कार्यकर्त्यांचे म्हणणे त्यांनी ऐकले तेव्हा त्यांनी समारंभाला यायचे आनंदाने कबूल केले. ते म्हणाले, "अलीकडे विद्यार्थीनेते फार उद्धट झाले आहेत. तुम्ही मात्र वेगळे आहात. तुमचे वागणे कसे गोड आणि नम्र आहे ! मी तुमच्या कार्यक्रमाला येईन, अगदी अवश्य येईन !"

रा. स्व. संघापासून मिळालेल्या प्रेरणेने सुरू झालेली दुसरी मोठी संघटना म्हणजे भारतीय मजदूर संघ. केरळ आणि बंगाल प्रांतात रा. स्व. संघाचे प्रचारक म्हणून काम केलेले श्री. दत्तोपंत ठेंगडी यांच्याकडे तिचे नेतृत्व आहे. श्री. ठेंगडी यांनी कामगारसंघटनेचे तंत्र आणि मंत्र इंटकच्या नागपूर शाखेत आत्मसात केले. मग त्यांनी इंटकला रामराम ठोकला. त्यावेळी इंटकतर्फे श्री. ठेंगडींना निरोप देण्याचा एक समारंभही आयोजित करण्यात आला होता. नंतरच्या काळात त्यांनी उत्तर प्रदेशमधील मान्यवर कामगारनेते दादा विनयकुमार मुखर्जी, रामनरेश सिंग, एन. सी. गांगुली, बी. एन. साठे इत्यादींच्या सहकार्याने भारतीय मजदूर संघाची संघटना बांधली.

भारतीय मजदूर संघाने केवळ लढे आयोजित करण्यावरच आपले

लक्ष केंद्रित केलेले नाही. कामगारप्रश्नावर काही मूलभूत संशोधन-देखील करण्यात आले आहे. उदाहरणार्थ– श्री. ठेंगडी यांनी प्राचीन भारतातील कामगारविषयक कायद्यांचे संकलन केले आहे, ते कायदे आधुनिक कायद्यांइतकेच प्रागतिक आणि उदारमतवादी असल्याचे त्यांना आढळून आले आहे. शिवाय दि. १ मे ऐवजी विश्वकर्मा दिन हा कामगारदिवस म्हणून पाळण्याचा निर्णय घेऊन भारतीय मजदूर संघाने कामगार चळवळीला वेगळी राष्ट्रीय दिशा दाखवली आहे. विश्वकर्मा हा प्राचीन भारतीय वाङ्मयात अखिल विश्वाचा वास्तुकर्मी म्हणून उल्लेखिला गेला आहे, हे सर्वश्रुत आहे.

परंतु भारतीय मजदूर संघाबाबत उद्योगपती मात्र फारसे समाधानी नाहीत. संघाचे कार्यकर्ते कमालीचे प्रामाणिक असल्याचा त्यांना अनुभव आहे. इंटक आणि आयटक यांच्यापेक्षा कितीतरी उशिरा भारतीय मजदूर संघाने कामगारक्षेत्रात प्रवेश केला असला तरी आज त्या क्षेत्रातली ती एक प्रमुख संघटना म्हणून मान्यता पावली आहे.

याच धर्तीवर श्री. गुरुजींपासून स्फूर्ती घेऊन श्री. रमाकांत केशव देशपांडे यांनी मध्य प्रदेशातल्या जशपूर येथे वनवासी लोकांसाठी ‘कल्याण आश्रम’ सुरू केला. आज त्या आश्रमाची शेकडो केंद्रे काम करीत असून श्री. रामभाऊ गोडबोले यांच्यासारख्या मान्यवर कार्यकर्त्यांसह शेकडो कार्यकर्ते या कार्यात सहभागी झालेले आहेत. १९७७ साली त्यावेळचे पंतप्रधान श्री. मोरारजीभाई देसाई यांनी आदिवासी भागाला भेट दिली होती, तेव्हा आश्रमाचे कार्य पाहून समाधान व्यक्त केले होते. आणीबाणीत मात्र या आश्रमाचे कामदेखील बंद करण्याचा आदेश देण्यात आला होता.

कल्याण आश्रमाने आपले उद्दिष्ट वनवासी लोकांच्या शिक्षणापुरते मर्यादित ठेवलेले नाही. श्री. देशपांडे यांच्या मते वनवासींची सगळ्यात मोठी समस्या म्हणजे त्यांना शहरी लोकांबद्दल वाटणारा कमालीचा अविश्वास. शहरी माणूस म्हणजे एक सावकार तरी असणार किंवा दुसरा सरकारी नोकर तरी असणार– आणि ते दोघेही आपल्याला सपशेल फसवणार असे या लोकांना वाटते. एखादी आदि-

वासी मुलगी गाठायची, तिच्याशी लग्न लावायचे, तिला दुसरी बायको म्हणायचे आणि हे नाते पुढे करून आदिवासींची जमीन खरेदी करण्यास एरवी कायद्याने असलेली मनाई बाजूला सारायची, असा प्रकार काही महाभागांनी केल्याचे उघडकीस आले आहे. त्याव्यतिरिक्त विदेशी मिशनऱ्यांचा प्रश्नही आहेच. या सर्व समस्यांवर मात करण्यासाठी कल्याण आश्रम त्या लोकांत मिसळून जाऊन एकत्रित कृती करीत आहे.

हिंदू धर्म ही काही संघटित धर्मसंस्था नाही. पण अधूनमधून हिंदू चालीरीतींचे पुनर्मूल्यांकन करण्याची गरज निर्माण होत असते. म्हणूनच श्री गुरुजींच्या सल्ल्यावरून काही धार्मिक नेत्यांनी आणि सुधारकांनी बऱ्याच वर्षांपूर्वी विश्व हिंदू परिषद स्थापन केली. श्री. दादासाहेब आपटे या परिषदेचे पहिले सरचिटणीस होते.

विश्व हिंदू परिषदेतर्फे १९७९ साली प्रयाग येथे भरवण्यात आलेले विश्वहिंदूसंमेलन हे हिन्दूंचे सगळ्यात मोठे संमेलन होते. त्या संमेलनाला २५ देशांमधून प्रतिनिधी व धार्मिक नेते उपस्थित राहिले होते. उपस्थितांमध्ये सनातनी, आर्यसमाजी, शीख, जैन, बौद्ध, लिंगायत वगैरे सर्वांचा समावेश होता. उदयपूरचे महाराणा भागवत सिंग हे संमेलनाच्या अध्यक्षस्थानी होते. या संमेलनाने अस्पृश्यतेविरुद्ध संमत केलेला ठराव म्हणजे हिंदूंच्या धार्मिक इतिहासातली एक क्रांतिकारक घटनाच होती. त्या ठरावावर बोलताना कर्नाटकातल्या पेजावर मठाचे स्वामी विश्वेशतीर्थ म्हणाले, "जगदगुरूंनी 'जगता'ची काळजी घ्यायला हवी आणि हरिजनांचा या 'जगता'तच समावेश होतो." स्वामी चिन्मयानंद म्हणाले, "आपण आधी हिन्दूनाच हिंदू धर्माची दीक्षा देऊ या. तसे झाले की सारे काही सुरळीत होईल." आणि बद्रीनाथच्या ज्योतिष्मठाचे जगदगुरू स्वामी शांतानंद म्हणाले, "जे पूर्वी कधी कुणी केले नाही ते आज विश्व हिंदू परिषद करीत आहे."

या संमेलनाला उपस्थित असणाऱ्या धर्माचार्यांनी सर्व हिंदूंसाठी एक सहा कलमी आचारसंहिता तयार केली. त्या संहितेनुसार सर्व पंथांच्या हिंदूंनी सूर्यप्रणाम करावा, भगवद्गीता वाचावी आणि दररोज ईश्वराची प्रार्थना करावी अशी अपेक्षा आहे. आपापल्या आवडत्या देव-

देवतांचे चित्र किंवा मूर्ती घरात ठवण्याची या संहितेने सर्वांना मुभा दिलेली आहे. त्याचप्रमाणे ॐ हे चिन्ह साखळीत किंवा दोऱ्यात ओवून कायम गळ्यात घालावे, आपल्या सर्व पत्रांवर, लेखनसामुग्रीवर–अगदी व्हिझिटिंग कार्डावरही ते लिहावे, छापावे, अशी ही अपेक्षा आहे. आणि आचारसंहितेच्या शेवटच्या कलमानुसार आपापल्या घरी सर्व हिंदूंनी तुळशीचे रोप लावावे, असे सांगण्यात आले आहे.

आज विश्व हिंदू परिषद गोरगरिबांच्या व पददलितांच्या सेवेसाठी सुमारे ३०० सेवाकेंद्रे चालवीत आहे. परिषदेचे सरचिटणीस श्री. राजाभाऊ डेगवेकर आपल्या इतर निष्ठावंत सहकाऱ्यांसह या कार्याचे सूत्रसंचालन करीत आहेत.

स्वामी विवेकानंदांची जन्मशताब्दी साजरी करण्याची वेळ आली तेव्हा ती मोठ्या प्रमाणावर साजरी करावी आणि शाश्वत स्वरूपात त्यांचे स्मारक उभारावे असे ठरवण्यात आले. त्याप्रमाणे एक अपक्षीय 'विवेकानंद शिलास्मारक समिती' स्थापन करण्यात आली. रा. स्व. संघाचे बरीच वर्षे सरकार्यवाह असलेले श्री. एकनाथजी रानडे त्या समितीचे संघटक चिटणीस बनले. कन्याकुमारीच्या ज्या शिलाखंडावर बसून स्वामीजींनी भारतमातेचे चिंतन केले होते आणि मग शिकागोच्या सर्वधर्मपरिषदेत भाग घेण्यासाठी प्रयाण केले होते तेथे त्या समितीतर्फे एक सुन्दर स्मारक उभारण्यात आले. एकेक रुपया करीत लाखो विद्यार्थ्यांकडून या स्मारकासाठी निधी जमा करण्यात आला, हे या मोहिमेचे एक वैशिष्टय होते. आज ते शिलास्मारक भारतातले एक पवित्र तीर्थक्षेत्र ठरले आहे. अमेरिकेत जसा स्वातंत्र्यदेवीचा पुतळा तसे आपल्या देशात हे विवेकानंदांचे स्मारकशिल्प !

अलीकडे स्मारक समितीने आपली कार्यकक्षा वाढवली आहे. दरवर्षी असंख्य तरुण-तरुणींना सामाजिक सेवेचे प्रशिक्षण देऊन, 'व्रती' बनवून हरिजन, गिरिजन आणि वनवासी लोकांमध्ये विधायक कार्य करण्यासाठी पाठवले जात आहे.

या सगळ्यांपेक्षा महत्त्वाची संस्था म्हणजे रा. स्व. संघापासून स्फूर्ती घेऊन काही सेवाभावी लोकांनी शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या

हेतूने सुरू केलेली विद्या भारती. या लोकांच्या अथक परिश्रमामुळ आज विद्याभारती ७०० शिशुमंदिरे चालवीत असून कुरुक्षेत्र, लखनौ, दिल्ली, बंगलोर या शहरांतल्या शाळा इतक्या विख्यात झाल्या आहेत की, अनेक वेळा मंत्रीदेखील 'त्या शाळांमध्ये प्रवेश द्यावा' म्हणून शिफारस करणाऱ्या चिठ्ठ्या पाठवू लागले आहेत. १९७८ साली म्हणजेच आंतरराष्ट्रीय बालकवर्षात विद्याभारतीने दिल्लीमध्ये सर्व देशातल्या १ ते ११ वर्षे वयोगटातल्या १५००० मुलांचे शिशुसंमेलन आयोजित केले होते. एवढ्या मोठ्या प्रमाणावर आणि तरीही इतके शिस्तबद्ध रीतीने आयोजित केलेले दुसरे काहीही आपल्याला पाहायला मिळाले नाही, अशीच प्रतिक्रिया सर्व उपस्थितांनी व्यक्त केली होती.

रा. स्व. संघाच्या लोकांनी सुरू केलेली दुसरी मोठी संस्था म्हणजे दीनदयाळ अनुसंधान संस्थान. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या स्मृती-प्रीत्यर्थ– ज्यांच्या निधनानंतर त्यांना श्रद्धांजली वाहताना श्री. बाळा-साहेब देवरस यांनी 'पूर्णार्थाने आदर्श स्वयंसेवक' असे ज्यांचे वर्णन केले होते– ही संस्था सुरू करण्यात आली आहे. पंडितजी भारतीय जनसंघाचे अध्यक्ष असताना फेब्रुवारी १९६८ मध्ये गूढ परिस्थितीत मरण पावले होते. सध्या ही संस्था 'मंथन' नावाचे वैचारिक त्रैमासिक इंग्रजी व हिंदीतून प्रकाशित करते संस्थेचे 'विवेकानंद वैद्यकीय मिशन' देशातल्या ३६ संस्थांना मोफत औषधे पुरवीत असते. आंध्रमधील वादळानंतर मुलापालेम हे पूर्णपणे उद्ध्वस्त झालेले खेडेगाव दीनदयाळ अनुसंधान संस्थानातर्फे पुन्हा वसवण्यात आले आणि दीनदयाळपुरम् असे त्याचे नवे नाव ठेवण्यात आले. सध्या ही संस्था उत्तर प्रदेशातल्या गोंडा जिल्ह्यात एक मोठा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवीत आहे. विधायक कार्य-क्रमांच्या मदतीने स्थानिक जनतेचे खरे उत्पन्न पाच वर्षांच्या काळात दुप्पट करण्याचा प्रयत्न आहे. अवघ्या दोन वर्षांच्या काळात संस्थेतर्फे या जिल्ह्यात २५००० कूपनलिका खोदण्यात आल्या आहेत. या संस्थेचे सारे कार्य श्री. नानाजी देशमुख यांच्या देखरेखीखाली चाललेले असून चिटणीस डॉ. जे. के. जैन आणि संचालक श्री. परमेश्वरन यांचे सहकार्य त्यांना मिळते आहे.

निबंध १०१८८
१७०४८४
... शाखा (स्थळ प्रत)



१९७८ साली रा. स्व. संघाने प्रौढ शिक्षण कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर हाती घेतला आणि 'राष्ट्रीय संस्कार व सेवा योजनेची' त्याला जोड दिली. आज देशभरात सुमारे १५०० केंद्रे हा कार्यक्रम अमलात आणीत आहेत. संघाचे टीकाकार असे म्हणतात की, या कामासाठी संघाने सरकारकडून २०० कोटी रुपये घेतले आहेत. वस्तुस्थिती अशी आहे की, संघाने या कार्यासाठी सरकारकडे एक पैदेखील मागितलेली नाही आणि सरकारकडून संघाला एक पै मिळालेलीदेखील नाही. या सर्व कार्यक्रमाचे संचालन करणारे प्रा. बी. एन. वऱ्हाडपांडे यांचे या बाबतीतले म्हणणे असे : "आम्ही त्यांना लिहावाचायला शिकवतो, हे तर खरेच; पण आम्ही तेवढ्यावरच थांबत नाही. आम्ही त्यांना स्वच्छतेचे धडे देतो, आरोग्याचे नियम सांगतो, त्यांच्यात देशभक्ती बाणावी असा आमचा प्रयत्न असतो त्याचप्रमाणे आपली आर्थिक स्थिती कशी सुधारावी, हेदेखील आम्ही त्यांना सांगतो. केवळ साक्षरता-प्रसार हे आमचे उद्दिष्ट नाही. त्यांना आत्मविश्वास मिळवून देणे, भविष्याबद्दल त्यांच्या मनात आशाअपेक्षा निर्माण करणे, सर्व प्रकारे त्यांना आदर्श नागरिक बनवणे हे आमचे ध्येय आहे."

श्री. बिंदुमाधव जोशी यांच्या नेतृत्वाखाली संघकार्यकर्त्यांनी ग्राहक चळवळीतही भाग घ्यायला सुरुवात केली आहे. त्यांच्या ग्राहक पंचायतीने पुण्यात फार चांगले काम करून दाखवले आहे आणि इतर राज्यांतही त्यांचे काम विस्तारते आहे. जयप्रकाशजी, छागला आणि इतरही अनेक नेत्यांनी त्यांच्या कार्याची प्रशंसा केली आहे.

सर्वांत शेवटची आणि तरीही इतरांइतकीच महत्त्वाची संघटना म्हणजे श्री. दत्तोपंत ठेंगडींनी १९७८ साली स्थापन केलेला भारतीय किसान संघ. मार्च १९७९ मध्ये कोटाह येथे भरलेल्या भारतीय किसान संघाच्या सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षपदावरून बोलताना उत्तरप्रदेशातल्या एका आदर्श सहकारी शेताचे संचालक श्री. पुरुषोत्तमदास भाटिया यांनी स्वातंत्र्यानंतरच्या पंचवीस वर्षांच्या काळात शेतकी क्षेत्राची कशी व किती हानी झाली त्याचे चित्र उभे केले. ते म्हणाले, "१९५३ आणि १९५४ साली लागोपाठ दोन वर्षे देशात अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन

झाले. साहजिकच त्यांच्या भावात बरीच घट झाली. परिणाम असा झाला की गव्हाचा १९५० साली जो भाव होता त्याच्या तीनचतुर्थांश भावाने १९५५ साली गहू विकला जाऊ लागला. १९५५ साली गव्हाच्या किमती या अशा रीतीने इतक्या खाली घसरलेल्या असताना शेतकऱ्यांना रास्त भावाची हमी देणे हे सरकारचे खरे कर्तव्य होते. पण, त्याऐवजी, सरकारने अमेरिकेतून मोठ्या प्रमाणावर गव्हाची आयात सुरू केली. अमेरिकेत या गव्हाला दोनदा सबसिडी देण्यात आलेली होतीच. एकदा उत्पादन चालू असताना आणि दुसऱ्यांदा निर्यात केली जात असताना. अशा या गव्हाला आणखी एकदा सबसिडी देऊन स्वस्त धान्याच्या दुकानांतून सरकारने त्याची विक्री केली. अशा तऱ्हेने स्वसंरक्षक धोरणाऐवजी हे उलटे आत्मघातकी धोरण अवलंबिण्यात आले. त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांचा कणाच मोडून पडला आणि भारतीय शेतीची बरीच पीछेहाट झाली.''

दि. १ मार्च १९३५ च्या 'हरिजन'मध्ये गांधीजींनी भारतीय अर्थव्यवस्थेबद्दल जे विचार मांडले होते त्यांची श्री. भाटियांनी आठवण करून दिली. गांधीजींनी लिहिले होते, "अर्थशास्त्राची तत्त्वे ही काही गणिताच्या तत्त्वांसारखी त्रिकालाबाधित असत नाहीत आणि सार्वत्रिकही असत नाहीत. इंग्लंड फ्रान्सचे अर्थशास्त्र स्वीकारणार नाही की फ्रान्स जर्मनीचे किंवा जर्मनी अमेरिकेचे अर्थशास्त्र मान्य करणार नाहीत. जर त्यांनी तसे केले तर ती त्यांची चूक ठरेल. जो देश अन्नधान्य पिकवीत नाही आणि फक्त खनिजांचेच उत्पादन करतो त्या देशाचे अर्थशास्त्र अन्नधान्याचे उत्पादन करणाऱ्या आणि खनिजसंपत्ती नसणाऱ्या देशाच्या अर्थशास्त्रापेक्षा वेगळेच असायला हवे. म्हणूनच भारताचे अर्थशास्त्र फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका किंवा जर्मनीच्या धर्तीवरचे असूच शकणार नाही. एकेकाळी भारत सुवर्णभूमी म्हणून ओळखला जात होता. इथे खूप सोने सापडत होते म्हणून नव्हे, तर इथे कलाकृतींचा असा अमूल्य खजिना होता म्हणून! भारतात अशी उंची वस्त्रे तयार होत असत आणि असे किमती मसाल्याचे पदार्थ पिकत असत की इतर देश त्यांच्या मोबदल्यात आपल्याला सोने देत असत. ती अभिमानास्पद स्थिती आज

आपण गमावून बसलो आहोत. निव्वळ लाकडे तोडणारे आणि पाणी वाहाणारे झालो आहोत. पण अजूनही वेळ गेलेली नाही. अजूनही आपण ती जुनी स्थिती पुन्हा एकदा निर्माण करू शकतो. कारण आपल्याला नैसर्गिक साधनसंपत्तीचे आगळे वरदान लाभलेले आहे आणि चीनचा अपवाद वगळल्यास जगातल्या दुसऱ्या कोणत्याही देशाजवळ नाहीत एवढी कोटचवधी जिवंत यंत्रे आपल्याजवळ आहेत. अशा स्थितीत, इतकी जिवंत यंत्रे जवळ बाळगणारा देश त्या कोटचवधी जिवंत यंत्रांना विस्थापित करणारे दुसरे कोणतेही निर्जीव यंत्र कसे काय जवळ बाळगू शकेल ? तसे करणे म्हणजे बेकारीला आणि विनाशाला आमंत्रण दिल्यासारखेच होईल."

भारतीय किसान संघाच्या त्या नेत्यांनी ग्रामीण भागात गरीब आणि श्रीमंत यांच्यातल्या रुंदावत चाललेल्या दरीकडेही सर्व उपस्थितांचे लक्ष वेधले. 'रिझर्व बँक ऑफ इंडिया'ने केलेल्या एका पाहणीनुसार १९७७ साली ग्रामीण भागातील ३० टक्के लोकांजवळ त्या भागातल्या मालमत्तेच्या अवघी २ टक्के मालमत्ता होती तर वेगळचा ३० टक्के लोकांजवळ ८२ टक्के मालमत्ता केंद्रित झालेली होती."

श्री. भाटिया पुढे म्हणाले, "स्वातंत्र्योत्तर ३२ वर्षांच्या काळात घडलेली अत्यंत खेदकारक अशी घटना म्हणजे ग्रामीण भागात जातिभेद आणि धर्मभेद या विघटनकारी घटकांमध्ये भरीस भर म्हणून राजकारणाचा झालेला उदय. पक्षीय राजकारणाच्या अनिष्ट प्रभावापासून शेतकऱ्यांना वाचवण्याची आता नितांत गरज निर्माण झालेली आहे. म्हणूनच किसान संघ शेतकऱ्यांच्या हितसंवर्धनासाठीच शेतकऱ्यांना संघटित करू इच्छितो आणि कोणत्याही राजकीय पक्षाच्या दावणीला बांधले जाण्यास आम्ही कायम विरोध करीत राहू."

संघप्रेरित मंडळींचे काम फक्त भारतवर्षापुरतेच मर्यादित राहिलेले नाही. ते जेथे जेथे गेले तेथे तेथे त्यांनी संघाचा प्रकाश नेला आहे. आज जगात जेथे जेथे भारतीय लोक नाव घेण्याइतक्या संख्येने स्थायिक झाले आहेत तेथे तेथे हिंदू स्वयंसेवक संघ किंवा भारत स्वयंसेवक संघ कार्य करीत असताना दिसेल. त्या ठिकाणी संघ केवळ शाखा चालवून

थांबलेला नाही. कीर्तने—प्रवचने आयोजित करणे, संस्कृत पाठशाला, ग्रंथालये चालवणे, ऐतिहासिक नाटके बसवून ती सादर करणे, सगळ्या भारतीयांसाठी योग प्रशिक्षण केन्द्रे चालवणे वगैरे कार्यक्रमही हाती घेतले जातात. केनयामध्ये त्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी चाललेल्या लढ्यात जोमो केनयाटा यांना संघकार्यकर्त्यांनी भरपूर मदत केली होती. केनयातील संघशिबिरांना त्यांनी आपल्या कुटुंबियांसह अनेक वेळा भेटी दिल्या आहेत.

१९६१ मध्ये संघाने केनयात पूरग्रस्तांसाठी आणि दुष्काळ-पीडितांसाठी मोठ्या प्रमाणावर मदतकार्य केले. २०० पूर्णवेळ कार्य-कर्त्यांची फौज त्या कामासाठी पुरवण्यात आली. केनयाच्या विधि-मंडळाचे तत्कालीन सभापती आणि हंगामी केनया पूर व दुष्काळ निवारण समिती 'चे अध्यक्ष हंफ्री स्लेड यांनी त्यावेळी भारतीय स्वयं-सेवक संघाच्या मुख्य कार्यालयाला भेट दिली होती. स्वयंसेवक करीत असलेल्या कामाची प्रशंसा करून ते म्हणाले होते, "तरुण पिढीमध्ये नैतिकता, शिस्त, सेवाभाव आणि त्याग ही मूल्ये बाणवण्याचे फार मोठे कार्य संघ पार पाडीत आहे. हिंदू धर्माने शिकवलेले विश्वबंधुत्वाचे तत्त्वज्ञान या अशा मानवतावादी कार्याद्वारे आचरणात आणले जात आहे. मदतीसाठी कार्य करीत असणाऱ्या सर्व सार्वजनिक संघटनांमध्ये संघाएवढ्या प्रामाणिकपणे आणि कार्यक्षमतेने पार पाडणारी दुसरी संघटना मी तरी पाहिलेली नाही." अमेरिका आणि ब्रिटनकडून मदती-दाखल मिळालेल्या हजारो टन मक्याचा आणि दुधाच्या भुकटीचा उल्लेख करून ते पुढे म्हणाले, "या मदतीशी पौंड—शिलिंग—पेन्सच्या भाषेत तुम्ही दिलेल्या मदतीची तुलना केली तर कदाचित ती अगदी क्षुल्लक वाटेल. पण सामान्य माणसाच्या पातळीवर पूर्वी कधीही विचा-रात घेतल्या न गेलेल्या ठिकाणांहून तुम्ही ही मदत गोळा केली आहे, हे तुमच्या प्रयत्नांचे आगळे वैशिष्टच आहे."

सध्या ब्रिटनमध्ये संघाच्या ३२ शाखा काम करीत असून स्वयं-सेवकांची संख्या २००० वर गेली आहे. हे सर्व विदेशांतील संघकार्य श्री. एल. एस. भिडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडले जात आहे.

विदेशांतील स्वयंसेवकांनी आणीबाणीच्या काळात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. परदेशांतल्या लोकशाहीवादी भारतीयांच्या मदतीने त्यांनी ' फ्रेंडस् ऑफ इंडिया सोसायटी इंटरनॅशनल ' ही संस्था स्थापन केली, जगात ठिकठिकाणी तिच्या शाखा काढल्या. ब्रिटनमध्ये श्री. जगदीश सूद व अमेरिकेत डॉ. जितेन्द्र यांनी आपल्या ठिकठिकाणच्या सहकाऱ्यांसह डॉ. के. बी. हरदास, रत्नाकर भारती व इतरांमागे आपले संघटनात्मक बळ उभे केले आणि परदेशी दौऱ्यांवर जाणाऱ्या भारतीय मंत्र्यांना पुरते भंडावून सोडले. रोक्षण स्वामी, सुब्रह्मण्यम स्वामी, राजपाल पुरी, मकरंद देसाई, केदारनाथ सहानी, राम जेठमलानी आणि इतर भारतीय प्रवक्ते परदेशांत गेले असताना त्यांना आश्रय व संरक्षण देण्याचे तसेच त्यांची मते मांडण्यासाठी त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे महत्त्वाचे काम या मंडळींनीच पार पाडले. ते ब्रिटनमधल्या खासदारांना आणि संपादकांना, अमेरिकेतील सिनेटर्सना आणि गव्हर्नर्सना व ' ॲम्नेस्टी इंटरनॅशनल 'च्या ठिकठिकाणच्या प्रतिनिधींना वारंवार जाऊन भेटले आणि पाश्चिमात्य देशांत प्रारंभी ' आणीबाणीतल्या शिस्ती 'चे कौतुक करणारे जे लोकमत तयार झाले होते ते त्यांनी बदलवले. आणीबाणीतील अतिरेकांची माहिती त्यांनी जगाच्या वेशीवर टांगली.

देशातल्या स्वयंसेवकांइतकाच विदेशांतल्या स्वयंसेवकांनी पुरुषार्थ गाजवला. कोणत्याही खटल्याशिवाय स्थानबद्ध होण्याचा मान आपल्याला मिळू शकला नाही, एवढीच खंत त्या विदेशातील स्वयंसेवकांना वाटत होती.

डॉक्टर हेडगेवार म्हणत असत ते अखेर खरे ठरले आहे. शिशुमंदिर चालवण्यापासून राष्ट्रीय आणीबाणीशी दोन हात करण्यापर्यंत विविध कार्यांना शक्ती पुरवणारे विद्युतकेंद्र अशाच स्वरूपात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची त्यांनी कल्पना केली होती. ' संघ हे पॉवरहाऊस होईल ' ही त्यांची कल्पना अशा रीतीने सार्थ ठरली, हे निश्चित !

## प्रकरण तेरावे : सामाजिक भूमिका

'जर अस्पृश्यता चुकीची नसेल तर मग जगात दुसरे काहीही चुकीचे असू शकणार नाही,' असे सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरस यांचे म्हणणे आहे. 'चूल आणि मूल एवढ्यापुरताच स्त्रियांच्या कर्तृत्वाचा परिघ मर्यादित ठेवणे चुकीचे ठरेल,' असेही त्यांचे मत आहे. 'पुराणमित्येव न साधु सर्वम्।' जे जुने आहे ते सगळेच काही सोने नाही, हे त्यांनी अनेकदा स्पष्ट केले आहे. पुराणमतवाद्यांची थट्टा करताना ते म्हणतात, "संस्कृतमध्ये एक वचन आहे. 'तातस्य कूपोयमिति ब्रुवाना: क्षारं जलं कापुरुषा: पिबन्ति।' त्याचा अर्थ असा की, माझ्या वाडवडिलांनी ही विहीर खणली, पाणी खारट होते तरी त्यांनी तेच पाणी पिण्यासाठी वापरले. तसे करूनही ते बरीच वर्षे जगले त्याअर्थी मीदेखील हे असेच पाणी पीत राहाणार. हा असा जुन्याचा आग्रह, नव्हे दुराग्रह योग्य नव्हे. असा विचार करणारा माणूस सत्पुरुष म्हणून उल्लेखिला गेला नसून कापुरुष म्हणजे घाबरट माणूस म्हणूनच ओळखला गेला आहे. विचार करण्याची ही पद्धत चुकीची आहे."

हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान म्हणजे एखादा ठराविक बिंदू किंवा विशिष्ट दोन-चार तत्त्वे नसून ती एक प्रवाही चळवळ आहे. पुण्याच्या वसंत-व्याख्यानमालेत १९७४ साली बोलताना श्री. बाळासाहेब देवरस यांनी हा मुद्दा विस्ताराने स्पष्ट केला होता. ते म्हणाले होते, "कोणताही अवतार म्हणजे अंतिम प्रेषित असे आपण कधीच मानले नाही. १९२५

साली एका अमेरिकन न्यायालयाने डार्विनचा उत्क्रांतिवादाचा सिद्धांत शिकवल्याबद्दल एका शिक्षकाला शिक्षा ठोठावली होती, कारण बायबलच्या 'जेनेसिस' या प्रकरणात सांगितलेल्या विश्वनिर्मितीच्या आणि माणसाच्या जन्माच्या कथेशी तो सिद्धांत विसंगत होता. (त्या खटल्याची संपूर्ण हकीकत 'रीडर्स डायजेस्ट' या नियतकालिकाच्या जुलै १९६२ च्या अंकात 'दि ट्रायल दॅट रॉक्ड दि वर्ल्ड' या शीर्षकाने प्रसिद्ध झाली होती.) भारतात अशी गोष्ट घडणे केव्हाही शक्य नाही."

आपण आपल्या धर्मग्रंथांचा पुनःपुन्हा वेगवेगळा अन्वयार्थ लावीत आलो आहोत. नव्या दृष्टीने बदलत्या परिस्थितीनुसार आपल्या चालीरीतींची पुनर्रचनाही होत आली आहे. म्हणून तर आपल्या विचारांचा प्रवास दाखवणाऱ्या अनेक स्मृती निर्माण होऊ शकल्या. वायू आणि वरुण यांच्यासारखे जुने देव मागे पडले आणि शिव-विष्णू हे त्यानंतरचे देव किंवा रामकृष्ण हे अगदी अलीकडचे देव प्रचारात राहिले. म्हणूनच अद्वैताचे तत्त्वज्ञान सांगणाऱ्या आदि शंकराचार्यांनीदेखील शिव–विष्णू–सूर्य–गणपती–शक्ती या पाच देवतांचे पंचायतन रूढ केले. शैव आणि वैष्णव या दोन पंथांमधील जुने वाद मिटवून दोन्ही विचारसरणींना एकत्र आणण्याचा त्यांचा विचार होता.

रा. स्व. संघ जातपात मानत नाही. संघात कुणीही कुणालादेखील 'तुझी जात काय ?' असा प्रश्न विचारीत नाही. एक मात्र खरे की 'जात-पात तोडक मंडळा'प्रमाणे संघाने जातीविरुद्ध युद्ध घोषित केलेले नाही. कोणत्याही जुन्या भारतीय पद्धतीत ज्यांना काहीही चांगले आढळत नाही, अशा महाभागांमध्येही संघकार्यकर्त्यांचा समावेश होऊ शकत नाही. संघाचा दृष्टिकोन ठाम आहे, निश्चित आहे, पण शांतपणे विधायक कार्य करण्यावर भर देणारा आहे. बुद्ध आणि महावीर या दोघांनीही जातिव्यवस्थेवर टीका केलेली नव्हती, हे या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे. दोघांनाही त्या व्यवस्थेत काहीतरी तथ्य असल्याचे जाणवले असणार, हे उघड आहे. रा. स्व. संघ जातिव्यवस्थेकडे एक ऐतिहासिक यंत्रणा म्हणून पाहातो. त्या यंत्रणेचे ऐतिहासिक काम तिने

पार पाडले असून आता ती कालविसंगत ठरली असून नाहीशी व्हायला हवी आहे.

ऋग्वेदात जातीबद्दल साधा उल्लेखदेखील नाही. वैदिक ऋषीमुनी सर्व मानवजातीला ‘ अमृतस्य पुत्राः ’ म्हणूनच संबोधितात. श्रीकृष्णाने गीतेत सांगितले आहे की, ‘ चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः । ’ (अध्याय ४, श्लोक १३ वा) यात चार वर्णांची निर्मिती स्वभाव-वैशिष्टये आणि कार्यवैचित्र्यांनुसार केल्याचा उल्लेख आहे; वंशपरंपरागत वर्ण इथे मुळीच अभिप्रेत नाही. ‘ शूद्राने वेदाभ्यास केला तर त्याच्या कानांत उकळत्या शिशाचा रस ओतावा ’ असे मनूने सांगितल्याचे म्हटले जाते, पण ते धादांत असत्य आहे. त्याने म्हटले होते ते इतकेच की ‘ वेदनिंदकांना वेदांचे ज्ञान उपलब्ध करून देऊ नये. ’ (२.११४) इतरांसाठी मात्र त्याने सांगितले होते की, एखाद्या खालच्या जातीतील माणसाकडूनही श्रद्धावंताने शुद्ध ज्ञान मिळवावे. आपल्या गुणांमुळे शूद्र ब्राह्मण होऊ शकतो त्याचप्रमाणे ब्राह्मण शूद्र ठरू शकतो, असेही मनूने म्हटले होते. (१०.६५)

विविध वंश, धर्म, पंथ, भाषा यांच्या गदारोळातून एक व्यवस्थित यंत्रणा उभी करण्याच्या गरजेपोटी जातिव्यवस्था सुरू झाली असावी. म्हणूनच सर्व प्राचीन समाजांमध्ये ती आढळते. ज्यांना मशिदीत प्रवेश करण्याची मुभा नाही, असे अस्पृश्य अरबांमध्ये आहेत. इराणमध्ये ‘ दाहा ’ लोक (दास ? )आहेत, तर जपानमध्ये ‘ एता ’ आणि ‘ हिनिन ’ लोक अस्पृश्य मानले जातात. अगदी आधुनिक काळात उदयास आलेल्या अमेरिकेतदेखील गोरे अँग्लोसॅक्सन प्रॉटेस्टंट, कॅथॉलिक, ज्यू, मेक्सिकन, प्युर्टोरिकन, निग्रो, रेड इंडियन आणि इतर हे जातिभेदांसारखेच भेद दिसून येतात.

पण दुसऱ्या कोणत्याही समाजाच्या तुलनेने भारतात जाती-उपजाती जास्त संख्येने आणि अधिक काळ टिकून राहिल्या. याची कारणे दोन. पहिले म्हणजे वांशिक, धार्मिक किंवा इतर अल्पसंख्य गटांना या देशात कधीही वाळीत टाकले गेले नाही. इतर समाजांत मात्र तसे केले जात होते. तर्कशुद्ध विचार करणाऱ्या भारतीयांनी या

बाबतीत अगदी टोकाचे निष्कर्ष काढले. आणि तर्कशास्त्र जशी कायद्याची प्रतिष्ठापना करते तसा गाढवपणालाही वाव देत असते. या बाबतीतला सगळा दृष्टिकोन भारतातल्या हवापाण्यामुळे, नैसर्गिक परिस्थितीमुळे तसा घडत गेला असावा. अनिर्बंधपणे विकसित होत गेलेला निसर्ग, झाडाझुडपांचे आणि पशुपक्ष्यांचे थक्क करून सोडणारे वैचित्र्य याचा परिणाम मानवी मनावर होऊन विविधतेबद्दलची सहिष्णुता विकसित झाली आणि काही वेळी परस्परविरोधी भासणाऱ्या पंथांचे किंवा गटांचे सहजीवन इथे यशस्वी होऊ शकले. सर्व प्रकारच्या जीवनपद्धतींबद्दल आदर बाळगण्याची सवय लागली आणि केवळ जगण्याचाच नव्हे तर आपले जीवन आपल्या मर्जीप्रमाणे जगण्याचाही लोकशाहीतला अधिकार पूर्वीपासूनच मान्य केला गेला. असा विचार वाळवंटात किंवा बर्फाळ प्रदेशात राहणाऱ्या लोकांना विचित्र वाटला किंवा पटला नाही तर त्यात आश्चर्य नाही.

अनेक शतकानुशतके जातिव्यवस्था योग्य रीतीने काम करीत राहिली, असे आपल्याला इतिहासावरून दिसते. मध्ययुगात ज्यावेळी मध्य आशियातील आक्रमकांनी संपूर्ण देश पादाक्रांत करण्याचा प्रयत्न चालवला होता. त्या वेळी या स्वायत्त जातिव्यवस्थेने आणि पंचायतीनेच लोकांना संघटित राखले. इराणमध्ये राजसत्ता उन्मळून पडल्यानंतर समाजाला एकत्र राखणारी एकही यंत्रणा अस्तित्वात नसल्यामुळे त्या समाजाचे जीवन जसे सैराभैरा झाले तसे भारतात घडले नाही. कवीच्या भाषेत सांगायचे झाले तर,

‘ They let the legions thunder past
With patient deep disdain ! ‘

भारतातले विविध लोकसमुदाय एका समाजात सुसंघटित करीत असताना, त्या समुदायांचे आपापले वैशिष्टय कायम राखून त्यांना एका मोठ्या अस्तित्वात सामावून घेत असताना आणि सर्वांचे मिळून असे एक खास व्यक्तिमत्व घडवीत असताना प्राचीन भारतातील राष्ट्र-निर्मात्यांनी जातिव्यवस्थेचा भरपूर उपयोग करून घेतला. ती प्रक्रिया सुरू असताना जातिव्यवस्था हे भारतीय समाजसंघटनेचे एक महत्त्वाचे

वैशिष्टच ठरले. शिवाय या संदर्भात लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे प्राचीन काळी इजिप्त किंवा चीनमध्ये राज्यव्यवस्था जितकी स्थिर होती आणि महत्त्वाची मानली जात होती, तितकी भारतातली राज्य-व्यवस्था स्थिरही नव्हती आणि महत्त्वाचीही नव्हती. अधूनमधून बऱ्याच वर्षांच्या कालावधीत शासनयंत्रणा अस्तित्वात असून नसल्यासारखीच असे. तशा स्थितीत जातिव्यवस्थेने आणि आंतरजातीय पंचायतीनेच समाजात आवश्यक तेवढे कायदा आणि सुव्यवस्थेचे रक्षण केले. संपूर्ण भारताला सामावणारे एकच राज्य असण्याऐवजी जातिव्यवस्थेभोवती गुंफलेली संपूर्ण देशाला सामावून घेणारी एक समाजव्यवस्थाच इथे विकसित झालेली होती.

गांधीजींच्या शब्दांत सांगावयाचे झाले तर 'जातिव्यवस्था शोषणावर आधारलेली नव्हती तर सहकार्यावर आधारलेली होती.' श्रीकृष्ण, सम्राट अशोक आणि शिवाजी हे तीनही महापुरुष श्रेष्ठ मानल्या जाणाऱ्या पहिल्या तीन जातींमधले नसूनही या देशाचे राष्ट्र-पुरुष आणि ऐतिहासिक मानबिंदू ठरले, ही गोष्टच मुळी हे सिद्ध करते की जातिव्यवस्था शोषणासाठी उपयोगात आणण्याचा हेतू नव्हता तर प्राविण्यसंपादनाचे साधन म्हणून ती वापरली जात होती.

प्राचीन ऋषीमुनींनी ब्राह्मणवर्गाची भरपूर थट्टा केलेली आढळते. छांदोग्य उपनिषदामध्ये ब्राह्मणांची तुलना 'एकमेकांची शेपटी धरून खाण्यापिण्यासाठी आसुसलेल्या अवस्थेत इतस्ततः भटकणाऱ्या कुत्र्यांशी' केलेली आहे, तर संस्कृत नाटकांमध्ये विनोदनिर्मिती करणारे पण नकोसे वाटणारे पात्र विदूषकाचे असते आणि तो विदूषक नेहमी ब्राह्मणच दाखवलेला असतो. त्या नाटककारांना ब्राह्मणांवर टीका करायची नव्हती तर ब्राह्मणांनी अधिक चांगले व्हावे असे त्यांना वाटत होते.

तसे पाहिले तर अनेक सामाजिक तत्त्ववेत्त्यांनी जातिव्यवस्थेत तथ्य असल्याचे मान्य केले आहे. 'Homo Hierarchius' या आपल्या ग्रंथात लुई डच्यूमाँटने म्हटले आहे की, "माणूस केवळ विचारच करीत नाही, तर कृतीदेखील करीत असतो. त्याच्या काही कल्पना असतात त्याचप्रमाणे काही मूल्येदेखील तो बाळगून असतो. एखादे मूल्य

स्वीकारणे म्हणजे अधिकारांची व जबाबदाऱ्यांची एक मांडणी समोर ठेवणे आणि नैतिक चौकटीत तिला सर्वांची मान्यता मिळवणे होय. सामाजिक जीवनात कल्पनांची, विविध बाबींची आणि लोकांची अशी रचना करणे हे एका दृष्टीने अनिवार्यच आहे."

अमेरी डी रिएनकोर्ट यांच्या शब्दांत सांगायचे झाले तर असे म्हणता येईल की, "भारतात सहिष्णुतेचे जे वातावरण कायम नांदत होते त्यातूनच जातिव्यवस्था जन्मास आली. अगदी वेगवेगळ्या भौगोलिक पार्श्वभूमीमुळे आणि हवामानामुळे उदयाला आलेल्या भिन्नभिन्न धार्मिक चालीरीती, सांस्कृतिक परंपरा आणि स्वभावविशेष यांच्या बरोबरीनेच भाषिक आणि वांशिक बाबतीतले कमालीचे वैविध्य लक्षात घेता या सर्वांना एकत्र कसे राखावे, हा प्रश्न उपस्थित होणे अगदी स्वाभाविक होते आणि सर्वांचे मूलभूत स्वातंत्र्य आणि वेगळेपण नष्ट केल्याशिवाय, त्यांच्या धार्मिक स्वातंत्र्यावर आणि विचारस्वातंत्र्यावर मर्यादा घातल्याशिवाय, त्यांचे वांशिक आगळेपण लोप पावेल असे उपाय योजल्याशिवाय तो प्रश्न सोडवण्याचा एकच मार्ग उपलब्ध होता आणि तो म्हणजे जातिव्यवस्था भक्कम पायावर उभी करणे. इतर संस्कृतींमध्ये वाळीत टाकणे किंवा गुलाम बनवणे हे उपाय अमलात आणले गेले आणि एकच मार्ग सर्वांवर जबरदस्तीने लादण्यात आला. भारतात मात्र तसे करण्यात आले नाही. दुबळ्या गटांना मोठ्या गटाशी संबंध राहिल्यामुळे उलट बळच प्राप्त होत गेले, अल्पसंख्याकांच्या मनातही सुरक्षिततेची भावना राहिली. जातिव्यवस्था मूळ ज्या स्वरूपात अस्तित्वात आली ते स्वरूप म्हणजे मानवी संस्कृतीने जन्माला घातलेली एक उदात्त समाजरचनाच होती." (The soul of India)

आणि काउंट कैसरलिंग यांनी म्हटल्याप्रमाणे, "दिवसेंदिवस माझे असे मत बनत चालले आहे की आपल्या युरोपीय समाजपद्धतीपेक्षा या जातिव्यवस्थेतच व्यक्तीला अधिक स्वातंत्र्य मिळत होते. आपल्या पद्धतीत व्यक्तिविशेषाला फारसे महत्त्वच राहात नाही. जर आपल्यापैकी प्रत्येकाला आपल्या अस्तित्वाचा अर्थ समजू शकला असता आणि जर ती जाणीव मुक्तपणे व्यक्त करता आली असती तर आपली

समाजपद्धती पूर्णत्वाच्या दिशेने जास्तीत जास्त पुढे गेलेली पद्धती आहे असे मानता आले असते. याउलट आपण कोण आहोत, याची पुरती जाणीव न झालेला युरोपीय माणूस कमीअधिक प्रमाणात ज्या अमूर्त कल्पना मनात बाळगतो त्या जातिविषयक पूर्वग्रहांपेक्षा अधिक जाचक आणि जुलमी असतात. हा युरोपीय माणूस निव्वळ एक माणूस म्हणूनच जगू पाहतो. अशी चीज या जगात अस्तित्वात राहू शकत नाही, हे तो विसरून जातो. त्यामुळे मानवी एकात्मतेबद्दलची त्याची जाणीव सखोल ठरू शकत नाही, ती केवळ वरवरची ठरते. भारतात मात्र अंतिम एकात्मतेबद्दलची जाणीव जेवढी खोलवर गेली आणि जेवढी लांबवर पसरली तेवढी इतरत्र कुठेही आढळली नाही. आणि म्हणूनच व्यक्तिमत्त्वावर फारसा विश्वास नसणारी भारतीय मानवता पाश्चिमात्यांच्या व्यक्तिवादी मानवतेपेक्षा अधिक वैविध्यपूर्ण आणि अधिक समृद्ध ठरली.''

जातिव्यवस्थेची ही ऐतिहासिक कामगिरी रा. स्व. संघाला मान्य असली तरी श्री. बाळासाहेब देवरस यांनी सांगितल्याप्रमाणे ' आपल्यातली सामाजिक विषमता हे आपल्या अधःपतनाचे एक प्रमुख कारण आहे, याबाबत कोणताही संशय नाही. वर्णव्यवस्था अल्पावधीतच वर्ण-अव्यवस्था ठरली यात आश्चर्य मानण्याचे फारसे कारण नाही. सर्व वर्गभेद नाहीसे करण्यासाठी निघालेल्या साम्यवादाने, जिलासच्या शब्दांत सांगायचे झाले तर, पक्षनेत्यांच्या नव्या वर्गालाच जन्म दिला.

महत्त्वाची गोष्ट ही की आज हिंदू भारतीय जातिभेद नष्ट करण्यास सिद्ध झाले आहेत. संघ कोणतीही जातपात मानीत नाही, तो सर्वांना फक्त हिंदू मानतो, हे श्री गुरुजींनी ब-याच वर्षांपूर्वी स्पष्ट केले होते. ते म्हणाले होते, " लोकांची बहुसंख्याक आणि अल्पसंख्याक, अनुसूचित जाती आणि जमाती, आदिवासी, गिरिजन, मागासलेले वर्ग आणि अशाच इतरही काही वर्गांत विभागणी केली आहे ती राष्ट्रीय एकात्मतावाल्यांनीच. राष्ट्रीय प्रश्नांकडे पाहाण्याची ही दृष्टी मुळीच राष्ट्रीय नाही. या गरीब देशात ब्राह्मण लोकही इतरांइतकेच गरीब आहेत. त्यांच्यापैकी नव्वद टक्के लोकांना दिवसाकाठी दोन वेळचे धड

जेवणदेखील मिळू शकत नाही, हे या लोकांना ठाऊकदेखील नाही. एक काळ असा होता की जातिव्यवस्थेचा फार मोठा प्रभाव होता. पण आज मात्र ती कालबाह्य आणि विसंगत ठरली आहे. जी गोष्ट लवचिक नसते ती अल्पावधीतच निष्प्राण सांगाडा बनते. अस्पृश्यता केवळ कायद्याने रद्द होऊन चालणार नाही, तर ती प्रत्यक्षातही नाहीशी व्हायला हवी, असे मला वाटते. यासाठी आपल्या धार्मिक नेत्यांनी अस्पृश्यता नाहीशी करण्यास धार्मिक मान्यता द्यावी, असे मला मनापासून वाटते. आपली कर्तव्ये करीत राहाणे– मग ती कोणतीही असोत– आपली सर्व कार्यक्षमता पणाला लावून ती कर्तव्ये उत्कृष्ट रीतीने पार पाडणे, तसे करताना एखादे कर्तव्य वरच्या दर्जाचे आहे की खालच्या दर्जाचे, असा विचार न करता ते बजावणे हाच खरा माणसाचा 'धर्म' आहे. काम करणे ही एक प्रकारची आराधनाच आहे आणि ती भक्तिभावानेच केली गेली पाहिजे. जातिव्यवस्था ही मला एखाद्या जुन्या चिलखतासारखी वाटते. योग्य त्या काळी तिने आपले कर्तव्य बजावले, पण आज ती निरुपयोगी ठरली आहे. पश्चिम पंजाब आणि पूर्व बंगालमध्ये जातिव्यवस्था दुबळी होती म्हणूनच तेथे इस्लाम इतर ठिकाणांपेक्षा लौकर विजयी होऊ शकला. म्हणूनच जातिव्यवस्था म्हणजे काही हितसंबंधी लोकांनी संपूर्ण समाजावर लादलेली एक अनिष्ट प्रथा होती, असे मानायला मी तयार नाही. ती एका विशिष्ट काळात अत्यंत उपयुक्त अशी संस्था होती, तिने समाजाची उत्तम सेवा केली आणि आजूबाजूला सारी उलथापालथ होत असताना समाजाला एकत्र आणि स्थिर राखले."

रा. स्व. संघाची १९२५ साली स्थापना झाली तेव्हापासूनच संघात कधीही जातिभेद पाळला गेला नाही. १९३६ साली पुण्याच्या शाखेतल्या मकरसंक्रांतीच्या उत्सवाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. त्या समारंभाला डॉक्टर हेडगेवारही उपस्थित होते. बाबासाहेबांनी डॉक्टरांना विचारले, "काय हो, संघाचे सगळे स्वयंसेवक ब्राह्मण आहेत का ?" त्या प्रश्नाला उत्तर देताना डॉक्टर हेडगेवार म्हणाले, "स्वयंसेवक जेव्हा आमच्या ध्येयांचा प्रचार करीत असतात आणि नवे स्वयंसेवक मिळवीत असतात तेव्हा ते ब्राह्मण

असतात. जेव्हा ते दररोज व्यायाम किंवा कवायत करीत असतात तेव्हा ते क्षत्रिय असतात. जेव्हा ते संघाविषयीचे आर्थिक व्यवहार हाताळीत असतात तेव्हा ते वैश्य असतात आणि जेव्हा ते शाखांच्या किंवा शिबिरांच्या ठिकाणी स्वच्छतेचे काम करतात तेव्हा ते शूद्र असतात." हिंदू समाज ज्या चार परंपरागत जातींमध्ये विभागलेला आहे, त्या चारही जातींचा उल्लेख करून डॉक्टरांनी हेच सूचित केले की जातिभेद आता निरर्थक ठरल्याचे दाखवून देण्याचाच संघाचा प्रयत्न चालू आहे. महाराष्ट्रातल्या एकंदर कर्मठ वातावरणाच्या पार्श्वभूमीवर रा. स्व. संघातले ते जातिभेदविरहित वातावरण पाहून डॉक्टर आंबेडकर खूपच प्रभावित झाले होते.

आणि गांधीजींनीं जेव्हा १९४७ साली दिल्लीतल्या संघकार्यकर्त्यांसमोर भाषण केले तेव्हा त्यांनी रा. स्व. संघाच्या शिबिराला कित्येक वर्षांपूर्वी दिलेल्या भेटीची आठवण सांगितली होती. 'तुमची शिस्त, अस्पृश्यतेचा पूर्ण अभाव आणि कमालीचा साधेपणा पाहून मी त्यावेळी खूप प्रभावित झालो होतो', असे ते म्हणाले होते.

हे सारे भाषणे करून किंवा निषेधपत्रके काढून साध्य केले गेले नव्हते तर दैनंदिन व्यवहारातील आचरणाचा आदर्श घालून देऊन साध्य करण्यात आले होते.

१९३७ साली हिवाळ्यात डॉक्टर हेडगेवार रत्नागिरीजवळच्या कागल येथे होते. तेथे नव्यानेच सुरू झालेल्या संघशाखेला ते भगवा ध्वज प्रदान करणार होते. तो समारंभ एका स्थानिक मंदिरात आयोजित करण्यात आला होता. त्या समारंभासाठी येत असणाऱ्या काही हरिजन स्वयंसेवकांना देवळाच्या पुजाऱ्यांनी बाहेरच अडवले. डॉक्टर जेव्हा तेथे आले तेव्हा त्यांनी पुजाऱ्यांबरोबर चर्चा केली, पण काही उपयोग झाला नाही. मात्र तशा परिस्थितीत डॉक्टर त्यांच्याशी भांडत बसले नाहीत किंवा त्यांनी तेथे धरणे धरण्याचा निर्णयही घेतला नाही. उलट एक ना एक दिवस ते पुजारीदेखील संघात दाखल होतील, अशीच अपेक्षा त्यांनी ठेवली होती. ते फक्त एवढेच म्हणाले, "आमच्या लेखी, सगळे हिंदू सारखेच आहेत" आणि त्यांनी त्या समारंभाचे स्थळच

बदलले. सर्व स्वयंसेवक समान पातळीवर एकत्र येऊ शकतील अशा ठिकाणी तो समारंभ पार पडला. तो स्वयंसेवकांना आणि त्या पुजाऱ्यांनाही एक धडाच होता.

बाळासाहेबांनी संघाच्या अगदी पहिल्या प्रशिक्षण–शिबिराबद्दलच्या आठवणी सांगताना म्हटले होते, "अनेक महार स्वयंसेवक त्यावेळी आमच्याबरोबर होते. जेवायच्या वेळी काही स्वयंसेवक त्यांच्या बरोबर बसायला तयार नव्हते. तोपर्यंतच्या त्यांच्या आयुष्यात त्यांनी कधीही महाराबरोबर जेवण घेतलेले नव्हते. त्यांनी आपली समस्या डॉक्टरांसमोर मांडली. त्यांनी शिबिराची शिस्त त्या स्वयंसेवकांवर लादली नाही किंवा त्यांना हाकलूनही दिले नाही. ते फक्त एवढेच म्हणाले, 'एकत्र बसण्याचीच आपली प्रथा आहे. आपण तसेच बसू या.' आमच्यापैकी बहुतेकजण जेवणासाठी एकत्र बसले. ज्यांची तशी तयारी नव्हती, ते एका वेगळ्या रांगेत बसले. पण पुढच्या जेवणाच्या वेळी मात्र ते स्वयंसेवक आपणहून डॉक्टरांकडे आले, त्यांनी क्षमा मागितली आणि आपणहून आम्हा सर्वांबरोबर जेवायला बसले. डॉक्टरांनी अगदी प्रारंभीच जर त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई केली असती आणि त्यांना शिबिरातून हाकलून दिले असते तर त्यांचे असे हृदयपरिवर्तन कधीच घडून आले नसते."

अशीच शिकवण देणारा श्री. बच्छीराजजी व्यास यांच्याबद्दलचा एक प्रसंग सांगता येण्यासारखा आहे. श्री. बाळासाहेब देवरस ज्या शाखेचे प्रमुख होते त्या शाखेचे बच्छीराजजी एक स्वयंसेवक होते. अत्यंत कर्मठ अशा मारवाडी ब्राह्मण कुटुंबात जन्म झालेले बच्छीराजजी बाळासाहेबांच्या घरीदेखील जेवण घेत नसत. ते जेव्हा संघशिक्षावर्गाला सर्वप्रथम उपस्थित राहिले तेव्हा सर्वांच्या बरोबर जेवायला कसे बसावे, हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला. सगळ्यांसाठी एकत्र तयार केलेले अन्न कसे खायचे, हा त्यांना पडलेला प्रश्न बाळासाहेबांनी डॉक्टरांच्या कानांवर घातला. डॉक्टरांनी कुठल्याही नियमावर बोट ठेवून बच्छीराजजींना वर्गातून बाहेर घालवण्याचा मार्ग सुचवला नाही. बच्छीराजजींच्या मनात आवश्यक तो बदल घडेल, अशी त्यांना खात्री वाटत

होती. बच्छीराजजी एक गुणी आणि सच्छील स्वयंसेवक आहेत, हे ते जाणून होते. ते बाळासाहेबांना म्हणाले, "त्यांना वर्गाला येऊ दे. आपण त्यांना भांडी देऊ आणि त्यांच्यापुरते अन्नधान्यही देऊ. त्यांनी त्यांचे स्वतःचे जेवण तयार करून घ्यावे म्हणजे झाले." या प्रकारे पहिले वर्ष गेले. दुसऱ्या वर्षी मात्र बच्छीराजजींनी आपणहूनच डॉक्टरांना सांगितले– "मी सगळ्यांबरोबरच जेवायला बसेन !" हेच बच्छीराजजी पुढे भारतीय जनसंघाचे अध्यक्षदेखील झाले होते.

श्री. गुरुजीदेखील याच पद्धतीने काम करीत गेले. नुसता उपदेश करीत बसण्यापेक्षा आपल्या कृतीने धडा शिकवण्याची ही पद्धत होती. एका विद्यापीठातील वसतिगृहाचे संचालक हरिजन विद्यार्थ्यांना प्रवेश द्यायला नकार देत असल्याचे जेव्हा मार्च १९६९ मध्ये त्यांच्या निदर्शनास आणण्यात आले, तेव्हा ते म्हणाले, "मला हे ऐकून खूप वाईट वाटले. सुमारे चाळीस वर्षांपूर्वी मी बनारस हिंदू विद्यापीठात विद्यार्थी होतो. एका गरीब हरिजन विद्यार्थ्यासमोर जेवणाखाण्याची समस्या उभी राहिली होती. मला ते समजल्यावर मी माझ्या सहाध्यायी मित्रांशी चर्चा केली. त्यानंतर त्याच्याबरोबर जेवण घ्यायला सगळेजण आनंदाने तयार झाले. शिवाय त्याच्याकडून पैसेदेखील घ्यायचे नाहीत, असे ठरले. हे असे तब्बल दोन वर्षेपर्यंत चालले होते."

त्याचवेळी श्री. गुरुजींनी हे स्पष्ट केले होते की, जातिव्यवस्थेवर विनाकारण हल्ले चढवणे त्यांना आवडत नाही. ते म्हणाले होते, "अशी वाचाळ टीका करीत बसण्यापेक्षा जातिभेद हळूच नाहीसा करणे अधिक योग्य ठरेल, असे मला वाटते. गेल्याच आठवड्यात कोचीनला असताना एका एझवा सद्‌गृहस्थांबरोबर मी जेवलो तो जेवलोच, पण एका प्रतिष्ठित नंबुद्री ब्राह्मणालादेखील तसेच करायला लावले. ही समस्या सोडवण्याचा खरा मार्ग हाच आहे, गोंधळ माजवणे हा नव्हे." गरिबांची काळजी घेणे सगळ्यात महत्त्वाचे आहे, असे सांगून श्री. गुरुजी म्हणाले होते, "आपल्या राष्ट्रीय अधोगतीला राष्ट्रीय वृत्तीचा आपल्यातला अभाव जसा कारणीभूत आहे तसेच आपण गरिबांकडे केलेले दुर्लक्षदेखील जबाबदार आहे. सुखवस्तु लोकांनी गोरगरिबांच्या मुलांची थोडी-

फार तरी काळजी घ्यायलाच हवी."

स्वामी विवेकानंद म्हणत असत, "आपण वर्षानुवर्षे केवळ 'मातृदेवो भव, पितृदेवो भव, अतिथीदेवो भव' हेच पुनःपुन्हा म्हणत आलो. यापुढे आपण 'दरिद्रदेवो भव' आणि 'अज्ञानीदेवो भव' असे म्हटले पाहिजे. गरीब आणि अडाणीमाणूस हा यापुढे आपला देव झाला पाहिजे. त्याचे दारिद्र्य आणि अज्ञान दूर करण्यासाठी आपण झटले पाहिजे." विवेकानंदांचे हे सांगणे श्री. गुरुजी वारंवार स्वयंसेवकांना ऐकवीत असत. हे सांगणे अगदी सामान्य स्वयंसेवकांपर्यंत जाऊन पोचत होते. नवी दिल्लीतल्या भंगी कॉलनीत १९४६ साली गांधीजींनी आपले वास्तव्य सुरू करण्यापूर्वीच रा. स्व. संघाने तेथे आपले कार्यालय थाट-लेले होते, ही गोष्ट काही निव्वळ योगायोगाने घडलेली नव्हती.

त्या अगोदर, १९३८ साली, दिल्लीत एक गमतीशीर प्रसंग घडला होता. रा. स्व. संघाच्या दिल्ली शाखेचे कार्यालय त्यावेळी नवी दिल्लीतल्या हिंदुमहासभा भवनामधल्या काही खोल्यांमध्ये होते. प्रांत-प्रचारक श्री. वसंतराव ओक तेथे राहात असत. एक दिवस त्यांनी घेतलेली बैठक अपेक्षेपेक्षा जास्त लांबली. ती संपली तेव्हा बरीच रात्र झाली होती. तेव्हा लांब राहणाऱ्या काही स्वयंसेवकांनी ती रात्र तेथेच काढायचे ठरवले. दुसऱ्या दिवशी सकाळी ते उठतात न उठतात तोच त्यांना गडबड गोंधळ ऐकू आला. नुकत्याच बांधून पूर्ण झालेल्या लक्ष्मी-नारायण मंदिराच्या (म्हणजेच बिर्ला मंदिराच्या) दिशेने तो ऐकू येत होता. ते मंदिर जेमतेम फर्लांग अंतरावर होते. लगेच वसंतराव ओक, नारायणराव पुराणिक, वेदप्रकाश कोहली आणि इतर काही स्वयंसेवक काय झाले ते पाहण्यासाठी धावतपळत तिकडे गेले. तेथले दृश्य पाहून त्यांना धक्काच बसला. हजारो लोक तेथे जमले होते. त्या मंदिराचे उद्घाटन करण्यासाठी महात्मा गांधी आले होते आणि एका हरिजन मुलाला आपल्याबरोबर आत घेऊन जाण्याची त्यांची इच्छा होती. पण काही जुन्यापुराण्या मतांच्या पंड्यांचा त्या हरिजनाने मंदिरात शिरायला सक्त विरोध होता. आणि गांधीजी तर त्या मुलाला बरोबर घेतल्या-शिवाय आत जायला तयार नव्हते. प्रसिद्ध सनातनी नेते श्री. गणेशदत्त

गोस्वामी यांनी पंड्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न करून पाहिला, पण त्या मुलाला आत जाऊ द्यायला ते काही केल्या तयार होईनात. लौकरच घोषणा आणि प्रतिघोषणा सुरू झाल्या. ढकलाढकली आणि दंगामस्ती सुरू झाली.

थोड्याच वेळात गोंधळ इतका वाढला की कुणाचेही त्यावर नियंत्रण राहिले नाही. गांधीजींनादेखील इकडेतिकडे ढकलले-ओढले जात होते आणि त्यांचे सहकारी स्वत:ला सावरण्यातच मग्न होते. त्या चेंगराचेंगरीत एक वेळ अशी आली की श्वासोच्छ्वास घेणेदेखील गांधीजींना जड जाऊ लागले. अत्यंत विचित्र स्फोटक परिस्थिती निर्माण झाली. आणि अचानक काहीतरी घडले. व्ही. पी. कोहली यांनी आपल्या दैनंदिनीत त्या घटनेची नोंद करताना असे लिहून ठेवले की, " ते त्या पायऱ्यांजवळच्या भिंतीवर उभे होते. वसंतरावांनी खाली उडी टाकली, आणि गुदमरलेल्या महात्माजींना पाठीवर घेऊन ते सरसर पायऱ्या चढून वर गेले. " कोहली आणि इतरांनी त्या मुलाला घेऊन मंदिरात प्रवेश केला. मग सर्वजण आत आले. पंड्यांचा अशा रीतीने पराभव झाला आणि 'महात्मा गांधी की जय' अशा घोषणांच्या निनादात त्या मंदिराचा उद्घाटन सोहळा पार पडला.

अस्पृश्यता हा आपल्या धर्माचा भाग नाही, असे विविध पंथोपपंथांच्या मठाधिपतींनी आणि आचार्यांनी नि:संदिग्धपणे जाहीर करावे, यासाठी श्री गुरुजींनी बरेच प्रयत्न केले होते. डिसेंबर १९६९ साली उडिपी येथे भरलेल्या कर्नाटक विश्व हिंदू संमेलनात सर्वप्रथम जगद्गुरूंनी आणि धर्माचार्यांनी संपूर्ण हिंदू समाजाला 'अस्पृश्यता नष्ट करण्याचे' ऐतिहासिक आवाहन केले होते. पुन्हा एकदा जानेवारी १९७९ मध्ये प्रयाग येथे भरलेल्या जगातल्या लाखो हिंदूंच्या संमेलनातही हा विखार आपल्या समाजपुरुषाच्या शरीरातून काढून फेकून देण्याचे आवाहन करण्यात आले होते आणि त्याला देशभरातून जमलेल्या शेकडो धर्माचार्यांनी आपला पाठिंबाही व्यक्त केला होता.

मार्च १९७७ मध्ये जनता संसदीय पक्षाच्या बैठकीत रा. स्व. संघाच्या प्रभावाखालील जनसंघाने नेतेपदासाठी जे पहिले नाव सुचवले

ते बाबू जगजीवनराम यांचे होते. मोरारजीभाईंबद्दल कमी आदर होता म्हणून नव्हे तर 'व्हाइसरॉयच्या बंगल्यात झाडूवाल्याची मुलगी राहात असलेली पाहाण्याचे' गांधीजींचे स्वप्न पूर्ण व्हावे असे वाटत होते म्हणून ते नाव सुचवण्यात आले होते. तो काही निव्वळ योगायोग किंवा एखादा अपघात नव्हता.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्त्रीजातीकडे पाहाण्याचा दृष्टिकोनही असाच विधायक आणि विशाल आहे. भारतात स्त्रीला मिळालेल्या वागणुकीवर विदेशी टीकाकारांनी अनेक वेळा जोरदार टीका केली आहे. जेव्हा ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचे हस्तक मुसलमानांना हिंदूविरुद्ध आणि काही जातींना इतर जातींविरुद्ध भडकावीत होते, चिथावणी देत होते, तेव्हा मिस कॅथेरिन मेयो हिने भारतीय स्त्रियांना भारतीय पुरुषांविरुद्ध भडकावण्याचाही प्रयत्न करून पाहिला होता. पण वस्तुस्थिती मात्र अशी आहे की आपला देश मागासलेला आहे, दडपला गेलेला आहे म्हणूनच केवळ या देशातल्या स्त्रिया मागासलेल्या आणि दडपल्या गेलेल्या राहिल्या आहेत. अन्यथा भारतीय स्त्रीचे समाजातले स्थान दुसऱ्या कोणत्याही देशातल्या स्त्रीपेक्षा अधिक प्रतिष्ठेचे राहिले आहे, याला इतिहास साक्षी आहे.

टीकाकार नेहमी उल्लेख करतात की मनूने बायकोला मारण्यास परवानगी दिली आहे. ते सोयीस्कररीत्या हे विसरतात की मनूने केवळ बायकोलाच नव्हे तर मुलाला, शिष्याला आणि आपल्या भावालादेखील मारण्यास– त्यांनी चूक केली असेल तर– परवानगी दिली आहे. शिवाय 'केवळ पाठीवर मारावे, नाजूक भागांवर मारू नये' असेही सांगून ठेवले आहे. (८ : २९९–३००) मग मनू मुलांविरुद्ध होता, असेही म्हणावयाचे की काय? त्याच मनूने 'मुलीला मुलाच्या बरोबरीचे स्थान द्यावे' असे सांगितले होते. (१० : १३०) तेही विसरले जाते. त्यानेच लिहिले होते की, 'जेथे स्त्रियांचा योग्य तो मान राखला जातो तेथे देवांचा निवास असतो, जेथे स्त्रिया अपमानित जिणे जगतात, तेथे केलेली धर्मकृत्ये निष्फळ व निरर्थक ठरतात.' (३ : ५६) मुलगी वयात आल्यानंतर तीन वर्षांच्या आत आई-वडिलांनी जर तिचे

लग्न लावून दिले नाही तर ती आपल्या मनाप्रमाणे वर शोधायला मोकळी आहे, असेही त्याने सांगितले होते. खरोखर वरसंशोधनाचा अधिकार वधूला देणारी स्वयंवरासारखी संस्था आणि स्त्रीला स्त्रीधनाच्या रूपाने स्वतंत्र मालमत्ता देण्याची प्रथा फक्त हिंदू समाजातच आढळते, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

पितृसत्ताक पद्धतीला अनुसरून साऱ्या जगाने केवळ लिंगाचीच पूजा केली आहे, पण मातृसत्ताक तत्त्व लक्षात घेऊन योनीचीही पूजा फक्त हिंदूंनीच केली आहे. हिंदूंचे देव केवळ विवाहित आहेत, एवढेच नव्हे तर त्यांची नावे घेतानादेखील त्यांच्या पत्नीचे नाव प्रथम घेण्याची प्रथा रूढ झालेली आहे. उदाहरणार्थ– सीता-राम, राधे-श्याम, लक्ष्मी-नारायण. आपले सर्व धार्मिक विधी पती-पत्नींनी मिळून करावयाचे असतात. आपण आपल्या देशाची कल्पना करतो तीदेखील मातृभूमी म्हणून, भारतमाता म्हणून !

महंमद गझनीचा दरबारी इतिहासकार अल्-बैरूनी याने 'हिंदू लोक आपल्या जीवनात सर्व महत्त्वाच्या बाबींत आणि आणीबाणीच्या वेळीदेखील आपापल्या स्त्रियांशी सल्लामसलत करीत असतात' हे पाहून आश्चर्य व्यक्त केले होते. याउलट इतर देशांची स्थिती होती.

प्राचीन ग्रीसमध्ये तत्त्वज्ञांनी असा निष्कर्ष काढला होता की स्त्रियांना पुरुषांइतके ३६ दात येऊच शकत नाहीत. त्या निकृष्ट दर्जाच्या असल्याने त्यांना जास्तीत जास्त ३२ दातच येऊ शकतात. पण एखाद्या स्त्रीच्या तोंडातले दात खरोखरच मोजून या निष्कर्षाची सत्यता पडताळून पाहाण्याची त्यांना गरज भासली नाही. स्त्रियांनी जन्मभर रखडत चालावे या हेतूने चिन्यांनी आपल्या मुलींना लोखंडी जोडे घालण्याची सक्ती केली होती तर मुसलमानांनी आपल्या स्त्रियांना नखशिखांत बुरख्यात बंदिस्त करून टाकले होते. धर्मयुद्धे खेळण्यासाठी जेव्हा इंग्रज वीर बाहेर पडले तेव्हा त्यांच्यापैकी अनेकांनी आपल्या बायकांना साखळदंडांनी जखडून टाकले होते. प्रियकरावरोबर त्यांनी पळून जाऊ नये म्हणून तो उपाय योजण्यात आला होता. इ. स. १५९५ या एकाच वर्षात विटेनवर्ग या जर्मनीतल्या प्रमुख विद्यापीठात असे तब्बल ५०

प्रबंध लिहिण्यात आले होते की ज्यात स्त्री ही मानव नाही हे 'सिद्ध करण्यात आले होते !' मध्ययुगीन युरोपमध्ये चेटकिणी म्हणून अनेक स्त्रियांना जिवंत जाळण्यात येई, पुरुषांना मात्र कधीच त्या अग्निदिव्यातून जावे लागले नाही. शिवाजीविरुद्ध लढण्यासाठी अफझलखान विजापूर सोडून निघाला तेव्हा त्याने आपल्या ७०० बेगमांची सरसकट कत्तल केली होती. 'जर आपण परतलो नाही तर त्या दुसऱ्या कुणाशीतरी लग्न लावतील', असे वाटल्यावरून त्याने ते भीषण कृत्य केले होते.

या प्रकारच्या घटना हिंदू समाजात कालत्रयी घडणे शक्य झाले नसते.

फ्रेंच राज्यक्रांती आणि रशियन राज्यक्रांती या दोन्ही घटनांनी स्त्रीचे स्थान पूर्वीपेक्षाही खालच्या दर्जाचे करून टाकले. नेपोलियनच्या संहितेनुसार स्त्रीने पुरुषाची इच्छा प्रमाण मानणे आवश्यक ठरले (कलम २०३); पुरुष जाईल तेथे त्याच्या मागून जाणे हे तिचे कर्तव्य ठरले (कलम २१४); पुरुषाच्या संमतीशिवाय आपल्या मालमत्तेची विल्हेवाट लावण्याचा तिला अधिकार राहिला नाही (कलम २६७); व्यभिचारी स्त्रीला तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली जात असे, पण व्यभिचारी पुरुषाला मात्र नवे लग्न करण्यास परवानगी नाही, इतकीच शिक्षा दिली जाई (कलम २९८). नेपोलियनची ही संहिता युरोपमधल्या बहुतेक सर्व देशांनी स्वीकारली होती आणि तिच्यात स्त्रियांना अनुकूल असे बदल केले गेले ते अगदी अलीकडे म्हणजे दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात. मादाम डी स्टेल ही आपल्या काळातली सर्वात कर्तबगार फ्रेंच स्त्री होती, तिने जेव्हा नेपोलियनला विचारले की, "इतिहासातली सर्वश्रेष्ठ स्त्री कोण ?" तेव्हा तो शांतपणे उत्तरला होता, "जिने जास्तीत जास्त मुलांना जन्म दिला असेल ती !"

क्रांतीनंतरच्या रशियात स्त्रियांना जादा अकुशल कामगारांसारखेच वागवण्यात येते. शारीरिक कष्टाची कामे त्यांच्याकडून करवून घेतली जातात आणि पुरुष त्यांच्यावर 'देखरेख' करीत राहातात. ६० वर्षांपूर्वी रशियन स्त्रिया रशियन पुरुषांपेक्षा फक्त दोनच वर्षे कमी जगत असत. आता ते अंतर आठ वर्षांइतके वाढले आहे. स्त्रिया जास्तीत

जास्त डॉक्टर होऊ शकतात– सोव्हिएत युनियनमधला सर्वात कमी पगार मिळवून देणारा तो व्यवसाय आहे. पक्षाच्या केंद्रीय समितीवर फक्त ३ टक्केच स्त्रिया असतात. अमेरिकेन स्त्रीदेखील काही अधिक भाग्यवान नाही. त्या देशातील स्त्रिया पुरुषांपेक्षा जास्त काळ जगत असल्यामुळे पुरुषांच्या तुलनेने त्यांची मालमत्ता अधिक असते, हे मात्र खरे. खूप वर्षांपूर्वी स्वामी विवेकानंदांनी म्हटल्याप्रमाणे अमेरिकन स्त्रीला असणारे अधिकार निव्वळ दिखाऊ आणि निरर्थक आहेत तर भारतीय स्त्रीला असणारे अधिकार खरेखुरे महत्त्वाचे अधिकार आहेत.

भारतीय स्त्रीला हे जे मानाचे स्थान प्राप्त झाले आहे त्याचे कारण म्हणजे लैंगिक संबंध हे इथे पाप मानले जात नाही, तसाच तो करारही समजला जात नाही. तो एक संस्कार आहे असे मानले जाते. मदुराई आणि रामेश्वरम या क्षेत्रांना भेटी देऊन झाल्यावर काउंट कैसरलिंग यांनी लिहिले होते की, " इथे, माझ्या आयुष्यात प्रथमच, लैंगिक हालचालींकडे काहीतरी गलिच्छ म्हणून नव्हे, तर काहीतरी पवित्र म्हणून, निसर्गातील देवत्वाचे प्रतीक म्हणून पाहिले जात असलेले मला दिसले. रामेश्वरमच्या जत्रेत उपस्थित असणाऱ्या भाविकांच्या मनात कळसूत्री बाहुल्यांच्या रूपात शिव आणि शक्तीचे मीलन पाहात असताना कोणतेही अश्लील विचार मुळीच डोकावले नव्हते. आज रात्री त्या लिंगासमोर भक्तिभावाने नतमस्तक होणाऱ्या स्त्रियांच्या मनातील भावना ' निष्पाप गर्भधारणेची कल्पना ' (Ideal of Immaculate Conception) मनात बाळगून परमेश्वराची प्रार्थना करणाऱ्या स्पॅनिश भिक्षुणीच्या भूमिकेपेक्षा मुळीच वेगळी नव्हती. शारीरिक प्रेम हे दैवी सृजनशक्तीचे प्रतीक मानून प्रत्येक हिंदू भाविक ती भावना त्यागाच्या पवित्र विचारांची वाहक म्हणून उपयोगात आणतो. शास्त्रांत असे सांगितले आहे की, पतिपत्नींनी समागम करताना या मार्गाने आपल्या माध्यमातून खुद्द ब्रह्मच कार्यरत आहे, हा विचार मनात सतत बाळगावा. एकमेकांवर प्रेम करताना आपण ईश्वरी अंश आहोत हे लक्षात ठेवावे आणि केवळ वासनांची पूर्ती करण्यासाठी नव्हे, तर आयुष्यातील परमानंद साधण्याचे एक साधन म्हणून परस्परांचा योग्य तो मान राखावा. या रीतीने पशुतुल्य मूलप्रवृत्तींना ईश्वरी

शक्तीचे प्रतीक बनवण्यात हा समाज यशस्वी झाला आहे."

आणि पतीपत्नींचे संबंध हा एक संस्कार मानला जात असल्यामुळे हिंदू माणसाला घटस्फोटाची भीतीच वाटते. हिंदू विवाह हा जन्मजन्मांतरी टिकावा म्हणून केला जातो– निदान तो या आयुष्यभर तरी टिकून राहावा अशी अपेक्षा असते. (पंडित नेहरूंचे हिंदू कोड या बाबतीत काहीही म्हणो !) हिंदू स्त्रीची ही सर्वांत मोठी जमेची बाजू आहे. केवळ नवऱ्याच्या मनात दुसरी एखादी स्त्री भरली एवढ्या कारणावरून घरातून बाहेर काढले जाण्याचे तिला भय नाही. यामुळे तिला सुरक्षितता लाभली आहे, प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे आणि सन्मानाचे स्थान मिळाले आहे. कोणत्याही स्त्रीला मिळू शकणारा हा सर्वांत महत्त्वाचा अधिकार आहे. अनेक विदेशी मुली भारतीय मुलांशी लग्न करतात, पण फारच थोड्या भारतीय मुली विदेशी मुलांशी विवाहबद्ध होतात, याचेही कारण हेच आहे.

स्थिर कुटुंब हा स्थिर समाजाचा आधार असतो. सुरक्षित कुटुंबव्यवस्था आणि जातिव्यवस्था यामुळे भारतीय समाजाला जे स्थैर्य प्राप्त झाले आहे त्याचे साऱ्या जगाला आश्चर्य वाटते. या देशाला अमरत्व प्रदान करणारे असे जे काहीतरी आहे, त्याबद्दल इक्बालनेसुद्धा आश्चर्य व्यक्त केले होते. 'कुछ बात है कि हस्ती मिटती नहीं हमारी।' आपल्या देशाचे आकारमान आणि आपली लोकसंख्या याव्यतिरिक्त आपल्या देशाला आगळेपण प्राप्त करून देणाऱ्या प्रमुख गोष्टी म्हणजे आपली कुटुंबसंस्था आणि जातिव्यवस्था याच होत. इतिहासात अत्यंत धकाधकीच्या आणि उलथापालथीच्या काळात याच संस्थांमुळे आपण संकटांमधून बाहेर पडू शकलो आहोत.

हिंदू कुटुंबसंस्थेचे पावित्र्य संघाला आदरणीय वाटते. ते तसेच कायम राहावे, अशी संघाची इच्छा आहे. गांधीजींच्या शब्दांत सांगायचे झाले तर 'आपल्याभोवती अनेक रोमिओ घेऊन फिरणाऱ्या आधुनिक ज्युलिएट'बद्दल संघाला मुळीच सहानुभूती वाटत नाही. 'स्त्रीमुक्ती'च्या घोषणा देणारे लोक हे त्या अर्थाने स्त्रीत्वाचे कट्टर शत्रू आहेत, असे

संघाला वाटते. स्वैराचार कोणत्याही समाजाला बाधक ठरेल, असेच श्री. गुरुजींचे स्पष्ट मत होते. मोगल राजवटीचे शेवटचे दिवस किंवा मराठा अमदानीचे शेवटचे दिवस या दृष्टीने न्याहाळले तर त्या दिवसांत नीतीबंधनांमध्ये शैथिल्य निर्माण झाल्याचे दिसून येते. त्या काळच्या साहित्यातही त्या शैथिल्याचे प्रतिबिंब पडलेले दिसते. ती अधोगती आणि ते शैथिल्य यांचा परस्परसंबंध स्पष्ट करून सांगण्याची मुळीच गरज नाही.

इतर गोष्टींप्रमाणेच या बाबतीतही संघ उपदेश करण्याऐवजी आचरणाने आदर्श घालून देण्याचा मार्ग अनुसरतो. स्वयंसेवक स्त्रियांच्या हक्कांबद्दल उच्चस्वरात घोषणा देताना आढळणार नाहीत, पण त्या हक्कांचे रक्षण व्हावे म्हणून प्रयत्न करणाऱ्यांत ते अग्रभागी असतील.

हेडगेवार कलकत्त्यात वैद्यकीय शिक्षण घेत होते तेव्हाची गोष्ट. क्रांतिकारकांचे नेते श्री. श्यामसुंदर चक्रवर्ती यांच्या मुलीच्या लग्नाचा प्रश्न उपस्थित झाला होता. त्या लग्नासाठी थोडयाफार पैशांची गरज होती. हेडगेवारांनी हुंडयाच्या योग्यायोग्यतेबाबत चर्चा करीत न बसता शांतपणे काही रक्कम जमवली आणि ते लग्न व्यवस्थित पार पाडले.

असेच एकदा डॉ. हेडगेवार आर्वी येथे श्री. गोविंदराव देशपांडे या आपल्या मित्राच्या घरी उतरले होते. तेव्हा गोविंदरावांच्या भाचीचे एक पत्र आले. 'माझे काका माझे लग्न एका म्हाताऱ्याशी लावून देणार आहेत', असे त्या पत्रातून भाचीने कळवले होते. गोविंदराव मोठ्या काळजीत पडले. पण केशवरावांनी त्यांना सांगितले, "तुम्ही काही काळजी करू नका. आवश्यक ते सारे मी पाहून घेतो." लग्नाच्या मुहूर्तावर अचानक डॉक्टर हेडगेवार तेथे गेले, वरपक्षाची मंडळी तेथे जमलेली असताना त्यांनी वधूला बरोबर घेतले, मोटारीत घातले आणि सर्वांसमक्ष तेथून ते निघून आले. नंतर त्यांनी तिचे तिच्या प्रियकराबरोबर लग्न लावून दिले. त्या म्हाताऱ्या 'वरा'ने डॉक्टरांवर खटला भरला, पण त्याची त्यांनी मुळीच फिकीर बाळगली नाही.

दुसरा एक प्रसंग. सुप्रसिद्ध मराठी साहित्यक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर प्रेमात पडले होते. त्यांच्या सर्व कुटुंबियांचा त्यांना विरोध

होता. पण डॉ. हेडगेवारांनी त्यांना सांगितले, 'काही काळजी करू नका.' डॉक्टरांनीच ते लग्न लावून दिले. प्राचीन हिंदू कायद्यातही गांधर्वविवाहासारख्या प्रेमाला मान्यता दिलेली होती, हे आपण विसरता कामा नये.

श्री गुरुजी हे आपल्या मातापित्यांचे जगलेवाचलेले एकुलते एक चिरंजीव होते. साहजिकच त्यांना लग्न करण्याबद्दल बराच आग्रह झाला. एकदा त्यांना एक मुलगी पाहाण्याच्या कार्यक्रमाला मुद्दाम नेण्यात आले. जेव्हा घरी परतल्यावर त्यांना विचारण्यात आले की, 'मुलगी कशी काय वाटली ?' तेव्हा त्यांनी आपण मुलगी पाहिलीच नसल्याचे, सर्व वेळ डोळे मिटून बसल्याचे सांगितले. पुढे खूप वर्षांनी म्हणजे १९६९ साली पुण्यात श्री. अमरेन्द्र गाडगीळ यांचा 'मातृ पूजन' हा ग्रंथ प्रकाशित करीत असताना ते म्हणाले होते, "मुलगी पाहाणे म्हणजे काय ? मुलगी म्हणजे काय नाटक-तमाशा आहे की आपण जायचे आणि पाहायचे ?"

श्री गुरुजी सर्व स्त्रियांकडे माता म्हणूनच पाहात असत. माणूस फक्त मातेचा हात धरूनच परमेश्वराप्रत जाऊ शकतो. या संदर्भात ते नेहमी भगवान रामकृष्ण परमहंसांच्या आयुष्यातील एक प्रसंग वर्णन करून सांगत असत. रामकृष्ण जरी अद्वैतवादी झाले असले तरी ते कालीची आराधना करीतच असत. याचे त्यांचे प्रारंभीचे गुरू तोतापुरी यांना आश्चर्य वाटत असे. याच तोतापुरींना एकदा तीव्र अतिसाराची लागण झाली. त्याचा त्रास एवढा वाढला की तोतापुरींनी गंगेत उडी टाकून जीव द्यायचा निर्णयही घेतला, पण बुडून जाण्याइतके गंगेत पाणी नसल्याचे त्यांना आढळले. त्या वैफल्यावस्थेत असतानाच त्यांना जगन्मातेचे दर्शन झाले. माता त्यावेळी तोतापुरींना म्हणाली, "तुम्ही फक्त माझ्या मदतीनेच परमेश्वराच्या जवळ जाऊ शकाल. तुम्हाला ब्रह्मज्ञान होईल तेदेखील माझ्याच मदतीने !" त्यानंतर तोतापुरींनीदेखील कालिमातेची आराधना सुरू केली. मॅडोनाच्या कल्पनेमुळे– लहानग्या जीझसला घेऊन उभ्या असणाऱ्या मेरीमुळे– ख्रिस्ती तत्त्वज्ञानाचेही उदात्तीकरण झाले, असेही श्री गुरुजी सांगत असत.

खाजगी जीवनातील विशुद्धतेवर रा. स्व. संघाची श्रद्धा आहे. स्त्रीपुरुष संबंधांच्या पावित्र्यावर संघाचा विश्वास आहे. हजारो तरुण प्रचारक झाले आहेत आणि ते सारे प्रचारक एकजात ब्रह्मचारी आहेत. पण रा. स्व. संघाच्या नेतृत्वाचे वर्तन इतके आदर्शवत आहे आणि संघाच्या तत्त्वज्ञानाचे आवाहन एवढे परिणामकारक आहे की या संदर्भात एखाद्या आश्रमाइतकीच ही संघटना भानगडींपासून अलिप्त राहिली आहे.

म्हणून आधुनिक काळाच्या दृष्टीने विचार करता संघ हा जुनाट धर्तीचा वाटतो. पण शाश्वत मूल्यांचा विचार करता, पतिपत्नींचे नाते पवित्र आणि विवाहसंबंध हा एक संस्कार मानणाऱ्या हिंदू जीवनपद्धतीचे उदात्त आदर्श घेऊन तो वाटचाल करीत आहे. डॉक्टरांनी राष्ट्रीय सेविका समितीच्या स्थापनेला शुभेच्छा दिल्या, आशीर्वाद दिले ते विनाकारण नव्हते. पण त्याचवेळी त्यांनी हे स्पष्ट केले होते की ती संघटना रा. स्व. संघापासून संपूर्णपणे वेगळी राहील. त्यांनी मावशींना सांगितले होते की, ‘ समितीच्या कामकाजात आपण आपल्या मुलाचासुद्धा सल्ला घेऊ नये, केवळ वडीलधाऱ्या अप्पाजी जोशींशीच काय तो विचारविनिमय करावा. आपल्या दोन्ही संघटना रेल्वेच्या रूळांप्रमाणे समांतर पण वेगवेगळ्या असायल्या हव्यात.’ जर दोन्ही रूळ एकमेकांना मिळाले असते तर संघ आणि समिती यांच्या रूपाने पुढे जात असणारी राष्ट्रीय चळवळ घसरली असती, थबकली असती. पण तशी चूक संघाने होऊ दिली नाही. कारण संघाने मानवी स्वभाव आणि हिंदू संस्कृतीचे मर्म पुरेपूर ओळखले होते.

## प्रकरण चौदावे : इतिहास हेच खरे तत्त्वज्ञान !

नेपोलियन मृत्युशय्येवर पहुडलेला असताना म्हणाला होता, " माझ्या मुलाने इतिहासाचा अभ्यास करावा कारण तेच एकमेव खरे तत्त्वज्ञान आहे !"

भारताचा इतिहास हेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तत्त्वज्ञान आहे म्हणजे त्या राष्ट्रीय इतिहासातूनच या राष्ट्रीय संघटनेचे तत्त्वज्ञान घडले आहे.

वैदिक द्रष्टयांनी म्हटले होते– ' माता भूमि: पुत्रोऽहम् पृथव्याह।' म्हणजे ही भूमी म्हणजे माता असून मी तिचा पुत्र आहे.' तर पुराणांनी म्हटले होते–

' उत्तरं यत्समुद्रस्य दक्षिणं हिमवत्‌गिरे: ।
वर्षं तद् भारतानां भारती यत्र सन्तति: ॥ '

" सागराच्या उत्तरदिशेला आणि बर्फाच्छादित पर्वतांच्या दक्षिणेला असणारी ही भूमी भारत म्हणून ओळखली जाते आणि जे लोक या भूमीला मातृभूमी मानतात आणि इथे भूमिपुत्रांसारखे राहातात ते सारे भारतीय आहेत."

हे जग खरे आहे, या जगरहाटीत तथ्य आहे, इथले सारे शाश्वत आहे– चिरंतन आहे असे मानणारा या देशातला समाज खराखुरा समाधानी होता.

'ध्रुवः द्यौः ध्रुवः पृथ्वी ध्रुवसः पर्वता इमे ।
ध्रुवं विश्वमिदं जगत् ध्रुवो राज विषमयम् ॥'

हे आकाश जसे शाश्वत आहे तशीच ही धरित्रीदेखील शाश्वत आहे, हे पर्वत शाश्वत आहेत, हे सारे जगच मुळी शाश्वत आहे. आणि हा लोकसेवक राजा– तो देखील शाश्वत आहे, अमर आहे.

या भूमीच्या अणूरेणूवर इथल्या लोकांचे नितांत प्रेम आहे. ती विष्णुपत्नी आहे असे समजून ते तिची पूजा करतात आणि तिच्यावरून पायी चालल्याबद्दल तिची क्षमादेखील मागतात. कालिदास हिमालयाचे वर्णन 'शिवाचे स्मितहास्य' अशा शब्दांत करतो. या देशात अश्वमेध आणि राजसूय यज्ञ करणारे चक्रवर्ती राजे होते. त्याचप्रमाणे प्रजासत्ताक राज्येदेखील होती. सभा-समित्या होत्या, गुप्त मतदान होत होते आणि गणसंख्यादेखील विचारात घेतली जात होती. वर्ण आणि आश्रम यांच्यावर आधारलेल्या धर्मामुळे देशात विविधता असतानाही एकात्मता नांदत होती. सार्वभौमत्व हे राजामध्ये म्हणजेच एका व्यक्तीमध्ये सामावलेले ठेवले गेले नाही तर परस्परांवर वेगवेगळी नियंत्रणे ठेवणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण यंत्रणेकडे ते सुपूर्त करण्यात आले होते आणि आणि संतांनी सांगितलेल्या धर्माच्या अन्वयार्थानुसार ते अमलात आणले जात होते. देशाच्या कानाकोपऱ्यांमधील तीर्थक्षेत्रांची स्थापना– बलुचिस्तानातल्या हिंग्लजपासून बांगलादेशातल्या चितगावपर्यंत– देशाच्या एकात्मतेचे पोषण करीत होती आणि लोकांमधले सामंजस्यदेखील वाढीस लावत होती.

लोक इकडून तिकडे आणि तिकडून इकडे सतत जा-ये करीत, होते, पण 'आर्यांचे आक्रमण' नामक घटना कधी घडलीच नाही. आपल्या राजवटीला समर्थन मिळावे या हेतूने ब्रिटिशांनी तो धादांत खोटा सिद्धांत प्रचारात आणला. या देशावर सतत परकीयांचेच राज्य होते– मग ते आर्य असोत, मुघल असोत किंवा ब्रिटिश असोत– असे त्यांना भासवायचे होते. पण डॉ. आंबेडकरांनी दाखवून दिल्याप्रमाणे या संदर्भातल्या सर्वोत्कृष्ट पुराव्यात म्हणजे खुद्द वेदांमध्येच तसा कोणताही ओझरता उल्लेखदेखील आढळत नाही. चाणक्याच्या मतानुसार शूद्र

हे देखील आर्यंच होते. तर दस्यू सर्व जातींमध्ये असल्याचा महाभारतात उल्लेख आहे. इ. स. ४०० च्या पूर्वी या देशात अस्पृश्यतेचा मागमूस-देखील नव्हता, असे डॉ. आंबेडकरांचेच मत होते. त्या सुमारास बौद्ध तत्त्वज्ञानाच्या सात्विक प्रभावाखाली असणाऱ्या गुप्त सम्राटांनी विशिष्ट प्रकारच्या मांसाहारावर निर्बंध घातले. ते निर्बंध डावलून जे लोक मांसाहार करीतच राहिले, त्यांना समाजाबाहेर टाकले गेले, अस्पृश्य ठरवण्यात आले.

आपल्या राष्ट्रीय सीमा हिमालयापासून दक्षिणसागरापर्यंत पसर-लेल्या होत्या. आपला प्रभाव मात्र त्या सीमांच्या पलीकडेही इराण, मंगोलिया, सायबेरियापासून व्हिएतनाम, इंडोनेशियापर्यंत आणि भिक्षू चमणलाल यांचे म्हणणे ग्राह्य मानले तर हिंदू अमेरिकेपर्यंतदेखील पडला होता. हा देश इतका संपन्न आणि समृद्ध होता की अलेक्झांडरपासून पुढे जगातल्या सर्व साहसवीरांना हा देश लुटावासा वाटत होते. आणि आपले कलानैपुण्य आणि विज्ञान प्रावीण्य इतके व्यापक होते की साऱ्या जगातले सत्यशोधक काशी, वैशाली, नालंदा आणि तक्षशिला येथे येत होते. भारतवर्ष 'जगद्‌गुरू' मानला जात होता. भारताचा पहिला मुस्लिम इतिहासकार अल्-बैरूनी याने लिहून ठेवल्याप्रमाणे, "साऱ्या जगात आपल्या देशासारखा दुसरा देश नाही, आपल्या राष्ट्रासारखे दुसरे राष्ट्र नाही, आपल्या राजांसारखे दुसरे राजे नाहीत, आपल्या धर्मासारखा दुसरा धर्म नाही, आपल्या विज्ञानासारखे दुसरे विज्ञान नाही, असे हिंदू लोक मानतात." जगातले संस्कृतीचे दुसरे मोठे केंद्र म्हणजे चीन. त्या देशानेसुद्धा भारताला ('इंटु') चुंग क्यो म्हणजे जगाच्या केंद्रस्थानी असणारे राज्य म्हणून मान्यता दिली.

आज आपल्या राष्ट्रीय सीमा एवढ्या संकुचित होत गेल्या आहेत की आता लाहोर आणि डाक्का ही शहरेदेखील आपल्या दृष्टीने परकी ठरली आहेत, ज्या नदीवरून आपल्या देशाचे नामकरण झाले ती सिंधू नदीदेखील आज भारताबाहेर आहे. भारत जगातल्या सर्वांत गरीब देशांपैकी एक ठरला आहे. आता पूर्वीसारखे विदेशी विद्वान या देशात येत तर नाहीतच, पण आपल्याच देशातले हजारो लोक परदेशांत

शिक्षणासाठी जाऊ लागले आहेत. साऱ्या जगावर आज ख्रिश्चनांचे वर्चस्व आहे तर पंचवीसएक देशांत मुसलमानांचे राज्य आहे. पण संख्येने त्यांच्याइतकेच असणारे हिंदू मात्र अगदी हिंदुस्थानातदेखील दडपले जात आहेत. प्रत्येक सच्च्या भारतीयाला ही परिस्थिती क्लेशकारक वाटते. आपल्या या अधोगतीला किंवा दुरवस्थेला कारणीभूत ठरलेले घटक लक्षात घेऊन देशाला आपल्या पायांवर पुन्हा उभे करण्याचे आणि जगात योग्य ते मानाचे स्थान मिळवून देण्याचे गेल्या शतकात जे अनेक प्रयत्न झाले त्यातलाच एक प्रयत्न म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ होय. या देशाच्या वैभवाचा ऱ्हास असंघटनामुळे किंवा विघटनामुळे झाला, असे संघाला वाटते. आणि ते इतिहासावरून स्पष्ट होतेच. जर आपल्या राजेरजवाड्यांमध्ये दुफळी नसती तर गझनीच्या महंमदाला किंवा महंमद घोरीला किंवा क्लाइव्हला भारतावर वर्चस्व प्रस्थापित करताच आले नसते.

ज्यावर आपले भारतीयांचे नियंत्रण नव्हते अशा इतर काही शक्तीदेखील कार्यरत होत्या, असे दिसते. अर्नोल्ड टॉयनबी यांनी म्हटल्याप्रमाणे इंडिक, (भारतीय), सायनिक, (चिनी), सीरियाक (मुस्लीम) व ग्रेकोरोमन या चार प्रमुख संस्कृतींचा जगावर प्रभाव पडलेला आहे, तसाच परस्परांवरही त्यांचा परिणाम झाला आहे. अलेक्झांडर आणि इतर ग्रीक राजांनी पश्चिम आशियावर जे हेलेनीकरण लादले त्याची सीरियाक प्रतिक्रिया म्हणजेच इस्लामचा उदय. त्या धर्माकडून आव्हान दिले गेल्यामुळे युरोपच्या ख्रिस्तीकरणाला चालना मिळाली, वेग आला. तोपर्यंत युरोपमध्ये असंख्य टोळ्या नांदत होत्या आणि त्यांचे वेगवेगळे देव, निरनिराळ्या चालीरीती प्रचलित होत्या. इस्लामविरुद्ध ख्रिश्चनांनी पुकारलेल्या धर्मयुद्धांमुळे स्थानिक राष्ट्रवादाला उठाव मिळाला आणि त्याचा परिणाम म्हणून अनेक ख्रिश्चनांना व मूर्तिपूजकांना बहुसंख्याकांचा धर्म असणारा इस्लाम स्वीकारणे भाग पडले. धर्मयुद्धे संपली पण कुणालाच निर्णायक विजय मिळाला नाही. त्यानंतर 'केप ऑफ गुड होप'च्या मार्गे अरबी समुद्रात प्रवेश करून युरोपीय लोकांनी इस्लामवर मात करण्याचा प्रयत्न केला, तर तुर्क-

स्थानने इजिप्त गिळंकृत करून पोर्तुगीजांशी आणि इतर ख्रिश्चनांशी अरबी समुद्रात मुकाबला करण्याची तयारी चालवली. लाल समुद्राच्या दुसऱ्या बाजूला बोटी बनवण्याइतके पुरेसे लाकूड उपलब्ध नव्हते हे ख्रिश्चन 'काफिरां'विरुद्धच्या लढ्यातले तुर्कस्थानचे दुर्दैव तेथे आड आले. आणि या दोन्ही साम्राज्यवाद्यांच्या कात्रीमध्ये भारत सापडलेला होता.

तेवढ्यावरच सारे काही संपलेले नव्हते. इराण, इराक, मोसुल आणि खोरासान येथे अनेक भारतीय पिढ्यानुपिढ्या राहात होते. अझरबैजानमध्ये अग्निपूजेचा ( Magism ) उदय झाल्यावर इराणचा राजा गुष्टप त्या पद्धतीने खूप प्रभावित झाला. त्याने सर्व हिंदूंची हकालपट्टी केली. स्वाभाविकच भारतात पश्चिम आशियातल्या लोकांबद्दल एक प्रकारचा संताप निर्माण झाला. आणि म्हणूनच एका हातात तलवार आणि दुसऱ्या हातात कुराण घेऊन इस्लामने जेव्हा त्याच दिशेकडून भारतात प्रवेश केला तेव्हा लोकांना आणखी खेद झाला.

गझनीच्या महंमदाबरोबर भारतात आलेला इतिहासकार अल-बैरूनी याने लिहून ठेवले आहे की, "हिंदू लोक प्रत्येक बाबतीतच आमच्यापेक्षा निराळे आहेत. त्यांचा ज्या गोष्टींवर विश्वास आहे त्यांच्यावर आमचा मुळीच विश्वास नाही, त्यांचा धर्म आमच्या धर्मापेक्षा पार वेगळा आहे. फार झाले तर ते शब्दाशब्दी करतील, पण आपला आत्मा किंवा शरीर किंवा मालमत्ता धार्मिक वादावादीत कधीही पणाला लावणार नाहीत." महंमदाने या देशाच्या वैभवाची नासधूस करून हिंदूंची धूळधाण उडवून दिल्याचे नमूद करताना हिंदूंचे विखुरलेले अवशेषदेखील मुसलमानांचा तिरस्कार करीत असल्याचेही अल्-बैरूनीने नोंदवून ठेवले आहे.

हे सारे पाहून खुद्द महंमद पैगंबरालाही जबरदस्त धक्का बसला असता. त्याच्या एका पत्नीचे नाव 'हिंद' असे होते आणि 'अल्लाने या हिंदवर आणि तिचे नाव धारण करणाऱ्या देशावरही मेहरनजर करावी' असे तो म्हणत असे.

राष्ट्रांच्या भाग्यचक्रानुसार होणाऱ्या चढउतारांव्यतिरिक्त

भारतातील फाटाफुटीला, दुहीला आणि शक्तिहीनतेला प्रभाव ओसरू लागलेला बौद्धधर्मदेखील जबाबदार होता. पृथ्वीराजाच्या दरबारातील चांदबरदाई नावाच्या कवीने जसा बौद्धधर्मीयांना दोष दिला आहे तसा नोबेल पारितोषिक विजेते अर्थशास्त्रज्ञ प्रा. कुझ्नेत्स यांनीही बौद्धधर्म प्रभाव गाजवीत असताना काही शतके या देशातली लोकसंख्या कमी कमी होत गेल्याचेही दाखवून दिले आहे. तत्त्वज्ञ काउंट कैसरलिंग यांनी म्हटले आहे, "बुद्धाचा उपदेश अभ्यासत असताना मला अनेकदा असा प्रश्न पडला आहे की माणसांची झाडे बनवावीत अशीच त्याची इच्छा होती की काय ? कारण तो तसेच वागलेला दिसतो, यात शंका नाही."

सुदैवाने आपला भारत इतका मोठा आहे की त्यावर संपूर्णरीत्या प्रभाव गाजवणे किंवा उलथापालथ घडवून आणणे कठीण आहे. आपण लगेच संरक्षणात्मक पवित्रा घेतला. अमेरिकेतील इंडियनांची जशी सरसहा कत्तल केली गेली, तशी आपली होऊ शकली नाही कारण— पुन्हा आपले प्रचंड संख्याबळ ! जातिव्यवस्था, पंचायतपद्धती आणि जानपदासारख्या आपल्या सामाजिक यंत्रणादेखील आपल्या मदतीला आल्या. आक्रमणाच्या लाटा थोपवून धरताना त्यांचा खूप उपयोग झाला. इराणमध्ये मात्र राष्ट्रीय ऐक्याचे एकमेव प्रतीक असणारी राजेशाही बाजूला सारली जाताच लोकसंख्या म्हणता येईल अशी कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नसल्यामुळे तो देश अगदी रसातळाला गेला. आपल्याला मात्र आक्रमकांच्या अन्याय्य राजवटीला विरोध करीत राहाणे या सामाजिक संस्थांच्या अस्तित्वामुळे शक्य झाले. संग आणि हेमू, प्रताप आणि शिवाजी, गुरू गोविंदसिंग आणि विजयनगरचा कृष्णदेवराय या वीरांनी इस्लामी आक्रमण मोडून काढले. जेते बनण्यासाठी आलेल्या लोकांवरच विजय मिळवण्यात आला होता. अगदी तेराव्या शतकातला अमीर खुशरूसारखा कवी असे म्हणून गेला की, "मुसलमानांना भारत हे एखाद्या नंदनवनासारखे वाटते तर उर्वरित जग एखाद्या तुरुंगासारखे. मक्कादेखील दिल्लीभोवती प्रदक्षिणा घालू लागेल. या देशातले लोक देवदूतांसारखेच आहेत."

या संदर्भात मार्क्सचे म्हणणे असे की, "अरब, तुर्क, तातार,

मोगल या एकापाठोपाठ एक भारतावर चाल करून आलेल्या आक्रमकांचे लौकरच हिंदूकरण होत गेले. असंस्कृत आक्रमकांवर जितांची श्रेष्ठ संस्कृती विजय मिळवते, हा तर इतिहासाचा शाश्वत सिद्धांतच आहे मुळी. " मार्क्सने भारतीयांचा वारंवार 'हिंदू' असाच उल्लेख केलेला आहे, हेदेखील लक्षात घेण्यासारखे आहे. इस्लामचे युरोपवरील हल्ले त्या खंडाच्या ख्रिस्तीकरणाला गती द्यायला जसे कारणीभूत ठरले आणि ख्रिस्ती धर्मयुद्धांमुळे पश्चिम आशियाचे इस्लामीकरण जसे पूर्ण झाले तसेच भारतावरच्या मुसलमानांच्या हल्ल्यांमुळे या देशातील विविध टोळयांचे 'संस्कृतीकरण' किंवा 'हिंदूकरण' व्हायला खूपच मदत झाली. मॅक्स वेबरच्या मते ८०० वर्षांच्या मुसलमान अमदानीत या टोळयांपर्यंत हिंदू धर्म जाऊन पोचला. इंडोनेशिया-मलेशियापर्यंत जाऊन पोचलेल्या इस्लामला भारतात मात्र शह दिला गेला. थोर उर्दू कवी हालीने म्हटल्याप्रमाणे,

'वह दीनेइलाही का बेबाक बेडा
निशाँ जिसका अक्साई आलम में पहुँचा
मझहिम हुआ कोई खतरा ना जिसका
ना 'अम्मान' में थिथका ना 'कुल्झम में झिझका
किये पासिपार जिसने सातों समंदर
वह डूबा दहाने में गंगा का आकर'

'इस्लामची बेधडक निघालेली बोट– ज्यावरचे निशाण सर्व जगात फडकत होते, अम्मानमध्ये किंवा कुल्झममध्ये कोणत्याही धोक्यापुढे जी डगमगली नाही, जिने सातासमुद्रांची यशस्वी सफर केली ती– इथे आली आणि गंगेच्या प्रवाहात बुडून गेली.'

अर्थात या प्रक्रियेत आपल्यालाही अनेक जखमा झाल्या. लाखो लोकांना गुलाम बनवण्यात आले आणि 'जिप्सी' म्हणून जगात भटकण्यासाठी नेण्यात आले. त्या परिस्थितीचे आव्हान पेलता यावे म्हणून परदेशातल्या भारतीयांना परत बोलावण्यात आले आणि समुद्रबंदी लादण्यात आली. यामुळे संपूर्ण आग्नेय आशियावरचा आपला प्रभाव लोप पावला. उत्तर व्हिएतनामने चीनचा पाठिंबा मिळवला आणि भारतीयांच्या

पाठिंब्यावर अवलंबून असणाऱ्या दक्षिण व्हिएतनामचा पराभव केला. जगाचे केंद्र म्हणजे 'चुंग क्यो' आता आपणच आहोत, असेदेखील चीनने जाहीर करून टाकले.

या बाहेरून येणाऱ्या मुसलमानांवर भारताचा इतका प्रभाव पडत होता की अकबर पूर्ण शाकाहारी बनला तर दारा शुकोह संस्कृतचा गाढा व्यासंगी विद्वान झाला. सगळे मोगल सम्राट फक्त गंगाजलच पिऊ लागले. ई. बी. हॅवेल यांनी म्हटले आहे की, "ताजमहाल किंवा विजापुरातल्या मोठमोठ्या इमारती बांधण्याची प्रेरणा कुठून मिळाली असेल याचा शोध घ्यायचा असेल तर आपण अरबी, पर्शियन किंवा युरोपीय कलाक्षेत्राचा धांडोळा घेण्याऐवजी भारतीय कलाक्षेत्रच अभ्यासले पाहिजे. सेंट पॉल्स कॅथेड्रल किंवा वेस्टमिन्स्टर अॅबे जितके इंग्लिश कलेचे नमुने आहेत त्याहून अधिक प्रमाणात ही स्मारक शिल्पे भारतीय आहेत."

पण पश्चिम आशियाचा भारतावरचा प्रभावही मोठा लक्षणीय होता. शिवाजीदेखील एखाद्या मुघल सरदारासारखा वेष परिधान करीत असे. आणि त्याने मिर्झाराजे जयसिंग यांना लिहिलेले पत्र– सर्व हिंदूंना एकत्र आणण्याचे आवाहन करणारे पत्र– पर्शियन भाषेत लिहिले होते. धर्मांतराची ती लाट अगदी परवापरवापर्यंत– म्हणजे खुद्द गांधीजींच्या मुलाने, नेहरूंच्या बहिणीने आणि कृपलानींच्या भावाने इस्लामचा स्वीकार करीपर्यंत– चालूच होती. त्यांच्यापैकी दोघांनी जरी पुन्हा हिंदू धर्मात प्रवेश केला तरी धर्मांतरे चालूच राहिली.

इ. स. १७०७ साली जेव्हा औरंगझेब मरण पावला तेव्हा आपण नमलेलो नव्हतो, पण रक्तबंबाळ मात्र निश्चितच झालो होतो. काही काळ असे वाटत होते की, भारत आता आपली काळजी नीट घेऊ शकेल. पण १७६१ सालच्या लढाईने ती आशा फोल ठरवली. मराठा सरदारांमधील दुहीमुळेच ती आशा फोल ठरली. त्यावेळी हे स्पष्ट झाले की, भारतातली मुस्लीम सत्ता मृतप्राय झाली आहे, पण पुनर्जन्म घेण्याइतके बळ हिंदू सत्तेमध्ये उरलेले नाही.

मध्यंतरीच्या काळात ब्रिटिशांचे रंगमंचावर आगमन झालेले

होते. प्लासीची लढाई होण्यापूर्वी तब्बल साठ वर्षे म्हणजे इ. स. १६८७ साली ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांनी आपल्या मद्रासमधल्या प्रतिनिधीला असे स्पष्ट कळवले होते की, "भारतात दीर्घकाळ टिकेल असे इंग्रजांचे राज्य पुढेमागे स्थापन करता यावे या दृष्टीने आवश्यक तेवढा महसूल मिळवण्याचे मार्ग तयार करणे, नागरी आणि लष्करी अशा दोन्ही प्रकारचे पुरेसे बळ तयार करणे हेच आपल्यासमोरचे खरे उद्दिष्ट आहे." आणि अल्पावधीतच क्लाइव्हला 'भारताचे सार्वभौमत्व असे रस्त्यावर पडलेले आढळले की, कुणीही ते सहज उचलून घ्यावे.' १७५७ साली प्लासीची लढाई आणि १७६१ साली पानिपतची तिसरी लढाई अशा दोन लढाया झाल्यानंतर थोड्याच काळात म्हणजे १७६५ साली क्लाइव्ह म्हणाला, "संपूर्ण मुघल साम्राज्य आता आमच्या हातांत आहे, असे म्हटले तर ती मुळीच अतिशयोक्ती होणार नाही."

मुसलमान राजवट भारतात कधीही लोकप्रिय नव्हती. तिचा ऱ्हास होत असताना सर्वत्र अनागोंदी माजली होती. कायद्याचे राज्य संपल्यातच जमा होते. त्यावेळच्या परिस्थितीत मुसलमान राजवटीपेक्षा ब्रिटिशांची राजवट बरी, असा विचार हिंदूंनी केला असावा, असे दिसते. ब्रिटिश लोक फसवाफसवी करीत होतेच, पण निदान ते इतरांच्या बायका-मुली तरी पळवीत नव्हते किंवा धर्मांतराची सक्तीदेखील करीत नव्हते. हिंदू समाजाला तो बराच मोठा दिलासा वाटणे स्वाभाविक होते. ब्रिटिशांनीदेखील प्रारंभी 'मूर' (मुसलमान) पेक्षा 'जेंटू'च (हिंदू) बरा, अशी भूमिका घेतलेली होती. क्लाइव्हने दिलेले त्या भूमिकेचे स्पष्टीकरण असे होते की, "हे गलेलठ्ठ विलासी मूर सरकारी महसूल चैनीसाठी, मौजमजा मारण्यासाठी वापरून मोकळे होतात... माझ्या मते जेंटूंशिवाय महसुलाच्या वसुलीचे काम दुसऱ्या कोणाकडेही दिले जाऊ नये. आपल्या उत्पन्नापेक्षा खर्च कमी करण्याकडे या लोकांचा कल असतो आणि वेळप्रसंगी महसुलात कमतरता भासली तर ती भरून काढण्याची क्षमताही त्यांच्याजवळ असते."

१७५६ साली कलकत्ता शहर सिराजउद्दौलाकडे देणे ब्रिटिशांना भाग पडले, तेव्हा कलकत्त्यातले हिंदू ब्रिटिशांवर इतके नाराज झाले

होते की त्यांनी शहर मुक्त राखण्यात कुचराई केली म्हणून त्यांना शिव्यांची लाखोली वाहाण्यात आली होती. श्री गुरुजींनी एकदा असे मत व्यक्त केले होते की, बहाद्दुरशहाला भारताचा सम्राट म्हणून घोषित करणे ही १८५७ सालच्या बंडखोर शिपायांची चूक होती, तो उठाव अपयशी होण्याचे ते एक प्रमुख कारण होते. त्या शिपायांनी मुघलांचा हिरवा ध्वज फडकावला होता आणि भारतीय जनता मुघल राजवट पुन्हा स्थापन झालेली पाहायला मुळीच उत्सुक नव्हती. बंकिम-चंद्रांच्या 'आनंदमठ' या कादंबरीत ब्रिटिश आणि मुसलमानांबद्दलच्या हिंदूंच्या या दृष्टिकोनाचे उत्तम प्रतिबिंब आपल्याला पाहायला मिळते.

'आनंदमठ' ही अठराव्या शतकाच्या सहाव्या-सातव्या दशकात बंगालमधील मुसलमानांच्या अन्यायाविरुद्ध बंड करून उठलेल्या विजिगीषू हिंदू संन्याशांची कथा आहे. बक्सरच्या लढाईनंतर नबाबाचे महसूल अधिकारी म्हणून काम पाहू लागलेल्या ब्रिटिशांना त्या संघर्षात हस्तक्षेप करावा लागतो आणि बंगालचे प्रशासन आपल्या हाती घ्यावे लागते. ती कथा हिंदू संन्याशांच्या हातून ब्रिटिश सेनेच्या तुकडीचा पराभव होतो, येथे संपते. बंडखोरांचा नेता सत्यानंद ते युद्ध पुढे चालू ठेवावे, अशा मताचा असतो. पण त्या बंडाला प्रेरणा देणारा दुसरा एक अनामिक विचारवंत संन्यासी त्याला युद्धातून निवृत्त होऊन नेहमीचा आयुष्यक्रम अनुसरायचा सल्ला देतो. तो सांगतो, "मुसलमानांची राजवट संपली आहे, यात शंकाच नाही. पण हिंदू राजवट अजून स्थापन झालेली नाही आणि ब्रिटिशांनी सत्ता हाती घेतल्यावाचून सनातनधर्माच्या पुनरुज्जीवनाची शक्यताच संभवत नाही. इंग्रजी शिक्षणाच्या माध्यमातून ऐहिक शक्तींची प्राप्ती करून घेतल्यानंतरच आपण आध्यात्मिक सामर्थ्याची आराधना करू शकू. मग सनातन धर्माच्या प्रसारात कसलीही आडकाठी राहाणार नाही. खऱ्या धर्माचा पुन्हा एकदा उदय होईल. तसे घडेपर्यंत, हिंदू ज्ञानी, प्रतिष्ठित आणि समर्थ होईपर्यंत ब्रिटिश लोक राज्य करीत राहातील."

कार्ल मार्क्सचे म्हणणेदेखील असेच होते. त्याने म्हटले होते, "इंग्लंडचा गुन्हा कोणताही असो, आशिया खंडातल्या समाजव्यवस्थेत

मूलभूत क्रांती घडवून आणण्याच्या कामी इंग्रज सत्ता अजाणतेपणी इतिहासाच्या हातातले साधन बनली आहे. एक जुनेपुराणे जग कोसळताना पाहाण्याच्या वेदना आपल्याला वैयक्तिकरीत्या किरीही कडवट वाटल्या तरी गटेबरोबर आपल्यालाही असे म्हणण्याचा अधिकार आहे की,

> ‘ Solte diese Qual uns qualen
> Da sie unsre Lust vermehrt,
> Hat nicht myriaden seelen
> Timur’s Herrschaft aufgezehrt ?’

“या छळामुळेच जर आपल्याला भरपूर समाधान मिळणार असेल तर तो छळ सहन करणे यातनादायी का बरे व्हावे ? तिमूरच्या अत्याचारी राजवटीतच नाही का असंख्य आत्म्यांना मुक्ती मिळाली ?”

भारत लौकरच स्वसामर्थ्य प्राप्त करील, याबद्दल मार्क्सच्या मनात मुळीच संदेह नव्हता. त्याने म्हटले होते की, “आज नाही तर उद्या, त्या थोर आणि लक्षणीय देशाचा पुनरुद्धार झालेला आपल्याला पाहायला मिळणार हे निश्चित. त्या देशातल्या लोकांना प्रिन्स सॅल्टिकोव्हसारखे लोक आज जरी अगदीच नगण्य आणि निकृष्ट समजत असले तरी त्याच लोकांनी आपल्या शौर्याने ब्रिटिशांनाही आश्चर्यचकित करून सोडले आहे, हे आपण विसरून चालणार नाही. आपल्या भाषा, आपले धर्म यांचे मूळ त्याच देशात आहे. त्या देशातल्या जाट माणसामध्ये प्राचीन काळच्या जर्मन माणसाची वैशिष्टचे दिसतील तर ब्राह्मणामध्ये प्राचीन काळच्या ग्रीक माणसाची !”

मार्क्स किंवा बंकिमचंद्र यांच्या अपेक्षेपेक्षाही लौकर म्हणजे अवघ्या ५० वर्षांच्या कालावधीतच भारत पुन्हा सावरला गेला. हिंदू आपल्या पायांवर पुन्हा उभे राहिले, त्यांना त्यांचा आत्मा पुन्हा एकदा गवसला आणि त्यांनी लगेच ‘स्वराज्या’ची मागणी केली. त्या मागणीला ठोकरून लावण्यासाठी ब्रिटिशांनी १९०५ साली बंगालची फाळणी जाहीर केली. मुस्लीम लीगचा जन्म १९०६ साली झाला, हा काही निव्वळ योगायोग मानता येणार नाही.

त्यानंतरच्या काळात हिंदू माणसाला दोन आघाड्यांवर लढा द्यावा लागला. परक्या ब्रिटिश राजवटीविरुद्ध आणि त्या राजवटीने चालवलेल्या मुसलमानांच्या अनुनयाविरुद्ध त्याला झगडावे लागले. जनतेच्या राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक हक्कांसाठी त्याने लढा उभारला. तो लढा दयानंद आणि बंकिमचंद्रांपासून सुरू झाला. अरविंद, विवेकानंद, टिळक आणि गांधीजींनी तो पुढे नेला आणि आज रा. स्व. संघाच्या नेतृत्वाखाली तोच लढा पुढे चालू आहे. संघाचा पूर्व वारसा हा असा आहे.

ब्रिटिश राजवटीत वाढत चाललेल्या ख्रिस्ती धर्माच्या प्रभावाला थोपवून धरण्यासाठी ब्राह्मो समाजाची स्थापना झाली. आर्य समाजाने मुसलमानांच्या आव्हानाकडे लक्ष दिले. 'दि थिऑसॉफिकल सोसायटी'ने हिंदू विचारपद्धतीचे काही पैलू जगासमोर मांडण्याचा प्रयत्न केला आणि हिंदूंना, हिंदुस्थानला आणि हिंदू संस्कृतीला मिळालेल्या सर्वंकष आव्हानावर मात करण्याचा सर्वंकष प्रयत्न म्हणून रा. स्व. संघ पुढे आला.

ऋषी बंकिमचंद्र चटर्जींनी आपल्याला 'वंदे मातरम्'चा मंत्र दिला. स्वामी दयानंदांनी हिंदू समाज सुधारण्याचा आणि बलवान करण्याच्या मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केला. त्यांनी हिंदी-संस्कृतचा प्रचार, प्रसार केला. अस्पृश्यता नाहीशी करण्याचा आग्रह धरला, स्त्रियांना अधिक चांगली वागणूक मिळावी असे आवाहन केले आणि गोरक्षणाचे महत्त्वही प्रतिपादन केले. १८७३ साली व्हाइसरॉय लॉर्ड नॉर्थब्रुक यांच्याबरोबर झालेल्या संभाषणात 'भारताचे संपूर्ण स्वातंत्र्य' हेच आपले ध्येय असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**व्हाइसरॉय** : इतर धर्माच्या अनुयायांवर आपण जे कडक हल्ले चढवता त्यामुळे आपल्याबद्दल कमालीची कटुता हिंदू-मुसलमानांमध्ये निर्माण झाली आहे, असे मला समजले आहे. आपल्या शत्रूकडून आपल्या जिवाला काही अपाय केला जाण्याची आपल्याला शक्यता वाटते काय ? आणि आमच्या सरकारकडून आपल्याला काही खास संरक्षण हवे आहे काय ?

**दयानंद** : ब्रिटिश राजवटीत मला माझ्या धर्माचा प्रचार करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे आणि माझ्या जीवाला कोणत्याही स्वरूपाचा धोका निर्माण झाला असेल, असे मला वाटत नाही.

**व्हाइसरॉय** : जर तसे असेल तर मग पंडित दयानंदजी, आपल्या देशात ब्रिटिश राजवट स्थापन झाल्यामुळे या देशावर आमचे जे उपकार झाले आहेत त्याबद्दलची कृतज्ञता आपण जाहीर कराल का? आणि आपल्या प्रवचनांपूर्वी होणाऱ्या प्रार्थनेच्या वेळी ब्रिटिश राजवटीच्या स्थैर्यासाठी प्रार्थना कराल का ?

**दयानंद** : अशी कोणतीही सूचना मी मान्य करू शकत नाही. कारण माझ्या देशबांधवांची प्रतिष्ठा वाढावी, जगात माझ्या देशाला योग्य मानाचे स्थान मिळावे यासाठी भारतवर्षाने संपूर्ण स्वातंत्र्यच मिळवले पाहिजे, असे माझे ठाम मत आहे. आणि त्यामुळेच 'परकीय वर्चस्वापासून माझा देश मुक्त व्हावा,' अशी मी सकाळ-संध्याकाळ प्रार्थना करीत असतो, परमेश्वराचे त्यासाठी आशीर्वाद मागत असतो.

व्हाइसरॉयने या निर्भीड वक्तव्याचा धसकाच घेतला. 'आपण या बंडखोर फकिरावर बारकाईने नजर ठेवून आहोत', असे त्याने लंडनमधील 'इंडिया ऑफिस'ला कळवून टाकले. त्यानंतर साठ वर्षांनी चर्चिलने दुसऱ्या एका भारतीय देशभक्ताचा म्हणजेच महात्मा गांधींचा 'नंगा फकीर' असा कुत्सित उल्लेख केला होता.

श्रीअरविंदांनी राष्ट्र आणि धर्म यांची युती घडवून आणली. राजकारणातून संन्यास घेण्यापूर्वी त्यांनी केलेल्या त्या ऐतिहासिक उत्तरपारा भाषणात ते म्हणाले होते, "योगसमाधी लागलेली असताना मला असा संदेश मिळाला की यापुढे तू जिथेजिथे जाशील तिथेतिथे देशबांधवांना तू सांगत जा की सनातन धर्माच्या उत्थानासाठी जागृत व्हा! त्यांनी जगाची सेवा करावी म्हणून मी त्यांना स्वातंत्र्य देणार आहे. त्यामुळे

भारताचा उदय होईल असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा उदय होणार असतो तो सनातन धर्माचा. भारत मोठा होईल असे म्हटले जाते तेव्हा मोठा होणार असतो तो सनातन धर्म. भारताचा प्रभाव वाढेल असे म्हटले जाते तेव्हा साऱ्या जगावरचा प्रभाव वाढणार असतो तो सनातन धर्माचाच ! धर्मासाठी आणि धर्माच्या आधारावरच भारताचे अस्तित्व आहे. धर्माचा प्रभाव वाढवणे म्हणजेच देशाचा प्रभाव वाढवणे, हिंदू राष्ट्र सनातन धर्माबरोबरच जन्माला आले, त्याच्याबरोबरच ते पुढेमागे होते आणि सनातन धर्माबरोबरच ते वाढते. जेव्हा सनातन धर्माला ओहोटी लागली तेव्हा आपल्या राष्ट्रालाही अवकळा आली. जर सनातन धर्म लोप पावला असता तर त्याच्याबरोबरच हिंदू राष्ट्रही लोप पावले असते. सनातन धर्म हाच आपला राष्ट्रवाद आहे आणि हाच संदेश मी तुमच्यापर्यंत पोचवू इच्छितो !" अरविंदांच्या पाँडिचरी आश्रमातील खोलीत पूजा केली जात होती ती फक्त भारतमातेची– भारताच्या नकाशाची, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

अठराव्या शतकात मराठे जेव्हा बंगाल मुक्त करण्यासाठी गेले होते तेव्हा तेथील लोकांनी भीतीपोटी दडी मारली होती. पुढे दोन शतके '**बोर्गी**'ची भीती दाखवून बंगाली लोक आपल्या रडणाऱ्या मुलांना गप्प बसवत असत. पण या शतकात मात्र शिवाजीची राष्ट्रीय मुक्तियोद्धा म्हणून बंगालला ओळख पटली. १९०५ साली टागोरांनी ते सुप्रसिद्ध शिवप्रशस्तीचे स्तवन रचले. "त्यावेळी हे राजन, आम्ही तुझ्या शब्दाचे मर्म नीट ओळखले नाही. तुझ्या कार्याचे मोल जाणले नाही, पण आज मात्र नतमस्तक होऊन आम्ही तुझी आज्ञा शिरोधार्य मानू. तू दिलेल्या ध्यानमंत्राने या भारतातील सर्व लोकांची हृदये एक होतील आणि ते खांद्याला खांदा लावून चालू लागतील. तापशांच्या अंगावरचे वस्त्र आमचे निशाण होईल तर पददलितांना व गोरगरिबांना आमच्या यात्रेत अग्रहक्काचे स्थान मिळेल. 'अवघा भारत एक धर्मराज्य होऊ दे !' ही तुझी घोषणा आम्ही शिरोधार्य मानू. हे बंगाल्यांनो, आज मराठ्यांच्या सुरात सूर मिळवून म्हणा– 'जयतु शिवाजी !'– शिवाजीचा जयजयकार असो. हे बंगाल्यांनो, आज मराठ्यांबरोबरच उत्सवात

सहभागी व्हा. त्या निमित्ताने भारतातील पूर्वपश्चिम-डावेउजवे यांचे मीलन होऊ दे आणि सर्वांना सामायिक वैभवाची प्राप्ती होऊ दे !'

तामिळ भाषेतील थोर आधुनिक महाकवी सुब्रह्मण्य भारती यांनी सांगितले की, "हिंदू धर्माच्या तत्त्वांचा प्रचार आणि प्रसार करण्याची वेळ आता आली आहे. मानवतेचे रक्षण करू शकेल आणि तिला योग्य मार्गाने नेऊ शकेल असे हिंदूंशिवाय कुणीही नाही. मी काही युद्धपिपासू माणूस नाही. मी एक शांतताप्रिय माणूस आहे. वीस कोटी हिंदूंची संघटना उभारण्याचे माझे ध्येय कोणत्याही आक्रमक हेतूसाठी नसून शांततेची फळे त्या सर्वांना चाखायला मिळावीत म्हणून आहे. त्या ध्येयाच्या पूर्तीसाठी मला शांततेची मदत हवी आहे, हिंदूंची मदत हवी आहे आणि परमेश्वराचीही कृपा हवी आहे. सर्व हिंदूंना एका कुटुंबात सामावून घेण्याची माझी इच्छा आहे. जर एखाद्याच्या अंतः-करणात या आकांक्षेचे बीजारोपण झाले तर तो दुसऱ्या कोणत्याही राजकीय किंवा इतर क्षेत्रांतील कार्यापेक्षा या कार्यालाच महत्त्व देईल, अशी माझी खात्री आहे."

आधुनिक भारतातले थोर कादंबरीकार शरदश्चंद्र चटर्जी यांना मुसलमानांच्या अरेरावीबद्दल आणि विभक्त, फुटीर वृत्तीबद्दल खंत वाटत होती. त्यांनी लिहिले होते, "हिंदुस्थान ही हिंदूंची भूमी आहे. त्यामुळे तिला परकीय वर्चस्वाच्या जोखडातून मुक्त करण्याची जबाब-दारीदेखील निव्वळ हिंदूंचीच आहे, मुसलमान फक्त इथे बसले आहेत, त्यांची तोंडे सदान्कदा अरबस्तानकडे आणि तुर्कस्थानकडे वळलेली अस-तात. या हिंदुस्थानात त्यांचे मन रमत नाही, पण त्याबद्दल खंत कर-ण्यात हशील नाही. जेव्हा त्यांनी या देशाकडे पाठ फिरवलेली आहे, तेव्हा त्यांच्यामागून धावत जाण्यात काय अर्थ आहे ? त्यांनी कान बंद करून घेतलेले असताना त्यांना शहाणपणाचे चार शब्द ऐकवणे किंवा ते याच भूमीचे पुत्र आहेत, भारतीय वातावरणातच त्यांचे पालन-पोषण झालेले आहे याची त्यांना आठवण करून देणे किती संयुक्तिक ठरणार आहे ?"

"मातृभूमीला मुक्त करण्याची जबाबदारी फक्त हिंदूंवर आणि हिंदूंवरच आहे, इतरांवर नाही, ही गोष्ट स्पष्टपणे आणि निःसंदिग्धपणे

आपण लक्षात घेणे आवश्यक आहे. मुसलमानांची शिरगणती लक्षात घेऊन आपण नाउमेद होण्याचे मुळीच कारण नाही. संख्याबळ हे काही या जगातले अंतिम व सर्वोच्च सत्य नव्हे. संख्याबळाचा मुळीच विचार न करणारे व्यापक सत्य अस्तित्वात आहेच. एखाद्या देशाच्या स्वातंत्र्य-लढ्यात त्या देशातले सर्व लोक भाग घेतात, असे थोडेच आहे ? तसे कधी शक्य झाले आहे किंवा व्यवहार्य ठरले आहे ? मुळात तशी आवश्यकता तरी असते का ? अमेरिकन लोकांनी जेव्हा त्यांच्या स्वातंत्र्यासाठी लढा दिला तेव्हा निम्म्याहून अधिक जनता ब्रिटिशांच्या बाजूची होती. आयरिश स्वातंत्र्यलढ्यात फारच थोड्या लोकांनी भाग घेतला होता. रशियावर आज राज्य गाजवणाऱ्या बोल्शेव्हिक पक्षात त्या देशातल्या एकूण जनतेच्या एक टक्क्याएवढेदेखील लोक नाहीत."

"माणसे म्हणजे काही गुरे नाहीत किंवा घोडे नाहीत. बरोबर काय आणि चूक काय, न्याय्य काय आणि अन्याय्य काय, याचा निर्णय काही डोकी मोजून करायचा नसतो. तपस्येच्या सामर्थ्यावर आणि निष्ठेच्या एकाग्रतेवर तो अवलंबून असतो. ती तशी तपस्या करण्याची जबाबदारी या देशातील तरुणांवर येऊन पडली आहे. कृत्रिम एकी घडवून आणण्यासाठी कोणते मार्ग आणि कोणती साधने उपयोगी पडतील हा हिंदूंसमोरचा प्रश्न नाही. संघटना कशी बांधावी, हाच खरा त्यांच्यासमोरचा मुख्य प्रश्न आहे."

या सर्व बाबतींतली हिंदूंची भूमिका स्वामी विवेकानंदांनी अगदी संक्षिप्तपणे लाहोरमधील एका भाषणात मांडली होती. १८९७ साली लाहोरच्या नागरिकांसमोर भाषण करताना ते म्हणाले होते, "आपण हिंदू आहोत. आज जे लोक आपला द्वेष करीत आहेत त्यांच्यापैकी अनेकांनी या नावाचा विपरीत अर्थ लावला असेल, पण नावे म्हणजे काहीच नाही. जे जे. वैभवशाली आहे, जे जे आध्यात्मिक आहे त्यासाठी हिंदू हे नाव घेतले जावे की पददलित, कुचकामी आणि निकृष्ट लोकांची हेटाळणी करण्यासाठी ते वापरले जावे हे आपल्या कर्तृत्वावर अवलंबून आहे. आज जर हिंदू या शब्दाचा काही वाईट अर्थ निघत असेल तर निघू दे बापडा, पण आपल्या कृतीने हे दाखवून देण्यास आपण सिद्ध

होऊ या की कोणत्याही भाषेत वापरला जाऊ शकणारा तो सर्वोत्कृष्ट शब्द आहे."

"अमानुष आक्रमकांच्या टोळधाडीने हा आपला प्रिय देश अनेकदा पायदळी तुडवला आहे, शेकडो वर्षे आपल्या आकाशात 'अल्ला-हो-अकबर' ही घोषणा निनादत राहिली आहे, कोणत्या क्षणी आपला शेवट होईल याची हिंदू माणसाला शाश्वती राहिलेली नाही. जगातल्या सर्व ऐतिहासिक भूमींपैकी हीच भूमी सर्वांत जास्त यातना सहन करीत आली आहे आणि तीच सर्वांत जास्त पराधीन राहिलेली आहे. आणि तरीही आपण पुन्हा पूर्वपदावर येत राहिलो आहोत, नवनवीन संकटांशी आवश्यक असेल तेव्हा मुकाबला करीत राहिलो आहोत. आपण समर्थ असल्याचे एवढेच नव्हे तर विस्तार करण्याचीही आपल्यात क्षमता असल्याचे प्रत्यंतर अलीकडच्या काळात आपल्याला मिळाले आहे. विस्तार हे जिवंतपणाचे लक्षण आहे ही गोष्ट लक्षात घेतली तर या दाखल्याचे मोल आपल्याला समजू शकेल."

"जर एखादा हिंदू माणूस संकटात सापडला असेल आणि ते समजताच जणू आपला मुलगाच संकटात सापडला आहे, अशी तुमची भावना होत असेल तरच तुम्ही हिंदू म्हणवून घेण्यास पात्र आहात. हिंदू म्हणवून घेणाऱ्यांसाठी वाटेल तो त्याग करायला तुम्ही तयार असाल, थोर गुरू गोविंदसिंगांचे आदर्श उदाहरण तुमच्या डोळ्यांसमोर ठेवणार असाल तरच तुम्ही हिंदू म्हणवून घेण्यास पात्र आहात. आपल्या देश-बांधवांमध्ये तुम्हाला कदाचित असंख्य दोष किंवा उणिवा आढळतील, पण तुम्ही त्यांच्या धमन्यांमधून वाहणारे हिंदू रक्त पाहा आणि त्या दोषांकडे, उणिवांकडे दुर्लक्ष करा. तुम्ही सर्वप्रथम त्यांचीच देव म्हणून पूजा करायला हवी. तुम्हाला दुखवणारी प्रत्येक गोष्ट ते करीत राहिले, त्यांनी तुमच्यावर शिव्याशापांचा वर्षाव केला तरी तुम्ही त्या सर्वांशी प्रेमानेच वागायला हवे, आपुलकीने बोलायला हवे. जरी त्यांनी तुम्हाला हाकलून दिले तरी तुम्ही त्या नरशार्दूलाप्रमाणेच-गुरू गोविंदसिंगांप्रमाणेच-शांतपणे मरण पत्करायला हवे. असा माणूसच हिंदू म्हणवून घेण्यास पात्र आहे. ही कल्पना आपण सतत डोळ्यांसमोर ठेवायला हवी.

आपापसातले सारे मतभेद आपण विसरून जाऊ या, हा प्रेमाचा संदेश आपण सर्वत्र पोचवू या, देशाच्या कानाकोपऱ्यात घरोघरी पोचवू या !"

"भारताच्या पुनरुत्थानाबद्दल लोकांना जसे बोलायचे असेल तसे बोलू द्या, पण आयुष्यभर काम करीत राहिलेला, निदान काम करण्याचा प्रयत्न करणारा एक माणूस म्हणून मी तुम्हाला सांगू इच्छितो की, जोपर्यंत तुम्ही आध्यात्मिक होत नाही, तोपर्यंत भारताचे पुनरुत्थान होणार नाही. केवळ एवढेच नव्हे तर भारताच्या आध्यात्मिकतेवरच साऱ्या जगाचे कल्याण अवलंबून आहे. जागतिक इतिहास याला साक्षी आहे. राष्ट्रामागून राष्ट्रे उदयाला आली, त्यांची थोरवी भौतिक वैभवावर आधारलेली होती. माणूस हा त्यांच्या दृष्टीने केवळ भौतिक होता. पाश्चिमात्य भाषेत माणूस आपले भूत सोडून देतो तर आपल्या भाषेत माणूस आपले शरीर टाकून देतो. पाश्चिमात्य माणसाच्या बाबतीत शरीर प्रथम येते आणि मग आत्मा येतो, आपल्या बाबतीत माणसाचा आत्मा आणि प्रवृत्ती आधी येतात आणि मग शरीराचा विचार येतो. हाच तर मुख्य फरक आहे."

"बांधवांनो, म्हणून म्हणतो की घाई करू नका, दुसऱ्यांचे अनुकरण करण्याच्या मागे लागू नका. आपण लक्षात ठेवला पाहिजे असा हा दुसरा महत्त्वाचा धडा आहे. अनुकरण म्हणजे संस्कृती नव्हे. मी राजाचा वेष धारण करू शकतो, परंतु केवळ तेवढ्यामुळे मी खरा राजा होऊ शकेन का ? अनुकरण हे माणसाच्या अधःपतनाचे एक किळसवाणे लक्षण आहे. आणि माणूस जेव्हा स्वतःच स्वतःचा तिरस्कार करू लागतो, तेव्हा त्याच्या अस्तित्वावर कुठाराघात केल्यासारखेच होते. जेव्हा माणसाला आपल्या पूर्वजांची लाज वाटू लागते, तेव्हा शेवट जवळ आला आहे, असे खुशाल समजावे. मी हिंदू समाजातला एक अत्यंत सामान्य माणूस आहे आणि तरीही मला माझ्या हिंदू असण्याचा अभिमान आहे, माझ्या पूर्वजांचा अभिमान आहे. मी हिंदू आहे, असे सांगण्यात मला अभिमान वाटतो. मी तुमचा एक सामान्य सेवक आहे, याचा मला अभिमान वाटतो. या जगात होऊन गेलेल्या महान साधुसंतांचे, थोर ऋषीमुनींचे वंशज असणाऱ्या तुमच्यासारख्यांचा मी देश-

बांधव आहे, याचा मला अभिमान वाटतो. म्हणून म्हणतो, आत्मविश्वास बाळगा, पूर्वजांची लाज वाटण्यापेक्षा त्यांचा अभिमान बाळगा. आणि मुळीच दुसऱ्यांचे अनुकरण करू नका. चुकूनही करू नका !"

'प्रबुद्ध भारत' या मासिकाच्या एप्रिल १८९९ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या एका मुलाखतीत स्वामी विवेकानंदांनी शुद्धीकरणाला अनुकूल असे मत व्यक्त केले होते. त्यांनी म्हटले होते, "परधर्मात गेलेल्यांना हिंदू धर्मात परत आणले नाही तर आपली संख्या सतत कमी होत जाईल. आणि शिवाय एका माणसाने हिंदू समाजातून बाहेर जाण्याचा अर्थ केवळ एक माणूस कमी असा नसून एक शत्रू जास्त असा होतो, हे लक्षात घ्यायला हवे."

'Swami Vivekananda In America : New Discoveries' या आपल्या पुस्तकात मिस कॉर्नर यांनी लिहिले आहे, "एक दिवस स्वामीजी माझ्या आजीला म्हणाले, 'माझ्या आयुष्यातला आजवरचा सर्वांत मोठा मोह मला अमेरिकेत आल्यावर पडला आहे.' त्यांना थोडेसे चिडवण्यासाठी थट्टेच्या सुरात तिने विचारले, 'स्वामीजी, कोण आहे ती मुलगी ?' त्यावर ते खळखळा हसत म्हणाले, 'नाही हो, ती एखादी मुलगी नाही. ती आहे संघटना !" भारतात तीन माणसे एकत्र पाच मिनिटे काम करू शकत नाहीत. प्रत्येकजण इतरांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करीत राहातो आणि अखेरीस संपूर्ण संघटनेलाच दुष्परिणाम भोगावे लागतात, याबद्दलची खंत त्यांनी व्यक्त केली आणि म्हणाले, 'परमेश्वरा, एकमेकांचा मत्सर करणे सोडून द्यायला आम्ही केव्हा बरे शिकणार आहोत ? एकमेकांना मदत करण्याची आणि समजून घेण्याची शिकवण सर्व हिंदूंना देणाऱ्या संघटनेची आज नितांत गरज आहे.

आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नेमके तेच करीत आहे. 'संघे शक्ति कलौयुगे ।' या संस्कृत उक्तीप्रमाणे इतर युगांत आवश्यक असणारी गुणसंपदा वेगळी होती, पण या कलियुगात आवश्यक आहे ते संघटनात्मक बळ !

आणि या साधुसंतांप्रमाणेच आपल्या राष्ट्रीय नेत्यांनीदेखील या प्रश्नावर स्पष्ट मतप्रदर्शन केले होते. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव

आणि शिवाजी महोत्सव सुरू केले होते ते, ईद आणि मोहरमच्या वेळी मुसलमानांना ज्याप्रमाणे संघटित होता येते त्याचप्रमाणे हिंदूंनादेखील संघटित होता यावे या हेतूनेच सुरू केले होते. 'समर्थ हिंदू राष्ट्राची' गरज समजावून सांगताना ते म्हणाले होते की, "हिंदू धर्माने नैतिक संबंधांप्रमाणेच सामाजिक संबंधांचीदेखील पुरेपूर तरतूद केलेली आहे. म्हणूनच आपण आपला पूर्वेतिहास आत्मीयतेने न्याहाळायला हवा आणि पूर्वी समाजाचा कारभार कसा चालत होता ते जाणून घ्यायला हवे. या बनारसमधला हिंदू मद्रासमधल्या किंवा मुंबईमधल्या हिंदू माणसाइतकाच हिंदू आहे. आपले राष्ट्र संघटित होते तेव्हा खरोखरच समर्थ होते, थोर होते. विविध पंथोपपंथांतील क्षुल्लक मतभेद विसरून जर आपण आपल्या समान वारशावर– वेद, गीता, रामायण इत्यादींवर– भर दिला तर नियतीच्या आशीर्वादाने आपण या सर्व पंथांचे एकत्र असे सामर्थ्यशाली हिंदू राष्ट्र बनवण्यात सहज यशस्वी होऊ शकू, ही प्रत्येक हिंदू माणसाची महत्त्वाकांक्षा असायला हवी. आपल्या वैभवशाली विजयासाठी आणि यशासाठी जर कशाची आवश्यकता असेल तर ती आपण आपल्यातल्या सर्व पंथांना एकाच व्यासपीठावर एकत्र आणण्याची आहे, त्या सर्वांमधून हिंदू धर्माच्या तत्त्वज्ञानाचा एकच प्रभावी प्रवाह वाहाता राहिला तर आपल्याला हवे ते सहज साध्य होऊ शकेल, अशी मला खात्री वाटते !"

आज रा. स्व. संघ समर्थ हिंदू राष्ट्र बनवण्यासाठी सर्व हिंदूंना एकाच व्यासपीठावर एकत्र आणण्याचे नेमके तेच कार्य करीत आहे !

गांधीजींनी वारंवार आपण कट्टर सनातनी हिंदू असल्याचे जाहीर केले होते. ते म्हणाले होते, "आज आपली दृष्टी घाण झाली आहे, विचार त्याहून घाण झाले आहेत आणि शरीरे तर अत्यंत घाणेरडी झाली आहेत. का ? तर आपण आपला हिंदू धर्मच मुळी बाजूला सारला आहे ! हिंदू धर्म म्हणजे सत्याचा सतत शोध घेणारा धर्म आहे. आज जर तो कुंठित झालेला दिसत असेल, निष्क्रिय वाटत असेल, त्याने विकासाकडे पाठ फिरवल्याचे जाणवत असेल तर त्याचे कारण आपण दमलो आहोत हे आहे. आपण विश्रांती घेऊन ताजेतवाने झालो म्हणजे

पुन्हा एकदा पूर्वी कधीही दिसला नाही इतक्या तेजःपुंज स्वरूपात हिंदू धर्म जगभर चमकल्याशिवाय राहाणार नाही !"

"संपूर्ण काँग्रेस फक्त हिंदूनीच चालवली तरी आपली काही हरकत नाही," असेदेखील एकदा गांधीजींनी म्हटले होते. दुसऱ्या एका प्रसंगी ते म्हणाले होते, "हिंदू धर्मात महंमद, झरतुष्ट्र आणि मोझेस यांना जसे स्थान मिळू शकते तसेच जीझसलाही मिळू शकेल." मुसलमान भारतीयांनी पूर्वजांच्या धर्मात परत यावे असे आवाहन करताना ते म्हणाले होते, "भारतातील बहुसंख्य मुसलमान हे परिस्थितीच्या दडपणाखाली हिंदू धर्मातून त्या धर्मात गेलेले लोक आहेत. अनेक महत्त्वाच्या बाबतींत ते अजूनही हिंदूच आहेत. स्वतंत्र, प्रगतिशील, संपन्न भारतात ते जर आपल्या पूर्वीच्या धर्मात परतले तर ती अत्यंत स्वाभाविक अशीच गोष्ट ठरेल." आणि म्हणूनच संघ ज्यावेळी 'हिंदू राष्ट्र' विषयी काही बोलत असतो किंवा 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व' असे सांगत असतो त्यावेळी भारतीय प्रबोधनाच्या शिल्पकारांची मतेच तो बोलून दाखवीत असतो.

टिळक, गांधीजी किंवा गुरुजी यांनी जेव्हा हिंदू राष्ट्राची संकल्पना मांडली, तेव्हा बिगर हिंदूंना बाजूला सारणारे आणि निव्वळ हिंदूंना सामावणारे राष्ट्र त्यांना अभिप्रेत नव्हते. बिगर हिंदूंना समान अधिकार मिळणार नाहीत, असे जर कुणी सुचवले असते तर त्यांच्यापैकी कुणालाही धक्काच बसला असता. अथर्ववेदात म्हटले आहे–

'जनं बिभ्रति बहुधा विवचसं । नाना धर्माणां पृथ्वी यथौकसम् ॥

'ही आमची मातृभूमी विविध भाषा बोलणाऱ्या आणि वेगवेगळ्या विचारसरणींचे अनुयायी असणाऱ्या लोकांना सारख्याच ममतेने आसरा देते.'

ते तिघेही फक्त या देशाचे सांस्कृतिक वैशिष्ट्य प्रस्थापित करू पाहात होते, या देशाला त्याचा आत्मा परत मिळवून देऊ पाहात होते. इंग्लंड ज्याप्रमाणे ख्रिश्चन आहे आणि इजिप्त ज्याप्रमाणे मुसलमान आहे त्याप्रमाणे हा देश हिंदू आहे. अर्थात इंग्लंडमध्ये लाखो बिगरख्रिस्ती लोक राहातात. आणि इजिप्तमध्ये १० टक्के लोक कॉप्टिक ख्रिस्ती

आहेत. हिंदू हा धर्म नसून ते राष्ट्रीयत्व आहे. म्हणूनच एम्. सी. छगलां-सारख्या मुसलमानाला, राजकुमारी अमृत कौर यांच्यासारख्या ख्रिस्ती व्यक्तीला आणि ए. डी. गोरवाला यांच्यासारख्या पारशाला आपण हिंदू आहोत असे सांगताना मुळीच अडचण वाटली नाही. १९६६ साली दिल्लीत स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या स्मृतीप्रीत्यर्थ भरवण्यात आलेल्या एका सभेत डॉ. राम मनोहर लोहिया देखील म्हणाले होते, "भारतात राहणारे सर्व लोक हिंदू आहेत– मग त्यांचा धर्म कोणताही असो– या सावरकरांच्या मताशी मी सहमत आहे."

अलीगड मुस्लीम विद्यापीठाचे संस्थापक सर सईद अहमद यांनी सुद्धा सुमारे शंभर वर्षांपूर्वी असेच मत व्यक्त केले होते. "भारतात राहाणाऱ्या या दोन्ही जमातींना मी 'हिंदू' या एकाच नावाने पुकारू इच्छितो कारण त्या या हिंदुस्थानात राहातात." अगदी अलीकडे म्हणजे १ मार्च १९७० च्या अंकात जमात-इ-इस्लामीच्या 'रॅडियन्स' या मुखपत्रानेदेखील 'भौगोलिक अर्थाने आपणही हिंदू आहोत, असा दावा मुसलमान करू शकतात' असे म्हटले होते.

काउंट कैसरलिंग यांनी अनेक वर्षांपूर्वी म्हटल्याप्रमाणे 'भारतात इस्लाम हळूहळू भारतीय प्रवृत्तींकडे झुकू लागला आहे. शेवटी रक्त बोलू लागणार, हे उघडच आहे. प्रत्येक नव्या धार्मिक नेत्याबरोबर, वांशिक वैशिष्ट्ये अधिकाधिक स्पष्ट होऊ लागली आहेत. पर्शियात खूप पूर्वी असेच घडले होते."

याला खूप महत्त्व आहे. 'हिंदू म्हणा किंवा भारतीय' म्हणा असे राष्ट्रीय नामाभिधान आपल्या लोकांमध्ये एकता, निष्ठा वाढवायला, त्यांच्यात सुरक्षिततेची भावना निर्माण करायला आणि त्यांचे बळ वाढ-वायला उपयुक्त ठरेल. आपल्या राष्ट्रजीवनाची मुळे त्यामुळे लक्षात येतील व त्यांना खतपाणी घालणे मग सोपे जाईल. कोणत्याही मोठ्या होऊ इच्छिणाऱ्या देशाच्या दृष्टीने आपली मुळे ही सगळ्यात महत्त्वाची असतात, ती यासाठीच.

इंग्लंड नेहमी पूर्वपरंपरा पाळीत आला आहे, खऱ्याखोट्या प्राचीन स्वातंत्र्य-प्रथांचे पालन करीत आला आहे. आज फ्रान्समधील एक पंथ युरोपमधील प्राचीन प्रथांचा धांडोळा घेऊन आपले मूलस्रोत शोधण्याच्या

प्रयत्नात आहे. 'Le Figaro' या नियतकालिकाने अलीकडेच नव्या चळवळीवर एक खास पुरवणी प्रसिद्ध केली होती. इजिप्त फॅरोकडे आणि क्लिओपात्राकडे अभिमानाने पाहू लागला आहे. तुर्काचेव्हस्की आणि सोल्झेनित्सीन यांच्यासारखे रशियन बंडखोर 'साम्यवादाने आमचा प्राचीन वारसा नासवून टाकला' अशी टीका करीत आहेत. मुसलमान इंडोनेशिया कधीही रामाला विसरलेला नाही. आणि पाकिस्तानचे इस्लामी प्रजासत्ताकदेखील इस्लामपूर्व इतिहासाचा अभिमान बाळगू लागले आहे. त्यांनी सर मॉर्टिमोर व्हीलर यांच्यासारख्या पुरातत्त्ववेत्त्याला 'Five Thousand years of Pakistan' असे पुस्तक लिहायला सांगितले आहे, त्याचप्रमाणे ए. एन्. खान यांचे 'Buddhist Art and Architecture in Pakistan' हे पुस्तक प्रसिद्ध करण्यात आले आहे. आठव्या शतकात महंमद बिनकासीमने ज्या बंदरावर हल्ला चढवला होता त्या देवलच्या आसपास उत्खनन करून तेथे सापडलेली शिवलिंगे त्यांनी मोठ्या अभिमानानाने प्रदर्शनात मांडून ठेवली आहेत. 'पंजाबचा राष्ट्रीय दिवस वैशाखी हाच आहे', असे मत लाहोरमधील विद्यार्थ्यांनी व्यक्त केले आहे.

भारतीय मुसलमान आपल्या धर्माचे आचरण करण्यास मुक्त असले तरी त्यांनी राष्ट्रीय मूलस्रोत– जरी ते इस्लामपूर्व असले तरीही– हेच आपले मूलस्रोत मानले पाहिजेत. 'काशी नसती तर हे जग केव्हाच बुडून गेले असते' असे लिहिणाऱ्या गालिबने नेमके तेच केले होते. अत्यंत सुंदर अशा एका पर्शियन कवितेत गालिब स्वर्गातल्या एका व्यक्तीला विचारतो, 'जग इतके छिन्नविच्छिन्न झालेले असूनही शेवट मात्र अजून कसा झालेला नाही?' तेव्हा त्याला उत्तर मिळते–

'सुआ काशी बा अंदाजे इशारत
तबस्सुम करदो गुप्त ईन इमारत'

काशीकडे बोट दाखवून तो हसला आणि म्हणाला, त्या काशीमुळेच हे जग अजूनही टिकून राहिले आहे.

मुसलमान भारतीय हे प्राचीन भारतीय मूलस्रोत जोपर्यंत स्वीकारीत नाहीत तोपर्यंत त्यांना इतरांशी शांततेने नांदता येणार नाही किंवा त्यांचे तेदेखील शांततेने राहू शकणार नाहीत. याबद्दल श्री गुरुजी म्हणाले

ग्रंथालय
3032

होते, "इथे राहाणाऱ्या प्रत्येक अहिंदू माणसाने राष्ट्रधर्माचे, समाज-धर्माचे आणि कुलधर्माचे पालन केलेच पाहिजे, म्हणजेच देशाबद्दलची, समाजाबद्दलची आपल्या पूर्वजांबद्दलची कर्तव्ये पार पाडली पाहिजेत. फक्त व्यक्तिधर्माचे पालन करीत असताना आपापल्या आध्यात्मिक कलानुसार मार्ग निवडायचा त्याला अधिकार असेल.

खरे म्हणजे रा. स्व. संघ मुसलमानांपेक्षा हिंदूंनाच आपल्या राष्ट्रजीवनाचे मूलस्रोत जाणून घेण्यास सांगत असतो. ज्यांच्या पूर्व-परंपरेची मुळे खोलवर गेलेली असतील तेच सर्व देशीविदेशी वादळांवर मात करू शकतात आणि भविष्याकडे आत्मविश्वासाने पाहू शकतात. भारतीयांच्या बाबतीत तर आणखी वेगळी गोष्ट आहे. आपले राष्ट्रीय मूलस्रोत केवळ आपल्यासाठीच नव्हे तर संपूर्ण जगाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहेत. आता तर विज्ञानदेखील तत्त्वज्ञानाच्या परिघात प्रवेश करू पाहाते आहे. विज्ञानामुळे ज्यांच्या ठिकऱ्या उडतील अशा तत्त्वांची बंधने भारतीयांवर नाहीतच. कोणत्याही परमेश्वरावर श्रद्धा ठेवणारा माणूस जसा हिंदू असू शकतो तसाच एखादा निरीश्वरवादी माणूस-देखील हिंदू असू शकतो. शिवाय धार्मिक श्रद्धा, चालीरीती आणि भूमिका कालसुसंगत राखण्यासाठी किंवा त्याचे नवनवीन अन्वयार्थ लावण्यासाठी वेळोवेळी संतसज्जनांनी आपल्या देशात अवतार घेतले आहेत. आणि इतर कोणाचेही नाही इतके आपले तत्त्वज्ञान तात्त्विक आहे. इतर तत्त्व-ज्ञानांचा भर माहिती देण्यावर आहे तर भारतीय तत्त्वज्ञानाचा भर परिवर्तनांवर आहे. आपल्या संकल्पना, मूल्ये आणि अंतर्दृष्टी जगातल्या कुठल्याही महापुरुषाला आकर्षित करून घेण्याइतकी समर्थ असल्याचे स्पष्ट झाले आहे. उदाहरणार्थ— केंद्रापासून दशदिशांना धावत सुटण्याची प्रवृत्ती असणाऱ्या व्यक्तीचे चित्त कसे थाऱ्यावर आणावे, हा गहन प्रश्न योगाच्या माध्यमातूनच उत्तम रीतीने सोडवला जाऊ शकतो. माणसाच्या नेणिवा, त्याची स्वप्ने, त्याची प्रतीके, शरीरशास्त्राचा मानसशास्त्राशी असणारा निकटचा संबंध यांचा इतका चांगला समन्वयात्मक विचार दुसऱ्या कोणत्याही संस्कृतीने केलेला नाही. इ. इम. फॉर्स्टर यांनी 'पॅसेज टु इंडिया'मध्ये म्हटल्याप्रमाणे "माणसाच्या आयुष्यातला प्रचंड गोंधळ व्यक्त करण्याचे काम इस्लामपेक्षा किंवा ख्रिस्ती धर्मापेक्षा

हिंदू तत्त्वज्ञानच अधिक चांगल्या रीतीने पार पाडते. त्या गोंधळावर मात करण्याचा योग्य मार्गदेखील तेच सुचवते." गीता ही केवळ भारतीय क्रांतिकारकांचीच मार्गदर्शक नव्हती, तिने तुर्की क्रांतिकारकांना आणि अरबी संतमाहात्म्यांनादेखील प्रेरणा दिली आहे. काही काळापूर्वी तुर्कस्थानने गीतेवर 'राजद्रोही वाङमय' म्हणून बंदी घातली होती, हे या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे.

हिंदू धर्माबद्दल जगाला वाटणारे हे आगळे आकर्षण काही नव्याने निर्माण झालेले नाही. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी भारतीयांना बाटवण्याचे वर्षानुवर्षे प्रयत्न चालवले आहेत. अगदी अलीकडे म्हणजे १९५४ साली बिली ग्रॅहम यांनी अमेरिकेतल्या एबीसी दूरचित्रवाणीवरून अशी इच्छा प्रकट केली होती की– 'हा हिंदू धर्म नाहीसा व्हायला हवा आहे.' ते ध्येय तलवारीच्या साहाय्याने गाठण्याचे त्यांनी प्रयत्न केले नाहीत आणि यदाकदाचित त्यांनी तसे प्रयत्न केले असते तरी ते सफल झाले नसतेच. त्यामुळे त्यांनी मार्ग स्वीकारला तो हिंदू धर्मग्रंथांचे अध्ययन करून ते खोटे किंवा मूर्खपणाचे ठरवण्याचा. पण तसे अध्ययन सुरू केल्यावर त्यांना वेगळाच साक्षात्कार घडला. त्यांच्यापैकी काहीजणांनी जरी आपल्या धर्मग्रंथांच्या मूळ संहितेचा विपर्यस्त अर्थ लावण्याची काही ठिकाणी खटपट केली, तरी बहुतेकजण आपल्या कामात प्रामाणिकपणाने वागले. मॅक्सम्युल्लरसारख्या मिशनरी विद्वानाला भारत ख्रिस्ती झालेला पाहाणे निश्चितच आवडले असते, पण तसे काही करण्याऐवजी त्यांनी पुस्तक लिहिले– 'भारत आपल्याला काय शिकवू शकेल?' त्यांनी म्हटले होते की, "तुम्ही तुमच्या विशेष अध्ययनासाठी मानवी मनोव्यापारांचा कोणताही पैलू निवडा– मग तो भाषाविषयक असो वा धर्मविषयक असो, पुराणे किंवा तत्त्वज्ञानाबद्दल असो किंवा कायदेकानू आणि प्रथांबद्दल असो, आदिमानवाच्या कलेविषयी असो किंवा विज्ञानाविषयी असो– तुम्हाला भारताकडेच मार्गदर्शनार्थ जावे लागेल– मग ते तुम्हाला आवडो वा न आवडो! कारण मानवी इतिहासाबद्दलची अत्यंत मौल्यवान आणि माहितीपूर्ण साधने भारतात आणि एकट्या भारतातच संग्रहित केलेली आढळतात!"

जनरल चार्लस स्टुअर्ट १७७७ साली भारतात आला. तो लौकरच

हिंदू झाला. पुढे १८२२ साली जेव्हा तो सेवानिवृत्त झाला तेव्हा कलकत्त्याला वुड स्ट्रीटवरील त्याच्या घरात असंख्य मूर्ती आढळल्या. आणि सर. सी. पी. रामस्वामी अय्यर यांनी इंग्लंडचे पंतप्रधान श्री. रामसे मॅक्डोनाल्ड यांना एकदा जेवताना धोतर नेसायला लावले होते.

ज्यांच्यावर आपण अधिराज्य गाजवतो आहोत त्या लोकांमध्ये काही चांगले आहे, हे मान्य करणे अनेक ब्रिटिशांना कठीण जात होते, पण जर्मनांमध्ये अशा प्रकारचा कोणताही गंड निर्माण झालेला नव्हता. हिंदू विचारांच्या अध्ययनाने त्यांना वेगळ्या प्रकारचे समाधान मिळत होते. म्हणूनच शोपेनहॉवरसारख्या तत्त्ववेत्त्याने 'सर्व चांगल्या गोष्टींचे मूळ गंगा नदीच्या पवित्र किनाऱ्यावर सापडेल,' असे म्हटले होते.

अनेक वर्षांपूर्वी मानसशास्त्रज्ञ जंग यांनी असे म्हटले होते की, "भारतीय विचारांच्या पश्चिमेवरील प्रभावाचे मोल कमी मानले जाता कामा नये. तो प्रभाव युरोपमधील बुद्धिवंतांच्या आयुष्यात फारच थोडा जाणवतो आहे. मानवजातीच्या प्रचंड सागरातली ती छोटीशी विखुरलेली बेटे आहेत, असे आपण मानतो आहोत. प्रत्यक्षात मात्र ती समुद्रतळाशी असणाऱ्या प्रचंड पर्वतांची शिखरे आहेत."

आज केवळ ही पर्वतशिखरेच नव्हेत तर त्या पर्वतांचेही आणखी थोडेफार दर्शन जगाला घडते आहे. हिंदू धर्मविचार आणि आचार आज पाश्चिमात्य देशांत चांगलाच मूळ धरू लागला आहे. स्टालिनकन्या स्वेतलानानेदेखील गंगेच्या तीरावर एका झोपडीत आयुष्य घालवण्याची इच्छा प्रदर्शित केली होती. इतिहासकार टॉयनबी यांना एकदा असे विचारण्यात आले होते की, "तुमचा परमेश्वरावर विश्वास आहे का?" थोडावेळ थांबून त्यांनी उत्तर दिले होते– "हो, ज्या अर्थाने हिंदूंचा परमेश्वरावर विश्वास आहे त्या अर्थाने मी देखील परमेश्वर मानतो."

यात आश्चर्य मानण्याजोगे काहीच नाही. कारण हिंदूंची परमेश्वराविषयीची संकल्पना इतर संकल्पनांपेक्षा अधिक नैसर्गिक, अधिक मानवी आणि अधिक वैज्ञानिकही आहे. 'सोका गक्कई' या जपानमधल्या रा. स्व. संघाच्याच धर्तीच्या संघटनेचे नेते श्री. इकेदा यांच्याबरोबरच्या एका संभाषणात टॉयनबी यांनी ही वस्तुस्थिती अत्यंत

समर्पकपणे विशद केली होती. ते म्हणाले होते, "ज्युडेइझम, ख्रिश्चन धर्म किंवा इस्लाम धर्म या ज्युडेइक धर्मांनी विश्वातले ईश्वरी तत्त्व विश्वाबाहेरील आगळ्या वेगळ्या, सर्वसाक्षी, सर्वशक्तिमान अशा विश्वनिर्मात्या परमेश्वरापुरतेच मर्यादित केले. ईश्वरी तत्त्व अशारीतीने सीमित केल्यामुळे निसर्गाचे– यात मानवी स्वभावही आलाच– पावित्र्यच नाहीसे झाले. याउलट भारतात आणि पूर्व आशियाई देशांत आधुनिक पश्चिमेचा प्रभाव पडण्यापूर्वीच्या काळात– सारे विश्व आणि त्या विश्वातील प्रत्येक वस्तू– अमानवी निसर्ग आणि खुद्द माणसासह सर्व वस्तू– ईश्वरीच मानण्यात येत आणि साहजिकच माणसाच्या लेखी त्या सर्व वस्तूंना एकप्रकारचे पावित्र्य लाभले होते, एक प्रकारची प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. साहजिकच अमानवी निसर्ग तुडवून टाकण्याच्या माणसाच्या स्वार्थी स्वभावाला लगाम घातला गेला होता. भारताची व पूर्व आशियाची भूमिका अनेकेश्वरी आहे, तर ज्युडेइक भूमिका एकेश्वरी आहे. अनेकेश्वरी विचारसरणीनुसार ईश्वरी शक्ती संपूर्ण विश्वात भरून राहिली आहे आणि विश्वातल्या प्रत्येक वस्तूत तिचे अस्तित्व जाणवू शकते. एकेश्वरी विचारसरणीनुसार मात्र या विश्वापेक्षा ईश्वरी शक्ती वेगळी मानण्यात येते, तिला बाहेरची ठरवण्यात येते आणि साहजिकच ती माणसापासून दूर जाते. जुन्या जगाच्या पश्चिम टोकाला असणाऱ्या देशांत आणि अमेरिकेत जी मूळ स्थानिक संस्कृती– मध्य अमेरिकन, पेरुव्हियन, सुमेरियन, ग्रेकोरोमन, इजिप्शियन आणि एकेश्वरी होण्यापूर्वीची इस्रायली लोकांची कॅननाइट संस्कृती– नांदत होती तिचे या भारतातल्या आणि पूर्व आशियातल्या संस्कृतीशी बरेचसे साम्य होते. ज्युडेइकपूर्व सर्व संस्कृतींमध्ये धर्म हा अनेकेश्वरीच होता, तो एकेश्वरी कधीच नव्हता. ज्युडेइक एकेश्वरी धर्मांचे आणि ख्रिस्तानंतर तसल्याच पर्यायांचे आजचे उपासक हे पूर्वाश्रमीचे अनेकेश्वरीच आहेत. ही ऐतिहासिक वस्तुस्थिती असे सूचित करते की एकेश्वरी तत्त्वज्ञानात निसर्गाचा जो अनादर केला जातो त्याचे दुष्परिणाम आता लक्षात आल्यानंतर तरी या एकेश्वरी धर्मांचे अनुयायी पुन्हा अनेकेश्वरी तत्त्वज्ञानाकडे वळतील, अशी अंधुकशी आशा बाळगण्यास अजूनही जागा आहे."

या शतकाच्या प्रारंभी डॉ. ॲनी बेझंट म्हणाल्या होत्या, “चाळीस वर्षांहूनही अधिक काळ जगातल्या सर्व मोठ्या धर्मांचा अभ्यास केल्यानंतर मला असे आढळून आले आहे की हिंदू धर्म या नावाने ओळखल्या जाणाऱ्या धर्माइतका दुसरा कोणताही धर्म परिपूर्ण नाही, वैज्ञानिक नाही, तत्त्वशुद्ध नाही आणि आध्यात्मिकही नाही. तुमचे त्या धर्माबद्दलचे ज्ञान जसजसे वाढत जाईल तसतसे तुमचे त्याच्याबद्दलचे प्रेमही वाढत जाईल. तो जाणून घेण्याचा तुम्ही जितका अधिक प्रयत्न कराल तितके तुम्हाला त्याचे मोल अधिक समजेल. या हिंदू धर्माशिवाय भारताला मुळीच भवितव्य नाही, हे निश्चित- लक्षात घ्या. भारतीय वृक्षाची पाळेमुळे या हिंदू धर्माच्या भूमीतच रुजलेली आहेत, ती मुळे कापून टाकण्यात आली तर मुळापासून कापलेला वृक्ष वठतो तसा भारत देशही वठून जाईल ! भारतात आज अनेक धर्म आणि अनेक वंश नांदत असले तरी दुसरा कोणताही धर्म या देशातील राष्ट्रजीवनाच्या प्रभातकाळापर्यंत पोचू शकत नाही आणि राष्ट्र म्हणून टिकून राहाण्यासाठीदेखील दुसरा कोणताही धर्म हिंदू धर्माइतका आवश्यकही नाही ! बाकीचे धर्म येतील आणि आले तसे जातील, पण भारत तसाच राहील. हिंदू धर्म नामशेष झाला तर मात्र भारताचे अस्तित्व कोणत्या स्वरूपात राहील ? भूतकाळाचा निव्वळ एक भौगोलिक आविष्कार, विगत वैभवाची अस्पष्टशी स्मृती ! या देशाच्या इतिहासावर, वाङमयावर, कलेवर, स्मारकांवर सर्वत्र हिंदू धर्माची मुद्रा खोलवर उमटलेली आहे. आणि जर खुद्द हिंदूंनीच हिंदू धर्म पाळला नाही तर मग त्याचे रक्षण कोण करील ? जर या देशाचे सुपुत्रच या मातीतून जन्मलेल्या धर्माशी प्रामाणिक राहिले नाहीत तर मग दुसरे कोण बरे त्याच्या रक्षणासाठी धावून येतील ! भारतच भारताचे रक्षण करू शकेल आणि भारत व हिंदू धर्म हे एकच आहेत !”

लोकमान्य टिळक म्हणाले होते, “आज भारतात ख्रिश्चन मिशनरी जसा ख्रिस्तीधर्माचा प्रचार करीत आहेत तसा आपण सर्व जगात सनातन धर्मांचा प्रचार करायला हवा. आधुनिक विज्ञान हळूहळू आपले प्राचीन ज्ञान खरे असल्याचे सिद्ध करीत आहे, त्यामुळे आपले श्रेष्ठत्व

प्रस्थापित होते आहे. म्हणून आपण सर्वांनी संघटित होऊन सनातन-धर्माचा प्रचार करायला हवा. आपण या राष्ट्राचे पुनरुज्जीवन घडवून आणू या, एक युग निर्माण करू या आणि सारे जग आर्य बनवू या. या कामासाठी आज जरी माणसे पुढे आलेली आपल्याला दिसली नाहीत तरी पुढच्या पिढीत मात्र ती मिळतील, अशी आपण आशा करू या!

स्वामी विवेकानंदांच्या अमेरिकन शिष्या भगिनी निवेदिता यांनी तर हिंदू धर्माने आक्रमक बनावे असा आग्रह धरला होता. त्या म्हणाल्या होत्या, "जर हिंदूंनी दररोज सकाळ-संध्याकाळ फक्त दहा मिनिटे सामूहिकरीत्या प्रार्थना करावयाचे ठरवले तर त्यांचा समज अजिंक्य होईल." आणि श्री गुरुजी म्हणाले होते, "राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची दैनंदिन शाखा म्हणजे त्या निष्ठावंत आत्म्याने कळकळीने पाहिलेल्या त्या स्वप्नाचीच पूर्तता होय!"

अमेरी दी रिएनकोर्ट या फ्रेंच तत्त्ववेत्त्या इतिहासकाराने म्हटले आहे की, "या पृथ्वीतलावरील प्रत्येक जुन्या संस्कृतीप्रमाणे भारतही आपल्या मूलस्रोतांकडेच वळत आला आहे आणि यापुढील काळात त्याचा त्या दिशेने असणारा कल अधिकच वाढेल. त्या जुन्या संस्कृतीच्या सखोल गाभ्यातूनच आधुनिक जगातील समस्यांवर मात करण्याचे सामर्थ्य भारत मिळवील. कालनिरपेक्ष हिंदू धर्माच्या कोणत्या ना कोणत्यातरी वैशिष्टयपूर्ण पैलूचा– कमीअधिक प्रमाणात त्याला आधुनिक साज चढवून– जाहीरपणे स्वीकार करणाऱ्या पक्षालाच भारतीय जनता हार्दिक पाठिंबा देईल, याबाबत शंका नाही." काल तो पाठिंबा गांधी-वादाला मिळत होता. उद्या कदाचित तो रा. स्व. संघाला मिळू लागेल!

रा. स्व. संघाचे भारताच्या आणि जगाच्या दृष्टीने महत्त्व आहे ते असे! आजमितीला तरी रा, स्व. संघ फक्त भारतात आणि हिंदू-मध्येच कार्य करीत आहे. पण त्याची कार्यकक्षा जगाला सामावून घेईल इतकी व्यापक आहे. श्री गुरुजी म्हणाले होते, "आपल्याला पश्चिमेला मार्ग दाखवायचा आहे."

आज रा. स्व. संघ या अशा ठिकाणी येऊन उभा आहे!

## प्रातःस्मरणम्

करा‍ग्रे वसते लक्ष्मीः करमध्ये सरस्वती ।
करमूले तु गोविन्दः प्रभाते करदर्शनम् ॥ १ ॥
समुद्रवसने देवि ! पर्वतस्तनमण्डले ।
विष्णुपत्नि ! नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे ॥ २ ॥

ब्रह्मा मुरारीस्त्रिपुरान्तकारी
भानुः शशी भूमिसुतो बुधश्च ।
गुरुश्च शुक्रः शनि-राहु-केतवः
कुर्वन्तु सर्वे मम सुप्रभातम् ॥ ३ ॥
सनत्कुमारः सनकः सनन्दनः
सनातनोऽप्यासुरिपिङ्गलौ च ।
सप्त स्वराः सप्त रसातलानि
कुर्वन्तु सर्वे मम सुप्रभातम् ॥ ४ ॥
सप्तार्णवाः सप्त कुलाचलाश्च
सप्तर्षयो द्वीपवनानि सप्त
भूरादि कृत्वा भुवनानि सप्त
कुर्वन्तु सर्वे मम सुप्रभातम् ॥ ५ ॥
पृथ्वी सगन्धा सरसास्तथापः
स्पर्शी च वायुर्ज्वलनं च तेजः :
नभः सशब्दं महता सहैव
कुर्वन्तु सर्वे मम सुप्रभातम् ॥ ६ ॥

महेन्द्रो मलयः सह्यो देवतात्मा हिमालयः :
ध्येयो रैवतको विन्ध्यो गिरिश्चारावलिस्तथा ॥ ७ ॥
गंगा सिन्धुश्च कावेरी यमुना च सरस्वती ।
रेवा महानदी गोदा ब्रह्मपुत्रः पुनातु माम् ॥ ८ ॥
अयोध्या मथुरा माया काशी काञ्ची अवन्तिका ।
पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिकाः ॥९॥

प्रयागं पाटलीपुत्रं विजयानगरं पुरीम् ।
इन्द्रप्रस्थं गयां चैव प्रत्यूषे प्रत्यहं स्मरेत् ॥१०॥

अरुन्धत्यनुसूया च सावित्री जानकी सती ।
तेजस्विनी च पाञ्चाली वन्दनीया निरन्तरम् ॥११॥

लक्ष्मीरहल्या चन्नम्मा मीरा दुर्गावती तथा ।
कण्णगी च महासाध्वी शारदा च निवेदिता ॥१२॥

वैन्यं पृथुं हैहयमर्जुनं च
शाकुन्तलेयं भरतं नलं च ।
रामं च यो वै स्मरति प्रभाते
तस्यार्थलाभो विजयश्च हस्ते ॥१३॥

दध्यङ मनुर्भुगुरसौ हरिपूर्वचन्द्रो,
भीष्मार्जुन-ध्रुव–वशिष्ठ–शुकादयश्च ।
प्रल्हाद नारद-भगीरथ-विश्वकर्म-
वाल्मीकयोऽत्र चिरचिन्त्यशुभाभिधानाः ॥१४॥

अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमांश्च बिभीषणः ।
कृपः परशुरामश्च सप्तैते चिरजीविनः ॥१५॥

सप्तैतान संस्मरेन्नित्यं मार्कण्डेयमथाष्टमम् ।
जीवेद् वर्षशतं साग्रमपमृत्युविवर्जितः ॥१६॥

पुण्यश्लोको नलोराजा पुण्यश्लोको युधिष्ठिरः ।
पुण्यश्लोको विदेहश्च पुण्यश्लोको जनार्दनः ॥१७॥

बुद्धो जिनेन्द्रो गोरक्षः शङ्करश्च पतञ्जलिः ।
रामानुजोऽथ चैतन्यः कबीरो गुरुनानकः ॥१८॥

ज्ञानेश्वरस्तुकारामः समर्थो मध्ववल्लभौ ।
नरसिस्तुलसीदासः कम्बः साधुकुलोत्तमाः ॥१९॥

नायन्मारालवाराश्च तिरुवल्लुवरस्तथा ।
वितरन्तु सदैवैते दैवीं मे गुणसम्पदम् ॥२०॥

अगस्त्यः कम्बुकौण्डिन्यौ राजेन्द्रश्चोलभूषणः ।
सर्वे दिग्जयिनः ख्याताः शैलेन्द्रो बप्परावलः ॥२१॥

चाणक्यश्चन्द्रगुप्तश्च विक्रमः शालिवाहनः ।
अशोकः पुष्यमित्रश्च खारवेलः सुनीतिमान् ॥२२॥
हूणजेता यशोधर्मा समुद्रो गुप्तवंशजः ।
श्रीकृष्णदेवरायश्च प्रदाता हर्षवर्धनः ॥२३॥
साधुः शङ्करदेवश्च तथा सायणमाधवौ ।
प्रतापः शिवराजश्च गोविन्दो बसवेश्वरः ॥२४॥
रामकृष्णो दयानन्दो रवीन्द्रो राममोहनः ।
रामतीर्थोऽरविन्दश्च विवेकानन्द उद्यशः ॥२५॥
तिलको रमणश्चैव सुधीर्नारायणो गुरुः ।
महामना मालवीयो महात्मा गान्धिरेव च ॥२६॥
केशवः संघनिर्माता हेडगेवारवंशजः ।
सन्ततं चिन्तयेदेतान् हिन्दुभूमिसुतोत्तमान् ॥२७॥
अनुक्ता ये भक्ता हरिचरणसंसक्त हृदया
अविज्ञाता वीरा अधिसमरमुध्वस्तरिपवः ।
महात्मानः सन्तो भरतभुवि ये सन्ति च परे
नमस्तेभ्यो भूयादुषसिसकलेभ्यः प्रतिदिनम् ॥२८॥
रत्नाकराधौतपदां हिमालयकिरीटिनीम् ।
ब्रह्मराजर्षिरत्नाढ्यां वन्दे भारतमातरम् ॥२९॥
प्रातःस्मरणमेतद् यो विदित्वाऽऽदरतः पठेत् ।
स सम्यग् धर्मनिष्ठः स्यात् संस्मृताखण्डभारतः ॥३०॥

॥ भारत माता की जय ॥

# प्रातःस्मरणाचे महत्त्व

प्रत्येक राष्ट्राचे स्वतःचे असे एक व्यक्तिमत्त्व असते. त्याचा प्रवाह अखंडपणे चालत आलेला असेल तर ते राष्ट्र जिवंत आहे, असे म्हटले जाते. राष्ट्राचे हे व्यक्तिमत्त्व नष्ट झाले आणि त्याच्या ठिकाणी सर्वस्वी वेगळे व्यक्तिमत्त्व, परंपरा आणि जीवनप्रणाली प्रस्थापित झाली तर ते राष्ट्र मृत झाले आहे, असेच म्हणावे लागते. वास्तविक देश (भूमी) तोच असला आणि त्यातील माणसेही तीच असली, परंतु परंपरा खंडित झाली व त्या भूमीचे, तेथील समाजाचे राष्ट्रजीवन समाप्त होऊन तेथे दुसराच जीवनप्रवाह प्रस्थापित झाला तर त्या दुसऱ्या स्वभावाच्या राष्ट्रजीवनाने पूर्वीच्यावर अधिकार प्राप्त केला आहे असे म्हणावे लागते. आपल्या राष्ट्र-शरीरात दुसऱ्या कोणा जीवाचा प्रवेश व्हावा आणि आपले वास्तविक राष्ट्र-जीवन संपुष्टात यावे अशी स्थिती कोणत्याही व्यक्तीला सहन होणे शक्य नाही. अशा प्रकारच्या संकटापासून राष्ट्राला सुरक्षित ठेवण्यासाठी राजकीय व आर्थिक क्षेत्रात प्रयत्न करणे ज्याप्रमाणे आवश्यक असते, त्याहीपेक्षा अधिक प्रयत्न राष्ट्रातील व्यक्तिव्यक्तीच्या अंतःकरणात मातृभूमीविषयी श्रद्धायुक्त भक्ती, स्वधर्म आणि स्वसंस्कृती यांच्याबद्दल ज्ञानपूर्वक निष्ठा, आपल्या उज्ज्वल भूतकालातील स्मृतीतून निर्माण झालेला अदम्य आत्मविश्वास आणि विजिगिषू वृत्ती इत्यादी श्रेष्ठ भाव जागृत ठेवण्यासाठी करणे हे अधिक महत्त्वाचे आहे

सर्वसामान्य माणसाच्या अंगी हें गुण आढळण्याची शक्यता कमी आहे ; कारण मातृभूमीच्या स्वरूपाचे, राष्ट्राच्या धार्मिक, सांस्कृतिक, इत्यादी प्रकाराच्या इतिहासाचे, तत्त्वज्ञानाचे ज्ञान प्राप्त करून घेण्याइतकी अनुकूल परिस्थिती फारच थोडयांना उपलब्ध होणे संभवनीय आहे. आणि या अडचणीतून मार्ग काढून प्रत्येक व्यक्तीला संस्कारित करण्याची आवश्यकता तर आहे. व्यक्तिमात्रावर असे संस्कार व्हावेत म्हणून मातृभूमीचे भौगोलिक वर्णन, तीमधील तीर्थक्षेत्रांचे वर्णन, तसेच संस्कृतीचे श्रेष्ठ मौलिक सिद्धांत ज्या महापुरुषांनी आपल्या जीवनात उतरवून स्वतःच्या आचरणाने पुढील पिढयांना त्या सिद्धांताचे प्रत्यक्ष उदाहरण घालून दिले, तसेच भावी पिढयांना त्या सिद्धांताबद्दल प्रेम आणि भक्ती निर्माण करून त्यानुसार परिपूर्ण जीवन जगण्याची प्रेरणा व ते सिद्धान्त आपण आत्मसात करू शकतो असा आत्मविश्वास जागृत केला, त्या महापुरुषाचे पवित्र स्मरण, त्यांच्या पवित्र नामोच्चाराने जागृती, गौरवशाली इतिहासातील विजयी प्रसंगांचे, पराक्रमी पुरुषांचे, साधुसंतांचे, निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये आपल्या राष्ट्राला महत्पद प्राप्त करून देणाऱ्या महानुभावांचे, त्यांना ज्या गुणामुळे श्रेष्ठत्व प्राप्त झाले त्या गुणांसह त्यांचे स्मरण दररोज करण्याची पद्धती सुरु होणे ही एक अत्यंत उपकारक गोष्ट ठरेल. आपल्या राष्ट्राची ही एक महत्त्वाची गरज लक्षात घेऊन, आपल्या संपूर्ण समाजासाठी परमप्रिय वंदनीय देववाणी संस्कृत भाषेत सोप्या वृत्तांमध्ये काव्यपंक्तींद्वारा अशा प्रकारचे स्मरण करण्यासंबंधीची योजना नागपूर विद्यापीठाचे संस्कृतचे प्राध्यापक

श्रीमान डॉ. श्रीधर भास्कर वर्णेकर यांनी आखली. संस्कृत भाषेमध्ये सरस भाषण व लेखन करण्यामध्ये डॉ. वर्णेकर सिद्धहस्त आहेत, तसेच संस्कृत भाषेच्या प्रचारासाठी ते अविश्रांत मेहनत घेत असतात. त्यांनी आपल्या ओजस्वी, प्रसादपूर्ण शैलीमध्ये हे प्रातःस्मरण अथवा भारतभक्ती-स्तोत्र रचिले आहे. राष्ट्रीय एकात्मतेचे पोषण होण्याच्या दृष्टीनेही संस्कृत भाषेचा यासाठी केलेला वापर अत्यंत आवश्यक व उचित असाच आहे. संस्कृत भाषा ही आपल्या सर्व प्रादेशिक भाषांची प्रत्यक्ष वा परंपरेने जीवनदात्री होय व तिच्या माध्यमातून सर्व भाषाभाषीयांमधील मौलिक एकराष्ट्रीयता अनुभवाला येते. म्हणूनच हे स्तोत्र संस्कृत भाषेत रचले आहे. हे श्लोक सहज पाठ होऊ शकतील. प्रत्येक व्यक्तीने दररोज सकाळच्या पवित्रसमयी हे स्तोत्र म्हटल्याने चांगले संस्कार, जागृती आणि दृढीकरण या दृष्टीने उपकारक ठरेल असा मला विश्वास वाटतो.

प्रत्येक दिवशी अर्थ लक्षात घेऊन हे स्तोत्र म्हटल्याने राष्ट्राबद्दल प्रबळ भक्ती उत्पन्न होईल, राष्ट्रसेवेसाठी उत्तम गुण प्राप्त करून घेण्याची क्षमता वाढेल आणि स्वार्थरहित खरी राष्ट्रसेवा करण्याची इच्छा उत्तरोत्तर वाढत जाईल असा मला विश्वास वाटतो. आपल्या भारताचा विस्तार फार मोठा आहे, हे तर उघडच आहे. त्यामध्ये पुण्यक्षेत्रे खूप आहेत. त्या सर्वांचा नामोल्लेख या स्तोत्रात करणे अशक्यच आहे. म्हणून काहींचा अंतर्भाव यात केला आहे. इतरांसंबंधी अश्रद्धा असल्यामुळे ती वगळली असे समजू नये. परंतु विशिष्ट मर्यादेत स्तोत्ररचना करणे आवश्यक असल्यामुळे त्यामध्ये काही क्षेत्रांचा अंतर्भाव झाला आहे व काहींचा उल्लेख झालेला नाही. श्रेष्ठ पुरुषांच्या नामावलीसंबंधातही असेच झाले आहे. तसे पाहिले तर आपल्या देशाचा इतिहास प्राचीन कालापासूनचा आहे. या प्रदीर्घ काळात देशाच्या कानाकोपऱ्यात असामान्य श्रेष्ठ पुरुष इतक्या मोठ्या संख्येने सतत उत्पन्न होत आहेत की त्या सर्वांचा उल्लेख अशा प्रकारच्या स्तोत्रात करणे केवळ अशक्य आहे. म्हणून वेगवेगळ्या कालखंडातील निरनिराळ्या क्षेत्रात चमकणारी काही नावेच यामध्ये घेतली आहेत. त्यांच्याबद्दलची सामान्य माहिती मिळवून त्यांच्याबद्दल आदरयुक्त श्रद्धा उत्पन्न व्हावी व त्यांच्या संपूर्ण चरित्रांचा अभ्यास करण्याची प्रेरणा मिळावी; तसेच आपल्या इतिहासाचे यथार्थ व सांगोपांग अध्ययन करून आपले राष्ट्रजीवन अधिक पवित्र, ऊर्ज्जस्वल बनविण्यासाठी जीवन अर्पण करण्याची प्रेरणा व शक्ती सर्वांना मिळावी हा हेतू बाळगून येथे काही निवडक नावांचा उल्लेख केलेला आहे. मला आशा व विश्वास आहे की, हे भारत-भक्ति-स्तोत्र दैनंदिन प्रातःस्मरणाच्या रूपाने देशामधील सर्व व्यक्तींच्या नित्य पाठात येईल व आपल्या देशबंधूंची राष्ट्रभक्ती व कर्मशक्ती जागृत करून राष्ट्राची सर्वांगीण उन्नती करण्यामध्ये महत्त्वाचा वाटा उचलील.

— प. पू. श्री. गुरुजी

## रा. स्व. संघाची प्रार्थना

नमस्ते सदा वत्सले मातृभूमे
त्वया हिन्दुभूमे सुखँव् वर्धितोऽहम् ।
महामङगले पुण्यभूमे त्वदर्थे
पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते ।। १ ।।

प्रभो शक्तिमन् हिन्दुराष्ट्राङगभूता
इमे सादरन् त्वान् नमामो वयम्
त्वदीयाय कार्याय बद्धा कटीयम्
शुभामाशिषन् देहि तत्पूर्तये ।
अजय्याञ् च विश्वस्य देहीश शक्तिम्
सुशीलञ् जगद् येन नम्रं भवेत्
श्रुतञ् चैव यत् कण्टकाकीर्णमार्गम्
स्वयम् स्वीकृतन् नस् सुगङकारयेत् ।। २ ।।

समुत्कर्षनिश्श्रेयसस्यैकमुग्रम्
परम् साधनम् नाम वीरव्रतम्
तदन्तस् स्फुरत्वक्षया ध्येयनिष्ठा
हृदन्तः प्रजागर्तु तीव्राऽनिशम् ।
विजेत्री च नस् संहता कार्यशक्तिर्
विधायास्य धर्मस्य संरक्षणम्
परवँ वैभवन् नेतुमेतत् स्वराष्ट्रम्
समर्था भवत्वाशिषा ते भृशम् ।। ३ ।।

।। भारत-माता की जय ।।

## प्रार्थनेचा अर्थ

हे वत्सल अशा मातृभूमे, मी तुला सदैव नमस्कार करतो. हे हिंदुभूमे, तू माझे सुखाने पालनपोषण केलेले आहेस. हे महामंगलमयी पुण्यभूमे, तुझ्यासाठी माझा हा देह समर्पण होवो. मी तुला पुन्हा पुन्हा वंदन करतो.

हे सर्वशक्तिमान परमेश्वरा, हिंदुराष्ट्राचे आम्ही पुत्र तुला सादर प्रणाम करतो. तुझ्याच कार्यासाठी आम्ही कटिबद्ध झालो आहोत. त्या कार्याच्या पूर्ततेसाठी आम्हाला तू शुभाशीर्वाद दे. हे प्रभू, आम्हाला अशी शक्ती दे की, जिला आव्हान देण्याचे धैर्य जगातील अन्य कुणा शक्तीला व्हावयाचे नाही. असे शुद्ध चारित्र्य दे की, ज्या चारित्र्यापुढे संपूर्ण विश्व नतमस्तक होईल. आणि असे ज्ञान दे की, ज्यामुळे आम्ही स्वतः होऊन पत्करलेला हा काटयाकुटयांनी भरलेला मार्ग सुगम होईल.

उच्च असे आध्यात्मिक सुख आणि महानतम अशी ऐहिक समृद्धी प्राप्त करण्याचे एकमेव श्रेष्ठतम असे साधन असलेली उग्र अशा वीर-व्रताची भावना आमच्यांत सदैव उत्स्फूर्त होत राहो. तीव्र आणि अखंड अशी ध्येयनिष्ठा आमच्या अंतःकरणात सदैव जागती राहो. तुझ्या कृपेने आमची ही विजयशालिनी संघटित कार्यशक्ती आमच्या धर्माचे संरक्षण करून या राष्ट्राला वैभवाच्या उच्चतम शिखरावर पोहोचविण्यास समर्थ होवो.

भारत माता की जय !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०३२
ग्रा. क्र. २४९८७
विभाग ९७।४।८४
संघ, शाखा (स्थळ प्रत)